




**सप्रेम नमस्कार,**

**आपली प्रतिक्रिया जाणण्यास उत्सुक आहोत.**

**आपले स्नेहांकित,**

**सुदेश हिंगलासपूरकर,** विश्वस्त

**अरुण जोशी,** कार्यकारी संपादक

**धनश्री धारप, योगिता मोरे,**

**अनिरुद्ध गद्रे, महेश खरे,**

**दिपाली माने, सौमित्र शिंदे,**

**किशोर कांबळे आणि**

**हरिप्रसाद जयस्वाल**

## दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!



# शब्द रुची ४८

दिवाळी विशेषांक

बदलता काळ, बदलते जीवन

नोव्हेंबर–डिसेंबर २०२३ । मूल्य २५० रु. । पृष्ठे १९२




महाराष्ट्र शासन
नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
विकासाचे
तेजोमय पर्व...
योजना कल्याणकारी : शासन आपल्या दारी
नमो शेतकरी महासन्मान योजना : शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ
लेक लाडकी योजना : मुलीच्या जन्माला मायेचा आधार
महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजना : आरोग्यम् धनसंपदा
हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग : राज्याच्या समृद्धीची भाग्यरेषा
मुंबई पारबंदर प्रकल्प-मुंबई व नवी मुंबई : वाहतूक व्यवस्थेचा कायापालट
प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र : कुशल महाराष्ट्र, रोजगारयुक्त महाराष्ट्र
दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा!
देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
अजित पवार
उपमुख्यमंत्री
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन
www.mahasamvad.in
MaharashtraDGIPR
MahaDGIPR



Azadi Ka Amrit Mahotsav
बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक
G20
भारत 2023 INDIA
आता सणांचा आनंद होईल, आणखी द्विगुणित
शुभ दिपावली
महाबँकेतर्फे सर्वांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !
दिवाळी बोनान्झा ऑफर्स
शून्य प्रक्रिया शुल्क
महासुपर गृह कर्ज
व्याजदर 8.50%* पासून
महासुपर कार कर्ज
व्याजदर 8.70%* पासून
*नियम व अटी लागू
व्हॉट्स ॲप बँकिंग : 70660 36640 या क्रमांकावर "Hi" पाठवा !
मिस्ड कॉल द्या : 8010 614 614
www.bankofmaharashtra.in
फॉलो करा : @mahabank
डिजिटली अर्ज करण्यासाठी क्यू आर कोड स्कॅन करा



सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था
पुस्तकांचं गाव
भारतातील पहिलं पुस्तकांचं गाव
३० घरे, २८ साहित्यप्रकार,२५ हजाराहून अधिक पुस्तके
मु. पो. भिलार, ता. महाबळेश्वर, जि. सातारा-४१२८०४
संपर्क - ०२१६८-२५०१११
pustakanchgaav.rmvs@gmail.com
* निर्मितीसाहाय्य योजनेचा लाभ घ्या... उत्तम संदर्भसाधने मराठीत आणा....
* युनिकोड,विकिपीडिया कार्यशाळा विविध प्रशिक्षणे यांचा लाभ घ्या.
सुरु असलेले काही महत्त्वाचे प्रकल्प
* मराठीच्या बोलींचे प्रतिमांकन
* बृहन्महाराष्ट्रातील संस्थांना अनुदान
* मराठी संशोधन संस्थांना अनुदान
* मराठी भाषा संस्कृती ज्ञान परीक्षा व निबंध स्पर्धा
* रंगवैखरी-आंतरमहाविद्यालयीन नाट्याविष्कार स्पर्धा
* श्राव्य पुस्तकें - दुसरा टप्पा - ज्ञानेश्वरी
* वस्त्रनिर्मिती माहिती कोश
* मध्यवर्ती ग्रंथालय, बदलापूर
* देवनागरी टंकविषयक पुस्तक
* भाषाविज्ञान शिष्यवृत्ती
* मराठी ग्रंथसूचिमाला (१९८६ ते २०००)
संस्थेच्या संकेतस्थळावरुन उतरवून घ्या.......
* श्राव्य पुस्तके - दासबोध, कृष्णाकाठ, कविता कुसुमाग्रजांची, कविता विंदांची
* अनेक दुर्मीळ पुस्तके, नियतकालिके व संस्थेची निवडक इ-पुस्तके
* युनिकोड आधारित देवनागरी टंक
* माय मराठी - अभ्यास/पाठ्य सामग्री उतरवून घ्या
* दासोपंतकृत गीतार्णव शब्दार्थ संदर्भकोश
* वऱ्हाडी बोलींचा शब्दकोश
* ज्ञानेश्वरी - श्राव्यपुस्तक लवकरच विनामूल्य उपलब्ध
संस्थेची निवडक प्रकाशने
घराघरात ठेवण्यासाठी, शालेय मुलांसाठी, उत्तमोत्तम ज्ञानासाठी, वाचनासाठी...
सर्व प्रकाशने सवलतीत उपलब्ध...प्रकाशनसूची मागवा
अधिक माहितीसाठी संकेतस्थळाला भेट द्या...
राज्य मराठी विकास संस्था (नोंदणी क्र. १६०५४ (मुंबई))
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई-४०० ००१
दूरध्वनी: (०२२)२२६३१३२५, संकेतस्थळ: http://rmvs.marathi.gov.in, इ-पत्ता: rmvs_mumbai@yahoo.com

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

४८

दिवाळी विशेषांक

नोव्हेंबर–डिसेंबर २०२३, वर्ष दहावे
अंक सातवा–आठवा, मूल्य २५० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ व आतील मांडणी : **सतीश भावसार**
आतील चित्रे : **प्रमोद जोशी**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
shabdruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**
**वेबसाइट डिझाइन व डिजिटल एडिटिंग**
**समीर कदम**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ४०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

BHIM UPI
SCAN & PAY
100021052900008.9821032830@idbi

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को–ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५० **(वेळ : दुपारी १ ते ६.३०)**

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.**
**shabdruchee@gmail.com**

**ऑफिस वेळ : दुपारी १ ते सायं. ७**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**



## अनुक्रम

### बदलता काळ, बदलते जीवन

**दिनकर गांगल / १५**
आधी होते संस्कार, मग झाले परिवर्तन; आता, काळ आला क्रांतिसम बदलांचा...

**डॉ. अविनाश सुपे / १९**
आधुनिक तंत्रज्ञान आणि आरोग्यभान

**सुलक्षणा महाजन / २४**
झपाटलेल्या नागरीकरणाची तीन दशके

**माधव ज. जोशी/ २९**
बदलते उद्योगजगत

**सुरेश वांदिले / ६१**
बदलते बालविश्व

**अनुराधा ठाकूर / ६५**
कुठे होतो आणि कुठे आलो

**डॉ. सतीश नाईक / ६९**
डॉक्टर आणि रुग्ण : बदलती मानसिकता

**जान्हवी खांडेकर / ७३**
फॅमिली फर्स्ट!

**शरद काळे / ७७**
हवामानबदल आपण थांबवू शकू?



**सुवर्णा साधू / ८४**
पर्यटनाचे बदलते आयाम

**अमोल साळे / ८७**
आर्टिफिशियल इंटेलिजन्सची रूपं...

**रेणू दांडेकर / १३३**
शिक्षणातील बदलते प्रवाह

**अपर्णा महाजन / १३७**
भाषेविषयी जागरूकता

**प्रा. डॉ. अजय देशपांडे / १४३**
गेल्या तीन दशकांतील मराठी कथा :
काही निरीक्षणे

**सर्वोत्तम ठाकूर / १६९**
आता आणि ते दिवस

**नीला उपाध्ये (पाटील) / १७४**
हे कोणते पुण्य आले फळाला...


## कथा


**डॉ. प्रकाश लोथे / ११**
तिलोत्तमेच्या शोधात

**चांगदेव काळे / ३९**
वहिवाटेच्या काठावरून

**प्रतिभा सराफ / ९४**
त्या बेटावर

**वसंत वसंत लिमये / १४८**
पेंटहाऊस

**सुधीर शं. कुलकर्णी / १७८**
त्रिशंकू




## लेख


**सुरेखा सबनीस / ३४**
कथास्तु!

**अरुण पुराणिक / ४७**
अंबू उर्फ ललिता पवार

**प्रा. नीला कोर्डे / ५०**
वृक्षराजीतील रंभा

**संजीवनी खेर / ५७**
पराक्रमी नूर, भारतीय गुप्तहेर

**डॉ. अजित मगदूम / १००**
एक सजग, सदाबहार शहर

**प्रकाश पेठे / १०६**
सिलिकॉन व्हॅली : एक जादूई जागा

**अपर्णा पाटील / ११३**
बदनाम वस्ती

**राजीव श्रीखंडे / ११८**
वाचनसंस्कृती सजग समाजाचा पाया

**प्रभाकर भिडे / १२२**
एका पुस्तकाची जन्मकथा

**डॉ. अनंत लाभसेटवार / १२७**
तांत्रिक उत्क्रांतीचा आत्मा मायक्रोचिप्स

**कविता १६० ते १६७**
**चंद्रशेखर सानेकर, नीता भिसे, डॉ. दिलीप पांढरपट्टे, प्रवीण दवणे, सदानंद डबीर, लिना संखे, किरण येले, संजय कृष्णाजी पाटील, आश्लेषा महाजन, जितेंद्र कुवर, उषा मेहता, अशोक लोटणकर, हेमंत जोशी, संगीता अरबुने, शिवकुमार आडे, प्रकाश कार्लेकर, रश सोवनी**

वृत्तांत / १८२
ग्रथपरिचय / १८६
ग्रंथपाने – चांगदेव काळे / १८७

# संपादकीय

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा.

संस्कृती कात टाकते, काळानुसार बदलते, ती प्रवाही असते असे आपण शतकानुशतके अनुभवत आहोत. आमच्या वेळी असे नव्हते या वाक्यातही मागच्या पानावरून पुढे असा बदल होता; जो स्वाभाविक होता. तरी मागच्याशी काही नाते होते. मात्र गेल्या तीन दशकांत माणसाचे जगणे सर्वांगांनी इतके बदलले आहे, की त्यापूर्वीचा काळ आणि त्यानंतरचा असे स्पष्ट विभाजन झालेले दिसते. मोठी सांस्कृतिक घुसळण झाली ती साधारण १९९०च्या दशकापासून. संगणक आणि तंत्रज्ञानातली क्रांती नवी फळे देऊ लागली तो हाच काळ. नवे टीव्ही चॅनेल भारतात आले त्यांच्या आरंभाचा हाच काळ. भारताने उदारीकरण, जागतिकीकरण स्वीकारले तोही हाच काळ (१९९१). या साऱ्यातून जीवनशैली वाऱ्याच्या वेगाने बदलत गेली. तो झपाटा इतका, की तोवर जगण्याला असलेले स्थैर्य कालबाह्य झाले. विशेषत: या तीस वर्षांत विविध क्षेत्रांत काय घडले, काय राहिले–काय गेले, त्याचा माणसाच्या जगण्यावर काय इष्ट–अनिष्ट परिणाम झाला याचा वेध घेण्याचा प्रयत्न या अंकात केला आहे. साहित्य, शास्त्र, वैद्यक, पर्यावरण, शिक्षण, कुटुंबव्यवस्था, पर्यटन, जीवनशैली, बालविश्व, उद्योग, शहररचना, कृत्रिम बुद्धिमत्ता, अर्थकारण अशा पैलूंवर दिनकर गांगल, शरद काळे, डॉ. अविनाश सुपे, रेणू दांडेकर, डॉ. सतीश नाईक, अनुराधा ठाकूर, अमोल साळे, सुरेश वांदिले, माधव जोशी, सुलक्षणा महाजन, जान्हवी खांडेकर, सुवर्णा साधू, डॉ. अजय देशपांडे यांचे लेख बदलाची मांडणी करतात.

डॉ. प्रकाश लोथे, प्रतिभा सराफ, चांगदेव काळे, वसंत वसंत लिमये, सुधीर कुलकर्णी यांच्या कथांतूनही वेगळ्या भावभावना दृग्गोचर होतात.

अरुण पुराणिक, अपर्णा पाटील, प्रभाकर भिडे, अपर्णा महाजन, सर्वोत्तम ठाकूर, अजित मगदूम, प्रकाश पेठे, अनंत लाभसेटवार, नीला कोर्डे, संजीवनी खेर, नीला उपाध्ये यांचे लेख वेगळे विचारखाद्य देतात. गंगाधर गाडगीळ–के.ज. पुरोहित–जी.ए. कुलकर्णी या कथाकारांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या एकाच पिढीतील तरी वेगळ्या आकृतिबंधाच्या कथांची, कथालेखनाची चिकित्सा सुरेखा सबनीस करतात. राजीव श्रीखंडे त्यांच्यातला वाचक आणि एकूणच वाचनवृत्ती याबद्दल लिहितात. तर वेगवेगळे कवी आपल्या ढंगाने कवितांतून व्यक्त होतात.

एकूण अंकाचा बाज असा आहे. तो भावेल असे वाटते.

सतीश भावसार यांचे वेधक मुखपृष्ठ आणि अंकाची मांडणी, प्रमोद जोशी यांची चित्रे, त्यांना योगिता मोरेचे संगणकीय साहाय्य, जाहिरातदार–हितचिंतकांचे सहकार्य, धनश्री धारप यांचे जाहिरात व्यवस्थापन या साऱ्यांच्या योगदानाने अंक पूर्णत्वास गेला आहे. त्यांचे आभार.

'ग्रंथाली' डिजिटल माध्यमात आल्यापासून विविध कार्यक्रम करते आहे. 'विज्ञानधारा' आणि 'आरोग्याची कॅप्सुल' हे कार्यक्रम करताना, याबद्दल समाजात जाऊन त्या विषयी जागृती करावी, थेट समाजात प्रश्नांना प्रबोधन करावे या विचाराने 'आरोग्ययात्रा' आणि 'विज्ञानधारा यात्रा' योजल्या आहेत. २४ नोव्हेंबर ते २४ डिसेंबर २०२३ या दिवसांत डॉ. जयंत जोशी, डॉ. सतीश नाईक आणि डॉ. राजेंद्र आगरकर, शरद काळे, सुधीर आणि नंदिनी थत्ते व डॉ. यश वेलणकर यांच्या नेतृत्वात या यात्रा महाराष्ट्राच्या पंधरा जिल्ह्यांत भेट देणार आहेत. त्यास सर्व त्या प्रकारे आपले सहकार्य लाभावे, असे आवाहन आहे.

पुढील अंक जानेवारी २०२४ चा.

**– अरुण जोशी**



G20
भारत 2023 INDIA
NEW INDIA ASSURANCE
दि न्यू इन्डिया एश्योरन्स कंपनी लिमिटेड
The New India Assurance Co. Ltd
Information Security Management System
ISO 27001 Certified
Health Insurance
Motor Insurance
Household Insurance
Liability Insurance
Fire Insurance
Wishing everyone a very happy, safe and blessed Diwali
www.newindia.co.in
1800 209 1415
Head Office: New India Assurance Bldg., 87, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001, INDIA
IRDAI REGN NO:190
CIN: L66000MH1919GOI000526



युनियन बँक
ऑफ इंडिया
भारत सरकार का उपक्रम
Union Bank
of India
A Government of India Undertaking
VYOM
Mobile Super App.
उत्सवाचा प्रकाश पसरवा
घरात आनंद आणि समृद्धी आणा
एमएसएमई कर्ज
वाहन कर्ज
कृषी कर्ज
गृह कर्ज
सुवर्ण कर्ज
दिवाळी निमित्त सर्वांना
सुख समृद्धीच्या शुभेच्छा
(टोल फ्री क्र.) 1800 208 2244 / 1800 425 1515 / 1800 425 3555 | 9666606060 | www.unionbankofindia.co.in
@unionbankofindia @UnionBankTweets unionbankinsta @UnionBankofIndiaUtube @unionbankofIndia @unionbankinsta



डॉ. प्रकाश लोथे

# तिलोत्तमेच्या शोधात

चिंतू सुखात्मे हा प्राणी सामान्य नाही, हे कोणाही सामान्य बुद्धीच्या माणसाला सांगावे लागत नसे, पण आजची बात जरा वेगळी होती. चिंतूने सकाळी उठताच प्रथम बेडरूममधील कपाट उघडलं आणि सगळ्या विजारी रंगानुक्रमे लावल्या. प्रथम पांढरी, नंतर करडी, नंतर निळी व शेवटी खाकी. त्यानंतर पाळी शर्टांची. ते फार सोपं, कारण त्याच्याजवळ फक्त पांढरेच शर्ट होते. सगळे कपडे लावून झाल्यावर दोन पावलं मागे येऊन त्यानं कपाटाकडे निरखून पाहिलं, चष्मा पुसला आणि समाधानाचा सुस्कारा सोडला.

आजचा दिवस खास, कारण आज आईच्या आज्ञेनुसार चिंतू वधूसंशोधनाला सुरुवात करणार होता. श्रेष्ठ पदवीधारक, दिसायला जरा C3 PO (स्टार वॉर्सवाला) पण, उत्तम घराण्यातला, शिवाय ठाण्याला स्वतःचा फ्लॅट असलेला तरुण म्हणजे लग्नाच्या बाजारातला बाजीराव पेशवाच जणू! झालंच तर त्याच्या पत्रिकेत एकही ग्रह वाईट नव्हता. त्याच्या आईला तर खात्रीच होती की चिंतूला किमान माधुरी दीक्षितइतकी सुंदर पत्नी मिळणार.

इंटरनेटवर जाऊन वधू शोधावी हे त्याच्या आईला कधीच पटल नाही. इंटरनेटवर फार फसवाफसवी असते असं तिला कुणीतरी सांगितलं होतं. शिवाय चिंतू लग्नाचा आहे अशी बातमी पसरताच शेकडो मुली तिच्याकडे धावतच येतील याबद्दल तिची बालंबाल खात्री होती.

चिंतू मात्र याबाबतीत फारच चिंतातुर होता. कॉलेजमध्ये असताना हुशार असूनही त्याचेकडे एकाही मुलीने कधी ढुंकूनही पाहिलं नव्हतं. ह्याच मुली इतर सामान्य तरुणांबरोबर मात्र सर्रास फिरायच्या. त्यातल्या काही धीटुरग्या मुली तर चक्क त्यांच्या खोलीवर यायच्या आणि मोटारसायकलवर बसून रात्री बेरात्री कुठतरी जायच्या.

परंतु चिंतूला सांगून आलेल्या पहिल्याच मुलीनं त्याची घोर निराशा केली. म्हणजे त्याचं असं झालं, की पत्रिका वगैरे जुळल्यावर आणि फोटो पाहून झाल्यावर चिंतूच्या आईनं ठरवलं की चिंतू आणि संहिता यांनी एकमेकांना व्यक्तिशः भेटावं. त्याकरता शहराच्या मध्यभागी असलेलं वैशाली रेस्टॉरंट निवडण्यात आलं.

वीकेंडची गर्दी नको म्हणून एका बुधवारी दुपारी तीन वाजता डेटिंगची डेट ठरली. चिंतू पांढरा शर्ट खाकी पॅण्ट घालून आणि डोक्याला ब्रीलक्रीम लावून बरोबर तीन वाजता तिथे हजर झाला. आश्चर्य म्हणजे संहिता तिथे अगोदरच पोचली होती. तिनं ब्ल्यू जीन्स आणि वर अबोली रंगाचा ब्लाऊज घातला होता. चिंतूनं तिला कोपऱ्यातल्या एका बूथकडे नेलं. स्थानापन्न झाल्यावर काही वेळ कोणीच बोललं नाही.

''तुम्ही कराडच्या, होय ना?'' चिंतूनं धीर करून शेवटी शांतता भंग केला.

''नाही. मी मिरजची! आणि मला तू म्हटलं तरी चालेल. तू तर इन्फोसिसमध्ये आहेस ना?''

''होय बरोबर.'' तिच्या धीटुरगेपणानं चकित होत तो म्हणाला, तुम्ही मिरजचे लोक थोडेसे बॅकवर्ड असता असं ऐकलं.''

''कुठं ऐकलं? ते चुकीचं आहे. इनफॅक्ट मी थोडंसं डेटिंगही केलेलं आहे. आणि तू?''

हा प्रश्न ऐकून चिंतूची अगदी दांडी उडाली. त्यानंतर पाच-दहा मिनिटं दोघंही काही न बोलता कॉफी ढवळत बसले.

''जरा डावीकडे बघ.'' शांततेचा भंग करत संहिता त्याला म्हणाली, ''ती गुलाबी साडीतली बाई आपल्याकडे

टक लावून बघते आहे. जणू काही आपण काही किसिंग वगैरे करत आहोत.''

''छे छे ती माझी आई आहे! आपलं डेटिंग कसं होतंय ते तिला बघायचं आहे.'' चिंतूने निर्विकारपणे सांगितलं!

''Your Mom! and here?'' संहिताचा चेहरा अनुक्रमे लाल निळा व नंतर पांढराफटक झाला!

त्यानंतर संहिता आणि तिच्या घरच्या लोकांकडून कधीच काही ऐकिवात आलं नाही. बिचाऱ्या चिंतूला मात्र कळेना की संहिताचं डोकं असं एकदम फिरायला काय झालं. तो पार हबकून गेला. हल्लीच्या मुली अतिशय वात्रट व उर्मट झाल्या आहेत याबद्दल त्याला अजिबात संदेह उरला नाही.

तसं पुन्हा कधी होऊ नये म्हणून चिंतूच्या इंजिनीयरी मेंदूनं वधुपरीक्षेकरता मास्टर प्लॅन करायचं ठरवलं. त्याकरता त्यानं अनेक अनुभवी मित्रांशी बोलून नोट्स घेतल्या. स्त्री मानसशास्त्राचं परीक्षण करणारी अनेक इंग्रजी आणि मराठी पुस्तकं वाचली. सुमारे एक महिन्यानंतर चिंतूजवळ चांगली पत्नी कशी पारखावी याचा मास्टर प्लॅन तयार झाला. त्यात स्त्रीच्या प्रत्येक शारीरिक आणि मानसिक गुणाला आणि अवगुणाला गुणांक बहाल करण्यात आले होते. आणि शेवटी सगळ्या गुणावगुणांची बेरीज करून सर्वोच्च गुण मिळवणाऱ्या मुलीला आपली पत्नी म्हणून निवडायचं त्यानं ठरवलं. यात अर्थातच आईनं केलेलं मूल्यमापन हा महत्त्वाचा भाग होता. त्यातील काही महत्त्वाचे गुण आणि अवगुण तथा त्याला दिलेले गुणांक पुढीलप्रमाणे–

१. सौंदर्य

गौर वर्ण–

शुभ्र गौर – १० , निमगौर – ७ , गहू वर्ण – ५,

कृष्ण वर्ण – शून्य.

त्वचा : अगदी नितळ – १०, गालावर बारीक पुटकुळ्या – ७ ज्वारीच्या साईझचे मुरूम – शून्य.

नाकी डोळी : तरतरीत – १०, सामान्य – ५, नकटे नाक शून्य, चष्मा शून्य.

हनुवटी : माधुरी दीक्षित हनुवटी – १०,

सॅन्ड्रा बुलक हनुवटी – ५, सोनिया गांधी हनुवटी – शून्य.

जाड भिवया, निरुंद कपाळ आणि टापरे कान – प्रत्येकी उणे ५ मार्क (कमी बुद्धीची लक्षणं)

कुरळे केस : उणे दहा मार्क. (कुरळे केस असलेल्या स्त्रिया जास्त कामुक असतात असं चिंतूने कुठंतरी वाचल होतं.)

जाड पोटऱ्या आणि रुंद खांदे : उणे दहा मार्क. (तेच कारण)

पावलं : पायाचं दुसरं बोट पायाच्या अंगठ्यापेक्षा लांब असल्यास उणे १० मार्क. (अशा मुली नवऱ्याला डॉमिनेट करतात असं त्यानं वाचलं होतं).

२. माहेरचं गाव : मुंबई आणि पुण्याच्या मुली नकोत. (डोईजड होतात). नागपूर, कोल्हापूर आणि सोलापूरच्या मुली चालतील. (पाच मार्क). अमरावती, नगर, नाशिक (७ मार्क) पुलगाव, शेगाव मालेगाव (१० मार्क)

३. शिक्षण : डॉक्टर, इंजिनीयर आणि गणकयंत्र विशारद – शून्य मार्क. शिक्षक, बँकेत कारकून, रिसेप्शनिस्ट – ५ मार्क आणि मॅट्रिक पास (गोमाता) – दहा मार्क.

४. पत्रिका : ३२ गुण जुळल्यास १०, वीसपेक्षा कमी ५ आणि शनी व मंगळ असल्यास शून्य.

५. चारित्र्य : माझी आई चौकशी करून यावर गुणांक देईल. (पूर्वी डेटिंग केलेली, परदेशात शिकलेली वा वाढलेली मुलगी – शून्य मार्क)

६. वेशभूषा : लुगडं – १० मार्क, साडी – ७ मार्क, (संगम साडी म्हणजे बेंबीच्या खाली घसरणारी साडी घालणारी असल्यास – शून्य मार्क). दोन्ही खांद्यावरून पदर लपेटला असल्यास ३ मार्क. अशा मुली अंमळ चवचाल असतात असं चिंतूच्या मारवाडी मित्रानं त्याला बजावलं होतं! घट्ट जीन्स आणि मिनी स्कर्ट – शून्य मार्क.

७. घरकामातील वैशारद्य : स्वयंपाक करता येणं – १५ मार्क. कचरा, धुणीभांडीकौशल्य – १० मार्क.

शिवणटिपण येत असल्यास ७ मार्क. गायननृत्य येत वगैरे नसलं तरी हरकत नाही, खरं तर नकोच.

८. घरची मंडळी : घरी मोठा भाऊ असल्यास – उणे १० गुण , धाकटी बहीण (baby sitting ला उपयुक्त)+१० गुण. शिस्तप्रिय आई +५ गुण. मिलिटरीतला बाप – उणे दहा गुण.

९. मित्रपरिवार : फक्त दोन–तीन मैत्रिणी – १० मार्क. पुरुष मित्र (बॉयफ्रेंड) असल्यास – उणे १० मार्क.

१० सवयी : विडिओ गेमचा छंद – उणे १० मार्क्स. सतत सीरियल पाहणारी – उणे ५ मार्क. वाचन आणि लेखन १० मार्क. (पण शृंगारिक लेखन वाचन – उणे १० मार्क्स)

चिंतूच्या आईनं ही यादी पाहिली तेव्हा तिचा आनंद गगनात मावेना. चिंतूबद्दलच्या अभिमानानं तिचं हृदय भरून आलं किमान सत्तर मार्क असल्याशिवाय लग्नाच्या बाबतीत पाऊल पुढे टाकायचे नाही असं ठरलं. आता समस्त सुखात्मे कुटुंबीयांनी कंबर कसून चिंतूसाठी वधुसंशोधनाची मोहीम सुरू केली.

पुढील सहा महिन्यांत चिंतूनं निदान पस्तीस तरी मुली पाहिल्या असाव्यात. फक्त एकाच मुलीचा स्कोअर ७० च्या

वर होता. परंतु जास्त चौकशीअंती कळलं की तिला बॉयफ्रेंड आहे.

एक वर्ष उलटलं, पण कुणाही मुलीचा स्कोअर सत्तरच्या वर जाईना तेव्हा चिंतू आणि त्याची आई चिंतामग्न झाले. सत्तरच्या ऐवजी साठचा स्कोअर असलेल्या मुलींचाही विचार करावा अशी त्याच्या वडिलांची सूचना मान्य करण्यात आली. चिंतूच्या मित्रांना मात्र हा सगळा उपद्व्याप फारच मनोरंजक वाटला. त्याचे सगळे मित्र त्याच्यासारखे गणकयंत्र विशारद असल्यानं 'बिग बँग थिअरी' या दूरदर्शन मालिकेतल्या शेल्डनप्रमाणे चिंतूकरता इंटरनेटवर वधू शोधायचं त्यांनी गुप्तपणे ठरवलं. चिंतूशी परफेक्ट मॅच होणाऱ्या तीन मुली त्यांना सापडल्या. पण त्यातील एक क्रोएशिया, एक चीनमधली आणि एक ब्राझीलमधली! शेवटी चिंतूचा विवाह एक तर म्हशीशी किंवा मातीच्या ढेकळाशी होणार असं ठरवून त्यांनी तो नाद सोडला.

या घटनेला सहा महिने उलटले. आणि अहो आश्चर्यम! एके दिवशी त्यांच्या दारात एक लग्नपत्रिका येऊन पडली!

जूनच्या बारा तारखेला चिंतू चतुर्भुज होणार हे वाचून त्यांना उत्सुकतेनं पछाडलं. त्यांनी चिंतूला फोन लावला पण तो काहीच सांगेना. मुलगी मराठवाड्यातल्या परभणी गावची होती आणि चिंतूच्या ऑफिसमध्ये काम करत होती एवढच कळलं. आता तर त्यांच्या औत्सुक्याला सीमाच उरली नाही. पत्रिकेवरून वधूचं माहेरचं नाव दुर्गा जगदंबे असं कळलं. त्यांनी लगेच दुर्गा जगदंबेला गूगल केलं. पण भारतातल्या सगळ्या जगदंबेच्या देवळांचे असंख्य फोटो आणि वेबसाइट त्यांच्या पदरात पडल्या. शेवटी परभणी गावातच देवीची चार मंदिरं आहेत एवढंच ज्ञान प्राप्त झालं. या दुर्गेला सायबर फूटप्रिंट नाही ते यावरून सिद्ध झालं. म्हणजेच पोरगी गणकयंत्रावर सर्फिंग करत नाही हे ओघानं आलंच.

शेवटी एकदा चिंतूचं लग्न झालं, आणि त्याचे सगळे मित्र तिथे झाडून हजर झाले. गुरगावचा महेश कुमार आणि बंगलोरचा दीपक गोस्वामीसुद्धा आले.


चिंतूची वधू रूपानं सामान्य पण तशी गोड होती. म्हणजे अगदी माधुरी दीक्षित नाही पण डिम्पल कपाडिया म्हणता येईल. चिंतूसुद्धा खुश दिसला. अपेक्षेप्रमाणे चिंतूची आई मात्र कपाळावर आठ्या घालून होती (अहेरात पैठणी नव्हती!).

खूप वासूगिरी करूनही त्यांना या दुर्गेनं हा मासा जाळ्यात कसा पकडला त्याचा थांगपत्ता लागेना. असे सहा महिने उलटले. चिंतूकडून मंगळागौरीचं निमंत्रण आलं. तेव्हा कुणाच्या तरी सुपीक डोक्यातून कल्पना निघाली. बायका पुरुषांपेक्षा नेहमीच मोकळेपणानं बोलतात, हे लक्षात ठेवून त्यांच्या बायकातर्फे दुर्गेकडून चिंतूच्या लग्नाचं रहस्य काढून घ्यावं असा डाव योजण्यात आला.

मंगळागौरीची रात्र आली. जेवणं आटोपली. पुरुषवर्ग नसल्यानं गप्पा छान रंगल्या. ओटी भरणं, वाण देणं हे प्रकार झाले.

चंद्र थोडासा वर आल्यावर आणि गप्पा रंगात आल्यावर दुर्गा खुलली. हे पाहून स्मितानं (महेशची बायको) हळूच विषय काढला.

''काय ग दुर्गे, तुझा नवरा पारच चोखंदळ होता असं ऐकलं. मग तुमचं कसं जमलं?




''खरं सांगू? आमचं किणी लव्ह मॅरेज आहे!'' किंचित लाजत लाजत दुर्गा म्हणाली.

''लव्ह मॅरेज? पाच-सहा जणी एकदम किंचाळल्या! अग्गो बाई! म्हणजे ऐकायलाच पाहिजे.'' असं म्हणत सगळ्या मैत्रिणीनी दुर्गेला घेराव टाकला.

दुर्गेनं हातातलं पेय ठेवलं. ओठ पुसले आणि एक लांब श्वास घेतला.

''मी ह्याच्या ऑफिसात गेल्या मार्चमध्ये कामाला लागले. एक-दोन दिवसांतच लक्षात आलं की सगळे ह्याची टिंगल उडवायचे. पण वेळ पडली की ह्याचेच पाय धरायचे.

मला हे अजिबात आवडायचं नाही. त्याला प्रमोशन मिळालं आणि मला पर्सनल सेक्रेटरी नेमण्यात आलं. मी त्याला म्हटलं की हे का चालवून घेता? तर तो म्हणतो, त्यांचा काही दोष नाही, मीच तसा आहे.

''लवकरच माझ्या लक्षात आलं की ऑफिसात येताच प्रथम चिंतू त्याच्या पीसीवर लॉग करतो आणि कसलं तरी गणित करून निराशेचा सुस्कारा टाकतो. मी त्याला विचारलं की म्हणायचा, काही नाही. काही नाही.

''एके दिवशी मला अगदी राहवलं नाही. मला त्याचा पासवर्ड माहीत होता. तो घरी गेल्यावर मी लॉग इन केलं. थोडंसं नाक खुपसल्यावर ब्राइड सर्च नावाची फाईल सापडली. अतिउत्सुकतेनं मी ती फाइल ओपन केली अन मला हसू आवरेना.

''त्या फायलीत निदान दीडशे तरी पोरी होत्या आणि प्रत्येकीच्या नावासमोर मार्क लिहिले होते! जास्त नाकेलेपणा केल्यावर मला कळून चुकलं की कुठल्याच मुलीला साठच्या वर मार्क नव्हते. आणि चिंतूच्या कसोटीला कुणीच उतरत नव्हतं. आता मला कळलं की हा प्राणी तिशी उलटून गेली तरी ब्रह्मचारी कसा?

''आणि एक गुपित सांगू?

''बऱ्याच मुलींना सत्तरच्या वर मार्क होते, पण चिंतूची आई दरवेळी त्यांना निगेटिव्ह मार्क द्यायची अन् त्या रिजेक्ट फाईलमध्ये अदृश्य व्हायच्या. मला शंका आली की चिंतूच्या आईलाच त्याच लग्न जमू द्यायच नव्हतं!

''मला चिंतूच्या एकलेपणाची इतकी दया यायची की मी त्याला नियमानं चहा नेऊन देणं, त्याच्या वाढदिवशी काहीतरी गोड करून देणं मी सुरू केलं. त्यात माझा अजेन्डा काहीच नव्हता बरं कां? तो नाक पुसायला लागला की मी त्याला चटकन व्हिक्स नेऊन द्यायची. त्याच डोकं दुखतंय अशी शंका आली की चुपचाप त्याच्या टेबलवर क्रोसीनची गोळी ठेवून द्यायची. हे त्याच्या लक्षात आलं की नाही कुणास ठाऊक.

'तुम्हीसुद्धा ॲप्लाय करा ना!' एक दिवशी तो मला अचानक म्हणाला.

'ॲप्लाय कशाकरता? मी इथं ठीक आहे. हा जॉब काही वाईट नाही.'

'म्हणजे...?' आणि तो किंचित लाजला. 'नवीन जॉबसाठी नाही हो.'

माझ्या डोक्यात प्रकाश पडायला दोन दिवस आणि दोन रात्री लागल्या. पण मला कळेना की मी ॲप्लिकेशन कशाला करायचं? त्याला माझ्यात इंटरेस्ट असेल तर मी त्याच्या समोरच आहे. मी त्याची किती काळजी घेते सगळ्या ऑफिसला माहीत होतं, मग ही फॉरमॅलिटी कशाला?

''मी सगळं लवकरच विसरून गेले. इतका हुशार मोठा ऑफिसर आणि मी .. एक क्षुद्र सेक्रेटरी!''

''एके दिवशी मी ऑफिसात पोचले तर माझ्या अगोदर तो येऊन कामाला लागला होता. मला वाटलं मला उशीर झाला. पण ऑफिसात कुणीच आलं नव्हतं. त्यानं माझ्यासमोर कॉफीचा कप ठेवला. मी आ वासून पाहताच राहिले.

''दुर्गा, मला तुझ्याशी जरा बोलायचं आहे. ऑफिसच्या मागे गार्डन आहे तिथे चालेल का?''

''माझी भीतीनं गाळण उडाली. मला वाटलं भरली माझी शंभर वर्षं. मला फायर करण्यात आलं असावं. त्यानं म ला एकेरी नावं संबोधलं हाच काय त्यातील दिलासा होता!''

''आम्ही बागेतल्या बेंचवर बसलो. थरथरत्या अंत:करणानं मी त्याच्याकडे चोरून बघितलं. त्यालाही घाम फुटला होता.

'दुर्गा, तुला नव्वद टक्के मार्क मिळाले आहेत.'

''ऑ! अहो, पण मी ॲप्लायच केलं नव्हतं.''

'त्यावर तो खट्याळपणे हसला. मीच तुझा फॉर्म भरला, मीच सगळा पेपर सोडवला अन् मीच तुला मार्क दिले.'

''माझं मन आनंदाने भरून आलं; माझ्या डोळ्यांत पाणी आलं. त्याच्या बोलण्यावर माझा विश्वास बसेना.''

''ह्याचा अर्थ तू मला...''

''होय. निःस्वार्थपणे कुणाची काळजी घेणं ह्याला माझ्या ब्रायडल मास्टर प्लॅनमध्ये प्लस १०० मार्क दिले जातात.''

'आणि तुझ्या आईचं काय?'

'तिनं कितीही कमी गुण दिले तरी तू पास होशील...' तो किंचितसा लाजला.

''ह्याच्या पुढे काय झालं तुम्हाला माहीतच आहे.'' दुर्गाच्या सगळ्या सख्या बराच वेळ अवाक् बसून राहिल्या.

''तर तुझ्या मासोळीनं तुला पकडलं, असंच ना?'' कुणीतरी म्हणालं.

''छे छे! भोळा शंकर पार्वतीला पावला!'' दुर्गा म्हणाली.

**– प्रकाश लोथे**

prakashlothe@aol.com



# आधी होते संस्कार, मग झाले परिवर्तन; आता, काळ आला क्रांतिसम बदलांचा...

दिनकर गांगल

‘ज्ञानोत्कर्षाचे दोन काळ घडून आले होते, ते परिस्थितीतून उद्‌भवले होते. सद्यकालात मानवासमोर तसाच पेच आहे. मला एवढेच वाटते, की माणूस आता एवढा जाणीवसमृद्ध झाला आहे, तर त्याने जगाच्या व्यवस्थेतील संभाव्य बदलांचा हवाला नियतीवर सोडू नये; स्वतःच्या जाणिवेतून मानवी जीवनासाठी नवी व्यवस्था सुचवावी, त्यावर डिबेट घडवावा आणि जगण्याचा नवा मार्ग सुचवावा. हे आव्हान संस्कारप्रेमी जन आणि परिवर्तनप्रेमी जन यांच्यासमोर आहे.’

‘बदल’ हा विषय ‘रुची’च्या संपादकांनी या वर्षीच्या दिवाळी अंकासाठी लेख लिहिण्याकरता सुचवला आहे. ‘बदल’ हा एकूण जीवनाचा गाभा आहे आणि तो सृष्टीमध्ये क्षणोक्षणी घडत असतो अशा आशयाची अनेक वाक्ये अनेक थोरामोठ्यांनी इतिहासकाळापासून लिहून ठेवलेली आहेत. या ‘बदला’चा प्रत्यय गेल्या पाच-पन्नास वर्षांत तर, प्रत्येक माणसाला पावलोपावली येत आहे.

अग्नी आणि चाक हे बदल घडवणारे मोठे शोध प्राचीन मानवी संस्कृतीतील मानले जातात; वाफ या शक्तिस्रोताचा शोध सतरा-अठराव्या शतकात लागला आणि माणसाचे यंत्रयुग सुरू झाले. नंतर, अरबस्तानात सापडलेल्या ‘तेला’ने अवघे मनुष्यजीवनच ‘श्रीमंत’ करून टाकले! मागील शतकाचा मोठा काळ हा त्यातून उद्भवलेल्या मानवी जय-पराजयाची कहाणी आहे. अग्नी, चाक, शक्तिस्रोत यांच्याइतकेच महत्त्व मोबाइलच्या शोधाला दिले जाते. तो शोध लागला गेल्या शतकाच्या अखेरीस, पण मोबाइल जगभर पसरला या शतकाच्या पहिल्या दशकात. मोबाइल संशोधला होता कम्युनिकेशनसाठी. परंतु प्रत्यक्षात, त्याने सारे मानवी जीवन व्यापून टाकले आहे. मोबाइलने काय साधले जात नाही, सांगा बरे! विजेचे तसेच झाले होते, नाही का? विजेचा शोध शंभर-दीडशे वर्षांपूर्वी लागला तेव्हा त्यापासून प्रकाश मिळावा ही अपेक्षा. परंतु आता, वीज जगभर प्रकाशासाठी कमी आणि ऊर्जेचे साधन म्हणून अधिक वापरात आहे. माणसाचे जीवन आणि म्हणून पृथ्वीतलावरील एकूण जीवन लाख वर्षांपूर्वीच्या आदिमानवापासून विज्ञान-तंत्रज्ञानातील मोबाइलपर्यंतच्या कृत्रिम बुद्धिमत्ताधारी अत्याधुनिक माणसांपर्यंत क्रांतिकारक रीत्या बदलून गेले आहे.

आगीचा (ऊर्जेचा) आणि चाकाचा (गतीचा) शोध हे विज्ञानच होते. त्या काळी विज्ञान हे ‘शाप की वरदान’ अशा स्वरूपाची चर्चा झाली असेल की नाही हा अंदाज करणे अवघड आहे, परंतु माणसाला त्या नव्या शोधांचा अचंबा व भय वाटले असणार. मात्र मानवी संस्कृतीचा इतिहास असा आहे, की माणसाची सद्‌बुद्धी सतत वरचढ राहिलेली आहे आणि तिने मानवी जीवनाला विधायक वळण लावलेले आहे. त्यातूनच नंतर ऐतिहासिक काळात वेगवेगळ्या मानवी संस्कृती (सिव्हिलायझेशन) घडत गेलेल्या आहेत.

महाराष्ट्रात/भारतात संस्कृतिविचार वेगळ्या तऱ्हेने होतो. संस्कृती हा शब्द मराठीत दोन कारणांनी वापरला जातो. एक, सिव्हिलायझेशन म्हणून आणि दुसरा, त्या शब्दाचा वापर सांस्कृतिक अंगाने मनोरंजनात्मक व मनाची घडण वगैरेसाठी होतो. संस्कृती या शब्दात संस्कार अभिप्रेत आहेत. संस्कार याचा अर्थ काहीतरी घडवणे. भारतीय संस्कृतीत (सिव्हिलायझेशन) संस्कारांना महत्त्व फार आहे. किंबहुना, भारतीय संस्कृती घडली व विकसित झाली ती संस्कारांतूनच. त्यामुळे भारतभूमीवर घडणे-घडवणे, टिकवणे या गोष्टींना मोठे महत्त्व आहे. मुलांवर घरोघरचे संस्कार, शाळाशाळांतील संस्कार, संघटनांतील (उदाहरणार्थ- राष्ट्रीय स्वयंसेवक संघ,

राष्ट्र सेवा दल) संस्कार असे तऱ्हतऱ्हेने केले जात. त्यातून मुलांचे व्यक्तिमत्त्व घडत असते असा समज आहे. त्यातूनच जीवनाची एक घडी निर्माण झालेली दिसू शकते. ती घडी जपण्याकडे आणि म्हणून टिकवण्याकडे भारतीय मनाचा कल असतो. तशा खुणा पुरातन काळापासून आढळतात. कोकणामध्ये 'गावरहाटी' नावाचा एक जुना शब्द आहे. म्हणजे त्या त्या गावाची जीवनशैली किंवा जीवनसंस्कृती. कालौघात, गावरहाटीतील अभिप्रेत दैनंदिन जीवनरीतीचा वा जीवनसंस्काराचा मुद्दा बाजूला पडला आणि 'गावरहाटी'चे महत्त्व देवदेवस्की व भाविकता यांच्यापुरते शिल्लक राहिले. ते टिकवणे हा त्या गावाचा अभिमान झाला! गावरहाटीसारख्या संस्था ही भारतीय जीवनशैलीतील एक वेगळीच मनोरम बाब आहे. एकूणच, भारतीय संस्कृती भारतीय भूमीवर कशी घडत गेली हा कुतूहलाचा भाग आहे. तो ढोबळपणे वर्णला जातो, परंतु सूक्ष्मात, खेड्याखेड्यात जाऊन अभ्यासला तर त्यातील विविधता आणि वैशिष्ट्ये मनाला थक्क करून टाकतात. पंडित नेहरू यांनी 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' लिहून विचारांना केवढी नवी दिशा दिली आहे! भारतीय जीवनाच्या विविधतेतील एकात्मता अशा पद्धतीने कोणी जाणली व मांडली नव्हती. नंतरही विविधतेतील एकात्मतेचा मुद्दा सर्व जण उगाळत असले तरी त्याचे मर्म फार क्वचित कोणी जाणले आहे.

भारतीय जीवनपद्धत किंवा जीवनशैली म्हणून जी म्हटली जाते ती संस्कारांतून घडली आहे. त्यामुळे तिला चाकोरीबद्धताही आलेली आहे. भारतातील लोकांचे दैनंदिन जीवन आणि येथील राजवटी वा समाजासाठी कारभार व्यवस्था यांचा परस्परसंबंध फारसा नव्हता. लोकांना त्यांच्या दैनंदिन भौतिक गरजांपुरते किमान प्रशासन हवे असे. त्या सोयीसुविधा मिळाल्या, की लोक त्यांना जगण्याचा जो क्रम भारतीय संस्कृतीने धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थांच्या आधारे आखून दिलेला होता, त्यानुसार तत्त्वत: जगत गेले. त्यांचे आचरण रुढीबद्ध राहिले. त्यांनी चिकित्सा फार कधी केली नाही; जीवनाकडून ऊर्मी, अपेक्षा बाळगल्या नाहीत. भारतीयांचे जीवनात सारे लक्ष 'लागले नेत्र हे पैलतीरी' असेच राहिले आणि मोक्ष हे माणसांसाठी उद्दिष्ट बनले. ती जीवनतऱ्हाच वेगळी आहे. भारतीय परंपरेतील आत्मा-परमात्मा-मोक्ष हे त्रिकूट आणि त्याला जोडून आलेल्या पुराणकथा हे सारे फार विलोभनीय आहे. त्यामधून त्यांना पुनर्जन्म हा जगण्याचा मोठा बहाणा बहाल करण्यात आला आहे. त्यामुळे मनुष्यजीवनाला केवढे मोठे उद्दिष्ट मिळाले!

वास्तविक हे तत्त्वज्ञान म्हणजे जगण्यासाठी एक विरंगुळाच आहे! माणसाने जगावे कशासाठी? तर 'स्व'चा शोध यासाठी! 'स्व' हा आत्मारूप मानला आणि तो साऱ्या जगाला/विश्वाला निर्मिणाऱ्या-जोडणाऱ्या परमात्म्याशी एकरूप करण्याचा प्रयत्न ठेवला! केवढे हे बिकट तरी लोभस तत्त्वज्ञान! त्यातून अध्यात्मविचार आला. त्याचे शास्त्र बनले, त्यासाठी योगसाधना आली. योगशास्त्रातील वैज्ञानिक विचार वाखाणण्यासारखा आहे. त्यामुळे योग आधुनिक जगाने स्वीकारला. सर्वसामान्य व्यक्तीच्या दृष्टीने अध्यात्मशास्त्राची मर्यादा अशी की त्या व्यक्तीचे उद्दिष्ट साधनेपाशीच थांबते. जशी प्रवासातील गोडी वेगळी आणि इष्ट स्थळी पोचल्याचा आनंद वेगळा, तसे ते आहे. अध्यात्मात प्रवास संपत नाही, पण प्रवासातच रमून चालत नाही ना! उद्दिष्ट गाठून त्याचे विवरण- त्यातील आनंद तोही अनुभवता आला पाहिजे व पुन्हा त्यापुढील शिखराचे उद्दिष्ट ठेवले पाहिजे. नाहीतर प्रवास खंडित होतो. पुनर्जन्म व मोक्ष या भारतीय परंपरेतील संकल्पनांना नव्या काळात आणखी पुढे नेता आले पाहिजे. अन्यथा अध्यात्मसाधनादेखील वयाच्या पुढील एका टप्प्यावर संदर्भहीन होऊ शकते.

यातील दुसरा भाग आहे तो धर्माचा व भाविकतेचा आणि कर्मकांडाचा. तर भारतीय जीवनपद्धत निरखताना प्रत्यय असा येतो, की धर्म नावाची बाब भारतात अस्तित्वात नसावी. भारतात संस्कृती होती व आहे. भाविकता हा त्या संस्कृतीचा गाभा व येथील माणसांचा जीवनाधार आहे. ती प्रत्येक व्यक्तिगणीक वेगळी आहे. म्हणजे विद्यमान काळातील 'पॉप्युलर' दैवत गणपती हे उदाहरणार्थ घेतले तरी त्याला मानणाऱ्या कोट्यवधी जनतेपैकी प्रत्येकाचे त्या देवतेशी नाते वेगळे आहे. त्यासाठी काही रूढ पूजाप्रार्थना आहेत, पण नियमबद्ध असे काही नाही. प्रत्येक व्यक्तीने स्वत:पुरते भाविकतेचे ते रूप उत्क्रांत करत नेले आहे. दर मंगळवारी गणपतीच्या देवळात जाणाऱ्या भक्तांची तेथील आराधना निरखून पाहावी. कोणी व्यक्ती देवतेसमोरील मूषकराजाच्या कानात काही बोलते/पुटपुटते तेव्हा तर प्रत्येक व्यक्तीच्या देवतेशी असलेल्या स्वतंत्र नात्याचा प्रत्यय येतो. तो 'स्व'चा शोध असतो आणि तो हळुहळू उच्च तरल पातळीवर नेता येतो. त्यातून अध्यात्माचा, आत्मा-परमात्मासंबंधांचा व त्यातून लाभण्याची शक्यता असलेल्या 'मोक्षा'चा अंदाज येऊ शकतो. त्यामुळे भारतीय तत्त्वज्ञान हे मूलत: जगन्नियंत्या परम त्म्याशी म्हणजे समष्टीशी जोडण्याचे आहे. विविध पंथपरंपरांनी स्वत:ला प्रिय असे मूर्ताकार त्या परमात्म्याला दिले आहेत. देवतांच्या त्या विविध मूर्ती - शेंदूर फासलेल्या दगडापासून विष्णूच्या दशावताराच्या कथारूपांपर्यंत त्यांतून निर्माण झाल्या आहेत. या भारतीय जीवनपद्धतीला वैदिक, सनातन, हिंदू,

बौद्ध, जैन... अशा कोणत्याही धर्मनावाने न संबोधता भारतीय संस्कृतीतील ते वेगवेगळे जीवनप्रकार आहेत हे समजून घेतले पाहिजेत. या भारतीय जीवनदर्शनात विज्ञान आढळते. वेदातील विज्ञान वा वैदिक गणित अशा संकल्पना किंवा रावणाच्या विमानासारखे पौराणिक दाखले अचंबित करून जातात. परंतु तो सैद्धांतिक भागच राहिला असावा. त्याचे जीवनोपयोगी तंत्रज्ञान बनले नाही. भारतीय जीवन पारंपरिक, रूढिबद्ध, अज्ञानी म्हणजे अडाणीच राहिले. भारतीय संस्कृतीची थोरवी अभ्यासावी, जाणावी अशीच आहे; फुका गर्व बाळगू नये!

भारतीय पारंपरिक जीवनतऱ्हा ढोबळपणाने ब्रिटिश प्रभाव भारतात येईपर्यंत तशीच कायम राहिली आणि नंतरही जग क्रांतिकारी बदलले असे म्हटले तरी त्या जीवनव्यवस्थेचे अवशेष भारतीय लोकांच्या जीवनात अजून दिसून येतात. किंबहुना तेच भारतीय जीवनातील सध्या जाणवणाऱ्या ताणाचे प्रमुख कारणही आहे. परंपरा आणि आधुनिकता यांतील ताण. भारतात 'आधुनिकते'चा विचार ब्रिटिशांबरोबर आला आणि येथे प्रबोधनपर्व सुरू झाले. त्या प्रबोधनपर्वातील महत्त्वाची मूल्ये होती स्वातंत्र्य-समता-बंधुता आणि समाजजीवनाच्या व्यवस्थापनासाठी रुजू झाली 'लोकशाही' जीवनपद्धत. ती 'लोकशाही' जीवनपद्धत राजेशाही अथवा संस्थानशाही याऐवजी आलेली आहे. लोकशाही महत्त्वाची आहे. त्यात भौतिक जीवनास, या भूमीवरील जगण्यास महत्त्व आहे. ते जगणे आचरणात भारतीय लोकांनी नवनवीन शोधांबरोबर स्वीकारले होतेच. भारतात १९५० पर्यंत अभावाचे जगणे होते - कसली उपलब्धताच नव्हती. स्वातंत्र्योत्तर पंचवार्षिक योजनांनी विकासाचे/प्रगतीचे दरवाजे उघडले. शिक्षणाचा प्रसार झाला - नवनवे शिक्षण मिळू लागले. जीवनशैलीत समृद्धीची चाहूल लागली. त्याच साधनसंपन्न जीवनाचे वर्णन आता 'चंगळवादी जीवनशैली' असे करतात. सुखासीन जीवन भारतीय मनाला सहज पटत नाही. म्हणून त्यास चंगळ म्हटले जाते. आजच्या जीवनाला पारंपरिक भारतीय मूल्यभाव अर्पण करण्याचा तो प्रकार झाला.

लोकशाही जीवनपद्धतीत लोकांना अधिकार गृहीत धरलेले आहे. लोकशाही जीवनपद्धत येईपर्यंत लोकजीवन कर्तव्याधारित होते. लोकशाही जीवनपद्धतीत लोकांना कर्तव्याबरोबर अधिकार प्राप्त झाले. त्या जीवनपद्धतीमागे मोठे आधुनिक तत्त्वज्ञान आहे. ते सतत विकास पावत आलेले आहे. त्यात व्यक्तिस्वातंत्र्य मोलाचे आहे. तो आजच्या जीवनाचा आधार आहे व त्याला पोषक असाच तंत्रज्ञानाचा विकास आहे - त्यानुसार लोकशाही राजवटीच्या वेगवेगळ्या तऱ्हा सुचवल्या गेल्या आहेत- जात असतात. त्या तत्त्वज्ञानाचे अनेक सिद्धांत आहेत- त्या सिद्धांतांनुसार सर्वसामान्य माणसांचे जीवन सुखकर व्हावे अशी अपेक्षा आहे. त्या अपेक्षित बदलाचे वर्णन आधुनिक काळात परिवर्तन असे केले गेले. परिवर्तन याचा अर्थ समाजाच्या वर्तनशैलीतील बदल असा आहे.

लोकशाही राज्यात स्वातंत्र्य गृहीत असते, परंतु स्वातंत्र्याचा अर्थ लोकांना समजावून सांगण्याची गरज असते. त्याबरोबर समता व बंधुता या तत्त्वांचा अंमल करणे तर फारच अवघड. मुळात त्या संकल्पना लोकांच्या मनी उतरल्या पाहिजेत. तसे प्रयत्न म्हणजे 'परिवर्तनाचा मंत्र' झाला. खरे तर, परिवर्तनात 'संस्कार' अभिप्रेत आहे, पण भारतीय संस्कारपद्धतीत रुढीबद्धता, आज्ञाधारकपणा असे दोष घुसले होते. त्यामुळे स्वतंत्र विचार करण्याला बंदी निर्माण झाली होती. त्यामुळेच सर्व समाजास एक प्रकारचे बुद्धिमांद्य आले होते. ते अजूनही तसेच आहे. उलट, आधुनिक जीवनात विचारस्वातंत्र्य अभिप्रेत होते - तेथे विचार करण्यास केवळ मुभा नव्हती, तर प्रोत्साहन होते.

महाराष्ट्रात विशेषत: गेल्या शतकाचा उत्तरार्ध हा परिवर्तनवादी विचारांनी भारला गेलेला आहे. 'परिवर्तना'त एक उदात्तता आहे. तो शब्द अधिकतर पुरोगामी व समाजवादी लोकांकडून खरोखरीच मंतरल्यासारखा उपयोगात आणला गेला. डांगे, एसएम, ना.ग. गोरे हे सारे परिवर्तनाचे अग्रदूत होते. जॉर्ज फर्नांडिस, मृणाल गोरे यांच्या चळवळी त्याच अंगाने पुढे गेल्या. त्या सर्वांना राजकारणाबरोबर समाजकारण अभिप्रेत होते. त्यांना विचारांत बदल म्हणजे परिवर्तन करून समाजात समतादी मूल्ये आणता येतील असा विश्वास होता. नरेंद्र दाभोलकर यांनी अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ चालवली, तिचे अंतिम टोक 'समाज परिवर्तन' असेच त्यांना अभिप्रेत होते. त्यांना परिवर्तन चळवळीतील शेवटचे वीर म्हणता येईल. नंतर परिवर्तन हा शब्द मागे पडला. तो शब्द राजकारणातील शरद पवार यांच्यासारख्या पुरोगामी मानल्या जाणाऱ्या पुढाऱ्यांकडून वापरला गेल्याचेही दिसून येते. पुढे शरद पवार यांच्यासकट सारे राजकारणी समाजधारणेपासून दूर झाले आणि राजकीय सत्तास्पर्धेत उतरले. राजकारण म्हणजे केवळ सत्ताकारण असते. त्याचा समाज परिवर्तनाशी संबंध नसतो. राजकारणी मंडळी लोकांची ताकद वाढवण्याऐवजी त्यांना परावलंबी व आश्रित बनवत असतात, असाच अनुभव आहे. ते लोकशाही संकल्पनेशी विसंगत आहे. तीच 'परिवर्तन' संकल्पनेची शोकांतिका ठरली.

क्रांतीसम बदलाची सुरुवात कशी व कोठे झाली हे नाही सांगता येणार, ती ढोबळपणे १९८०-९० च्या सुमारास

फॅक्स, एसटीडी-आयएसडी अशा सुविधांपासून जीवनात दिसू लागली. इंटरनेट व इमेल १९९० च्या दशकात आले. इंटरनेट इंटरनॅशनल काऊन्सिलच्या अध्यक्षांचे १९९६ सालचे भाषण मला आठवते. ते म्हणाले होते, की या इंटरनेटची व्याप्ती केवढी आहे याचा आम्हालाही अंदाज येत नाही. ध्यानात घ्या, इंटरनेटचे प्रवर्तक हे सांगत आहेत. दुसरी गोष्ट म्हणजे जाहिरातीचे एक होर्डिंग आठवते - जिऑग्राफी इज हिस्टरी! म्हणजे तंत्रज्ञानात्मक जगात मूळ संकल्पनाच बदलल्या. इलेक्ट्रॉनिक्सच्या शोधांमधून या नवनवीन क्षेत्रांतील विकासाला तोंड फुटले होते. त्याचे कर्ते जगभर पसरलेले होते. त्याचे श्रेय कोणा एकाचे नाही, पण त्यांनाही ही प्रगती कोठवर आणि कशी जाणार आहे हे समग्रतेने कळत नव्हते. काळाबरोबर संशोधनाची, विकासाची व प्रगतीची ही क्षेत्रे आणखी गुंतागुंतीची व सूक्ष्मातिसूक्ष्म होत चालली आहेत. वैद्यकीय क्षेत्रातील 'चमत्कार' जनसामान्यांना दिलासा तर देतातच, पण त्याबरोबर भेडसावतातदेखील. आताआतापर्यंत माणसाच्या पुऱ्या आयुष्याचा जो जीवनक्रम होता तो आता जन्मणाऱ्या व वयाच्या पहिल्या दशकात असणाऱ्या बच्छड्यांचा त्या वयातील जीवनक्रम असणार आहे, तेवढी समजूत त्या बालकांना असणार आहे असे जाणवते. मग ती बालके त्यांच्या पुढील नव्वद-शंभर-सव्वाशे वर्षांच्या आयुष्यात करणार काय? असे काही चमत्कारिक प्रश्न निर्माण होण्याची शक्यता वाटते.

दाभोलकर चिकाटी धरून परिवर्तनाचा विचार मांडत राहिले, तरी त्या शब्दाची जादू चार दशकांपूर्वी विरून गेली होती. कामगार-कष्टकऱ्यांचे राज्य हा विचारच इतिहासजमा झाला आहे. मानवी जीवनात तंत्रज्ञानाने जे बदल होत आहेत त्यांकडे 'लव्ह-हेट' भावनेने पाहिले जाते. 'फ्युचरॉलॉजी' नावाची विद्याशाखा पंचवीस-तीस वर्षांपूर्वी एकदम पुढे आली. जगाच्या भविष्याची विज्ञानाधारे मांडणी करणारे विद्वान जगभर प्रकट झाले- त्यांची पुस्तके आली. पण, तंत्रज्ञानातील प्रगतीचा झपाटा एवढा वाढला, की गेल्या पाच-दहा वर्षांत त्या विद्याशाखेतील पुस्तके चर्चेत नाहीत. उलट, कालच्या काळातील स्टीफन हॉकिंगसारखे वैज्ञानिक व आजच्या काळातील युव्हाल नोआ हरारीसारखे भाष्यकार-तत्त्वज्ञ तंत्रज्ञानाची प्रगती आणि मानवी जीवन यांची सांधेजोड मांडताना भविष्याबद्दल शंकाच व्यक्त करतात. मानवाची अशी अधांतरी अवस्था जगण्याच्या पातळीवर झाली आहे. त्याला जीवनोद्दिष्ट राहिलेले नाही. त्यामुळे मनुष्यमात्र एक तर सुखाच्या अधीन आहे, अथवा देवाच्या नादाला लागला आहे. त्याच्या या भाविकतेचे एका टप्प्यापर्यंत कौतुक करता येते, जसे की पंढरपूरची वारी! पण ते खूळ साईबाबा किंवा गावोगावच्या सिद्धिविनायकासारख्या देवीदेवतांबाबतही पसरते तेव्हा लोकांना तोच वर्षभराचा कार्यक्रम होतो. परंतु त्यामुळे माणसाच्या जगण्याचे ज्ञानजिज्ञासा हे जे प्रमुख कारण असू शकते तेच हरपले जाते.

मानवी जीवनात यापुढील बदल काय असू शकेल असा विचार मनात येतो, तेव्हा पुन्हा इतिहासाचा आधार घ्यावा लागतो. मानवाने निसर्गाचे कोडे जवळजवळ उलगडून दाखवले आहे. भविष्यवेधी म्हणून जी इंग्रजी पुस्तके वाचनात आली त्यामध्ये मुख्यत: भौतिक जीवनाचा, वैज्ञानिक, विशेषत: वैद्यकीय क्षेत्रातील प्रगतीच्या अंगाने घेतलेला वेध जाणवला. जीवनाबद्दलाचा खरा आधार असतो ज्ञानाचा आणि मनोविश्वाचा -त्यातील भाव आणि विचार यांचा. मानवी इतिहासात ज्ञानोत्कर्षाचे दोन काळ लक्षवेधी आहेत. पहिला वैदिक काळ - त्यात धर्म-अध्यात्म तत्त्वज्ञानाला पोषक अशी साहित्यनिर्मिती झाली. दुसरा, युरोपातील 'रिनेसान्स'चा काळ - त्यात वैज्ञानिक प्रगती घडून आली. माणसाचा स्वत:च्या बुद्धीवरील विश्वास वाढला. त्यामधून नवीन जीवनतत्त्वज्ञान निर्माण झाले. तोच सध्याच्या मानवी जीवनाचा आधार आहे. जगातील सुमारे दोनशेपैकी बहुसंख्य देश त्याच नवविचारांच्या आधारे लोकशाही जीवन अनुभवत आहेत.

परंतु याच काळात विज्ञानातून उपजलेल्या तंत्रज्ञानाने अवघ्या जगाला विळखा घातला आहे. माणूस सुखसमृद्धी अनुभवत आहे. विषमतेसारखे मानवी व्यवस्थेतून निर्माण झालेले दोष दूर होण्याच्या वाटेवर आहेत. पण तरी माणसाने जगावे कशासाठी या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयास जाणवत नाही. गेल्या चाळीस वर्षांतील घडामोडींचे, विचारप्रदर्शनाचे अवलोकन केले तर त्याचे उत्तर - माणसाने यंत्रवत जगावे असे येते! संवेदना हरवत चालल्या आहेत हेच आजच्या समंजस, सुसंस्कृत माणसाचे दु:ख आहे ना?

वर नमूद केलेले ज्ञानोत्कर्षाचे दोन काळ घडून आले होते, ते परिस्थितीतून उद्भवले होते. सद्यकालात मानवासमोर तसाच पेच आहे. मला एवढेच वाटते, की माणूस आता एवढा जाणीवसमृद्ध झाला आहे, तर त्याने जगाच्या व्यवस्थेतील संभाव्य बदलांचा हवाला नियतीवर सोडू नये; स्वत:च्या जाणिवेतून मानवी जीवनासाठी नवी व्यवस्था सुचवावी, त्यावर डिबेट घडवावा आणि जगण्याचा नवा मार्ग सुचवावा. हे आव्हान संस्कारप्रेमी जन आणि परिवर्तनप्रेमी जन यांच्यासमोर आहे.

**- दिनकर गांगल**
dinkargangal39@gmail.com



# आधुनिक तंत्रज्ञान आणि आरोग्यभान

डॉ. अविनाश सुपे

> काळानुसार सतत नवीन तंत्रज्ञान येतच राहणार आहे, त्याला वैद्यकशास्त्राचाही अपवाद नाही. मात्र त्याच्या सुयोग्य वापराबद्दलची जाणीव डॉक्टर, रुग्णासह एकूणच समाजाला असणे आवश्यक आहे. तरच आरोग्यभान आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा ताळमेळ राहू शकेल.

**आरोग्यज्ञानात वाढ**

गेल्या काही वर्षांमध्ये वैद्यकशास्त्रात अनेक बदल झाले आहेत. सर्वांत महत्त्वाचा बदल म्हणजे जगातील ज्ञान खूप वाढले आहे. आरोग्यक्षेत्रातील ज्ञान हे दर ७३ दिवसांत दुप्पट होत आहे. खूपशी माहिती अगदी सहज आणि वेगवेगळ्या ठिकाणी मिळते आहे. पूर्वी लोकांना फारसे काही माहीत नसायचे. गेली काही वर्षे दिवसागणीक रोज नवनवीन माहिती उपलब्ध होते आहे. या माहितीचा जणू पूर आल्यामुळे तेच आजार वेगळ्या दृष्टिकोनातून पाहायला सुरुवात होते आहे. त्यात सतत नवीन नवीन संशोधन/तंत्रज्ञान/औषधे येत आहे, त्यामुळे आजाराचे उपचार बदलत आहेत. एखादी गोष्ट गुगलवर शोधल्यावर त्या संदर्भात अनेक पर्याय एका क्लिकसरशी हजर होतात. बऱ्याच वेळा वाटते, की काही माहिती वाचून प्रश्न सुटतील, पण ते सुटत नाहीत. उलट गुंता आणखी वाढू शकतो. गुगलवर गेल्यावर त्याला इतकी माहिती मिळते, की त्याच्या शंकेचे निरसन होण्याऐवजी अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यातच चुकीची माहितीही दिली जाते. या चुकीच्या माहितीचे दोन प्रकार असतात. पहिला प्रकार म्हणजे – एखाद्याने चुकून दिलेल्या आरोग्य माहितीला डिसइन्फर्मेशन (Disinformation) म्हटले जाते. तर दुसरा प्रकार म्हणजे – एखाद्याने मुद्दाम चुकून दिलेल्या चुकीच्या आरोग्य माहितीला मिसइन्फर्मेशन (Misinformation) म्हटले जाते. उदाहरणार्थ– कोरोनाकाळात एचसीक्यू, रेमडेसिवीर, टॉसिलिझुमॅब वगैरे औषधे घ्यावी असे खात्रीने सांगितले गेले. नंतर लक्षात आले की त्या औषधांनी तेवढा गुण येत नाही. त्या वेळी या गोळ्या काळाबाजारात विकून नफा कमावला गेला. गेली अनेक वर्षे लोकांना सांगितले गेले कॉलेस्ट्रॉल (Cholesterol) वाईट आहे. आता सांगितले जाते आहे, की साखर वाईट आहे. गेली पन्नास वर्षे आपण ज्या वैद्यकीय दिशेने चाललो होतो, ते आपल्याला मिळालेल्या माहितीच्या आधारे. या माहितीत त्यात वेळोवेळी प्रकाशित केल्या जाणाऱ्या वैद्यकीय संशोधनाचा मोठा वाटा असतो. मात्र माहितीच्या या महापुरात जाणीवपूर्वक पेरलेली माहितीही अस्तित्वात असते. अशा प्रकारच्या माहितीस स्युडो सायन्स अर्थात छद्मविज्ञान म्हटले जाते. Pseudoscience is a proposition, a finding or a system of explanation that is presented as science but that lacks the rigor essential to the scientific method. Pseudoscience can also be the result of research that is based on faulty premises, a flawed experimental design or bad data. अनेकदा ही माहिती व्हॉट्सॲप युनिव्हर्सिटी किंवा अन्य समाजमाध्यमांतून पसरवली जाते. सतत हाताशी असणाऱ्या या माध्यमावर वाचल्या-पाहिल्या-ऐकल्या जाणाऱ्या गोष्टींवर विचार करण्याची लोकांची मानसिकता वाढू लागली आहे. परंतु अस्सल आणि अनावश्यक माहितीचा सारासार विचार करण्याची क्षमता असली पाहिजे. ती केवळ छापलेली आहे किंवा व्हॉट्सॲपवर आहे म्हणून असे उपचार करायला लागल्यास फायदा राहिला बाजूला अपाय व्हायचीच शक्यता जास्त असते. वृत्तपत्रे असोत किंवा ऑनलाइन असो, या माध्यमांतून

होणाऱ्या माहितीच्या भडिमारामुळे सामान्य माणूस दिशाहीन होऊन गोंधळतो. बॅरी श्वारत्झ (Barry Shwartz) या लेखकाने 'पॅरॅडॉक्स ऑफ चॉईस' या आपल्या पुस्तकात लिहिले आहे. तो म्हणतो, की 'पूर्वी आपल्याकडे फारसे पर्याय नसायचे तेव्हा आपण आनंदी होतो. आज आपल्याकडे एकेका वस्तूचे किंवा गोष्टींचे शेकडो पर्याय उपलब्ध असतात. फक्त त्यातला कोणता निवडायचा हा प्रश्न असतो.' नेमकी हीच स्थिती आरोग्यक्षेत्रात सामान्यांची दिसून येते. एखाद्या साध्या आजारावर इतके लिहिले जाते आहे, की त्यामुळे सामान्य माणूस त्या अविरत माहितीच्या ढिगाऱ्याखाली जणू दबून जातो.

**आधुनिक तंत्रज्ञानाचा महापूर**

गेल्या काही वर्षांत वैविध्यपूर्ण आधुनिक तंत्रज्ञान आले असून त्यात सातत्याने बदल होत आहेत. साधारण १९८० मध्ये सोनोग्राफी व एंडोस्कोपी, १९८४-८५ मध्ये सिटीस्कॅन, पुढे, १९८९ मध्ये लॅपरोस्कोपी, मग एमआरआय आणि पेटस्कॅन आले आहे. मेंदू किंवा पोटातल्या एखाद्या ट्यूमरचे किंवा गाठीचे खरे रंगरूप पूर्वी शस्त्रक्रिया करताना कळायचे. आता तंत्रज्ञानामुळे त्या गाठीचे स्वरूप आधीच कळल्याने ती शस्त्रक्रिया अधिक व्यवस्थित करता येते. मात्र बऱ्याच वेळा तंत्रज्ञानाचा अतिरिक्त वापर केला जातो. त्याऐवजी अनेकदा रूग्णाशी बोलून, त्याला तपासून रोगाचे निदान करता येऊ शकते. अलीकडे गरजेपेक्षा कित्येक पट जास्त प्रमाणात तपासण्या केल्या जातात. त्यातून ठोस निदान होत असेल तर ठीक, पण अनेकदा त्यातून गोंधळ वाढू शकतो. साध्या गोष्टींचा बाऊ बनवला जातो. मला वाटते, या बाबींविषयी सुजाणपणे विचार करता आला पाहिजे. म्हणजे बऱ्याचदा माहिती (information) मिळते. त्या माहितीचे ज्ञान (knowledge) व्हायला पाहिजे आणि ज्ञानाचे रूपांतर शहाणपणात (wisdom) व्हायला पाहिजे. त्यासाठी आजच्या तरुण डॉक्टरांची म नसिकता तयार आहे, असे वाटत नाही. अनेकदा रुग्णाला नीट तपासल्यावर आजाराचा अंदाज येतो. फार तर काही प्राथमिक तपास करावे लागतात. हे केले जात नाही. नवीन पिढीतले डॉक्टर तपासण्यांवर अधिक अवलंबून असतात. परंतु केवळ तपासण्यांमध्येच गुंतून जाऊ नये. सारासार विचार करून डॉक्टरांनी रुग्णाला आवश्यक आहे, तितक्याच चाचण्या करून घेऊन उपचार करायला हवेत. काही वेळा अनावश्यक शस्त्रक्रियाही केल्या जातात. त्यामुळे आवश्यक चाचण्या आणि रुग्णाची प्रत्यक्ष तपासणी यांचा योग्य समन्वय साधायला हवा. या अतिशय महत्त्वाच्या आणि आवश्यक असणाऱ्या बदलाकडे तरुण डॉक्टरांनी लक्ष देणे आवश्यक आहे.

**फॅमिली डॉक्टर संकल्पनेचे पुनरूज्जीवन**

फॅमिली डॉक्टर या संकल्पनेचे आपल्याकडे पुनरुज्जीवन व्हायला हवे. फॅमिली डॉक्टरांनी शंभर टक्के अपडेट राहायला हवे. पूर्वी ही संकल्पना खूप चांगली होती. मधल्या काळात ज्ञान आणि कौशल्य खूपच वाढले. तेवढे फॅमिली डॉक्टर अपडेट राहू शकले नाहीत. त्यामुळे त्यांच्या आणि सुपरस्पेशालिस्ट डॉक्टरांच्या ज्ञानामध्ये प्रचंड तफावत आली. 'उरलो केवळ शिक्क्यांपुरता' अशी अनेकांची अवस्था झाली. मग कट प्रॅक्टिस वगैरे सुरू झाली. फॅमिली डॉक्टरांनी विश्वासार्हता गमावली. खरेतर रुग्णांना नेहमी पाहणारे, ओळखणारे, फक्त रुग्णच नाही तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाची माहिती असलेले हे डॉक्टर. त्यामुळे फॅमिली डॉक्टर आणि त्यांच्या रुग्णांमध्ये एक प्रकारचा विश्वास आणि त्या कुटुंबाला समजून घेण्याची माणुसकी असते. आज आरोग्यव्यवस्थेमध्ये 'नॉलेज' खूप आहे. वेगवेगळ्या स्रोतांमधून ते रुग्णांपर्यंत पोहचते. त्यातील अनेक पर्यायांपैकी काय घ्यावे ते रुग्णाला कळत नाही. नेमका हाच सल्ला सर्वतोपरी विचार करून फॅमिली डॉक्टरांनी द्यायला हवा. 'फॅमिली डॉक्टर' ही संकल्पना नव्याने रुजायला हवी.


**एआय अर्थात आर्टिफिशिल इंटेलिजन्स**

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वेग गेल्या ७-८ वर्षांमध्ये प्रचंड वाढला आहे. खरेतर एआय ही १९५०-१९६० पासून आहे. त्यानंतर आले मशीन लर्निंग (ML). आता डीप लर्निंग (डीएल) आले आहे. डीएलचा फायदा अनेक ठिकाणी झाला आहे. आता जन्मापासून (आयव्हीएफ तंत्रज्ञान) मृत्यूपर्यंतचा अंदाज एआयमुळे लावू शकतो. बऱ्याचदा हे अंदाज खरे ठरतात. केवळ उपचारच नाही तर वैद्यकीय व्यवस्थापनातही एआयचा वापर सर्रास केला जातो. उदाहरणार्थ- सुरुवातीला कोविडमध्ये एक्सरे आणि सिटी स्कॅन वापरून निदान केले जात होते. कारण रेडिओलॉजिस्टनी तसे सॉफ्टवेअर तयार केले होते. आता अशा प्रकारची सगळी सॉफ्टवेअर तयार व्हायला लागली आहेत. त्वचारोग आजारात मोबाइलमध्ये ॲपद्वारा फोटो काढला तर निदान करू शकतो. आता एआयच्या साहाय्याने बऱ्याचदा निदान केले जाते. समजा, लॅपरोस्कोपिक सर्जरी. त्यात मोठ्या प्रमाणावर लाखो लोकांचा डेटाबेस तयार केला जातो. त्यातून एआय मार्गदर्शन करते. उदाहरणार्थ- पित्ताशय काढण्याची शस्त्रक्रिया. याचे एक एआय ॲप आहे. त्या ॲपमध्ये शस्त्रक्रिया सुरू असताना लॅपरोस्कॉपी मॉनिटरचा फोटो काढायचा. मग ॲप सांगते की झालेली शस्त्रक्रिया योग्य आहे की त्यात अजून




**Cholecystectomy app**

काही बदल पाहिजेत. Chole AI नावाच्या या ॲपमुळे तुमच्या शस्त्रक्रियेला समर्थनही मिळते. शिवाय शस्त्रक्रियेत काही चूक झाली आहे का, तेही कळते. आज अनेक घरांत ॲलेक्सा आहेत. त्या तुमच्या प्रश्नांना अचूक उत्तरे देतात. मेयो क्लिनिकने काढलेल्या मेडिकल ॲलेक्साला प्रश्न विचारल्यावर ती काही उत्तरे देते. जसे की औषधांचे योग्य प्रमाण इत्यादी. कालांतराने सर्जिकल ॲलेक्साही येईल आणि ती शस्त्रक्रियेच्या वेळी सर्जनला सल्ला देईल. आताशा शस्त्रक्रिया करताना अनेकजण नेव्हिगेशन वापरतात. उदाहरणार्थ– न्यूरोस्पाइन सर्जरीमध्ये रुग्णाच्या शरीरात काय आहे, कुठे आजार आहे आणि काय करायला हवे. हा टेक्नॉलॉजिकल फाईननेस (तांत्रिक सूक्ष्मता) तंत्रज्ञानाच्या साहाय्याने बरीच कळते व शस्त्रक्रिया जास्त सुकर व सुरक्षित होतात. सध्या होलो–मेडिसिनचा वापर केला जातो. हल्ली मीही होलोलेन्स वापरतो. त्या होलोलेन्समध्ये लिव्हरच्या फोटोचा आकार कृत्रिम तंत्रज्ञानाच्या साहाय्याने एखाद्या खोलीएवढा करू शकतो आणि ते हाताने फिरवू शकतो. शस्त्रक्रियेच्या वेळी ती इमेज बाजूला ठेवून त्याप्रमाणे शस्त्रक्रिया करता येऊ शकते. त्यायोगे रुग्णाची जोखीम कमी करता येऊ शकते. अशा प्रकारचे त्याच्या साहाय्याने शिक्षण देता येते. मी मुंबईत, कुणी नेपाळमध्ये, कुणी भूतानमध्ये आहेत, तर मी



**होलोलेन्स**

ऑगमेंटेड रिॲलिटीच्या साहाय्याने त्यांना मार्गदर्शन करू शकतो. हेच तंत्र शस्त्रक्रियेतील मार्गदर्शनासाठीही वापरता येते. याचबरोबर हॉस्पिटल मॅनेजमेंटमध्ये सॉफ्टवेअरचा वापर वाढला आहे. रूग्ण आल्यावर त्याला ताबडतोब सेवा उपलब्ध करून देण्यासाठी क्लिनिकल सॉफ्टवेअरचे साहाय्य घेतले जाते. या व्यतिरिक्त शिक्षणात तंत्राचा खूप फायदा होतो. त्याला लर्निंग ॲनालिटिक्स म्हणतात. उदाहरणार्थ– एखादी शस्त्रक्रिया करणाऱ्याचा हात कसा फिरतो, कुठे तो कमी पडतो, कुठे अधिक प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे, या सगळ्याचे विवरण करून त्याचा बारीकसारीक विचार करून त्याप्रमाणे त्याला योग्य ते ट्रेनिंग देऊन त्याचे कौशल्य कसे वाढवता येईल आणि त्यायोगे रुग्णाची आरोग्यसुरक्षा कशी वाढवायची याचा अभ्यास करायला सुरूवात झाली आहे. आधी विद्यार्थ्यांच्या शस्त्रक्रियेत सफाईदारपण आणणे अवघड होते पण आता त्याची चूक दाखवून देऊन शस्त्रक्रिया सफाईदार कशी होईल, ते सांगता येते, ही सगळी एआयची किमया आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे डॉक्टरांच्या स्थानाला धक्का पोहचेल का? याविषयी मी विमानक्षेत्राचे उदाहरण देईन. विमानक्षेत्रात जवळपास पंधरा–वीस वर्षे एआयचा वापर होतो आहे. परंतु पायलटविरहित विमाने आहेत का? आज कुणाला विमानाने जायचे असले तर पायलटविरहित विमानाचा वापर केला जाईल का? मला वाटते, की याचे उत्तर नाही असे आहे. पायलटविरहित विमानापेक्षा एआय टेक्नॉलॉजीतही निपुण असलेला पायलट असणे ही काळाची गरज आहे. हेच वैद्यकीय क्षेत्राबद्दलही म्हणता येईल. एआय टेक्नॉलॉजीतही निपुण असलेला डॉक्टर असणे ही काळाची गरज आहे. एआय माणसांची जागा घेऊ शकणार नाही; पण कदाचित एआय आणि डॉक्टर यांची सुयोग्य रितीने सांगड घातली गेली तर रुग्णांवर अधिक चांगल्या पद्धतीने उपचार होऊ शकतील, हा दृष्टिकोन असणे गरजेचे आहे. या सगळ्या दृष्टीने पाहिल्यास पाश्चात्त्य देशांच्या तुलनेने तांत्रिक बदलांमध्ये आपण अजून पाच–दहा वर्षे मागेच आहोत. अजूनही एआयच्या बाबतीत सांगायचे तर आपला बेसिक रिसर्च थोडासा कमी आहे. माझ्या मते, तो पुढल्या पाच–दहा वर्षांत वाढेल.

आम्ही केईएममध्ये केलेल्या संशोधनाविषयी सांगतो. केईएममध्ये दररोज ८०० रुग्णांची स्किन ओपीडी आहे. त्यातील ३००–४०० रुग्ण साध्या आजाराचे असतात व ते कोणीही जनरल प्रॅक्टिशनर उपचार करू शकेल असे असतात. परंतु योग्य निदान होत नाही म्हणून ते आमच्याकडे

येतात. जवळच्या सरकारी दवाखान्यात त्यांना उपचार मिळू शकतात. यासाठी आम्ही एक ॲप तयार केले होते, त्यात रुग्ण ज्या जनरल प्रॅक्टिशनरकडे गेला असेल त्याने त्या ॲपमध्ये रुग्णाच्या स्किनचा फोटो टाकला तर त्याला सूचना येते, की हा अमुक प्रकारचा आजार असून त्यावर तमुक प्रकारचे उपचार करा. साधारण २०१६ मध्ये केलेला हा स्टडी खूप यशस्वी ठरला आणि अनेकांना त्याचा फायदा झाला. रूग्णांचा मुंबईच्या उपनगरांतून उठून केईएमपर्यंत येण्यासाचा वेळ, खर्च वाचला. कुणाला तरीही बरे वाटले नाही, तर केईएमला यायचा पर्याय होताच. अशा प्रकारचे ॲप आज उपलब्ध आहेत व कोविडकाळामध्ये अनेक डॉक्टरांनी त्याचा फायदा घेतला. दुसरा एक स्टडी होता पावसाळ्यातील आजारांवरचा. पावसाळयाआधी आणि पाऊस सुरू झाल्यावर सहसा गॅस्ट्रोएन्टेरिटिस वाढतात. पुढे पावसाचे पाणी साचल्यावर लेप्टो, मग मलेरिया, टायफॉईड, डेंग्यू असा सर्वसाधारण क्रम असतो. आम्ही महानगरपालिका आरोग्यविभाग आणि हवामानखात्यासह अभ्यास केला, होता की पावसाळी आजारांच्या या पॅटर्नवरून पुढील काही दिवसांमध्ये कोणत्या आजाराचे रुग्ण येतील, याचा अंदाज घेता येऊ शकतो का, त्याप्रमाणे आपली आरोग्यव्यवस्था आपण सुसज्ज ठेवू शकतो का वगैरे मुद्द्यांचा त्यात समावेश होता. या विषयावर डॉक्टर भारंबे यांनी पीएचडी केली आहे. काही दिवसांतच याचा नियमित वापर सुरू होईल.

याव्यतिरिक्त आधुनिक तंत्रज्ञान आताही प्रत्यक्षात वापरात येत आहे. उदाहरणार्थ- सीजीएम म्हणजे कंटिन्युअस ग्लुकोज मॉनिटरिंग याचा वापर अनेक जण आताही करत आहेत. रूग्णाच्या पोटाला एक सेन्सर लावून मोबाइलच्या साहाय्याने रुग्णाच्या साखरेच्या पातळीचे व्यवस्थापन डॉक्टर किंवा रुग्णाच्या काळजीवाहकाला करता येते. (फोटो ५) अशा प्रकारचे तंत्रज्ञानातले बदल माझ्या मते महत्त्वाचे आहेत.




**साधन हालचाली विश्लेषण**

**(Instrument Movement analysis)**



**Continuous Glucose Monitoring**

टेलिमेडिसिन हे कोरोनाकाळात प्रचंड वाढले. सुरुवातीला टेलिमेडिसिन ज्या पद्धतीने वापरले गेले त्यापेक्षा आता होणारा वापर अनुषंगिक आहे. उदाहरणार्थ- काही वेळा बाहेरगावचे रुग्ण असतील पहिल्यांदा प्रत्यक्ष तपासून व नंतर ऑनलाइन व्हिडिओ कॉलवर बोलून उपचार सुरू ठेवता येतात. छोट्या छोट्या गोष्टींसाठी त्यांना प्रत्यक्ष यावे लागत नाही. आता तर काही वेळा मॉनिटरवर पल्स, अल्ट्रासाऊंड पाहता येऊ शकते. विशेषतः दुर्गम भागांत या गोष्टी होतात. उदाहरणार्थ- मेळघाट वगैरेसारख्या ठिकाणी पाच-सात वर्षांपूर्वीच हा वापर सुरू झाला आहे. मात्र सगळीकडे तंत्रस्नेही लोक असतीलच असे नाही. मात्र हे होणे शक्य आहे, ही चांगली बाब आहे. राहता राहिला प्रश्न एखादा इंटरनेट कनेक्शन बंद पडले तर? हा प्रश्न आपल्याकडे येऊ शकतो. परंतु मी सुचवेन, की क्रिटिकल बाबींसाठी स्टॅण्डबाय व्यवस्था सज्ज ठेवायला पाहिजे. Histopathology च्या स्लाइड बनवणे व बघणे, आधुनिक तपासण्या करणे अशा अनेक आधुनिक तंत्रज्ञानामुळे रुग्णाचे आयुष्यमान एकूण उंचावताना दिसते आहे.

तंत्रज्ञानाच्या दृष्टीने पाहता आपण मायक्रोलेव्हलला चाललो आहोत. काहीच दिवसांत जनुकाचा आपल्या आजारात व उपचारात सहभाग असेल. जेनेटिक काऊन्सेलिंग, जेनेटिक अंडरस्टॅण्डिंग, जेनेटिक मॅन्युप्युलेशन, जेनेटिक इक्विपमेंट यायला लागली आहेत. एआय आणि जेनेटिक्स यांचा संगम झाला तर गोष्टी अधिक बदलतील. भावी आई-बाबाला त्यांच्या आई-वडिलांकडून आलेला एखादा आजार उदाहरणार्थ- मधुमेह - लक्षात घेऊन त्यांना मूल होऊ देताना तो आजार बाळाला होऊ न देणे हा पुढचा आधुनिक वैद्यकीय टप्पा असेल. आज काही ठिकाणी गर्भावरदेखील शस्त्रक्रिया केल्या जातात. अशा प्रकारे काही आजार टाळून पुढची पिढी- सुआरोग्य असलेली सुप्रजा कशी निर्माण करता येईल, ते बघितले जाणार आहे.

सगळे बदल होत आहेत, ते चांगल्यासाठीच होत आहेत. त्या बदलांसोबतच त्यात गुंतागुंत, वाढता खर्च असे अनेक मुद्दे समाविष्ट होतात. नवीन गोष्ट वापरताना तिचा

फायदा तर घ्यावाच, त्याबरोबर कदाचित होणाऱ्या तोट्याचेही भान असले पाहिजे. प्रत्येक नवीन किंवा महाग उपचाराची पद्धत किंवा औषधी उपयुक्त असेल असे नाही. याची जाणीव डॉक्टरने रुग्णाला करून दिली पाहिजे. एखाद्या चौकोनी कुटुंबाला मध्यमवर्गी जीवनशैली जगायची तर महिन्याला कमीत कमी पंचवीस-तीस हजार रुपये लागतातच. त्यासाठी तेवढे पैसे कमावणे गरजेचे ठरते आणि त्यासाठी राबावे लागते. मात्र हे करताना आरोग्याच्या पुंजीकडे सहसा दुर्लक्ष होते. अचानक एखादा आरोग्यविषयक खर्च उद्भवला तर फक्त आरोग्याचेच नाही तर घराचेही आर्थिक बजेट कोलमडून पडते. अशा वेळी आरोग्यविम्याचा आधार घ्यावा म्हटला तरी तोही भार सोसायची आर्थिक परिस्थिती हवी. ती असली तरी त्यातही पुन्हा थोडीफार किचकट प्रक्रिया आहेच. अशा वेळी आर्थिक बळ असणे आवश्यक आहे. त्यामुळे सामान्यांनी या खर्चासाठी वेगळी ठेव ठेवायला हवी.

**रुग्णसंवाद सर्वात महत्त्वाचा**

सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे तो डॉक्टर-रुग्णसंवादाचा. गेल्या २०-३० वर्षांत डॉक्टरांना दिले जाणारे शिक्षण हे ज्ञानावर आधारित व वस्तुनिष्ठ आहे. बदलत्या काळाचा कानोसा घेतला तर पुढच्या पिढीतील काही डॉक्टरांची सारासार विचार करण्याची शक्ती हरवते आहे. त्यामुळे डॉक्टर-रुग्ण संवाद हरवण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पूर्वी रुग्ण डॉक्टरांकडे विश्वासाने जायचे. त्याला देव स्वरूप मानायचे. ते म्हणतील ती पूर्व दिशा असायची. आता हे चित्र बदलले आहे. आता रुग्ण डॉक्टरांनी सांगितलेली गोष्ट पुन्हा पडताळून बघतात. गुगल सर्च करतात किंवा सेकंड ओपिनियन घेतात. बरेच जण मनातील प्रश्न, शंका विचारायला लागले आहेत. खूप वेळा कंपनीबेस्ड, खोट्या ट्रीटमेंटही व्हायला लागल्या आहेत. त्यातून डॉक्टर-रूग्ण नाते-संवाद बिघडायला लागला आहे. तो विश्वास पुन्हा आणण्याची आवश्यकता आहे. डॉक्टरांप्रमाणेच रुग्णांनीही समजून घ्यायला हवे. आरोग्य हे वाटते तितके सोपे क्षेत्र नाही. त्यात चिक्कार गुंतागुंत असते. वैद्यकीय प्रश्न हे काही गणितासारखे चुटकीसरशी सोडवणे शक्य नाही. उपचार, शस्त्रक्रिया यांचे फायदे-तोटेही होतात आणि रुग्णाने ते नीट समजून घ्यायला हवेत. ते होत नाही तोपर्यंत आरोग्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलणार नाही. लोकांच्या जीवनशैलीत, खाण्याच्या सवयींमध्ये खूप बदल झाले आहेत. लठ्ठपणा वाढला. मधुमेह, उच्च रक्तदाबाचे रुग्ण वाढत आहेत. ते होण्यासाठी काही अंशी तंत्रज्ञानानेही एक भूमिका वठवली आहे. त्यावर उपाय म्हणजे संतुलित आहार, विहार, व्यायाम, मनःशांती ही चतुःसूत्री प्रत्यक्षात आणणे फारच आवश्यक आहे. धकाधकीच्या जीवनात स्वतःची जीवनशैली विशिष्ट पद्धतीने आचरणात आणणे गरजेचे आहे. ही धकाधकी राहणार आहेच, त्यातून काही सुटका नाही. त्यामुळे आपणच स्वतःत बदल घडवणे गरजेचे आहे.

पन्नास-साठ वर्षांपूर्वी सार्वजनिक रुग्णालये मोठी होती आता खाजगी रुग्णालयांची संख्या वाढते आहे. छोटी नर्सिंग होम बंद पडत आहेत. सर्वसाधारणपणे शहरातला श्रीमंत व मध्यमवर्गीय माणूस आरोग्यविम्यावर जगतो आहे. गावातला व शहरातील गरीब माणूस विविध सरकारी आरोग्ययोजनांवर जगतो आहे. त्या योजना आणि विम्याचा प्रभाव हा जवळपास ५०-६० टक्के लोकांवर पडतो आहे. त्यामुळे आरोग्याची अर्थव्यवस्था बदलली आहे. आरोग्यखर्च वाढला आहे. नवीन औषधांमुळे जीवनमान वाढले आहे. उदाहरणार्थ- लहान मुलांचा रक्ताचा कर्करोग. पूर्वी हा रोग होणे ही अत्यंत दुःखद घटना असायची व सर्व लहान मुले दगावत असत. आज जवळपास ९० ते ९५ टक्के मुले वाचतात आणि ती चारचौघांसारखे आयुष्य जगतात. कर्करोगाच्या अन्य काही प्रकारांमध्येही पूर्वीच्या काळी जे निराशाजनक चित्र असायचे, तेवढे आता राहिलेले नाही. चांगले उपचार करता येतात. म्हणजेच नवीन औषधे-तंत्रज्ञानाचे प्रकार येत आहे. त्यातले काही स्थिरावत आहेत. काही मागे पडत आहेत. डॉक्टर पूर्वापार उपचार पद्धती वापरतात तेव्हा प्रश्न नसतो, पण काही प्रयोग करायचा असतो/नवीन तंत्रज्ञान वापरतात तेव्हा त्याचे भान आणि जाणीव स्वतः डॉक्टर, रुग्ण, समाजाला असणे आवश्यक आहे. अशा वेळी त्या उपचारांचा परिणाम शंभर टक्के होईल याची खात्री त्या डॉक्टरलाही नसते. तेव्हा त्याने आणि रूग्णाने होणाऱ्या चांगल्या-वाईट परिणामांना समजूतदारपणे सामोरे जायची तयारी ठेवायला हवी. रुग्णाचे समुपदेशन योग्य पद्धतीने व्हायला हवे. आधुनिक तंत्रज्ञान वापरताना रुग्णाची शारीरिक, मानसिक आणि आर्थिक परिस्थितीही लक्षात घ्यावी लागते. या सगळ्याला आपण आरोग्यभान म्हणू शकतो आणि ते असणे अत्यंत आवश्यक आहे.

**- डॉ. अविनाश सुपे**
avisupe@gmail.com

**शब्दांकन - राधिका कुंटे**
kunte.radhika@gmail.com



# झपाटलेल्या नागरीकरणाची तीन दशके

सुलक्षणा महाजन

१९७० च्या दशकात मुंबईमधील नरिमन पॉईंट कार्यालयीन आणि कफ परेडच्याच्या कार्यालयीन इमारतींचे बाधकाम सुरू झाले होते. इंडियन एक्स्प्रेस आणि एअर इंडियाच्या इमारती २३ आणि २५ मजल्यांच्या होत्या. कफ परेडच्या वर्ल्ड ट्रेंड सेंटरच्या ३५ मजली इमारतींचे बांधकाम वीस वर्षे चालू होते. 'उषाकिरण' आणि 'मातृमंदिर' ह्या दोन २६ मजल्यांच्या निवासी इमारती बांधल्या जात होत्या. १९९०च्या दशकापर्यंत अशा गगनचुंबी इमारती मुंबईच्या आकाशात फारशा दिसत नसत. ग्रामीण विकास हा तेव्हाचा विकासमंत्र होता. शहरांना काँक्रीटचे जंगल म्हणून हिणवले जात असे. तेव्हाचा अधिकृत बांधकाम व्यवसाय शहरनियोजनाच्या नियमांनी करकचून बांधलेला होता, तरी अनधिकृत बांधकाम व्यवसाय मुंबई, ठाणे, डोंबिवली, मुंब्रा गावांमध्ये जोमाने फोफावलेला होता.

विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात अर्थव्यवस्थेने नवे वळण घेतले. महानगरांमध्ये पैशांचा पूर आला तर काही शहरे दुष्काळातच राहिली. इमारती ताडमाड वाढू लागल्या. मुंबई आणि अनेक महानगरांमध्ये बहुमजली इमारतींचे पीक तरारून आले. काही झोपडवस्त्या झोपू योजनेच्या माध्यमातून काँक्रीटच्या जंगलामध्ये सामील झाल्या, तरी अनेक झोपड्यांची माजलेले झुडपी जंगले तगून राहिली. शहरांमधील विरोधाभास अधिक तीव्र झाले. जुनी आव्हाने शिल्लक असतानाच नवीन मोठे धोके शहरांमध्ये दिसू लागले आहेत.

अलीकडेच २०२३ सालातील १७३ राहण्यायोग्य शहरांची जागतिक क्रमवारी जाहीर झाली. त्यात शिक्षण, आरोग्य, निवारे, पाणी-सांडपाणी आणि घनकचरा सेवा, वाहतूक, सुरक्षितता आणि करमणूक असे राहण्यायोग्य शहरांचे निकष तपासून क्रमांक दिले गेले. भारतामधील दिल्ली व मुंबई, १४१ क्रमांकावर तर चेन्नई, अहमदाबाद आणि बंगलोर अनुक्रमे १४४, १४७ आणि १४८ क्रमांकावर आहेत. पाकिस्तानातील कराची आणि बांगला देशातील ढाका, सीरियामधील दमास्कस अशी काही शहरे भारतामधील शहरांच्यापेक्षाही या यादीच्या तळाशी आहेत. गेली तीस वर्षे शहरे ही विकासाची इंजिने असल्याचा विचार भारतामध्ये सुरू झाला असला तरी ही इंजिने किती अकार्यक्षम आहेत ह्याचाच पुरावा जागतिक क्रमवारीने दिला आहे. त्याचे खरे कारण आहे ते म्हणजे राजकारण्यांचे काँक्रीट ओतून बांधकामे करून शहरी विकास करण्याचे वेड! एकीकडे पॅरिसला जाऊन जागतिक पर्यावरण रक्षणासाठी आश्वासन द्यायचे, देशात शाश्वत विकासाचा दिखाऊ मंत्रघोष करायचा आणि प्रत्यक्षात स्मार्ट शहरांचे अशाश्वत विकासाचे धोरण आखायचे. हे राजकीय ढोंग नागरिकांच्या लक्षात येईल तो खरा सुदिन!

**बहरलेली अर्थसृष्टी**

तीस वर्षांपूर्वी नरसिंह राव या पंतप्रधानांच्या कारकिर्दीमध्ये भारताच्या आर्थिक धोरणाने मोठे वळण घेतले. शेतीप्रधान खेड्यांच्या देशाकडून भारताचे नागरी स्थित्यंतर वेगाने सुरू झाले. नव्या आर्थिक खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण अशा नव्या त्रिसूत्री धोरणाला खाउजा म्हणून नावे ठेवली गेली. नव्या धोरणामुळे भारताची जागतिक बँकेच्या कर्जफेडीच्या संकटातून, उद्योगांची लायसेन्स-परमिट राजमधून मुक्तता झाली आणि शहरांना नवीन आयाम मिळाले. भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढू लागली नवीन तंत्रज्ञान, उद्योग वाढू लागले. केंद्र शासनाच्या तिजोरीमध्ये अधिक भर पडू लागली आणि त्यामधून जुन्या-नव्या सामाजिक



कल्याणकारी योजनांना अधिक पैसे मिळू लागले. काही वर्षांतच कोट्यवधी भारतीय नागरिकांची गरिबीतून मुक्तता झाली. इतर अनेकांना गरिबीतून बाहेर पडण्याच्या आशा उत्पन्न झाल्या. आधी इंडिया शायनिंगचे डिंडिम वाजले आता अच्छे दिनाचे वाजत आहेत.

१९९०च्या दशकात शहरांमध्ये एक नवा श्रीमंत आणि सधन मध्यमवर्ग निर्माण होऊ लागला. काहींना अच्छे दिन दिसू लागले. खाजगी बँकांकडून वाहन आणि गृहकर्ज स्वस्त झाले. शहरांच्या उत्तुंग इमारतीमध्ये त्यांच्यासाठी मोठी घरे बांधली गेली. नव्या आर्थिक धोरणाने देशी-विदेशी मोटारींचे उत्पादन भारतात सुरू झाले. तीस वर्षे रस्त्यांवर अधिराज्य गाजवणाऱ्या फियाट-अँबॅसिडर मोटारी रस्त्यावरून नाहीशा होऊ लागल्या. सर्वांच्या हातात मोबाइल आले. शहरांच्या परिघावर मोठ्या उद्योगांनी संसार थाटून अर्थव्यवस्थेची गती वाढवली. भारताच्या अर्थव्यवस्थेचा ढाचा बदलून गेला. शहरांचा आणि भारताचा भूगोल आणि हवामानही बदलले. नव्या अर्थव्यवस्थेमध्ये शहरे विकासाची इंजिने झाली. देशी-विदेशी गुंतवणूकदारांनी त्यात पैसे टाकून ती गतिमान केली आणि त्यांनी नागरीकरणाला गती दिली.

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात ह्या नवश्रीमंतवर्गात जन्मलेल्या आजच्या तरुण पिढीला पालकांच्या तरुणपणाचा, अभावग्रस्त काळाचा, संथगती शहरी जीवनाचा अनुभव मिळाला नाही. स्वातंत्र्योत्तर काळातील पिढीचा भागीरथी प्रयत्नांचा इतिहास त्यांना सांगितला गेला नाही. नवीन जीवनशैलीचा, उपभोगाचा, आनंदी जीवनाच्या जाहिरातींचा प्रसार प्रसिद्धीमाध्यमांतून जोमदारपणे झाला. त्यामुळे शहरातीलच नाही तर ग्रामीण भागात वाढलेली नवीन पिढीही नागरी होण्यासाठी, सुशिक्षित, उच्च-शिक्षित होण्यासाठी धडपडू लागली. नव्या अर्थव्यवस्थेने अनेकांना मोठ्या पगाराच्या नोकऱ्या मिळाल्या. स्थलांतरासाठी प्रोत्साहन मिळाले. देशा-परदेशात जाण्याच्या संधी आणि त्यासाठी विमानसेवा उपलब्ध झाल्या. रेल्वेसेवा विस्तारली. महामार्गांनी दाही दिशा खुल्या केल्या. प्रवास आरामदायी आणि जलद गती झाला. मुंबईसारख्या शहरातले काही जीर्ण विभाग नव्या उत्तुंग इमारतींनी भरून गेले. काही इतर विकासकांच्या आश्वासनावर तिष्ठत राहिले. नवीन शहरे उभारली जाऊ लागली. एकमेकांशी जोडली जाऊन जवळ येऊ लागली.

मात्र असा शहरी नवश्रीमंत-मध्यमवर्ग तयार होऊनही, किंवा तयार झाल्यामुळेच बहुसंख्य शहरांतले नागरी जीवन मात्र अधिकाधिक प्रकारे असह्य होत आहे. त्यामुळेच तर २०२३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या १७३ जागतिक महानगरांच्या यादीमध्ये भारतामधील मुंबई-दिल्ली-चेन्नई अहमदाबाद, बंगलोर यांसारख्या शहरांना ५०ते ६० टक्के गुण असले तरी १४१ ते १४८ वे स्थान दिले गेले आहे. इतर शेकडो भारतीय महानगरांना ह्या यादीमध्ये स्थान मिळवण्याइतकेही राहणीमान उपलब्ध नाही.

**झपाटलेली नागरसृष्टी**

गेल्या तीस वर्षांत जागतिक कंपन्यांमुळे महानगरांची वाढ झपाटल्यासारखी झाली. बंगळुरू, हैदराबाद, चंदिगढ, दिल्ली, पुणे, नवी मुंबई, मंगलोर अशा शहरांमध्ये माहितीतंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील नवीन प्रकारच्या उद्योगांनी शेकडो एकरांवर आपली संकुले उभाराली. नव्या तरुण पिढीला आकर्षित केले. सरकारनेही इलेट्रॉनिक्स, संगणक, माहितीतंत्रज्ञानाच्या क्षेत्राच्या विकासाठी विशेष नागरी विभाग घडवले. निर्यातक्षम उद्योगांसाठी विशेष धोरण आले. नवीन उद्योगांची वाढ काही सुलभ नव्हती. जुन्या विचारांच्या राजकीय-सामाजिक संघटना त्यात अडथळे आणत होत्या. तरीही आर्थिक विकासाचा वेग वाढला. कुशल आणि प्रशिक्षित कामगारांना मोठी मागणी निर्माण झाली. अनेक शहरांमध्ये खाजगी क्षेत्रामध्ये अभियांत्रिकी, संगणक महाविद्यालये निर्माण झाली. भारतभरातून माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये उच्चशिक्षित तरुणांचे ओघ सुरू झाले. नव्या सहस्रकाच्या पहाटे संगणक प्रणालीम ध्ये बदल करण्यासाठी Y2K मध्ये अक्षरश हजारो अभियांत्रिकी पदवीधरांना अल्पावधीत मोठ्या पगाराच्या नोकऱ्या मिळाल्या. आई-वडिलांपेक्षा मुलामुलींचे पगार कितीतरी पट झाले. जगभरात अनेक देशांमध्ये जाऊन काम करण्याच्या संधी उपलब्ध झाल्या. उच्च शिक्षणाच्या, स्थिरावण्याच्या संधी उपलब्ध झाल्या. त्यांच्या पालकांनाही परदेशात जाण्याचे वेध लागले.

मात्र नव्या आर्थिक धोरणांचे विपरीत परिणाम मुंबईसारख्या व्यापारी आणि औद्योगिक महानगरावर तीव्रपणे दिसू लागले. कापडगिरण्या आधीच बंद पडलेल्या

होत्या, त्यांच्या जोडीने ठाणे, डोंबिवली, नवी मुंबई अशा शहरांमधील मोठे मोठे कारखाने, रासायनिक उद्योग बंद पडले. त्यांची जागा कार्यालयीन इमारती, श्रीमंती घरांच्या संकुलांनी, मॉल आणि नव्या मल्टिप्लेक्सच्या उत्तुंग इमारतींनी घ्यायला सुरुवात केली. औद्योगिक कामगारांची जागा नव्या माहितीतंत्रज्ञान क्षेत्रातील, वित्त आणि पर्यटन अशा क्षेत्रातील उच्चशिक्षित तरुण-तरुणींनी घेतली. मुंबईसकट सर्व शहरांमध्ये मॅकडोनाल्ड, केएफसी, स्टारबक्सच्या माळा दिसू लागल्या. देशी खाद्यगृहांचेही मोठे रूपांतर होऊ लागले. देशी-परदेशी कंपन्यांमधील तरुणांच्या जोडीनेच ह्या नव्या सेवाक्षेत्रातील तरुणांची वेशभूषा, भाषा, संस्कृती, झपाट्याने बदलू लागली. पंचतारांकित संस्कृतीचा प्रसार झपाट्याने झाला. महानगरी तरुण पिढीचे अनुकरण इतर लहानमोठ्या शहरांमध्येही सुरू झाले. करमणूक साधने, संगणक, इंटरनेट आणि मोबाइल तंत्रज्ञानाने नव्या नागरी जीवनशैलीचा प्रसार केला.

महाराष्ट्रात पुणे, नासिक, नागपूर, औरंगाबाद शहरांमध्ये नवीन नवीन कारखाने उभे राहू लागले. इतर राज्यांमध्येही अनेक शहरांच्या परिघावर मोठ्या परदेशी वाहनकंपन्यांनी आपले हातपाय पसरले. त्यांच्या आजूबाजूला लहान लहान कारखाने उभे राहू लागले. मुंबईतील रासायनिक कारखाने महाडसारख्या कोकणातील गावांत गेले. कोकण रेल्वे अगोदरच कार्यान्वित झाली होती. त्या आधारे रत्नागिरी, चिपळूण अशा गावांमध्ये कारखानदारीचा विस्तार सुरू झाला. मुंबई आणि अहमदाबाद येथील कापडउत्पादनाला उतरती कळा लागली तरी महाराष्ट्रात बारामती, कुर्डूवाडी, तामिळनाडूमध्ये कोईमतूर, तिरूपूर, पंजाब आणि केरळमधील अनेक शहरांमध्ये मोठे मोठे कापड कारखाने उभे राहू लागले. जागतिक आणि भारतीय व्यापारी मालाची उलाढाल वाढली. आयात-निर्यातीला वेग आला. भारताच्या डोक्यावरचे मोठे कर्ज तर फिटलेच शिवाय शासनाच्या तिजोरीत भर पडू लागली. शासनाने पायाभूत सेवांमध्ये मोठी गुंवणूक सुरू केली. आर्थिक धोरणापाठोपाठ नवीन पायाभूत क्षेत्र, टेलिकॉम, वित्त आणि बँकिंग क्षेत्र, नागरी धोरण, वाहतूक धोरण अशी अनेक धोरणांची मालिकाच उलगडू लागली. एकमेकांच्या आधाराने आणि सहकार्याने काही सेवांना वेग आला, तर सार्वजनिक बस सेवा खुरडत गेल्या. नोटबंदीने, कोविड-१९ महामारीने गरिबांची, स्थलांतरितांची परवड वाढवली.

### महामार्ग, उड्डाणपूल आणि विमानतळ

स्वातंत्र्यानंतरच्या चार दशकांमध्ये रेल्वे, रस्ते, बंदरे, विमानतळ, टेलिफोन, नवीन शहरे, ओद्योगिक वसाहती अशा



सर्व पायाभूत सेवांच्या निर्मितीची जबाबदारी केवळ शासकीय संस्थांची असे. त्याच्यासाठी लागणारे भांडवल, नियोजन आणि तंत्रज्ञ सर्वकाही शासनाचे असे. परंतु त्या गुंतवणुकीसाठी आवश्यक असणारा निधी गरजांच्या तुलनेत कायमच तुंटपुजा होता. नव्या धोरणामुळे पायाभूत क्षेत्राच्या निर्मितीमध्ये खाजगी आणि परदेशी कंपन्यांनाही सहभागी करून घेणे शक्य झाले.

व्यापारविस्तारासाठी समुद्रकिनाऱ्यांवर खाजगी क्षेत्रामध्ये बंदरांची सागरमाला तयार झाली. अनेक जुन्या बंदरांचा विस्तार झाला, मात्र मुंबईचे बंदर आणि बंदराची जमीन ओस पडू लागली. दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नई अशा महानगरांना जोडण्यासाठी चतुष्कोन महामार्गांचे नियोजन केंद्र शासनाने केले. त्याआधी मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग महाराष्ट्रात झपाट्याने बांधण्यात आला. त्यासाठी वेगळ्या कंत्राटी पद्धती, नवीन तंत्र-यंत्रसामग्री, वित्तउभारणी, करण्यात आली. टोलआकारणी सुरू झाली. पाठोपाठ वाहनसंख्यावाढ होऊन कोंडी दिसू लागल्यावर एकट्या मुंबईमध्ये पूर्व-पश्चिम महामार्गावर पन्नास उड्डाण पूल झपाट्याने बांधण्यात आले. पाठोपाठ अर्धवट नियोजन प्रक्रियेमुळे उड्डाणपूल बांधण्याचे नंतर मेट्रोसाठी पाडण्याचे प्रकारही पुण्यात झाले. गेली साठ वर्षं बांधकामाच्या प्रक्रियेत असलेल्या न्हावा-शिवडी समुद्री महामार्गाचे आणि नवी मुंबईमधील नव्या विमानतळाचे बांधकाम सुरू झाले. मुंबई आणि इतर महानगरांमध्ये मेट्रोची उभारणी वेगाने सुरू झाली. एकेकाळी शेतीसाठी मोठी धरणे बांधली जात. तीस वर्षांच्या काळात मात्र शहरांमधील मेट्रोसारख्या पायाभूत सेवांची उभारणी करण्यात सर्वच राज्यांनी विशेष रस घेतला. खेडी जोडण्यासाठी रस्ते बांधणी झाली. काही गावे जोडली गेली काही वंचित राहिली.

### उत्तुंग इमारतींनी आकाश व्यापले

नवीन सहस्रकामध्ये मुंबईच्या आकाशावर अनेक

गगनचुंबी इमारतींचे नानाविध आकारांचे मनोरे दिसू लागले. गेल्या वीस वर्षांत एकट्या मुंबईमध्ये ५० ते ८० मजल्यांच्या ७० बहुमजली इमारती पूर्ण झाल्या. याशिवाय मुंबई-ठाण्यामध्ये जवळजवळ दोनशेच्या वर ३० ते १०० मजली इमारतींना बांधकामपरवाने मिळाले आहेत. थोड्या प्रमाणात झोपडवस्त्या, जुन्या जीर्ण चाळी आणि रेल्वेच्या अतिक्रमण झालेल्या लोकांसाठी फुकट घरांचे धोरण मुंबईत आले. खाजगी विकासकांना जणू काही मुंबई आंदण दिली गेली असे वाटू लागले. वीस वर्षे रखडलेला धारावी विकास प्रकल्प अलीकडेच अडाणी उद्योगाला बहाल केला असला तरी तो कधी, कसा पूर्ण होईल आणि त्याचा फायदा कोणाला मिळेल हे आज कोणीही सांगू धजणार नाही. मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या खर्डी-आसनगाव, टिटवाळा, वसई, सफाळे, विरार अशा दूरच्या गावांमध्येही उंच उंच निवासी इमारतींची संकुले उभी राहिली आहेत. झोपू योजनेतून खाजगी विकासकांना भरपूर चटईक्षेत्र बहाल केले असले तरी झोपडवस्तीमधील लोकसंख्या थोडीशी कमी होण्यापलीकडे काहीही साध्य झाले नाही. उलट झपाट्याने बांधलेली लाखो घरे विक्री होऊन किंवा विक्री न झाल्यामुळे रिकामी पडलेली आहेत आणि गरिबांना जुन्या आडव्या आणि नव्या झोपू इमारतींच्या उभ्या झोपडवस्त्यांचा आधार आहे. शिवाय अनेक ठिकाणी अर्धवट बांधलेल्या इमारतींचे सांगाडेही शहरांमध्ये दिसत आहेत.

**बांधकाम व्यवसायाचे आधुनिकीकरण**

संपूर्ण बांधकाम व्यवसायाचे तांत्रिक, वित्तीय आणि व्यावसायिक स्वरूप अमूलाग्रपणे बदलले आहे. प्रथम बांधकाम साहित्याची, यंत्र आणि तंत्रज्ञानाची, बांधकाम व्यवसायातील तज्ज्ञांची आणि संकल्पनांची आयात खुली झाली. चीनमधून स्वस्त बांधकाम साहित्य मोठ्या प्रमाणावर आयात होऊ लागले. पाठोपाठ आयात साहित्य आणि यंत्रांचे अनुकरण करून भारतामध्ये उत्पादन वाढले. १९९३ मध्ये कारखान्यात कॉंक्रीट मिसळून सिंहगड पुलाच्या बांधकामासाठी ते ओतण्याचा प्रयोग झाला होता. आता तयार कॉंक्रीटचे मोठे ट्रक सर्व शहरांमध्ये हिंडत असलेले बघायला मिळतात. त्यामुळे प्रत्यक्ष बांधकामाच्या जागेवरचे खडी-वाळूचे, सिमेंटच्या गोण्यांचे ढीग दिसत नाहीत. त्यामुळे एकीकडे बांधकामाचा वेग वाढला आहे. दुसरीकडे बांधकामाची गुणवत्ता सुधारायला मदत झाली आहे. संगणकीय प्रणालीमुळे इमारतीची डिझाईन तंत्रे बदलली आहेत. तीस वर्षांपूर्वी ट्रेसिंग पेपरवर, पेन्सली, पेन वापरून हाताने इमारतींची ड्रॉईंग तयार केली जात. पाय, खांब, तुळयांचे आकार, त्यातील लोखंडी सळ्या ह्यांची रचना करताना गणिती आकडेमोड करावी लागे. आता अशी कामे संगणकांमुळे सुलभ आणि वेगवान झाली आहेत. इमारतींच्या बाबतीत असे बदल झाले असले शासकीय मक्तेदारी, नोकरशाही आणि अज्ञानी राजकीय नेत्यांचा हस्तक्षेप मोठ्या प्रमाणात वाढला आहे. शहर नियोजनाच्या संदर्भात अजूनही गत शतकातल्या कालबाह्य वेळखाऊ प्रक्रिया व नियोजन पद्धती, गैरसमजुतींवर आधारित कायद्यांची नियमावली ह्याचाच पगडा आहे. बांधकामात तांत्रिक सुधारणा वेगाने झाल्या असल्या तरी शहरे विकृत आणि बांधकामग्रस्त होऊन नागरिक त्रस्त आणि भयग्रस्त झाले आहेत. मोठे मोठे प्रसिद्ध बिल्डर श्रीमंत ग्राहकांनाही फसवून बांधकामे करतात, काही कोर्टाच्या दणक्याने पाडली जातात. दिल्लीमधील अनेक वर्षांत बांधलेले चाळीस मजली टॉवर केवळ नऊ सेकंदांमध्ये पाडले गेले हे वेगवान बदलाचे आणखी एक उदाहरण! बांधकामांसाठी जुन्या इमारती, वाडे, इमारती पाडण्याचे, त्यांचा राडा-रोडा, कचरा आजूबाजूच्या खेड्यात, नाल्यांत, खाड्यांमध्ये आणि नद्यांमध्ये ढकलण्याचे प्रमाणही वाढले आहे. ह्या क्षेत्रात पैशांचा अमाप पूर आला आहे. जमीनमालक, बिल्डर, राजकारणी ह्यांच्या अफाट नफ्याचा विळखा सामान्य झोपडवस्त्या आणि जुन्या इमारतींच्या रहिवाशांना कवेत ओढून घेत आहे आणि





दुसरीकडे निसर्गाचा नाश करत आहे.

**उद्ध्वस्त निसर्गसृष्टी**

वेगवान अर्थव्यवस्थेबरोबरच निसर्गातील बदलांचा वेग आणि त्याचा लहरीपणा वाढत जात आहे. पूर, वादळे, उष्णतेच्या लाटा यांचा तडाखा भारतामधील सर्वच शहरांना बसत आहे. त्यामुळे शहरी जीवन अशाश्वत होत आहे. सात-आठ हजार वर्षांपूर्वी मानवाला शेतीचा शोध लागला. नंतर शेतीसाठी पृथ्वीवरची जंगलजमीन नष्ट करायला सुरुवात झाली. त्या मानवी अतिक्रमणाचा वेग संथ होता. परिणामही तत्काळ लक्षात येत नसत. एकोणिसाव्या शतकात भारतामध्ये कोळसा आणि खनिजांसाठी, रेल्वेच्या विस्तारासाठी आणि जंगले नष्ट झाली. पर्वत उजाड झाले. गेल्या तीस दशकात सिमेंटसाठी चुनखडीचे डोंगर उपसले गेले. आता इमारतींच्या बांधकांसाठी दगड-खडी साठी डोंगर आणि वाळूसाठी नद्या-खाड्या नष्ट होऊ लागल्या.

बारा वर्षांपूर्वी बंगळुरूला नवा विमानतळ शहरापासून ३५ कि.मी. दूर उभा राहिला. त्याभोवती हिरवीगार शेती, झाडे आणि खेडी होती. रस्त्यापासून दीड-दोन कि.मी. अंतरावर एक भला मोठा डोंगर होता. तेथे डोंगर खरवडणारी यंत्रे आणि ग्रॅनाइटचे दगड, खडी वाहून नेणाऱ्या मालमोटारी दिसत होत्या. आता तो भलामोठा डोंगर उंचीने, रुंदीने आणि लांबीने अर्ध्यापेक्षाही कमी उरलेला दिसला. तेव्हा 'डोंगर नाहीसा झाला' अशी कादंबरी लिहायला हवी, असे मनात आले!

नाहीशा झालेल्या डोंगरातून विमानतळाच्या भोवती, नव्या मार्गाच्या दुतर्फा आणि बंगळुरूमध्ये अनेक इमारत संकुले उभी राहिली आहेत. ह्या एका डोंगराने बंगळुरूच्या अगणित इमारतींना किती दगड, खडी, वाळू माती पुरवली असावी ह्याचे गणित अवघड आहे! अनेक वाढत्या शहरांमध्ये हेच होत आहे. नवीन मुंबईमध्ये लांबच लांब पसरलेल्या डोंगराची होणारी 'खरवड' अनेक वर्षे चालू आहे. बदलापूर जवळच्या डोंगरावर दगड फोडून खडी करणारी यंत्रे खेड्यांमधील रात्रीची शांतता भंग करत आहेत. दिव्यांच्या झगमगाटात रात्री दगडांची खुलेआम चोरी होत होती. नाशिकजवळ पांडवलेण्यांच्या समोरचा डोंगरही खरवडलेला अनेकांनी बघितला असेल. मुंबई-पुणे आणि अनेक महामार्गांसाठी डोंगर पोखरून बोगदे तयार झाले आहेत. सह्याद्रीचा कठीण कातळ मानवी हस्तक्षेपाने ठिसूळ होत आहे. दरडी कोसळून गावे गाडली जात आहेत. हा लेख लिहीत असतानाच हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमधील नवे कोरे महामार्ग, नदीकाठच्या इमारती, देवळे कोसळण्याची दृश्ये



बघायला मिळाली. हिमालयाच्या ठिसूळ डोंगरांवर धार्मिक पर्यटनाला उत्तेजन देण्यासाठी, वीजनिर्मितीसाठी धरणे आणि अवास्तव रुंद महामार्ग झपाट्याने बांधले. त्यामुळेच जोशीमठ, सिमला सारखी अनेक गावे असुरक्षित आणि भयग्रस्त झाली आहेत. डोंगरउतारावरच्या मोठ्या इमारती कोसळत आहेत. गेल्या तीस दशकांत 'डोंगर खरवडून काँक्रीटची जंगले' उभारण्याचा झपाटा नागरसृष्टी आणि तेथील अर्थसृष्टीच्या मुळावर येत आहे.

डोंगर फोडून बांधलेली काँक्रीटची जंगले उष्णतेची बेटे बनवून पृथ्वीच्या तापमानात भर घालत आहेत. प्रदूषणाला, वादळ-वाऱ्यांना, ढगफुटीला आमंत्रण देत आहेत. पूरग्रस्त होत आहेत. सध्याचे हे अनिर्बंध, अडाणीपणाने होणारे नागरीकरण शहरांना अशाश्वत आणि उद्ध्वस्त करणारे आहे. वास्तवात ह्याच काळात शाश्वत नागरी नियोजनासाठी अनेक नवीन साधने, तंत्रे उपलब्ध झाली आहेत. अशा डिजिटल युगात तथाकथित प्रगत शहरात राजकीय नेत्यांनी, म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी तंत्र-वैज्ञानिक साधने आणि मर्यादा डावलून मनमानी नियोजनाचा विडा उचलला आहे. मुंबईमधील बीडीडी चाळींचा पुनर्विकास प्रकल्प हे अशाश्वत नियोजनाचे आदर्श उदाहरण म्हणून नोंदवावे लागेल.

जगामध्ये सर्व नागरी झालेले देश शाश्वत विकासासाठी झटत आहेत. अर्थसृष्टी, नागरसृष्टी आणि निसर्गसृष्टीच्या मर्यादा जाणून संतुलित नागरी विकासाचे नवीन नवीन प्रयोग करीत आहेत. भारतातील शहरे मात्र उलट्या दिशेने जाऊन नागरिकांना भविष्यातील संकटांमध्ये लोटत आहेत. म्हणूनच राहण्यायोग्य शहरांच्या यादीमध्ये भारताची शहरे तळाला जात आहेत.

**– सुलक्षणा महाजन**
sulakshana.mahajan@gmail.com



# बदलते उद्योगजगत

माधव ज. जोशी

तीन दशकांपूर्वी, १९९१ साली भारतामध्ये आर्थिक उदारीकरण अमलात आले. गेल्या तीन दशकांतील बदलत्या उद्योगजगताचा आढावा या लेखात आपण घेणार आहोत त्याआधी १९४७ ते १९९० औद्योगिक परिस्थिती काय होती हे समजून घ्यावे लागेल.

**पार्श्वभूमी**

१९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यावर भारतातील उद्योग आणि आर्थिक धोरणे यांच्यावर पंडित नेहरू यांच्या समाजवादी विचारसरणीचा जबरदस्त पगडा होता. बहुतेक सर्व मोठे उद्योग सरकारी मालकीचे होते . भारतरत्न जेआरडी टाटा हे त्यावेळचे (१९३२-९१) प्रमुख उद्योगपती होते.नेहरू आणि त्यांची मैत्री होती, पण भारताच्या विकासासंबंधी, लोकसंख्येबद्दलची मते मात्र दोन टोकांची होती.

चांगल्या चालणाऱ्या खाजगी उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करणे हा त्या काळी राजकारण्यांचा आवडता खेळ होता. टाटा स्टीलचेही राष्ट्रीयीकरण होता होता कामगार विरोधामुळे वाचले. जगात त्या काळी पहिल्या पाचांत गणल्या जाणाऱ्या एअर इंडियाचे १९५३ मध्ये राष्ट्रीयीकरण करण्यात आले. विमा व्यवसाय १९५६ साली तर १४ बँका १९६९ साली सरकारी मालकीच्या झाल्या.

त्यावेळी खाजगी व्यवसाय हे managing agency पद्धतीने चालवता यायचे. प्रत्येक कंपनीला व्यवस्थापकीय संचालक (एमडी ) नेमायची आवश्यकता नसे. १९६९ साली ही पद्धत कायद्याने बंद करण्यात आली. त्याचवेळी मक्तेदारी प्रतिबंधक कायदा (एमआरटीपी) कायदा करण्यात आला आणि उद्योगांच्या विस्तारावर अनेक निर्बंध लादण्यात आले.

त्यावेळच्या समाजवादी मताचा असा आग्रह होता की भांडवलशाही हा एक प्राणी आहे ज्यावर कठोरपणे नियंत्रण ठेवले पाहिजे, इलाज नाही म्हणून त्यास सहन केले पाहिजे; परंतु त्यावर कधीही विश्वास ठेवायचा नाही. त्यावेळी प्रत्येक गोष्टीसाठी परवाने (लायसन्स) लागायचे. अनेक उद्योगसमूह दुसऱ्या समूहाला प्रतिबंध करण्यासाठी आपले राजकीय संबंध वापरून असे परवाने घेऊन ठेवायचे, पण ते धंदे सुरू मात्र करायचे नाहीत. 'परमिट राज'युगाने उद्योजकतेसाठी प्रतिकूल नसले तरी कठीण वातावरण निर्माण केले होते.

स्वातंत्र्यानंतरच्या तीन दशकांत भारताचे दरडोई उत्पन्न केवळ एक टक्का वार्षिक दराने वाढले. १९८० च्या दशकाच्या मध्यापासून राजीव गांधी यांच्या काळात भारताने हळूहळू आर्थिक उदारीकरणाच्या माध्यमातून आपली बाजारपेठ खुली केली. १९९१ मध्ये सरकारला सोने विमानातून भारताबाहेर पाठवून गहाण ठेवावे लागले आणि त्यावेळी परकीय चलन गंगाजळी एक अब्ज डॉलर (म्हणजे फक्त तीन आठवडे आयात करता येईल एवढी कमी) होती तेव्हा पंतप्रधान कै. पीव्ही नरसिंह राव आणि अर्थमंत्री मनमोहनसिंग या जोडीने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे कर्ज मिळवण्यासाठी आर्थिक उदारीकरणाच्या अधिक मूलभूत सुधारणा जाहीर केल्या. लायसन्स राज संपवण्यात आले. मक्तेदारी कायदा मागे घेण्यात आला. आयात सोपी करण्यात आली आणि त्यामुळे संरक्षणाच्या कोशात वावरण्याची सवय झालेल्या भारतीय उद्योगांना जागतिक बाजारातील स्पर्धेला तोंड द्यावे लागले.

**उद्योगांची तीन दशके**

१९९१च्या आर्थिक उदारीकरणानंतर पुढच्या काही वर्षांत जे उद्योग बदल स्वीकारू शकले नाहीत, ते बंद पडले

तर सेवाक्षेत्राचा विकास झाला.

उदारीकरणानंतर, भारतीय खाजगी क्षेत्राला जे बहुतांश जुन्या कौटुंबिक कंपन्यांद्वारे चालवले जात होते आणि त्यांना समृद्ध होण्यासाठी राजकीय संबंधांची आवश्यकता होती, त्यांना स्वस्त चिनी आयातीच्या धोक्यासह परदेशी स्पर्धेला सामोरे जावे लागले. त्यानंतर खर्च कमी करत, व्यवस्थापनात सुधारणा करत, नवीन उत्पादने डिझाइन करण्यावर लक्ष केंद्रित करून आणि कमी श्रम, खर्च आणि तंत्रज्ञानावर अवलंबून राहून हा बदल उद्योगधंद्यांनी समर्थपणे हाताळला.

महत्त्वाचे स्थित्यंतर म्हणजे १९९४ पासून मोबाइल सेवा भारतात प्रमुख शहरात सुरू झाली. १९९५ पासून सॉफ्टवेअर क्षेत्राची जोरदार प्रगती होऊ लागली. जगभर एक भीती होती की वर्ष २००० उजाडले की सर्व संगणक प्रणाली बंद पडतील कारण आतापर्यंत तारखेमधील वर्षामध्ये तीन शून्ये कधीच आली नव्हती. विमानसेवा ३१ डिसेंबर १९९९ रोजी संध्याकाळपासून बंद ठेवण्याचे ठरले. Y2Kच्या जबरदस्त भीतीमध्ये भारतीय सॉफ्टवेअर कंपन्यांनी खूप धंदा केला. स्वतःबद्दल विश्वासार्हता निर्माण केली. पुढची काही वर्षे डॉट कॉम वर्षे होती. त्या कंपन्यांच्या समभागांचे बाजारभाव अवास्तव वाढले, पण शेवटी फुगा फुटला.

२०००च्या दशकात त्या आर्थिक सुधारणांचे नूतनीकरण झाल्यानंतर भारताने मुक्तबाजार अर्थव्यवस्थेच्या दिशेने खूप प्रगती केली आहे. उदार परदेशी गुंतवणूक धोरण आणि शिथिल नियमांमुळे भारतीय अर्थव्यवस्था चांगली कामगिरी करत आहे.

एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून सकल देशांतर्गत उत्पादन (GDP) ५.५ टक्के ते ७ टक्के (सरासरी ६.१५ टक्के) दराने वाढते आहे. आपली अर्थव्यवस्था १९९१ सालच्या २६,६०० कोटी डॉलरपासून जून २०२३च्या ३,७५,००० कोटी डॉलरपर्यंत वाढली आहे आणि सध्या जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. भारत नाममात्र GDP द्वारे ही जगातील पाचवी सर्वात मोठी आणि क्रयशक्ती समता (Purchasing Power Parity - PPP) द्वारे तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. मात्र आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) नुसार, दरडोई उत्पन्नाच्या आधारावर, भारत GDP नुसार (नाममात्र) १३९ व्या आणि GDP (PPP) नुसार १२७ व्या क्रमांकावर आहे.

२०१४ पासून मोदी सरकारने Make




In India योजनेद्वारे आणि नंतर कोविड काळात जाहीर केलेल्या आत्मनिर्भर भारत योजनेद्वारे स्वदेशी चळवळीचे पुनरुज्जीवन केले.

निवडक तेरा क्षेत्रांसाठी जाहीर केलेल्या उत्पादनाशी संबंधित प्रोत्साहन (पीएलआय) योजनेद्वारे मूळ उत्पादनापेक्षा जास्त केलेल्या उत्पादनावर चार ते सहा टक्के प्रोत्साहन सरकारतर्फे दिले जाते. अनेक वस्तू ज्या पूर्वी आयात केल्या जायच्या त्या भारत आता पीएलआयमुळे निर्यात करतो. भारत मोबाइल हँडसेट उत्पादनात चीन खालोखाल दुसऱ्या क्रमांकाचा देश बनला आहे. २०२३-२४ मध्ये ही निर्यात १,२०,००० कोटी रुपये असेल. आयफोनचा वाटा अर्ध्यापेक्षा जास्त असेल.

स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देण्यासाठी वीस लाख कोटींपेक्षा अधिक कर्जे युवकांना त्यांचा उद्योग-व्यवसाय सुरू करण्यासाठी देण्यात आली आहेत. आतापर्यंत ८ कोटी लोकांनी आपले उद्योग सुरू करत, स्वतःबरोबर इतर एकदोघांना त्यात रोजगारही दिला आहे.

कोविड-१९ महामारीच्या काळात लघू आणि मध्यम (एमएसएई) उद्योगांना सरकारने वाऱ्यावर सोडले नाही. त्यांना



३.५ लाख कोटी रुपयांची मदत करण्यात आली.

येत्या पाच वर्षांत भारत जगातील तिसऱ्या अर्थव्यवस्थेचे शिखर नक्कीच गाठेल असा विश्वास पंतप्रधानांनी ७७ व्या स्वातंत्र्यदिनी देशाला संबोधन करताना व्यक्त केला. जेव्हा गरिबांची क्रयशक्ती वाढते, तेव्हा गावे आणि शहरांची अर्थव्यवस्था अधिक वेगाने धावू लागते. या अर्थचक्राला गती देऊन हे शक्य होईल.

**भारताचे जागतिक उद्योग जगतातील स्थान**

१९९१ मध्ये फक्त एक अब्ज डॉलर परकीय चलन गंगाजळी आज ६०० अब्ज डॉलरपेक्षा जास्त आहे आणि जगात भारताचा चौथा क्रमांक आहे.

फॅक्टरी आउटपुटमध्ये भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे आणि जागतिक उत्पादन गंतव्य (Destination) म्हणून आपण अमेरिकेला मागे टाकले आहे. चीनने पहिले स्थान कायम ठेवले आहे.

केवळ चीन, अमेरिका आणि जपाननंतर भारत चौथ्या क्रमांकाचा वाहन उत्पादक देश बनला आहे. २०२२ मध्ये भारतात सुमारे ५४ लाख कारचे तर १ कोटी ५४ लाख दुचाकी वाहनांचे उत्पादन झाले. कारविक्रीच्या बाबतीत भारत तिसऱ्या क्रमांकाची बाजारपेठ आहे.

२०२३ च्या ग्लोबल इनोव्हेशन इंडेक्समध्ये भारत ४०व्या क्रमांकावर होता तर स्वित्झर्लंड प्रथम क्रमांकावर होता.

सेवाउत्पादनात भारत जगात आठव्या क्रमांकावर आहे. सेवाक्षेत्राचा जीडीपीमध्ये ५४ टक्के, औद्योगिक क्षेत्र २६ टक्के तर शेती आणि तत्सम व्यवसाय २० टक्के असा हिस्सा आहे. आयटी उद्योग आपल्या देयक संतुलनात (Balance of payment) महत्त्वपूर्ण योगदान देत आहे. एकूण जीडीपीच्या ७.५ टक्के किंवा एकूण सेवांच्या २० टक्के हिस्सा आहे.

आयटीईएस-बीपीओ क्षेत्र तरुण पदवीधरांमध्ये एक मोठा रोजगार निर्माण करणारे बनले आहे. मार्च २०२३ मध्ये या क्षेत्रात ५.४ दशलक्ष रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत.

डिजिटल इंडिया योजनेंतर्गत तीन लाख व्यक्तींना या क्षेत्रात उच्चप्रशिक्षण देणे आणि पाच लाख व्यक्तींना मूलभूत प्रशिक्षण देणे याचा समावेश आहे. विश्वकर्मा योजनेअंतर्गत तीन ते चार लाख सुतार, लोहार इत्यादी अनेक प्रकारच्या कारागिरांना दोन लाख रुपयांपर्यंत विना तारण कर्ज देण्यात येणार आहे.

फोर्ब्स ग्लोबल २००० यादीच्या २०२३च्या यादीमध्ये




५५ भारतीय कंपन्या आहेत.यापैकी पाच मोठ्या कंपन्यांमध्ये रिलायन्स ४५ व्या स्थानावर, एचडीएफसी बँक १२८ व्या, आयसीआयसीआय बँक १६३ व्या, सरकारी मालकीची ऑइल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन (ONGC) २२६ व्या आणि एचडीएफसी २३२ व्या स्थानावर समाविष्ट आहे.

भारत हा जगातील सर्वात मोठा दूध, कडधान्ये आणि ताग उत्पादक देश आहे. तांदूळ, गहू, ऊस, भुईमूग, भाजीपाला, फळे आणि कापूस यांमध्ये दुसरा क्रमांक लागतो सध्या बासमती शिवाय इतर तांदळाच्या निर्यातीवर भारताने घातलेल्या बंदीमुळे जगात ग्राहक दुकानांसमोर रांगा लावत आहेत.

**व्यवसाय सुलभता**

लालफीत, नोकरशाही, भ्रष्टाचार या व्यापक समस्यांवर मात करण्यासाठी जुने कायदे आणि नियम रद्द करणे, माहितीचा अधिकार कायदा अंमलबजावणी, करनिर्धारण प्रत्यक्ष भेटीशिवाय करणे, सेवांचे संगणकीकरण असे उपाय केले जात आहेत. ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनलने नोंदवलेल्या २०२२च्या करप्शन परसेप्शन इंडेक्सनुसार भारत १८० देशांपैकी ८५ वा सर्वात कमी भ्रष्ट देश आहे. चीन ६५ वा, इंग्लंड १८ वा, अमेरिका २४ वा तर डेन्मार्क पहिला आहे.

व्यवसाय सुलभतेच्या बाबतीत भारत अजूनही विकसनशील देशांच्या तळाशी आहे आणि चीनच्या तुलनेत, स्टार्टअपसाठी मंजुरी मिळविण्यासाठी किंवा दिवाळखोरी लागू करण्यासाठी लागणारा सरासरी वेळ खूप जास्त आहे

२०२०मध्ये व्यवसाय सुलभता निर्देशांकात भारत ६३व्या स्थानावर आहे.

**रोजगार**

जुलै २०२३मधील अधिकृत बेरोजगारी ७.९५ टक्के आहे. २००८-०९ चे जागतिक आर्थिक संकट, २०१६ मध्ये पाचशे आणि एक हजार या नोटा रद्द करणे (नोटाबंदी), जीएसटी प्रणालीची सुरुवात, कोविड महामारी आणि इतर अडथळ्यांमुळे औपचारिक व्यवसाय आणि नोकऱ्यांची निर्मिती कमी झाली. जवळजवळ ३० टक्के कामगार हे

नैमित्तिक कामगार आहेत जे जेव्हा त्यांना नोकरी मिळू शकेल तेव्हाच काम करतात आणि उर्वरित काळ विनावेतन राहतात. केवळ १० टक्के कर्मचारी नियमित रोजगारात आहेत. भारताचे कामगार नियम विकसनशील देशांच्या मानकांनुसारही जाचक आहेत.

**पर्यावरण**

भारतातील कोट्यवधी लोकांना स्वच्छ, सुरक्षित पाण्याची कमतरता आहे कारण बहुतेक घरगुती आणि औद्योगिक सांडपाणी आणि कचरा प्रक्रिया न करता थेट नद्या आणि तलावांमध्ये टाकला जातो. यामुळे जलजन्य आजारांमध्ये झपाट्याने वाढ होते. लोक उघड्यावर लाकूड आणि कोळशाने स्वयंपाक करतात, सुमारे ३५ लाख लोक सतत धुराच्या संपर्कात असतात. सरकारने उज्ज्वला योजनेद्वारे ४८ लाख स्त्रियांना मोफत गॅस जोडण्या देऊन ही समस्या कमी केली आहे.

**आजच्या उद्योगांचे वेगळेपण**

आपल्या लक्षात आले असेल, की अलीकडच्या काळात उद्योगांचा चेहरामोहरा बदलत चालला आहे. येत्या काही वर्षांत केवळ इलेक्ट्रिक कार रस्त्यावर दिसतील, त्यामुळे पेट्रोल-डिझेलची बचत होईल आणि प्रदूषण कमी होईल. पारंपरिक आणि अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रात अनेक प्रयोग केले जात आहेत. तेलावरील अवलंबित्व कमी झाल्यास अर्थकारण आणि जागतिक राजकारणही बदलू शकते. वंदे भारतसारख्या जलद रेल्वे गाड्या देशात बनविल्या जात आहेत.

पुरवठा प्रणालीतील लवचिकता (Resilience in supply chain management) महत्त्वाची आहे. चीन आणि युरोपवर विसंबून न राहता, केवळ वेळेवर (Just in time) ऐवजी केवळ प्रसंगी (आवश्यक) या तत्त्वावर (Just in case) पुरवठ्याचा नवा स्रोत विकसित करणे हे मोठे आव्हान आहे.

व्यवस्थापनातील व मालकीतील क्लिष्टता दूर करणे (Simplify), पूरक व्यवसाय एकत्र आणणे किंवा सहकार्याने काम करणे (Synergise) आणि धंद्याचा जरुरीप्रमाणे विस्तार (Scale) व त्यासाठी लागणारे कौशल्य व आधारभूत सोयी विकसित करणे ही त्रिसूत्री सध्या महत्त्वाची आहे व त्यामुळे अनेक कंपन्यांची आर्थिक परिस्थिती सुधारत आहे. कार्बन फूटप्रिंट कमी करण्यात यश येत आहे. या कंपन्या सजग व सामर्थ्यवान होत आहेत. होणाऱ्या बदलांना समर्थपणे तोंड देत आहेत. अनेक कंपन्यांनी या धोरणाबरोबर मोठ्या प्रमाणात सर्व प्रक्रियांचे Digitisation केले व त्या आता नवीन तंत्रज्ञानाचा अंगीकार करीत आहेत.'

नवनवीन विषाणू येत राहतील, पण भीतीवर मात करत काम करण्यास शिकणे हे उद्योगधंदे आणि समाज यासाठी मोठे आव्हान आहे. त्यासाठी कर्मचाऱ्यांचे आरोग्य महत्त्वाचे आहे. देशातील आरोग्य यंत्रणा मजबूत करावी लागेल आणि तिचा विस्तार करावा लागेल. त्यासाठी उद्योगांना वाटा उचलावा लागेल.

नोव्हेंबर २०२१ मध्ये सुरू केलेल्या पीएम गतिशक्तीमुळे - मल्टी-मोडल कनेक्टिव्हिटीसाठी राष्ट्रीय मास्टर प्लॅन, पायाभूत सुविधा कनेक्टिव्हिटी प्रकल्पांचे एकात्मिक नियोजन आणि समन्वयित अंमलबजावणीसाठी रेल्वे आणि रोडवेजसह १६ मंत्रालयांना एकत्र आणण्यासाठी एक डिजिटल प्लॅटफॉर्म उपलब्ध झाला आहे.

ऑक्टोबर २०२२ पासून सुरू करण्यात आलेल्या 5G फोन प्रणालीमुळे दुर्गम भागातील व्यवसाय, शिक्षण, ई कॉमर्स, वैद्यकीय सेवेचा चेहरामोहरा आमूलाग्र बदलण्याची अपेक्षा आहे. यात परदेशी तंत्रज्ञान आणि यंत्रसामग्री याबरोबर भारतीय तंत्रज्ञानही आहे. सी-डॉटद्वारे (दूरसंचार विभागाचे संशोधन आणि विकास केंद्र) डिझाइन केलेले आणि विकसित केलेले 5G नॉन-स्टँडअलोन (एनएसए) कोर लॉन्च केले आहे. 6G फोन प्रणालीवरही संशोधन सुरू आहे. डिजिटल इंडिया योजनेअंतर्गत सर्व ग्रामपंचायतींमध्ये इंटरनेट उपलब्ध होणार आहे. सॅटेलाईट इंटरनेट लायसन्सही लवकरच देण्यात येणार आहेत.

आणखी एक आव्हानात्मक क्षेत्र म्हणजे इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन. सध्या जगात सेमीकंडक्टर किंवा चिप्सचा प्रचंड तुटवडा आहे. परदेशी चिप उत्पादकांना आकर्षित करण्याचा भारत सरकारचा प्रयत्न आहे.

दहा हजार कोटी रुपयांची उलाढाल असलेल्या ऑनलाइन हेल्थ किंवा हेल्थकेअर व्यवसायात उतरण्यासाठी अनेक कंपन्या स्पर्धा करत आहेत.

संरक्षण उपकरणांच्या निर्मितीचे क्षेत्र झपाट्याने वाढत आहे. टाटा, भारत फोर्ज, महिंद्रा अशा अनेक कंपन्या या क्षेत्रात आहेत. आयातीऐवजी घरगुती संरक्षण साधने वापरण्याचे धोरण असेल. आपण गेल्या नऊ वर्षांत दहा युद्धनौका बांधल्या आहेत. सध्या जवळपास ७० टक्के संरक्षण खरेदी भारतीय कंपन्यांकडून होते. त्यात आणखी वाढ होईल. अनेक देशांना उपकरणे आणि ब्राह्मोस क्षेपणास्त्रांची निर्यात सुरू झाली आहे. रशियाच्या सहकार्याने DRDO ने बनवलेली ब्राह्मोस रशियालासुद्धा पाहिजेत. टाटा आणि एअरबस



**चांद्रयान**

गुजरातमध्ये C 295 विमानाचे उत्पादन करणार आहेत.

सीओपी २६/२७ करारातील उद्दिष्टांमुळे पर्यावरण संरक्षक उपकरणांचीही मोठी मागणी असणार आहे.

मंगळयान आणि चांद्रयान-३ मोहिमा यशस्वी करणाऱ्या इस्रोने भारताला या क्षेत्रात जगातील चौथा देश बनवले आहे. युक्रेनमधील युद्धामुळे अनेक देश रशियन प्रक्षेपण सेवेपासून दूर जात आहेत. इस्रोने ऑक्टोबर २०२२ मध्ये वन वेब लिमिटेड या लंडनस्थित कंपनीसाठी (भारती एंटरप्रायझेस एक प्रमुख गुंतवणूकदार आहे) ३६ संप्रेषण उपग्रह प्रक्षेपित केले.

कृत्रिम बुद्धिमत्तेबद्दल (AI) मोठ्या अपेक्षा आणि तितकीच भीती आहे. सध्याच्या नोकऱ्यांतील जवळपास एकचतुर्थांश नोकऱ्या यामुळे नाहीशा होतील ही खूप मोठी भीती आहे.

मनोरंजनाची साधने आमूलाग्र बदलत आहेत. सिनेमास्क्रीन किंवा केबल टीव्ही हे मुख्यतः गरीब आणि मध्यमवर्गीयांचे मनोरंजन साधन झाले आहे. इतर प्रेक्षक ओटीटी प्लॅटफॉर्मवर आणि इंटरनेट टीव्हीच्या माध्यमातून हवे तेव्हा हवे ते कार्यक्रम पाहत आहेत.

जाहिरातदार प्रिंट मीडियापेक्षा डिजिटल माध्यमांना अधिक महत्त्व देत आहेत. ही वृत्तपत्रे बंद होण्याची नांदी आहे.

रिलायन्स, आणि टाटा समूह रिटेल, बँकिंग, फायनान्स क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहेत.

वाढत्या विकासाच्या गरजा भागवण्यासाठी पोलाद, सिमेंट यांसारख्या मूलभूत उत्पादनांना नेहमीप्रमाणे वाढती मागणी आहे.

शेतीमध्ये नगदी पिकांवर भर वाढत आहे! बेभरवशी हवामानामुळे शेतकरी हवालदिल आहेत. साठवणूक आणि वाहतुकीच्या सोयी वाढल्या की अन्नाचा अपव्यय कमी होईल. खेड्यापाड्यातही अन्नप्रक्रिया उद्योग उभारले जात आहेत. रस्त्यांचे जाळे विकसित झाल्याने शेतमाल अधिक वेगाने बाजारपेठेत पोहोचेल.

सरकार आरोग्यावर अधिक खर्च करत असल्याने फार्मास्युटिकल क्षेत्र आपले आरोग्य टिकवून ठेवेल किंवा वेगाने वाढू शकेल.

मूडीच्या ऑगस्ट २०२३ मधील अंदाजाप्रमाणे येती दोन वर्ष भारत हा G20 मधील एकमेव देश असेल जो चांगला विकासदर नोंदवेल. घेतलेली प्रचंड कर्जे आणि मागणीचा अभाव आणि अमेरिकेचे निर्बंध यांमुळे चीन सध्या महामंदीच्या वाटेवर आहे.

कंपन्यांनी केवळ आर्थिक उद्दिष्टांचा पाठपुरावा करून थांबू नये, तर समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न करावेत. त्यांनी तंत्रज्ञान, शाश्वतता (continuity) आणि कौशल्य विकासात नवीन मानके (standards) निश्चित केली पाहिजेत. टाटा उद्योगसमूहाच्या दातृत्वाचे आणि सामाजिक बांधिलकीचे अनुकरण होणे आवश्यक आहे.

माझ्या स्वप्नातील भारत-आत्मनिर्भर, डिजिटल महासत्ता, पर्यावरणरक्षणाच्या क्षेत्रात अग्रणी, निरोगी आणि मजबूत असेल आणि वसुधैव कुटुंबकम करण्यासाठी प्रयत्नशील असेल.

**– माधव ज. जोशी**

joshimj2002@gmail.com



# कथास्तु!

## सुरेखा सबनीस

इसवी सन १९२३, १५ जून – कथाकार शांताराम यांचा जन्म.
इसवी सन १९२३, १० जुलै – कथाकार जी.ए. कुलकर्णी यांचा जन्म.
इसवी सन १९२३, २५ ऑगस्ट – कथाकार गंगाधर गाडगीळ यांचा जन्म.

आज मराठी कथेचा वाचक या तीन नामवंत कथाकारांच्या जन्मशताब्दीवर्षांच्या महत्त्वाच्या टप्प्यावर उभा आहे. मागे वळून पाहता हरिभाऊंच्या कथेपासून उमटलेल्या पाऊलखुणा दिसतात. शतकोत्तर वाटचालीचा दमदार ठसा उमटलेल्या या पाऊलखुणा. ना.ह. आपटे, वि.सी. गुर्जर, कॅप्टन गो.गं. लिमये, गिरिजाबाई केळकर, आनंदीबाई शिर्के, क्षमाबाई राव, श्री.म. माटे, य.गो. जोशी, ना.सी. फडके, वि.स. खांडेकर, चिं.वि. जोशी, दिवाकर कृष्ण, वामन चोरघडे... किती नावे आठवावीत. मराठी कथेची भरभराट काळाच्या प्रत्येक टप्प्यावर वाचकाला समाधान देऊन गेली. कथेची बदलती रूपे लक्ष वेधून घेत गेली. नवे काही हवेसे वाटत गेले. जुनेही आठवत राहिले. आजघडीला मराठी कथेने खूप टप्पे पार केले आहेत. वळसे आणि वळणे घेत ही कथा तिचा आजचा बहर टिकवून आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर मागे वळून पाहताना अनेक सिद्धहस्त कथाकार पुन्हा भेटतात. काळाच्या ओघात आणि नव्या–जुन्याच्या पसाऱ्यात हरवून न जाता भेटतात. आपापल्या कथेचे मोल आणि चिरकालित्व राखून भेटतात. वाचकांना ते आठवतात. प्रसंगपरत्वे आठवतात. निमित्ताने आठवतात. आणि त्याहूनही आठवतात ते त्यांच्या अनेक कथा कायमस्वरूपी मनात रुतून बसलेल्या असतात म्हणून. आज आठवायचे ते शांताराम, जी.ए. आणि गाडगीळ हे तीन मातब्बर कथाकार. हे त्यांचे–त्या तिघांचेही जन्मशताब्दीवर्ष आहे म्हणून प्रसंगपरत्वे. कृतज्ञबुद्धीने स्मरण करावे हे निमित्त साधून. त्यापेक्षा त्यांच्या दाणेदार कथा आज इतक्या वर्षांनंतरही मनात रुतून बसल्या आहेत म्हणून. शांतारामांच्या 'खार', 'वाघ', 'परागंदा', 'राधाबाई', 'मैत्र'... जी.एं.च्या 'गुंतवळ', 'चंद्रावळ', 'तुती', 'कैरी', 'काकणे'..., गाडगीळांच्या 'तलावातले चांदणे', 'कडू आणि गोड', 'भागलेला चांदोबा', 'किडलेली माणसे', 'कबुतरे ... किती नावे घ्यावीत, या उत्तमोत्तम कथांची?

शांताराम – (के.ज. पुरोहित), जी.ए. कुलकर्णी आणि गंगाधर गाडगीळ हे समवयस्क. अर्थात लेखक म्हणून समकालीन.

गाडगीळांची पहिली कथा 'प्रिया आणि मांजर' जुलै १९४० मध्ये प्रसिद्ध झाली. त्याच वर्षी जी.एं.ची पहिली कथा 'बळी' ही 'अमाशी' या नावाने प्रसिद्ध झाली. 'भेदरेखा' ही शांतारामांची पहिली कथा सप्टेंबर १९४१ मध्ये प्रसिद्ध झाली. 'संत्र्याचा बाग' हा शांताराम यांचा पहिला कथासंग्रह १९४२ मध्ये प्रकाशित झाला तर गाडगीळांचा 'मानसचित्रे' हा पहिला कथासंग्रह १९४६ मध्ये आला. 'निळासावळा' हा जी.एं.चा पहिला कथासंग्रह यायला मात्र १९५६ हे वर्ष उजाडावे लागले. दरम्यानच्या काळात हे तीनही कथाकार आपापल्या लयीत कथालेखन करत होते. वाचकांच्या मनात त्यांचे स्थान निर्माण झाले होते. टीकाकारांचे लक्ष त्यांनी वेधून घेतले होते. मात्र समकालीन असूनही हे तिघेही कथाकार परस्परांहून पार वेगळे होते. आपापले स्वतंत्र अस्तित्व राखून कथालेखन करत होते.

या कथाकारांचा लेखनारंभ एकोणीसशे चाळीसच्या दशकातला. हा महायुद्धोत्तर काळ. एकूणच सर्व क्षेत्रांत मूलभूत स्वरूपाचे बदल झाले होते. मराठी साहित्यातही









हे घडले. मर्ढेकरांसारख्या समर्थ कवीने 'नवसाहित्या'चे दालन उघडले. 'नव' हे कालवाचक नव्हे तर मूल्यवाचक विशेषण घेऊन अवतरलेल्या मर्ढेकरांच्या 'नवकविते'पाठोपाठ 'नवकथे'चा उदय झाला. महायुद्धोत्तर परिस्थितीचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम, औद्योगिकीकरण, वाढती महानगरे, ढासळू लागलेली पारंपरिक कुटुंबव्यवस्था अशी सामाजिक-सांस्कृतिक उलथापालथ होण्याचा हा काळ. यामुळे माणसाला वेढून टाकणारे एकाकीपण, वैफल्यग्रस्ततेतून येणारी परात्मतेची जाणीव आणि त्यातूनच निर्माण होणारा जीवनाकडे पाहण्याचा उपरोधिक दृष्टिकोन घेऊन नवकथेची जडणघडण होत गेली. गंगाधर गाडगीळ हे या नवकथेचे शिलेदार ठरले. पुढे अरविंद गोखले, पु.भा. भावे आणि व्यंकटेश माडगूळकर यांच्यासारखे समर्थ कथाकार गाडगीळांच्या बरोबरीने नवकथेचे मानकरी ठरले. मात्र मर्ढेकरांनंतर खऱ्या अर्थाने नवसाहित्याची चळवळ उभी राखली ती गाडगीळांनीच. या नवसाहित्याने प्रस्थापित अभिरुचीला न मानवणारी भूमिका घेतली होती. पारंपरिक कलादृष्टी आणि नवकथा यांच्यात अंतर पडले होते. रुळलेल्या साहित्यिक मूल्यव्यवस्थेलाच आव्हान दिले गेल्याने प्रतिक्रियाही तीव्र उमटल्या. मर्ढेकरांच्या कवितेवर ज्याप्रमाणे दुर्बोधता, अश्लिलता, वैफल्यग्रस्तता या संदर्भात आक्षेप घेण्यात आले तेच गाडगीळांच्या कथेबाबत घडले. मात्र यामुळे किंचितही न डगमगता गाडगीळांनी कथेची नवी मूल्ये आणि नवे संकेतव्यूह यांची नेमकी मांडणी केली. मराठी साहित्यात 'नवकथा' खंबीरपणे पाय रोवून उभी राहू शकली ती गाडगीळांमुळेच. रूढ झालेले आणि लोकप्रिय ठरणारे कथाआशय त्यांनी दूर सारले. अनुभवविश्वाचा ठरावीक परीघ मोडून ते लिहिते झाले. निवेदनपद्धतीच्या रुळलेल्या वाटा त्यांनी सोडून दिल्या. मात्र केवळ प्रयोगासाठी प्रयोग अशी कारागिरीही त्यांनी केली नाही, म्हणूनच कथालेखनातली कलात्मकता ते अबाधित राखू शकले. हे त्यांचे फार मोठे यश मानले जाते. त्यातूनच मराठी नवकथेला नेमके स्वरूप आले १९४५ ते १९६० या कालखंडावर 'नवकथेचा' मोठा प्रभाव दिसून आला.

बा.सी. मर्ढेकर आणि माधव आचवल यांच्यासारख्या जाणकारांनी गाडगीळांच्या कथालेखनाचे सांगोपांग विश्लेषण करताना महत्त्व दिले ते त्यांच्या कथेतील 'सच्ची काव्यात्मता' आणि 'मानवी मनोव्यापाराची प्रगल्भ जाण' यांना 'आजकालचे कथालेखक' या लेखमालेत लिहिताना, गाडगीळ 'फार मोठे, प्रतिभावंत' असल्याचा विश्वास मर्ढेकरांनी व्यक्त केला होताच. मानवी आयुष्याविषयीचे प्रश्न लेखकाला आव्हान देत असतात. या प्रश्नांची मांडणी लेखक कशी करतो यावर त्याच्या लेखनाचा कलात्मक दर्जा ठरत असतो. गाडगीळांमधील कथाकार असा दर्जेदार होता हे मराठी कथेसाठी फार मोलाचे ठरले.

वाचकांचे स्वप्नरंजन करण्याची किमयाही कथाकार गाडगीळांना साधलेली होती. याची साक्ष त्यांच्या आरंभीच्या 'एखाद्याचे नशिब', 'पुरुषस्य भाग्यम' 'अशा मोजक्या कथा देत होत्या. मात्र अशा कथा अपवादभूत ठरल्या हे महत्त्वाचे. गाडगीळ त्यात गुंतून राहिले नाहीत. त्यांची कथा रमली ती जीवनाच्या अस्सल अनुभूतीचा मागोवा घेण्यात, मानवी मनाची गुंतागुंत, जीवनसंघर्ष यांचे दर्शन घडवण्यात. त्यांच्या कथेत प्राधान्याने दिसून आली ती नागर संवेदनशीलता, त्यातही मुंबई या विशिष्ट महानगरातले जीवन ही त्यांच्या कथेची पृष्ठभूमी ठरली. 'बकुळा', 'ते डोळे', 'लांडगे' असा अगदी मोजका अपवाद सोडता शहरी पांढरपेशा मध्यमवर्ग त्यांच्या कथेच्या केंद्रस्थानी राहिला.








नोकरीपेशातील संकुचित जीवन, जगण्याच्या धडपडीत दिसून येणारे हताश केविलवाणेपण, स्पर्धेच्या जगाने लादलेले एकाकीपण त्यातून निर्माण होणारी क्षुद्र ईर्ष्या, वैफल्यग्रस्ततेतून येणारी विकृती यांचा उपहास गाडगीळांच्या कथेने केला. 'किडलेली माणसे', 'क्षुल्लक गोष्ट', 'लक्तरे' आणि अशा कितीतरी कथा याची उदाहरणे म्हणून समोर येतात. नेणिवेत दडलेल्या कामभावना, त्यातून निर्माण होणारी गुंतागुंत आणि तिची भावनिक रूप 'उंट आणि लंबक', 'चोरटी पावले' आदी कथा बेधडक आणि चोख दाखवून गेल्या. त्याउलट 'तलावातले चांदणे'तील हळुवारता, 'कडू आणि गोड'मधील सुखदुःखांचे ओझरते स्पर्श आणि 'रोज मथायचे शिक्षण'मधील रोज मथायला अंतर्बाह्य बदलवून टाकणारा, प्रेमाचा स्पर्श या गाडगीळांच्या कथेची तरल अभिव्यक्तीची चोख उदाहरणे म्हणून समोर आल्या.

मुंबई ही गाडगीळांच्या कथेची केवळ पृष्ठभूमी ठरली नाही तर त्यांच्या आस्थेचा विषय म्हणून त्यांच्या अनेक कथांतून सामोरी आली. 'निर्वासितांची नगरी' या कथेने मुंबईच्या सामाजिक जीवनाचे अंतःकरणाच्या गाभ्याला हात घालणारे चित्रण केले. 'स्वप्नभूमी', 'वेगळे जग', 'भिरभिरे' आदी अनेक कथांमधून मुंबईच्या रस्त्यांपासून समुद्रापर्यंत, रेल्वे प्रवासापासून कार्यालयांपर्यंत, मोहल्ल्यांपासून उच्चवर्गापर्यंत, चाळीपासून फ्लॅट संस्कृतीपर्यंत मुंबई चहूबाजूंनी भिडत गेली. एक वेगळा-स्वतंत्र सामाजिक-सांस्कृतिक अवकाश उभा करण्यात गाडगीळ पुरेपूर कसोटीला उतरले. कथेच्या माध्यमातून माणूस आणि त्याचे जगणे याविषयी खूप काही गंभीरपणे सुचवून गेले.

गंभीरपणे आयुष्याकडे पाहणाऱ्या-पाहायला शिकवणाऱ्या गाडगीळांनी विनोदी कथाही लिहिल्या. 'बंडू आणि स्नेहलता'च्या या कथा लिहिताना त्यांनी एक कथामालाच साकार केली. दैनंदिन जगण्याच्या धडपडीतून होणारी गंमत हेरणारी, आयुष्याकडे असेही पाहता येते हे सहज शिकवून जाणारी. हा त्यांचा एक वेगळा दृष्टिकोन. असाच वेगळा दृष्टिकोन त्यांनी बालमानसकथा लिहून दर्शवला. 'राशीचे दुःख', 'कबुतरे' ही काही ठळक उदाहरणे. बालमानसशास्त्राच्या आधारे लहान मुलांच्या मनोव्यापाराचे अनेक पदर त्यांनी उलगडून समोर ठेवले. त्यासाठी काही वेळा फँटसीचाही आधार घेतला. नियतीच्या निष्ठूर खेळाच्या चित्रणापासून विनोद आणि फँटसीपर्यंत कथाकार गाडगीळांची प्रतिभा सारख्याच ताकदीने व्यक्त होत गेली. गाडगीळ सर्वार्थाने नवकथेचे मानकरी ठरले.

या नवकथेच्या रुजायच्या आणि भरभराटीच्या काळातलेच शांताराम. गाडगीळांचे समकालीन. नवसाहित्याचे तत्त्व जाणून घेऊन, मराठी नवकथेकडे चिकित्सक बुद्धीने पाहून, 'गाडगीळच खऱ्या अर्थाने मराठीतील एकमेव नवकथाकार' हे मत स्पष्ट मांडणारे के.ज. पुरोहित म्हणजेच शांताराम. १९४१ ते २०११ ही दीर्घायुषी ठरलेल्या शांतारामांच्या कथालेखनाची दीर्घ वाटचाल. शांताराम संथ लयीत गुणवत्तापूर्ण कथालेखन करून गेले. नवकथेच्या काळातही, आणि पुढे मराठी लघुकथेने वेगळी वळणे घेतली तेव्हाही. काही अभ्यासकांचा अपवाद वगळता शांतारामांना नवकथाकार म्हटले गेले नाही. खुद्द शांतारामांनाच स्वतःला नवकथाकार म्हणवून घेणे मान्य नव्हते. नवकथेत येणारा आधुनिकतेतला इहवाद, व्यक्तिवाद, त्यांना पूर्णपणे मान्य होता, मात्र माणूस सर्वस्वी एकटा आहे, तो एखाद्या बेटासारखा सर्वांपासून तुटलेला आहे, अलिप्त आहे या विचाराशी ते सहमत नव्हते. समाज







आणि कुटुंबव्यवस्था यांच्या अनुषंगानेच माणसाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी त्यांच्या कथेतून दिसून आली. माणसांचे विविध पातळ्यांवरचे आणि नाना प्रकारचे परस्पर नातेसंबंध. माणूस आणि त्याचा परिसर याचे भावबंध, त्यांच्या कथेतून प्रत्ययकारक रेखाटले गेले. विदर्भातील वैनगंगेच्या तीरापासून मुंबईच्या सागरी किनाऱ्यापर्यंतचा परिसर शांतारामांच्या कथेने आपला म्हटला. त्यांच्या कथेत शहरे आली. गावखेडी आली, 'रेलाँ रेलाँ'सारख्या कथेतून आदिवासी पाडे आले; इतकेच नव्हे तर 'परागंदा'सारख्या कथेमधून निर्वासितांच्या छावण्याही आल्या. परिसरानुरूप आणि काळानुरूप तेथल्या माणसांसमोरचे प्रश्न बदलत गेले. आणि त्या त्या मूलभूत प्रश्नांची तर्कशुद्ध मांडणी करत शांताराम ांची कथा आकाराला येत गेली. आपला परीघ विस्तारत गेली.

माणूस जाणून घेण्याच्या ओढीने शांतारामांची कथा लिहिली गेली. वेगवेगळ्या सामाजिक स्तरांवरील माणसे, विविध पेशांतील माणसे, नानाविध जातीजमातींची माणसे त्यांच्या कथेतून सामोरी आली. आपापले स्वभावधर्म जपणारी ही माणसे प्रश्न उपस्थित करत गेली. जगण्यातील विसंगतींकडे बोट दाखवून गेली. आध्यात्मिक पुनर्जन्म झालेला 'शंकरगुरु', परंपरेच्या कचाट्यातून सुटू पाहणारा 'पोतराज', सोन्याविषयी आसक्ती असलेला आदिवासी कनसुमाड्या, महानगरी मुंबईत जगण्यासाठी धडपडताना कोंडमारा झालेले 'निर्णय' कथेमधील फ्रान्सिस आणि फिलोमिना, 'विभावरी'तील उच्चपदस्थ सैन्याधिकारी. ज्यांच्या पायाशी सन्मान उभा राहतो असे 'परीक्षा' कथेतील प्रभुणे घराणे, 'इफ्तार'मधला लाचार चाचा, 'धूळ'मधील गावगन्ना फिरणारी ढेला... नाना परीने जगणारी अनेक माणसे. शांतारामांची कथा ही खऱ्या अर्थाने जमिनीवरच्या माणसांची कथा ठरली.

शांतारामांच्या कथेची सर्वात मोठी ताकद त्यांच्या कथेतील स्त्रीने दाखवून दिली. स्त्रीविषयक प्रश्नांची मूलभूत समज त्यांच्या कथेने ठाशीवपणे व्यक्त केली. स्त्रीपुरुष समानता, स्त्रीचे आर्थिक स्वातंत्र्य, निर्णयस्वातंत्र्य, इतकेच नव्हे तर स्त्रीचा माणूस म्हणून कामभावनेबाबतचा अधिकार यांची स्पष्ट मांडणी त्यांच्या कथेने केली. शांताराम चाळीसच्या दशकापासून लिहीत होते. या कालखंडाचा विचार करता त्यांची स्त्रीविषयक कथा निखालस धीटपणे उभी राहिली हेच खरे. या कथेने स्त्री-पुरुषसंबंधांचे वास्तव, निखळ शारीर पातळीवरचे म्हणून मांडले. मात्र ते कधीच वर्णनपर स्वरूपाचे नव्हते तर माणसाने माणसाकडे साधन म्हणून पाहण्याच्या वृत्तीवर रोखलेले बोट होते ते. 'रती', 'गोपिका', 'सत्यभामा', 'गंधा', 'नागीण', 'उद्रेक', 'जाळे', 'चेटूक'... अशा कितीतरी कथा शांतारामांच्या लेखणीची ताकद दाखवून गेल्या. त्यांची 'राधाबाई' ही तर मराठीतीलच नव्हे तर भारतीय कथासाहित्यातील, स्त्रीच्या आत्मसन्मानाची लखलखीत बाजू दाखवून देणाऱ्या कथांपैकी एक महत्त्वाची ठरावी अशी कथा.

माणसाच्या मूलभूत प्रेरणांची दखल शांतारामांच्या कथेने नेमकी घेतली. त्यांच्या प्रतीककथांमधून अशा प्रेरणांचे स्पष्ट दर्शन घडले. 'वाघ', 'खार', 'चंद्र माझा सखा' अशा काही ठळक प्रतीककथा. तरल अनुभव व्यक्त करण्याचे सामर्थ्य नेमके हेरून शांतारामांनी अचूक प्रतीके योजली. मात्र प्रतीके योजण्याचा सोस त्यांच्या लेखणीने कधी दाखवला नाही. त्यांच्यातील कथाकाराने आपली संथ आणि जीवनविषयक मूलभूत जाण या बळावर आपल्या कथेला कोणत्याही प्रकारच्या स्पर्धेपासून, अनुकरणापासून दूर ठेवले. म्हणूनच नवनवे दर्जेदार कथाकार आले, नवनवे कथाप्रवाह आले तरी

सात दशके अव्याहत कथालेखन करणारे शांताराम कथाकार म्हणून आपले स्थान कायम राखू शकले.

असेच आपले वेगळे स्थान निर्माण करून लिहीत राहिले ते जी.ए. कुलकर्णी. त्यांच्या लेखनावर आरंभीसुद्धा कुणाही कथाकाराचा प्रभाव दिसून आला नाही किंवा त्यांच्याप्रमाणे लेखन करण्याचा सफल प्रयत्न पुढे कुणाहीकडून झाल्याचे दिसले नाही. जी.एं.चा कथालेखनाचा प्रवास नवकथेला समांतर राहिला. भारतीय आणि पाश्चात्त्य पुराणकथा, लोककथा यांपासूनची जीवनदृष्टी घेऊन त्यांची कथा आकाराला आली. रूपककथा, दृष्टांतकथा अन्ये रूपेही त्यांच्या कथालेखनात आली. प्रतिमा आणि प्रतीकांनी समृद्ध अशा त्यांच्या भाषाशैलीतून त्यांची कथा मानवी दुःखाचा शोध घेऊ लागली. मानवी क्रौर्याची हादरवून टाकणारी चित्रणे करत गेली. 'बळी' ही त्यांची प्रारंभीची कथा याचे सूतोवाच करणारीच ठरली. सामाजिक मूल्ये आणि त्यातून घडणारे व्यवहार यांतली भयप्रदता त्यांच्या कथेने अधोरेखित केली. जी.एं.च्या कथालेखनावरील एक ठळक आक्षेप म्हणजे त्यांच्या कथेत सामाजिक आशय असत नाही किंवा तो अल्पच असतो. हा आक्षेप वरवर पाहता मान्य होत असला तरी पूर्णतयः मान्य होण्याजोगा नाही. कारण ज्या माणसांच्या दुःखाचे, यातनांचे भयावह जिण्याचे दर्शन जी.एं.ची कथा घडवत गेली ती माणसे समाजाचाच एक भाग होती. सामाजिक चौकटीतच किंवा अशा चौकटींमुळेच दुर्दैवाचे दशावतार नाशिबी आलेली हतबल माणसे होती. 'रात्र झाली गोकुळी', 'राधी', 'वस्त्र' या आणि अशा कथांतून ही विदारक चित्रे उभी राहिली. मात्र असे करताना जी.एं.नी माणूस विरुद्ध नियती हे बंध उभे केले म्हणूनच सामाजिक परिप्रेक्ष्यात उद्ध्वस्त झालेला माणूस नियतीची शिकार ठरला आहे हेच अधिक तीव्रतेने भासत राहिले.

माणसाचे अस्तित्व आणि माणसामाणसांमधले परस्परसंबंध यांची केवळ परस्परविरोधीच नव्हेत तर जीवघेणी विसंवादी दर्शने जी.एं.च्या कथेने घडवली. अनेक प्रकारच्या अतृप्तीचे दर्शन टोकदारपणे घडवले. 'चंद्रावळ'मधील सण्ण्या, 'वस्त्र'मधील मिस डिसूझा, 'अखेरचा दिवस'मधील नाना, सारेच वेगळे परंतु प्रत्येकाच्या अतृप्तीच्या परी वेगळ्या आणि अंतिमतः दुःखानुभवाचा विदीर्ण करणारा अनुभव देणाऱ्या. जी.एं.नी रंग, रूप, गंध, नाद यांचा जिवंत अनुभव प्रतिमा निर्माण करून दिला. दुःखातिशयाच्या विद्रूपालाही भरजरी भाषेत व्यक्त केले. औदासिन्यापासून विनाशापर्यंतची वर्णने करताना त्यांच्या शब्दकळेची झळाळी लोपली नाही. हे जीएंचे सामर्थ होते का? की यामुळेच त्यांच्या कथेवर आक्षेपही नोंदवले गेले! गाडगीळांनी 'आजकालचे साहित्यिक'मध्ये जी.एं.चे मोजमाप 'भोवऱ्यात अडकलेला प्रतिभावंत' असे केले ते यामुळेच. जी.ए. उपमा-उत्प्रेक्षांच्या प्रतिमा-प्रतीकांच्या भोवऱ्यात अडकले होते हे खरे; पण ते अंतिमतः प्रतिभावंत होते हे कुणालाही मान्य होणारेच. त्यांच्या भाषिक वैभवाच्या पसाऱ्यात फार न रमता, त्यांच्या कथेच्या आशयाचा विचार करता, हा लेखक मानवी जीवनाचा वेध घेण्यात यशस्वी ठरला आहे हेच दिसून आले. हे मानवी जीवन नियतीच्या हाती सोपवले गेले आणि विश्वाच्या पटावर मांडले गेलेले. 'गुंतवळ' कथेतल्या माळरानावर विखरून एकत्र आलेली विशाल अज्ञात आकृतीतील 'रांगोळीचे ठिपके' ठरणारी माणसे किंवा 'माकडाचे काय, माणसाचे काय?'मधील 'कोट्यवधी सूर्य पोटात घेऊन बसलेल्या देवयानी तारामंडळा'च्या प्रकाशकिरणांचा प्रवासाचा हिशेब जाणून घेताना गणिताचे सेवानिवृत्त प्राध्यापक सुब्राव, वानगीदाखल ही दोनच उदाहरणे पाहिली तर माणसाला-त्याच्या विकलतेला अंतर्बाह्य जाणून घेताना जी.एं.नी त्यामागचा विशालपटही पाहिला, आपल्या कथेत तोलला हेच खरे. जी.ए. कोणत्याही साहित्यिक पंथात सामील होणारे नव्हतेच आणि कुणी त्यांचे अनुकरण करू म्हणेल तर तेही शक्य नव्हते. म्हणूनच मराठी कथाविश्वात जी.ए. सर्वार्थाने वेगळे ठरले.

जन्मशताब्दीवर्षाच्या निमित्ताने शांताराम, गंगाधर गाडगीळ आणि जी.ए. कुलकर्णी या तीन साहित्यिकांचे हे स्मरण कथाकार म्हणून. या कथाकार असण्यापलीकडेही या तिघांच्या ठायी इतर अनेक मोलाच्या गोष्टी जमा आहेत. कथेतर अन्य लेखन, भाषांतरे, समीक्षा यातील कामगिरी आहेच. गाडगीळ, पुरोहित या बहिर्मुख व्यक्तींचा सामाजिक क्षेत्रांतला सहभाग आणि योग्य दबदबाही लक्षात घेण्याजोगाच. मराठी कथेच्या क्षेत्रात आपले आपले स्वतंत्र स्थान भक्कमपणे निर्माण करून गेलेले हे तिघेही प्राध्यापक होते. गाडगीळ अर्थशास्त्राचे तर पुरोहित - शांताराम - आणि जी.ए. हे इंग्लीश वाङ्मयाचे. हे एक साम्य आणि त्यांचे इसवी सन १९२३ हे जन्मवर्ष सोडले तर त्या तिघांत आणखी एकच ठळक साम्य दिसून येईल ते म्हणजे हे तिघेही मराठीतले मातब्बर कथाकार होते. संस्कृत धातुकोशाप्रमाणे 'स्तु'चा अर्थ 'स्तुती करणे', 'गौरव करणे' असा आहे. हे तिघे कथाकार मराठी कथेला गौरव बहाल करून गेले.

**- डॉ. सुरेखा सबनीस**
surekhass53@gmail.com



चांगदेव काळे

# वहिवाटेच्या काठावरून

रस्त्याच्या कडेला असलेले रद्दीचे दुकान समोर दिसताच गोविंदराव अचानक थांबले. हातातली पिशवी खाली ठेवून दुकानातली जुनी पुस्तके चाळावीत असा त्यांचा मानस होता. त्याचवेळी त्यांना पाठून धक्का बसला.

''काय डिसिप्लिन वगैरे ठाऊक आहे की नाही, नॉनसेन्स!'' धक्का देणाऱ्या गृहस्थाने आणखी एक शाब्दिक धक्का दिला. आपले चुकले की त्याचे याची शहानिशा न करताच गोविंदरावांच्या तोंडून दिलगिरी व्यक्त झाली, 'सॉरी!'

घक्का देणाऱ्याने पुढे कुठलीच प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. तितका वेळही त्याच्या शिस्तीपलीकडे नसावा. तो त्याच्या वेगाने पुढे निघून गेला. गोविंदरावांना दिसत राहिली ती त्याची निळ्या रंगाची गडद जिन्स. समोर अनेक जुनी पुस्तके दिसत होती. तो मळकट रंग त्यांना अधिक प्रिय होता. हाताला लागले ते 'रसीदी टिकट' हे पुस्तक. त्यांनी हातानेच त्यावरील धूळ झटकली. पानांचा पिसारा एका क्षणात नोटांच्या मशीनसारखा तपासून पाहिला.

''सौ रुपया, आपके लिए अस्सी! हमेशा के हो इसलिए।'' रद्दी पेपरच्या विस्कटलेल्या घड्या चोख घालताना रद्दीवाल्याच्या चेहऱ्यावरचा खरखरीत निर्विकारपणा त्याच्या आवाजातही उतरला होता. गोविंदरावानी रद्दीवाल्याच्या शब्दांची किंमत मोजली. लेकराला छातीशी कवटाळावे तशा खुशीत त्यांनी एका हाताने पुस्तकाला आपल्या मायेच्या छायेत घेतले. दुसऱ्या हाताने जड पिशवीला उचलून घेतले. मान खाली घालून 'फुटपाथ तुडवीत' ते घराकडे निघाले.

''अरे, गोविंदाऽऽ!'' रस्त्याच्या वळणावर अनोळखी आवाजाने गोविंदरावांच्या पाठीवर थाप मारली. ''ओळखलंस? आयेम रमाकांत! एबीला होतो आपण!'' रमाकांतचा उत्साह आणि त्याची देहयष्टी गोविंदरावांना आपल्या भरलेल्या पिशवीसारखी वाटली. शाळेचे संपूर्ण फ्रेम केलेले चित्र उभे केले केले, रद्दी उपसावी तसे स्वतःचे ते दिवस उस्कटून पाहिले, त्यात हा चेहरा ठळकपणे कुठेच सापडला नाही.

''आता कुठं असता आपण?'' गोविंदरावांनी स्वतःच्या विस्मरणावर मात केली. आवाजात अपराधीपण डोकावत होतेच.

''काही नाही रे. असतो कधी इथं, कधी तिकडं यूएसएला... तसा बराच वेळा तिकडंच असतो अरे मुलाकडं. नाहीतरी इथं इंडियात काय उरलं आहे सांग? यू नो, साधी डिसिप्लिन नाही रे... नाहीतर तिकडं बघ...'' रमाकांतच्या बोलण्यावरून लक्षच उडाले. म्हणजे डिसिप्लिन सांगणारा हा तोच आहे तर! नजर त्याच्या निळ्या पँटवर खिळली. रमाकांत तिकडच्या विमानातल्या गोष्टी हातवारे करून उभ्याउभ्याने सांगत राहिला. अचानक त्याने प्रश्न केला, ''तू पाहिलीस की नाही अमेरिका? अरे, पाहा एकदा. इंडियात येणार नाहीस परत!''

गोविंदरावांना वाटले सांगावे, माझीही मुलगी असते तिथे. ती अनेकदा आग्रह करून थकली, आईबाबा या तिकडं... पण ते मोठेपण त्यांनी टाळले. आपले चमकदार व्हिजिटिंग कार्ड देत रमाकांत निरोपाच्या टप्प्यावर आला, ''फोन कर. अजून आहे एक महिना इथं... भेटूया आपण.''

गोविंदरावांनी पुस्तकासह हात पुढे केला, कार्ड घेण्यासाठी. त्या पुस्तकावर कार्ड ठेवताना रमाकांत हसला. ''अरे व्वा! अजून वाचतोस तू?''

गोविंदराव नुसतेच हसले अपराधी असल्यासारखे. रमाकांत काळ्यापिवळ्या रंगाच्या रिक्षात बसून निघून गेला

ऐटीत. गोविंदरावांनी त्याला बाय केले पाठून. त्या पाठमोऱ्या रिक्षाकडे पाहताना त्याची निळी जिन्स डोळ्यांसमोर दिसत होती. हातातल्या कार्डावरून नजर फिरवली. रमाकांत... यूएसए! मनाने उसळी घेतली एका अनामिक उत्साहाने. रस्त्याकडे पाहिले तर रिक्षा आता नजरेआड झाली असे चित्र रस्त्याने दाखवले. निराशेने पुस्तकासह हात कपाळावर मारला. अरे! विचारायला हवे होते, 'मुलगा काय करतो? लग्न वगैरे झाले का त्याचे? शर्वरी नजरेसमोर उभी राहिली. स्वतःशीच निषेधाची मान हलवत ते घराकडे निघाले, संधी घालवली या निराशेत.

''ऐकलंत! आपलं लाडकं लेकरू येणार आहे, शर्वरी!'' गोविंदरावांनी उंबरठ्यातून आत पाऊल टाकताच गीताने आपल्या आनंदी भोवऱ्याची दोरी वेगाने ओढली. भोवरा आपल्या मस्तकावर नाचतो आहे, त्याची आरी मेंदूत खोलखोल दडलेली खदखद विस्कटू पाहात आहे, असा त्यांना भास झाला. जड झालेली पिशवी कोपऱ्यात भिंतीला टेकवून ठेवली. पुस्तक तिच्यावर ठेवून गोविंदरावांनी हात मोकळे केले. हाताकडे पाहिले तर बोटांना पीळ पडलेला दिसला, पिशवीच्या जड ओझ्याने. दुसऱ्या हाताने वाकलेली, लाल घट्टा पडलेली बोटे सरळ करत ते समोरच्या खुर्चीवर टेकले. लेकरू येणार... त्यांनी खिडकीतून बाहेर नजर टाकली. ऊन नजरेत सुईसारखे आरपार गेले. शर्वरी... नाही म्हटले तरी सहा उन्हाळे सरलेत शर्वरीला जाऊन. किती मोठा काळ गेला हा उन्हाळ्याने रापलेला. आता कशी दिसत असेल, उन्हाला लाजवणारी गोरी मड्डम की आपली तीच सावलीला उभी राहिलेली कृष्णा! भाजीपाला आणि इतर सामानाने भरलेली पिशवी त्यांच्याकडेच पाहात होती कृतज्ञतेने. तिच्या दिवसभरलेल्या नजरेशी नजर भिडताच मात्र ते चपापले. पिशवीवरचे पुस्तक तसे तिऱ्हाईतासारखे भासले. हे आपले प्रतीक की शर्वरीचे?

''आताच फोन आला होता तिचा. म्हणत होती...'' पाण्याने भरलेला ग्लास पुढे करत गीता मनात साचलेले आणखी काही सांगू पाहत होती. गोविंदरावांना ग्लास हातात घेताना जाणवले, बाईसाहेबांचा आनंद ग्लासासारखा काठोकाठ भरलेला आहे. ''तिला काय आवडतं ते आणलंत ना सगळं? इतक्या वर्षांनी येतेय माझी लाडकी लेक! आता असं करा ...थांबा. मला पाहू द्या, काय काय आणलंत ते...''

गीताने पिशवीवरचे पुस्तक बोटांच्या चिमटीत धरून खाली फेकले, मेलेल्या झुरळासारखे. भरलेली पिशवी खाली पाडून जागेवरच मोकळी केली. सांडलेल्या भाज्या व वस्तूंवरून निष्णात सुईणीची नजर फिरवत तिने जाहीर केले, ''यात एकही वस्तू तिच्या आवडीची नाही. ना भाजी, ना फळं. हे पाहा...'' तिने तळहाताची लांबसडक बोटे दुसऱ्या हाताच्या बोटांनी धरून गणती करायला सुरुवात केली, ''एक, ओला नारळ. दोन, लाल टोमॅटो, ...'' दोन्ही हातांची बोटे अपुरी पडली तरी हिशोब लागेना. ''लक्ष आहे ना माझ्या बोलण्याकडं? बोलत नाही काही ते?''

गोविंदरावांना खरे तर आता काहीच बोलायचे नव्हते आणि बोटांवर टिपलेल्या वस्तूंना नखाइतकी किंमत द्यावीशी वाटत नव्हती. ते गप्प होते, वाद नकोत म्हणून. शेवटी नाईलाज झालाच, ''ती येणार म्हणजे फक्त खाण्याइतकीच सवड आहे तिला. लगेच ती उडून जाणार दाणे टिपून झालेल्या चिमणीसारखी, असं काही आहे का?''

गोविंदराव खुर्चीतून उठले. खाली जमिनीवर पडलेले पुस्तक त्यांनी दोन्ही हातांनी काळजीपूर्वक उचलून घेतले. त्याला कुठे इजा झाली नाहीना याची खात्री केली उलटसुलट करत. मग प्राण फुंकावेत तशी पुस्तकावर हाताने हळू थाप मारत खुर्चीत बसले. त्याच कळवळलेल्या आवाजात त्यांनी बायकोची समजूत घातली, ''नाही आणलं आज, उद्या आणता येईल. ती येणार हे तुला केव्हा कळलं?''

''तसं नाही हो! इतक्या दिवसांनी येतंय लेकरू म्हटल्यावर...'' गीताच्या काळजातला ओलाव्याचा पाझर कंठाच्या काठाशी येऊन थांबला आहे याचा गोविंदरावांना अंदाज आला.

''शर्वरी आली की आणू हवं ते सारं.'' गोविंदरावांनी बायकोची समजूत घालण्यापेक्षा स्वतःची सुटका करून घेण्यासाठी मधला पर्याय स्पष्टपणे समोर ठेवला. वास्तविक त्यांना म्हणायचे होते 'हे बघ, ती काही कुक्कलं बाळ राहिलेली नाही, तुझ्या शहाळ्यातल्या पाण्यासारखी. आता तिच्या आवडी बदललेल्या असतील वयानुसार.' पण त्यांनी मौन पाळण्यात धन्यता पाहिली.

''तुम्ही जाणार आहात का तिला घ्यायला? सायंकाळी पोचेल म्हणाली.'' गीतासाठी आणखी एक सोपस्कार शिल्लक होता. खरे तर मनातून स्वतःही विमानतळावर जायची इच्छा होती सोबत म्हणून. परंतु गोविंदरावांनी तिचा पाय मोडून टाकला,

''काळजी करू नकोस. येईल ती व्यवस्थित. तेवढी हुशार नक्कीच..., नाही तू समजतेस त्यापेक्षा अधिक हुशार आहे तुझं लेकरू.'' गोविंदरावांच्या लक्षात आले, आपल्या बोलण्यात दुःस्वास डोकावतो आहे. आवाजात तिरसटपणा. पुस्तकाच्या दुमडलेल्या पानांचे कोपरे सरळ

करत त्यांनी स्वतःला सावरले, ''रद्दीवाल्याकडं सापडलं. किती दिवसांपासून शोधत होतो. होतं आपल्या संग्रहात, पण सापडेचना...''


''शर्वरी आहेच हो हुशार. परदेशात एकटी राहते ती का उगाच! पण आता इतक्या वर्षांनी...'' गोविंदरावांनी लेकीऐवजी पुस्तकाला मांडीवर घ्यावे, हे काही गीताला रुचले नव्हते. खरे तर गोविंदरावांनी आताच विमानतळावर हजर व्हायला हवे, असे तिला मनापासून वाटत होते. अर्थात ती हेसुद्धा विसरली नव्हती, ते यापूर्वी कधीच विमानतळावर गेलेले नाहीत. अगदी शर्वरीने निरोप घेतला तेव्हासुद्धा.

''इथून पुढं कुणालाही पुस्तकांना हात लावू द्यायचा नाही. लोकांना त्यांची किंमत नसते. हवं तर एक बोर्डच लावून टाकतो, पुस्तकांना मागणी घालू नये.''

'लेकीच्या मागणीकडं लक्ष द्या.' गीताच्या ओठांवर आले होते, पण तिने तसे ऐकवले नाही. प्रत्येक पदार्थाला गरम करण्याची वेळ असते तशी बोलण्याचीही असते, हे तिला कळत होते. तरीही तिने आत वळण्यापूर्वी आपली इच्छा पुन्हा गरम करण्यासाठी तवा गरम आहे असे समजून त्यावर टाकली, ''नाही म्हणू नका, जायचं विमानतळावर तिला आणायला.''

गोविंदरावांनी भिंतीच्या खांद्यावर डोके टाकून ते थंड राहील याची काळजी घेतली. पाय लांब सैल सोडले. शर्वरी येणार... घरभर चिवचिवाट करणारी चिमणी येणार... निर्वात वाटणारे घर आता किलबिलाटाने चारीकोपरे काठोकाठ भरून जाणार... घरसमुद्रातले जहाज होणार. सगळ्या आठवणींचा खजिना सावरत वारा, लाटा, भरतीओहोटीच्या तालानुरूप प्रवासाला निघणार... गीता तिचा भोवरा होणार... लाडक्या लेकराला डोक्यावर घेऊन नाचत राहणार... आणि आपण? काय करणार आपण? एक... दोन... तीन... दहा... कुठलीच भूमिका गवसेना. शर्वरी येण्याचा आनंद आपल्याला झाला की नाही? तिच्या ओढीने आपला जीव कासावीस होतो, ती एकटी परदेशात कशी राहात असेल ही काळजी आपल्याला सतत पोखरत राहते, हे मनाचे खेळ की ओल्या आतड्यांना पडलेला पीळ? आजही आपण अस्वस्थ आहोत तिच्यासाठी, हे कशाचे लक्षण म्हणता येईल? शर्वरी आपली लाडाची लेक आजही लाडाची आहेच पण ...

''मी काय म्हणते, हळदच संपली पाहा... माझ्या मेलीच्या लक्षातच नाही आलं तुम्हाला सांगायचं.'' गीताने समोर येत तिची अडचण सांगून गोविदरावांना अडचणीत टाकले. त्यांनी रंग उडालेल्या नजरेने गीताकडे पाहिले, तर तिच्या चेहऱ्यावर ओशाळलेली हळद सांडलेली दिसली. 'हळद खाल्ली इतके दिवस, तिचा फायदा झाला तो फक्त तुलाच. त्यामुळे नाही खाल्ली एक दिवस म्हणून काही काळी पडणार नाहीस.' असं ठणकावून सांगावेसे वाटले तरीही



गोविंदराव उठून उभे राहिले आज्ञाधारकपणे. हातातले पुस्तक गीताच्या हाती देत, कपाटात ठेव अशी हाताच्या खुणेने सूचना केली. हातातले पुस्तक ठेवण्यासाठी ती पुस्तकांच्या कपाटाजवळ आली. कपाटात तशी आता जागाच उरली नव्हती पुस्तक ठेवायला. काठोकाठ भरलेली अशी तीन कपाटे तिच्यासमोर उभी होती. पुस्तके वाचून झाल्यानंतर ती कपाटात सांभाळायची कशासाठी, हा नेहमी पडणारा प्रश्न तिला आताही पडला. तिने हातातले पुस्तक समोरच एका कपाटात उभे केले.

''मला वाटतं, हे पुस्तक शर्वरीच्या हातात पाहिलं होतं.'' गीताने स्मरणशक्तीला ताण दिला, ''तेच ना, ते तिनं नवरा सोडला. दुसरा मित्र जवळ केला, असंच काहीतरी होतं ना त्यात... तुम्ही भरभरून बोलत होता ते आठवलं... बहुतेक तिनं ते सोबत नेलं असावं, तुमची आवड म्हणून.''

गीता बोलत होती तरी तिची नजर पुस्तकावरच होती. गोविंदरावांनी एका शब्दाने तिला उत्तर दिले नाही. ते तडक बाहेर पडले, डोक्यात हळद, ओला नारळ घेऊन.

''साहेब, तुम्ही!'' अचानक कानांवर शब्द आदळले, आश्चर्याचे आणि कौतुकाचेही. आपल्याच तंद्रीत असलेल्या गोविंदरावांसाठी हा स्पीडब्रेकर होता. त्यांनी वळून समोर पाहिले तर एक लाल रंगाची मोटारसायकल ब्रेक मारून त्यांच्यासमोरच उभी राहिलेली दिसली. हेल्मेटने डोके आवळलेले असल्याने उन्हातच त्यांच्यावर डोके खाजवण्याची वेळ आली. कुणीतरी खूप दिवसांनी भेटतो आहे, आणि आपल्या बऱ्यापैकी जवळचा आप्तांच्या यादीतला असावा. रमाकांत असाच भेटला होता अचानक. मुद्दाम पँटकडे पाहिले, ती गडद निळ्या रंगाची दिसली नाही. बाईकस्वाराने मस्तकावरील कवच अतिशय काळजीपूर्वक बाजूला करत आपला ग्रहण लागलेला चेहरा दर्शनासाठी बाहेर काढला. हास्याचा मुखवटा न उतरवता त्याने खात्रीच्या स्वरात विचारले, ''ओखळलंत साहेब!''

''अरे, जावईबापू तुम्ही!'' ओळख पटण्यासाठी कडक उन्हाच्या मदतीची आकश्यक नव्हती. ती पटली तेव्हा मात्र उन्हाची तीव्रता अधिक प्रकर्षाने जाणवली. ''लाजवता आहात की राग वगैरे डोक्यात? नाही, असं परक्यासारखं विचारलंत ते.''

''परकी आणि रागावलेली माणसं ओळखीपासून दूर राहतात. ते स्वतःहून ओळख नाही दाखवत.'' हसत हसत त्याने चौकशी केली, ''कसे आहात, तब्येत कशी आहे, मामी काय म्हणताहेत?''

'माणसं खूनशी असतील तर मुद्दाम ओळख दाखवतात, तुम्ही त्यातले नाही असं मी समजतो.' गोविंदरावांच्या माणसे ओळखण्याच्या सूत्रात हे वाक्य चपखल होते, तरीही त्यांनी त्याचा स्थळाकाळानुरूप मोह टाळला. बाकीच्या बोलण्यात नुसतीच औपचारिकतेची टरफले भरलेली होती, उत्तराची अपेक्षा नसलेली. त्याचे दात मात्र चमकत होते, लक्षात यावेत इतके. न चावताही असे दात जखमा करू शकतात, गोविंदरावांना मान्य करावे लागले. मोटारसायकलवर आणखी एक सवारी मागे पाठीशी बांधलेली आहे, ती तिनेच कलेसारखा चेहरा पुढे करून स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून दिली तेव्हा लक्षात आली. ती जावईबापूंची एक सुस्वरूप आणि हक्काची ठेव आहे, हा विश्वासही तिच्या चेहऱ्यावर उजळून आलेला दिसला. गोविंदरावांची अवस्था आता वितळण्याच्या पातळीवर पोहोचली. स्वतःच्या विस्कटू पाहणाऱ्या सभ्यपणाला गोळा करताना त्यांना बराच प्रयास करावा लागला, ''चला, चहापाणी घ्या. जवळच आहे घर.''

''शलाका, माझी बायको.'' जावईबापूने शलाकावर रोखलेल्या गोविंदरावांच्या नजरेला ओळख करून दिली. तसा तिने पटकन कळसूत्रीपणाने हात जोडून सुहास्य प्रतिसाद दिला, नमस्कार! तिचे हसणे गोविंदरावांना डाळींब मधोमध कापल्यासारखे जाणवले. त्यांचेही हात आपोआप जुळले, प्रतिक्षिप्त प्रतिक्रिया म्हणून.''निघतो. घाईत आहोत. मुलगा वाट पाहत असेल घरी.''

''तन्मय, नाव ठेवलं आम्ही त्याचं.'' शलाकाचे ममत्व दाटून आले.

''चहाला कितीसा वेळ लागतो, चला...''

''तुम्ही दिसलात. म्हटलं भेटून घ्यावं.'' त्याने स्वतः उतरवलेले कवच पुन्हा परिधान केले. दाखवलेली तात्पुरती ओळख डाग पाडणाऱ्या खोडरबरने पुसून टाकली. लालघोड्याला टाच मारून ते निघून गेले उधळलेल्या मस्तीत. गोविंदराव त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत उभे राहिले. काही क्षण रोवलेल्या पायांवर ते तसेच निश्चल उभे राहिले, पक्षाघात झाल्यासारखे. आता दूरपर्यंत कुणीच दिसत नाही असा निर्वाळा रस्त्यावरच्या वाहनांनी दिला तेव्हा ते परत फिरले. आपण विकल झालो आहोत, काहीतरी हरवले आहे, उपहासाची सूर्यफुले अंगभर दंश करत आहेत, असे काहीतरी अस्वस्थ भान त्यांच्यावर स्वार झाले होते आणि त्याखाली जीव घुसमटतो आहे असे त्यांना प्रकर्षाने जाणवत होते.

''आणलीत हळद?'' गीताने हात पुढे करत विचारले तेव्हा ते भानावर आले.

''शंतनू भेटला होता.'' गोविंदरावांनी तिच्या हातावर उत्तर ठेवले. खुर्चीचा आधार घेत त्यांनी स्वतःला सैल करण्याचा प्रयत्न केला.

गीताचा चेहरा हळद करपल्यासारखा झाला. खूप सावकाशपणे सैल झालेल्या कूकरच्या शिट्टीतून वाफेने आपल्या अस्वस्थेचे दर्शन घडवावे तशी गीताची प्रतिक्रिया उमटली, ''शर्वरीच्या नावाने रडला असेल गळा काढून!''

''तुझी चौकशी करत होता.'' शंतनूच्या हुशारीचे कौतुक त्यांना टाळता आले नाही. गीताच्या अंदाजाला जिंकण्याची संधी त्याने दिलेली नव्हती.

''भेटलातच कशाला त्याला?'' शंतनूविषयी मनात असलेला कोरडेपणा गीताच्या ओठांवर आला. ''लग्न नको करू म्हणावं आता. बायको सांभाळता येत नाही त्याला काय नवरा म्हणायचा?''

''लग्न झालं त्याचं, शलाका नावाच्या मुलीशी. मुलगाही आहे तन्मय नावाचा.''

''अगं बाई, हो!'' गीताला गोविंदरावांच्या शब्दांवर विश्वास ठेवताना तळहातावर विस्तव घेतल्याचा भास झाला. ती चटका बसलेल्या नजरेने नवऱ्याकडे पाहू लागली.

'खोटं नाणं म्हणून संभावना करणं सोपं असतं. सोपं नसतं ते सिद्ध करणं.' गोविंदराव स्वतःशीच स्वगतागत पुटपुटले. एक दीर्घ निःश्वास सोडून ते कोपऱ्यात विस्कटून पडलेल्या पिशवीकडे पाहत राहिले. तिच्यातले सामान तिच्याशेजारी तसेच अस्ताव्यस्त अवस्थेत विखरून पडलेले होते. गुटगुटीत मूल जन्माला येईल या अपेक्षेत असताना काहीतरी वेगळेच जन्माला आलेले पाहण्याची वेळ यावी, असेही त्या पिशवीकडे पाहताना भासत होते.

''तिला दोष देऊ नका. माझ्या सोन्यासारख्या लेकराच्या आयुष्याची माती केली ती त्यानं.'' गीताचा स्वर आर्द्र झाला तरीही त्यात उपहास होताच, ''म्हणे दुसरं लग्न केलं! आणली नाही ना दुसऱ्यानं सोडून दिलेली गाय वासरासह?''

''या गडबडीत तुझी हळद राहिली आणायची. येतो घेऊन.'' गोविंदराव उठले.

''काही नका जाऊ आता.'' गीताने अडवले. तिने ओळखले ही टाळाटाळ आहे आपल्या प्रश्नाची. गोविंदरावांनी उंबरठा ओलांडला नाही. तिथली पिशवी भरण्यासाठी ते खाली बसले. गीताच्या लक्षात आले, आपल्या अंदाजात जराही खोट नाही. अनुमान शर्वरीशी येऊन थांबलेले आहे आणि ते सिद्ध झाले आहे. नाही म्हटले तरी त्याक्षणी तिला गोविंदरावांचा राग आलाच. आपल्या माणसाची बाजू घ्यायची सोडून दुसऱ्याला चांगले म्हणायची यांची सवय जाणार तरी कधी? शर्वरी इतके शिकली, त्या जोरावर परदेशात गेली. ती चूक कशी असू शकते? नवरा म्हणून शंतनू तिच्यासाठी योग्य नव्हता, हेच खरं. नाहीतर त्याच्यापासून वेगळं व्हायला तिला काय वेड लागलं होतं का? वाद नको म्हणून हळद न घालताच फोडणी देण्यासाठी ती आत वळली. तरी एक पाऊल थबकून तिने निरीक्षण नोंदवलेच, ''शर्वरी येत असल्याचा आनंद झालेला नाही की शंतनूनं तो हिरावून घेतला? चेहरा पाहा कसा पातेल्याच्या बुडासारखा दिसतो आहे.''

गोविंदरावांनी कानांच्या गुहा मोठ्या शिळांनी बंद आहेत असे भासवत प्रतिक्रियेच्या कुठल्याही लाटेला स्वतःवर आक्रमण करू दिले नाही. शंतनू आपल्याला, सगळ्यांनाच आवडला होता. गुणाने, कर्तृत्वाने, माणुसकीने उणा ठरावा असे काहीच नव्हते त्याच्यात. शर्वरीशी लग्नबंधनाच्या संस्काराने बांधला गेला तो तिला अनुरूप असल्यामुळेच. आपण निवड केली होती सगळ्यांच्या साक्षीने. आणि संसारसुखाच्या प्रवासाला निघालेले हे जहाज अवघ्या वर्षभरात नकाराच्या खडकाशी नांगर टाकून उभे राहिले, 'माझ्या सातासमुद्रापारच्या प्रवासात एक जड साहित्य आहे, मला जखडून टाकणारं. त्याला उतरवून घ्या.'

आपल्याला कुठलेच कारण कळले नाही या विभक्त होण्यामागचे. 'मला तो नकोय, मला त्याच्या जोखडात राहायचं नाही. मला मुक्त करा,' बस एवढेच? आपण सहमती दिली, पण मनापासून नाही. वाटले अशाने आयुष्य उद्ध्वस्त होईल. तिच्या इच्छेप्रमाणे दुसरे स्थळ पाहू, असेही मनाशी ठरवले. पण पाहणार कसे, ती गेली परदेशात. आता परत येते आहे, तेही अशी अचानक. निघण्यापूर्वी कळवावे असेही तिला का वाटले नाही? आपल्यावर विश्वास नाही म्हणून? एकेक सामान उचलून पिशवीत भरताना गोविंदराव जड जड होत गेले. आणि अचानक समोर पडलेले रमाकांतचे कार्ड दिसले. आशा पल्लवित झाल्या. अधाश्यासारखा ते त्यावरील फोन क्रमांक पाहत राहिले. जणू गटांगळ्या खाणाऱ्याला ओंडक्याचा आधार सापडला.

''शर्वरी येत आहे, हे चांगलंच झालं म्हणायचं.'' जेवताना गोविंदरावांनी विषय काढला, ''लेखकाला नेहमी वाटतं, पुस्तक प्रकाशित व्हावं. ते एकदा झालं की आपली जबाबदारी संपली. मग ते पुस्तक आणि वाचक! सांगायचा मुद्दा शर्वरीशी आहे. तिच्या लग्नाचा. एकदा ते पार पडलं की आपण मोकळे. मागे काय झालं ते गंगेला मिळालं.''

गीताने पटकन उत्तर दिले नाही. या विषयावर अनेकदा

त्यांच्यात स्वंथ झालेले होते. निष्पन्न व्हायला शर्वरीची उपस्थिती आवश्यक होती. प्रत्येक वेळी तिचा मुक्काम हुलकावणी देत राहिला, तसा विषय काळजाभोवती दिवसागणीक काळजीचे वेटोळे वाढवत राहिला.

''रागवणार नसाल तर एक सांगू?'' गीताने अगदी संथपणे वाहणाऱ्या पाण्यात हळूच लहानसा खडा टाकला. त्याचा डुबूक असा झालेला आवाज गोविंदरावांना सुरुंगासारखा भासला. हात जागीच थबकला. पोटातला शंकेचा गोळा अचानक उसळून सुन्न बिंदूभोवती प्रचंड वेगाने घावू लागला. त्याच्या निःशब्द भ्रमणध्वनी परिघातून आकाराला आलेला आवाज होता, '' लग्न हा विषय संपला. मी पुन्हा लग्न करणार नाही... असा तिचा निर्णय... मला म्हणाली, सांग बाबांना...''

''तशीच राहणार आहे आयुष्यभर?'' गोविंदरावांच्या आवाजाला अचानक धार आली.

''मी म्हणते... ''

एकुलती एक लेक. लाडात वाढवलेली. सर्व हौसमौज मनासारखी पुरवली. एक राजकन्याच जणू! तिच्या आयुष्याची इमारत पक्की किल्ल्यासारखी मजबूत, अभेद्य उभारून द्यायची. त्यात तिने सुखाने राज्य करावे एखाद्या राजाच्या राणीसारखे, एवढीच तर माफक अपेक्षा होती आपली. आपले चिमणे पिलू सतत आनंदात राहावे, तिच्या चिवचिवाटाने आपण बहरून यावे. त्यात कुठेही उणेपणा येणार नाही, याची काळजी सतत घेतली. किती साधी आणि निर्मळ अपेक्षा होती आपली, कुठल्याही आईबापाला वाटावी अशी. आणि आज काय पाहतो आहोत? ही तिची आई सहज सांगते आहे, एखाद्या परीची गोष्ट सांगावी तशी, 'तिला लग्नच करायचं नाही!' गोविंदराव कासावीस झाले, सलणाऱ्या असह्य जखमेसारखे. आणखी ऐकण्याची इच्छाच राहिली नाही. अस्वस्थ काळोख भोवती दाट झाल्यासारखे वाटू लागले. असे वाटू लागले, दूर कुठे निघून जावे. तसे उठलेही तिरीमिरीत. पण गीताने अडवले, ''आपण विमानतळावर जायचं. तिला आणायला. लेकरू आपलं आहे. नाही म्हणायचं नाही. माझी शपथ!''

गीता गोविंदरावांची प्रतिक्रिया अजमावू लागली. तिला माहीत होते, आपल्या शब्दांना फोलपटाइतकीही किंमत नसते. कधीही आपण आग्रह धरला तरी त्याची तुलना भाजीच्या निवडून टाकलेल्या देठकाडीशी होते. आपण यांच्या आदर्शाच्या कल्पनेपुढे खिजगणतीतही नसतो. माघार घ्यायची वेळ येते तेव्हा लक्ष आपल्याच पावलांवर असते, खापर फोडून घ्यायची वेळ येते तेव्हा माथा आपलाच असतो. आताही नकारासाठी माथा पुढेच केला होता. लेकीच्या प्रेमासाठी आग्रह धरला. तरीही तिला स्वतःचे आश्चर्य वाटत होते, इतके वज्रधाडस आपल्यात आले कसे?

गोविंदराव एका शब्दाने प्रकटले नाहीत. खूप वेळ त्यांच्या खोलीत कोंडून राहिले. जणू सगळे कप्पे बंद केले. आपलेच चुकले म्हणत गीताने माघार घेतली. थोड्या वेळाने ते तडक घराबाहेर पडले तेही न बोलताच. तेव्हा गीताच्या लक्षात आले, आधीच पोखरलेल्या झाडावर आपण कुऱ्हाडीने घाव घालायला नको होता.

''चला लवकर, आपण विमानतळावर जात आहोत.'' थोड्या वेळाने परत आलेल्या गोविंदरावांनी हुकूम सोडला. निर्विकार चेहऱ्यावर ही शब्दांची प्रसन्न फुले उमलेली पाहून गीताचा स्वतःवर विश्वासच बसेना. हे मुलीवरील प्रेम की आपल्या शब्दाला दिलेली किंमत? तयारी करताना विचार केला तेव्हा लक्षात आले, दोन्हींचा अर्थ एकच!

गोविंदराव टॅक्सी घेऊन आले होते, ती दाराशी उभी होती. टॅक्सीने विमानतळावर जाताना गीताचा आनंद विमानासारखा आकाशात विहार करत होता. लेकीला भेटून कडकडून गळाभेट कधी घेते, या उत्सुकतेने जीव कासावीस झाला होता. गोविंदराव शांत होते, एकटेच प्रवास करत असल्यासारखे. शर्वरीने लग्न मोडले, संसार मोडला तेव्हा आप्तांनीच कान धरले, कुणी नाक, कुणी थेट मान... न्यायनिवाडा हातात घेऊन आपल्याला फाशीच्या दोराशी उभे केले. शंतनूकडची मंडळी यात मागे नव्हती. वेदना त्यावेळी जणू परीक्षा पाहत असावी. हे न विसरण्यासारखे होते. तरीही त्या किल्मिषांना मागे टाकण्याचा निर्णय घेतला होता. तरीही प्रश्न होताच, हा आपल्यातला बदल की तडजोड? गोविंदराव स्वतःच स्वतःला तपासून पाहत होते. आपल्यातल्या बदलाकडे आश्चर्याने पाहत होते. जणू सोबतीला एक वेगळाच अश्व धावत होता.

टॅक्सी विमानतळावर येऊन थांबली. दोघेही बाहेर आले. चकचकीत विमानतळावरचा झगमगाट पाहून त्यांचे डोळे दिपून गेले. विमानांची घरघर, प्रवाशांची लगबग, वाहनांच्या रांगा, त्यांना वेगळेच विश्व दिसत होते. प्रथमच हा देखावा ते पाहत होते. त्याचवेळी निळी पॅंट घातलेला रमाकांत समोर आला. तो त्याची कार घेऊन आला होता. रमाकांतच्या नजरेत आश्चर्य होते. ''अरे तू?''

''मुलगी येते आहे. तिला घ्यायला आलो.'' गोविंदरावांनी खुलासा केला.

''याला म्हणतात छुपा रुस्तम! एका शब्दानं बोलला नाहीस. पुस्तकात वाचून तसा वागतो काय रे तू?''

रमाकांतच्या आर्श्चयाला आता पारावार उरला नव्हता. गोविंदराव नुसतेच हसले. त्यांनी गीता आणि रमाकांतची एकमेकांना ओळख करून दिली. कुतूहलाने चौकशी केली, ''आता अमेरिकेला निघालात की काय?''

रमाकांतने नकारार्थी हसत माहिती दिली, त्याचाही मुलगा याच विमानाने भारतात येत आहे आणि लग्न करून पुन्हा परत जाणार आहे.

''मला वाटलं झालेलं असेल लग्न!'' गोविंदरावानी आपले भोळेपण दाखवले.

''तशी... नाही केलं. वी इंडियन... टूबी इंडियन!'' रमाकांतच्या चेहऱ्यावर अभिमान चमकला विमानतळावरील झगमगाटासारखा. हा एक महिना इथे राहणार म्हणाला होता, बहुतेक त्यासाठीच असावा, गोविंदरावांनी अनुमान काढले. शिवाय मुलगा त्याच्या वळणावर आहे हे ऐकून समाधानही वाटले. तशी मनात पालवीदेखील फुटली, शर्वरीसाठी स्थळ म्हणून विचार करता येईल का? तीही येते आहे. त्यांनी गीताकडे सहेतूक पाहिलेदेखील. परंतु गीताने त्यात सहभाग घेतला नाही. तिचे सगळे लक्ष शर्वरीच्या आगमनाकडे लागले होते.

थोड्याच वेळात अनेक प्रवासी बॅगा सांभाळत बाहेर आले. जो तो आपापल्या नातेवाईक, गाडीकडे धावत होता. त्यांच्यातूनच शर्वरी धावत पुढे आली ते खूप वर्षांचे शिल्लक असलेले हास्य आणि प्रेम घेऊनच. त्याच आवेगाचे अस्तित्व तिने आईवर पांघरले. दोघी आसुसलेल्या मायलेकी एकाच कवेत सामावल्या. गोविंदराव दूर उभे होते अलिप्तपणे. आपली शर्वरी आहे तशीच आहे. तिच्यात कणभरही बदल झालेला नाही. आपण गोरी मड्डम म्हणून अपेक्षा करत होतो तीही नाही. नाही म्हणायला छटा आणि बटा यांच्यात बदल दिसतो आहे. ते तिच्याकडे निरखून पाहत असताना शर्वरी समोर आली. थेट गळ्यात हात टाकून बिलगली वेलीसारखी सगळा भार टाकून. तो भार पेलवताना गोविंदरावाना अवघड झालेच. त्यातच तिने हळूच कानांत विचारले, ''अजून राग गेला नाही माझ्यावरचा?''

गोविंदरावांनी तिच्या पाठीवर मायेने थोपटले. आपले मन मोकळे असल्याची ग्वाही त्या स्पर्शात होती. तिचा हात हातात घेऊन ते टॅक्सीकडे वळले गीताही सोबत आली. शर्वरीचे सामान टॅक्सीत चढवताना एका सहप्रवाशाने मदत केली. त्याला थँक्यू म्हणत गोविंदराव टॅक्सीत पुढे बसले. गीता आणि शर्वरी मागे बसल्या. तसा तो सहप्रवासी मागच्या सीटवर शर्वरीच्या बाजूने आत येऊ लागला. दरवाजा त्याच्याच हातात होता. गोरा, उंच, सुदृढ प्रकृतीचा, हसतमुख. गोविंदराव त्याच्याकडे आश्चर्याने पाहू लागले, हा आत कुठे शिरतो आहे? तशी शर्वरी त्याच्या मदतीला पुढे झाली, ''बाबा, हा फिलीप, माझा पार्टनर. खूप स्मार्ट आहे. आम्ही एकाच कंपनीत आहोत आणि राहतोही एकत्रच, माझ्याच रूमवर! लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये!''

गोविंदरावांचा अगोदर कानांवर विश्वास बसला नाही. विमानाच्या घरघर आवाजात आपण काही वेगळे ऐकले असावे असे त्यांना वाटले. परंतु फिलीपने हात जोडून इंग्रजी वळणाचे नमस्ते म्हटले. त्याच्या लाल पांढऱ्या चेहऱ्यावर विमानाइतका आनंद पसरलेला दिसला. त्याच्याकडे पाहताना आपण बरोबर ऐकले याची खात्री झाली, तसे गोविंदरावांनी गीताकडे सहेतूक वळून पाहिले. विमानाचा धूर डोळ्यांत गेल्यासारखे त्यांच्या डोळ्यांतले भाव बदलेले. आणि दुसऱ्याच क्षणी उसळी घेऊन ते टॅक्सीच्या बाहेर पडले. गीताच्या हाताला धरून तिला बाहेर ओढले. फिलीप आणि शर्वरी यांच्याकडे रागाने पाहत एकदोन क्षण तसेच उभे राहिले. दुसऱ्याच क्षणी एक शब्दही न बोलता दुसऱ्या टॅक्सीकडे वळले. पाठून शर्वरी हाक मारत होती, ''आई! बाबाऽऽ!''

''काय झालं, ती हाक मारतेय?'' गीताने नवऱ्याला थांबवले. तिला त्यांच्या वागण्यातला अर्थ लक्षात आला नव्हता.

''वेड लागलंय मला!'' गोविंदरावांच्या वागण्यातच नाही तर बोलण्यातही संताप ठासून भरलेला आहे, शर्वरीच्या बॅगेसारखा, याचा अंदाज गीताला आला. तिने टॅक्सीकडे वळून पाहिले, शर्वरी आणि तिचा पार्टनर फिलीप अजून टॅक्सीजवळ उभे होते. दोघांच्या नजरा त्यांच्यावरच खिळलेल्या होत्या.

''मला वाटतं आपण असं ... घरी गेल्यावर...''

''आपणच. ती नाही आणि तोही.'' गोविंदराव नुसतेच निकरावर आले नाहीत, त्यांनी दुसऱ्या टॅक्सीला हात दाखवला.

टॅक्सी थांबताच ते आत बसण्याऐवजी त्यांनी गीताला आत ढकलले. मग आत स्वतःला झोकून देत दरवाजा जोरात ओढला. एव्हाना शर्वरी जवळ आली होती.

''बाबा! माझ्यावरचा राग गेला नाही अजून? आलं माझ्या लक्षात. पण...'' शर्वरीने बाबाची नेमकी नस दाबली. तिचा घरी आल्याचा, आईबाबाना भेटल्याचा आनंद क्षणात निराशेच्या ढगांनी काळवंडून टाकला होता. आशा, स्वप्नांच्या उंच भराऱ्या घेत मायदेशी परतलेल्या विमानाचे पंख आता जागीच छाटले गेले आहेत आणि त्यांच्या

कलेवरांवर बाबा पाय रोवून उभे आहेत, असे दिसू लागले.

''आणखी काही बोलायचं राहिलं?'' गोविंदरावांची क्रुद्ध नजर तिच्यावर रोखली.

''बाबा, मनासारखं जगणं, यात काही चूक आहे का?'' शर्वरीचा चेहरा मेघांनी दाटल्यासारखा झाला. आवाजात कमालीची आर्द्रता पाझरत होती.

''चलो.'' गोविंदरावांनी शर्वरीच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले. त्यांनी टॅक्सीवाल्याला हुकूम सोडला. रमाकांत कार घेऊन समोर उभा होता आणि सुरू आलेला संवाद त्याच्या कानांनी टिपला होता. त्याचा मुलगा कारच्या डिकीत सामान ठेवत होता.

''काही प्रॉब्लेम?'' रमाकांत मुद्दाम समोर आला. गोविंदरावांनी उत्तर दिले नाही. सुरू असलेल्या टॅक्सीचे इंजिन त्यांच्या मनात धुमसत होते आणि त्याचा अनुत्तराचा ब्रेक करकचून पायाखाली दाबून धरलेला होता. ''मला वाटतं तू अजून गतशतकात वावरतो आहेस. ही नवी पिढी आहे आणि...''

''तरीसुद्धा तुझा मुलगा अमेरिकेतून भारतात आला, फक्त लग्न करण्यासाठी. का?'' गोविंदरावांनी कडवटपणे रमाकांतचे बोलणे मध्येच तोडले. रमाकांतला राग येईल असे वाटले परंतु तो हसला. गोविंदरावांनी टॅक्सीच्या दरवाजावर ठेवलेल्या हातावर हाताने हलकेच थोपटले. अतिशय सौम्य आवाजात आपले मन मोकळे केले,

''माय फ्रेंड, चॉईस मेक्स डिफरन्स! कुणाला झाडाच्या सावलीत राहायला आवडतं कुणाला झाडावर. तू पुस्तकं वाचणारा माणूस आहेस. तेव्हा...''


गोविंदराव ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते. रमाकांतचे शहाणपण त्यांच्या मेंदूपर्यंत पोहोचलेच नाही. त्यांनी टॅक्सीवाल्याला इशारा केला. गीताला काहीच प्रतिकार करता आला नाही. टॅक्सी घराच्या समोर येऊन उभी राहिली. बाहेर आल्यानंतर गीताला मात्र राहवले नाही.

''आता एक काम करा. लेकीला जसं घरापासून रोखलंत तशी ती घरातली सगळी पुस्तकं घरातून काढा. मला नकोयत ती पुस्तकं घरात. पुस्तकात वाचलेल्या आदर्शांचे कौतुक इतरांसाठी आणि तेच आपल्या घरी घडलं तर त्याचा तिटकारा, हेच शिकवतात का पुस्तकं?''

गोविंदरावांनी फक्त रागाने गीताच्या नजरेत पाहिले.

**– चांगदेव काळे**
changdeokale12@gmail.com

॥ग्रंथाली॥




# जागतिक सत्ताकारण : एक दृष्टिक्षेप

**अमोल केरकर**

जुने म्हटले जाणारे दुसऱ्या महायुद्धानंतरचे जग तसेच शीतयुद्धानंतरचे जगही लयाला गेले. पण नवे जग, नवी जागतिक संरचना निर्माण झालेली नाही. अशा पोकळीत आपण जगाच्या 'नवसत्ताकारणाचा' वेध घेत आहोत. अशा या बदललेल्या जगाचे अर्थ आणि अन्वयार्थ समजून घेणे अगत्याचे आहे. ज्याला आपण राजकारण म्हणतो ते प्रत्यक्षात असते 'सत्ताकारण'. 'सत्ता' हाच राजकारणाचा आत्मा असतो. जगाचे हे 'सत्ताकारण' आणि त्याचे उग्र स्वरूप अमोल केरकर यांनी या पुस्तकात मांडले आहे.

**मूल्य ४०० रु. ❖ सवलतीत २५० रु. ❖ टपालखर्च ३० रु.**



# अंबू उर्फ ललिता पवार

अरुण पुराणिक

नाशिकजवळचे येवले पूर्वीपासूनच रेशीमकाठी पैठणीसाठी प्रसिद्ध आहे. १८ एप्रिल १९१६ रोजी अंबूचा जन्म येवल्याच्या रेशमी आणि सुती वस्त्रांचा सधन व्यापारी लक्ष्मणराव सगुण यांच्या घरी झाला. लहानपणापासूनच धीट झालेली अंबू वयाच्या नवव्या वर्षापासून मूकपटात बालकलाकाराची भूमिका करत असे. आर्यन कंपनीच्या नानासाहेब सरपोतदारांनी तिला सिनेव्यवसायात येण्याची संधी दिली. अंबूचा भाऊसुद्धा मास्टर शांताराम सगुण या नावाने मूकपटात काम करत असे. १९२८ च्या राजा हरिश्चंद्र या मूकपटापासून अंबूला मुख्य नायिकेच्या भूमिका मिळण्यास सुरुवात झाली. 'गनिमी कावा', 'आर्य महिला '(नायक भोपटकर), 'ठकसेन', 'पारिजातक', 'भीमसेन', 'पृथ्वीराज संयोगिता' आदी तिचे मूकपट लोकप्रिय झाले होते. तिच्या 'गॅलण्ट हार्ट डर्फ दिलेर जिगर' या मूकपटाचे पोस्टर पाहायला मिळते. सध्या भारतात उपलब्ध असलेले हे सर्वांत जुने व दुर्मिळ पोस्टर समजले जाते.

त्या काळातील प्रख्यात नटी शरीफाही येवल्याचीच होती. मुंबईत मेट्रो थिएटरसमोर, मरिन स्ट्रीटवर तिची स्वत:ची टोलेजंग बिल्डिंग होती. खाली हारविक रेस्टारँट होते. चित्रपटात भरपूर पैसा व नाव कमावल्यावर, शरीफाने येवल्याच्या मशिदीसाठी मोठी देणगी पाठवली होती. पण शरीफा चित्रपटात काम करते म्हणून तिथल्या मुस्लीम समाजाने ती देणगी साभार परत पाठवली होती.

अंबूने स्टंट किंग गणपत बाक्रे यांच्याबरोबर 'कैलाश' (१९३२) या मूकपटाची व 'दुनिया क्या है' या बोलपटाची निर्मिती केली होती. 'कैलाश'मध्ये अंबूने नायिका, खलनायिका व आई अशी तिहेरी भूमिका केली होती. बाक्रे त्यामध्ये नायक होते. ही त्यावेळची लोकप्रिय जोडी होती.

त्या काळात अनेक चटोर कादंबऱ्यांच्या मुखपृष्ठांवर अंबू व गणपत बाक्रे यांचे फोटो छापून येत. अंबू त्या काळात मुंबईत परळला चमारबाग लेन येथे राहत होती. दिग्दर्शक जी.पी. पवार, संगीतकार हनुमानप्रसाद आदी मंडळीही तिथेच राहत होती. पुढे दिग्दर्शक जी.पी. पवारांबरोबर बंगलोरला जाऊन अंबूने 'साँग ऑफ लाईफ' या मूकपटाची निर्मिती केली. अंबूचा त्या काळात एवढा मान आणि दरारा होता की भल्याभल्यांना ती बाब्या, भाल्या, शांत्या अशा घरगुती टोपणनावाने हाक मारत असे. बोलपटांच्या सुरुवातीच्या काळात तिचे 'शेवरलेट-१९३४', 'किर्ती', 'मनमानी', 'नारी', 'आशीर्वाद' आदी चित्रपट प्रदर्शित झाले. तिचा 'महाराची मुलगी' चित्रपट पाहायला सरोजिनी नायडू खास मॅजेस्टिकला आल्या होत्या. त्यांनी अंबूचे जाहीर कौतुकही केले होते.

दिग्दर्शक जी.पी. पवारांशी तिचा पहिला विवाह झाला आणि अंबूची ललिता पवार झाली. पूर्वी सिनेमात काम करणाऱ्या नट्यांना कुणी राहायला घर भाड्याने देत नसे. अंबू परळला पवारांच्या वाड्यातच भाडेकरू म्हणून राहत असे. पवारांबरोबर अंबूनी सातआठ चित्रपटही केले. दुर्दैवाने हा विवाह फार काळ टिकला नाही. त्यानंतर अंबूने, अंबिका स्टुडिओचे मालक, निर्माते रामप्रकाश गुप्ता यांच्याबरोबर विवाह केला.

१९३५ ते १९४२ या काळात ललिता, चंद्रराव कदम यांच्या 'टारझन टाईप' जंगलपटात काम करत होती, त्यात स्वत: चंद्रराव नायक होते तर मास्टर भगवान दुय्यम नायक होते. हे चित्रपट पिला हाऊस परिसरात प्रदर्शित होत. त्यांचा 'हिम्मत-ए-मर्दा ऊर्फ जंगल क्वीन' चित्रपट मिनर्व्हाला प्रदर्शित झाला. चार आठवडे हा चित्रपट हाऊसफुल्ल गर्दीत

चालू होता. वेस्टर्न इंडिया पिक्चर्सचे वितरक केकी मोदींनी हा चित्रपट मध्येच मिनर्व्हातून काढला. कदमांनी कोर्टात जाऊन यावर स्टे आणला. ललिताचा हिम्मत-ए-मर्दा मिनर्व्हाला आठ आठवडे चालला. १९४२च्या सुमारास अशाच एका जंगलपटात ललिता भगवानदादाबरोबर एका प्रसंगाचे चित्रण करत होती. थंडीच्या दिवसांत, तळ्यात स्नान करत असलेल्या ललिताला मास्टर भगवान थोबाडीत मारतो असा सीन होता. भगवानदादा पहेलवान होते आणि फिल्मी दुनियेत नवखे होते. त्यांनी चुकून ललिताच्या एक






सणसणीत कानफटीत ठेवून दिली. त्यामुळे ललिताच्या डाव्या डोळ्याची रक्तवाहिनी फुटली. चेहऱ्याला तात्पुरता पॅरालायसिसचा ॲटक आला. सतत तीन वर्षे उपचार घेऊनही शेवटी तिच्या डाव्या डोळ्यात दोष निर्माण झाला. तिला मुख्य नायिकेच्या भूमिका सोडून देऊन पुढे चरित्र नायिकेच्या भूमिका कराव्या लागल्या. त्या भूमिका पुढे ललिताला प्रसिद्धीच्या शिखरावर घेऊन गेल्या.

नवयुगच्या 'अमृत'मध्ये (१९४१) तिने बाबूराव पेंढारकरांच्या पत्नीची एका चांभारणीची अप्रतिम भूमिका केली होती. मास्टर विठ्ठल त्यामध्ये खलनायक होते. ते नायिकेवर (ललितावर) अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा ती स्वाभिमानी स्त्री त्यांना बडवून काढते असा प्रसंग होता. भालजींच्या 'नेताजी पालकर'मध्ये ती मास्टर विठ्ठलची नायिका होती. 'भक्त दामाजी'मध्ये (१९४२) बाबुराव पेंढारकरांची पत्नी. 'गोरा कुंभार'मध्ये (१९४२) गोरा कुंभार झालेल्या बाबूराव महिन्द्रकरांची पत्नी झाली होती.

प्रभातच्या 'रामशास्त्री'मध्ये (१९४४) तिने आनंदीबाईची- रघुनाथरावांच्या महत्त्वाकांक्षी, करारी आणि निष्ठूर स्वभावाच्या पत्नीची भूमिका केली होती. थोरल्या माधवराव पेशव्यांच्या अंतिम इच्छेप्रमाणे धाकट्या नारायणाला गादीवर बसवले जाते. राजदरबाराच्या रितीरिवाजाप्रमाणे, रामशास्त्रींच्या आग्रहास्तव रघुनाथराव पेशव्यांच्या गादीला मानाचा मुजरा करतात. ते दृश्य पाहून आनंदीबाईचा नुसता जळफळाट होतो. हिरमोड झाल्याने शालूचा पदर सावरत फणकाऱ्याने ती उठून निघून जाते. त्या पदराने नकळत नारायणरावाच्या पत्नीच्या भाळीचे कुंकू पुसले जाते. पुढे घडणाऱ्या घटनांची ती एक नांदी असते. सुमेरसिंग गारद्याला (सप्रू) ती निग्रहाने हळूच बजावते. 'अगदी तुकडे तुकडे झाले पाहिजेत', 'काका, मला वाचवा' असा टाहो फोडत नारायण प्राणदानाची भीक मागतो तेव्हा ही आनंदीबाई रघुनाथरावाला तसे करू देत नाही. नारायणरावाच्या हत्येचा प्रसंग पाहताना अंगावर भीतीने काटा येतो. आनंदीबाईच्या भूमिकेमुळे ललिताचे संपूर्ण हिंदुस्थानात नाव झाले. तिला लाहोरच्या 'झुमके', 'बैरामखान', 'संतान' आदी चित्रपटांत भूमिका मिळाली.

मंगल पिक्चर्सचा 'जयमल्हार' (१९४७) हा मराठीतील पहिला ग्रामीण चित्रपट! ललिता यामध्ये मुरळी झाली होती. डोळ्यांत व्यंग निर्माण झाल्यावर तिने भूमिका केलेला पहिला चित्रपट होता, 'गृहस्थी'मध्ये, ललिता व याकूब यांची खलनायिका व खलनायक अशी जोडी होती. चेहऱ्यावरील रागीट भाव दर्शवण्यासाठी ती या व्यंगाचा उपयोग करत असे. ते तिच्यासाठी वरदान ठरले होते. 'गृहस्थी'ने लॅमिंग्टनला ज्युबिली साजरी केली. 'अमर भूपाळी'त (१९५१) ती होनाजीची आई होती. वेश्यांच्या वस्तीतून मार्गक्रमण करत असताना, तेथील गणिकांचा आवाज कानी पडू नये म्हणून ती प्रेमळ माता होनाजीला 'घनश्याम सुंदरा' ही भूपाळी म्हणण्यास सांगते. 'छत्रपती शिवाजी'मध्ये (१९५२) ती विजापूरच्या आदिलशहाची बेगमसाहिबा झाली होती, राजकमलच्या 'दहेज'मध्ये तिने रंगवलेली 'झांबाज सासू' मला नाही वाटत कुणाला अशी परत रंगवता आली असती.





अमिया चक्रवर्तीच्या 'दाग'मध्ये ती दारुड्या मुलाची (दिलीपकुमारची) प्रेमळ माता झाली होती. आजारी पडून ती अंथरुणाला खिळते आणि शेवटची इच्छा म्हणून ती निम्मीला आपल्या मुलाचे आवडते गाणे 'ऐ मेरे दिल कहीं और चल' म्हणायला सांगते त्यावेळचा तो तिचा नि:शब्द अभिनय पाहण्यासारखा आहे. निरागसपणा, भाबडेपणा दर्शवण्यात राज कपूर निपुण होता. पण 'श्री ४२०'मध्ये, ललिता पवारांनी साकार केलेली 'भोळीभाबडी केळेवाली' क्षणभर राज कपूरचाही विसर पाडते. 'दिल का हाल सुने दिलवाला' गाण्यात, राजूची (राज कपूरची) ही मानलेली आई गंगामाई केळेवाली, गुडघा पोटाशी धरून ऐटीत लाकडी बाजेवर बसून, अधूनमधून पान चघळत अशा काही कौतुकाने प्रेमळ नजरेने राजूकडे पाहते की बस! शेवटी गरिबांसाठी शंभर रुपयांत घर देण्याची योजना जाहीर केली जाते. गंगामाई गाठोड्यात ठेवलेले ९९ रुपये व काही सुटे पैसे काढून राजूच्या हातावर ठेवत म्हणते, 'इसमें पाच रुपये कम है. भले एक खिडकी कम लगा लेना, लेकिन घर जरूर देना बेटे!' हा उत्कट प्रसंग पाहताना डोळ्यांतून खळकन पाणी येते. कुणी शिकवला असेल तिला हा अभिनय?

दात काढून हसणे हे थिल्लरपणाचे लक्षण आहे असे मानणारी 'जंगली'मधील शम्मी कपूर व शशिकलाची खानदानी माता, राजेश खन्नाला बरे वाटावे म्हणून जिझसकडे करुणा भाकणारी 'आनंद'मधील मेट्रेन प्रोफेसरमध्ये वयाला न शोभणारी विनोदी भूमिका साकार करणारी ललिता, तिची किती रुपये रूपे आठवू?

सुलोचना सोज्वळ माता होती. दुर्गा खोटे करारी माता होती. लीला चिटणीस, निरूपा रॉय रडक्या आया होत्या, पण ललिता पवार आईचे प्रत्येक रूप जगली. हृषीकेश मुखर्जींच्या 'अनाडी'मध्ये तिने साकारलेली 'मिसेस डिसा' म्हणजे तिच्या अभिनयाचा कळस होता. शेवटी न राहवून राज कपूर म्हणतो, ''हमने तुम्हारे जैसा एक भी नहीं देखा मिसेस डिसा!' हा तिच्या आयुष्यातील एक सर्वोत्कृष्ट अभिनय होता. तिला या भूमिकेसाठी फिल्मफेअरचा बेस्ट साहाय्यक अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला.

ललिता वास्तविक जीवनातही प्रेमळ आई होती. आपल्या लाडक्या मुलासाठी– जयसाठी – तिने १९७१मध्ये नवीन निश्चल, अमिताभ बच्चन, योगिता बालीला घेऊन 'परवाना' चित्रपटाची निमिर्ती केली. दुर्दैवाने हा चित्रपट सपशेल आपटला. रामानंद सागर यांच्या 'रामायण' या दूरदर्शन मालिकेत तिने साकार केलेली मंथरा ही तिची शेवटची अविस्मरणीय भूमिका!

ललिता पवार ही खरी हाडाची कलावंत! अभिनयाचे कसलेही प्रशिक्षण न घेता तिने केवळ सूक्ष्म निरिक्षणशक्तीच्या आणि अभिनयसामर्थ्याच्या जोरावर शेकडो व्यक्तिरेखा रंगवल्या. तहहयात रंगदेवतेची सेवा केली. दादासाहेब फाळके पुरस्कार तर त्यांना तीसचाळीस वर्षांपूर्वीच मिळायला हवा होता. त्यामुळे त्या पुरस्काराचीच शान वाढली असती. स्वाभिमानी ललिताला याची बिलकूल तमा नव्हती. तिने लोकांचे उदंड प्रेम मिळवले. २४ फेब्रुवारी १९९८ रोजी, पती, पुत्र व सून हा परिवार मागे ठेवून ललिताजी देवाघरी गेल्या. येवल्याच्या अंबूने एक देदीप्यमान इतिहास घडवला. हिंदी चित्रपटांच्या साम्राज्यातही एक मराठी पताका फडकवत ठेवली.

**– अरुण पुराणिक**
arun.puranik@gmail.com



# वृक्षराजीतील रंभा

प्रा. नीला कोर्डे

आपणा सर्वांसाठी 'नभास नित्य बाहुनि' ताठ, उंच उभा राहणारा 'कल्पवृक्ष' माड हा जणू ताठ मानेचा कर्तव्यदक्ष पिता आहे; तर आपल्या अंगोपांगांनी सर्वांच्या नित्य उपयोगी पडणारी केळ ही आपली प्रेमळ माता आहे. भोजनातील केवळ पदार्थच पुरवणारी नव्हे, तर स्वतःच भोजनाचे पानसुद्धा झालेली अशी ही आगळीवेगळी आई आहे. 'भोज्येषु माता शयनेषु रम्भा' असे म्हटले जाते तेव्हा 'रम्भा' या नावात रंभा ही अप्सरा अभिप्रेत असते. परंतु केळीसाठी 'रम्भा' हे संस्कृत नाव वापरले जाते तेव्हा मात्र होतो महन्मंगल मातृत्वाचा आविष्कार आणि ही रम्भा होते, 'भोजेष्यु माता!'

सर्वपरिचित अशा या केळीला वनस्पतिशास्त्रात 'म्युझा पॅरॅडिसियाका' (मोठी फळे येणारी) आणि 'म्युझा सॅपिएंटम' (वेलची केळी येणारी) अशी नावे असून ती म्युझेसी कुलातील आहे.

केळीचे झाड आधी ठेंगणे असून सोपटात गुंडाळलेले असते. दोन-तीन वर्षांनी त्याची वाढ होते. केळीच्या पानांचा आकार मोठा, शिरा समांतर असून ते पातळ असते. निसर्गत: केळे उष्ण हवामानात दलदलीत किंवा ओलसर मातीत



उगवते. सभोवतालच्या उष्ण वातावरणाचा आणि स्वतःच्या वाढीचा समतोल साधण्यासाठी केळीचे भलेमोठे पान खूप सूर्यप्रकाश शोषून घेते. त्याचबरोबर, बाष्पाचे उत्सर्जनही करत असते म्हणूनच पानाचा आकार मोठा असतो. केळीला पानांच्या वेढ्यातून फुलोरा येऊन, तो वर निघून एका बाजूस वळून खाली वाकतो. फुलोऱ्याचा शेवटचा भाग थोडासा मिटलेला असतो. फुलोऱ्याच्या मागच्या भागातील पाऱ्या गळून केळ्यांची एकेक फणी तयार होते. अशा प्रकारे केळ्याचा घड तयार होतो.

उपवन्य केळी, वन्य केळी, शोभेची केळी असे केळ्यांचे प्रकार आहेत. उपवन्य केळ्यांचे बसराई, राजेळी, हरी साल, सफेत वेलची, लाल वेलची, मुठेळी असे विविध प्रकार आहेत. वन्य केळीला चवेणी म्हणतात. याशिवाय कापूरकेळ म्हणजे कापराचा वास येणारी, केळीची आणखी एक जात आहे. एका केळीपासून दुसरी केळ तयार होते तेव्हा केळ प्रसवली असे म्हणतात.

शब्दसंपन्न संस्कृत भाषेत केळीला अर्थपूर्ण अशी विविध नावे आहेत. त्यांपैकी 'कदली' या नावाची व्युत्पत्ती 'यद्वा काय जलाय दल्यते' अशी आहे. क: = जल. जलामुळे जी फोफावते, ती 'कदली. केळीच्या स्तंभात अधिक जल असते आणि तिची पाने शीतल असतात. 'मोचा' (मुञ्चति त्वचम् इति = सोपटांचा त्याग करणारी), उरूस्तम्भा (मांडीप्रमाणे खोड असणारी), सुकुमारा, दीर्घपत्रा, भानुफला, अंशुमत्फला (तजेलदार फळे येणारी), सकृत्फला (एकदाच फळे येणारी), बालप्रिया, वारणवल्लभा (हत्तीला प्रिय असणारी), हस्तिविषाणी (हस्तिदंताप्रमाणे असणारी), काष्ठकदली, काष्ठीला (रानकेळ), तृणसारा, गुच्छफला अशीही नावे आहेत. केळफुलालाही संस्कृतमध्ये 'शिलीन्ध्रः, कदलीपुष्पम् ही नावे आहेत.

संस्कृत साहित्यात, महाभारतात केळीचा उल्लेख आला

आहे. महाभारतातील वनपर्वात, पांडव अज्ञातवासात असताना भीम द्रौपदीसाठी सौगन्धिक कमल आणण्यासाठी गन्धमादन पर्वताकडे जातो. या पर्वताच्या शिखरांवर असलेल्या 'कदलीषण्डात' म्हणजे केळीच्या बनात, त्याची चिरंजीव असणाऱ्या हनुमानाशी भेट होते. या बनातील केळी सुवर्णमय असल्याच उल्लेख आला आहे

*काञ्चनैः कदलीषण्डैर्मन्दमारुतकम्पितैः ।*
*वीज्यमानमिवाक्षोभ्यं तीरात् तीरविसर्पिभिः।। ५८।।*

(वनपर्व-अध्याय १४६, श्लोक क्र. ५८)

अर्थ : गंधमादन पर्वतीवरील सरोवराच्या एका तीरापासून दुसऱ्या तीरापर्यंत पसरलेले ते सुवर्णमय केळींचे बन, वायूने कंपित होऊन जणू त्या जलाशयाला पंख्याप्रमाणे वारा घालत होते.

हनुमानाचे वास्तव्य या कदलीवनातच होते. हिरण्यमय कदलीवनाच्या मध्यभागी विश्रांती घेणाऱ्या हनुमानाला महाभारतकार व्यासांनी एक सुंदर उपमा दिली आहे -

*केसर-उत्कर-सम्मिक्षम्-अशोकानाम इव-उत्करम् ।*
*हिरण्यमयींना मध्यस्थं कदलीनां महाद्युतिम् ।।*

(वनपर्व, अध्याय १४६, श्लोक क्र.८१)

अर्थ : सुवर्णमय कदली वृक्षांमध्ये विराजमान, तेजस्वी हनुमान असा दिसत होता, की जणू केशराच्या समूहात अशोकपुष्पांचा गुच्छ ठेवला आहे.

महाभारतातील दिव्य कदलीचे हे वर्णन मनाला मोह घातल्यावाचून राहत नाही.

कविकुलगुरू कालिदासाच्या 'मेघदूतम्' या गीतिकाव्यातही कनककदलींचा उल्लेख आला आहे. मेघदूतातील शापित यक्ष, मेघाजवळ आपल्या गृहपरिसराचे वर्णन करताना म्हणतो-

*तस्यास्तीरे रचितशिखरः पेशलैरिन्द्रनीलैः*
*क्रीडाशैलः कनककदलीवेष्टनप्रेक्षणीयः ।*
*मद्गेहिन्याः प्रिय इति सखे चेतसा कातरेण*
*प्रेक्ष्योपान्तस्फुरिततडितं त्वां त्वमेव स्मरामि ।।१७।।*

(उत्तरमेघ, श्लोक क्र.१७)

अर्थ : त्या विहिरीच्या काठावर नीलमण्यांचे शिखर असलेला क्रीडाशैल आहे. सोन्याच्या केळींनी वेढल्यामुळे तो फारच आकर्षक दिसतो. हे मित्रा मेघा, तुझ्यासमीप चमकणाऱ्या विद्युल्लतेबरोबर तुला पाहिल्यावर, मला माझ्या पत्नीला प्रिय असणाऱ्या त्या पर्वताचीच आठवण येते.

या श्लोकात, कालिदासाने कदलीचे एक आगळेवेगळेच तेजस्वी रूप आपल्याला दाखवले आहे. ही कदली यक्षगृहाच्या परिसरातील असल्यामुळे साधीसुधी नसून सोन्याची आहे आणि त्यामुळे इंद्रनीलमण्यांच्या शिखराच्या सान्निध्यात ती नीलवर्ण मेघात तळपणाऱ्या तेजस्वी विद्युल्लतेप्रमाणे भासते.

कदलीला स्त्रीरूपात पाहणाऱ्या माझ्या मनाला या कदलीमध्ये दिसते ती आपल्या कर्तृत्वाच्या तेजाने तळपणारी स्त्री!

संस्कृत साहित्यात स्त्रीच्या ऊरूंना (मांड्यांना देण्यात येणारी रसरशीत कदलीस्तंभाची उपमा ही कालिदासाने यक्षपत्नीच्या ऊरूंना दिली आहे. (ऊरू: सरसकदलीस्तम्भगौरः - उत्तरमेघ, श्लोक क्र.३६)

असे असले तरी 'कुमारसम्भवम्' या, कार्तिकेयाची जन्मकथा असणाऱ्या विदग्ध महाकाव्यात मात्र स्वतः कालिदासाला ही उपमा मान्य नाही असे दिसून येते. पार्वतीच्या ऊरूंचे वर्णन करताना तो म्हणतो-

*नागेन्द्र हस्तास्त्वचि कर्कशत्वादेकान्तशैत्यात्कदलीविशेषाः ।*
*लब्ध्वाऽपि लोके परिणाहि रूपं जातास्तदूर्वोरुपमानबाह्याः ।।*

(कुमारसम्भवम्, सर्ग-१, श्लोक क्र.३६)

अर्थ : पार्वतीच्या पुष्ट मांड्यांना फक्त दोन वस्तूंची उपमा दिली. एक वस्तू म्हणजे हत्तीची सोंड आणि दुसरी वस्तू म्हणजे कदलीस्तंभ! परंतु हत्तीची सोंड कडक असते आणि कदलीस्तंभ शीतल असतो. म्हणूनच पार्वतीच्या ऊरूद्वयाला उपमा देण्यासाठी योग्य वस्तू मिळू शकली नाही.

या श्लोकात पार्वतीचे ऊरूद्वय हे नागेंद्रहस्त आणि कदलीस्तंभ या उपमानांपेक्षा श्रेष्ठ असल्यामुळे व्यतिरेक अलंकार झाला आहे.

कालिदासाच्या 'रघुवंशम्' या विदग्ध महाकाव्याच्या बाराव्या सर्गात, राम-रावण युद्धवर्णनात कदली आली आहे. रावणाने रामावर शतघ्नी नावाचे, चारही बाजूंना टोकदार खिळे असलेले यष्टीसारखे असा सोडले. रामाने आपल्या अर्धचन्द्रमुख असणाऱ्या बाणाने त्या अस्त्राचे, केळीच्या झाडाचे तुकडे करावेत त्याप्रमाणे कसे तुकडे केले; ते सांगताना कालिदास म्हणतो-

*राघवो रथमप्राप्तां तामाशां च सुरद्विषाम् ।*
*अर्धचन्द्रमुखैर्बाणैश्चिच्छेद कदलीसुखम् ।।*

(रघुवंशम् - सर्ग-१२, श्लोक क्र.९६)

अर्थ: ते शतघ्नी अस्त्र रामाच्या रथापर्यंत पोहोचण्यापूर्वीच रामाने आपल्या अर्धचन्द्रमुख असणाऱ्या बाणाने, त्याने केळीच्या झाडाचे तुकडे करावेत त्याप्रमाणे तुकडे केले आणि अस्त्रभंगाबरोबरच रावणाच्या आशेचाही भंग केला.

केळ दिसायला नाजूक वाटली तरी तिच्यात चिवटपणा

असतो. रावणाचे अस्त्र कणखर असले तरी रामाचा बाण त्यापेक्षा अधिक प्रभावी होता, हे कालिदासाने येथे सूचित केले आहे.

कालिदासाच्या काव्यांतील उपवन्य केळींप्रमाणेच वन्यकेळींचा उल्लेखही त्याच्या मेघदूतात आला आहे. आविर्भूतप्रथममुकुलाः कन्दट्टी: म्हणजे कळ्यांचा प्रथमच बहर आलेल्या या रानकेळी आहेत. (पूर्वमेघ, श्लोक क्र.२१)

इसवी सनाच्या सातव्या शतकात होऊन गेलेल्या 'माघ' कवीच्या 'शिशुपालवधम्' या विदग्ध महाकाव्यात, रैवतक पर्वतावरील वर्षाऋतूच्या वर्णनात रानकेळीच्या 'शिलीन्ध्र' म्हणजे केळफुलाचा उल्लेख आला आहे. रैवतक पर्वतावरील वायू शिलीन्ध्र सुगंधी आहे. (शिशुपालवधम्, सर्ग ६, श्लोक, क्र.३२)

सम्राट हर्षवर्धनाच्या राज्यसभेत कवी असणाऱ्या बाणभट्टाच्या 'कादम्बरी' या गद्यकाव्यात केळीविषयी अनेक संदर्भ आले आहेत

जाबालीमुनींच्या आश्रमातील कुटीरांच्या अंगणात केळी वाळत घातली होती. आज आपल्याला परिचित असलेली सुकेळी किती प्राचीन आहेत याची यावरून कल्पना येते.

चंद्रप्रभ पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या शिवमंदिराच्या परिसरातील वृक्षवेलींच्या वर्णनात, केळींची नाजूक कोवळी पाने वाऱ्याच्या झुळुकीबरोबर पंख्याप्रमाणे हालत असल्याचा उल्लेख आहे.

*तनुपवन-कम्पित- कोमल-कदलीदल-वीजितैः*

हिमगृहाच्या वर्णनात तर केळ अनेक वेळा आली आहे. कुठे कुठे फुलांच्या तुऱ्यांनी केलेल्या छत्र्यांचे दांडे सुंदर, वेळूसारख्या दिसणाऱ्या केळीच्या गाभ्याच्या खुंटांचे बनवले होते.

केळीच्या दाट बनांतील केळींची फडफडणारी पाने जणू हिंव भरल्याप्रमाणे थरथरणारी वाटत होती. केळीच्या थंड पानांना हिंव भरण्याची कल्पनाच किती गमतीदार आहे.

नावाप्रमाणेच शीतल असणाऱ्या हिमगृहात शीतल केळींची कमान होती. वारा घालण्यासाठीही केळीच्या पानांचा उपयोग केला जात होता.

'कादम्बरी'चा नायक चंद्रापीड प्रमदवनात पोहोचतो तेव्हा पाचूप्रमाणे हिरव्या केळींच्या बनांच्या प्रभेने सूर्याचे किरणही गवताप्रमाणे झाल्यामुळे दिवसदेखील त्याला हिरवळलेला दिसतो, अशी सुंदर उत्प्रेक्षा बाणाने केली आहे.

बाणभट्टाच्या 'हर्षचरितम्' या गद्यकाव्यातही कदली आली आहे. बाण जेव्हा सम्राट हर्षवर्धनाच्या भेटीस जातो तेव्हा प्रासादाच्या परिसरात असलेले कदलीवन त्याच्या दृष्टीस पडते. दर्पशात या हत्तीच्या अवस्थानमंडपाच्या भोवतीही कदली होत्या. दर्पशाताने आपल्या दंतांमध्ये धरलेल्या केळीच्या पानांमुळे, केळीप्रमाणे असणाऱ्या त्याच्या दंतांनाच जणू पालवी फुटल्यासारखे वाटत होते. 'दन्तविषाणी' म्हणजे हत्तीच्या दाताप्रमाणे असणाऱ्या केळीची उपमा, येथे बाणाने हत्तीच्या दातालाच दिली आहे. अशाप्रकारे येथे उपमेय आणि उपमान यांचा व्यत्यास झाला आहे. राजद्वाराजवळ असलेल्या कदलींना तर बाणाने 'कल्पलता' म्हटले आहे. राजद्वारवर्णनात पाचूच्या हिरव्या किरणांना बाणाने कदलीवनाची उपमा दिली आहे.



निसर्गावर निर्व्याज प्रेम करणारा बाणभट्ट, कदलीचा नेत्रसुख देणारा हरितवर्ण आणि स्पर्शसुख देणारी शीतलता आपल्या प्रत्ययास आणून देतो.

कालक्रमाने इसवी सनाच्या सातव्या शतकात होऊन गेलेल्या बाणभट्टानंतर आठव्या शतकातील आद्य शंकराचार्यांनी सगुण ब्रह्माची उपासना करताना अनेक देवदेवतांच्या स्तुतीपर स्तोत्ररचना केल्या. या स्तोत्रांमध्ये 'शिवमानसपूजा' स्तोत्रात शिवाला अर्पण करण्यात येणाऱ्या नैवेद्यामध्ये 'रम्भाफलं पानकम्' म्हणजे केळ्याच्या शिकरणीचा उल्लेख आहे. (श्लोक क्र.२) शिवाविषयी असणाऱ्या 'मृत्युंजयमानसपूजा' स्तोत्रात तर (पुढीलप्रमाणे)- शिकरणीची कृतीही सांगितली आहे.

*शर्करामिलितं स्निग्धं दुग्धान्नं गोघृतान्वितम्।*
*कदलीफल संमिश्रं भुज्यतां मृत्युसंह ।*

(मृत्युंजयमानसपूजास्तोत्रम्, श्लोक क्र.२६)

इसवी सनाच्या बाराव्या शतकात होऊन गेलेल्या,



पंडित श्रीहर्षाच्या 'नैषधीयचरितम्' या विदग्ध महाकाव्यात नल-दमयंती विवाहप्रसंगी झालेल्या भोजनसमारंभाचे वर्णन आले आहे.

त्यामध्ये भोजनपात्राचा 'दल' म्हणजे पान म्हणून जो उल्लेख आला आहे, ते पान केळीचे आहे. मंगलकार्यात प्रवेशद्वारापाशी केळीचे खांब लावण्याची प्रथाही नैषधीयचरितात दिसून येते.

*श्लथैर्दलै: स्तम्भयुगस्य रम्भया चकास्ति चण्डातमण्डिता सा।*

(नैषधीयचरितम्, सर्ग १६, श्लोक क्र.८)

अर्थ : केळीच्या दोन खांबांवरून खाली लटकणारी (लोंबणारी) पर्णरूपी चंडातक (पायघोळ वस्त्र) परिधान केलेली द्वारभूमी दमयंतीची सखी म्हणून शोभत होती.

संस्कृत न्यायकोशात (न्याय = Maxims) कदलीकण्टक न्याय आला आहे. केळीच्या पानाला काटा लागला असता पानाची हानी होते, काट्याची नव्हे. त्याचप्रमाणे दुष्टाच्या सहवासात सज्जनाची हानी होते; दुष्टाची नव्हे, असा या न्यायाचा अर्थ आहे.

संस्कृत साहित्याप्रमाणेच संस्कृत शास्त्रीय ग्रंथांमध्येही कदलीला स्थान आहे. आयुर्वेदात केळीचे अनेक औषधी उपयोग सांगितले आहेत. केळ शीतल, गुरू (पचण्यास जड) वृष्य (पौष्टिक, शुक्रवर्धक), स्निग्ध व मधुर आहे. कदलीकंद कर्णशूल, रजोदोष, आम्लपित्त यांचा नाश करतो. कदलीसार (काले), तृषा, दाह अतिसार यांचा नाश करते. पिकलेले केळे तृषा, क्षुधाग्लानी, पित्त, नेत्ररोग यांवर गुणकारी आहे. कच्च्या केळ्यांमध्ये पिकलेल्या केळ्यांपेक्षाही अधिक प्रमाणात औषधी गुणधर्म असतात. कच्ची केळी तंतुमय असल्याने बद्धकोष्ठ कमी होऊन शरीरातील अनावश्यक चरबीही कमी होते. तसेच, मधुमेहावर नियंत्रण ठेवले जाते. केळ्याच्या सालीमध्ये अँटि-मायक्रोबियल आणि अँटिऑक्सिडंट गुणधर्म असल्याने मुरुमे व पुरळ नष्ट होतात. ही साल बारीक करून फेसपॅक म्हणून लावता येते. केळीच्या पानाचे औषधी उपयोग तर अनेक आहेत. त्यातील पॉलिफेनॉल कॅन्सरच्या पेशींवर कार्य करते. या पानातील चिकट द्रवपदार्थ खाल्ल्यानंतर कॅन्सर वाढवणाऱ्या ग्रंथीची वाढ मंद होते किंवा ती हळूहळू निष्क्रिय होत जाते. केळीच्या पानावर जेवण केल्यास पानातील पोषक द्रव्यांमुळे त्वचेवरील डाग, पुरळ, मुरुमे नाहीशी होऊन त्वचा तरुण राहते. केळीच्या पानावर खोबरेल तेल टाकून ते पान त्वचेवर गुंडाळल्यास त्वचारोग बरे होतात. भाजलेल्या, बेडसोअर झालेल्या रुग्णाच्या अंगाखाली केळीची शीतल पाने ठेवतात. काही अन्नपदार्थ शिजवताना भांड्याच्या तळाशी केळीचे पान ठेवल्यास अन्नपदार्थाला मंद सुवास येतो

पाकक्रियाविषयक संस्कृत ग्रंथांमध्येही केळ्यांच्या पाककृती सांगितल्या आहेत. 'नलपाकदर्पण' या ग्रंथात पिकलेल्या राजेळी केळ्यांच्या भाजीची पाककृती दिली आहे.

संस्कृत भाषेतील रंभेकडून, कदलीकडून आपण 'अमृताते पैजा जिंकणाऱ्या' मायमराठीतील केळीकडे येतो, तेव्हा अर्थातच ही केळ, आपल्याला प्रथम भेटते ती ज्ञानेश्वरीत!

मन ताब्यात ठेवलेला योगी आत्म्याला परमात्म-स्वरूपाच्या ठिकाणी लावून परमानंदाची पराकाष्ठा असणारी शांती कशी मिळवतो, हे सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात-

*नातरी कर्दळीचा गाभा।*
*बुंथी सांडोनी उभा।*
*का अवयवची नभा।*
*निवडला जो।।*

(ज्ञानेश्वरी, अध्याय-६. ओवी क्र.२९५)

अर्थ : केळीच्या खांबाची सोपटी सोलून आतील गाभा मोकळा करावा, त्याप्रमाणे योगी आपली देहासक्ती काढून टाकतो. तो जणू आकाशाचा एक भाग आहे असे वाटते; म्हणजेच तो परमात्म्याशी एकरूप होतो.

दुसऱ्या एका ओवीत कर्पूरकर्दळीचा उल्लेख आला आहे. श्रीकृष्णाच्या दिव्य विश्वरूपदर्शनाने प्रभावित झालेल्या अर्जुनाची अवस्था वर्णन करताना ज्ञानेश्वर म्हणतात-

*कर्पूर कर्दळीची गर्भपुटे।*
*उकलता कापुराचेनि कोंदाटे।*
*पुलिका गळती तेवी थेंबुटें।*
*नेत्रोनि पडती।।*

(ज्ञानेश्वरी, अध्याय ११ ओवी क्र.२५०)

अर्थ : कर्पूरकळीच्या गर्भपुरामध्ये कापूर दाटला असता, तो उकलून जसे कापराचे कण गळू लागतात तसे अर्जुनाच्या नेत्रांवाटे आनंदाश्रूचे थेंब गळू लागले.

ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायातही पुण्यपुरुषांच्या लक्षणांमध्ये कर्पूरकर्दळीचा दृष्टान्त आला आहे. पुण्यपुरुषाचे गुण सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात-

*नातरीं केळीं कापूर जाहला*
*जेवीं परिमळे जाणो आला*

(ज्ञानेश्वरी, अध्याय-१३, ओवी क्र.१८२)

अर्थ : कर्पूरकर्दळीमध्ये परिपक्व झालेला कापूर जसा सुवासामुळे जाणवतो त्याप्रमाणे हृदयातील ज्ञानामुळे पुण्यपुरुषाच्या शरीरी चिन्हे उमटतात.

त्याचे अदंभित्व कसे असते हे सांगतानाही ज्ञानेश्वरांनी

केळीचाच दृष्टान्त दिला आहे.

*केळीचे दळवाडे।*
*हळू पोकळ आवडे।*
*परि फळोनिया गाढे।*
*रसाळ जैसा।।*

(ज्ञानेश्वरी, अध्याय १३, ओवी क्र.२१२)

अर्थ : केळीचे झाड बाह्यतः पोकळ असताना त्याची फळे मात्र रसरशीत असतात; त्याप्रमाणे वरवर पाहता ज्याच्या ठिकाणी अभावच जाणवतात, अशा पुण्यपुरुषाकडे पूर्णतेच्या दृष्टीने पाहणाऱ्याची इच्छा अगदी तृप्त होते.

एरवी अतिपरिचित असणाऱ्या या केळीला ज्ञानेश्वरांनी आपल्या दृष्टान्तामध्ये मानाचे स्थान दिले आहे.

संत रामदासांनी 'बाग' या प्रकरणात, कोणती झाडे लावण्यात यावी हे सांगताना ज्या झाडांची नावे दिली आहेत त्यांमध्ये केळीचा आवर्जून उल्लेख केला आहे.

अर्वाचीन मराठी साहित्यात निसर्गकन्या बहिणाबाई चौधरी यांच्या स्फुट ओव्यांमध्ये केळीच्या पानाला एक वेगळाच संदर्भ आहे. वादळी वारा केळीच्या पानाच्या 'मोठे'पणाचे जणू गर्वहरण करतो. लहान असल्याने वादळी वाऱ्यात वाचलेले बाभळीचे पान केळीच्या फाटणाऱ्या पानाला म्हणते–

*'फाट आता टराटर', नाही दया तुफानाले*
*हाले बाभयीचं पान, बोले केयीच्या पानाले*

केळ्याचा एक गमतीदार उल्लेख कृ.प्र. खाडिलकर यांच्या 'संगीत मानापमान' (इ.स. १९११) या नाटकात आला आहे. या नाटकातील धैर्यधर आणि लक्ष्मीधर या गाजलेल्या व्यक्तिरेखा आहेत. शूर, पराक्रमी सेनापती धैर्यधर याच्या भेटीला सुखलोलुप लक्ष्मीधर जातो तेव्हा धैर्यधराची प्रतीक्षा करताना तो अगदी वैतागून जातो. त्याच्या सुखासीन शरीराला ही प्रतीक्षा सहन न झाल्यामुळे तो उद्गारतो, 'आमच्या अंगावरील मांस लोण्याच्या गोळ्याप्रमाणे मऊ आहे, हे ठीक आहे; पण ही हाडे इतकी कठीण कशाला? देवा, आमची ही हाडे सोललेल्या केळ्यासारखी केली असतीस तर चालले नसते का?'

केळ्यासारख्या मऊ फळाविषयी इतका विनोदी विचार कोणी केला नसेल!

याउलट पु.ल. देशपांडे यांनी आपल्या 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकात कवी अनिल यांच्या 'केळीचे सुकले बाग' या भावकवितेची समर्पक आणि अगदी चपखल योजना केली आहे. यातील केळ ही दूरच्या दुःखाच्या, वेदनांच्या झळांनीसुद्धा सुकून जाणाऱ्या हळव्या स्त्रीमनाचे प्रतीक आहे. 'तुझे आहे तुजपाशी'मधील सतीश आपल्या प्रेयसीला– उषाला 'केळीचे सुकले बाग' या कवितेची जाणीवपूर्वक आठवण करून देतो. सतीश आणि उषा यांची प्रीती, ही निगराणी राखलेल्या नाजूक केळींच्या बागेसारखी आहे परंतु हळवी उषा समाजजीवनातील वेदनांच्या चटक्यांनी होरपळलेली आहे. त्यामुळे सतीश–उषा यांची, नाजूक केळींच्या बागेप्रमाणे असणारी प्रीतीसुद्धा कोमेजून गेली आहे. कातरवेळी मन कातर करणारी अशी ही कविता आहे.

कवी वसंत बापट यांच्या 'दख्खनराणी' या कवितेत चवेणी आली आहे–

*'पाहा ही चवेणी, पाहा हा केवडा'*

इंदिरा संतांनी आपल्या एकच कथासंग्रहाला 'कदली' हे नाव दिले आहे, याचाही उल्लेख येथे करावासा वाटतो.

बालगीतांमध्ये, 'केळीच्या बागा मामाच्या, पिवळ्या घडांनी वाकायच्या' हे एक बालगीत आहे. 'तू सुखी राहा' या चित्रपटातील 'झुकझुक झुकझुक आगीनगाडी' या बालगीतातील 'मामाची बायको सुगरण, रोजरोज पोळी शिकरण' हे बालोद्गार कोण विसरेल?

चित्रपटगीतांमध्ये, दादा कोंडके यांच्या 'पांडू हवालदार' या चित्रपटातील–

'केळेवाली मी, सांगा तुम्हाला शोभल का?' हे गीतही आपल्या परिचयाचे आहे. चित्रपट म्हटल्यावर केळेवालीशी हुज्जत घालणारा 'श्री ४२०' चित्रपटातील राज कपूरही आपल्याला आठवतो–

प्राचीन काळातील या रंभेला– कदलीला तिच्या सुफलता आणि सौंदर्य या गुणांमुळे आपल्या भारतीय संस्कृतीत आजही महत्त्वाचे स्थान आहे. केळीच्या झाडात देवाची वसती आहे असे मानले जाते. इतकेच नव्हे तर, हे झाड लक्ष्मीचे प्रतीक मानतात. लक्ष्मी जशी पिवळ्या सोन्याच्या दागिन्यांनी मढलेली असते, तशीच सोनपिवळी केळी या लक्ष्मीने आपल्या अंगावर धारण केली आहेत.

आजही मंगलप्रसंगी द्वारापुढे लेकुरवाळ्या केळींचे तोरण उभारतात. सत्यनारायणाच्या पूजेच्या वेळीसुद्धा चौरंगाच्या चार बाजूंना केळीचे खांब लावतात. पूजेच्या प्रसादासाठी केलेल्या शिऱ्यात केळी घालतात. याविषयी अशी एक कथा आहे, की विदुरपत्नीने कृष्णाला केळे सोलून देताना चुकून साल खाण्यास दिली. कृष्णाने तीसुद्धा अमृतापेक्षा गोड मानून खाल्ली. कृष्ण हा विष्णूचाच अवतार असल्यामुळे सत्यनारायणाच्या प्रसादात त्याला प्रिय असणारे केळे घालतात.

धार्मिक कार्यांमध्ये केळ्याच्या फळाइतकेच त्याच्या





पानालाही महत्त्व आहे. दक्षिणेतला तिरुमल हा देव बाल्यावस्थेत असताना वाहत्या जलात केळीच्या पानावर पहुडला असल्याची कल्पना आहे. दक्षिणेत तर भोजनाचे पान म्हणून केळीच्या पानाला अतिशयच महत्त्व आहे. हे पान राजवैभवाचे प्रतीक मानले जाते.

ध्यानधारणा व समाधी यांसाठी केळीची शीतल छाया फलप्रद मानतात.

महाराष्ट्रात केळीला पतिव्रता मानले आहे. तिच्याविषयी लोकसंकेत असा आहे–

*जन्मामध्ये जन्म केळीबाईचा चांगला।*
*भर्तारावाचून गर्भ नारीला राहिला।*
*श्रेष्ठ पतिव्रता केळीबाई म्हणू तुला।*
*विनाभोग गर्भमरणाचा ग सोहळा।।*

पातिव्रत्य आणि पुरुषनिरपेक्ष मातृत्व हे दोन कल्पनाबंध केळीच्या ठिकाणी एकत्र आलेले आढळतात. केळ प्रसवल्यावर मरून जाते, हा उल्लेख या पूर्वी आलाच आहे. (संदर्भ : भारतीय संस्कृतिकोश, खंड–२ पृ.क्र.५३९)

व्रतांमध्ये 'कदलीवत' नावाचे एक काम्यव्रत भाद्रपद शुद्ध चतुर्थीला करतात. या दिवशी केळीच्या झाडाची पूजा करतात. पूजेचा ध्यानमंत्र पुढीलप्रमाणे आहे–

*ध्याये त्वां कदलीदेवि सौभाग्यफलदायिनी।*
*रूपं देहि जयं देहि यशो देहि च निश्चितम्।।*

पूजा झाल्यावर केळीला पाणी घालतात, पूजलेल्या केळीला घड आल्यावर व्रताचे उद्यापन करतात. त्यावेळी तिल आणि घृत यांचे हवन करून, आचार्यपूजा, वायनदान, दंपतीभोजन इत्यादी गोष्टी करतात. आरोग्य, सौंदर्य आणि अपत्यप्राप्ती हे या व्रताचे फल!

रुक्मिणीने श्रीकृष्णाच्या उपदेशानुसार हे व्रत केले. पुढे कौरवांच्या सभेत द्रौपदीचे वस्त्रहरण होत असताना तिने कृष्णाचा धावा केला तेव्हा कृष्णाने रुक्मिणीला; तिने केलेल्या कदलीव्रताचे फल द्रौपदीला देण्यास सांगितले. तिने तसे केल्यावर केळीला ज्याप्रमाणे एकाखाली एक पदर असतात त्याप्रमाणे द्रौपदीच्या अंगावर एकाखाली एक अशी वस्त्रे उत्पन्न होऊन तिचे लज्जारक्षण झाले.

(संदर्भ : श्री विश्वनाथ शर्माविरचितः व्रतराज:)

प्राचीन काळातील कदलीव्रतासारख्या व्रतांमधून आपल्या पूर्वजांची वृक्षसंवर्धन आणि वृक्षसंरक्षण करण्याची दूरदृष्टी दिसून येते. कदलीव्रतात, कदलीला देवी मानले आहे. या व्रताच्या उद्यापनासाठी जो कालावधी दिला आहे, तोसुद्धा तिला घड येण्यापर्यंतचा आहे. यामुळे आपोआपच तिची जोपासना केली जात होती. आज पर्यावरणास पूरक वृक्षसंपदेचा नाश होत असताना या वृक्षव्रतांकडे आपण नव्या दृष्टीने पाहिले पाहिजे.

आपल्या खाद्यसंस्कृतीत तर केळीला अतिशय महत्त्व आहे. केळीच्या काल्यात (गाभ्यातील पाणी) पापडाचे पीठ भिजवले असता ते पापड हलके होतात. कच्च्या केळ्यांचे तर काप, भजी, टिक्की, कीस, वेफर्स, भाजी असे विविध प्रकार आहेतच. पिकलेल्या केळ्यांचे शिकरण, नारळाचा चव घालून केलेली भरली केळी, उंबर (घारगे) वड्या असे विविध गोड पदार्थही सणासुदीला करतात. केळफुलाची भाजीही चवदार होते. आइसक्रीम लवकर वितळू नये म्हणून केळीच्या देठातील सेल्युलोजचा वापर करतात.

केळीच्या सोपटांच्या मजबूतपणामुळे त्यांच्यापासून वस्त्रेही बनवतात. वस्त्रांवरून एक आठवण झाली.. ती म्हणजे पूर्वीच्या काळी नऊवारी साडीच्या विशिष्ट पद्धतीने केलेल्या निऱ्यांना 'केळे' म्हणत असत.

लोकसाहित्यातील म्हणी, वाक्प्रचार, कोडी, उखाणे यांमध्येही केळे आले आहे.

- केळी खाता हरखले, हिशेब देता कचरले
- केळीला नारळी आणि घर चंद्रमौळी
- एका टायमाला खाती सतरा केळी,
  आन म्हंते बाई मी भोळी

संस्कृतमध्ये पत्नीसाठी असलेल्या 'जाया' या शब्दाचा व्युत्पत्ती 'तज्जाया जाया भवति यदस्यो जायते पुन:' म्हणजे 'पतीच पत्नीच्या ठिकाणी पुत्ररूप घेतो' अशी दिली आहे. त्यावरून पुढील म्हण आली आहे–

*केळीच्या पानाला लावला चुना*
*बायको बाळंतीण नवरा तान्हा*

वाक्प्रचारांमध्ये 'हात केळी खायला जाणे' हा एक वाक्प्रचार आहे.

मजेदार कोड्यांमध्येही एका कोड्यात केळीचा उल्लेख आहे.

*'सातासमुद्रापलीकडे राजाने लावल्या केळी,*
*वाकतात, पण मोडत नाहीत.'*

(उत्तर - हातापायांची बोटे)

पूर्वी मंगळागौरीच्या वेळी फुगड्या घालताना उपवर मुलीला चिडवण्यासाठी पुढीलप्रमाणे उखाणा घातला जाई-

*'केळं बाई केळं राजेळी केळं*
*एवढी मोठी झाली तरी लग्न नाही केलं'*

पतीचे नाव घेताना नववधूच्या उखाण्यातही केळ येत असे.

*'इंद्राच्या नंदनवनात सोन्याच्या केळी*
*..... चे नाव घेते मंगळागौरीच्या वेळी'*

गावांच्या नावात तसेच आडनावांतही केळ आली आहे. केळवे, केळशी, त्याचबरोबर गिरगावातील (मुंबई) केळेवाडीही आपल्या परिचयाची आहे. आडनावांमध्ये केळकर, केळशीकर अशी आडनावे आहेत.

चिरंतनतेचे वरदान लाभलेल्या आपल्या भारतीय संस्कृतीत केळीशी संबंधित असलेल्या परंपरा आजही आपण जपल्या आहेत. जेवणात खऱ्या केळीच्या पानाची हौस आपण कृत्रिम पानाने भागवतो. सणावारी चांदीचे केळीचे पान वापरतो. ठाण्यातील एका उपाहारगृहाला तर 'बनाना लीफ' हे नाव दिलेले आहे. इतकेच नव्हे तर, बेडशीटवरसुद्धा केळीच्या पानांचे डिझाइन पाहण्यात आले आहे. अजूनही श्रावण महिन्यात, मंदिरांमध्ये देवदेवतांना केळ्यांची वाडी भरतात. अगदी अलीकडे आषाढी एकादशीच्या दिवशी, परळच्या नरेपार्क शाळेतील विद्यार्थ्यांनी केळीची पाने आणि केळी यांनी विठ्ठलाची पर्यावरणपूरक आकृती बनवली होती. आज वृक्षसंपदेचा ऱ्हास होत असताना मंगल कार्यालयाच्या द्वाराशी लेकुरवाळ्या केळी उभारणे उचित नाही याची जाणीव होऊन ठाणे येथे चाफेकर यांनी 'शहनाई हॉल'च्या द्वारात कृत्रिम केळी उभ्या केल्या आहेत. थोडक्यात सांगायचे तर परंपरा आणि नवता यांचा मेळ घातलेला आज आपल्याला दिसतो.

अशा या केळीशी माझा भावबंध बालपणापासूनच जुळून आला आहे. माझ्या बालपणी, श्रावणी सोमवारचा उपवास संध्याकाळी केळीच्या पानावर भोजन वाढून सोडला जात असे. तेव्हा केळ्यांपासून तयार केलेले विविध खाद्यपदार्थ तर होत असतच, शिवाय केळफुलांच्या पानांचे जोडे पायांत घालून चालण्याचा प्रयत्न केल्याचेही मला आठवते. या पानांपैकी पांढुरक्या पानांना गाई आणि काळपट लाल पानांना आम्ही म्हशी म्हणत असू. अंगणातल्या केळीविषयी आणखी एक गमतीदार आठवण आहे. आमच्या घरातल्या नोकराने घरातले मौल्यवान पेन चोरून ते केळीच्या झाडात खुपसून ठेवले पांडवांनी आपली शस्त्रे शमीवृक्षात लपवून ठेवली होती, त्याचे हे विडंबनच म्हणायला हवे.

प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या, स्वर्गातील नव्हे तर भूलोकातील रंभेविषयी-केळीविषयी आज मी नव्याने विचार करू लागते तेव्हा तिच्या स्तंभातील एकावर एक असणारे कणखर पदर, आजच्या काळाशी सुसंगत असा वेगळाच संदर्भ घेऊन उलगडत जातात.

आजची स्त्री, कन्या, पत्नी आणि माता या भूमिका तर निभावून नेत आहेच, परंतु त्याचबरोबर आजच्या विज्ञानयुगात तिच्या व्यक्तिवाला विविध पैलू लाभले आहेत. राजकारण, अर्थकारण, क्रीडा, देशसंरक्षण यांसारख्या क्षेत्रांप्रमाणेच अंतरिक्ष संशोधनातही तिच्या बुद्धिमत्तेने झेप घेतली आहे. यामुळेच तिचे मातृत्वही केवळ शारीर नसून वैश्विक झाले आहे.

आजची स्त्री ही खरोखरच केळीप्रमाणे आहे. केळीप्रमाणेच ती सदाहरित, प्रसन्न, टवटवीत आहे. आज ती सौंदर्यप्रसाधनांनी, वस्त्रप्रावरणांनी, अलंकारांनी आपल्या मूळ रूपाला उजाळा देत आहे. हिरव्यागार पानांची केळ बाहेरून जितकी नाजूक दिसते तितकीच आतून कणखर असते. जुन्या काळात चूल आणि मूल या मर्यादित क्षेत्रात वावरत असणारी स्त्री आज विविध क्षेत्रांमध्ये वावरत असल्यामुळे तिचे मानसिक ताणतणाव वाढत आहेत. 'स्ट्रेस' हा आजचा रोजच्या वापरातील शब्द झाला आहे. परंतु हा ताणच तिला प्रतिकूल परिस्थितीला तोंड देण्यासाठी कणखर बनवत आहे. त्यामुळेच नैसर्गिक नाजूकपणाबरोबरच मनाचा कणखरपणाही तिच्यात आला आहे.

वटपौर्णिमेला विशाल वडाची पूजा करण्याबरोबरच आजच्या स्त्रीने या रंभेला-कदलीला-प्रिय सखी मानून तिची पूजा केली पाहिजे. म्हणजे तिची जोपासना करून निगा राखली पाहिजे. हेच आजच्या काळातील 'कदलीव्रत' आहे.

**- प्रा. नीला कोर्डे**
भ्रमणध्वनी : ९३२४८ ९१८८०



# पराक्रमी नूर, भारतीय गुप्तहेर

संजीवनी खेर

'नूर इनायत खान ही तशी आपल्याला अपरिचित स्त्री. तिने दुसऱ्या महायुध्दात जो पराक्रम केला त्यांची नोंद आपण घ्यावी अशीच आहे. भलेही ती तेव्हा भारतीय भूमीवर राहत नव्हती. सूफी वडलांच्या तालमीत तयार झालेली ही तरुणी वास्तवात हळूवार कलासक्त, लेखिका होती. भारतीय संस्कार तिच्या मनात होते म्हणूनच तिने गीतेचा अभ्यास केला, जातक कथांचे मुलांसाठी पुस्तक लिहिले. पॅरिस, मॉस्को, लंडन अशा ठिकाणच्या साहित्यिक वातावरणात तिचे भावनिक पोषण झाले. आपल्या वैयक्तिक प्रेमाला मुरड घालून तिने घराण्याच्या अब्रुला(?) जपले. आणि अखेर युद्ध प्रयत्नात भाग घेऊन हौतात्म्य पत्करले. ह्या पराक्रमी स्त्रीला अभिवादन.'



नूर इनायत खान

स्वातंत्र्यपूर्वकाळ, युरोपात युद्ध पेटलेले होते. युद्धात भारतातील मूल रहिवासीही सामील होतेच. एका राजघराण्यातील, कलासक्त, सुफियाना मिजाजाच्या वडिलांची लाडकी कन्या नूर. लेखन, संगीत ह्यात रस घेणारी, अत्यंत देखणी नूर. युद्धाच्या धूमश्चक्रीत आपणहून जाईल. सुरक्षित, आरामशीर जीवन पॅरिसमधील 'फजल मंजिल'मध्ये असताना ही म्हैसूरच्या वाघाची नातेवाईक स्वस्थ बसेल हेही अशक्य होते. आई अमेरिकन आणि वडील भारतीय मुस्लीम. संगीतात मग्न. चारी भावंडे, रशिया आणि युरोपमध्ये वाढलेली. नूरचा जन्म १९१४ मध्ये, रशियातील. तिला तिच्या शौर्य आणि धैर्याबद्दल अनेक मेडल्स मिळाली होती. जॉर्ज द क्रॉस हा मानाचा किताब मिळाला होता. तिचे हेरगिरीचे उपनाव मेडेलिन होते. ती रेडिओ ऑपरेटर होती. शत्रूची माहिती मित्रराष्ट्रांना द्यायचे काम करत होती. तिचे सगळे आयुष्य युद्धाच्या धामधुमीत गेले. नियतीचा खेळ इतका विचित्र होता की तिने गेस्टापोच्या हातून हाल सहन केले, पण सहकाऱ्यांची माहिती दिली नाही. अखेरच्या दिवसात तिला दगाफटका झाला नि ती पकडली गेली. तिला दॅश्यू ह्या छळछावणीत पाठवले गेले आणि युद्ध संपायच्या आदल्या रात्री फायरिंग स्क्वाडला सामोरे जाऊन तिला मरण आले. वय होते तीस!

ह्या तेजस्विनीच्या जीवनाचा शोध घेऊन लेखिका, 'अमृत बझार पत्रिके'च्या ब्रिटनमधील पत्रकार शरबानी बसू हिने 'स्पाय प्रिन्सेस- द लाइफ ऑफ नूर इनायत खान' हे पुस्तक लिहिले. मला तिच्याविषयी मराठीतून लिहावे असे



**बसलेले – नूरचे वडील इनयात खान, आई अमिना शारदा उभी असलेले नूर, क्लेर, विलायत आणि हिदायत. पाठीमागे काका**

वाटत होते आणि हा लेख मी लिहायला घेतला. वास्तविक हे पुस्तक माझ्याजवळ ४-५ वर्षांपासून होते. जेव्हा जेव्हा मी ते उघडले, ह्या तरुण स्त्रीच्या जीवनातील नियतीच्या खेळाने दु:खी झाले. तिच्या धैर्याने चकित झाले. तिला १९४४ मध्ये जर्मन सैन्याने गोळ्या घातल्या. तिच्या ह्या हौतात्म्याची आठवण करून आजदेखील तिच्या महालासमोर बिगुलवादनाने सैनिक तिला सलामी देतात. तो घातकी क्षण मला अस्वस्थ करतो. तिची सुटका करायची ऑर्डर आल्याची बातमी जर्मन सैन्याला मिळाली असती तर नूर वाचू शकली असती. पण? ते तिच्या प्राक्तनात नव्हते.

ती सुफियाना वातावरणात वाढली असली तरी क्रूर सत्तेच्या पाडावासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे तिला वाटले. अहिंसेवर गाढ श्रद्धा असली तरी तिला जाणवले की रेडक्रॉसमध्ये सामील होऊन युद्धात देशसेवा करणे आवश्यक आहे. ती फ्रान्स आणि ब्रिटनमध्ये वाढली होती. तिने वायरलेस ऑपरेटर म्हणून प्रशिक्षण घेऊन काम सुरू केले. तिला एसओइ ह्या खास संस्थेत पाठवले गेले. जिथं शत्रूचे संदेश मध्येच ऐकून त्यानुसार आपल्या वरिष्ठांना कळवणे हे प्रमुख काम होते. बरेच दिवस हे व्यवस्थित चालले, पण नशिबाने धोका दिला. वास्तविक तेव्हा तिला कळवण्यात आले होते, की तू तिथे राहू नकोस, तातडीने पोस्ट सोड, पण तिने ते ऐकले नाही, कारण तिथून मिळणारी माहिती अत्यावश्यक होती. तेच तिला नडले. जर्मनांनी तिला पकडले, तिने दोनदा पळून जाण्याचा प्रयत्न केला. अखेर तिला छळले गेले तरी तिचे खरे नावही शत्रूला वदवून घेता आले नाही. अशी ही भारतीय वीरांगना!!

म्हैसूरचा टायगर समजल्या जाणाऱ्या टिपू सुलतानची ही संपत्तीची वारसदार भलेही नसेल, पराक्रमात नक्कीच होती. ही वास्तविक एखादी नृत्यांगना, गायिका वा वादक झाली असती तर अधिक शोभली असती. ही असले काही धाडस करील असे वाटले नव्हते. नूरून्नीसा हे तिचे पूर्ण नाव. नावाप्रमाणेच ती तेजस्वी होती. राजघराण्यातील होती. तिचे वडील हे सुफी विचारांचे प्रचारक आणि गायक होते. सारे कुटुंब १८५७च्या स्वातंत्र्यसंग्रामानंतर विखुरले. राजपरिवाराच्या सुरक्षेसाठी मुलांना, लेकीसुनांना राजघराण्याच्या विश्वासू सरदारांनी वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन वसवले. नूरचे वडील इनायत खान बडोदा इथे राहत होते. त्यांची अमेरिकन पत्नी आणि त्यांची चार मुले सारेच सात्त्विक वागत असत. राहणे, वागणे विनयशील आणि धार्मिक होते. त्यांनी आपल्या संगीताने देशविदेशातील अनेकांना मंत्रमुग्ध केले होते. विदेशात अनेक ठिकाणी त्यांनी सुफी संगीताचे जलसे केले. काही वर्षांनंतर त्यांना सुफी विचारांच्या प्रसारासाठी युरोपात जायची आज्ञा त्यांच्या गुरूंनी केली आणि ते सहकुटुंब तिथे गेले. पण, त्यावेळी त्यांना रशियन संस्कृतीने आकर्षित केले. त्यामुळे ते सहकुटुंब मॉस्कोला राहायला गेले. जाताक्षणीच त्यांना तेथील साहित्यिक विश्वाचे गुरू लिओ टॉलस्टॉय यांच्या व्यक्तिमत्त्वाने आणि साहित्याने भारून टाकले. हजरत इनायत खान यांचे रूप आणि राहणी कुणालाही प्रभावी वाटेल अशीच होती. त्यांच्या विचार व आचारांत भारतीय विचारांचे सार होते नि सुफियाना मिजाज होते. तेथे त्यांनी लिओंबरोबर पूर्व-पश्चिम संगीतावर आधारित 'शकुंतला' नाटक केले. तिथे आणि त्यानंतर पॅरिसमध्ये त्यांच्याभोवती तेव्हाचे अनेक मातब्बर कलावंत असत. युरोपात त्यांनी महात्मा गाधींच्या अहिंसेला आपलेसे केल्याने सत्ताधीशांची त्यांच्यावर नजर असे. रामकृष्ण मिशनमध्ये इनायत खान यांनी 'भारतीय एकात्मिक संस्कृतीवर' भाषण दिले होते.



**वीणावादन करताना नूर**

त्यांनी एका उच्चपदस्थाची कन्या ओरा बेकर हिच्याशी विवाह केला आणि तिला अमिना शारदा (रामकृष्ण परमहंस यांच्या सहचरीचे) नाव दिले.

त्यांच्या मनोवृत्तीला पॅरिसचे वातावरण आवडले आणि तिथे आपली दोन भावंडे आणि पत्नी व मुलीसह राहू लागले. रशियात राहत त्यांच्या पहिल्या कन्येचा जन्म १ जानेवारी १९१४ रोजी झाला. तेव्हाच तेथील वातावरण राजकीय



नूर, हिदायत, विलायत आणि क्लेर

दृष्टच्या अस्थिर होऊ लागल्याने त्यांच्या हितचिंतकांनी त्यांना मॉस्को सोडायचा सल्ला दिला. आपले सामान आवरून ते निघत असतांनाच कळले की शहरात नाकाबंदी केलीय. ते घराबाहेर पडले तर लोकांनी त्यांना पाहून कुणी साधुपुरुष चालले आहेत असे वाटून वाट करून दिली. ते युरोपात गेले. तिथे त्यांनी सुफी विचारांच्या प्रसाराला आरंभ केला एक वेगळा प्रयोग करायचा ठरवून त्यांनी जागतिक सर्वधर्म प्रार्थना दिवसाची सुरुवात केली. युरोपातील सुफी संप्रदायातले लोक तिथे जमू लागले. आता 'फझल मंजिल' हे इनायत खान आणि कुटंबीयांचे राहण्याचे स्थान झाले, ते जर्मनांनी फ्रान्सवर कब्जा मिळवेपर्यंत कायम होते. जसजशी तेथील संस्कृतीवरील, कलाजीवनावरील, इतर धर्मीयांवरील बंधनं वाढू लागली इनायत खान परिवाराने आपला पसारा तिथून आवरता घेणे इष्ट समजले.

ह्याच दरम्यान तिच्या जन्मानंतर जी स्थिती रशियात उद्‌भवली तशीच पॅरिसमध्ये निर्माण झाली. जर्मनांच्या हल्ल्यांमुळे हजारो लोक घरदारे सोडून बाहेर पडत होते. कसेबसे हे परिवारजनही लंडनला पोहोचले.

आता त्यांचा देश इग्लंड झाला. अधूनमधून पॅरिसला जाणे होई, पण बातम्या दु:खकारकच होत्या. जर्मन सैन्य आजूबाजूचा प्रदेश गिळंकृत करत चालले होते. भारतात स्वदेशी सरकार यावे यासाठी झगडा सुरू होत होता. नूर आता मोठी होत होती. राजकारण समजत होती. ती आणि तिच्या भावांना-विलायत आणि हिदायत दोघांना- असे वाटत होते की भारताने ब्रिटन संकटात असताना त्यांना मदत करावी आणि युद्धोत्तर ब्रिटन भारताला स्वातंत्र्य देईल. इनायत खान ह्यांच्या मृत्यूनंतर दोघा काकांनी कारभार हाती घेतला. ते इनायत खानप्रमाणे उदारमतवादी नव्हते. त्यामुळे नूर आणि धाकटी बहीण क्लारेसा यांच्यावर बधने येऊ लागली. नूरने आपले प्रेम दडवून ठेवले होते, पण तो सामान्य कुटुंबामधील आणि ही पीरजादी आहे हे नाते घरच्यांना मान्य नव्हते. तिने मित्राला-ज्याच्याशी तिने वाङनिश्चय केला होता, त्या गिल्डबर्गला - नाइलाजाने दूर सारले आणि सॉरबां विद्यापीठातून मानसशास्त्रात पदवी घेतली. ह्या दरम्यान तिचे वाद्यवादन आणि मुलांसाठी लेखन सुरू होते. तिने वीस जातक कथांचे पुस्तक लिहिले होते. त्या पुस्तकाचा तिने गूढ निरोप देण्यात वापर केला. बीबीसीवर तिच्या बालकथा प्रसारित झाल्या होत्या. मीरा आणि अकबर बादशाह हे तिच्या आवडीचे विषय होते. भगवद्‌गीतेचे अध्ययन तिने केले होते. त्यांच्या घरात तसे आध्यात्मिक वातावरण होते, पण काकांच्या राज्यात तिला काही परंपरावादी रितीचे पालन करावे लागत होते.

तिने भारतीय आणि ग्रीक मिथकांवर लेखन केले. कथा, लेख, नाटके लिहिली, पण आधुनिक जगात राहूनही तिला स्वत:चे प्रेम मिळवता आले नाही. घरच्यांच्या दडपणाखाली तिला नमावे लागले. त्यानंतर तिच्या आयुष्यात दोनदा प्रेम आले; पण घरच्यांच्या विरोधापुढे तिचे काही चालले नाही. प्रेम ह्या शब्दालाच ती बिचकू लागली. बाकी काहीही धाडस करू शकणारी नूर हे बंध नाकारत राहिली. आईला, काकांना दुखावणे तिला शक्य झाले नाही. लंडनमध्ये आल्यावर मात्र तिने युद्धप्रयत्नात भाग घ्यायचा निश्चय केला. त्यासाठी तिचे नाव आणि धर्म आड येऊ नये म्हणून तिने आपण ख्रिस्ती असल्याचे आणि चर्च ऑफ इंग्लडचे सदस्य असल्याचे सांगितले. हळूहळू तिला सैनिकी जीवनातील क्रौर्य कळू लागले होते. गेस्टापोचे निर्दय वागणे रोज कळत होतेच. ज्यू लोकांवरील अन्याय



नूर

आणि त्यांचे शिरकाण वाचून कुणाही सभ्य माणसाला चीड आल्याखेरिज राहत नव्हती. अशा दुष्ट शक्तींचा नि:पात करायचा म्हणजे सैन्यात भरती व्हायचे, रक्षण कार्यात सहभागी व्हायचे, एवढाच पर्याय होता. हातावर हात ठेवून बसून राहणे तिला मान्य नव्हते. तिने युद्धविषयक विविध विभागांत भरती करून घेणाऱ्या संस्थांकडे अर्ज करायला सुरुवात केली. अनेक कौशल्ये विकसित केली. धाकट्या बहिणीनेही युद्धकामात घेण्यासाठी परीक्षा देणे सुरू केले.

नूरने स्वीकारलेला पेशा अधिक धोकादायक होता. वेगवेगळ्या खात्यांत काम करून, प्रशिक्षण घेऊन तिने स्वत:ला सिद्ध केले. तिला कव्हर करायला माडलिनबरोबरच जेन मेरी रेनियर हेही नाव दिले होते. शक्यतो आपल्याला जे काम करायचे. निरोप द्यायचे; ते कुठेही लिहून ठेवायचे नाहीत तर पाठ करायचे. आपल्या सहकाऱ्याशीही कोड भाषेतच बोलायचे. ती विमेन्स ऑक्झिलरी एअर फोर्समध्ये रुजू झाले. तिला शत्रूचे संदेश फोडायाचे काम होते. ते ती यशस्वीपणे करत होती. दुसरे महायुद्ध हे अधिक रक्तलांछित होत चालले होते. सुफी अहिंसा पाळणे असंभव होते. पण, स्वत: हिंसा न करता शत्रूची हिंसा थांबवणे जे निव्वळ अशक्य होतं. मात्र देशसेवेचे व्रत घेतलेल्या ह्या स्त्रीला जे भोगावे लागले ते कल्पनातीत होते. आपण सारेच फक्त युद्ध कथांमधूनच हे वाचून आहोत वा सिनेमातून पाहून आहोत. काही काळ हे अचूकपणे सुरू होते, पण अखेर दगाफटका झालाच आणि ती पकडली गेली.

ती रात्र... ज्या रात्री नूर इनायत खानला हालहाल करून ठार केले गेले. त्याच रात्री स्वप्नात तिच्या आईने, भावांनी आणि इतरांनी तिला मिलिटरी पोशाखात चमचमत्या मेडलमध्ये पाहिले. ती हसतमुख होती. ती आता नोरा बेकर नावाची एक ब्रिटिश हेर होती. म्हणाली, 'मी आता सुटले.' त्यांना वाटले की ती आता घरी येईल. पण तसे होणार नव्हते. ती आता छळाच्या त्रासातून, हालातून सुटली होती. ती आणि तिच्या चार सहकारी हेर स्त्रियांच्या हातांत आणि पायांत बेड्या ठोकलेल्या होत्या. कडाक्याच्या अवस्थेत त्या पार गारठल्या होत्या. तिच्या गळ्यात 'अत्यंत धोकादायक' अशी पाटी होती. तिला एकांत कोठडीत डांबलेले होते. तिच्या तोंडून दबलेले रडू आणि सुस्कारे ऐकू येत होते. आणि दुसऱ्या सकाळी तिला गोळ्या घातल्या गेल्या. परंतु तिच्या तोंडून आपल्या संस्थेबद्दल ब्रही निघाला नाही. त्या वधस्थानी तीन हजार लोकांना ठार केले गेले होते.


तिच्याकडे काम होते मेसेज पाठवायचे. तिचे काम चोख होते पण बऱ्याचदा मेन ऑफिसमध्ये काही मेसेज शत्रू देशातील लोकांकडून फोडले जात. तर कधी अती श्रमाने थकलेले अधिकारी बदललेले पत्ते वा माहिती वेळेवर आपल्या हेरांना पाठवू शकत नसत.

ह्या पुस्तकाच्या लेखिकेने अत्यंत परीश्रम घेऊन हेरगिरी शिकवणाऱ्या अधिकाऱ्याकडून माहिती मिळवली आहे. त्यांच्या प्रशिक्षणात मुद्दामहून नूरचा चतुरपणा लपवून, ती फारशी तीक्ष्ण बुद्धीची नाही हे ठसवणे असे. या मागेही तिच्याकडे लक्ष जाऊ नये हेच उद्दिष्ट होते. संपूर्ण हेरगिरीचे जाळे कसे विणले जाते, आपल्या माणसांना सुरक्षा देण्याचे कसे प्रयत्न होतात. त्यांच्या राहण्याच्या जागा, तेथील माणसांशी व्यवहार, भाषांचे वैविध्य कसे राखले जाते, शत्रूला चकवायचे नानाविध प्रकार कसे हाताळले जातात, हे यात येते. अनेकदा हेराचे सारे जीवनच खोट्या नावानेच पुरे होते. त्यांना ओळख दाखवली जात नाही. सगळेच गुप्त असल्याने हे काम बहुधा जगासमोर येतच नाही. त्यांना बेनामच मरावे लागते. नूरचा पराक्रम आणि तिचे कर्तृत्व जगासमोर आणायचे श्रेय शरमनी बसूला जाते. नूरला प्रकाशात आणून लेखिकेने एका भारतीय राजकन्येचे अतुलनीय धैर्य आणि शौर्य जगासमोर आणले. नूर इनायत खानला फ्रान्सचा 'French Croix de Guerre' मिळाला नि जॉर्ज क्रॉसही मिळाला. दुसऱ्या महायुद्धानंतर भारतीय स्वातंत्र्ययुद्धात भाग घ्यायचे स्वप्न मात्र अधुरेच राहिले.

**– संजीवनी खेर**
sanjeevanikher@gmail.com

‖ग्रंथाली‖

**शिवगंधार** निर्मित
**संत बहेणाबाई शिऊरकर यांची अभंगवाणी**




**'तिनेच गगन झेलियेले'चे**
निर्मितिकथन
**योजना शिवानंद**
शब्दांकन
**ऋतुजा सावंत**

प्रस्तावना
**डॉ. सदानंद मोरे**

**मूल्य २०० रुपये ❖ सवलतीत १२० रुपये**
**टपालखर्च ३० रु.**



# बदलते बालविश्व

सुरेश वांदिले

मुलांचं भावविश्व बदलेलं असलं तरी त्यामुळे मुलांना आपल्या स्वविषयी काळजी अधिक वाटू लागली आहे. त्यांना त्यांच्या अस्तित्वाची लढाई कशी लढायची हे कळू लागलं आहे. या भावविश्वानं त्यांना अधिक जागरूक केलं आहे.

नुकतेच एका गुरुपोर्णिमेच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचा योग आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी पाच ते सहा वर्षं वयाच्या चिमुरडीच्या गायनाचा कार्यक्रम झाला. शास्त्रीय गाणं नुकतंच ती शिकू लागली असावी. तिला प्रोत्साहन देण्यासाठी तिच्या गुरूनं तिला या बडबड गायनास संधी दिली. कार्यक्रमाचा शेवट याच चिमुरडीच्या आईनं केला. शास्त्रीय गायनाची तिची बैठक बरीच पक्की झालेली दिसली. चिमुरडीचं गाणं झाल्यावर आणि आईचं गाणं सुरू होईपर्यंच्या काळात ती चिमुरडी, बालसुलभ अस्वस्थेतनं इकडून तिकडे, कधी इथे तर कधी तिथे, जात येत राहिली. कधी बाबांना तर कधी आईला, हे दे नि ते दे किंवा मग असंच काहीतरी. आलटून पालटून आईबाबा तिची बालसुलभ अस्वस्थता जमेल तसं घालवत राहिले. कधी डोळे वटारून तर काहीतरी खायला देऊन तर कधी एखादं वेगळं आमिष दाखवून. आईचं गाणं सुरू झालं, तेव्हा बाबांनी कॅमेरा हातात धरला नि गाणं रेकॉर्ड करायला सुरुवात केली. चिमुरडीची अस्वस्थता आपणास नीट रेकॉर्ड करू देणार नाही हे पक्कं ठाऊक असल्यानं बाबांनी तिला आधीच मोबाइल देऊन ठेवला होता. बाबा रेकॉर्ड करण्यात दंग, आई गाण्यात मग्न आणि चिमुरडी दूर एका कोपऱ्यात शांतपणे मोबाइलमध्ये गुंग! साधारण अर्धा तास आई गात होती. तेव्हा आपली आई अशी गाते की तशी गाते, ही बालसुलभ उत्सुकता अजिबात तिच्यात दिसत नव्हती. मोबाइलच्या गुंगीत ती छान रंगून गेली होती. बाबांचं रेकॉर्डिंग विनाव्यत्यय पार पडलं. आईचं गाणंही मोकळेपणानं झालं. एका मोबाइलनं तीन गोष्टी प्रभावीपणे साध्य केल्या.

मुलांच्या बदलत्या (भाव)विश्वात मोबाइलचं स्थान हे असं महत्त्वाचं ठरतंय किंवा ठरलंय. हे केवळ मुंबईतच घडतंय असं नव्हे तर तिकडे भंडारा किंवा गडचांदूरमध्ये याहून दुसरी काही स्थिती नाही.

युनेस्कोनं ऑगस्ट २०२३ मध्ये मोबाइल आणि मुलांवर होणारा परिणाम, यावरील त्यांचा नित्याच्या पद्धतीनुसार सखोल संशोधन आणि निष्कर्ष जगापुढे आणले. जागे व्हा, जागे व्हा, अन्यथा मुलांच्या बाबतीत बरंच काही घडेल, अशा आशयाचा हा निष्कर्ष! या, बरंच काहीच्या परिघात ९० टक्के भाग, मुलांचं वाईट होईल किंवा त्यांचं वाटोळं होईल, हेच अपेक्षित. आता, युनेस्को सांगते म्हणजे त्यात तथ्य असणार हे भारतीयांनी गृहीत धरलेलं असतं. त्यामुळे हा अहवाल येताच बालमनावरील मोबाइलचा परिणाम किंवा दुष्परिणाम यावर वृत्रपत्रांमधून अग्रलेखांचा रतीब पडला आणि इतर माध्यमांमधून चर्चा झाली. पूर्वी दोन टक्के वाचक आणि आता अर्धा टक्केच वाचक अग्रलेखाच्या वाटेनं जात असल्यानं, मुलांवर वाईट परिणाम घडवण्यास (युनेस्कोच्या मते) सक्षम ठरत असणाऱ्या मोबाइलवरील ही चर्चा अदखलपात्र ठरली. त्यामुळे मुलांच्या भावविश्वातून पुढील दोनशे वर्षं मोबाइल जाणार नाही याची निश्चिती झाली. यातील गमतीचा भाग सोडला तरी मुलांचं (भाव)विश्व आणि मोबाइल हे समिकरण फेविकॉल आणि चिकटपणा यांचा जो संबंध, तसाच झालाय, हे मान्य करावं लागतं.

### स्मार्ट प्रारंभ

मुलगा सहा महिन्याचा होतो न होतो तोच त्याच्या हातात आधी सर्वप्रथम खेळण्यातला मोबाइल जातो नि वर्षभरात तो खऱ्या मोबाइलशी खेळू लागतो. पुढच्या दोन वर्षात तो या मोबाइलसारखाच स्मार्ट बनतो. त्याचं कोडकौतुक आईबाबा, (असल्यास) आजी-आजोबा, शेजारी-पाजारी या सर्वांना वाटतं. माझा मुलगा स्मार्ट की तुमचा स्मार्ट, अशा अघोषित स्पर्धेत मग भारीभारीचे स्मार्टफोन मुलांच्या हातात येऊ लागतात. जेवताना-झोपताना मोबाइलचा खाऊ हाती असेल तर आईबाबा अगदीच निश्चिंत होतात नि हे मोबाइल फ्रेंडली बालक, त्याच्या पालकांना गुंतवून आणि गुंगवून टाकणाऱ्या ओटीटी प्लॅटफॉर्मवरील, लस्ट स्टोरी दर्शनात अजिबात (मांजरीसारखा) आडवा जात नाही.

सध्याच्या मुलांचं भावविश्व इतकं विस्तीर्ण आणि व्यापक करणाऱ्या मोबाइलचा जुन्या पिढीतील बालकांशी दुरान्वयेही संबंध नव्हता. त्यामुळे त्यांच्या भावविश्वात काय घडत असेल किंवा घडून गेलं असेल नि आताची मुलं, यांची तुलना होऊ शकत नाही.

आम्ही मामाच्या गावाला जात असू नि तिथे मग मामी, आम्हास शेतात नेत असे नि कणसं खात असू नि पक्ष्यांची गाणी ऐकत असू नि झुंजीमुंजीला ढवळ्या-पवळ्या या बैलजोडीच्या गाडीत रमत-गमत येत असू, मारुतीच्या पारावर थांबून चिंचा खात असू नि चिंचोके खात असू...या आठवणींना उमाळा देण्यात अर्थ नाही. तेव्हाच्या मुलांना या सगळ्या गोष्टी बघायला आणि अनुभवायला मिळाल्या म्हणून ते भाग्यवान आणि काय आताची पिढी? असा शिळ्या कढीला उत आणण्यात काही अर्थ नाही. तेव्हाच्या मुलांनी त्यांच्या अवतीभोवती जी परिस्थिती होती, त्यानुसार आपली कुवत आणि सामर्थ्य लक्षात घेऊन आपला जीवनप्रवास केला. किंवा आपआपल्या वकुबाप्रमाणे स्वत:ला घडवलं. काहींनी बिघडवलं.

आताची पिढी ही तिच्या अवतीभोवतीच्या परिस्थितीला स्वीकारण्याला प्राधान्य देते. पूर्वी बालकांच्या आसपास बरीच वर्षं आईबाबांसोबत काकाकाकू, मामामामी, आजीआजोबा, आत्या, ताई-दादा, असा बराच गोतावळा असे. ते त्याचं सरंक्षित कवचही होतं. सध्याच्या मुलांना असं कवच अभावानंच मिळतं. त्यामुळे त्यांचं संगोपन वगैरे नीट होत नाही असा निष्कर्ष काढणं गैर ठरतं. सुदैवानं असं रडगाणं गाणारे पालक दिवसेंदिवस कमी होत चाललेत हे सुचिन्ह मानावं लागेल. आहे ती परिस्थिती, जी सध्याच्या आर्थिक-सामाजिक-सांस्कृतिक किंवा अगदी पर्यावरणीय बदलांमुळे ती नव्या पालकांना गरज म्हणा किंवा रेटा म्हणा किंवा स्मार्टपणे म्हणा, स्वीकारावी लागते. सध्या प्रचंड गती आणि त्यामानानं वेळ कमी असल्यानं मुलांनासुद्धा ही परिस्थिती स्वीकारावी लागते. हा डोळसपणा किंवा याचा डोळा मोबाइल देतो. हे बऱ्याच अंशी सत्य आहे.

### पूर्वी आणि आता

पूर्वी मुलं काय करत होती? कशी वागत होती? काय खेळत होती? काय दंगामस्ती करत होती? असे प्रश्नसुद्धा गैरलागूच ठरतात. सध्याच्या मुलांच्या भावविश्वात वेगवेगळी आंदोलनं सुरू असतात. पूर्वी मुलं बहुश्रुत असत, अनेकांच्यात राहण्याची संधी मिळाल्यानं ते अधिक सामाजिक असत, संवेदनशील असत, असं सांगितलं आणि बोललं जातं. पण तेव्हाच्या आणि आताच्या जीवन जगण्याच्या आणि वागण्याच्या व्याख्या बदलेल्या आहेत. संवेदनशीलतेच्या आणि सामाजिकतेच्या व्याखा बदलेल्या आहेत. ही बाब स्वीकारायला हवी.

### कौशल्य हस्तगत करण्याची निकड

मुलांच्या बदलेलल्या भावविश्वात त्यांना लहानपणापासूनच स्पर्धात्मकता आणि अधिक दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारं कौशल्य हस्तगत करण्याची निकड भासू लागते. पूर्वीच्या पिढीला याची कदाचित फारशी गरज भासली नसेल. आईबाबा, मुलांना विविध कौशल्यनिर्मितीच्या आणि व्यक्तिमत्त्वविकासाच्या उपक्रमांमध्ये किंवा कार्यक्रमांमध्ये गुंतवून टाकून मुलांचं बालपण करपून टाकतात, असं गेल्या काही वर्षापासून बोललं जातं. पण यात कितपत वास्तव आहे याचा काही समाजशास्त्रीय किंवा सांख्यिकीय अभ्यास झालेला दिसत नाही. निष्कर्ष काढलेले दिसत नाहीत. एक सर्वसाधारण चालता चालता केलेली शेरेबाजी यापलीकडे अशा सांगण्याला काही अर्थ नसतो. जी मुलं 'श्यामची आई' वाचतात. त्यांचं बालपण सकारात्मक होतं आणि जी मुलं 'पॉपाय' किंवा इतर कार्टून शोमध्ये गुंतून राहतात त्यांचं नकारात्मक होतं, असं सरसकट म्हणणं मुलांवरचा अन्याय ठरतो.

तेव्हाच्या मुलांनी त्यांच्या परिस्थितीनुसार बालपणाचा आनंद घेतला. आजची मुलं त्यांच्या पद्धतीनं त्यांच्या बालपणाचा आनंद घेतात. शिवाय, श्यामची आई वाचून, संध्याकाळी, शुंभकरोती म्हणून आणि आजीनं सांगितलेल्या रामायण-महाभारताच्या गोष्टी ऐकून तेव्हाची पिढी संस्कारक्षम

झाली म्हणजे नेमकी काय झाली, याचा शोध घ्यायला हवा. ही संस्कारित पिढी पुढे आयुष्यात कधीच खोटी बोलली नाही, त्यांनी भ्रष्ट आचरण केलं नाही, करचुकवेगिरी केली नाही की लपवाछपवी केली नाही? अभक्ष्य भक्षण केलं नाही की अपेयपान केलं नाही, स्त्रियांकडे वाईट नजरेनं बघितलं नाही, वाकडं पाऊल टाकलं नाही, याचे किती पुरावे, तेव्हा बालपण करपलं नाही, असा सिद्धांत मांडणारी मंडळी देऊ शकतात? या उलट परिस्थिती आहे. पूर्वीच्या पिढीतील संस्कारित बालकं वयस्क झाली तेव्हा आपोआपच बहुतेक संस्कार सोई-सोईचे झाले. मंगळवारी सिद्धिविनायकाच्या दर्शनासाठी रांगा लावण्यातला उत्साह त्यांना दागिना वाटू लागला. तेव्हा संस्काराचा आणि मुलांच्या भावविश्वाचा फार संबंध नाही.

**बदलते विश्व**

मुलांचं भावविश्व निश्चितपणे बदलेलं आहे, हे तर खरंच आहे, पण त्याचं स्वरूप सरसकट वाईटच आहे, असं म्हणणं ही आपली फसवणूक. मुलांच्या बदलत्या भावविश्वात त्यांना त्यांची स्वप्नं अधिक लवकर कळू लागतात. स्पर्धा कळू लागते. स्पर्धेत धावण्याची मानसिक, बौद्धिक आणि शारीरिक क्षमता प्राप्त करण्याकडे कल वाढतो. शिवाय ठामपणा येतो. काही जणांकडे उद्दामपणा येत असेल. ते प्रत्येक काळातच होत होतं. आताची मुलं त्याला काही अपवाद ठरू शकत नाही.

आजच्या मुलांच्या भावविश्वात वाचनाला फार स्थान नाही, असा एक सिद्धांत मांडला जातो. पूर्वीच्या पिढीतली मुलं वाचनाचा छंद जोपासत, वाचनालयात जात, घरी पुस्तकं आणत, त्यांचे बाबा आर्थिक चणचणीतही एखादंदुसरं पुस्तकं विकत आणून देत, हे कायम सांगितलं जातं. त्यात बऱ्याच प्रमाणात तथ्यही असलं तरी मराठी माणसांना वाचनाचं प्रचंड प्रेमबिम होतं असं सिद्ध करणारं कोणतंही संशोधन नाही. तेव्हा पुस्तकाच्या आवृत्त्यावर आवृत्त्या निघायच्या, पुस्तकं घेण्यासाठी मराठी माणूस दुकानासमोर रांगा लावायचा, असं काही गेल्या पन्नास वर्षांत घडलेलं नाही. चंद्रपूरसारख्या मोठ्या शहरात पन्नास वर्षांपूर्वी पुस्तकांचं एकही दुकान नव्हतं, तशीच परिस्थिती आजही आहे. नागपुरात पन्नास वर्षांपूर्वी चार दुकानं होती, आताही तीच स्थिती आहे. एवढ्या मोठ्या आणि मराठी अस्मितेचा जप करणाऱ्या सर्वाधिक मुंबईत तर पुस्तकांची दुकानं गेल्या पन्नास वर्षांत पंजावर मोजण्याइतकी झाली आहेत. त्यामुळे तेव्हाच्या मुलांनी खूप पुस्तकं वाचली आणि आताच्या मुलांच्या भावविश्वात पुस्तकांना स्थानच नाही ही एक लोणकढी थाप ठरते. तेव्हा, पुस्तकांच्या ओढ्याची खूप वैभवशाली मराठी परंपरा आहे, असं म्हणणं ही आपली दुसरी फसवणूक. महाराष्ट्रातील मराठी मुलं कदाचित पुस्तकं वाचत नसतील पण महाराष्ट्रात राहणारी इतर मुलं इंग्रजी पुस्तकांवर उड्या मारतात. हॅरी पॉटरच्या भारतीय आवृत्तीला घेण्यासाठी मुलांनी रांगा लावल्याचा इतिहास फार जुना नाही. तरी हे उदाहारण जुनंच झालं. त्यानंतरही मुलांचं इतर साहित्यं याच मुलांनी आवडीनं वाचलं आहे.

**आहारी कसे?**

आजची बालकं मोबाइलच्या आहारी गेल्याचा जप करताना आपण हे विसतो की हीच बालकं सध्या पर्यावरणाचं संरक्षण आणि निर्सगाचं संतुलन याविषयी सर्वाधिक जागरूक आहेत. जगातील मुलांमध्ये पसरलेली पर्यावरणीय संवर्धनाची चळवळ ही या डिजिटल माध्यमांमुळेच शक्य झाली. पृथ्वीला का वाचवलं पाहिजे? यावर ही मुलं पोटतिडकीने लिहितात आणि वाचतातसुद्धा.

सर्व मोठी माणसं पर्यावरणाचं जमेल तितकं वाटोळं करायला निघाली असताना ही मुलं मात्र जगभरात, स्वत:च्या क्षमतेवर पर्यावरण संरक्षणाचा लढा उभारताना यशस्वी होताहेत. ग्रेटा थनबर्ग ही मुलगी या सर्वांचा आदर्श ठरलीय. ऑगस्ट (२०२३) मध्ये एका मोठ्या कार्यक्रमात सहभागी होण्यास ग्रेटाताईंनी चक्क नकार दिला. त्याचं कारण होतं, त्या कार्यक्रमाचं प्रायोजकत्व, एका कोळसा खाणमालकाचं असणं. पर्यावरणाची हानी करण्यात कोळसाखाणीतून अत्यंत अंदाधुंद पद्धतीनं चाललेला कोळशाचा उपसा कारणीभूत ठरतोय. अशा या व्यक्तीला पर्यावरणसंवर्धनाच्या कार्यक्रमात सहभागी कसं करून घेता, असा प्रश्न उपस्थित करून ग्रेटाताईंनी संवदेनशीलतेचा वेगळाच परिचय दिला. तर तिकडे ऑस्ट्रेलियात कोळसाखाणीच्या काळ्या धंद्यात अडकलेल्या एका मंत्र्याच्या विरोधात, अंजली शर्मा ही मुलगी चक्क न्यायालयात गेली.

सध्याच्या मुलांच्या हातात मोबाइल आहे, टॅब आहे, आयफोन आहे, लॅपटॉप आहे, यावर त्यांचं अनंत विषयावरचं वाचन सुरू असतं. सेक्सपासून युनिर्व्हसपर्यंत अनेक विषयांत स्वत:च्या आवडीनिवडी, क्षमता, बुध्यांक, सहनशीलता, संयम यानुसार त्यांचा संचार सुरु असतो. या मुलांच्या भावविश्वाला तंत्रज्ञानानं वेढलं आहे. हे वास्तव स्वीकारावंच लागेल. परंतु हे सगळं त्याच्या मुळाशी येईल, किंवा त्याचं काय होईल, त्याची भविष्यवेधी चिंता करण्यात हशील नाही.

हे जगच यापुढे अधिकाधिक तंत्रज्ञानावर चालणार आहे. एलॉन मस्कसारख्या भविष्यवेधी उद्योजकानं अशी केवळ शक्यताच वर्तवली नाही तर अगदी मानवाच्या बरोबरीनं किंवा सहकारी म्हणून काम करू शकणाऱ्या ए-आय (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स-कृत्रिम बुद्धिमत्ता) आधारित रोबोमॅन/वुमनची निर्मितीसुद्धा प्रारंभ केली आहे. या तांत्रिक सहकाऱ्यांना, त्यांचं त्यांचं शिकता यावं यासाठीची डीप लर्निंग, ही शाखा वेगानं विकसित होऊ घातलीय.

या तंत्रज्ञानानं वेढलेल्या जगात आजच्या मुलांना राहायचंय आणि त्याला उत्तम जीवन जगायचं आहे. त्यामुळे त्यांच्या भावविश्वातील तंत्रज्ञानाकडे ज्येष्ठांनी सकारात्मकतेनं बघायला हवं. या तंत्रज्ञामुळे मुलं शुष्क होतील. जीवनाचा आनंद घालवून बसतील, त्यांना कलेचा मनस्वी आनंद घेता येणार नाही, सर्जनशीलता संपुष्टात येईल, असा निष्कर्ष काढण्यासाठी कोणताही आधार नाही.

**प्रगतीची प्रेरणा**

नवं तंत्रज्ञान आणि त्यावरची त्याची हुकूमत ही या मुलांना भविष्यात आणखी प्रगती करण्यासाठी प्रेरणा देणारी ठरेल. त्याची सर्जनशीलता पृथ्वीच्या पलीकडे काय, हे बघण्यात अडकून पडणार नाही. ब्रह्मांडाच्या पलीकडे काय, हे आताच त्याला खुणावू लागलंय. याविषयीच्या प्रयोगांनी घेतलेली गती विस्मयकारक आहे. त्याची सर्जनशीलता आणि ए-आययुक्त यंत्रमानव यांच्या युतीतून नवं जगसुद्धा निर्माण होऊ शकेल.

मुलांकडे लक्ष द्यायला वेगवेगळ्या वस्तुनिष्ठ कारणांनी पालकांना वेळ नाही. आप्तेष्टांना काही देणंघेणं नाही. अशा स्थितीत तंत्रज्ञानाचा आधार घेत स्वत:ला उत्क्रांत करण्याची सक्षमता मुलं, त्यांच्या आणि पालकांच्याही नकळत प्राप्त करू लागले आहेत. डार्विनच्या उत्क्रांतीच्या सिद्धांताशी हे सुसंगत ठरतं आणि त्याच्या सिद्धांताला भक्कम आधारही देतं. आपण सदासर्वकाळ वाईट कशासाठी चिंतायचं?

मुलांच्या हातात कायम मोबाइल असतो म्हणजे ते सदासर्वकाळ अश्लिल गोष्टी बघत असतात, असं समजणं तर्काला धरून नाही. काही मुलं तसं करतही असतील, पण सरसकट सर्वांना तो न्याय लावणं योग्य नाही. हातात मोबाइल आणि त्यातला गुगल बाबा नसताना, तेव्हाच्या बऱ्याच तथाकथित असंस्कारित मुलांसोबत संस्कारित मुलं(सुद्धा) चोरूनलपून ब्ल्यू फिल्म बघत, पिवळी पुस्तकं आवडीनं वाचत, डेबोनेर कुठे मिळतो, याचा शोध घेतच होती. मुलांचं एका विशिष्ट वयातलं कुतूहल आणि काही अंशी गरज ही पिढ्यान पिढ्या तशीच राहिली आहे. तेव्हाची मुलं हे सगळं केल्यावर अपराधगंडात जायची. मोकळेपणा घालवून बसायची. आजच्या मुलांना याचा फार अपराधगंड किंवा न्यूनता वाटत नाही. मुला-मुलींमध्ये बरीच मोकळीक असते. लैंगिकतेचा बाऊ करण्यात आपला बराच काळ खर्ची गेला. आजच्या मुलांमध्ये अपवाद वगळता तसं होत नाही. डिजिटल माध्यमांमधून लैंगिक बाबींचा मोठाच मारा होतो म्हणून मुलं-मुली सदैव मिठ्या मारायला आणि मुके घ्यायला उत्सुक असतात असं नाही.

मुलांचं भावविश्व बदलेलं असलं तरी त्यामुळे मुलांना आपल्या स्वविषयी काळजी अधिक वाटू लागली आहे. त्यांना त्यांच्या अस्तिवाची लढाई कशी लढायची हे कळू लागलं आहे. या भावविश्वानं त्यांना अधिक जागरूक केलं आहे. ही जागरुकता स्वत:विषयीची असली तरी ती गेल्या पिढीतील मुलांपेक्षा अधिक टोकदार आणि स्पष्ट आहे. बहुतांश मुलांच्या मनात पुढे काय करायचंय याचा गोंधळ नाही. अभ्यासाचा गोंधळ नाही. आपल्या भावविश्वात डोकवायला पालकांना वेळ नाही, ही वस्तुस्थिती त्याने स्वीकारायला सुरुवात केली आहे. आसपास आईबाबा सतत नाहीत म्हणून तो गेल्या पिढीतील मुलांसारखा भोकाड पसरत नाही किंवा कावराबावरा होत नाही. त्याला लहान वयातच पैसे खर्च करण्याचं कळतं. पैसे कमावण्याचा अर्थ कळतो. बरीच मुलं उधळपट्टीचा अर्थही समजू लागली आहेत. सध्याच्या मुलांच्या भावविश्वाला तंत्रज्ञानानं एक खंबीरता आणि स्थैर्यसुद्धा मिळवून दिलं आहे. ते पालकांना किंवा समाजाला कळलं पाहिजे.

मुलांकडे बघण्याची दृष्टी निकोप असायला हवी. दिवसरात्र मोबाइलमध्ये मग्न असणाऱ्या एखादा मुलाचा हाच नेमका प्रश्न आहे, की दुसराच कोणता प्रश्न आहे, हे समजून घेणं गरजेचं आहे. त्यासाठी थोडा वेळ पालकांनी काढायला हवा. या थोड्यावेळातूनसुद्धा मुलांच्या भावविश्वातील नेमका भाव लक्षात येऊ शकतो. आजच्या मुलांचं बालपण करपलं वगैरे नसल्याचं लक्षात येऊ शकतं. ते आजच्या बालकाला परवडणारं नाही. ही जाणीव कदाचित या वयात नसेलही, पण यापुढे त्याला स्वत:शी, सोबतच्या मुलाशी आणि ए-आययुक्त यंत्रमानवाशी स्पर्धा करायची आहे, हे पक्कं लक्षात आल्याचं लक्षात येईल. इतक्या लहान वयात ही जाणीव होणाऱ्या या चिमुकल्यांचं कौतुकही आपणास वाटू लागेल.

**– सुरेश वांदिले**
ekank@hotmail.com



# कुठे होतो आणि कुठे आलो

अनुराधा ठाकूर

> दरडोई उत्पन्नात आपला नंबर आज जगात १३९ वा आहे. आपण श्रीलंका, पॅलेस्टाईन, अंगोला अशा गरीब देशांपेक्षाही गरीब आहोत. हे कसे शक्य आहे? याचे कारण आर्थिक विषमता. देशाच्या साऱ्या उत्पन्नातून अंबानी, अदानी आणि अशा मोठ्या उद्योगपतींचे उत्पन्न वजा केले तर जो आकडा येईल तो धक्कादायक असेल. मासिक पंधरा हजार रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्यांची टक्केवारी एकूण लोकसंख्येच्या सत्तर टक्क्यांच्या आसपास असेल.

इसवी सन १९९१ ते २०२३ हा आपला प्रवास मोठा रोमहर्षक आहे. एक ग्राहक म्हणून आपल्या आयुष्यात या तीन दशकांत जेवढे बदल झाले, तेवढे इतिहासात पूर्वी कधीही झाले नव्हते. मी वाचकांना नवीन काही सांगत नाहीये, पण आज आपण कितीतरी गोष्टी गृहीत धरतो, की ज्या तीस वर्षांपूर्वी केवळ अशक्य वाटल्या असत्या. त्याचाच मागोवा घेण्याचा हा एक प्रयत्न.

या काळाचे स्थूलमानाने दोन भाग पाडता येतील– १९९१ ते २००५ ह्या काळाला उदारीकरणाचा कालखंड म्हणता येईल. दुसरा, २००५ ते २०२३ हा कालखंड आहे तंत्रज्ञानाचा.

जरा आठवा १९९१च्याआधीचा काळ. सर्व वस्तू भारतीय कंपन्यांनी उत्पादित केलेल्या असायच्या. ग्राहक म्हणून आपला चॉईस अगदी मर्यादित असायचा. फोनसाठी वर्षानुवर्षे थांबावे लागे. ओवायटीमध्ये (ओन युवर टेलिफोन) ५००० रुपये भरले की सहा महिन्यांनी फोन मिळायचा. ही रक्कमही त्या काळी मोठी होती. गाडी घ्यायची तर फियाट, अँबेसेडर वा स्टँडर्ड हेरॉल्ड असे तीनच पर्याय. त्यात फियाटची प्रीमियर पद्मिनी अगदी प्रेस्टिज समजली जाई. माणसाकडे चार फकार – फ्लॅट, फ्रिज फोन आणि फियाट– असले की तो श्रीमंत समजला जायचा. टीव्ही तर फक्त ब्लॅक अ‍ॅण्ड व्हाइट असत. आमच्याकडे पहिला सोनी ट्रिनित्रोन आला तो एका पायलटकडून विकत घेतलेला, त्याचे लायसेन्स आपल्या नावावर ट्रान्सफर करून घ्यावे लागे. प्रत्येक गोष्टीसाठी एवढी यातायात, की तिची फारच अपूर्वाई वाटे.

आजच्या मुलांना या गोष्टी सांगितल्या, तर ती वेड्यात काढतील आपल्याला.

हे सारे प्रथम बदलले ते १९९१ पासून. त्या वेळेस आपला देश दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभा होता. पंधरा दिवसांचे पेट्रोल आंतरराष्ट्रीय बाजारात विकत घेण्यासाठी पुरेल इतकेही परदेशी चलन आपल्याकडे नव्हते. आपले सोने आयएमएफकडे गहाण ठेवावे लागले होते.

अशा वेळी आपला देश दोन व्यक्तींनी वाचवला, ज्यांची आठवण सारे राजकारणी सोयीस्करपणे विसरले आहेत. एक, पंतप्रधान नरसिंह राव, जे धोरणी राज्यकर्ते होते, आणि डॉक्टर मनमोहनसिंग, जे अर्थमंत्री होते. अत्यंत विद्वान व अनुभवी व्यक्ती. त्यांना आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये कामाचा अनुभव होता. त्यांना राव यांनी पूर्ण निर्णयस्वातंत्र्य दिले. या परिस्थतीतून देशाला बाहेर काढण्यास व त्यासाठी वर्ल्ड बँकेकडून पैसे उभे करण्यास काही कलमांचा करार करावा लागला. त्यानुसार जी धोरणे अमलात आणावी लागली, त्याला उदारीकरण (लिबरलायझेशन) म्हटले जाते. आपल्या आयुष्यातील १९९१ ते २००५ या काळात जे बदल झाले, ते बरेचसे या उदारीकरणामुळे झाले.

लायसेन्स राज संपुष्टात आले. परदेशी कंपन्यांना भारतीय कंपन्यांशी जॉइंट व्हेंचर करून भारतात शिरकाव करण्यास काही क्षेत्रांत परवानगी त्या पूर्वीच दिली गेली होती – १९८५च्या सुमारास. कोणताही धंदा, फॅक्टरी सुरू करण्यास शेकडो परवाने लागत असत. ते देणाऱ्या प्रत्येकाला भरपूर खिरापत वाटावी लागे. या परवान्यांच्या संख्येत सरकारने लक्षणीय घट केली, त्यामुळे लाच घेण्यालाही थोडाफार पायबंद बसला.

सर्वात महत्त्वाची सुधारणा ही की खाजगी कंपन्यांना भांडवल उभे करण्यावर व उत्पादनाच्या बाबत जे कडक निर्बंध होते, ते सरकारने उठवले. याचा मोठाच सकारात्मक परिणाम असा झाला की मोठ्या आणि लहान उद्योजकांना प्रथमच असे स्वातंत्र्य मिळाले. त्यामुळे त्यांनी भांडवली बाजारात भरपूर पैसा उभा केला आणि उत्पादन अनेक पटींनी वाढवले, तसेच नवनवीन संकल्पनाद्वारे नव्या वस्तू बाजारात आणल्या. ग्राहकाला हे सारे नावीन्य आवडले आणि मास मार्केट, मास प्रॉडक्शन असा सिलसिला सुरू झाला. जसजशी स्पर्धा वाढली तसतसा उत्पादनांचा दर्जा सुधारू लागला.

आणखी एक सुधारणा होती आयात कर (import duty) आणि अबकारी कर (excise duty) यांचे सुसूत्रीकरण (rationalization). हे कर खूप कमी केले गेले. त्यामुळे वस्तू स्वस्त झाल्या. उद्योगांचा आयकर ५०-५२ टक्के असे, तो कमी करत करत आता २५ टक्क्यांवर आला आहे. एक प्रकारे करामध्ये जाणारा पैसा आता उद्योजक नव्या संशोधनासाठी, नवी यंत्रसामग्री घेण्यासाठी वापरू लागले.

हा एक प्रकारचा संपूर्ण उद्योगजगताला ढवळून टाकणारा काळ होता. वाढते उत्पादन, वाढते रोजगार, वाढती क्रयशक्ती आणि आणखी वाढते उत्पादन असे हे गुणवत्तेचे वर्तुळ (virtuous circle) होते. प्रत्येक देशाच्या इतिहासात असा काळ येतो, भारतात तो त्या मानाने उशिरा का होईना, पण आला.

किर्लोस्करने टोयोटाशी, महिंद्रने प्यूजोशी, डीसी एमने दायवूशी करार केले ते याच काळातले. हळूहळू आपल्याकडे परदेशी गाड्या दिसू लागल्या. त्या जास्त आकर्षक आणि कार्यक्षम होत्या. फ्रिज, रंगीत टीव्ही, वॉशिंग मशीन या साऱ्याळत आपल्याला अनेक पर्याय उपलब्ध झाले.

या साऱ्याचा परिणाम असा झाला की ग्राहकाला चॉईस मिळू लागला. स्पर्धा आली आणि ग्राहक राजा झाला. याच काळात खाजगी क्षेत्र बँकांना खुले झाले. तोपर्यंत फार जुन्या खाजगी बँका- देना बँक, कॅनरा बँक अशा होत्या. पण १९६९ साली श्रीमती इंदिरा गांधी यांनी बऱ्याच बँकांचे राष्ट्रीयीकरण केले, त्यांचे वर्चस्व सर्व क्षेत्रात होते. १९९१ ते १९९६ या काळात अनेक बँका खाजगी क्षेत्रात उदयाला आल्या- एचडीएफसी बँक, ग्लोबल ट्रस्ट (ही २००४ मध्ये ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्समध्ये विलीन झाली), आयसीआयसीआय बँक, इंडसइन्ड बँक, बीसीसीआय बँक (ही पुढे बुडीत निघाली) या त्याच काळातल्या. या बँकांकडे पुरेसे भांडवल होते, सरकारी अंकुश व हस्तक्षेप फारसा नव्हता. अद्ययावत तंत्रज्ञान होते. त्यांनी भरपूर पगार देऊन सरकारी बँकांतले उत्तम कार्यक्षम अधिकारी स्वतःकडे ओढले. ज्यांची जोखीम पत्करायची तयारी होती ते या काळात नव्या बँकांत गेले व त्यांनी या बँका भराभर वाढवल्या. ग्राहकांना या बँका त्यांच्या कार्यपद्धती आणि ग्राहकाभिमुखता यामुळे आवडू लागल्या.

उदारीकरणाच्या बाबतीत आपण इतर देशांच्या तुलनेत मागे पडलो. चीन आणि काही छोटे आशियाई देश आपल्यापुढे केव्हाच गेले होते.

मात्र तंत्रज्ञानाबाबत उलटे घडले. आपण इथेही इतर देशांच्या तुलनेत मागेच होतो, पण काही वेळा विलंबाचा फायदा (late mover advantage) मिळतो. आपल्याकडे जे आले ते सारे विकसित स्वरूपातच आले. त्यामुळे आपण उशिरा सुरुवात करूनही इतरांच्या मागे पडलो नाही.

उलट यूपीआय (Universal payment interface) हे तंत्रज्ञान आपण इतक्या मोठ्या स्तरावर राबवले आहे, की जगभर त्याची दखल घेतली जात आहे. एवढी प्रचंड लोकसंख्या, सारे काही खूप मोठ्या प्रमाणात केले जाते. या बाबतीत आता काही विकसनशील देश आपल्याकडून शिकत आहेत.

आता आपण २००५ ते २०२३ या कालखंडाकडे वळूया. आपल्याला असे जाणवते की या काळात माहिती आणि तंत्रज्ञान यांनी आपल्या आयुष्याचा कब्जा घेतला आहे आणि ही पकड दिवसेंदिवस जास्तच घट्ट होत चालली आहे.

आपण आता सारी ॲप गृहीत धरतो, पण ही कधी आणि कुठे आली याचा थोडक्यात इतिहास –

तसे पाहिले तर पहिला सेल फोन १९७३ मध्ये मोटोरोला कंपनीने आणला. याचा टॉक टाइम ३० मिनिटे होता आणि बॅटरी पूर्ण चार्ज व्हायला दहा तास लागायचे. (आज हे हास्यास्पद वाटते.)

१९८७ पर्यंत जीएसएम ॲनालॉग तत्त्वावर चालायचे, त्या वर्षी डिजिटल तत्त्वाचा वापर सुरू झाला. व तांत्रिक क्रांतीची सुरुवात झाली.

सॅमसंगचा पहिला फोन १९८८ मध्ये साऊथ कोरियात बनवला गेला, तिथून मेसेजिंगची सुरुवात झाली.

फिनलंड या देशात १९९१मध्ये प्रथम २ जी नेटवर्क आले. 'नोकिया' हा त्याचाच फोन १९९२मध्ये तिथे आला, भारतात यायला त्याला २००२ उजडावे लागले. त्याचे ७६५० हे मॉडेल आपणा सर्वांच्या हातात असायचे.

पहिला स्मार्ट फोन १९९४ मध्ये आला, टच स्क्रीन असलेला. टच स्क्रीनमुळे जराही बोटाचा दाब न देता अत्यंत हलक्या हाताने फोन वापरता येऊ लागला, त्यामुळे सारा वेग झपाट्याने वाढला.

१९९६ मध्ये आलेल्या नोकियाने प्रथमच ईमेल, वर्ड प्रोसेसिंग, स्प्रेडशीट, नोट्स, अशा उद्योगधंद्याला उपयुक्त असलेल्या अनेक सोयी आणल्या, व त्यामुळे तो फार लोकप्रिय झाला.

१९९८मध्ये पहिला रंगीत फोन आला. २००१-०२मध्ये आलेल्या नोकियात जीपीआरएस, एफएम रेडिओ आणि कॅलेंडर फोनमध्ये आले.

त्यानंतर एरिक्स्नचा टी-३६ हा फोन २००० साली आला आणि पहिल्यांदा कॉन्टॅक्ट, फाईल आणि फोटो पाठवता आणि रिसिव्ह करता येऊ लागले. भारतात तो २००८ मध्ये आला.

3जी प्रथम जपानमध्ये २००१मध्ये आले, यात ईमेल आणि इंटरनेट होते. ब्रॉडबँड हा मोठा टप्पा होता. हा काळ ब्लॅकबेरीने गाजवला. सरकारी व कॉर्पोरेट क्षेत्रात सारे तो सेलफोन वापरू लागले.

सर्वात मोठी क्रांती झाली २००७मध्ये, आयफोनने अमेरिकेत पाय रोवले. अतिशय सुंदर डिस्प्ले, टच, आणि सोपी व आकर्षक कार्यपद्धती यामुळे तो साऱ्यांच्या गळ्यातला (अक्षरशः) ताईत बनला.

२००८मध्ये अँड्रॉइड ही प्रणाली आली. सर्वत्र या प्रणालीचा स्वीकार होईपर्यंत २०१५ उजाडले. ही प्रणाली गूगलने विकत घेतली.

साधारण याच काळात 4जी नेटवर्क नॉर्वे आणि स्वीडनमध्ये आले. त्याच सुमारास सॅमसंगने गॅलेक्सी ही फोनची रेंज बाजारात आणली, तिच्या अनेक आवृत्त्या त्यानंतर आल्या व फार लोकप्रिय झाल्या. तेव्हाच गूगल मॅपसुद्धा आले. पुढील काही वर्षांत आपल्याकडे जिओने 4जी नेटवर्क आणले. मोबाइल डाटा वर फोकस करून जिओ ने ते अत्यंत कमी किमतीत विकायला सुरुवात केली आणि मग भारतात प्राइस वॉर सुरू झाले.

आता दर वर्षी नवनवी ॲप येताहेत, कॅमेऱ्यांची संख्या वाढतेय, स्पीड आणि मेमरी वाढतेय. गेमिंग वाढतेय. नजीकच्या भविष्यकाळात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) विकसित होऊन, यासारख्या तंत्रज्ञानाचा वापर वाढणार आहे.

आज आपण स्मार्ट फोनशिवाय आयुष्य ही कल्पनाच करू शकत नाही. किती गोष्टी या एवढ्याशा फोनमध्ये आल्या! आणि त्याही किती कमी खर्चात! भारत हा सर्व जगात स्वस्त देश आहे या बाबतीत.

एकमेकाला कॉल करून तासन्‌तास गप्पा मारणे, मेसेज पाठवणे, फोटो पाठवणे हे व्यक्तिगत होतेच, व्हॉट्सॲपवर अनेक ग्रुपही असतात. प्रत्येक सणाला, वाढदिवसाला सदिच्छांचा पाऊस पडतो. शिवाय अनेक विनोद, ताज्या बातम्या आहेतच. अहो, चांद्रयान चंद्राच्या दक्षिण भागाला टेकले तो सुवर्णक्षणही प्रत्येकाने, जिथे होता तिथे मोबाइलवर अनुभवला, अगदी प्रत्यक्ष!

कॅलेंडर त्यातच, डायरी नोट त्यातच, घड्याळ, गजर त्यातच. अमेझॉन किंवा मिंत्रावर खरेदी करायची तर त्यातच, हॉटेल बुकिंग करा, विमानाची-ट्रेनची तिकिटे काढा, सिनेमा-नाटकाची तिकिटे काढा, ड्रायव्हर कट्ट्यावरून ड्रायव्हरला हवे तेव्हा बोलवा, उबरला बोलवा!

माहिती हवी आहे? गूगल क्रोमला विचारा. अगदी वसंत प्रभूंची गाणी, सेप्टिलिन (septilin) हे औषध कशावर आहे, डोस किती, विमान वेळेवर आहे का, त्याला ट्रॅकपण करता येते. व्हॉट्सॲप व्हिडिओ कॉलमध्ये आपण घेतलेली साडी मुलीला दाखवता येते, ती आपल्याला तिकडे फॉलचे रम्य रंग दाखवते.

काय काय म्हणून हा छोटासा फोन करत नाही?

आपण बँकिंगकडे पाहिले, तर आठवेल एक तारखेनंतरची कॅश काढण्यासाठी लागणारी लांब रांग, वादावादी, चिडचिड. २००० साली आम्ही बँकेत सर्वत्र एटीएम बसवण्यात आणि लोकांना ती वापरायला शिकवण्यात मग्न होतो. माझ्याकडे तेव्हा गोवा आणि महाराष्ट्राचा काही भाग होता. लोकांना नवीन काही आले की भीती वाटते, त्यात हा तर पैशांचा मामला! मी मग एक माणूस महिन्याच्या १ ते १० तारखेपर्यंत एटीएममध्येच नेमत असे, तो लोकांना पैसे कसे काढायचे ते शिकवायचा. परिणाम असा झाला की ज्याला १ ते १० आकडे मोजत येतात, असा खेड्यातला माणूसही एटीएम वापरू लागला. बँकेतल्या रांगा खूप कमी झाल्या.

आता तर आपण बँकेत क्वचित जातो. खात्याचे स्टेटमेंट इंटरनेट बँकिंगमुळे घरबसल्या मिळते, ते आपल्या सीएला ईमेल वर पाठवता येते. एका बँकेतून दुसऱ्या बँकेत

पैसे पाठवता येतात. फिरायला जातो तेव्हा पैसे काढता येतात, चेक भरता येतो. अगदी मध्यरात्रीसुद्धा पैसे काढू शकतो.

क्रेडिट कार्डामुळे फार पैसे जवळही बाळगायला नकोत. लाखो रुपयांचे हॉस्पिटल बिल आले तरी तिथल्या तिथे भरायची सोय.

या साऱ्या सुविधा केवळ तंत्रज्ञानामुळे शक्य झाल्या. आपण नियम काळजीपूर्वक पाळले आणि पासवर्डबाबत गुप्तता पाळली तर हे सारे व्यवहार पूर्ण सुरक्षित असतात.

लेखाच्या सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे १९९१ ते २०२३ या कालखंडात झालेल्या बदलांचा आवाका एवढा व्यापक आहे की त्यावर एक पुस्तकच लिहावे लागेल. इथे एक ग्राहक म्हणून या बदलाकडे पाहण्याचा प्रयत्न केला आहे, एवढेच! पण हे सारे वाचून आपल्याला असे वाटत असेल, की वा! आता आपण अमेरिका किंवा युरोपीय देशांच्या बरोबरीला आलो, तर ती मोठी चूक ठरेल. पुढील आकडेवारीकडे नजर टाकली तर काय दिसते?

उदारीकरणाचा एक मोठा फायदा म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नात जबरदस्त वाढ. भारताचे ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट– देशाचे त्या वर्षीचे पूर्ण उत्पन्न– १९९१ मध्ये २६६ बिलियन अमेरिकन डॉलर होते. २०२२मध्ये ते ३५०० ट्रिलियन अमेरिकन डॉलर एवढे वाढले आहे.

जागतिक पातळीवर सकल राष्ट्रीय उत्पन्नात आपला नंबर १९४७ साली सहावा होता. त्यानंतरच्या निर्बंधांमुळे तो १९९१ मध्ये बारावर घसरला होता. तेव्हाच्या उदारीकरणामुळे तो २०२२ मध्ये पाचवर आला आहे.

वरवर पाहता ही फार अभिमानाची बाब आहे, पण हा अभिमानाचा फुगा फुटला आहे तो दरडोई उत्पन्नात! आश्चर्य वाटेल तुम्हाला, पण दरडोई उत्पन्नात आपला नंबर आज जगात १३९ वा आहे. आपण श्रीलंका, पॅलेस्टाईन, अंगोला अशा गरीब देशांपेक्षाही गरीब आहोत. हे कसे शक्य आहे? याचे कारण आर्थिक विषमता. देशाच्या साऱ्या उत्पन्नातून अंबानी, अदानी आणि अशा मोठ्या उद्योगपतींचे उत्पन्न वजा केले तर जो आकडा येईल तो धक्कादायक असेल. मासिक पंधरा हजार रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्यांची टक्केवारी एकूण लोकसंख्येच्या सत्तर टक्क्यांच्या आसपास असेल.

ही विषमता दूर होत नाही आणि सामान्य नागरिकांचे राहणीमान उंचावत नाही तोपर्यंत या तंत्रज्ञानाच्या प्रगतीला फारसा अर्थ नाही, आणि भारत विकसित देशांतही समाविष्ट होऊ शकणार नाही. आपण मूठभर शहरी लोक म्हणजे भारत नव्हे . विकसित देशांत गणना होते, त्यासाठी देशातील सर्वात खालच्या थराचे दरडोई उत्पन्न किती आहे हा महत्त्वाचा निकष असतो. त्यामुळे विकसित देशांत गणना होण्यासाठी आपला नंबर १३९ वरून कितीतरी पुढे जायला हवा. त्यासाठी आपल्यापुढे सर्वात मोठे आव्हान आहे की हे उद्दिष्ट साधायला तंत्रज्ञानाचा कसा उपयोग करायचा. त्यावरच देशाचे भवितव्य अवलंबून राहील.

**– अनुराधा ठाकूर**
anuradha333@gmail.com

**ग्रंथाली आयोजित स्थानिक संस्था व व्यक्तींच्या सहकार्याने**
**'आरोग्य' आणि 'विज्ञानधारा' या दोन यात्रा – २४ नोव्हेंबर ते २४ डिसेंबर २०२३**
आरोग्ययात्रा प्रमुख – **डॉ. सतीश नाईक, डॉ. राजेंद्र आगरकर, डॉ. हेमंत जोशी, डॉ. यश वेलणकर**
विज्ञानधारा प्रमुख – **शरद काळे**, विज्ञानगप्पा – **सुधीर/नंदिनी थत्ते**
ठिकाणे – **चिपळूण–रत्नागिरी** (२४ ते २६ नोव्हेंबर), **नागपूर–चंद्रपूर** (२९ नोव्हेंबर ते २ डिसेंबर)
**अमरावती** (१ ते ३ डिसेंबर), **कऱ्हाड** (६ ते ८ डिसेंबर), **कोल्हापूर** (७ ते ९ डिसेंबर),
**नांदेड–औरंगाबाद** (१० ते १२ डिसेंबर), **नाशिक–धुळे–नंदूरबार** (१४ ते १७ डिसेंबर),
**अहमदनगर–जळगाव** (२० ते २३ डिसेंबर). **सांगता** (२४ डिसेंबर) **माणिकराव कीर्तने वाचनालय, वाशी**
प्रत्येक ठिकाणी पोस्टर प्रदर्शन, ग्रंथप्रदर्शन, 'आरोग्याची कॅप्सुल'अंतर्गत मान्यवर डॉक्टरांची मुलाखत, वैद्यकीय प्रबोधन आणि परिसंवाद, जीवनशैलीविषयक वर्कशॉप आणि व्याख्यान.
**शाळांच्या सहभागातून विज्ञानधारा व विज्ञानगप्पा**
**महाविद्यालयांच्या सहभागातून आरोग्यविषयक कार्यक्रम**
**आपल्या गावी आपण अवश्य सहभागी व्हा!**



# डॉक्टर आणि रुग्ण : बदलती मानसिकता

डॉ. सतीश नाईक

> कदाचित गेल्या काही वर्षांत डॉक्टर-पेशंटसंबंधातला सर्वात मोठा बळी घेतलाय तो फॅमिली डॉक्टरांचा. किमान आपल्या देशात नवे फॅमिली डॉक्टर दवाखाने थाटताना दिसत नाहीत. त्यामुळं जनसंख्येच्या मानानं त्यांची संख्या पाहिजे तशी वाढत नाही. आपण जाणीवपूर्वक प्रयत्न करून ही पोकळी भरून काढायला हवी हे नक्की. कारण जगात ज्या देशांमध्ये फॅमिली डॉक्टर मजबूत आहेत त्या त्या देशांमध्ये वैद्यक सुस्थितीत आहे.

तीस वर्षांत डॉक्टर आणि रुग्ण यात नेमकं काय बदललंय हे जाणून घेण्यापूर्वी या काळातल्या काही महत्त्वाच्या वैद्यकीय घटनांचा मागोवा घ्यावा लागेल. कारण तंत्रज्ञान, वैद्यकीय प्रशिक्षण, उपचार याबाबतीत इतकी प्रगती झालेली आहे की जवळपास वैद्यक नव्यानं जन्मलंय की काय असं वाटावं.

सुरुवातीला वैद्यकाचं ज्ञान प्रचंड वाढलंय हे कबूल करावं लागेल. पूर्वी पेशींपर्यंत असलेल्या जाणिवा आता आणखी सूक्ष्म पातळीवर, जीन्स किंवा जनुकांच्या पातळीवर पोचल्यात. शरीराचे यच्चयावत गुणधर्म जीन्स ठरवतात हे या काळात अधोरेखित झालंय. जर मागच्या तीस वर्षातल्या वैद्यकीय क्षेत्रातल्या सर्वात महत्त्वाच्या घटनेचा उल्लेख करायचा झाला तर माणसाच्या सर्व जीन्सचा शोध, जीनोम अभ्यास, असं म्हणता येईल. हा प्रकल्प इतका महत्त्वाचा होता की त्यात जगातले अनेक देश एकत्र आले, त्यांनी खर्चाची जबाबदारी एकत्रित उचलली, प्रकल्पाची पूर्तता झाली तेव्हा अमेरिका, इंग्लंड यांसारख्या देशांच्या प्रमुखांनी एकत्र पत्रकार परिषद घेऊन याची घोषणा केली.

त्यानंतर वैद्यकीय संशोधनाने प्रचंड वेग घेतला. जास्त प्रगती झाली ती कॅन्सरच्या क्षेत्रात. आता कॅन्सर हा जनुकीय दोषामुळं होणारा आजार आहे यावर शिक्कामोर्तब झालंय. कॅन्सरच्या एकंदरीत स्वभावाचा आणि त्यातल्या जीन्सच्या प्रभावाचा उलगडा व्हायला लागला तसतशी नवी औषधं आणि उपचारपद्धती विकसित व्हायला लागली. कॅन्सरवर विजय मिळवण्याच्या दिशेनं दमदार पावला उचलणं शक्य व्हायला लागलं. भविष्याचा विचार करता चित्र खूप आशावादी बनू लागलं. आता काही हजार रुपयांमध्ये जीन्स तपासले जाऊ शकतात.

यांच्याशीच संबंधित परंतु प्रजननक्षेत्रात क्रांती घडवून आणणारी घटना मेंढीच्या क्लोनिंगच्या रूपानं पुढं आली. मेंढीच्या आचळातील पेशींपासून डॉली जन्माला आली. त्यानंतर जगभर उत्सुकता आणि घबराट दोन्ही एकाचवेळी पसरल्या. उत्सुकता निसर्गाला आपण कसं हरवू शकतो, आपल्या मुठीत आणू शकतो, जगातून नष्ट झालेल्या अनेक प्राण्यांना पुन्हा पृथ्वीतलावर आणू शकतो याबद्दल होती, तर आता या तंत्रज्ञानाचा उपयोग करून अनेक क्रूरकर्मा आपल्यासारखे अनेक नवे लोक तयार करतील, जगाला जेरीला आणतील ही भीतीदेखील होती.

दोन्ही घटना कदाचित या शतकातली सर्वात महत्त्वाची उपलब्धी म्हणून मानता येतील. परंतु या व्यतिरिक्त इतर कितीतरी घडामोडींमुळे वैद्यकाचा एकंदर चेहरामोहरा बदलत चालला आहे. आजचं वैद्यक हे अनेक विज्ञानशाखांना स्वतःत सामावून घेत आहे. संगणक आता वैद्यकाचे जवळपास सर्वच विभाग काबीज करू लागला आहे. कृत्रिम

मानव म्हणजे रोबोचा उपयोग शस्त्रक्रियेदरम्यान करणं नवं राहिलेलं नाही. पॅथॉलॉजी क्षेत्रात रोज नवनव्या तपासण्यांची भर पडते आहे. त्यामुळं निदान अधिक अचूक होण्याची शक्यता वाढली आहे. पूर्वी केवळ एक्स-रेवर विसंबून असलेले आपण आता सीटी, एमआरआय, पेट अशा चढत्या भाजणीच्या प्रतिमातंत्रांचा (स्कॅन) उपयोग करू लागलो आहोत. टेलिमेडिसिन वापरून जगाच्या एका टोकाला असलेल्या जागी बसल्या बसल्या आपण दुसऱ्या टोकाच्या डॉक्टरांशी सल्लामसलत करू शकतो. प्रसंगी कुठल्याही तज्ज्ञाचा सल्ला सहज घेऊ शकतो. इंटरनेटच्या महाजालाची उपलब्धता तीस वर्षांपेक्षा जुनी असली तरी तिचा प्रचार आणि प्रसार गेल्या काही काळात खूप वाढला आहे. त्यामुळं ज्ञानाची देवाणघेवाण खूपच सुकर झाली आहे. पूर्वीपेक्षा अधिक आधुनिक, अधिक सुसज्ज इस्पितळं बनताहेत, देशाच्या कानाकोपऱ्यात पसरताहेत.

सोबत काही नवी आव्हानंदेखील उभी राहताहेत. जगभरात पाण्याचं, हवेचं, समुद्राचं, जमिनीचं प्रदूषण वाढतं आहे. त्यामुळं कित्येक आजार आपली दमछाक करताहेत. खाण्याचे नवे प्रश्न उभे राहत आहेत. जगाच्या कित्येक भागांमध्ये उपासमार आहेच, पण अतिखाण्यानं निर्माण झालेल्या वजनाच्या समस्या, मधुमेह, रक्तदाब, कमी वयातला हृदयरोग जग व्यापताहेत. काही दिवसांमध्ये बऱ्या होऊ शकणाऱ्या आजारांची जागा आता जीवनशैलीशी निगडित लांब पल्ल्याच्या आजारांनी घेतलीय.

रोगजंतूंमुळं होणाऱ्या आजारांवर आपण बऱ्यापैकी नियंत्रण मिळवलं आहे. परंतु ते करताना काही चुकाही केल्यात. प्रमाणाबाहेर प्रतिजैविकं वापरून कुठल्याही औषधांना दाद न देणाऱ्या मल्टिड्रग रेझिस्टन्स रोगजंतूची पिढीच्या पिढी निर्माण केलीय. त्यात मलेरिया, टीबी यांसारख्या आजारांनी अधिक धोकादायक वळण घेतल्याचं दिसतं आहे. बॅक्टेरिया मारले जात असताना सूक्ष्म जीवांच्या जगतात निर्माण झालेली पोकळी आता व्हायरस किंवा विषाणू भरून काढू लागलेत. जगप्रवास सोपा झाल्यानं हे विषाणू जगाच्या एका भागातून दुसऱ्या भागात विनासायास जाऊ लागले आहेत. त्यामुळं डॉक्टर आणि पेशंट दोघांनाही जगभरातल्या नवनव्या आजारांची माहिती असणं आवश्यक बनलं आहे. डॉक्टरांना नव्या घडामोडींबद्दलचं ज्ञान स्वतःला सतत देणं, सतत अपडेट करणं अपरिहार्य बनत चाललं आहे.

या पार्श्वभूमीवर आपल्याला डॉक्टर-पेशंटसंबंधांचा धांडोळा घ्यावा लागेल.

समोर प्रगती दिसली की अपेक्षा वाढणार. एका बाजूला त्या अपेक्षा पूर्ण करणं जमलं नाही तर दुसऱ्या बाजूचा मुखभंग होणार. संबंधांत दुरावा निर्माण होणार वा संबंधांत अविश्वास वरचढ ठरणार. दोन्ही गोष्टी डॉक्टर आणि पेशंट संबंधाला पूरक नाहीत. परंतु प्रगतीचा अर्थ आपण अमर झालो आहोत असा लावणं, कुठल्याही परिस्थितीत, कितीही गंभीर आजार घेऊन आपण डॉक्टरांना दाखवलं तरी आपण शंभर टक्के बरे होणार असा विचार करणं, वैद्यकाकडून अवास्तव अपेक्षा ठेवणं नक्कीच चुकीचं होईल. या विचारामुळंच दवाखाने, हॉस्पिटल यावर होणारे हल्ले वाढताहेत की काय हे तपासून घ्यावं लागेल.

हे का ते प्रथम स्पष्ट केलं पाहिजे. वैद्यक इतर व्यवसायापेक्षा वेगळं आहे. इथं शरीराचा व जिवाचा प्रश्न असतो. शरीर हे केवळ वेगवेगळ्या इंद्रियांचा एकत्र एका जागी केलेला संग्रह किंवा त्यात चालणाऱ्या घडामोडी इतकंच नव्हे. त्यात भावभावनांचा अनेक प्रकारचा कल्लोळ सामावलेला आहे. एकाच आजाराला वेगवेगळ्या व्यक्ती वेगवेगळ्या प्रकारे सामोऱ्या जातात. त्या भावभावनांना आताशा वैद्यकात स्थान खूपच कमी मिळतंय. त्यामुळं मानसिक आधार कमी व्हायला लागला आहे. हेच एक कारण असावं की आजच्या घडीला मोठ्या प्रमाणात मानसिक प्रश्न वाढलेत. ताणतणाव, उदासीनता, आत्महत्या वाढताहेत, पालक मुलांना 'नाही' हा शब्दच शिकवत नाहीत त्यामुळं मुलांमध्ये विध्वंसक, खुनशी वृत्ती वाढतेय, जगातली सुखी माणसांची संख्या दिवसेंदिवस कमी होतेय.

कदाचित गेल्या काही वर्षांत डॉक्टर-पेशंटसंबंधातला सर्वात मोठा बळी घेतलाय तो फॅमिली डॉक्टरांचा. किमान आपल्या देशात नवे फॅमिली डॉक्टर दवाखाने थाटताना दिसत नाहीत. त्यामुळं जनसंख्येच्या मानानं त्यांची संख्या पाहिजे तशी वाढत नाही. संपूर्ण कुटुंबाला ओळखणाऱ्या, प्रसंगी सल्लागार, कुटुंबाचा हितचिंतक म्हणून वावरणाऱ्या फॅमिली डॉक्टरांची घटत जाणारी संख्या, त्यांच्या निरपेक्ष आधाराची उणीव, त्या आश्वासक स्पर्शाची कमतरता या नव्या संस्थांमध्ये जाणवत असावी. आपण जाणीवपूर्वक प्रयत्न करून ही पोकळी भरून काढायला हवी हे नक्की. कारण जगात ज्या देशांमध्ये फॅमिली डॉक्टर मजबूत आहेत त्या त्या देशांमध्ये वैद्यक सुस्थितीत आहे.

दवाखाने थाटण्यासाठी लागणारा पैसा, मूळ भांडवल आणि मिळकत यात असलेली प्रचंड तफावत हे याचं प्रमुख कारण आहे. मोठी शहरं आणि गावखेडी यामध्ये उपलब्ध असलेल्या वैद्यकीय सोयी यातही खूप फरक आहे. हे चित्र नक्कीच आश्वासक नाही. डॉक्टरी हा व्यवसाय समजून

कोपऱ्यातल्या गावांना उत्तम रीतीनं वैद्यकीय पटलावर आणण्यासाठी करांमध्ये सवलती देता येऊ शकतात. नाहीतरी मागास भागात इतर उद्योगांना आपण काही वर्षांसाठी 'करसुट्ट्या' देतोच की! वैद्यक हादेखील उद्योग मानायला काय हरकत आहे.

वैद्यकाचं व्यावसायिकीकरण केव्हाच सुरू झालं आहे. कॉर्पोरेट हॉस्पिटलांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे. ही हॉस्पिटल मुळातच पैसे कमावण्यासाठी बनलेली असतात. त्यातली फारच थोडी सामाजिक बांधिलकी जपतात. अशा हॉस्पिटल्स आणि त्याच्याशी संबंधित व्यक्ती यांच्यामध्ये एकप्रकारची फक्त 'व्यावसायिक' स्वरूपाची नाती तयार होतात. तिथे पेशंट आणि डॉक्टर दोघांनाही चेहरा नसतो. वैद्यकीय व्यवसायाच्या गाभ्याला हे बरंचसं मारक आहे. त्यामुळं समाजाला ज्याची गरज आहे त्यापेक्षा अधिक फायदा मिळवून देणाऱ्या तज्ज्ञांचा भरणा अशा हॉस्पिटलमध्ये होतो. उदाहरणार्थ, समाजाला गरज असते मोठ्या प्रमाणात सर्वसामान्य आजारांवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांची. त्याऐवजी गुडघे बदलणारे, हृदयाची शस्त्रक्रिया करणारे डॉक्टर अशा हॉस्पिटलमध्ये अधिक दिसतात.

आणखी एक मूलभूत बाब करण्याची नितांत आवश्यकता निर्माण झाली आहे. ती आहे वैद्यकीय शिक्षणाच्या क्षेत्रात. दिवसेंदिवस शिक्षणाचा दर्जा खालावत चालला आहे. उत्तम शिक्षकांची वानवा आहे. केवळ डिग्री पाहून शिक्षकांची नियुक्ती करणं निदान या क्षेत्रात तरी योग्य नाही. इथं पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रात्यक्षिकांना खूपच महत्त्व आहे. त्यामुळं आता नव्या विचारांनी, नव्या कसोट्या लावून शिक्षक नेमण्याची गरज निर्माण झाली आहे. किमान आहे त्यात काय काय सुधारणा करता येतील याबाबत मंथन तरी सुरू झालं पाहिजे. नेहमीच्या वैद्यकशास्त्रासोबत इकॉनॉमिक्स आणि पेशंटबरोबर साधायचा संवाद असे विषयसुद्धा शिकवायला हवेत.

वैद्यकीय शिक्षणाच्या बाबतीत दिसणारे बदल इथं नमूद करायला हवेत. पूर्वी डॉक्टर जास्त जनरॅलिस्ट असायचे. आता बहुतेक तज्ज्ञ होण्याच्या मागे लागतात. साहजिकच हे शिक्षण खूप दिवस चालतं. अनेकदा तिशी-पस्तिशीपर्यंत डॉक्टर वैद्यकीय महाविद्यालयातून बाहेर पडत नाहीत. शिकण्याच्या काळातली चुरस, पदव्युत्तर प्रवेशासाठी करावी लागणारी म ारामार, त्यानंतर व्यवसायात स्थायिक व्हायला करावे लागणारे अवास्तव कष्ट, यांचा विलक्षण ताण नव्या पिढीच्या डॉक्टरांवर पडतोय. पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात तरुण डॉक्टर याला बळी पडताहेत. कमी वयात ते स्वतःच आजारी होताहेत.

प्रॅक्टिसदरम्यान सतत बदलणारे कायदे, खूप विचित्र नियम यांचीही भरमार होतेय. मुळात या नियमांच्या ओझ्याखाली डॉक्टर दडपून जातात. सरकारी कायदे सर्व डॉक्टर चोर, लुटारूच आहेत हे गृहीत धरून बनवले जातात की काय असा संशय यावा. वजनाचा काटा हा याचा उत्तम दाखला म्हणता येईल. डॉक्टर दवाखान्यात जो वजनाचा काटा वापरतात त्यात पेशंटला फसवण्याचा उद्देश नक्कीच नसतो. परंतु व्यापाऱ्यानं ग्राहकाला वजनात फसवू नये म्हणून बनवला गेलेला कायदा डॉक्टरांच्या दवाखान्यातल्या वजनकाट्याला लागू करणं यात काय साधतं तेच कळत नाही. तीच गोष्ट गर्भचिकित्सा कायद्याची. पूर्वी डॉक्टर सोबत सोनोग्राफी मशीन घेऊन दुर्गम भागात जायचे. कायद्यानं यावर बंदी आणली. म्हणजे एकप्रकारे रुग्णांना मिळणारी घरपोच सेवा आता बंद झाली. केवळ वय हाच मुद्दा ग्राह्य धरून बनवला गेलेला गर्भपात कायदा पेशंटची परिस्थिती पाहून वापरला जावा यासाठी डॉ. निखिल दातार यांना स्वतः पदरमोड करून कित्येक वर्षं न्यायालयीन लढा द्यावा लागला, ही गोष्टच खूप काही सांगून जाते.

दुर्दैव असं की वैद्यकीय दर्जापेक्षा दवाखान्याच्या सजावटीला महत्त्व येऊ लागलंय. सर्वच क्षेत्रात हे व्हायला लागलं आहे. मोबाइलचंच उदाहरण घ्या. मुळात मोबाइलचा शोध लागला तो कुठूनही कोणाशीही संवाद साधण्यासाठी. तसं पाहिलं तर त्याचा फोटोंशी अर्थाअर्थी काहीच संबंध नसायला हवा. परंतु कित्येकदा मोबाइलच्या कॅमेऱ्याकडे, त्या कॅमेऱ्याच्या क्षमतेकडे पाहून तो घ्यायचा की नाही हे ठरवलं जातंय. आता हेच वैद्यकातही शिरू लागलंय. उत्तम इलाज मिळताहेत की नाही ही बाब दुय्यम ठरू लागलीय. त्या ऐवजी जिथं उपचार होताहेत ती जागा किती चकाचक आहे हे महत्त्वाचं होतंय.

संगणक कुठलंही काम अत्यंत कमी वेळेत आणि अचूक करतो हे नक्कीच खरं आहे, परंतु त्याला स्वतःची बुद्धी नाही हे लक्षात ठेवायला हवं. संगणकाला मानवी बुद्धी नाही हे तितकंच सत्य आहे. त्यामुळं चुका होणारच नाहीत असा विचार करणं मूर्खपणाचं ठरेल. दुर्दैव असं की चुका संगणकाच्या झाल्या तरी दोष उपचारकर्त्याच्या माथी येतो.

संगणक आणखी अनेक बाबतीत आपलं जग व्यापतोय. अर्थात ही आपल्यासाठी चांगली गोष्ट आहे. आज मोठ्या प्रमाणात डॉक्टर संगणक वापरू लागलेत. आपली वैद्यकीय माहिती ते जपून ठेवायला लागलेत. नुसतंच माहितीचं संकलन इतक्यावर हे थांबलं नाहीय. या माहितीची देवाणघेवाण तितक्याच जलदगतीनं, सहजपणे, अत्यंत

कमी खर्चात व्हायला लागलीय. डॉक्टरांनी लिहिलेल्या दोन औषधांमध्ये होणाऱ्या टकरीचा, ड्रग इंटरअ‍ॅक्शनचा, छडा त्वरित लागू लागलाय. डॉक्टर आणि पेशंट मोबाइल, ईमेल, स्काईप यांच्या साहाय्यानं कुठेही, कधीही जोडले जाऊ लागलेत. रिपोर्ट, त्वचेच्या समस्यांची छायाचित्रं क्षणार्धात पाठवू शकताहेत. बसल्या ठिकाणाहून संवाद साधू, सल्लामसलत करू, शकताहेत,

आपण बदलत्या मानसिकतेचा विचार करतो तेव्हा पिढ्यापिढ्यांमधलं अंतरदेखील लक्षात घ्यायला हवं. नवी पिढी पूर्वीच्या पिढीच्या मानानं बरीच मोकळ्या मनाची आहे. पूर्वीची पिढी लैंगिक प्रश्नाबाबत डॉक्टरांशी चर्चा करताना लाजायची. सुदैवानं आता हे बदलत चाललंय. 'तसले' शब्द वापरायला ती आता कचरत नाही. दुसरा तितकाच चांगला बदल म्हणजे ही पिढी आजाराची माहिती घेते. आपल्या वैद्यकीय हक्कांविषयी जागरूक राहून आपल्या आजारांची चर्चा करते. डॉक्टरांना नको असलेलं देवत्व उगीचच बहाल करत नाही. त्यांना आपला वैद्यकीय मित्र समजते. हा बदल उल्लेखनीय आहे.

त्याचबरोबर माध्यमांचा अतिरेक त्यांच्या बाबतीत नव्या समस्या घेऊन उभा राहतो आहे. माध्यमात, विशेषतः इलेक्ट्रॉनिक माध्यमात, येणारी सगळीच माहिती अचूक नसते. काही वेळा तर ती पूर्णपणे चुकीची असते. तरीही त्यावर विसंबून त्याप्रमाणे उपचार घेणारे थोडके नाहीत. बऱ्याचदा त्यातून दिशाभूलच होते आणि त्या माहितीचा प्रत्यवाय करताना डॉक्टरांचा खूप वेळ वाया जातो.

वैद्यकीय क्षेत्रात वाढत चाललेला भ्रष्टाचार याबाबत नेहमीच चर्चा होत असते. डॉक्टर आणि त्यांच्या भ्रष्टाचाराची भलामण करणं योग्य नाहीच, पण दुर्दैवानं समस्येच्या मुळाशी जाताना कोणीही दिसत नाही. यातला पहिला मुद्दा म्हणजे डॉक्टरांनी फक्त सेवा करावी, पैशांची हाव धरू नये हे चुकीचं गृहितक. कोणीही, अगदी कोणीही शिक्षण घेतो ते विशिष्ट पातळीवरचं जीवनमान जगता यावं म्हणून. आयआयटी, आयआयएम यांसारख्या प्रतिष्ठित संस्थामध्ये प्रवेश मिळवायला जी अहमहमिका लागते त्यात पुढच्या आयुष्यात मिळणारी लठ्ठ पगाराची नोकरी आणि त्यामुळं मिळणारी सुबत्ता हेच कारण असतं. उद्या याच मंडळींना दहा-बारा हजारांची नोकरी मिळू लागली तर या संस्था ओस पडतील. त्यामुळं समाजानं आपली मानसिकता बदलणं आज खूपच गरजेचं झालं आहे. एखादा इंजिनीयर किंवा एखादी पीएच.डी. व्यक्ती परिस्थितीमुळं नाईलाजानं कारकुनीचं काम करू लागली तर त्याची बातमी होते. मग डॉक्टरांच्या बाबतीतच हा दुजाभाव का? लक्षात घ्यायला हवं की सनदशीर मार्गानं पैसे मिळणं अवघड होतं तेव्हा चुकीच्या मार्गांचा अवलंब केला जातो. मुळावर घाव घातला तर समस्येचं निराकरण सहज होऊ शकतं. आपण फक्त कायदे बनवतो आहोत. त्याचा फारसा उपयोग होत नाही. उलट त्यातून पळवाटा जास्त शोधल्या जातात.

हाही मुद्दाम गौण नाही की सरकारी मेहेरनजर असलेल्या मोठ्या हॉस्पिटलांना किती प्रमाणात कायद्याच्या कचाट्यात आणलं जातं, त्यांना किती प्रमाणात सजा होते? किती प्रमाणात भ्रष्ट पद्धतीनं वैद्यकीय शिक्षणाचा बाजार मांडला जातो? त्याचं काय?

यात एक भीती नक्कीच आहे. पुरेसे पैसे मिळत नाहीत म्हटल्यावर बुद्धिमान मुलं किती प्रमाणात डॉक्टर व्हायला तयार होतील. कमी बुद्धिमान मुलं या व्यवसायात शिरली मग समाजाला कमी कुवतीचे डॉक्टर मिळणार नाहीत का? इथं शिकून परदेशी जाणार नाहीत का? तिथल्या लोकांचं भलं होणार नाही का? प्रश्न खरंच विचार करायला लावणारे आहेत.

कुठल्याही क्षेत्रात कालानुरूप बदल घडणारच. किंबहुना ते घडायलाच हवेत. त्याशिवाय ते क्षेत्र प्रवाही राहणार नाही, प्रगती करणार नाही. नवं तंत्रज्ञान, नवे विचार, बदलणाऱ्या मानसिकता यांचा प्रभाव त्या त्या क्षेत्रांवर पडणारच. वैद्यकदेखील त्याला अपवाद नाही. परंतु वैद्यकाच्या बाबतीत काळजी घेण्याची गरज आहे. कारण वैद्यक समाजाच्या आरोग्याशी निगडित आहे. निरोगी शरीरातच निरोगी मन वास्तव्य करून असतं हे लक्षात घेतलं की वैद्यकाचा आणि त्याच्याशी संबंधित प्रश्नाचा नियमित आढावा घेणं किती आवश्यक आहे ते लक्षात येतं.

**– डॉ. सतीश नाईक**
dr.satishnaik.mumbai@gmail.com

**'विज्ञान' आणि 'आरोग्य' या यात्रांच्या सांगतेचा समारंभ आणि यंदाचा 'वाचकदिन' २४ व २५ डिसेंबर रोजी वाशी येथे होणार आहे.**



# फॅमिली फर्स्ट!

जान्हवी खांडेकर

एखाद्या समूहाच्या किंवा संस्थेच्या सदस्यांमधील बॉण्डिंग स्ट्राँग आहे हे निर्देशित करायचे असते त्यावेळी त्या समूहाला एक कुटुंबं म्हणून संबोधले जाते. कारण कुटुंबच माणसाला जगण्यासाठी लागणारी शक्ती, प्रेरणा विनाअट, निरपेक्षपणे पुरवत असते..म्हणूनच तर अगदी ऑस्करपासून गल्लीतल्या गणेशउत्सवातल्या पारितोषिक समारंभातले विजेते यशाचं श्रेय आजही कुटुंबालाच देतात. माणसाला कुटुंब हे लागतेच. त्यामुळेच जगाच्या अंतापर्यंत फॅमिली फर्स्ट हेच जागतिक सत्य अबाधित राहील, यात काहीच शंका नाही.

आमच्या बिल्डिंगमध्ये दुसऱ्या मजल्यावर राहणाऱ्या काकू रोज बरोबर नऊच्या ठोक्याला खांद्याला बॅग अडकवून कुठे बरं जातात? काकू काही नोकरी करत नाहीत. शेवटी न राहवून विचारलेच एके दिवशी, 'काय काकू, रोज याचवेळी कुठे जाता हो तुम्ही? काकू गडबडीत म्हणाल्या माझी बस चुकेल, संध्याकाळी बोलू निवांत.' आणि गेल्या लगबगीने. मात्र म्हटल्याप्रमाणे संध्याकाळी बरोबर सातला बेल वाजली. काकूच होत्या.

'या काकू. बसा. चहा टाकते.'

'चहा झालाय, पण घेईन घोट भर' म्हणत काकू खुर्चीवर टेकल्या.

'कुठून येताय तुम्ही काकू? काही जॉब घेतलात कुठे की उद्योग सुरू केलात?' माझी उत्सुकता मला गप्प बसू देत नव्हती.

'अग अशोककडे गेले होते, नातीला सांभाळायला. रोज नऊच्या बसनं जाते आणि सहाच्या बसनं परत येते. अगदी जॉब असल्यासारखा वेळ पाळते. सून जाते ना कामावर तिला उशीर नको व्हायला.'

दोन वर्षांपूर्वीच काकूंच्या मोठ्या मुलाचं लग्न झालं. लग्नानंतर तो ऑफिसच्या शेजारी म्हणून शहराच्या दुसऱ्या टोकाला राहायला गेलाय. त्याच्या बायकोचीही कंपनी त्याच भागात आहे.

'अहो, पण आता या वयात ही दगदग कशाला? त्यापेक्षा त्यांना सांगा की इथे आणून सोडायला किंवा पाळणाघरात ठेवायला नातीला 'अग, दगदग काय, उलट मला तर हेच बरं वाटतं. त्या निमित्तानं घराबाहेर पडते मी. शिवाय संध्याकाळी माझी मी मोकळी कार्यक्रमांना जायला. येताना कधी कधी अर्ध्या वाटेतून चालत येते. कधी हे येतात न्यायला नि मग आम्ही दोघं छान फिरून येतो. झालंच तर आता हे, मी यायच्या आधी संध्याकाळचं जेवण बरंचसं बनवून ठेवतात. मी आले की टीव्ही बघत मस्त जेवतो आम्ही दोघं. कधी लवकर यायचं असेल तर सुनबाई तिची वेळ ॲडजस्ट करते. आणि मदतीला वर कामाला एक बाई ठेवलीये तिनं. मी फक्त आमच्या शोणाकडे बघते दिवसभर.' अगदी खुशीत काकू सांगत होत्या.

मुलगा-सून वेगळे राहतात, नातीला भेटायला मिळत नाही या सगळ्यावर काकूंच्या कुटुंबाने काढलेला मार्ग सगळ्यांसाठीच सोयीचा होता. आजीकडे नातीला सोपवून सून निःशंक मनाने ऑफिसला जाऊ शकत होती. नातीला सांभाळतोय याचं समाधान काकूंना मिळत होतं. सोबत त्यांचं स्वतःचं हक्काचं घर आणि हक्काचा वेळ दोन्ही अबाधित राहिल्यामुळे त्याही खुश होत्या.

मन मारत, गैरसोय आणि कुचंबणा सोसत कुटुंबं

एकत्र राहण्याचा काळ आता केव्हाच मागे पडलाय. पूर्वीपेक्षा मध्यमवर्गाची आर्थिक स्थिती बरीच सुधारलीय. स्त्रियांची अर्थार्जनाची क्षेत्रे विस्तारली आहेत. त्यामुळे कामाच्या अनियमित वेळा, कामानिमित्त करावे लागणारे दौरे हे पुरुषांप्रमाणेच घरातील मुली, सुना याही करू लागल्या आहेत. यामुळे घरातील स्वयंपाकाची कामे, घरसफाई, घरातील इतर बारीसारीक कामे, बाजारहाट यातील पुरुषांचा सहभाग आता अत्यावश्यक बनलाय. आमच्या ओळखीतील एका कुटुंबात दोन्ही मुलगेच. मोठ्याची बायको पायलट तर धाकट्याची डॉक्टर. करिअर करणाऱ्या मुली-सुना म्हणून घरात आणताना या कुटुंबातील आईवडील आणि त्यांची दोन्ही मुले यांनी सुनांकडून असलेल्या पारंपरिक अपेक्षांना पूर्णपणे बाजूला सारले आहे. स्वतःच्या मुलांची करिअर उत्तम घडताना आपल्या सुनांचीही करिअर घडावी म्हणून त्या कुटुंबातील आईवडील प्रयत्नशील आहेत. तर दुसऱ्या एका कुटुंबात एकुलता एक मुलगा अगदी शेजारच्या फ्लॅटमध्येही आईवडिलांपासून वेगळा राहायला तयार नाही. वकील असलेल्या तिशीतील मुलीला सून म्हणून घरात आणताना तिच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा स्वीकार करणे या त्रिकोणी कुटुंबाला जमले नाही. आपल्याबरोबर आपल्या आवडीचे कार्यक्रम तिने टीव्हीवर पाहावेत, आपल्यासारखा दिनक्रम ठेवावा, आपल्या त्रिकोणी कुटुंबाचे चौकोनी कुटुंब व्हावे ही वर वर पाहता साधी वाटणारी अपेक्षा ती मुलगी पूर्ण करू शकली नाही आणि दोन महिन्यांतच विवाहाची परिणती घटस्फोटात झाली. आयुष्यभर विभक्त कुटुंबात राहिलेला मुलगा लग्नानंतर मात्र एकत्र कुटुंबाचा आग्रह धरतो, स्वतःच्या आईवडिलांपासून वेगळ्या झालेल्या मुलाच्या आईवडिलांना सुनेने मात्र एका घरात राहावे असे वाटते. हे काहीच तर्कसंगत आणि काळ सुसंगत नाही.

घटस्फोटाचे प्रमाण वाढते आहे आणि त्याबरोबर कुटुंबांचे स्वरूप, प्रश्न बदलताहेत. एकत्र कुटुंब, विभक्त किंवा एकल कुटुंब याबरोबरीने आता, एकल पालक असलेले कुटुंबं, समलैंगिक पालकांचं कुटुंबं आपल्या आजूबाजूला आढळताहेत.

परवा एका लग्नाच्या मंडपात मध्यमवयीन बायकांच्या एका ग्रुपच्या गप्पा कानावर पडल्या. विषय अर्थातच मुलांची लग्ने हाच होता. मुले लग्नाला तयार नाहीत, मुलींना इतक्यात लग्न करायचे नाही. एकीचा मुलगा अमेरिकेत गलेलठ्ठ पगाराची नौकरी करतोय, पण त्याला मुलगी मिळत नाहीये. कारण मुलींना आता परदेशी जायचे नाहीये. ती सांगत होती, मी माझ्या मुलाला सांगितलेय काळी, गोरी, कुठल्याही धर्माची चालेल पण मुलीशीच लग्न कर बाबा. त्यावर सर्व जणी हसल्या पण त्यांच्या चेहऱ्यावरची या शक्यतेची भीती काही लपत नव्हती. ट्रान्स जेण्डर, गे, लेस्बियन. इतके दिवस आपल्यासाठी हे सर्व म्हणजे नुसत्या संकल्पना होत्या, आता ते आपल्या अवतीभोवतीचे, अनेक जणांनी स्वीकारलेले वास्तव आहे. मुलगा किंवा मुलगी लग्न कधी करेल याबरोबरीने आता कुणाशी करेल हा एक मोठाच, आईबापाच्या जिवाला घोर लावणारा प्रश्न झालाय. या नव्या वास्तवाने आपले समाजजीवन आणि कुटुंबव्यवस्था ढवळून निघालीय. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने केलेल्या प्रगतीमुळे अनेक प्रकारच्या सुखसोयी, साधनांची रेलचेल आपल्या आजूबाजूला आहे. एका क्लिकवर जगातील म्हणाल त्या गोष्टी, बघायला अनुभवायला मिळू लागल्या आहेत. आभासी समाजमाध्यमांमुळे जग खूप जवळ आले आहे. एका संस्कृतीचा प्रभाव दुसऱ्या संस्कृतीवर पडू लागलाय. रोजचे आयुष्य प्रचंड गतिमान झालेय. कुणाकडेच कशासाठीच वेळ नाही. प्रत्येकाला व्यक्त व्हायचेय, प्रत्येकाला काही ना काही सांगायचेय. प्रत्येकाला जीवनातली सर्व सुखे मिळवायची आहेत आणि हे सर्व सगळ्यांना लवकरात लवकर करायचे आहे. तुम्ही कधी हल्लीच्या तरुण मुलांना फोनवर संभाषण करताना पाहिलेय? नाही, ते बोलण्याऐवजी टेक्स्ट करतात. किंवा गडबडीत असतील तर व्हॉइस रेकॉर्डिंग करून पाठवतात. असे व्हॉइस मेसेज ते ऐकतात तेव्हा कधीच नॉर्मल स्पीडमध्ये ऐकत नाहीत तर 2X म्हणजे दुप्पट वेगात ऐकत असतात. सिनेमेही ते 2X वेगात पाहतात.

दुसरीकडे, विज्ञानाने केलेल्या प्रगतीमुळे माणसाचे आयुर्मान वाढलेय. आजकाल ७५ ते ८० वर्षे हे सरासरी आयुर्मान झालेय. आधुनिक वैद्यकीय औषध आणि उपचारयंत्रणा, सकस आहार, रोगप्रतिबंधांची प्रभावी सुविधा यामुळे अधिक काळ माणसे उत्तम, तंदुरुस्त आयुष्य जगत आहेत.

घरोघरी ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढतेय. कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींची देखभाल हा एक मोठाच प्रश्न निर्माण झालाय. '१०२ नॉटआउट' नावाचा एक सिनेमा आहे. अमिताभ बच्चन आणि ऋषी कपूर यांचा. यात ७५ वर्षं वृद्ध ऋषी कपूरचे १०२ वर्षांचे वडील अमिताभ बच्चन या दोघांचीही गोष्ट. स्वतःच्या वृद्धत्वाचा स्वीकार करून स्वतःवर अनेक बंधने घालून ऋषी कपूर एक रटाळ आयुष्य जगत असतो तर १०२ वर्षांचा अमिताभ जगातील सर्वात जास्त वर्षे जगलेल्या माणसाचा रेकॉर्ड मोडण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून आनंदात, धमाल मस्तीत प्रत्येक दिवस साजरा करत असतो. शेवटी

असे होते की ऋषी कपूरच्या कुरकुऱ्या रटाळपणाला कंटाळून त्याचा बाप अमिताभ त्याला सोडून जाण्याचा विचार करतो. आयुर्मान वाढल्यामुळे कुटुंबात निर्माण झालेला हा वेगळाच पेच विनोदाच्या साहाय्याने मांडण्याचा प्रयत्न या चित्रपटात केला आहे. एकीकडे वयोवृद्ध आईवडिलांची देखभाल आणि दुसरीकडे वृद्धत्वामुळे स्वतःला जडलेल्या व्याधींना तोंड देत असलेले वृद्ध, असे चित्र अनेक कुटुंबात दिसते.

एक सत्तरी ओलांडलेले परिचित सांगत होते. वडिलांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन झाले. वडील ९५ वर्षांचे आहेत. एका चांगल्या वृद्धाश्रमात त्यांची सोय केलीय. तिथे चोवीस तास उत्तम देखभाल करणारी सेवक मंडळी आहेतच, शिवाय चोवीस तास मेडिकल हेल्प उपलब्ध आहे. त्यामुळे आम्हालाही थोडी उसंत मिळतेय. परदेशात असलेल्या नातवंडांशी रोज व्हिडिओ कॉलवर बोलतो तसेच वडिलांशीही बोलतो.

तंत्रज्ञानामुळे ज्या सुविधा उपलब्ध झाल्यात त्यांचा योग्य वापर करून आज अनेक ज्येष्ठ नागरिक वाढलेल्या आयुष्याला सामोरे जाताहेत. तर दुसरीकडे या तंत्रज्ञानाच्या मदतीने तरुण पालक आपल्या मुलांचा सांभाळ करतायत. घरी कामवाल्या मावशीजवळ ठेवलेल्या बाळा वर इंटरनेट आणि CC कॅमेऱ्याच्या माध्यमातून तरुण वर्किंग माता ऑफिसमधून लक्ष ठेवतेय. दूर देशी गेलेला बाबा व्हिडिओ कॉलवर गोष्ट सांगत बाळाला झोपवतोय. शाळेतून घरी आल्यावर लँडलाईन फोन वरून आईला किंवा बाबाला मी घरी आले असे सांगत ही पिढी वाढलीये. आता त्यांची मुले व्हिडिओ कॉलवरून शाळेत केलेला अभ्यास, काढलेली चित्रे ऑफिसमध्ये कामात बुडालेल्या आईला किंवा बाबाला दाखवताहेत. आईबापाची ओढ तीच आहे. अत्याधुनिक साधनांनी कामाच्या व्यापात, वाढणाऱ्या मुलांकडे पुरेसे लक्ष देऊ शकत नाही, त्यांना वेळ देऊ शकत नाही ही आधीच्या पिढीला वाटणारी खंतही तीच आहे. बदलली आहेत ती साधने आणि लाइफ स्टाईल. आधी दमून घरी आलेल्या आईला मुलांना चांगलेचुंगले खाऊ घालण्यासाठी पदर खोचून स्वयंपाकघरात घुसावे लागायचे. आता टेक्नोसॅव्ही आणि चांगला पगार कमावणारी आई, हातातल्या फोनवर हवे ते खाद्यपदार्थ काही मिनिटांत ऑर्डर करतेय. महिना-दोन महिन्यांतून एखादा सिनेमा पाहायला मिळाला तरी चंगळ असणारी कुटुंबे घरातल्या स्मार्ट टीव्हीवर रोज हवा तो सिनेमा, कार्यक्रम पाहत आहेत. सुट्टी लागली की मामा, मावशीकडे जाणारी बच्चेकंपनी आता आईबाबांबरोबर प्रेक्षणीय स्थळे पाहायला देशविदेशी हिंडतेय. काका-काकू, मामा-मामी यांची जागा आता मित्र परिवारातल्या अंकलआँटीने घेतलीये. तोंडदेखल्या रक्ताच्या नात्यांपेक्षा मैत्रीची नाती अधिक दृढ होताहेत.

सणसमारंभ दणक्यात साजरे होतात. जुन्या प्रथांना नवीनतेचा साज चढवला जातो. घराच्या दारावर किंवा गच्चीवर गुढी उभारून साजरा होणार गुढीपाडवा आता गावोगावी तरुणाईसाठी शोभायात्रेत मराठमोळी वेशभूषा करून मिरवण्याचा इव्हेंट झालाय. मुलींनी आपल्या सख्ख्या आणि इतर नात्यातल्या भावांना राखी बांधायची एवढ्यापुरता मर्यादित असलेला राखी पौर्णिमेचा सण आता उत्तर भारतीयांप्रमाणे बहिणींनी भावांना आणि बहिणींनाही राखी बांधून मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. वाढदिवसाला केक कापला जातो, मेणबत्त्या विझवल्या जातात आणि औक्षणही केले जाते. आपल्या बाळाच्या वाढदिवसाच्या दिवशी त्याला औक्षण करण्यात बाळाच्या आईबरोबर आता बाबालोकही उत्साहाने सामील होतात. लग्न समारंभात तर संबंधित कुटुंबाच्या हौसेचा आणि कल्पकतेचा परमोच्च आविष्कार पाहायला मिळतो. थाटमाट, सजावट आणि विविध कार्यक्रमांनी हा सोहळा देखणा आणि अविस्मरणीय व्हावा यासाठी प्रत्येक कुटुंब आपापल्या ऐपतीप्रमाणे प्रयत्न करताना दिसते. पूर्वी लग्न समारंभात मुलाकडच्यांचे मानपान, विहिणीचा मान, वऱ्हाडातल्या पाहुण्यांचे रुसवेफुगवे याभोवती चर्चा रंगायच्या. आता नवरा नवरीचे विवाहपूर्व फोटोसेशन, त्यांचे एकमेकांशी सुसंगत वेष, त्याला मॅचिंग केशभूषा, लग्नसमारंभा दरम्यानचे त्यांचे चित्रीकरण, नवदाम्पत्यांचे मधुचंद्राचे बेत या भोवती संपूर्ण विवाहसमारंभ केंद्रित झालेला असतो.

लग्नसमारंभ एखाद्या मोठ्या हॉटेलात साजरे होतात. पुण्या-मुंबईकडे तर अर्ध्या दिवसात लग्नसोहळा विधी आणि जेवणासह संपतोही. काही हौशी आणि आर्थिकदृष्ट्या संपन्न कुटुंबात आता डेस्टिनेशन वेडिंग होतात. संपूर्ण वऱ्हाड तीन-चार दिवस एकत्र राहून धमाल, मजामस्ती करत विवाहसोहळा एन्जॉय करतात. वधूपक्षाने संपूर्ण खर्च करावा, वरपक्षाने फक्त मान घ्यावा अशा रूढीपरंपरा आता उरल्या नाहीत. वधू-वर एकमेकांचे मित्र आणि त्यामुळे त्यांची कुटुंबेही एकमेकांचे मित्र बनून सोहळ्याचा खर्च वाटून घेतात. चार दिवस दोन्हीकडची कुटुंबे एकच होऊन जातात.

काळ बदलला, चालीरीती बदलल्या, तंत्रज्ञानामुळे आधुनिक सुखसोयी आल्या. शहरीकरणाच्या रेट्यामुळे कुटुंबं विभक्त झाली. कुटुंबातील स्त्रीपुरुषांच्या भूमिका बदलल्या.

एकमेकांशी वागण्याच्या पद्धती बदलल्या. वडिलांना सतत घाबरणारी घरातली मुले वडिलांना 'अरे बाबा', 'अरे डॅड्डी' संबोधू लागली. धाकाची जागा मैत्रीने घेतली. तरी 'हम दो हमारे दो' कुटुंबात काही वेळा मोकळेपणा आणि उर्मटपणा यात गल्लत झाल्यामुळे समरप्रसंगही उद्भवतात. तर अती लाड आणि अती काळजी यांच्या माऱ्यामुळे पालकांवर मनस्ताप भोगण्याची वेळही येते. अनेक कुटुंबांत मोबाइलचा अतिरिक्त वापर हे काळजीचे कारण बनलेय. मुलांचा पालकांशी संवाद होत नाही. फेसबुकवर शेकड्याने फ्रेंड असलेली व्यक्ती कुटुंबात एकटी आहे. तरुण पिढी संवादाअभावी व्यसनांच्या विळख्यात अडकण्याच्या शक्यता मोठ्या प्रमाणावर वाढल्यात. मानसिक आरोग्याच्या समस्यांनी ग्रस्त लोकांची संख्या बरीच वाढलीय. एकत्र कुटुंबामुळे आपोआप मिळणारी सपोर्ट सिस्टीम विभक्त कुटुंबात नाहीशी झालीय. त्यामुळे मानसिक ताणात वाढ झाल्याचे तज्ज्ञ सांगतात.

अशा अनेक बदलांतही बदलली नाहीये ती माणसाची मूलभूत प्रवृत्ती. माणूस एकटा राहू शकत नाही. अनेक कुटुंबांतून एकटेपणावर तोडगा म्हणून पेट म्हणजे पाळीव प्राण्यांनी स्थान मिळवले आहे ते याचमुळे. या पाळीव कुत्री आणि मांजर यांना कुटुंबातील सदस्यांचा दर्जा दिलेला असतो. अगदी त्यांचा उल्लेखही त्यांचे नाव आणि कुटुंबाचे आडनाव असा केला जातो. आमच्या मजल्यावर एका बाजूच्या फ्लॅटमध्ये ब्रुनो संघवी आणि दुसऱ्या बाजूच्या फ्लॅटमध्ये जेसी ओक यांचे वास्तव्य बऱ्याच काळ होते. ब्रुनोचे निधन झाले तेव्हा त्याचे क्रियाकर्म झाले त्यानंतर शोकसभाही झाली. आणि आता त्या घराच्या भिंतीवर ब्रुनोचा हार घातलेला फोटो टांगलेला आहे.

आजही जगभर एकतेचे आणि अखंडतेचे सर्वोच्च प्रतीक कुटुंबच मानण्यात येते. आजच्या यंत्रयुगात, मानव चंद्रावर पोचल्यावरही विश्वशांतीसाठी आणि एकतेसाठी आपले पंतप्रधान वसुधैव कुटुंबकम्‌चा नारा देतात तेव्हा सारे जग त्याकडे आकर्षित होते. एखाद्या समूहाच्या किंवा संस्थेच्या सदस्यांमधील बॉण्डिंग स्ट्राँग आहे हे निर्देशित करायचे असते त्यावेळी त्या समूहाला एक कुटुंब म्हणून संबोधले जाते. कारण कुटुंबच माणसाला जगण्यासाठी लागणारी शक्ती, प्रेरणा विनाअट, निरपेक्षपणे पुरवत असते..म्हणूनच तर अगदी ऑस्करपासून गल्लीतल्या गणेशउत्सवातल्या पारितोषिक समारंभातले विजेते यशाचं श्रेय आजही कुटुंबालाच देतात. माणसाला कुटुंब हे लागतेच. त्यामुळेच जगाच्या अंतापर्यंत फॅमिली फर्स्ट हेच जागतिक सत्य अबाधित राहील, यात काहीच शंका नाही.

**– जान्हवी खांडेकर**


janhavip@yahoo.com


॥ग्रंथाली॥

# चिरंजीव भारत

**धर्मेतिहासाचे वेगळे आकलन**

**विजय बुक्कावार**




पुस्तकात मध्ययुगीन इतिहासकाळातील मुस्लीमपूर्व काळातील राजघराण्यांनी ठेवलेल्या स्थापत्य आणि वाङ्मय या देदीप्यमान वारशाची त्रोटक माहिती दिली आहे. या पुस्तकाच्या अभ्यासात आणखी एक धक्कादायक बाब आढळली, ती म्हणजे सर्वदूर फोफावलेला इसापगंड. त्यामुळे हा गंड कसा आणि का? हे पहिल्या प्रकारात विस्ताराने दिले आहे. खरंतर हा गंड आढळल्यानेच हे पुस्तक लिहिण्यास लेखक प्रेरित झाले. पुस्तकाच्या पानोपानी या गंडाची भेट होणारच आहे. कुठे ती सरळ उल्लेखिली आहे आणि कुठे ती जाणीवपूर्वक अनुल्लेखित.

**मूल्य ५०० रु. ❖ सवलतीत ३०० रु. ❖ टपालखर्च ३० रु.**



# हवामानबदल आपण थांबवू शकू?

शरद काळे


हवामानबदलाचा दर आता गेल्या दहा हजार वर्षांतील कोणत्याही गोष्टींपेक्षा जास्त आहे. सन १८५० पासून, वातावरणातील $CO_2$ हा प्रबळ हरितगृहवायू स्फोटक वेगाने वाढला आहे. मानवी लोकसंख्या, जीडीपी (देशांतर्गत एकूण उत्पादन) आणि जीवाश्मइंधनाचे उत्सर्जन एकाच वेळी त्याच पद्धतीने वेगवान झाले. म्हणजे ह्या तीन घटकांमध्ये आणि हवामान बदलाच्या दरात परस्परसंबंध दिसून येतो. कदाचित ही १७५ वर्षे भूगर्भशास्त्रीय काळाच्या हिशेबात नगण्य असतीलही, पण आपल्या दृष्टीने हा मोठा कालावधी आहे. त्यामुळे काळाच्या हिशेबातील  या क्षणभंगुर कालावधीत मानवाने पृथ्वीची प्रणाली मूलभूतपणे बदलली आहे, त्याच्याशी संबंधित जीवन बदलणारे परिणाम आणले आहेत. सन १९५८ मध्ये मौना लोआ वेधशाळेत वातावरणातील $CO_2$चे प्रमाण  पहिल्यांदा मोजण्यात आले तेव्हा ३१५ भाग प्रति दशलक्ष (ppm) इतके होते. तेव्हापासून हे प्रमाण सातत्याने वाढत आहे. सन २०२० मध्ये ते ४१० पीपीएमवर पोहोचले आहे. या ३० टक्के कार्बन डायऑक्साइडमधील वाढीचा निश्चित संबंध जागतिक हवामानबदलाशी आहे. योगायोगाने पहिले आण्विक वीजकेंद्र त्याच सुमारास कार्यरत झाले. आण्विक वीजकेंद्रातून शून्य टक्के कार्बन डायऑक्साइड उत्सर्जित होत असताना गेल्या ६० वर्षांत ७० टक्के वीज जीवाश्मइंधनातून मिळवताना पर्यावरणाची जी हानी झाली आहे, त्या पार्श्वभूमीवर आण्विक वीजकेंद्रांचा साकल्याने विचार होण्याची आवश्यकता आहे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला शोध लागलेल्या प्लास्टिकच्या उत्पादनाने दुसऱ्या महायुद्धानंतर प्रचंड गती घेतली. सन १९६० मध्ये एक लाख टनांहून कमी असलेले उत्पादन २०२१ साली ३९ कोटी टनांपर्यंत पोहोचले होते. या प्लास्टिकमुळे पर्यावरणाची जबरदस्त हानी होत आहे. १९६० मध्ये जागतिक लोकसंख्या ३०० कोटी होती, ती गेल्या साठ बासष्ट वर्षांमध्ये ८१० कोटी झाली आहे. त्यांच्यासाठी शेतीउत्पादन व इतर जीवनावश्यक गोष्टींची निर्मिती त्या प्रमाणात वाढणे अपेक्षित होतेच. त्यामुळे नैसर्गिक स्रोतांवर ताण आला. या सर्व गतीविधींचा जागतिक तापमानवाढीशी व पर्यायाने होणाऱ्या हवामानबदलाशी अगदी निकटचा संबंध आहे. या एकूणच बदलांचा हा आढावा अंतर्मुख होऊन विचार करण्यास प्रवृत्त करेल अशी अपेक्षा आहे.

भारताची लोकसंख्या या कालखंडात ४६ कोटींवरून १४१ कोटींपर्यंत पोहोचली आहे. भौगोलिक क्षेत्र मात्र तेवढेच आहे, शेतीक्षेत्रात काही प्रमाणात वाढ झाली आहे. तांदळाचे उत्पादन ३.५ कोटी टनांवरून १२.५ टनांपर्यंत तर गव्हाचे उत्पादन १ कोटी टनावरून ११.४ कोटी टनांपर्यंत पोहोचले आहे. म्हणजे माणशी ह्या दोन्ही धान्यांचे उत्पादन दुपटीहून थोडे अधिक झाले आहे.



भाजीपाल्याचे उत्पादन २ कोटी टनांपासून गेल्या ६० वर्षांमध्ये २१ कोटी टनांपर्यंत गेले आहे. म्हणजे दरडोई भाज्यांची उपलब्धता तीन-साडेतीन पटी वाढली. दूध व संबंधित दूधउत्पादनात आणि दुभत्या जनावरांच्या संख्येतील गेल्या साठ वर्षांतील वाढ अशीच लक्षणीय स्वरूपाची असून माणशी उपलब्धततेतील वाढही दुपटीहून अधिक आहे. यांचे दृश्य परिणाम म्हणजे सरासरी आयुष्यमान ४८ वर्षांपासून ७२ वर्षांपर्यंत पोहोचले आहे व गरिबी रेषेखाली असणाऱ्या जनतेची संख्या लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. परंतु कृषी व दूध उत्पादनात जी दहा ते बारा पट वाढ झाली, तिचे प्रतिबिंब जनावरांच्या विष्ठेची व टाकाऊ कृषीस्रोतांचीही बेसुमार वाढ होण्यात पडले आहे, आणि त्यांच्या अनियंत्रित विघटनातून मिथेनची निर्मिती गेल्या साठ वर्षांमध्ये तिप्पट तरी वाढली आहे. म्हणजे परिणामी कार्बन डायऑक्साइडचा पर्यावरणीय गुणक कमीत कमी फक्त या प्रकारच्या निर्मितीमुळे ६०-६५ पट वाढला आहे. आकडेवारी पाहिली तर मिथेनचे वातावरणातील प्रमाण १९६० मध्ये दर लाखाला ०.०९ भाग होते, ते आता दर लाखाला ०.१९ (१.९ पीपीएम) इतके झाले आहे. मिथेन पर्यावरणात कमीत कमी १४ वर्षे टिकून राहतो, म्हणजे गेल्या तीन-चार दशकांतील त्याचे वातावरणातील एकत्रित प्रमाण खूप वाढले आहे हे लक्षात येईल. त्याचे परिणाम जागतिक तापमानवाढीवर होत आहेत. त्यामुळे या विविध कचरास्रोतांचे विघटन नियंत्रित करून त्यातून निर्माण होणारा मिथेन कमी करून किंवा इंधन म्हणून वापरून हा परिणाम कमी करणे आवश्यक आहे.

ज्या विविध मानवी गतीविधींमधून हरितगृहवायूंची निर्मिती होते, त्यांचे ढोबळ मानाने वीज आणि उष्णता-उत्पादन, औद्योगिक क्षेत्र, शेती आणि वनीकरण, वाहतूक क्षेत्र आणि इमारती व बांधकाम क्षेत्र असे वर्गीकरण करता येईल. सन २०२०च्या जागतिक हरितगृह वायुउत्सर्जनाच्या





२४ टक्के उत्सर्जन हे वीज आणि उष्णतेसाठी कोळसा, नैसर्गिक वायू आणि तेल जाळणे यातून होणारा मोठा स्रोत आहे. सन २०२०च्या जागतिक हरितगृहवायू उत्सर्जनाच्या २४ टक्के हरितगृहवायू उत्सर्जनामध्ये औद्योगिक क्षेत्रात प्रामुख्याने ऊर्जेच्या सुविधांच्या ठिकाणी जाळल्या जाणाऱ्या जीवाश्मइंधनांमुळे होते. या क्षेत्रामध्ये ऊर्जावापराशी संबंधित नसलेल्या रासायनिक, धातू आणि खनिज परिवर्तन प्रक्रियेतील उत्सर्जन आणि कचरा व्यवस्थापन क्रियाकलापांमधून उत्सर्जनदेखील समाविष्ट आहे. सन २०२०च्या जागतिक हरितगृहवायू उत्सर्जनाच्या २२ टक्के उत्सर्जन हे शेती आणि वनीकरण या क्षेत्रातून मुख्यतः शेती (पिके आणि पशुधनाची लागवड) आणि जंगलतोड यातून होते. या आकड्यात कार्बन, मृत सेंद्रिय पदार्थ, आणि मातीत कार्बन अलग करून परिसंस्था वातावरणातून काढून टाकणाऱ्या $CO_2$ चा समावेश केलेला नाही. ते या क्षेत्रातून सुमारे २० टक्के उत्सर्जन करतात. सन २०२०च्या जागतिक हरितगृहवायू उत्सर्जनाच्या १५ टक्के उत्सर्जन वाहातूकक्षेत्रातून प्रामुख्याने रस्ते, रेल्वे, हवाई आणि सागरी वाहतुकीसाठी जळलेल्या जीवाश्मइंधनातून होते. जगातील जवळजवळ सर्व (९५ टक्के) वाहतूकऊर्जा पेट्रोलियम-आधारित इंधन, मोठ्या प्रमाणात गॅसोलिन आणि डिझेलमधून येते. सन २०२०च्या जागतिक हरितगृहवायू उत्सर्जनाच्या ६ टक्के उत्सर्जन इमारती व बांधकाम क्षेत्रातून प्रकल्पावर केली जाणारी ऊर्जानिर्मिती आणि इमारतींमध्ये उष्णता किंवा घरांमध्ये स्वयंपाक करण्यासाठी इंधन जाळण्यामुळे उद्भवते. ९ टक्के उत्सर्जन हे थेट वीज किंवा उष्णता उत्पादनाशी संबंधित नाहीत अशा इतर क्षेत्रांतून म्हणजे तेलविहिरींमधून इंधन काढणे, शुद्धीकरण, विविध रासायनिक प्रक्रिया यातून होत असते.

सन २०२२ मध्ये, सर्वोच्च कार्बन डायऑक्साइड उत्सर्जित करणारे चीन, अमेरिका, युरोपीयन युनियन, भारत, रशियन फेडरेशन आणि जपान हे देश होते. या उत्सर्जनात जीवाश्मइंधनाच्या ज्वलनातून निघणारा कार्बन डायऑक्साइड, तसेच सिमेंट उत्पादन करताना होणारे उत्सर्जन आणि वायुज्वलन (गॅस फ्लेअरिंग) यांचा समावेश आहे. एकत्रितपणे, ह्या स्रोतांचा एकूण जागतिक $CO_2$ उत्सर्जनात मोठा वाटा आहे. कृषी, वनीकरण आणि इतर जमिनीच्या वापरातून निव्वळ जागतिक हरितगृहवायू उत्सर्जन ८ अब्ज मेट्रिक टन $CO_2$ समतुल्य होते. एकूण जागतिक हरितगृह वायू उत्सर्जनाच्या सुमारे २४ टक्के उत्सर्जन अमेरिका आणि युरोप यांसारख्या क्षेत्रांमध्ये, मानवी गतीविधींशी संबंधित


जमिनीच्या वापरातील बदलांमुळे $CO_2$ शोषून घेण्याच्या निव्वळ परिणामामुळे होते.

पृथ्वीचे तापमान तिच्या प्रणालीमध्ये प्रवेश करणारी ऊर्जा आणि उत्सर्जित केलेली ऊर्जा यांच्या एकूण संतुलनावर अवलंबून असते. सूर्यप्रकाश पृथ्वीवर पोहोचण्यास सुमारे आठ मिनिटे लागतात. जेव्हा सूर्यप्रकाश पृथ्वीच्या पृष्ठभागावर पोहोचतो तेव्हा तो परत अंतराळात परावर्तित होऊ शकतो किंवा काही प्रमाणात वातावरणात शोषला जाऊ शकतो. हरितगृह परिणाम ही एक प्रक्रिया आहे. पृथ्वीच्या वातावरणातील वायू सूर्यप्रकाशातील काही ऊर्जा शोषून घेतात, तेव्हा ही प्रक्रिया घडत असते. पृथ्वीवर वातावरण नसते तर ही प्रक्रिया घडली नसती. ह्या परिणामामुळे सजीवसृष्टीसाठी पृथ्वीवरील वातावरण पोषक व आरामदायक बनवते. म्हणजे हरितगृह परिणाम हा मूलतः सजीवसृष्टीसाठी आवश्यक आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. वातावरणातील जे वायू ऊर्जा शोषून घेतात त्या वायूंना हरितगृहवायू म्हणून ओळखले जाते. ते पांघरुणासारखे किंवा ब्लँकेटसारखे कार्य करतात. हरितगृह परिणाम ही प्रक्रिया नैसर्गिक आणि जीवनाला आधार देण्यासाठी आवश्यक आहे. तिचे संतुलन राखणे गरजेचे आहे. मानवाच्या विविध क्रियांमुळे वातावरणात हरितगृहवायूंचे प्रमाण वाढते व हे संतुलन बिघडते. त्यामुळे गेल्या दोन शतकांमध्ये आणि विशेषतः काही दशकांमध्ये पृथ्वीचे हवामान बदलले आहे. त्याचे फक्त मानवाच्या आरोग्यवरच घातक परिणाम झाले आहेत असे नाही, तर एकूणच सजीवसृष्टीसाठी ते घातक ठरत आहे. कार्बन डायऑक्साइड, मिथेन, नायट्रोजन ऑक्साइड आणि क्लोरोफ्लुयुरोकार्बन हे चार अतिशय महत्त्वाचे हरितगृह वायू आहेत.




**कार्बन डायऑक्साइड**

सन १९५० पासून बहुतेक पृथ्वीवर झालेल्या तापमानवाढीस मानवी हस्तक्षेपामुळे हरितगृहवायूंच्या उत्सर्जनात झालेली वाढ कारणीभूत आहे. कार्बन डायऑक्साइड हा प्राथमिक हरितगृहवायू आहे जो या हवामान बदलास कारणीभूत आहे. कार्बन डायऑक्साइड कसा निर्माण होतो? जीवाश्मइंधन ज्वलन, अनियंत्रित घनकचरा विघटन, झाडे आणि इतर जैविक सामग्री जाळल्यामुळे आणि सिमेंट उत्पादनासारख्या विशिष्ट रासायनिक अभिक्रियांमुळे वातावरणात कार्बन डायऑक्साइड वायूचे प्रमाण वाढते राहते. कार्बन डायऑक्साइड हा कार्बनचक्राचा भाग म्हणून नैसर्गिकरित्या शोषला जातो व उत्सर्जित केला जातो. वनस्पती आणि प्राणी यांच्या श्वसनक्रिया, ज्वालामुखीचा उद्रेक आणि महासागर-वातावरण बदलाद्वारे हे चक्र चालू राहते. कार्बनचक्र




ही अशी साखळीची प्रक्रिया आहे, ज्याद्वारे कार्बन विविध स्वरूपांत सतत वातावरणातून जमिनीकडे व महासागरात आणि नंतर पुन्हा वातावरणात परत जातो. पृथ्वीवरील खडक, गाळ, महासागर आणि सजीवांमध्ये कार्बन साठवला जातो. वनस्पती आणि प्राणी मरतात, तसेच पदार्थ किंवा जीवाश्मइंधने (जसे की कोळसा, नैसर्गिक वायू आणि तेल) जळतात आणि ज्वालामुखीचे उद्रेक होतात, तेव्हा कार्बन पुन्हा वातावरणात सोडला जातो. कार्बनचक्रात पृथ्वीवरील विविध जलाशयांमध्ये कार्बनचे संतुलित प्रमाण आहे. परंतु एका जलाशयातील कार्बनचे प्रमाण बदलले तर त्याचा सर्वांवर कमी अधिक प्रमाणात परिणाम होतो. लोक जीवाश्म इंधन जाळून कार्बनचक्रात अडथळा आणत आहेत, जे वातावरणात कार्बन डायऑक्साइड मोठ्या प्रमाणात सोडतात आणि जमिनीच्या वापराच्या स्वरूपात बदल करतात.

इथे एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेणे गरजेचे आहे. जीवाश्मइंधने निर्माण कशी झाली याचा विचार केला तर असे

लक्षात येते, की कित्येक कोटी वर्षांपूर्वी पृथ्वीवर कार्बन-डायऑक्साइडचे प्रमाण खूप जास्त होते आणि ते प्रमाण कमी होताना जी सजीवांची प्रचंड वाढ झाली, त्यामध्ये यापैकी बऱ्याच कार्बन डायऑक्साइडचे स्थिरीकरण झाले. मध्यंतरीच्या काळात डायनासोरसारखे प्रचंड महाकाय प्राणी आणि त्यांना भोजनासाठी लागणाऱ्या महाकाय वनस्पती पृथ्वीवर अस्तित्वात होत्या. त्यामुळे कार्बन डायऑक्साइडचे वातावरणातील प्रमाण बरेच कमी झाले. हे कित्येक लाख वर्षे घडत होते. त्यानंतर एका विशिष्ट कालकखंडात या सर्व सजीवसृष्टीचा नाश होऊन भूकंपामध्ये ती जमिनीखाली गाडली गेली. जमिनीखाली असलेल्या प्रचंड दाबामुळे त्या अवशेषांचे जीवाश्मइंधनात रूपांतर झाले. म्हणजे जीवाश्म इंधनांची निर्मिती हा निसर्गात घडलेला एक चमत्कार होता. त्यामुळे वातावरणातील मोठ्या प्रमाणात असलेला कार्बन डायऑक्साइड जमिनीखाली बंदिस्त केला गेला. त्याची इंधने झाली कारण त्यात ज्वलनशील असा कार्बन आहे. गेल्या काही शतकांमध्ये माणसाची संख्या या पृथ्वीवर प्रचंड वाढली आणि त्यामुळे ऊर्जेच्या गरजा वाढल्या (चित्र २ - मानवी लोकसंख्या आलेख). त्या वाढत्या गरजांपोटी ही जीवाश्मइंधने जास्तीत जास्त वापरण्याच्या प्रघात पडला. म्हणजेच ग्रीक पुराणात असलेल्या पॅनडोराज बॉक्स कथेप्रमाणे आपण ही जमिनीखालची पेटी उघडली आणि कार्बन डाय-ऑक्साइड मुक्त करण्यास सुरुवात केली. चक्रीय कार्बन डायऑक्साइड हवेत मिसळतो तेव्हा त्याचे प्रमाण संतुलित राहते, पण जेव्हा असा बंदिस्त स्वरूपातील कार्बन डायऑक्साइड पृथ्वीच्या वातावरणात निर्माण होतो, तेव्हा ते प्रमाण संतुलित राहत नाही. ते प्रमाण वाढत जाते, हा जीवाश्मइंधनांचा अर्थ आपण लक्षात घेतला तर आता पर्यायी आणि कार्बन शून्य इंधनांची किती गरज आहे हे लक्षात येईल. जोपर्यंत ही जाणीव सम ाजात निर्माण होत नाही, व हे वाढते प्रमाण कमी करण्यासाठी वैयक्तिक पातळीवरून प्रयत्न केले जाणार नाहीत, तोवर हे कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढतच जाणार आहे.

**मिथेन**

मिथेन हा दुसरा हरितगृहवायू नैसर्गिक क्रियांमधून आणि मानवी क्रियांमधून तयार होत असतो. उदाहरणार्थ, नैसर्गिक पाणथळ प्रदेश, कृषीक्षेत्रातील रासायनिक क्रिया, जैविक घनकचरास्रोतांचे अनियंत्रित विघटन, आणि जीवाश्मइंधन आणि वाहतूकक्षेत्रात मिथेनचे उत्सर्जन होत असते. आर्क्टिक आणि अंटार्क्टिका परिसरात मिथेन वायू बर्फात बंदिस्त स्वरूपात आढळतो. त्याला मिथेन हायड्रेट असे म्हणतात. जागतिक तापमानवाढीमुळे या प्रदेशातील बर्फ वितळून त्यातील मिथेन हायड्रेट विरघळतात आणि मिथेन मुक्त होतो. रासायनिकदृष्ट्या पाहिले तर मिथेनची जागतिक तापम ानवाढीची क्षमता ही कार्बन डायऑक्साइडच्या साधारण २१ ते २२ पट एवढी प्रचंड आहे. या हिशेबाने एक मेट्रिक टन जैविक घनकचरास्रोत विघटित झाला तर त्यातून साधारणपणे ४५ ते ५० किलोग्रॅम मिथेन मुक्त होतो. म्हणजेच एक टन घनकचरा स्रोतामुळे एक मेट्रिक टन कार्बन डायऑक्साइड हवेत मिसळतो आणि मुंबईत साधारण रोज तीन हजार जैविक कचरास्रोत डंपिंग यार्डवर विघटित होत असतो. म्हणजेच मुंबईतून रोज जास्तीचा ३००० टन कार्बन डायऑक्साइड हवेत मिसळला जातो. भारताच्या एक टक्का लोकसंख्या मुंबईत असल्यामुळे हा हिशोब केवढा मोठा आहे आणि वैयक्तिक पातळीवर दुर्लक्ष केल्यामुळे त्याचे पर्यवसान किती मोठ्या प्रमाणात होत आहे हे लक्षात येते. हवामानबदलाचे हे विकेंद्रित स्वरूप दुर्दैवाने कोणीच लक्षात घेत नाही, त्यामुळे परिस्थितीत सुधारणा होत नाही. जोपर्यंत जैविक स्वरूपाचा कचरास्रोत डम्पिंगवर जात राहील, तोपर्यंत मिथेनचे प्रमाण वाढतच राहाणार आहे. माझ्या घरात निर्माण होणाऱ्या जैविक कचरस्रोतांचे सेंद्रिय खतात रूपांतर करण्याची जबाबदारी माझी आहे ही जाणीव समाजात निर्माण झाली तरच यात काही बदल घडून येऊ शकेल.

**नायट्रस ऑक्साइड**

तिसऱ्या महत्त्वाच्या हरितगृहवायूची म्हणजे नायट्रस ऑक्साइडची निर्मिती प्रामुख्याने कृषीक्षेत्रातील आणि नैसर्गिक जैविक प्रक्रियांद्वारे होत असते. जीवाश्मइंधन स्वयंचलित वाहनांमध्ये जळताना आणि विविध औद्योगिक प्रक्रियातूनदेखील नायट्रस ऑक्साइडची निर्मिती होत असते. गेल्या काही दशकांमध्ये चारचाकी आणि दुचाकी स्वयंचलित वाहनांची संख्या बेसुमार वाढत चालली आहे. सायकल वापरणे, पायी चालणे, सार्वजनिक वाहतुकीच्या साधनांचा वापर या साऱ्या पर्यावरणपूरक माध्यमांचा विसर समाजाला पडत चालला आहे. अमेरिकेत प्रत्येक चारचाकी वाहनात एकच व्यक्ती असते, असे आपण काही वर्षांपूर्वी म्हणत होतो. भारतातही हेच दृश्य दिसू लागले आहे. माझ्या स्वयंचलित वाहनाचा जागतिक हवामानबदलाशी निकटचा संबंध आहे आणि त्यासाठी पर्यायी सोय करणे माझ्या हाती आहे, ही जाणीव समाजात निर्माण झाल्याशिवाय हे प्रदूषणाचे प्रमाण कमी होणार नाही! स्वयंचलित वाहनांचा वापर निम्मा करता आला, तरी मोठाच फायदा पर्यावरणास होऊ शकतो.

**एफ वायू**


चौथ्या महत्त्वाच्या हरितगृहवायूमध्ये फ्लु-वायू म्हणजे क्लोरोफ्लुरोकार्बन, हायड्रोक्लोरोफ्लुरोकार्बन, हायड्रोफ्लुरोकार्बन, परफ्लुरोकार्बन आणि सल्फर हेक्साफ्लोराइड (एकत्रितपणे एफ-वायू) यांचा समावेश होतो. बहुतेकदा शीतलक, फोमिंग एजंट (विविध सेन्टच्या फवाऱ्यातून) अग्निशामक, सॉल्व्हेंट, कीटकनाशके आणि एअरोसोल प्रोपेलेंटमध्ये हे वायू वापरले जातात व ते हवेत मिसळत राहातात.

**इतर हरितगृहवायू**

जमिनीलगत असलेला ओझोन - सूर्यप्रकाशाच्या उपस्थितीत स्वयंचलित वाहने, औष्णिक उर्जाकेंद्रे आणि इतर औद्योगिक आणि व्यावसायिक स्रोतांमधून नायट्रोजन ऑक्साइड आणि अस्थिर सेंद्रिय संयुगे उत्सर्जन यांच्यातील रासायनिक अभिक्रियांमुळे भू-स्तरीय ओझोन तयार होतो. उष्णतेला अडकवण्याव्यतिरिक्त, भू-स्तरीय ओझोन एक प्रदूषक आहे. त्यामुळे श्वसनाच्या आरोग्याच्या समस्या उद्‌भवू शकतात आणि पिके आणि सभोवतालच्या परिसंस्थेचे नुकसान होऊ शकते.

ओझोन हा वायू पृथ्वीच्या आरोग्यासाठी आवश्यक आहे! ओझोन थर किंवा ओझोन शील्ड हा पृथ्वीच्या स्ट्रॅटोस्फियरचा एक भाग आहे. तो सूर्याच्या प्रकाशातील अतिनील किरणे शोषून घेतो. ते कवच नसेल तर आपल्या सर्वांना या अतिनील किरणांचा त्रास होईल. कर्करोगजन्य असे हे किरण असतात. ओझोन थरात वातावरणाच्या जमिनीलगतच्या भागांच्या तुलनेत ओझोनचे प्रमाण अधिक असते. स्ट्रॅटोस्फियरमधील इतर वायूंच्या तुलनेत ते कमीच आहे. ओझोनच्या थरात प्रती एक लाख भागात ओझोन १पेक्षा कमी भाग असतो, तर पृथ्वीच्या वातावरणात सरासरी ओझोनचे प्रमाण दर एक लाख भागांमध्ये ०.०३ भाग एवढेच असते. ओझोनचा थर मुख्यतः स्ट्रॅटोस्फियरच्या खालच्या भागात, पृथ्वीपासून अंदाजे १५ ते ३५ किलोमीटरवर आढळतो, त्याची जाडी ऋतूनुसार आणि भौगोलिकदृष्ट्या बदलत राहते. १९७०च्या दशकात या थराला उत्तर ध्रुवाजवळ मोठे छिद्र पडले होते. त्यावेळी संशोधनातून त्याचा प्रत्यक्ष संबंध हवेतील क्लोरोफ्लुरोकार्बनशी असल्याचे सिद्ध झाले होते. त्यानंतर त्यावर जागतिक स्तरावर प्रयत्न करण्यात येऊन हवेतील प्रमाण कमी करण्यात शास्त्रज्ञांना यश आले होते.

युरोपीयन स्पेस एजन्सीने (ESA) म्हटले आहे की ओझोन छिद्राचा आकार १६ सप्टेंबर २०२३ रोजी आजपर्यंतचा सर्वात मोठा झाला आहे. ह्या छिद्राचा परीघ २.६ कोटी चौरस किमीपर्यंत पोहोचला आहे. म्हणजेच हे छिद्र ब्राझील देशाच्या आकाराच्या अंदाजे तिप्पट झाले आहे. स्पेस एजन्सीच्या म्हणण्यानुसार ओझोनच्या छिद्राच्या आकारात नियमितपणे चढ-उतार होत असतात. ऑगस्ट ते ऑक्टोबर या कालावधीत, ओझोनचा थर आकारात वाढतो. मध्य सप्टेंबर आणि मध्य ऑक्टोबर दरम्यान त्याचे प्रमाण सर्वात कमी असते. या वर्षी ऑगस्टच्या मध्यापासून



ओझोनचे छिद्र जलद गतीने वाढले आहे असे कोपर्निकस ॲटमॉस्फियर मॉनिटरिंग सर्व्हिसचे वरिष्ठ शास्त्रज्ञ अँटजे इनेस यांनी एका निवेदनात म्हटले आहे. ES ने सांगितले की ओझोन छिद्राच्या आकाराची परिवर्तनशीलता मुख्यत्वे अंटार्क्टिक क्षेत्राभोवती वाहणाऱ्या मजबूत पवनपट्ट्याच्या ताकदीद्वारे निर्धारित केली जाते. हा मजबूत पवनपट्टा पृथ्वीच्या परिभ्रमणाचा आणि ध्रुवीय आणि मध्यम अक्षांशांमधील तीव्र तापमान फरकाचा थेट परिणाम आहे. एजन्सी पुढे म्हणाली, वाऱ्याचा पट्टा मजबूत असेल, तर तो अडथळ्यासारखे काम करतो: ध्रुवीय आणि समशीतोष्ण अक्षांशांमधील हवेच्या वस्तुमानाची यामुळे देवाणघेवाण होऊ शकत नाही. त्यानंतर हवेचे द्रव्य ध्रुवीय अक्षांशांवर विलग राहते आणि हिवाळ्यात थंड होते. तथापि, सध्याच्या ओझोन सांद्रतेमागील नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे. डिसेंबरच्या अखेरीस ओझोनची पातळी सामान्य होते.

या विक्रमी स्वरूपाच्या छिद्रामागे एक कारण, जानेवारी २०२२ मध्ये हुंगा टोंगा ज्वालामुखीच्या उद्रेकाने स्ट्रॅटोस्फियरमध्ये भरपूर पाण्याची वाफ मिसळली गेली, हे असू शकते. ही वाफ सन २०२२च्या ओझोनछिद्राच्या समाप्तीनंतर फक्त दक्षिण ध्रुवीय प्रदेशात पोहोचली. या जलबाष्पामुळे ध्रुवीय समतालमंडलातील ढगांची निर्मिती वाढू शकते, जेथे क्लोरोफ्लुरोकार्बन (सीएफसी) रासायनिक अभिक्रिया घडवू शकतात आणि ओझोन कमी होण्यास गती देऊ शकतात. पाण्याच्या वाफेची उपस्थिती अंटार्क्टिक स्ट्रॅटोस्फियरच्या थंड होण्यास देखील कारणीभूत ठरू शकते. या ध्रुवीय स्ट्रॅटोस्फेरिक ढगांची निर्मिती आणि परिणामी अधिक मजबूत ध्रुवीय भोवरा निर्माण होतो. हवामानबदलामुळे जी तापमानातील विषमता पृथ्वीच्या विविध भागांमध्ये निर्माण होऊ लागली आहे, तिचे कसे आणि कुठे परिणाम होतील हे सांगता येणे कठीण आहे. ही विषमता आपल्यामुळे तरी होऊ

नये अशी अपेक्षा करून आपण आपला भविष्यातील मार्ग निश्चित केला पाहिजे.

**पाण्याची वाफ**


बाष्पाच्या स्वरूपातील पाणी म्हणजे पाण्याची वाफ हा आणखी एक हरितगृहवायू आहे आणि त्याच्या उष्णतेला अडकवण्याच्या क्षमतेमुळे हवामानाच्या विविध क्रियांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतो. उबदार हवेत थंड हवेपेक्षा जास्त आर्द्रता असते. म्हणून, हरितगृहवायूंचे प्रमाण वाढते आणि जागतिक तापमान वाढते, तसतसे वातावरणातील पाण्याच्या बाष्पाचे एकूण प्रमाणदेखील वाढते, ज्यामुळे तापमानवाढीचा परिणाम आणखी वाढतो. कितीतरी औद्योगिक वसाहतींमध्ये पाण्याची वाफ सातत्याने हवेत मिसळत राहते. त्याकडे दुर्लक्षच केले जाते, कारण ती थांबवण्यासाठी जे उपाय करावे लागतात, ते खर्चीक असतात! प्रेशर कूकरच्या अनावश्यक शिट्ट्यांमुळे हवेतील पाण्याच्या वाफेचे प्रमाण वाढते. हवामानबदलाचे हे विकेंद्रित स्वरूप दुर्दैवाने कोणीच लक्षात घेत नाही, त्यामुळे परिस्थितीत सुधारणा होत नाही. कूकरच्या शिट्ट्या होत राहातात, पाण्याच्या वाफेचे प्रमाण वाढत राहते आणि जागतिक हवामान बदलत राहाते. औद्योगिक स्तरावर पाण्याची वाफ हवेत मिसळण्याचे प्रमाण जसे नियंत्रित करण्याची आवश्यकता आहे, तसेच वैयक्तिक स्तरावरपण कूकरची शिट्टी ही हवामानबदलास कारणीभूत ठरू शकते, ही जाणीव समाजात झाली तरच त्यात काही सुधारणा होऊ शकते. कूकरची शिट्टी हे उदाहरण झाले. अशा अनेक बाबी असतात, उदाहरणार्थ, स्वयंपाकघरात गॅस वापरताना नियंत्रित स्वरूपात कसा वापरू शकतो, रेफ्रिजरेटरची उघडझाप कशी नियंत्रित स्वरूपात करता येईल, अंघोळीसाठी पाणी खूप गरम करून मग विसण घालण्याऐवजी कमी गरम करावे, इत्यादी, यांची दखल रोजच्या रोज घेणे आवश्यक असते.


**एरोसोल**

वातावरणातील एरोसोलचे प्रमाण हवामानावर प्रतिकूल परिणाम करू शकतात. एरोसोल हे सूक्ष्म (घन किंवा द्रव) कण असतात. ते इतके लहान असतात की ते मोठ्या कणांप्रमाणे त्वरित पृष्ठभागावर पडण्याऐवजी कितीतरी दिवस हवेत फिरत राहतात. जीवाश्म इंधन आणि लाकडी इंधनाच्या ज्वलनातून म्हणजे मानवी क्रियांमधूनच या पदार्थांच्या उत्सर्जनास हातभार लागतो. काही एरोसोल ज्वालामुखी आणि सागरी प्लँक्टनसारख्या नैसर्गिक स्रोतांमधून येतात. हरितगृहवायूंच्या तुलनेत एरोसोलचे हवामान प्रभाव ते कशापासून बनवले जातात आणि ते कोठे उत्सर्जित केले जातात यावर अवलंबून असतात. त्यांच्या रंगावर आणि इतर घटकांवर अवलंबून, एरोसोल एक तर सूर्यप्रकाश शोषू शकतात किंवा परावर्तित करू शकतात. सूर्यप्रकाश प्रतिबिंबित करणारे एरोसोल म्हणजे ज्वालामुखीच्या उद्रेकाचे कण किंवा जळत्या कोळशातून होणारे सल्फर उत्सर्जन हे हवामान थंड करतात. तर सूर्यप्रकाश शोषून घेणारे काळ्या कार्बनचे (काजळीचा एक भाग) कण, हवामान उष्ण करतात. काळा कार्बन केवळ येणारा आणि परावर्तित सूर्यप्रकाशच थेट शोधतो असे नसून, अतिरक्त किरणदेखील शोषू शकतो. काळा कार्बन बर्फावरदेखील जमा होऊ शकतो, त्यामुळे बर्फाचा पृष्ठभाग गडद होतो आणि त्यामुळे बर्फाच्या थरातून सूर्यप्रकाशाचे शोषण वाढते. त्यामुळे त्याचे वितळणे वाढते. काळ्या कार्बन कणांच्या उत्सर्जनात लक्षियत कपात केली तर जागतिक तापमानवाढ कमी करू शकते. एरोसोल ढगांवर परिणाम करत असतात. ढगांची निर्मिती आणि विघटन यामुळे पर्जन्य प्रमाण बदलू शकते. ढग थंड होण्यास एरोसोल हातभार लावू शकतात, तसेच सूर्यप्रकाश परावर्तित करून आणि बाहेर जाणारी उष्णता अडकवून तापमान वाढवू शकतात. रोज मारल्या जाणाऱ्या सेंटच्या फवाऱ्यांमधूनही एरोसोलचे प्रदूषण वाढत जाते. त्यामुळे एरोसोल कमी करण्याचे उपाय औद्योगिक स्तरावर होणे आवश्यक आहेत, तसेच वैयक्तिक गरजा कमी करून प्रत्येकाने त्यास हातभार लावला पाहिजे, ही जाणीवदेखील समाजात निर्माण होणे तेवढेच गरजेचे आहे.

**प्लास्टिक प्रदूषण**

प्लास्टिकचा शोध १९०७मध्ये लागला. सुरुवातीला त्याची महती फारशी लक्षात आली नव्हती. दुसऱ्या महायुद्धात गरज म्हणून निर्माण झालेल्या प्लास्टिकने युद्धानंतर मात्र पृथ्वी, आकाश आणि पाताळ व्यापून टाकले. १९५० साली एक लाख टन निर्मिती होत असलेल्या प्लास्टिकचे सन २०२२ साली उत्पादन सुमारे २३९ टनांवर गेले होते. गेल्या साठ वर्षांत प्लास्टिकचे सुमारे ३५ अब्ज टन इतके प्रचंड उत्पादन झालेले आहे आणि सन २०५० पर्यंत हा आकडा ५० अब्ज टनांपर्यंत जाईल असा अंदाज आहे. यापैकी काही प्रगत देश वगळता प्लास्टिकच्या पुनर्चक्रांकनाचे प्रमाण फक्त ९ टक्के आहे. म्हणजे हे प्रचंड प्लास्टिक वातावरणात जमा होत आहे. सागरी प्रदूषण, नदी प्रदूषण आणि सर्वच जलस्रोतांचे प्रदूषण त्यामुळे होत आहे. या प्लास्टिक उत्पादनात काही प्रगत देश वगळता कोणतेही प्रदूषण नियंत्रणाचे नियम काटेकोरपणे पाळत नसल्यामुळे




मायक्रो प्लास्टिकचे प्रमाण पर्यावरणात प्रचंड वेगाने वाढत होते. त्याचे आरोग्यावर नेमके कोणते परिणाम होत आहेत हे आता समजू लागले आहे. कर्करोगजन्य हे मायक्रो प्लास्टिक मानवी आरोग्यासाठी मोठाच धोका बनत आहे. शिवाय ठिकठिकाणी साचलेल्या प्लास्टिकमुळे मानवा व्यतिरिक्त इतर सजीवसृष्टीलाही मोठाच धोका निर्माण झाला आहे. यातील वापरा आणि फेका स्वरूपाचे प्लास्टिक सर्वात त्रासदायक असते कारण त्याचे पुनर्चक्रांकन होत नाही. आपण सर्वच जण हे प्लास्टिक सतत वापरत असतो. पार्ट्या देताना, पिकनिकला जातांना मोठ्या प्रमाणावर डिस्पोजेबल प्लास्टिकच्या वस्तू आपण सर्वच वापरतो आणि पर्यावरणाचा विचार न करता कचऱ्यात टाकून देतो! आणि वर मी एकटा काय करू शकतो, असा प्रश्नही विचारतो! पण प्रत्येकाने वैयक्तिक पातळीवर प्लास्टिकचा वापर शून्य केला तर हे प्रदूषण टाळणे अवघड नाही.

हवामानबदलाला आपण कसा प्रतिसाद देतो हे महत्त्वाचे आहे. आपल्यामुळे हा बदल होणार नाही याची पृथ्वीवरील ८१० कोटी लोकांनी ठरवले तर खूप फरक पडू शकतो आणि त्याचा प्रत्यक्ष परिणाम पुढील पिढ्यांचे उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी होऊ शकतो. काही बाबतींत ही नैसर्गिक प्रक्रिया आहे जी हवामानप्रणालीमध्ये तडजोड करून किंवा पुढील वाढत्या बदलाद्वारे ग्लोबल वार्मिंगला प्रतिसाद देतात. हवामानातील बदल वाढविणाऱ्या प्रतिसादास नकारात्मक प्रतिसाद म्हणतात. जैसे थे स्थिती कायम ठेवणाऱ्या म्हणजे, आज आहे ते बदल पूर्ववत स्थितीस आणणाऱ्या प्रतिसादास सकारात्मक प्रतिसाद म्हणतात. पाण्याची वाफ कमी करणे हा सकारात्मक प्रतिसादास कारणीभूत असणारा सर्वात महत्त्वाचा घटक आहे असे दिसते. पृथ्वी गरम होते तसतसा बाष्पीभवनाचा वेग आणि हवेतील पाण्याच्या बाष्पाचे प्रमाण हे दोन्ही वाढते. कारण पाण्याची वाफ हा हरितगृहवायू आहे, त्यामुळे आणखी तापमानवाढ होते. आर्क्टिक समुद्रातील बर्फ वितळणे हे नकारात्मक हवामान प्रतिसादाचे आणखी एक उदाहरण आहे. तापमान वाढते तसतसे समुद्रातील बर्फ ध्रुवीय प्रदेशाकडे ढकलला जातो. बर्फ वितळल्यामुळे समुद्राचा पृष्ठभाग बर्फापेक्षा जास्त सूर्यप्रकाश शोषून घेतो, ज्यामुळे तापमानवाढीचे एकूण प्रमाण वाढते. ढगांचा हवामानावर तापमान वाढणे आणि थंड होणे असे दोन्ही परिणाम होऊ शकतात. दिवसा सूर्यप्रकाश परावर्तित करून ते पृथ्वीला थंड करतात आणि उष्णतेचे अंतराळात जाणे कमी करून ते वातावरण उबदार करतात. हा परिणाम रात्रीच्या वेळी सर्वात स्पष्ट असतो, कारण ढगाळ रात्री सामान्यतः स्वच्छ रात्रींपेक्षा जास्त उबदार वातावरण असते. हवामानातील बदलामुळे ढगांच्या व्याप्ती, उंची आणि परावर्तकतेमध्ये बदल होऊ शकतात. हे बदल पुढे एक तर वाढू शकतात (नकारात्मक प्रतिसाद) किंवा मूळ बदल (सकारात्मक अभिप्राय) कमी करू शकतात. मुख्यतः उष्णकटिबंधातील उंच ढगांची उंची वाढत आहे, ज्यामुळे ते उष्णता अधिक चांगल्या प्रकारे पकडू शकतात आणि मध्य-अक्षांशांमध्ये निम्नस्तरीय ढगांचे आच्छादन कमी करतात. त्यामुळे परावर्तित होणाऱ्या सूर्यप्रकाशाचे प्रमाण कमी होते. क्लाउड/हवामान परस्परसंवादाच्या जटिल स्वरूपामुळे या प्रतिसादाचा परिमाण अनिश्चित आहे.

आपण वैयक्तिक पातळीवरूनच ह्या जागतिक तापमान वाढीशी आणि हवामानबदलाशी सामना करू शकतो. हे लक्षात घेतले तर मग त्याचे एकात्मिक परिणाम जागतिक स्वरूपात दिसून येतील. तशी प्रतिज्ञा करून आपण सुरुवात करूया. ही आपली लाडकी वसुंधरा प्रदूषणमुक्त करण्याचा निर्धार करूया.

**– शरद काळे**
sharadkale@gmail.com

# पर्यटनाचे बदलते आयाम



सुवर्णा साधू

गेल्या तीन दशकांमध्ये भारतात आंतरराष्ट्रीय पर्यटकांच्या आगमनात लक्षणीय वाढ झाली आहे. सुधारित कनेक्टिव्हिटी, उत्तम मार्केटिंग आणि देशातील विविध आकर्षणे यांनी या वाढीस हातभार लावला आहे. परिणामी, पर्यटनक्षेत्राच्या महसुलात लक्षणीय वाढ झाली आहे. अंतर्गामी पर्यटन हे नेहमीच त्या-त्या देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देते. आज भारताने विदेशी पर्यटकांसाठी अनेक पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. अगदी आयुर्वेदिक उपचार घेण्यापासून लग्नसोहळा साजरा करण्यासाठी, परदेशी पाहुणे आपल्या देशात येत असतात.

पंधराव्या शतकात, केरळच्या तटावर पोचलेला वास्को-द-गामा, काही पर्यटनाला आला नव्हता! पण त्याच्याही आधी ग्रीक आणि रोमन लोक वायव्येकडून आणि नैऋत्येकडून तर त्यांच्याही आधी चिनी लोक ईशान्य आणि आग्नेयकडून भारताबरोबर व्यापारासाठी संपर्कात होते. पर्यटन मात्र एकोणिसाव्या शतकाच्या आसपास सुरू झाले. परदेशातल्या वाऱ्या आधी बोटींनी आणि मग विमानाने सुरू झाल्या. देशातल्या देशातदेखील, बैलगाडी, बस, आगगाडी आणि आता विमान असा प्रवाससाधनांचा प्रवास झाला. चेंज इज द ओन्ली कॉन्स्टंट असे म्हणतात ते काही उगाच नाही. त्याच कंटाळवाण्या चाकोरीतून माणसाला एक बदल पाहिजे असतो. वेगळे लोक, वेगळी ठिकाणे, वेगळे जेवण... सगळाच बदल. पर्यटनामुळे हा बदल घडून येतो आणि आजच्या धकाधकीच्या जीवनात एक नवी उमेद नक्कीच देऊन जातो. सुट्टीत आजोळी जाणे, शाळेतून ट्रिपला जाणे किंवा कुलदैवतांच्या दर्शनाला जाणे, अगदी कळस म्हणजे पावसाळ्यात खंडाळ्याचा घाट चढणे म्हणजेच पर्यटन अशी व्याख्या माहीत असलेल्या पिढीतली मी. परदेशी फिरायला जाणे, अगदी देशातल्या देशात फिरायला जाणे आणि हॉटेलात राहणे, म्हणजे श्रीमंतीचे चोचले, असा एक सार्वजनिक समज होता! आज मात्र याच पर्यटनव्यवसायात मी गेली पंचवीस वर्षे कार्यरत आहे.

कोविडपूर्व काळात भारतातले अंतर्गामी पर्यटन म्हणजे, परदेशी पर्यटक आपल्या देशात येतात ते; बहिर्गामी पर्यटन म्हणजे, आपण बाहेरच्या देशात फिरायला जातो ते; आणि देशांतर्गत पर्यटन म्हणजे आपण आपल्याच देशात फिरतो ते, अगदी जोरात सुरू होते. मात्र पर्यटनव्यवसायाला उद्योगाचा दर्जा देणे, हे भारतात फार उशिरा घडले. खरे तर सहाव्या पंचवार्षिक योजनेत आर्थिक वाढ, सामाजिक एकात्मता आणि शांतता राखण्यासाठी पर्यटनाचा वापर करण्यावर जोर देण्यात आला होता आणि त्याही आगोदर, १९६६ साली देशाच्या पर्यटन उद्योगाच्या विकास, संवर्धन आणि वाढीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्यासाठी इंडियन टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनची (ITDC) स्थापना झाली होती. पण तरीदेखील, या उद्योगात व्हावी तेवढी वाढ झाली नाही. १९८२ साली आपले पहिले पर्यटनधोरण जारी झाले, ज्याचे उद्दिष्ट शाश्वत पर्यटनाला सामाजिक आणि आर्थिक समावेशाचे साधन म्हणून पुढे नेणे आणि भारताची प्रतिष्ठा वाढवणे हे होते. यानंतर मात्र पर्यटनक्षेत्र, नोकऱ्या, महसूल, परकीय चलन आणि विश्रांतीचा स्रोत म्हणून वाढीला लागले. अनेक देशांमध्ये भारतीय पर्यटन विभागाच्या शाखा उघडू लागल्या आणि त्यांच्याद्वारे, भारतात येणाऱ्या पर्यटकांची संख्या हळूहळू वाढू लागली.

जग नुकतेच नव्वदीच्या दशकात पाऊल ठेवत होते. संपूर्ण जगाची अर्थव्यवस्था बदलत होती. भारतसुद्धा एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करत होता. भारताकडे, एक उज्जवल भवितव्य असलेला देश म्हणून पाहिले जात होते. नवीन उद्योजक, नवीन गुंतवणुकी सुरू होत्या. आणि

त्याच सुमारास आलेल्या कम्प्युटरक्रांतीने तर जगाला अधिकच जवळ आणले.

या व्यवसायाशी संबंध येण्यास माझे चिनी भाषेचे ज्ञान कारण झाले. झाले असे, की १९९०-९१ मध्ये केव्हातरी, मी शिकत असतानाच, एका पर्यटन कंपनीमध्ये काम करणारा मित्र आला. म्हणाला, ८-१० चिनी लोक आहेत, त्यांना दिल्ली दाखवायची आहे, चिनीशिवाय दुसरी कोणतीही भाषा त्यांना येत नाही, तू दाखवशील? त्या कामाचा मोबदला तर मिळालाच, शिवाय एक अतीव आनंद झाला. परदेशी लोकांना भारताविषयी पुष्कळ काही सांगू शकले. भारताविषयीचे गैरसमज दूर करू शकले. गरिबी आहेच, त्याचबरोबर आपुलकी आहे, आतिथ्य आहे, आणि प्रचंड वैविध्य असलेला आमचा देश आहे, हे त्यांना समजावून सांगू शकले, याचा आनंद. पुढे त्याची आवड निर्माण झाली आणि अशी अनेक कामे मिळू लागली.

त्या काळी भारतात चिनी पर्यटकांचा लोंढा येणे नुकतेच सुरू झाले होते. तोवर केवळ अमेरिकन, युरोपीय आणि काही जपानी पर्यटकांचा भरणा असे. आणि बहुतांश पर्यटक हे केवळ ताजमहाल बघण्याच्या ओढीने भारतात येत, आणि लवकरच भारताचे नैसर्गिक आणि इतर वैविध्य पाहून अचंबित होत असत. चिनी पर्यटक म्हणजे चार दिवसांचा दिल्ली-आग्रा आणि जयपूर असा धावता दौरा करणारे, आणि मोठ्या संख्येने बौद्ध ठिकाणांना भेट देणारे म्हणून प्रसिद्ध होते. १९८०-९० च्या दशकांत येणारे बहुतेक अंतर्गामी पर्यटक, हे भारताच्या उत्तरेलाच भेट देत असत. दिल्ली, आग्रा आणि राजस्थानमधले महाल आणि काश्मीर ही त्यांच्यासाठी प्रमुख आकर्षणस्थळे होती. पूर्व, पश्चिम, दक्षिण आणि ईशान्य भारताला भेट देणारे फारच कमी पर्यटक असत.

त्या काळी भारतातील सुविधा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नव्हत्या. भारताचा व्हिसा मिळायला अनेक सायास पडत, अनेक कागदपत्रे जमा करावी लागत, अनेक पानी फॉर्म भरावे लागत. तसे पाहता, अमेरिकन नागरिकांना अनेक देशांत, व्हिसा अपॉन अरायव्हलची सोय तेव्हादेखील होती. पण भारतात येण्यासाठी मात्र त्यांना व्हिसा लागे, ज्याची प्रक्रिया वेळखाऊ होती. विविध देशांत उघडलेल्या पर्यटन विभागाच्या शाखा पूर्ण माहिती देऊ शकत नसत. त्याचे मुख्य कारण म्हणजे, तिथे काम करणाऱ्यांना पर्यटनउद्योगाबद्दल फारशी माहिती नसे. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जायला किती वेळ लागू शकतो, हे १९९०च्या दशकात तरी कोणीच सांगू शकत नसे! त्यात उत्तर भारतीय अधिकारी असला तर त्याला दक्षिण किंवा इतर भारतीय प्रातांचे ज्ञान असणे संभवच नव्हते आणि तीच गत इतर प्रांतीय अधिकाऱ्यांची होती.

तीन दशकांपूर्वी भारतातील पर्यटनासाठी उपयुक्त मूलभूत सुविधा अविकसित होत्या. राहण्याचे पर्याय, वाहतूक, खाण्याची ठिकाणे इत्यादी मर्यादित होते. लहान शहरांत नाही, तर मोठ्या शहरांमध्येसुद्धा या सुविधांचा अभाव होता. १९७०च्या दशकात फ्रान्समधून अमेरिकेत स्थायिक झालेले जोडपे, मार्टिन आणि मिशेल हिरीषर, यांचा भारत प्रवासाचा अनुभव खरोखर या तीस वर्षांचा आहे. १९९२ साली ते प्रथम भारतात आले, तेव्हा त्यांना फारशी काहीच माहिती नव्हती. केवळ गांधींचा देश म्हणून हे दाम्पत्य भारतात आले, आणि भारताच्या प्रेमात पडले! १९९२ पासून आजपर्यंत दर चार-पाच वर्षांनी ते येतात आणि प्रत्येक वेळेस आम्हाला केवढा तरी बदल दिसतो, असे म्हणतात. त्यांनी अगदी अंदमानपासून काश्मीरपर्यंत, संपूर्ण भारत पालथा घातला आहे. त्यांच्यासारखे वारंवार येणारे पर्यटक अनेक आहेत.

सन १९९० चे दशक संपता-संपता आणि शताब्दीच्या वळणावर, पर्यटन नियोजनाला चालना देण्याचे साधन म्हणून पर्यटनक्षेत्रात खाजगी क्षेत्राच्या वाढत्या सहभागावर जोर देण्यात आला. हाहा म्हणता देशात अनेक ट्रॅव्हल एजन्सी सुरू झाल्या. अनेक नवीन विमान कंपन्या आल्या. अर्थव्यवस्था आणि जीवनमान सुधारत चालले होते. त्यामुळे पर्यटन हा केवळ शौक न उरता, एक प्रकारची गरज बनली. एकविसावे शतक सुरू होत असतानाच देशात अनेक नवीन उद्योग सुरू झाले. नोकरदारांचे पगार वाढले, आणि सुट्ट्यांमध्ये - हनिमूनसाठी एखादी लहानशी फॉरेन ट्रिप लोक करू लागले. प्रवास किंवा पर्यटन केवळ निवृत्त लोकांसाठी आता उरले नाही.

गेल्या तीस वर्षांत तांत्रिक प्रगती, जागतिकीकरण, ग्राहकांची बदलती पसंती आणि विविध सामाजिक-आर्थिक घटकांमुळे प्रवास आणि पर्यटनउद्योगात लक्षणीय बदल झाले आहेत. इंटरनेटच्या आगमनाने प्रवासाचे नियोजन आणि बुकिंग करणे सोपे झाले आहे. हॉटेले असोत किंवा विमानसेवा, लोकांना असंख्य पर्याय मिळतात. इंटरनेटमुळे त्या-त्या जागेचे संशोधन आणि आरक्षण दोन्ही सुकर झाले आहे. २०१० नंतर तर स्मार्टफोनच्या व्यापक तंत्रज्ञानामुळे लोक अगोदर काहीही बुकिंग न करता, बिनधास्त प्रवासाला निघतात. यात युवा प्रवाशांची संख्या अधिक असते. डिजिटल नकाशे, Airbnb सारखी स्वस्त हॉटेल्स, आणि Ola-Uber सारख्या वाहनसोयींनी या प्रवाशांची संख्या वाढवली आहे.

इंटरनेटमुळे लोकांना आपल्या तसेच दुसऱ्या अनेक देशांबद्दल माहिती मिळू लागली. त्यामुळे अनेक प्रवासी केवळ पारंपरिक प्रेक्षणीय स्थळांनाच भेट देण्यापेक्षा त्या देशाचा खरा अनुभव घेण्यासाठी उत्सुक असतात. भारतातदेखील आज,

केवळ ताजमहाल बघण्यासाठी न येता, अनेक भारतीय सणांमध्ये सामील होण्यासाठी, भारताची जंगले, त्यातले प्राणी बघण्यासाठी भारतात येतात. नृत्य, संगीत, कला, लोककला यांचा अनुभव घेण्यासाठी भारतात येतात, तसेच अनेक भारतीयदेखील परदेशात जातात. काही खाद्यप्रेमी तर केवळ विविध प्रदेशांतले उत्तम पदार्थ कसे बनवतात ते शिकायला आणि खायला भारतात येतात. योगाभ्यास, आयुर्वे द आणि साहसी खेळ खेळण्यासाठी येतात. आरोग्यसेवेच्या जागतिकीकरणामुळे वैद्यकीय पर्यटनाला चालना मिळाली आहे, लोक वैद्यकीय उपचार घेण्यासाठी आणि वैद्यकीय प्रक्रियांसाठी परदेशात प्रवास करतात. याचबरोबर राजकीय आणि आर्थिक बदलांमुळे प्रवासाचा कल बदलला आहे. एके काळी फक्त भारतीयच नव्हे तर जगातील बहुतेक प्रवाशांचे मुख्य आकर्षण युरोप आणि अमेरिका होते. आता मात्र, चीन आणि भारतासारखे आशियाई देश, मोरोक्को आणि केन्यासारखे आफ्रिकी देश, न्यूझीलंड अगदी आइसलंड यांसारखे देश आणि व्हिएतनाम, लाओस कंबोडियासारखे लहान देश, अशी नवीन गंतव्यस्थाने उदयास आली आहेत. तिथली संस्कृती, तिथले खाद्यपदार्थ, तिथले लोक, त्यांची लोककला, याचा अनुभव घेण्यास पर्यटक उत्सुक असतात.

भारतातदेखील, पर्यटनावर, आर्थिक व्यवस्थेतला एक महत्त्वपूर्ण उद्योग म्हणून २००२ ते २००७ या वर्षांमधे अधिक जोर देण्यात आला. भारतातील पर्यटनक्षेत्र हे रोजगाराचे एक फार मोठे साधन बनले आहे. उदरनिर्वाहासाठी पर्यटनावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असलेले लोक आज भारतात कमी नाहीत. मूलभूत सुविधांचा विकास होत असल्याने, प्रवास सुकर झाला आहे. वैशाली, श्रावस्ती अशा ठिकाणी १९९५-९७ पर्यंत काहीच सुविधा नव्हत्या. पण २०१० नंतर तिथे अनेक हॉटेले उभी झाली, रस्ते सुधारले आणि वाहतुकीची साधने अत्याधुनिक आणि अधिक कार्यक्षम होऊ लागली. याचबरोबर जागतिक स्तरावर e-visa ही सवलत सुरु झाली. अनेक मित्र देश एकमेकांना ही सुविधा उपलब्ध करून देत आहेत. अनेक मित्र देश एकमेकांना व्हिसा अपॉन अरायव्हल उपलब्ध करून देत आहेत. एकूणच, भारताच्या आणि जागतिक पर्यटनक्षेत्राने गेल्या तीस वर्षांत उल्लेखनीय वाढ आणि परिवर्तन अनुभवले आहे.

गेल्या तीन दशकांमध्ये भारतात आंतरराष्ट्रीय पर्यटकांच्या आगमनात लक्षणीय वाढ झाली आहे. सुधारित कनेक्टिव्हिटी, उत्तम मार्केटिंग आणि देशातील विविध आकर्षणे यांनी या वाढीस हातभार लावला आहे. परिणामी, पर्यटनक्षेत्राच्या महसुलात लक्षणीय वाढ झाली आहे. अंतर्गामी पर्यटन हे नेहमीच त्या-त्या देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देते. आज भारताने विदेशी पर्यटकांसाठी अनेक पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. अगदी आयुर्वेदिक उपचार घेण्यापासून लग्नसोहळा साजरा करण्यासाठी, परदेशी पाहुणे आपल्या देशात येत असतात. ताजमहाल आणि जयपूरचे किल्ले यांसारखी ऐतिहासिक आणि सांस्कृतिक आकर्षणे अजूनही लोकप्रिय आहेत, हिमालयातील साहसी पर्यटन, केरळमधील वेलनेस टूरिझम यासारख्या विशिष्ट विभागांना महत्त्व प्राप्त झाले आहे. मुंबईत येऊन अनेकांना बॉलिवूड पाहायची इच्छा असते.

गेल्या ३० वर्षांत तंत्रज्ञानाने भारताच्या पर्यटन क्षेत्रात क्रांती घडवून आणली आहे. इंटरनेट, ऑनलाइन बुकिंग प्लॅटफॉर्म आणि ट्रॅव्हल ॲप्सच्या व्यापक वापरामुळे देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय प्रवाशांसाठी त्यांच्या सहलींचे नियोजन आणि बुकिंग करणे सोपे झाले आहे. याशिवाय, जगभरातील पर्यटन स्थळ म्हणून भारताचा प्रचार करण्यासाठी डिजिटल मार्केटिंग आणि सोशल मीडियाचा मोठा वाटा आहे. भारताने अलिकडच्या वर्षांत टिकाऊ पर्यटन अर्थात sustainable टुरिझमचा स्वीकार केला आहे. अनेक पर्यावरणपूरक उपक्रम स्वीकारले आहेत, जे आज लोकांना पसंत पडते आहे.

जितके जास्त अंतर्गामी पर्यटन, तितक्या अधिक नोकऱ्या, जास्त काम आणि देशासाठी अधिक महसूल. या समीकरणामुळे, भारताने पर्यटनाच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी गुंतवणूक केली आहे, ज्यात विमानतळांचे आधुनिकीकरण, रस्त्यांचे जाळे अपग्रेड करणे आणि उत्तम निवास व्यवस्था विकसित करणे समाविष्ट आहे. यामुळे प्रवाशांसाठी एकूणच पर्यटनाचा अनुभव चांगला झाला असून, देशाच्या विविध क्षेत्रांमध्ये पर्यटन वाढीस मदत झाली आहे. भारत हा प्रचंड आणि वैविध्यपूर्ण देश आहे. जिथे वाळवंट आहे तसेच बर्फाचे डोंगर देखील आहेत, जिथे एका समुद्रावर सूर्य उगवतो, तर दुसऱ्यावर मावळतो, जिथे घनदाट जंगले आहेत आणि त्यात राहणारे सुंदर प्राणी आहेत. प्रत्येक मैलावर बदलणारी भाषा, कपडे आणि खाणे आहे. या सगळ्या गोष्टींचा फायदा जर भारतीय पर्यटन क्षेत्राने घेतला, तर तो दिवस दूर नाही जेव्हा पर्यटन हा भारतीय अर्थव्यवस्थेचा एक मजबूत स्तंभ बनेल. ३० वर्षांत बदल नक्कीच झालेत आणि ते सकारात्मक आहेत, पण तरी अजून खूप काही बाकी आहे. आणि म्हणूनच संपूर्ण भारतीय पर्यटन उद्योगाच्या शाश्वत विकासाची आणि त्याच्याशी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे जोडलेल्या लोकांसाठी आणखीन बदल नक्की घडून येतील अशी आशा करूया.

**– सुवर्णा साधू**
suvarna_sadhu@yahoo.com



# आर्टिफिशियल इंटेलिजन्सची रूपं...

अमोल साळे

आपल्या मेंदूसारखा स्मार्ट संगणक तयार करण्याचा प्रयत्न करणे हे खरे तर अतिशय आव्हानात्मक काम आहे. गगनचुंबी इमारती बांधणे, माणसांना अंतराळात पाठवणे, बिग बँग नक्की कसा घडला या सगळ्यांचे तपशील शोधणे या सर्व कार्यांपेक्षा आपल्या स्वतःच्या मेंदूला समजून घेणे जास्त अवघड आहे.

We are on the edge of change comparable to the rise of human life on Earth. - Vernor Vinge

गोष्ट १९९७ची आहे. या वर्षी IBM च्या डीप ब्ल्यू सुपर कम्प्युटरने ऐतिहासिक सहा डावांच्या बुद्धिबळ सामन्यात विद्यमान जागतिक बुद्धिबळ चॅम्पियन गॅरी कास्परोव्हचा पराभव केला होता. डीप ब्ल्यू हा विशेषत: बुद्धिबळ खेळण्यासाठी डिझाइन केलेला सुपरकम्प्युटर होता आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विकासात हा एक मैलाचा दगड होता. या सामन्याने साऱ्या जगाचे लक्ष वेधले कारण त्याने बुद्धिबळ खेळण्यासारख्या जटिल कार्यात मानवी तज्ज्ञांना मागे टाकण्याची AI ची क्षमता दाखवून दिली. डीप ब्ल्यूचा विजय हा संगणक बुद्धिबळातील अनेक वर्षांच्या संशोधन आणि विकासाचा कळस होता, ज्यामध्ये प्रगत अल्गोरिदमचा वापर समाविष्ट होता. या घटनेने मशीन लर्निंग आणि आर्टिफिशियल इंटेलिजेंसमधील पुढील संशोधनाला प्रेरणा दिली, ज्यामुळे बुद्धिबळाच्या पलीकडे विविध डोमेनमध्ये AI ॲप्लिकेशन्सचा मार्ग मोकळा झाला.

मानवी उत्क्रांतीचा इतिहास हा खरे तर शोधांचा इतिहास आहे. सतत नवनवीन शोध लावणे आणि त्याद्वारे आपल्या मानवी प्रजातीचा उद्धार घडवून आणणाऱ्या घटनांनी मानवी इतिहास काठोकाठ भरलेला आहे.

फार पूर्वी मानवाने आगीवर नियंत्रण आणले आणि तिचा वापर अन्न शिजवण्यासाठी, त्याचप्रमाणे थंडीपासून तसेच जंगली श्वापदांपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी करू लागला. आगीचा वापर करायला शिकल्याने मानवी उत्क्रांतीने एक अतिशय रंजक वळण घेतले. अगदी तसाच परिणाम करणाऱ्या विविध शोधांचा आविष्कार मानव प्राणी गतकाळात करत राहिला. विविध हत्यारे-साधने बनवणे, शेती, ज्ञान प्रसारासाठी लिहिण्याचा शोध, चाकाचा शोध, छापखाने, वाफेचे इंजिन, वीज, संगणक आणि इंटरनेट हे मानवी उत्क्रांतीतले महत्त्वाचे टप्पे मानले जातात. या प्रत्येक टप्प्यावर मानवी इतिहासाने एक अकल्पित वळण घेतले. अशाच एका अती महत्त्वाच्या वळणावर मानवी संस्कृती सध्या उभी आहे. कृत्रिम प्रज्ञा म्हणजेच आर्टिफिशियल इंटेलिजन्सने आजचे वर्तमान घुसळून काढले आहे. आणि मानवी संस्कृती आता कुठल्या अकल्पित दिशेने जाऊ शकते याकडे सगळ्या मानवजातीचे लक्ष लागून आहे.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स या विषयावर चर्चा करण्यापूर्वी काही महत्वाचे मुद्दे समजून घेणे महत्त्वाचे आहे.

**डेटा**

डेटा म्हणजे कच्चे आणि विखुरलेले दुवे. जसे आकडे, शब्द, चित्र, व्हिडिओ. डेटामध्ये सुसूत्रता आणि अर्थ असेलच असे नाही.

**इन्फर्मेशन म्हणजे माहिती**

साध्या डेटावर प्रक्रिया केली जाते, त्याची सुसूत्रपणे मांडणी केली जाते तेव्हा त्याची इन्फर्मेशन म्हणजे माहिती बनते. ही माहिती म्हणजे सुसूत्र डेटा जो वाचून-बघून

मानवाला किंवा मशीनला अर्थबोध होऊ शकतो.

**ज्ञान (Knowledge)**

ज्ञान म्हणजे उपलब्ध माहितीचे योग्य आकलन. वेगवेगळ्या प्रकारच्या माहितीपासून योग्य ज्ञान घेतले जाऊ शकते.

**अंतर्दृष्टी (Insight)**

अंतर्दृष्टी म्हणजे उपलब्ध ज्ञानापासून मौल्यवान आणि सहज न दिसणारी निरीक्षणे काढणे. अंतर्दृष्टी ही उपलब्ध डेटामधील नमुने, सहसंबंध आणि ट्रेंड म्हणजेच माहितीची प्रवृत्ती कुठल्या दिशेने आहे हे ओळखण्यात मदत करू शकते. हे मानवी मेंदूसाठी क्लिष्ट कौशल्य आहे. इथे सहसा आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करून फार प्रभावी निकाल मिळू शकतात.

**शहाणपण (Wisdom)**

उपलब्ध ज्ञानाचा आणि अंतर्दृष्टीचा योग्य वापर करून विधायक कार्ये साध्य करणे म्हणजे शहाणपण. ही ज्ञानाची सगळ्यात महत्वाची पायरी आहे. योग्य शहाणपण असेल तर त्याचा वापर करून संभाव्य शक्यतांचा साधक-बाधक विचार होऊ शकतो. उपलब्ध ज्ञानाचा गैरवापर टाळण्यासाठी आणि त्याला विधायक मार्गाने वापरण्यासाठी योग्य शहाणपण हवे असते.

ज्ञानाच्या या पातळ्या आजवर जोपर्यंत मानवाच्या हातात होत्या, तोवर त्यांत सातत्य आणि सुसूत्रता राखणे जवळजवळ अशक्यप्राय होते. आज आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करून तो समतोल साधण्याचा प्रयत्न केला जातोय. अल्गोरिथम्स, मशीन लर्निंग, डीप लर्निंग यांचा वापर करून डेटा, अर्थपूर्ण माहिती, ज्ञान, अंतर्दृष्टी, शहाणपण या पातळ्यांवर सुसूत्रता आणली जातेय. आणि योग्य निर्णय घेऊन चुका टाळण्याचा प्रयत्न होतोय.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स हा आजकाल महत्त्वाचा चर्चेचा विषय बनला आहे. यामुळे आपल्या आयुष्यावर काय बरे वाईट परिणाम होतील, त्याद्वारे आपले आयुष्य कसे बदलणार आहे हा मुख्यत्वे या चर्चांचा केंद्रबिंदू असतो. प्रत्येक औद्योगिक आणि तांत्रिक क्रांतीनंतर वस्तू व सेवा पुरवण्याच्या पद्धती बदलत गेल्या. तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स च्या निमित्ताने येऊ घातलेली क्रांती आमूलाग्र बदल घेऊन येते आहे.

आर्टिफिशियल इंटेलिजन्सची ओळख जगाला झाली ती हॉलिवूड चित्रपटांच्या माध्यमातून. त्यामुळे आर्टिफिशियल इंटेलिजन्सविषयी सामान्य जणांच्या मनात अवास्तव कल्पना निर्माण झाल्या. हॉलिवूड चित्रपटातील आर्टिफिशिअल इंटेलिजन्सच्या अतिरंजक रेखाटनामुळे ती विज्ञानकथेतील काल्पनिक संकल्पनेप्रमाणे भासत राहिली. खरे तर आपण वापरत असलेले कॅल्क्युलेटर ते स्वयंचलित वाहने, ते आज काल्पनिक वाटावेत असे भविष्यात येऊ घातलेले बदल ज्यामुळे भविष्यातील जग कल्पनेपेक्षाही वेगळे असणार आहे, हे सगळे आर्टिफिशियल इंटेलिजन्सच आहे हे समजून घ्यावे लागेल.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे आर्टिफिशियल इंटेलिजन्स भविष्यात दूर कधीतरी येऊ घातलेली कल्पना आहे असेही काही जणांना वाटते. खरे तर आपल्या आजच्या दैनंदिन व्यवहारात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे आपण आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करत असतो.

**AI इफेक्ट**

जॉन McCarthy ज्यांना फादर ऑफ आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हटले जाते. त्यांनी 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' ही संज्ञा १९५० सालात रूढ केली. त्यांचे एक खूप खोल विचार करायला लावणारं वाक्य आहे. ते म्हणतात, 'As soon as it works, no one calls it AI anymore.' एकदा एखादी अचंबित करणारी सिस्टीम काम करू लागते आणि ती सवयीची होते तेव्हा नंतर तिला लोक आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणणे बंद करतात.

कम्प्युटर सायन्समुळे मानवतेसमोराचे जे प्रॉब्लेम सुटत गेले त्यात सुरुवातीला सगळे अचंबित होत राहिले आणि पुढे ते सॉफ्टवेअर आपल्या जगण्याचा भाग झाले तेव्हा त्याविषयीचा अचंबा दूर होत गेला. कम्प्युटर सायन्समध्ये garbage collection नावाचा खुप मोठा प्रोब्लेम होता, तो ज्या सॉफ्टवेअरमुळे सुटला त्याला सुरुवातीला आर्टिफिशयल इंटेलिजन्स मानले जायचे. सॉफ्टवेअर प्रोग्रामने चेस प्लेअरला हरवायला सुरुवात केली तेव्हा ती जगभरात ब्रेकिंग न्यूज होती. आता ही एक सामान्य बाब झाली आहे. गुगल सर्च ही स्वतः एक आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि सेल्फ लर्निंग सिस्टीम आहे. गुगलच्या आगमनानंतर जगभरात कम्प्युटर वापरकर्त्यांमध्ये उत्साह संचारला होता. आज गुगल हा प्रत्येक घरातील एक सामान्य सदस्य आहे.

अशी कितीतरी उदाहरणं देता येतील. काही वर्षांत Chat GPT सारखी लार्ज लँग्वेज मॉडेल्स हीसुद्धा घरगुती नावे बनतील.

आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे मुख्य तीन रूपे आहेत-

Artificial Narrow Intelligence (ANI) : या प्रकारचे आर्टिफिशियल इंटेलिजन्स कुठले तरी एकच काम करू शकते. जसे बुद्धिबळ खेळणे. त्यांना इतर कुठले काम

करायला सांगितले तर ते अक्षम असतात.

**Artificial General Intelligence (AGI) :** या प्रकारचा आर्टिफिशियल इंटेलिजन्स मानवी बुद्धिमत्तेइतका किंवा त्याहूनही अधिक सक्षम असू शकतो. मानवी बुद्धीला शक्य असलेल्या सर्व भौतिक गोष्टी तो करू शकतो. या पातळीपर्यंत आर्टिफिशियल इंटेलिजन्सला पोहोचायला अजून बराच काळ बाकी आहे. या क्षेत्रातील सुप्रसिद्ध विद्वान, डेलावेअर विद्यापीठाच्या प्रोफेसर लिंडा गॉटफ्रेडसन बुद्धिमत्तेचे वर्णन असे करतात: एक अतिशय सर्वसामान्य मानसिक क्षमता ज्यामध्ये इतर गोष्टींबरोबरच तर्क करणे, योजना आखणे, सम स्या सोडवणे, अमूर्तपणे विचार करणे, जटिल कल्पना समजून घेणे, त्वरीत शिकणे आणि अनुभवातून शिकण्याची क्षमता असणे. भविष्यात येऊ शकणारे AGI सहजपणे त्या सर्व गोष्टी करण्यास सक्षम असेल.

**Artificial Superintelligence (ASI) :** ऑक्सफर्ड विद्यापीठातील तत्त्वज्ञानी आणि अग्रगण्य AI विचारवंत निक बोस्ट्रॉम यांनी सुपरइंटेलिजन्सची व्याख्या काहीशी अशी केली आहे– 'एक अशी बुद्धिमत्ता जी प्रत्येक क्षेत्रात – जसे वैज्ञानिक सर्जनशीलता, शहाणपण आणि सामाजिक कौशल्यांसह व्यावहारिकदृष्ट्यासुद्धा सर्वोत्तम मानवी मेंदूपेक्षा जास्त हुशार असेल.'

कृत्रिम सुपरइंटेलिजन्सची श्रेणी मानवापेक्षा थोडे अधिक हुशार असलेल्या संगणकापासून ते करोडोपट अधिक हुशार संगणकापर्यंत वाढत जाईल. ASI हा विषय फार रंजक आहे आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या संबंधित बहुतांश अंदाज आणि भीती या ASI शी निगडित आहेत. आर्टिफिशियल इंटेलिजन्स ज्या मूळ तत्त्वावर उभे आहे ते लार्ज लँग्वेज मॉडेल हे भव्य न्यूरल नेटवर्कवर उभारलेले आहेत. मानवी मेंदूच्या तुलनेत हे मॉडेल अजून छोटे आहे. आपल्या मेंदूत शंभर ट्रिलियन न्यूरल कनेक्शन असतात. आज उपलब्ध असलेल्या लार्ज लँग्वेज मॉडेलमध्ये फक्त अर्धा ट्रिलियन न्यूरल कनेक्शन आहेत. इथपर्यंत यायला वीस–तीस वर्षे लागली आहेत. परंतु हा प्रवास सरळ रेषेत नसून घातांक दराने म्हणजेच एक्सपोनेंशली झालेला आहे. काही वर्षांतच एक दिवस येऊ शकतो जेव्हा लार्ज लँग्वेज मॉडेलचे न्यूरल कनेक्शन मानवी मेंदूपेक्षा जास्त होतील. आणि तिथून पुढे घातांक दराने वाढत जातील आणि हा प्रवास ASI च्या दिशेने अधिक वेगाने होत राहील.

## आपण सध्या कुठे आहोत?

आजतागायत मानवाने आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या सर्वात पहिल्या प्रकारापर्यंत मजल मारली आहे. म्हणजेच Artificial Narrow Intelligence (ANI) पर्यंत मानव पोहोचला आहे. आपण सगळे कळतनकळत ANI वापरतो आहोत. सध्याचा प्रवास ANI पासून Artificial General Intelligence (AGI) ते Artificial Superintelligence (ASI) च्या दिशेने सुरू आहे.

आर्टिफिशियल इंटेलिजन्समुळे वाहतूक आणि दळणवळणाच्या पद्धतींमध्ये आमूलाग्र बदल येऊ घातले आहेत. टेस्ला AI चा वापर करून त्यांच्या कारमध्ये ऑटोपायलट सिस्टीम देत आहे. जी स्वयंचलितपणे कार चालवू शकते, ब्रेक करू शकते आणि वेग वाढवू शकते. वोल्वोच्या कारमध्ये AI चा वापर करून झोप लागलेल्या ड्रायव्हरला सावध करते ज्यायोगे अपघात टाळण्यासाठी मोठी मदत होऊ शकते. याव्यतिरिक्त प्रत्येक ड्रायव्हरच्या सवयी आणि आवडीनिवडी लक्षात घेऊन कारमध्ये personalization म्हणजे वैयक्तिकीकरण होऊ लागले आहे, जसे ड्रायव्हरच्या आवडीनिवडीनुसार गाण्यांची प्ले लिस्ट AC ची, सीटचं सेटिंग इत्यादी. ड्रायव्हरला ओळखू शकणाऱ्या कार आणि बाईकसुद्धा येऊ घातल्या आहेत ज्या अनोळखी व्यक्तींना गाडीत प्रवेश करूच देणार नाहीत.

आपला फोन तर एक छोटी ANI (Artificial Narrow Intelligence) फॅक्टरीच आहे : तुम्ही फोनवर मॅप वापरता, तुमचा म्युझिक प्लेअर तुम्हाला तुमच्या आवडीनिवडीनुसार नवीन गाणे सुचवतो, तुम्ही हवामानाचा अंदाज फोनवर चेक करता किंवा सिरी, अलेक्सा, गुगल असिस्टंट इत्यादी ॲप वापरून तुम्हाला हवी असलेली कामे करून घेता तेव्हा तुम्ही आर्टिफिशियल नॅरो इंटेलिजन्स म्हणजेच ANI चा वापर करत असतात.

तुम्ही गूगलवर एखादी माहिती शोधता आणि नंतर तुम्हाला त्या माहितीशी संबंधित इतर उत्पादने वेगळ्या साइटवर तुमच्यासाठी शिफारस केलेली उत्पादन म्हणून दिसतात तेव्हा किंवा फेसबुकला हे माहीत असते की तुमचे फेसबुकवरील इतर मित्र कोण असू शकतील, ही सगळी ANIचे उदाहरणे आहेत.

Google Translate ही आणखी एक क्लासिक ANI प्रणाली आहे– एका मर्यादित कार्यात अतिशय प्रभावीपणे काम करणारी. तुम्ही काय बोलता आहात ते समजू शकणारी व्हॉइस रेकग्निशन ही आणखी दुसरी बाब आहे, आणि अशा अनेक प्रणाली आहेत ज्या त्या दोन ANI चा वापर करून अशी प्रणाली बनवतात ज्यामुळे तुम्हाला एका भाषेत वाक्य बोलता येते आणि तुमचा फोन त्या वाक्याला लगेच दुसऱ्या

भाषेत भाषांतरित करून फोनवर बोलणाऱ्या पलीकडच्या माणसाला हव्या त्या भाषेत सांगू शकतो.

वैयक्तिक वापराव्यतिरिक्त मोठे बिझनेस, सरकारी यंत्रणाच्या पातळीवरसुद्धा ANI चा वापर वाढतो आहे. ट्रॅफिक सिग्नल न पाळणारे वाहने ओळखण्यापासून ते अशाप्रकारे ANI प्रकारातील आर्टिफिशियल इंटेलिजन्स आपल्या दररोजच्या जगण्याचा भाग बनला आहे. आणि दिवसेंदिवस आपल्या वापरात असलेल्या कित्येक प्रणाली त्यावर अधिकाधिक अवलंबून होत जाणार आहे.

आज ANI प्रकारातील आर्टिफिशियल इंटेलिजन्स हा एका विशिष्ट क्षेत्राशी मर्यादित असल्याने त्यामुळे निर्माण झालेले प्रश्न किंवा चुका किंवा ANI च्या गैरवापरामुळे निर्माण झालेल्या समस्या या त्या क्षेत्रात मर्यादित स्वरूपात नुकसान करू शकतील. या चुकांमुळे मोठा संहार घडण्याची शक्यता फार कमी आहे. तरीही हे लक्षात घ्यावे लागेल की ANI आर्टिफिशियल इंटेलिजन्स मध्ये झालेली प्रत्येक प्रगती ही आपल्याला AGI (आर्टिफिशियल जनरल इंटेलिजन्स) आणि मग ASI कडे (आर्टिफिशियल सुपर इंटेलिजन्स) घेऊन जात आहे.

**ANI पासून AGI कडे**

हे लक्षात घ्यावे लागेल, की मानवी मेंदू ही आतापर्यंत ज्ञात विश्वातील सर्वात गुंतागुंतीची वस्तू आहे.

आपल्या मेंदूसारखा स्मार्ट संगणक तयार करण्याचा प्रयत्न करणे हे खरे तर अतिशय आव्हानात्मक काम आहे. गगनचुंबी इमारती बांधणे, माणसांना अंतराळात पाठवणे, बिग बँग नक्की कसा घडला या सगळ्यांचे तपशील शोधणे या सर्व कार्यांपेक्षा आपल्या स्वतःच्या मेंदूला समजून घेणे जास्त अवघड आहे.

मनोरंजक गोष्ट अशी आहे, की AGI (सामान्यत: माणसांइतकाच स्मार्ट संगणक) तयार करण्याचा प्रयत्न आपल्याला वाटते तितका सोपा नाही. तुम्हाला दोन दहा-अंकी संख्यांचा गुणाकार करू शकेल असा संगणक हवाय? आज ते सोपे आहे. परंतु तुम्हाला अशी प्रणाली बनवायची आहे जी कुत्र्याकडे बघून उत्तर देऊ शकेल की तो कुत्रा आहे की मांजर, हे फार कठीण काम आहे. बुद्धिबळात कोणत्याही माणसाला पराभूत करू शकेल असे एआय हवे आहे? ते आज अस्तित्वात आहे. पण, सहा वर्षांच्या मुलाच्या वहीतील परिच्छेद वाचू शकेल आणि वाचून फक्त शब्द ओळखू शकत नाही तर त्यांचा अर्थसुद्धा समजू शकेल अशी प्रणाली हवी आहे? ते आजपर्यंत तरी फार कठीण कार्य आहे. अशा प्रणाली बनवण्यासाठी गुगलसारख्या कंपन्या अब्जावधी डॉलर खर्च करत आहेत. अवघड गणिते सोडवणे, अर्थविषयक मार्केट स्ट्रॅटेजी आणि भाषांतर यासारख्या कठीण बाबी संगणकासाठी अतिशय सोप्या आहेत. तर दृष्टीचा वापर करून बघणे आणि ती वस्तू अचूकपणे ओळखणे, एका जागेपासून दुसऱ्या जागेवर अचूकपणे/सुरक्षितपणे जाणे, वस्तू ओळखणे यासारख्या मानवीय सोप्या गोष्टी त्यासाठी अत्यंत कठीण असतात. संगणक शास्त्रज्ञ डोनाल्ड नुथ म्हणतात त्याप्रमाणे, एआयने आतापर्यंत 'तर्कसंगत विचाराची' आवश्यकता असलेल्या सर्व गोष्टी करण्यात यश मिळवले आहे, परंतु मानव आणि प्राणी 'विचार न करता' ज्या प्रतिक्षिप्त क्रिया करतात ते करण्यात तो अद्यापतरी यशस्वी झालेला नाही.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स मध्ये Moravec's Paradox नावाचा विरोधाभास प्रसिद्ध आहे. तो म्हणतो, काही कामे मानवासाठी सोपी आहेत, तीच कामे आर्टिफिशियल इंटेलिजन्ससाठी अवघड असू शकतात, आणि काही कामे आर्टिफिशियल इंटेलिजन्स सहज करू शकतो ती कामे मानवासाठी अवघड असू शकतात.

तर्कसंगत कामे जसे, डिफरेन्शियल कॅल्क्युलसची गणिते सोडवणे, बुद्धिबळ खेळणे आर्टिफिशियल इंटेलिजन्सला फार थोडा वेळ व संगणकीय ताकद लागते, तिथेच मानवी कौशल्य लागणारी कामे जसे- पायऱ्या चढणे, डोंगर चढणे, प्लंबिंग, वाहन दुरुस्त करणे, सुश्रूषा करणे इत्यादी कामे आर्टिफिशियल इंटेलिजन्सद्वारे करवून घेण्यासाठी खूप क्लिष्ट संगणक प्रोग्रॅम आणि संगणकीय ताकद लागेल.

आर्टिफिशियल जनरल इंटेलिजन्स (AGI) हा भविष्यात येऊ शकणारा एक काल्पनिक पण महत्त्वाचा टप्पा आहे, ज्यावेळी तंत्रज्ञान या टप्प्यावर पोहोचेल त्यावेळी मानवाला शक्य असणारी सगळी कामे आर्टिफिशियल इंटेलिजन्सलासुद्धा शक्य होतील. AGI च्या टप्प्यावर खरेच पोहोचता येईल की कसे, याविषयी आज भिन्न मतप्रवाह आहेत.

आर्टिफिशियल जनरल इंटेलिजन्सपर्यंत (AGI) पोहोचण्याचे संभाव्य मार्ग संगणकीय शक्ती वाढवणे-

AGI पर्यंत पोहोचण्यासाठी मानवी मेंदूइतका सुपर फास्ट कम्पुटर बनवावा लागेल. त्यासाठी अतिशय ताकदवान हार्डवेअरची गरज आहे. यासाठी अजून किती मोठा पल्ला गाठणे बाकी आहे हे समजण्यासाठी मानवी मेंदू एका सेकंदात किती वेगाने आकडेमोड करू शकतो हे समजणे गरजेचे आहे. आता उपलब्ध असलेला सर्वात वेगवान सुपर कम्पुटर

हा मानवी मेंदूपेक्षा अधिक वेगाने आकडेमोड करू शकतो. पण, ते साध्य करण्यासाठी खूप मोठा खर्च करावा लागतो, आजचा सगळ्यात वेगवान महासंगणक हा ७३०० घनफूट इतक्या जागेत ठेवला आहे. त्याला २१ मेगावॉट इतकी ऊर्जा लागते. मानवी मेंदू तांत्रिक दृष्ट्या २० वॅट वर काम करतो. तसेच, त्या महासंगणकाला नियंत्रित करण्यासाठी अवाढव्य खर्च करावा लागतो.

संगणकीय हार्डवेअरशी संबंधित मुरचा नियम आहे. गॉर्डन मुर म्हणतात, संगणकाची हार्डवेअर क्षमता ही साधारणतः प्रत्येक दोन वर्षानंतर दुपटीने घातांक दराने वाढत जाते. इतिहास साक्ष आहे, हा नियम इतिहासात तंतोतंत खरा ठरला आहे. म्हणजे, १९७२ साली मानवाने चंद्रावर पाऊल ठेवले त्यासाठी वापरला गेलेला अपोलो-११ कम्पुटर हा त्या काळातील अद्ययावत आणि ताकदवान सुपर कम्पुटर होता. त्यानंतर आजपर्यंत संगणकाची हार्डवेअर क्षमता इतकी वाढली आहे की आज प्रत्येकाच्या खिशात जे स्मार्टफोन आहेत त्यांची क्षमतासुद्धा अपोलो-११ पेक्षा कितीतरी पट अधिक आहे.

**मानवी मेंदूची नक्कल**

शास्त्रज्ञ मेंदूची रचना आणि शिकण्याच्या पद्धती कॉपी करण्याचा प्रयत्न करत आहेत. कृत्रिम न्यूरल नेटवर्क मेंदूच्या संरचनेसारखी रचना निर्माण करण्याचा प्रयत्न करतात आणि चुकांमधून आणि अभिप्रायांपासून सतत शिकत असतात. या मार्गाने हळूहळू मानवस्तरीय AGI साध्य होऊ शकते.

**उत्क्रांतीचे अनुकरण**

मेंदूची नक्कल करण्याऐवजी, उत्क्रांतीमुळे आपला मेंदू कसा विकसित होत गेला/झाला याचे अनुकरण करूनसुद्धा मानवी क्षमतेइतक्या AGI पर्यंत पोहोचणे शक्य होऊ शकेल. परंतु या पद्धतीस बराच काळ लागू शकतो.

**स्वशिक्षण करू शकणारा संगणक**

आजपर्यंत संगणक हे त्यांना दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करून हवे ते आउटपुट देण्याचे काम करतो, आज संगणकांना प्रत्येक गोष्ट शिकवण्याची गरज उरलेली नाहीये. ते स्वत:हून शिकू शकतात. या प्रक्रियेतून संगणक स्वतः मानवी हस्तक्षेपाशिवाय AI चे संशोधन करण्यास आणि त्यांचे स्वतःचे कोडिंग सुधारण्यास सक्षम होऊ शकतात. या पद्धतीत संगणक स्वतः शास्त्रज्ञ बनतील, स्वतःला अधिक हुशार बनवण्यासाठी सतत काम करत राहतील. ही पद्धत आज अधिक प्रभावीपणे उपयोगात आहे.

हार्डवेअर आणि सॉफ्टवेअरमधील प्रगती झपाट्याने घातांकीय दराने होत आहे. या प्रगतीमुळे AGIचा टप्पा आपल्याला वाटतो त्यापेक्षा लवकर येऊ शकतो. या वाटेत अनेक आव्हाने असूनही, आज मानव सुपर-इंटेलिजेंट मशीन तयार करण्याच्या दिशेने वेगाने प्रगती करत आहे.

**AGI पासून ASI कडे : माणसापेक्षा अधिक बुद्धिमान कृत्रिम प्रजातीचा जन्म**

सुपर-इंटेलिजेंस म्हणजे काय?

सुपर-इंटेलिजेंस ही भविष्यात येऊ शकणारी अशी एक काल्पनिक प्रणाली आहे जी प्रत्येक बाबतीत मानवी क्षमतेपेक्षा सरस असेल, फक्त बुद्धिमत्तेतच नाही तर शारीरिक क्षमतेतसुद्धा. ही प्रणाली फक्त वेगाने गणितच करू शकणार नाही, तर आकलन, ग्रहण, तार्किक विचार या आणि अशा अनेक क्षमतांमध्ये ती मानवापेक्षा वरचढ असेल. हे समजून घ्यायचे असेल तर सध्या जिवंत असलेल्या प्राण्यांच्या प्रजातींचे उदाहरण घेता येईल. जसे मानव हा मांजरांपेक्षा अधिक बुद्धिमान आहे. समजा, तुम्हाला गुरुत्वाकर्षण म्हणजे काय, हे एका पाच वर्षांच्या मुलाला आणि एका मांजराला समजावून सांगायचे आहे. तर, हे तो पाच वर्षांचा मानवाचा मुलगा कदाचित समजू शकेल पण मांजर कधीच समजू शकणार नाही. का? तर मानवाचा मेंदू लाखो वर्षांपासून एका विशिष्ट रितीने उत्क्रांत झाला आहे, ज्याला गुरुत्वाकर्षण किंवा तत्सम संकल्पना समजून घेण्यासाठी मेंदूमध्ये विशिष्ट रचना उपलब्ध आहेत. मांजरासाठी ते असाध्य आहे. म्हणजे मानव हा मांजरांपेक्षा अधिक बुद्धिमान आहे. अगदी याच प्रकारे मानवापेक्षा अधिक बुद्धिमान असलेली प्रणाली जन्माला घालणे म्हणजेच सुपर-इंटेलिजेंसच्या टप्प्यापर्यंत पोहोचणे. या प्रणालीला अशा गोष्टी समजू लागतील ज्या मानवी मेंदूसाठी दुर्बोध म्हणजेच समजण्यायोग्य नसतील. ज्याप्रमाणे मानवाने आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर इतर सर्व प्राण्यांवर कुरघोडी केली आहे अगदी त्याचप्रमाणे सुपर इंटेलिजंट AI मानवासह इतर सर्व प्राण्यांवर राज्य करण्याची क्षमता राखू शकतो. AI ची ही पातळी मानवी अस्तित्वासाठी मोठा धोका निर्माण करू शकते, अशी भीती बरेच तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या क्षेत्रात अशाच नकारात्मक शक्यतांविषयी खूप महत्त्वाचे तज्ज्ञ वेगवेगळी भाकिते करत आहेत. ती काय-काय आहेत त्याविषयी थोडक्यात-

२०१४ मध्ये दिलेल्या एका मुलाखतीत प्रसिद्ध भौतिकशास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग यांनी मत मांडले होते, की आर्टिफिशियल इंटेलिजन्समुळे मानवजातीच्या अस्तित्वालाच धोका निर्माण होऊ शकतो. त्यांनी असेही सांगितले होते, की आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर शस्त्रनिर्मितीत होऊ लागेल तेव्हा मानवी हस्तक्षेपाशिवाय जीव घेऊ शकणारी हत्यारे बनतील आणि ती चुकीच्या हातात गेली काय काय घडू शकेल याची कल्पनाच न केलेली बरी.

प्रसिद्ध उद्योगपती एलोन मस्क यांनी सुद्धा अशाच शक्यता वर्तवल्या आहेत. त्यांच्यानुसार AI एक दिवस मानवापेक्षा जास्त बुद्धिमान बनेल आणि त्या दिवशी मानवाच्या पृथ्वीवरील सत्तेला आव्हान उभे राहील. ते स्वायत्त शस्त्रांविषयीसुद्धा धोक्याची सूचना देतात.

निक बॉस्ट्रॉम हे 'सुपर इंटेलिजन्स' या प्रसिद्ध पुस्तकाचे लेखक सुद्धा चेतावणी देतात की AI मुळे मानवी अस्तित्वच धोक्यात येऊ शकते.

मागच्या काही महिन्यांत चॅट GPT वगैरेंच्या आगमनानंतर या चर्चांनी पुन्हा वेग घेतला. त्या चर्चेला पुन्हा एकदा महत्त्व प्राप्त झाले ते Geoffrey Hinton यांच्यामुळे. Geoffrey Hinton, हे गुगलमध्ये VP आणि Engineering Fellow होते. त्यांनी गुगलमध्ये असताना आधुनिक आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि डीप लर्निंग या विषयात काही महत्त्वाच्या टेक्निक डिझाईन केल्या होत्या. त्यांनी काही नैतिक कारणास्तव आपली गुगलमधली हाय प्रोफाइल नोकरी सोडली आहे.

व्हिन्टन यांना २०१८ चा टूरिंग अॅवॉर्ड (कॅम्प्युटर सायन्समधील नोबेलच्या बरोबरीचे अॅवॉर्ड) दिले गेले आहे. गुगलमधील इतका महत्त्वाचा रोल सोडून देण्यामागे नैतिक कारण हे मुख्य आहे असे ते सांगत आहेत. इथून पुढचा काळ हा मुख्यत्वे आर्टिफिशियल इंटेलिजन्स मुळे मानवतेसाठी निर्माण झालेली आव्हाने या विषयावर जनजागृती करण्यासाठी घालवायचा, असे ते म्हणत आहेत. हे सगळे शोध लावून आपण किती धोकादायक काम केले आहे याचा विचार करून मनात अपराधीपणाची भावना येते आहे, असे ते म्हणत आहेत.

हिन्तोन यांनी गूगल सोडल्यानंतर एमआयटीने (Massachusetts Institute of Technology) त्यांची एक महत्त्वाची मुलाखत घेतली. हिन्तोन यांनी या मुलाखतीत मांडलेले मुद्दे दुर्लक्ष करून नक्कीच चालणार नाही. त्यांनी अधोरेखित केलेले काही महत्त्वाचे मुद्दे असे–

आतापर्यंत AI सिस्टीम फक्त लर्निंग करत आहेत. परंतु जेव्हा एकापेक्षा अधिक AI सिस्टीम अस्तित्वात येतील तेव्हा एका सिस्टीमने कमावलेले ज्ञान इतर हजारो लाखो सिस्टीमना सहज शिकता येईल. हे फक्त फाईल कॉपी करणे इतके सरळ सोपे राहील. मानवामध्ये ही क्षमता नाही. एका मानवाने कम ावलेले ज्ञान, अनुभव दुसऱ्याला जसेच्या तसे पोहोचत नाही.

या सिस्टिम मानवी मेंदूच्या क्षमतेपेक्षा अधिक बुद्धिमान होण्यासाठी फक्त काही काळ बाकी आहे. तसेच, ही प्रक्रिया तिथे थांबणार नाही. त्यांची बुद्धिमत्ता घातांक दराने वाढत जाईल. एकदा तो दिवस उगवला तर या सिस्टीम मानवाला कंट्रोल करू शकतील. मानवाला मिळणारी माहिती, त्याची विचारक्षमता आणि बऱ्याच गोष्टीवर त्यांचे नियंत्रण येऊ शकते.

आतापर्यंतच्या संगणक प्रणाली एका साध्या तत्त्वावर बनलेल्या आहेत. मानवाने दिलेल्या कमांड किंवा त्यांचा सिक्वेन्स संगणक प्रणाली पूर्ण करू शकते. एकापेक्षा अधिक कमांड म्हणजेच subgoals हेसुद्धा यांत्रिकी पद्धतीने म्हणजेच सांगितले तितकेच पूर्ण करणाऱ्या सिस्टीम आता अस्तित्वात आहेत. पण AI मुळे या subgoals मध्ये बुद्धिमत्ता संचारेल. आणि प्राप्त परिस्थितीनुसार निर्णय घेऊ शकणाऱ्या प्रणाली अस्तित्वात येतील. हा AI च्या क्रांतीतील सर्वात धोकादायक टप्पा असेल अशी भीती व्यक्त केली जात आहे.

मानवी अस्तित्वाला धोका निर्माण करण्याची क्षमता असलेल्या सिस्टीम याआधी शक्यतो सरकारी पातळीवर बनवल्या गेल्या. त्यांच्यावर कायदेशीर नियंत्रण आणण्यात आली. पण AI च्या सिस्टीम तशा नाहीत. या मुख्यत्वे नफ्यासाठी आसुसलेल्या कॉर्पोरेशनच्या ताब्यात आहेत. दुसऱ्या महायुद्धात आयबीएमने हिटलरला पद्धतशीरपणे नरसंहार करण्यासाठी अल्गोरिदम विकले होते हे विसरून चालणार नाही.

या भव्य कंपन्या अशा सिस्टीम हानिकारक शक्तींना विकू शकतात. आणि त्यांचा वापर मोठ्या प्रमाणावर नरसंहार करण्यासाठी होऊ शकतो.

एखादी बिग फार्मा कंपनी एखाद्या असाध्य रोगावर औषध बनवते तेव्हा नफा कमावणे हे मुख्य उद्दिष्ट असते. यात त्या रोगाचे निवारण करण्यापेक्षा औषधाची विक्री वाढवणे हा मुख्य हेतू असू शकतो. रोगनिवारण झालेच तर औषध विकत कोण घेणार असाही विचार नफेखोरीसाठी असू शकतो. त्यामुळे फक्त नफ्यासाठी व इन्व्हेस्टरच्या रिटर्न साठी काम करणाऱ्या बिग कॉर्पोरेशनच्या भरवशावर या सिस्टीम्स ठेवल्या जाऊ शकत नाही. त्यांच्यासाठी योग्य कायदे करावे लागतील. या कायद्यांसाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकार

गरजेचा आहे. ते साध्य करण्यासाठी कित्येक वर्षे लागू शकतात. तितका वेळ मानवाकडे सध्यातरी नाही.

सुपर इंटेलिजसच्या टप्प्यावर पोहोचल्यानंतर सगळ्यात मोठे आवाहन त्या बुद्धिमान प्रणालींना ताब्यात ठेवणे हे असणार आहे. कारण या सुपर इंटेलिजंट प्रणाली बरीच कामे स्वतःहून करणार आहेत आणि प्राप्त परिस्थितीनुसार निर्णय घेणार आहेत. हे सगळे घडताना या प्रणालींकडून अनावधानाने का होईना पण मानवाचे नुकसान होणार नाही किंवा त्याच्या सुरक्षेस धोका निर्माण होणार नाही ही काळजी घ्यावी लागेल. याला आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या भाषेत कंट्रोल प्रॉब्लेम असे म्हणतात.

उदाहरणार्थ, एखाद्या वर्दळीने व्यग्र शहरात अपघात टाळण्यासाठी तयार केलेल्या शक्तिशाली AI ची कल्पना करा. जर वाहतुकीवर योग्य नियंत्रण आणण्यासाठी AI चा वापर करण्यात येणार असेल आणि एखाद्या आणीबाणीच्या प्रसंगी वाहतूक हाताबाहेर गेली तर अपघात टाळण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे सर्व वाहतूक थांबवणे असे AI ला वाटू शकते आणि त्यामुळे आणखी मोठा गोंधळ निर्माण होऊ शकतो. अशाच प्रकारची घटना भारतात ओडिशामध्ये रेल्वे अपघातात घडली आणि मोठी जीवितहानी झाली. कंट्रोल प्रॉब्लेम ही AI च्या विकासामध्ये मानवी सुरक्षेसाठी आणि भविष्यासाठी ही एक गंभीर व चिंतेची बाब आहे.


या चर्चेचा समारोप करण्यापूर्वी हे नोंदवावेसे वाटते आहे, की जेव्हा कुठलेही तज्ज्ञ काही नकारात्मक शक्यतांचे भाकीत करतात तेव्हा त्या शक्यता खऱ्या ठरतीलच असे नसते, पण योग्य वेळी योग्य उपाय केले नाहीत तर असे घडू शकते यासाठी ती वॉर्निंग असते. बऱ्याच वेळेला योग्य उपाय योजून ते परिणाम टाळले जातात.

**– अमोल साळे**


amoalsale@gmail.com

॥ग्रंथाली॥


## डॉ. घनश्याम बोरकर यांचे तीन कवितासंग्रह




**शिवमतभैरव**




**शरणयोग**




**कालाजयी**

**मूल्य प्रत्येकी ५०० रु. ❖ सवलतीत प्रत्येकी ३०० रु. ❖ टपालखर्च ३० रु.**



प्रतिभा सराफ

# त्या बेटावर

'चंद्राच्या या मंद प्रकाशात तुझं अंगांग किती उजळून निघालेलं आहे.'

प्रख्यात श्वेताला डोळेभरून पाहात म्हणतो. ती लाजून नजर झुकवते. मिलनाची हुरहुर दोघंही अनुभवत असतात.

'एक गाणं या क्षणी मला आठवतंय...'

डोळे बारीक करून हातवारे करत प्रख्यात गाऊ लागतो-

चौदहवीं का चाँद हो, या आफ़ताब हो...

प्रख्यात तिच्या आणखी जवळ सरकतो. सावळ्या रंगाचा श्वेताचा गोल गरगरीत चेहरा निरखून पाहात तिच्या कपाळावर अल्लडपणे उतरलेल्या कुरळ्या केसांच्या महिरपी तो हलकेच मागे सारतो. आतापर्यंत पाहिलेल्या सगळ्या सिनेमातील हनिमूनची दृश्ये दोघांच्याही डोळ्यांपुढून सरकत असतात. निरभ्र आकाशात चमचमणाऱ्या काही तारका डोळे मिचकावून जणू त्यांच्याकडे पाहात आहेत असा त्यांना भास होतो. अगदी जमिनीपासून छतापर्यंत असलेल्या बारा बाय आठ आकाराच्या त्या मोठ्या काचेच्या खिडकीमुळे त्यांना आकाशाखाली रोमान्स करत असल्याचा भास होणे, स्वाभाविकच होते. मोरपिशी स्पर्श अनुभवत रात्र सरते. श्वेताला जाग येते तेव्हा प्रख्यातच्या घट्ट गुलाबी मिठीतच तिला बेडवरूनच निसर्गाचा विस्तीर्ण पट दिसत असतो. आकाशीच्या निळाईपासून जमिनीवरच्या हिरवाईपर्यंत पाना-फुलांच्या असंख्य रंगांच्या छटांची उधळण नजरेत सामावून घेण्यात ती गर्क होऊन गेलेली असते.

'प्रख्यात...'

अतिशय लाडिवाळपणे ती त्याला हाक मारते.

'अग झोपू दे ना... आताच तर झोपलोय मी. तूसुद्धा मला सोडून कुठं जायचं नाही हं.'

असे काहीसे बरळत तो परत झोपी जातो. साधारण दुपारी दोन-अडीच वाजता दोघेही उठतात.

'श्वेता... थांब थांब, मला या क्षणी आपला एक सेल्फी काढायचा आहे.

'ए... काहीतरीच काय तुझं रे.'

'कसं सांगू तुला... आपण भेटल्यापासून तू इतकी सुंदर मला कधीच दिसली नाहीस. काय खुललाय तुझा चेहरा... या चांदणगोंदणाची आठवण बंदिस्त करायला हवीच!'

असे बोलतच तो श्वेताच्या गळ्याभोवती हात टाकतो. दोन-तीन सेल्फी काढतो.

श्वेता लाजून वॉशरूमकडे पळते.

***

प्रख्यात आळोखेपिळोखे देत टीपॉयवरील मेन्यू कार्ड उचलतो. रेस्टॉरंट या शब्दापुढे लिहिलेल्या ३ नंबरवर फोन लावतो. तो फोन उचलला जात नाही. तो दोन-तीनदा प्रयत्न करतो तरीही पलीकडून फोन उचलला जात नाही. सवयीप्रमाणे तो हातात मोबाइल घेऊन फोन लावणार इतक्यात त्याच्या लक्षात येते की या बेटावर मोबाइलची कोणतीच रेंज येत नाही. थोडासा वैतागून तो उठतो. अंगात कपडे चढवत श्वेताला म्हणतो,

'इंटरकॉम बिघडलेला दिसतोय. मी आपल्या खाण्यासाठी काही ऑर्डर देऊन येतो. व्हेज पुलाव, दही-बुंदी आणि ग्रीन सॅलड, चालेल ना?'

'स्वर्गात पृथ्वीसारखेच सर्व पदार्थ मिळतात?'

श्वेता हसून विचारते.

'हो मिळतातच... शिवाय अप्सरांचा नाचही पाहायला

मिळतो, तो पाहूनच मी परततो...'

असे म्हणत नाचल्याचा हावभाव करत प्रख्यात गडगडाटी हास्य करतो. त्याच्या हास्यात श्वेताही सामील होते. दार ओढून तो निघून जातो आणि काही वेळातच घाबराघुबरा होऊन परततो. श्वेता अवाक् होते.

'श्वेता... श्वेता... रिसॉर्टमध्ये कोणीच नाही, आपल्या दोघांशिवाय.'

'काहीतरीच काय...?'

ती आश्चर्यचकित... प्रश्नांकित नजरेने त्याच्याकडे पाहते.

'तू चल आधी माझ्याबरोबर...'

तो श्वेताचा हात खेचत म्हणतो.

'अरे, पण मला कपडे तर घालू दे... असे नाईटसूटच्या सिंगल पीसमध्ये...?'

'तुझ्याकडं पाहायला या अख्ख्या हॉटेलमध्ये माणसं तर नाहीतच पण एक काळं कुत्रंसुद्धा नाही.'

त्रासलेल्या स्वरात प्रख्यात म्हणतो. तरीही बेडवरचा नाईट गाऊनचा दुसरा पीस ती अंगावर चढवते आणि पायात स्लीपर सरकवून प्रख्यातसोबत झपाट्याने बाहेर पडते. त्याही परिस्थितीत आठवणीने रूमचे इलेक्ट्रॉनिक की-कार्ड मात्र हातात घ्यायचे विसरत नाही. दोघेही अंगात वारे भरल्यासारखे रिसॉर्टच्या या दालनातून त्या दालनात फिरत राहतात. रिसेप्शन, डायनिंग एरिया, कॅन्टिन एरिया, जिमखाना, स्पा एरिया, प्ले एरिया, वॉकिंग ट्रॅक... अगदी सिक्युरिटी गार्ड केबिनसुद्धा रिकामे असते. रात्रभराची प्रणयधुंदी सर्रकन उतरते. तीही त्याच्या वेगाने त्याच्यासोबत पळत असते. बाहेरचा मोठा लोखंडी दरवाजा कडीच्या आसपासच्या लोखंडी गजातून हात घालून ते उघडतात. त्याच अवस्थेत रस्त्यावर फिरतात. एकही माणूस काही त्यांना दिसत नाही. थकून माघारी परततात.

श्वेता त्याला धीर देते.

'आसपास काहीतरी अघटित घडलं असेल. तिथे सगळे गेले असतील. येतील परत. चल, आपण काहीतरी खाऊन घेऊ.'

'कुठे आणि काय खाणार?'

'अरे, कॅन्टीन आहे की... तिथे सर्व पदार्थही आहेत. मी दोन सँडविच बनवते आपल्यासाठी.'

ते दोघे सोबतीने सँडविच बनवून डायनिंग एरियामध्ये बसून खातात आणि मग आपल्या रूमवर परततात. प्रचंड मानसिक थकव्याने बेडवर आडवे पडतात. थोड्या वेळाने श्वेता म्हणते,

'मला वाटतं आपण दोघांनी मस्त अंघोळ करावी.'


प्रख्यात डोळे विस्फारून तिच्याकडे पाहतो आणि मग एक सुस्कारा सोडत म्हणतो,

'किती हौसेनं बाथ-टबवाली रूम बुक केली मी. आता तर साधी शॉवरखालीपण अंघोळ करायची भीती वाटतेय.'

श्वेता उठते आणि त्याचे डोके आपल्या मांडीवर घेते. पदरआड जाण्याआधीच हिरावलेले त्याचे बालपण तो तिच्या मेंदीभरल्या ओंजळीतून पांघरल्याचे अनुभवतो. तृप्तीने डोळे मिटून घेतो. ती गोड आवाजात गुणगुणते,

'हम तुम एक कमरे में बंद हो और...'

तो डोळे उघडून तिच्याकडे पाहतो. ती हसून म्हणते,



'लाखो रुपये खर्च करूनसुद्धा असा एकांत मिळणं कठीणच आहे रे... चल... लेट्स एन्जॉय इट.'

'श्वेता... मला तुझी कमालच वाटते. इतकी भयानक आणि बिकट परिस्थिती असतानाही तू मस्तपैकी सँडविच बनवतेस, मला प्रेमानं खाऊ घालतेस आणि आता माझे डोकं मांडीवर घेऊन रोमँटिक गाणं म्हणतेस... मानायला पाहिजे तुला. चला, माझ्यातही आता ऋषी कपूर संचारलाय... आणि तो बाथ-टब मला खुणावू लागलाय.'

असे म्हणत तो दोन टर्कीश टॉवेल उचलतो जे दोन पक्ष्यांच्या जोडीच्या स्वरूपात गुंफलेले असतात. रोमँटिक मूड निर्माण करणाऱ्या रूम सर्व्हिस देणाऱ्या त्या मुलाचे तो मनोमन

कौतुक करतो.

'दॅट्स द स्पिरिट...' म्हणत श्वेतापण उठते आणि दोघे बाथरूमकडे जातात. त्यानंतर तास-दोन तास त्यांना या जगाचा विसर पडतो. रात्री नऊ वाजता मात्र भुकेने पोटात कावळे ओरडू लागतात आणि प्रखर वास्तव डोळ्यांसमोर येते. या रिसॉर्टमधील कर्मचारी, इतर माणसे परत आली असतील, या आशेने ते परत परत इंटरकॉम फिरवत राहतात. कंटाळून रात्री उशिरा दोघेही कॅन्टीनमध्ये जाऊन ब्रेड-जाम, सलाड वगैरे खाऊन रूमवर परततात. सताड डोळे उघडे टाकून बेडवर पडतात आणि त्यांच्या डोळ्यांसमोर मागील काही वर्षे झपाट्याने पुढे सरकतात.

******

प्रख्यात आणि श्वेताची पहिली भेट प्रख्यात एम.एस.सी. (केमिस्ट्री) पार्ट-टूला असताना झालेली असते. तेव्हा ती मुंबई युनिव्हर्सिटीमध्ये एम.एस्सी. (मायक्रोबायोलॉजी) पार्ट-वनला असते. सात-आठ महिन्यांच्या काळात जणू आठ पूर्वजन्म सोबत काढल्यासारखी दोघांची घट्ट मैत्री झालेली असते. तिच्यापेक्षा दोन शेड गोरा असलेला, साधारण उंची असलेला आणि सर्वसामान्य चेहऱ्याचा प्रख्यात स्वभावाने शांत, संयमी म्हणून तिला आवडलेला असतो. श्वेताच्या घरात तिचे वडील त्यांच्या प्रेमाला विरोध करतात. प्रख्यातबद्दल वडिलांना आधीच काही माहिती आहे का, जी आपल्याला माहीत नाही, हा प्रश्न मात्र तिला कायम छळत राहतो. तिचा आणि वडिलांचा संवाद जवळजवळ संपुष्टात आलेला असतो. दरम्यान श्वेताच्या आईची प्रकृती ढासळू लागते. एक-दोनदा तिला हॉस्पिटलमध्येही ॲडमिट करावे लागते. एके दिवशी श्वेताच्या वडिलांना रस्त्यावरून चालताना एक ट्रक उडवतो आणि त्या जागीच त्यांचा अंत होतो. या दुःखाला सामोरे जात असतानाच, सगळ्यांना आश्चर्यचकित करणारी घटना घडते, की तीन दिवसांनंतर श्वेताची आई हे जग सोडून निघून जाते. आईवडिलांचे विधी संस्कार करून श्वेता थोडीशी स्थिरावते. नातेवाईकही आपापल्या घरी निघून जातात.

प्रख्यात आणि श्वेता लग्न करायचा निर्णय घेतात. कोर्टात जाऊन रजिस्टर पद्धतीने लग्न करतात. प्रख्यात हनिमूनसाठी अंदमान-निकोबार बेटसमूहातील काराटांग या बेटाची निवड करतो.

***

दोघांच्याही डोळ्यांसमोर थोड्याफार फरकाने हेच सर्व पूर्वायुष्य याक्षणी तरळत होते. किती व्यवस्थित व्हॅली या रिसॉर्टमध्ये त्यांचे आगतस्वागत झाले होते. गुलाबी आणि सोनेरी रंगाच्या फुलाफुलांचा फ्रॉक घातलेल्या दोन मुलींकडून शंख वापरून बनवलेल्या माळा त्या दोघांच्या गळ्यात घातल्या गेल्या होत्या. हसतमुख चेहऱ्याच्या दोन तरुणांनी गिटार वाजवून आल्हाददायक वातावरणनिर्मिती केली होती. रंगीबेरंगी इव्हिनिंग गाऊन घातलेल्या तरुणीने वेलकम ड्रिंक आणून दिले होते. एका दिवसात ही सगळी माणसे कुठे गायब झाली हे दोघांनाही कळत नव्हते. मन कुठेही रमवले तरी मनातल्या भीतीचे सावट हनिमूनच्या निरभ्र आकाशाला झाकोळून टाकत होते.

***

'ये माझ्या कुशीत... झोपण्याचा प्रयत्न कर.' असे म्हणत प्रख्यात श्वेताला स्वतःजवळ बोलावून घेतो आणि त्याच्या खांद्यावर डोके टेकून श्वेता पडते. सकाळी उठल्यावर दोघे आलेल्या परिस्थितीला तोंड द्यायचे ठरवतात. कॅन्टीनमध्ये गेल्यावर लक्षात येते की ब्रेडवर बुरशी आलीय. मग दूध-कॉर्नफ्लेक्स खाऊन ते दोघे बाहेर पडतात. समुद्रकिनाऱ्याजवळ जातात. दूरवर दिसणाऱ्या एका खरखरीत मोठ्या दगडावर जाऊन बसूया, असा विचार करतात, जेणेकरून शांतपणे समुद्र न्याहाळता येईल. अचानक समोरून एक बकरीसदृश प्राणी वेगाने पळत येतो आणि दोन-तीन मगरी उडी मारून त्याचा फडशा पाडतात. त्या प्राण्याचा कुत्र्यासारखा भुंकण्याचा मोठा भयानक आवाज ऐकून हे दोघे जागीच स्तब्ध होतात. त्यांना जो खरखरीत दगड वाटत होता त्या असंख्य मगरी या एकत्रितपणे जणू सूर्यस्नान घेत होत्या. त्या जंगली बकरीमुळे दोघेही वाचतात. मनोमन देवाचे आभार मानून ते थोडेसे पुढे जातात तेव्हा एक छोटसे जंगल दिसते. असंख्य वेगवेगळे पक्षी किलबिलाट करत असतात. श्वेता त्यांच्याकडे बोट दाखवून 'तो मोठ्या पिवळ्या चोचीवाला हॉर्नबिल', 'तो बघ छोटुकला पिवळट बुलबुल', 'अरे तो कोंबडीसारखा दिसतोय ना तो मेगापोड्स'...

अशा तऱ्हेने उत्साहाने अनेक पक्षी ती प्रख्यातला दाखवते. इतक्यात एक आडव्या पडलेल्या झाडावर अजगर पहुडलेला दिसतो. त्याला पाहून त्या दोघांच्याही मनात भीती दाटते आणि इथे कोणाचीही मदत लागली तर मदत मिळणेही शक्य नाही, या विचाराने ते मनाविरुद्धच मागे फिरतात.

खरे तर या बेटावर त्यांना अनेक ठिकाणे पाहायची

असतात. 'एका वाटेवरून पुढे जाताना त्यांना 'मड व्होल्कॅनो' असे इंग्रजीत लिहिलेली पाटी दिसते. हे पाहण्यासाठीच तर मुख्यत्वे ते इथे आलेले असतात. उत्साहाने ते चालू लागतात. समोरच्या निमुळत्या पायवाटेवरून दहा-पंधरा पावले पुढे गेल्यावर त्यांना दूरवर एक ज्वाळा दिसून येते. जंगलाला आग लागली आहे की काही आदिवासी आसपास आहेत, याबद्दल दोघेही साशंक होतात. न जाणो आपल्यालाच भाजून खातील, या विचाराने भयकंपित होत ते परत रिसॉर्टकडे परतातात.

दुपारचे दोन वाजून गेलेले असतात. इतक्यात काही डबे पडल्याचे आवाज येतात आणि दोघेही घाबरतात. अचानक एक पांढराशुभ्र मोठा धुराळा कॅन्टिनच्या दारातून बाहेर फेकला जातो. तेथून पळ काढत कसेबसे ते रूमच्या आत शिरतात. एकमेकांना घट्ट धरून भेदरलेल्या अवस्थेत डोळे बंद करून काही काळ बसून राहतात. वेगवेगळे आवाज त्यांना खूप अस्वस्थ करतात. काही वेळाने सगळे आवाज बंद झाल्यावर ते दबकत बाहेर पडतात. खाली येतात, कॅन्टिनकडे जातात. तिथे उंदीर फिरत असतात. पिठाचा डबा आडवातिडवा खाली पडलेला दिसतो याचा अर्थ तो धुराळा म्हणजे ते पीठ होतं तर... उंदरांनी पाडलेले. काय काय विचार त्यांच्या मनात येऊन गेलेले असतात! दोघांनाही हायसे वाटते. थोडीशी भीती कमी होते. तेथील सफरचंद खाऊन ते आपल्या रूममध्ये परततात.

या बिकट परिस्थितीत कशी आणि कोणाकडून मदत घ्यावी, तेही त्यांना कळत नाही. श्वेता खिडकी उघडते आणि अचानक तिच्यावर हल्ला होतो. शरीरापेक्षा लांब शेपटी असलेले एक माकड तिच्यावर वेगात झेपावते. ती जिवाच्या आकांताने किंचाळते. प्रख्यात तिच्याकडे धाव घेते आणि ती खिडकीपासून थोडी बाजूला सरकते तशी एकामागून एक दहा-पंधरा माकडे आत शिरतात. ते दिसतील त्या वस्तू उलटपालट करू लागतात. थोडासा धुमाकूळ घालून झाल्यावर माकडांच्या लक्षात येते की इथे खाण्याचे काहीच नाही आणि मग ते एकेक करून स्वतःहूनच बाहेर जाऊ लागतात. माकडाची अणुकुचीदार नखे श्वेताच्या कानाच्या बाजूला थोडीशी घुसल्यामुळे त्यातून रक्तही येत असते. ती स्फुंदत असते. प्रख्यात जखम कापसाने पुसतो आणि खिडकी लावून घेतो. आता मात्र दोघांना एक अनामिक भीती ग्रासून टाकते. ते येऊन दोनच दिवस झालेले असतात. भीतीच्या सावटाखालीच दोघेही झोपायचा प्रयत्न करतात.

***

तिसऱ्या दिवशी सकाळी प्रख्यात डोळे उघडतो तेव्हा श्वेता परत खिडकी उघडून खाली डोकावून पाहत असते. प्रख्यात तिला ओरडतो,

'अग, कालचा प्रसंग आठवत नाही का तुला... काय करते आहेस? लाव ती खिडकी.'

तेव्हा ती काहीच प्रतिक्रिया देत नाही हे पाहून तो उठतो आणि तिच्याकडे जाऊ लागतो तशी ती म्हणते,

'मला आता या क्षणी खाली गेलं पाहिजे.'

तो विचारतो, 'कशासाठी?'

'मला गेलंच पाहिजे कारण माझे बाबा मला खाली बोलवत आहेत.'

'अग... काय बोलतेस, कळतंय का? तुला आठवत नाहीय का ते महिनाभरापूर्वीच हे जग सोडून गेलेत.'

ती ऐकले न ऐकल्यासारखे करते. लिफ्टसाठीही न थांबता जिना उतरत वेगाने खाली उतरते.

काय करावं, या विचारात प्रख्यात तसाच खिडकी धरून उभा राहतो आणि त्याला समोर जे दृश्य दिसते ते पाहून तो घाबरून जातो. कारण श्वेता एकटीच हातवारे करत बोलत असते. तो सुन्नपणे बेडवर येऊन बसतो. श्वेता केव्हा परत येते त्याला कळतही नाही. थोड्या वेळापूर्वी काहीच न घडल्यासारखी श्वेता सामान्यपणे वागू लागते. तोही विचार करतो की या क्षणी तिला काही विचारायला नको. अतिशय जास्त घाबरल्यामुळे तिची ही अवस्था झाली असेल. तो तिला मायेने थोपटत राहतो. जवळ घेतो. यांत्रिकपणे ते, तो दिवस ढकलतात. त्याच्या कटाक्षाने मोहरून जाणारी श्वेता एखाद्या निर्जीव वस्तूकडे अधांतरी पाहात असल्यासारखी त्याच्या नजरेपल्याड पाहात राहते. कधी रात्र होते तेही कळत नाही. इतक्यात पंखा हळूहळू फिरत बंद होतो आणि त्या रूमसहित संपूर्ण रिसॉर्ट एरियातले दिवे झपकन बंद होतात. श्वेता प्रख्यातला अधिकच बिलागते. तो तिला थोपटत म्हणतो,

'श्वेता, तू अजिबात घाबरू नकोस हं... मी आहे ना आणि बघ तो पूर्ण चंद्र... किती छान प्रकाश पसरलाय आपल्या रूममध्ये या खिडकीतून. सगळे ग्रह-तारे आहेतच की सोबत, तू कशाला घाबरतेस?'

श्वेता त्याही अवस्थेत फक्त हुंकार देते. मग प्रख्यात म्हणतो,

'थांब मी तुझ्यासाठी खूप छान गाणं म्हणतो...

तोच चंद्रमा नभात तीच चैत्रयामिनी...'

त्याच्या गोड आवाजातील गाण्याने श्वेताला कधी झोप लागते ते त्यालाही कळत नाही. तोही तिला घट्ट

मिठीत घेऊन झोपी जातो फक्त काही क्षण... आणि अचानक टकटक टकटक असा आवाज येत राहतो. प्रख्यात खिडकीकडे पाहतो. श्वेताचे डोळे बंद असतात, हे एका दृष्टीने त्याला बरेच वाटते. त्याच्यातच घुबडाचे धुत्कार वाढत जातात. कोणतेतरी कीटक झुंडीने फिरत घोंगावणारा आवाज करत असतात. घामेजल्या चेहऱ्याने तो मनावरील अंधाराचा पडदा चिरत खिडकीबाहेर चंद्राचा प्रकाश पाहण्याचा प्रयत्न करतो. घोगऱ्या आवाजात श्वेता... श्वेता... ओरडतो. ती प्रतिसाद देत नाही. एक सावली दिसते, अचानक दिसेनाशी होते. थोड्यावेळाने प्रख्यातला डोळ्यांवर खूप सारा प्रकाश पडल्यासारखा वाटतो म्हणून तो परत एकदा डोळे उघडतो तर मंद प्रकाश फेकणारे असंख्य किडे त्या खिडकीवर बसलेले त्याला दिसतात. डोके फुटेल इतके मोठे आवाज येत असूनही श्वेता डोळे का उघडत नाही, याचीही त्याला भीती वाटते. तिची पाठ खिडकीकडे असते आणि चेहरा त्याच्याकडे. इतक्यात काच तडकल्याचा त्याला आवाज येतो. तो उठून बसतो. काचेवरचे सगळे किडे उडून गेलेले असतात. भन्नाट वारा सुटलेला असतो. कदाचित त्या वाऱ्यामुळेच ते उडून गेले असणार असे त्याला वाटते. तो परत झोपायचा प्रयत्न करतो. इतके मोठे आवाजही श्वेताला ऐकू येऊ नये, याचे त्याला नवल वाटते. तो खूप घाबरतो. तिच्या नाकापुढे हात ठेवून, तिच्या छातीवर हात ठेवून ती जिवंत असल्याची खात्री करतो आणि डोळे मिटून तिच्या अंगावर हात ठेवून पडतो.

*****

प्रचंड थकव्याने ग्लानी आल्यासारखा प्रख्यात पडलेला असतो. एक अनामिक भीती त्याला ग्रासून टाकते. स्किझोफ्रेनिया या गंभीर आजाराने तिला ग्रासले आहे, हे त्याच्या लक्षात येते. सकाळी उठल्यावर श्वेता बोलताबोलता खिडकीत जाते आणि मागे वळून त्याला म्हणते,

'बाबा मला खाली बोलवत आहेत.'

तो आवाज चढवून तिला म्हणतो,

'सकाळीच तू भेटून आलीस ना... आता परत कशाला?'

त्याच्या चढलेल्या आवाजाने तिच्या डोळ्यांत अश्रू उभे राहतात आणि ती त्याच्याकडे रोखून बघत म्हणते,

'बाबा बरोबरच म्हणत होते. तू माझ्यावर चिडणार, ओरडणार, भांडणार आणि मग मला मारून टाकणार... म्हणूनच तू मला इथे घेऊन आला आहेस...'

प्रख्यात जागेवरून उठतो आणि तिच्याजवळ जाऊ लागतो तशी ती मागे मागे सरकते आणि म्हणते.

'नाही... मला मारू नकोस.'

'अग, वेडी आहे का तू? श्वेता... श्वेता...'

प्रख्यात चिरक्या आवाजात ओरडू लागतो. श्वेता अधिकच मागे मागे सरकत जाते. ती त्याला ओरडून विचारते,

'तुझ्या आईवडलांना तू मारून टाकलंस?'

'अग, काय बोलतेस हे तुला कळतंय का?'

'मला माझ्या बाबांनी हेच सांगितलंय आणि तू मलाही मारून टाकण्यासाठी इथे आणलं आहे. पण तू हे करू शकणार नाहीस कारण माझे बाबा माझ्यासोबत आहेत...'

असे म्हणत ती झटकन दाराची कडी काढते आणि पायात चप्पलही न अडकवता धडधडत जिन्याच्या पायऱ्या उतरते. प्रख्यात परत खिडकीतून पाहतो तेव्हा ती हातवारे करत बोलत असते. आता मात्र तो खाली उतरतो आणि तिच्याजवळ जाऊ लागतो. ती नाही... नाही... ओरडते. त्याच क्षणी असंख्य किडे घोऽ घोऽ असा आवाज करत त्यांच्या आसपास घोंगावायला लागतात आणि त्यांना काय करावे सुचत नाही. प्रख्यात श्वेताला ओरडून परत आपल्या रूमकडे ताबडतोब जाऊया, अशी विनंती करतो; पण श्वेता ती विनंती धुडकावून लावते. तो तिला सोडून जाऊ शकत नाही आणि त्या गोंधळात त्या सगळ्या माश्या त्या दोघांच्या सर्वांगावर तुटून पडतात. त्या माऱ्याने, चाव्याने ते दोघेही खाली पडतात. मरणप्राय वेदनेने ते किंचाळतात, रडतात, गडाबडा लोळतात. प्रख्यात श्वेताऽ श्वेताऽ ओरडत राहतो आणि एकाक्षणी त्याला ग्लानी येते.

***

तीन दिवसांनंतर प्रख्यात डोळे उघडतो तेव्हा बाजूच्या बेडवर त्याला श्वेता पहुडलेली दिसते. श्वेता त्याच्याकडे पाहते आणि प्रसन्न हसते. ती त्याच्या काही तास आधीच बेशुद्धावस्थेतून बाहेर आलेली असते आणि तिला सर्व परिस्थितीची जाणीव त्या हॉस्पिटलस्टाफने करून दिलेली असते. ती ही सगळी घटना प्रख्यातला सांगायचा प्रयत्न करते.

***

या बेटावर असलेल्या या मड व्होल्कॅनोमधून साधारण सतरा वर्षांपूर्वी ज्वाळा बाहेर पडू लागल्या होत्या. कधीतरी

त्यातून मोठ्या प्रमाणात मिथेन वायू बाहेर पडतो, तसा तो पडला होता. या ज्वलनशील वायूने पेट घेतला आणि या बेटावरील सगळ्यांना त्या ज्वाळा दिसू लागल्या होत्या. परंतु त्या विझतील या भ्रमात सर्व लोक होते आणि दोन-चार तासांतच त्या ज्वाळा खूप वाढल्या. त्याने जंगलात आग पसरली. या ठिकाणची संपूर्ण वस्तीच जळून खाक झाली होती. जी माणसे बोटीतून निघून गेली, तेवढीच वाचली होती. याविषयी या बेटावर नेहमी बोलले जायचे. शासनाने इथे जागोजागी रेड अलर्ट जारी करून कोणत्याही भागातील कोणताही माणसाला अशा तऱ्हेने आग किंवा लाटांचे तांडव असे काही दिसले तर त्यांनी एकमेकांना जागरूक करायचे, अशी व्यवस्था करून ठेवलेली होती. आपण आलो त्या दिवशी रात्री अचानक याच मड व्होल्कॅनोतून ज्वाळा निघू लागल्या होत्या तेव्हा त्या जुन्या घटनेची जाणीव येथील जाणकारांनी एकमेकांना जागरूकपणे करून दिली. बोटी भरून येथून सगळे रहिवासी, टूरिस्ट निघून गेले. खरे तर जाण्याआधी बेटावरच्या सर्व रहिवाशांपर्यंत माईकवरून याबद्दलची घोषणाही त्यांनी व्यवस्थित केलेली होती, परंतु आपण दोघे त्यावेळेस या बेटावरूनही पुढे, एका वेगळ्याच प्रेमबेटावर पोहोचलेलो होतो! अगदी दाराबाहेर डू नॉट डिस्टर्बचा बोर्ड लावल्यापासून ते इंटरकॉम बंद करून ठेवण्यापर्यंत आपण काय काय केले, आठवत असेलच! आपण असे कोणतेही आवाज ऐकण्याच्या पलीकडचे होतो. मला असेही या लोकांनी सांगितले की गेले तीन-चार दिवस हेलिकॉप्टरद्वारे या व्होल्कॅनोची पाहणी केली जायची. त्या ज्वाळा पूर्णपणे विझल्याची खात्री झाल्यावर येथील रहिवासी टूरिस्टसह बेटावर परतले. त्यांनी आपल्याला रस्त्यावर पडलेले पाहिले. त्या किड्यांच्या हल्ल्याने आपले चेहरे संपूर्णतः सुजले होते, ओळखू येण्यापलीकडचे होते. इकडच्या लोकांना माहीत होते की नेमके कोणते किडे चावल्यावर माणसाची अशी गत होते त्यामुळे त्यांनी आपल्यावर ताबडतोब उपचार केले. आपण गेले दोन दिवस या हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहोत.

***

प्रख्यातला अधेमधे कोणताही प्रश्न विचारायची संधी न देता एका दमात श्वेताने हे बेट निर्मनुष्य होण्याची कथा सांगितली.

श्वेता तिच्या चेहऱ्यावरच्या काळ्याभोर खुणामुळे ती भयानक दिसत होती. शारीरिक-मानसिक थकवा असूनही त्याही परिस्थितीत सर्व शक्ती एकवटून प्रख्यात उठतो. तिला म्हणतो,

'श्वेता... जन्मत:च मला उकिरड्यावर टाकण्यात आले. माझी आई कुमारी माता होती की माझा जन्म कोणत्या कारणाने माझ्या आईवडलांना नको होता, माहीत नाही. मला आईवडील नाहीत, इतकेच मी कायम सगळ्यांना सांगत आलो. माझे पालकत्व कोणी नाकारले आहे हे सांगण्याची कधीच हिंमत झाली नाही. श्वेता... तू तरी या अनाथाला नाकारणार नाहीस ना?'

'नाही राजा, कधीच नाही... आता आपल्या दोघांनाही पालक नाहीत, पण आपण कुणाचे तरी पालक नक्की होऊ शकू...'

श्वेता ठीक आहे, सामान्य माणसांसारखी विचार करत आहे, या आनंदात तो असतानाच अगदी सिनेमातल्यासारखे त्यांच्या आसपास हॉस्पिटलचे डॉक्टर-नर्सेस-वॉर्ड बॉय येऊन उभे राहतात. डॉक्टर म्हणतात,

'अरे मुलांनो, तुम्हाला माहीत आहे का? तुमचा दोघांचाही पुनर्जन्म झाला आहे... स्टाफने हा केक आणला आहे. नव्याने आयुष्य सुरू करा.'

ते दोघेही केककडे पाहतात. त्यावर वरच्या बाजूला अर्धवर्तुळाकार लिहिलेले असते- निर्जन बेटावर... आणि त्याखाली एक लाल रंगाचा बदाम असतो!

एक नर्स प्रख्यातच्या हातात केक कापण्यासाठी म्हणून चाकू देते आणि अचानक 'नाही... नाही, मला मारू नकोस... बाबाऽ बाबाऽ' किंचाळात श्वेता धडाधड पायऱ्या उतरून रस्त्याकडे धाव घेते... सगळे अवाक् होतात. एक वॉर्डबॉय तिच्या मागे पळत जातो आणि प्रख्यात गर्भगळीत होऊन मटकन खाली बसतो. त्याच्या हातातील चाकूसुद्धा गळून खाली पडतो. तो एकटक त्या केकमधल्या लालबुंद बदामाकडे पाहतो. त्याला जणू तो व्होल्कॅनो भासू लागतो. बदामावर कोरलेल्या काळ्या बाणातून लाल तप्त लाव्हा उसळून वेगाने त्याच्याकडे सरकत त्याच्या रक्तात शिरत आहे, असा त्याला भास होतो. त्याच्या शिरा तटतटून त्याचा दाब मस्तकावर पडतोय असे वाटून तो जिवाच्या आकांताने किंचाळतो आणि बेडवरच मागे मागे सरकत जातो!

**– प्रतिभा सराफ**

pratibha.saraph@gmail.com



# एक सजग, सदाबहार शहर

डॉ. अजित मगदूम

सकाळी साडेसहाला विमानाने सॅन अँटोनिओ या टेक्सास प्रांतातील शहरातून निघून अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील सॅन फ्रान्सिस्को या शहरात चार तासातचा प्रवास करून पोहोचलो. विमानतळावरच नावानं 'रोग' असली तरी तगडी गाडी भाड्यानं घेतली. पत्नी वृषाली, मुलगा सौरभ, सून तेजश्री व दोन वर्षांची नात इरा असे आम्ही युनियन स्क्वेअरजवळच्या सेंट फ्रान्सिस ड्रेक नावाच्या आलिशान हॉटेलमध्ये पोहोचलो. सामान व आमची गाडी तिथेच पार्क करून फिरण्यासाठी ठरवलेली गाडी जिथे येणार होती तिथंपर्यंत चालतच गेलो. थोडा वेळ होता अजून म्हणून एका कट्ट्यावर बसून बरोबर आणलेली चपाती पिठलं व थालीपीठं खाऊन घेतली. आता थंडगार वाऱ्यात गारठलेल्या अवस्थेत हे खाणं म्हणजे एक मजेदार अनुभव. शिवाय चपाती पिठलं आणि तेही सॅन फ्रान्सिस्कोमध्ये म्हणजे एक गंमतच!

तेवढ्यात आमची व्हॅन आली. मी बघतच राहिलो. रस्त्यावरच्या सगळ्या गाड्यांपेक्षा ही वेगळीच होती. चक्क केशरी रंगाची. पुढचे दिवे खाली असलेली व दिव्यांभोवती काळ्या रंगाच्या उभ्या रेषा म्हणजे जणू गाडीच्या डोळ्यांच्या पापण्याच त्या! पुढच्या दोन्ही दिव्यांच्यामध्ये VW ही अक्षरं पाहून होक्स वॅगन कंपनीचं जुनं मॉडेल असावं असा तर्क मी बांधला. चाळीसेक वर्षांपूर्वी आपल्याकडे मेटॅडोर नावाची व्हॅन होती अगदी तशीच काहीशी. ऐसपैस, चढायला उतरायला अगदी सोपी. आम्हाला खूप आवडली ती तिच्या वेगळेपणामुळे! चालवणारा गोरा ड्रायव्हर मायकेल सांगत होता, 'गेल्या अकरा वर्षांपासून मी तिला निगुतीनं सांभाळतोय.' तो बोलका असल्यानं बरीच माहिती त्याच्याकडून आधीच मिळायची. सॅन फ्रान्सिस्को शहरानं आता कात टाकलीय. १९०६ व त्यानंतर १९८९ सालच्या भूकंपात जवळजवळ जमीनदोस्त झालेलं हे शहर आता राखेतून उठून भरभराटीला लागलं आहे. याचं कारण तंत्रज्ञानामुळे त्याला आलेलं महत्त्व. अमेरिकेत गजबजाटाच्या, बरकतीच्या शहराला राजधानी न करता शांत, बाजूला असलेल्या शहराला राजधानीचा दर्जा दिला जातो. तसं कॅलिफोर्नियाची राजधानी लॉस एंजेलिस किंवा सॅन फ्रान्सिस्को असायला हवी होती, पण त्यांच्या पद्धतीनं सॅक्रेमेन्टो या कमी प्रसिद्ध असलेल्या शहराला राजधानीचा मान दिला आहे.

या शहरात वेगवेगळ्या २९ देशांतून आलेले नागरिक आहेत. म्हणूनच याला राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, प्रागतिक, सामाजिक चळवळींचं एक संवेदनशील शहर म्हणता येईल. सांस्कृतिक, वांशिक, राजकीय अस्मिता जागवत या चळवळींनी इथला भूगोल, संस्कृती, पर्यावरण यांचा वारसा घेत इथल्या समाजजीवनाला आकार दिला आहे.

फाऊंड एसएफ ही सर्व संघटनांची शिखर संस्था आहे. बर्कलेची अभयारण्य चळवळ, ऑकलंडची ब्लॅक नॅशनॅलिझम चळवळ, युद्ध आणि अणुबॉम्बविरोधी चळवळ अशा अनेक सामाजिक चळवळी या शहरात तसेच बे एरियात सुरू झाल्या.

अमेरिकेत कुठल्याही राज्यात किंवा शहरात गेलो तरी पाहण्यासारख्या आजूबाजूला खूप काही गोष्टी असतात. कॅलिफोर्निया या नावापासूनच खूप कुतूहल व आकर्षण माझ्या मनात अनेक वर्षांपासून होतं. कोकणची तुलना कॅलिफोर्नियाशी केली जाते किंवा अनेकदा कोकणचा कॅलिफोर्निया झाला पाहिजे असेही नेतेमंडळी अधूनमधून आकर्षक विधान करीत असतात. कॅलिफोर्निया हा अमेरिकेतला अत्यंत सुपीक जमिनीचा व सधन, संपन्न लोकांचा प्रदेश आहे. तिथल्या नापा व्हॅलीतील वाईननिर्मिती;



**एलजीबीटीक्यू+ या मानवसमूहाची ‘कॅस्ट्रो’ नावाची एक भली मोठी वसाहत.**

---

बदाम, अक्रोड, पिस्ता, द्राक्ष, किवी इत्यादींच्या बागा; सिलिकॉन व्हॅली म्हणजे माहितीतंत्रज्ञानाचे माहेरघर आणि इथल्या गुगल, ॲपल व फेसबुकनं तर जगभर पसरवलेलं माहितीतंत्रज्ञानाचं जाळं; इंटरनेटचं जन्मस्थान, मुबलक नैसर्गिक साधनसंपत्ती, दूध आणि मधनिर्मितीचं क्षेत्र, हॉलिवूडची रुपेरी दुनिया आणि महत्त्वाचं म्हणजे सामाजिक-राजकीय-सांस्कृतिक दृष्ट्या सजग असणारं राज्य अशा अनेक वैशिष्ट्यांमुळे कॅलिफोर्नियाचं महत्त्व आणि आकर्षण वाढतच राहिलं आहे. हिरा जसा कोंदणात शोभतो तसं सॅन फ्रान्सिस्को हे शहर कॅलिफोर्नियाच्या अफलातून कोंदणात बेमालूम शोभतं.

इथल्या मूळच्या मेक्सिकन लोकांबरोबर रशियन, चिनी, भारतीय अशा मिश्र वंशांच्या लोकांनी एका मिश्र संस्कृतीला खतपाणी घातलं.

सॅन फ्रान्सिस्कोला ‘बूम टाऊन’ म्हणजे एकाएकी उदयाला आलेलं शहर असंही म्हणतात. याचं कारण म्हणजे १८४८ ते १८५५ या काळात या भूमीत सोनं असल्याचा लागलेला शोध. त्यामुळे उडालेली ‘सुवर्ण झुंबड’ ज्याला Gold Rush असं संबोधलं जातं. याची एक गमतीदार गोष्ट आहे. इथं जलऊर्जेवर चालणाऱ्या लाकूड कापण्याच्या यंत्राच्या शोधात जेम्स विल्यम मार्शल हा न्यू जर्सीहून आला होता. त्यानं २४ जानेवारी १८४८ रोजी या भूमीत सोनं असल्याचा शोध लावला. येथील सटरच्या लाकडाच्या मिलमध्ये तो काम करत होता. सोनं सापडल्याची बातमी या दोघांनी बाहेर येऊ दिली नाही. तरीही काही शब्द बाहेर पडलेच. सटरच्या सॉ मिलजवळ भरपूर सोनं मिळालं आहे अशी बातमीही आली, पण लोकांचा त्यावर फारसा विश्वास बसला नाही. परंतु जूनपर्यंत नगरातील तीनचतुर्थांश लोक सोनं सापडल्याच्या जागी पोहोचले होते. एवढंच नव्हे तर पेरू, चिली आणि चीनमधूनही स्थलांतरितांचा लोंढा सुरू झाला. डिसेंबर १८४८ मध्ये अमेरिकन अध्यक्ष जेम्स पोक यांनी याविषयीची अधिकृत घोषणा केली. त्या काळात दीड लाख लोक नव्यानं स्थलांतरित झाल्यानं नवे नागरी प्रश्न निर्माण झाले. विविध संस्कृतींच्या, वंशांच्या, वर्गांच्या, वर्णांच्या लोकांचा या सुवर्णशोधातील खाणकामगारात तसंच खाणमालकांत समावेश होता. स्थलांतरितांमध्ये ९५ टक्के लोक तरुण होते. मिश्रवंशीय, मिश्रलिंगी लोकसंख्येमुळे सामाजिक सामंजस्य व सलोखा निर्माण करण्यात गोंधळ उडाला होता. १८५३ च्या दरम्यान सामान्य माणसाला आपल्या हत्यारानं खाणकाम करणं अवघड होऊ लागलं. कारण बड्या खाणव्यावसायिकांनी हायड्रोलिक मशीनद्वारे खाणकाम करून प्रचंड नफा मिळवला. यादरम्यान निसर्गाची अपरिमित हानी झाली. काहींनी तर नद्यांनाही बाजूला सारलं. परिणामतः सामान्य स्थलांतरितांच्या पदरी निराशाच आली. कराराप्रमाणे १८५५ साली सोन्यासाठीची झुंबड (Gold Rush) संपुष्टात आली. पण त्यामुळे कॅलिफोर्नियाला राज्याचा दर्जा मिळाला व सॅन फ्रान्सिस्को एक घडामोडींचं, आर्थिक बरकतीचं शहर म्हणून उदयास आलं.

आम्ही पहिल्या दिवशी शहरात तीन-साडेतीन तासांचा फेरफटका मारला. पहिल्यांदा आम्हाला या शहराच्या केंद्रस्थानी असलेली ९२२ फूट उंचीची जुळी शिखरं (Twin Peaks) बघायला नेलं. नागमोडी रस्त्याने उंच उंच गेल्यानंतर एक छोटीशी मोकळी सपाट जागा मिळते तिथून सॅन फ्रान्सिस्को शहराचं अत्यंत मनोहारी असं विहंगम दृश्य पाहायला मिळतं. शहराच्या जवळजवळ एक हजार फूट उंचीवरून शहर चाहूबाजूंनी पसरल्याचं दिसतं. शहरातील



**पापण्या असलेली ही गाडी.**



शेवटी शेक्सपीयरचा हा पुतळा सापडला!

रस्त्यांवरील वर्दळ, ट्रान्स अमेरिका ही उत्तुंग इमारत, मार्केट स्ट्रीट, याबरोबरच प्रेक्षणीय असं गोल्डन गेट ब्रिज, एकेकाळी कैद्यांना डांबून ठेवणारा अल्कत्राज तुरुंग असलेली टेकडी, हिरव्यागार वृक्षांच्या छायेत पहुडलेली घरं, हे सारं दृश्य विलोभनीय आहे. आम्ही दुपारनंतर गेलो होतो. त्यामुळे थंडीवारा एवढा होता की अक्षरशः बोबडी वळायला लागली.

सकाळी पाच वाजल्यापासून या शहरात लोक यायला सुरुवात होते. दहाच्या आत आलो तर गर्दी कमी असते, मायकल सांगत होता. पण प्रत्येक प्रहराला या शहराचं सौंदर्य वेगळं बघायला मिळतं. पूर्वेकडे पाहिलं तर उपसागर दिसतो. त्यापलीकडे बर्कले, ओकलँड शहरं दिसतात तर दुसऱ्या बाजूनं पॅसिफिक समुद्राचं अथांग दर्शन होतं. (अलीकडेच वाचण्यात आलं की २०१८ मध्ये १०७० फूट उंचीची म्हणजेच या प्रेक्षणीय जुळ्या शिखरांपेक्षाही अधिक उंच अशी 'सेल्स फोर्स टॉवर' ही गगनचुंबी इमारत बांधून पूर्ण झाली आहे.) या शहराची वरून दिसणारी नजाकत मनात साठवत रस्त्याची तीच वळणं घेत खाली आलो. या शहराची मला आवडलेली गोष्ट म्हणजे घसरगुंडीसारखे उतार आणि पुन्हा तितकेच चढाचे रस्ते. या नैसर्गिक चढउताराचा फायदा घेऊन १९२२ मध्ये रशियन हिलवरून खाली येणारा तीन मैलांचा लोम्बार्ड स्ट्रीट नावाचा नागमोडी रस्ता बनवल्यापासून तिथे येणाऱ्या कोणत्याही पर्यटकाला इथे गाडी चालवण्याचा मोह अनावर झाल्याशिवाय राहत नाही. एखाद्या अम्युजमेंट पार्कमधील राईडसारखा थरार अनुभवता येतो. आम्हीही तो अनुभवला.

रस्त्याकडेला पार्क केलेल्या गाड्यांची पुढची चाके वळवलेली असायची. याचं कारण मला नंतर समजलं की उताराला तोंड करून ज्या गाड्या लावलेल्या असतात त्यांची पुढची दोन्ही चाकं डावीकडे वळवलेली असतात, तर चढाला तोंड करून लावलेल्या गाड्यांची पुढची चाकं उजवीकडे वळवलेली असतात. ही चाकं सरळ ठेवली तर उताराच्या बाजूला घसरण्याची शक्यता निर्माण होते म्हणून इथे गाड्या पार्क करण्याचा हा एक शिरस्ता असून तो पाळला जातो.

येता येता युनियन स्केअर हे शहराचं मध्यवर्ती आणि अनेक चळवळींना चालना देणारं, अनेक घडामोडींचं साक्षीदार असलेलं एक ऐतिहासिक ठिकाण पाहण्यासाठी नव्हे तर अनुभवण्यासाठी गाडीतून उतरलो. अडीच एकराचा हा परिसर असून संपूर्ण दगडी फ्लोरिंगमुळे हे आवार अतिशय भव्य दिसतं. आजूबाजूला हॉटेलं, थिएटर, मार्केट इत्यादी गजबज असून ही जागा चोवीस तास खुली असते. या सार्वजनिक ठिकाणी सर्व प्रकारच्या लोकांना एकत्र येऊन मेळावे, सभा घेण्यास मुभा असते. अमेरिकेच्या नागरी युद्धाच्या काळात मेळावे सभा घेण्यासाठी हे ठिकाण प्रसिद्ध होते म्हणून याला 'युनियन स्केअर' असं नाव दिलं गेलं. या मोकळ्या जागेच्या मधोमध एक उंच दगडी स्तंभ आहे. त्याच्याजवळ आम्ही फोटो काढले. इथून आमचं हॉटेल पायी चालण्याच्या अंतरावर असल्यानं मायकेलला दुसऱ्या दिवशी दहा वाजता यायला सांगितलं. आम्ही हॉटेलमध्ये जेवण केल्यानंतर इथे जवळच असलेल्या ॲपलच्या आलिशान कार्यालयाला भेट दिली. संपूर्ण काचेचं भव्य असं कार्यालय असलं तरी ॲपल असा कुठेही बोर्ड नव्हता हे विशेष.

दुसऱ्या दिवशी दहा वाजता मायकेल आधीच आला होता. या शहराचा उर्वरित भाग पाहण्यासाठी सज्ज झालो.



जगातला सर्वात जास्त तीक्ष्ण वळणांचा (Crooked) ही लँबार्ड स्ट्रीट.

मायकेल म्हणाला, की हे शहर विविध चळवळींचं उगमस्थान आहे. शहरातून फिरताना एलजीबीटीक्यू+ कॉलनी दिसते. तिथे थोडावेळ थांबून पाहिलं तर सुस्थितीत घरांची ही वसाहत असून त्या प्रत्येक घराला वेगळ्या रंगाचे झेंडे असल्यानं या वसाहतीचं वेगळेपण दिसून येतं. गे असलेला हार्वे मिल्क नावाचा माणूस न्यू यॉर्कमधून सॅन फ्रान्सिस्को इथं आपल्यासारखे अनेक लोक आहेत म्हणून १९७२ साली इथं आला. त्याची लोकप्रियता तिथे वाढत गेली व १९७७ साली शहराचा शहर पर्यवेक्षक (City Supervisor) म्हणून निवडून आला. दुर्दैवानं १९७८ मध्ये त्याची व महापौराची हत्या करण्यात आली. त्यानं समलिंगींना समान वागणूक मिळावी म्हणून खूप प्रयत्न केल्यानं वसाहतीमध्ये व इतरत्र हार्वे मिल्कबद्दल लोकांच्या मनात खूप आदराची भावना असल्याचे दिसून येते. पण आपल्याकडे मात्र त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बराच विपर्यस्त आहे. त्यांना माणूस म्हणून समान वागणूक दिली जात नाही. २०१४ आणि २०१८ सालातील सुप्रीम कोर्टाच्या निकालानं त्यांना माणूस म्हणून समान वागणूक मिळाली पाहिजे हे आता लोकांना पटायला लागलं. त्यानंतर पुढे गेल्यानंतर आम्हाला मायकेलनं महिलांची इमारत (Women’s Building) लांबूनच दाखवली. आम्ही गाडी थांबवायला सांगितलं. त्याने आपण आत बघून या असं सांगितले. बाहेरून अनेक प्रतीकात्मक चित्रांनी रंगवलेल्या इमारतीत शिरलो. अनेकांना भेटलो. बहुतेक जण आपल्या कामात व्यस्त होते. त्यांनी महिलांविषयी अनेक प्रश्नावर काम करत असल्याचं सांगितलं. स्वयंनिर्णय, लिंगभाव समानता, व सामाजिक न्याय या प्रमुख तत्त्वांवर काम करणारी ही महिलांची स्वयंसेवी संस्था असून वर्षाकाठी वीस हजार स्त्रियांना त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी मदत केली जाते इत्यादी माहिती घेऊन आम्ही लिफ्टमधून खाली आलो.

गाडीत बसून थोडे पुढे जातो तर ‘ब्रह्मकुमारीज’ असा बोर्ड दिसला. आश्चर्य वाटून गाडी थांबवून आम्ही कुतूहलापोटी आत शिरलो. आत गेल्यानंतर आम्ही ब्रह्मकुमारीच्या काही कार्यक्रमांना गेलो होतो असं सांगितलं. मग त्या महिलेनं आत जाऊन सांगितलं असावं. आतून काही क्षणांत केंद्राच्या मुख्य वाटाव्यात अशी नवप्रौढा आमच्यासमोर आल्या. मृदू भाषेत सुहास्य वदनानं आमचं स्वागत केलं. त्यांनी आम्हाला बसायला सांगून कम्फर्टेबल केलं. गप्पा झाल्या. एकूणच अमेरिकेत प्रजापिता ब्रह्मकुमारींच्या कामाचा पसारा किती वाढला आहे हे सांगितलं. मध्येच आम्ही एकमेकांशी मराठीत बोलल्याचं ऐकून त्यांनी चक्क ‘महाराष्ट्रातून आलात का’ हा मराठीत प्रश्न



गोल्डन गेट ब्रिज हा या शहराचा आयकॉनच!

विचारून आम्हाला आश्चर्याचा धक्काच दिला. इंजिनीयरची पदवी घेतलेल्या सुकन्यादीदी बोलताना, त्यांची आई अमरावती मेडिकल कॉलेजच्या डीन असून वडील ऑर्थो सर्जन असल्याचं सांगितलं. नंतर आम्हाला गोड खाऊ दिला व नातीला डोक्याला बांधण्याचा स्कार्फ दिला. आम्ही खुश होऊन त्यांचा निरोप घेतला.

अमेरिकेच्या सर्व प्रांतांत १९६० ते १९६६या दरम्यान हिप्पी चळवळ सुरू झाली त्यात पंधरा हजार तरुण-तरुणी सहभागी झाले होते. बीट जनरेशनचा प्रभाव हा सॅन फ्रान्सिस्को शहरात प्रामुख्यानं होता. थोडक्यात हिप्पी चळवळीची सुरुवात झाली ती याच शहरात. तसंच, अमेरिका आणि व्हिएतनाम यांच्यातील युद्धांमुळे तरुणाईनं हिप्पी चळवळीच्या रूपानं प्रती संस्कृती सुरू केली. निसर्गाशी सुसंगती, सामूहिक राहणी, कलात्मक संगीत, प्रयोगशीलता इत्यादी ठळक वैशिष्ट्यं असणारी ही समांतर संस्कृती जगभर पसरली. मला आठवलं, आपल्याकडे सत्तरीच्या दशकात देव आनंदचा ‘हरे रामा, हरे कृष्णा’, हा सिनेमा व त्यातल्या ‘दम मारो दम’ या गाण्यानं तर आम्हा कॉलेज तरुणांना अक्षरशः वेड लावलं होतं. भरपूर केस वाढवलेले तरुण आणि तरुणी अमली पदार्थांच्या धुंदीनं संगीतात रममाण होणाऱ्या हिप्पी संस्कृतीचं चित्रण या सिनेमात होतं. जे आपल्या संस्कृतीत कुठेच बसत नव्हतं, त्यामुळे या सिनेमाला नाकं मुरडली गेली.

सॅन फ्रान्सिस्को शहरातील आणखी एक प्रेक्षणीय ठिकाण म्हणजे ‘जापनीज टी गार्डन’. आम्ही तिसऱ्या दिवशी आमच्या गाडीने सकाळी तिथे पोहोचलो. चांगलीच थंडी होती. खूप सुंदर अशी दाट हिरवीगार नाना प्रकारच्या वनस्पती, जुनी झाडं, लुसलुशीत गवत, रंगीबेरंगी नाना

तऱ्हेच्या फुलांची ही बाग पाहिल्याबरोबर कोणीही प्रेमात पडावं अशीच होती. जपानी पद्धतीच्या चहाचं छोटेखानी रेस्टॉरंट आधी गाठलं. चहा घेऊन तरी हुडहुडी कमी होईल असं वाटलं. चहाचे कपही ग्रामीण संस्कृतीचे निदर्शक वाटले. त्याबरोबरच त्यांनी छोट्या वेताच्या टोपलीत सोयाबिन शेंगाही पुढे ठेवल्या. हिरव्या कंच कोवळ्या तर होत्याच, शिवाय वरून मिठाची हलकिशी पखरण त्यामुळे खूपच चवदार वाटल्या. अशा थंडीत ते खाताना आम्हाला गरम गरम भजींची आठवण झाली. इथे ते कसं शक्य होईल? इथे एक शेक्सपीयर गार्डन असा फलक पाहिला आणि मी आग्रहच धरला की याचा शोध लावायचाच. तर त्याचं स्वरूप छोटं असल्यानं ते शोधावं लागलं. गेल्यावर एका भिंतीच्या मधोमध शेक्सपीयरचा मिश्रधातूत बनवलेला पुतळा होता.

मी आणि वृषाली – आम्ही दोघांनी दोन्ही बाजूंना उभं राहून फोटो काढला. आम्ही दोघांनी शेक्सपीयरचं अध्ययन व अध्यापन केलं असल्याने शेक्सपीयरप्रेमीच होतो. आम्हाला खूपच हायसं वाटलं. अर्थात इथं गर्दी मात्र नव्हती. आपली भक्ती असलेल्या देवाचे दर्शन झाल्यानंतर देवळाच्या मंडपात काही वेळ त्या पवित्र, शांत, शीतल वातावरणाचा अनुभव घेण्यासाठी आपण थोडे विसावतो तसं आम्ही या ठिकाणी काही क्षण या वैश्विक ख्यातीच्या महान नाटककाराच्या सान्निध्याचा मुग्ध अनुभव घेतला.

बाहेर आलो तर 'गोर्मेट इंडियन फूड' पाटी अशी असलेली एक गाडी समोरच डेरेदाखल झाली.

भारतीय जेवण होतं आणि विशेष म्हणजे मगाशीच आठवण काढलेली चक्क गरम भजीही (पकोडे)! खूपच मजा आली. आम्ही भजांसह जेवणाचा आस्वाद घेतला. ही खाद्यसेवेची गाडी ज्या रस्त्याच्या कडेला उभे होती त्याच रस्त्यावर आम्ही उभे असताना एका बाजूनं अतिशय उमदे देखणे असे दोन घोडेस्वार आपल्या तुकतुकीत पांढऱ्याशुभ्र घोड्यावरून टॉक टॉक असा भारदस्त आवाज करत आमच्या जवळ आले. इराला पाहून ते जवळ आल्याचं नंतर लक्षात आलं. लहान मुलांना घोड्यावरून रपेट मारणारेही वाटत नव्हते. आश्चर्य म्हणजे आकाशी निळ्या रंगातील टिपटॉप युनिफॉर्ममधील हे घोड्यावरून राऊंड घेणारे पोलीस होते. त्यांनी इराला जवळ बोलावलं. थोडी भीड मोडल्यानंतर इरा घोड्याच्या कानांना हात लावू लागली. नंतर जाताना त्यांनी इराला चांदणीच्या आकाराचा एक बिल्ला दिला.

त्यावर लिहिलं होतं, सॅन फ्रान्सिस्को माउंटेड युनिट सिन्स १८७४. इरानं तो बिल्ला आपल्या स्वेटरवर लावला आणि मिरवायलाही लागली.

सॅन फ्रान्सिस्कोची निजखूण समजला जाणारा गोल्डन गेट पूल पाहिल्याशिवाय या शहराचीच नव्हे तर अमेरिकेची सफर पूर्ण होत नाही. जगातला सर्वात लांब व सर्वात उंच असा हा झुलता पूल (Suspension Bridge) १९३७ साली बांधून पूर्ण झाला. पॅसिफिक समुद्रावरील सॅन फ्रान्सिस्को व मरीन काऊंटी यांना जोडणाऱ्या सायकल व पादचारींच्या मार्गिका सोडून सहा पदरी भव्य अशा लोखंडी दोरखंडानं बांधलेल्या पुलाची लांबी १.६ किलोमीटर असून उंची ७४६ फूट इतकी आहे. अमेरिकेची निरंतर विस्तारणारी सत्ता आणि प्रगतीचं प्रतीक म्हणूनही या पुलाचं महत्त्व सांगितलं जातं. अमेरिकन नौदलानं या पुलाला काळ्या-पिवळ्या पट्ट्यांचा रंग द्यायचं ठरवलं होतं. परंतु लाल-केसरी रंग जो प्रायमर म्हणून देण्यात आला होता तोच अधिक आकर्षक आहे असं तज्ज्ञांचं व वरिष्ठांचं मत पडल्यानं तो रंग तसाच आजही राहिला आहे. २७ मे १९३७ रोजी हा पूल पादचाऱ्यांसाठी खुला करण्यात आला त्या दिवशी या पुलावरून पहिल्यांदा मीच चालणार या अहमहमिकेनं दोन लाख लोक पुलावरून पायी चालत गेले. आणखी एक गमतीची आठवण म्हणजे या पुलाच्या पन्नासाव्या वर्धापनदिनानिमित्त तीन लाख लोक चालत गेले तेव्हा हा पूल हेलकावत होता. म्हणून तेथील अधिकाऱ्यांनी पुलाला धोका पोहोचू नये म्हणून पुढील ६ लाख लोकांना अडवावं लागलं. अर्थात इंजिनीयरांनी हा पूल लवचीक



**विलोभनीय समुद्रकिनारा**

आहे पण धोका नाही असं मत मांडलं होतं.

सॅन फ्रान्सिस्कोचं वैभव ठरलेल्या या पुलाला भेट देण्यासाठी रोज हजारो लोक जगभरातून येतात. दररोज सुमारे ९० हजार ते एक लाख कार या पुलावरून जातात. तर सरासरी दहा हजार पादचारी या पुलावरून पायी जाण्यातील थरार अनुभवतात. तर सहा हजार सायकलस्वार व तितकेच बाइकर या पुलावरून जाण्याची मजा अनुभवतात.

चारचाकी व अवजड वाहनांना टोल भरावा लागतो तर सायकलस्वार, बायकर व पादचाऱ्यांना टोल नाही.

आता त्यांनाही टोल लावण्याचा विचार चालू आहे. या पुलावरून उडी मारून आत्महत्या करणाऱ्यांची संख्यासुद्धा मोठी आहे. भारताच्या तुलनेनं ही संख्या खूपच कमी म्हणावे लागेल. उडी मारणाऱ्यांचे प्राण वाचावेत म्हणून संरक्षक जाळी बसवण्याविषयी सूचना केल्या जातात. परंतु पुलाच्या सौंदर्याला बाधा येईल म्हणून त्या सूचनांचा विचार बाजूला ठेवला होता. आता २०१४ मध्ये संरक्षक जाळी बसवण्याविषयीच्या सूचनेला मंजुरी मिळाली आहे. ब्रिजवॉच एंजल्स (Bridgewatch Angels) नावाची एक स्वयंसेवी संस्था पुलाच्या परिसरात कार्यरत असून प्रत्येक सुट्टीच्या व आपल्या कामाच्या वेळा संपल्यानंतर या संस्थेचे स्वयंसेवक आत्महत्येचे प्रयत्न रोखण्यास मदत करतात.

दु:खीकष्टी, वैफल्यग्रस्त व्यक्ती आत्महत्येचे विचार मनात घोळत असावेत, अशा व्यक्तींना हेरण्याचं काही प्रशिक्षण या स्वयंसेवकांना दिलेलं असल्याने अनेकांचे आत्महत्येचे प्रयत्न रोखण्यात आलेले आहेत.

१९९४ साली अमेरिकन सोसायटी ऑफ सिव्हिल इंजिनीयर्स यांनी आधुनिक जगातल्या सात आश्चर्यांमध्ये या पुलाचा समावेश केल्याची घोषणा केली.

आम्ही गोल्डन गेट पूल डोळेभरून पाहून झाल्यावर काही अंतरावर गाडी पार्क करून ७००-८०० मीटरवर असलेल्या किनाऱ्यावर बसण्यासाठी गेलो.

विस्तीर्ण किनारा, निळेशार पाणी, शुभ्र, दुधाळ लाटा पाहत बसणं हा एक विलक्षण आनंददायी अनुभव होता. मी आणि इरा मोठ्या आकाराच्या वाळूतून त्रिकोणी खडे गोळा करायला लागलो. मूठभर झाल्यानंतर एका कागदात पुडी करून बरोबर घेतले. पॅसिफिक उपसागरकिनाऱ्यावर मनसोक्त खेळून परत जाण्यासाठी गाडीकडे आलो. तोवर २५-३० मिनिटं आमची वाट पाहत उभी असलेल्या अमेरिकन महिलेनं विचारलं, ही तुमची कार आहे का? आम्ही हो म्हटलं. ती म्हणाली, या माणसानं (त्याच्याकडे बोट दाखवत) तुमच्या गाडीला धडक दिली. मी त्यांना थांबवून धरलं आहे तुमची वाट पाहत. तिनं टिश्यू पेपरवर त्याचा फोन आणि गाडी नंबर टिपून घेतला होता. आम्ही लगेच घाबरून गाडीला कुठे लागलं हे पाहू लागलो. धडक फार मोठी नसावी पण चांगलंच घासलं होतं. समोरचा माणूस नेमका भारतीय (केरळी) निघावा का? आम्ही त्या शूर आणि दक्ष महिलेचे आभार मानले. सौरभ आणि त्याच्यात काही बोलणं झालं. तो त्याच्या इन्शुरन्सला माहिती द्यायला तयार झाला. त्याचा संपर्क नंबर व इन्शुरन्सचा नंबर सौरभनं त्याच्याकडून घेतला, झालं. आता आम्ही निघणार तेवढ्यात पोलिसांची गाडी आली. इतक्या दूर पोलीस कसे काय आले, कोणी सांगितलं त्यांना, वगैरे प्रश्न मनात घोळत होते. त्यांनी विचारलं धडकेनं कुणाला काही लागलं का? गाडीचं नुकसान झालं का? आम्ही नाही असं सांगताच आम्हाला त्यांनी 'हॅपी जर्नी' म्हणून शुभेच्छा दिल्या व ते निघाले. नंतर आम्हाला समजलं की त्या महिलेनं पोलिसांनाही कळवलं होतं.

अमेरिकेत पोलीस सगळीकडे नसतात पण नागरिक वेळ पडेल तेव्हा स्वतः पोलीस (Self Policing) होतात असं ऐकलं होतं त्याचा प्रत्यक्ष अनुभवच आला. दुसऱ्या कुणाच्या उभ्या असलेल्या गाडीला तिसऱ्यानं ठोकर मारली असता त्या गाडीचा मालक-मालकीण तिथे नसल्यानं आपणच ती भूमिका निभावली पाहिजे, त्यासाठी वेळ दिला पाहिजे असं वाटणं हे प्रगल्भ नागरिकत्वाचं लक्षण नव्हे काय?

शिक्षणासाठी अमेरिकेतील अनेक चांगली शहरं आहेत पण विद्यार्थ्यांची सॅन फ्रान्सिस्कोला पहिल्या पाचांत पसंती असते. येथील बे एरियामुळे शेकडो तंत्रज्ञानविषयक कंपन्यांनी (ॲपल, फेसबुक, आयबीएम आदी) आपलं बस्तान चांगलं बसवलं आहे. जगातील ७५ शहरांचा अभ्यास केल्यानंतर पहिल्या तीन शहरांपैकी एक असलेल्या सॅन फ्रान्सिस्कोची निवड विद्यार्थ्यांनी सर्व दृष्टीनं आवडणारं शहर म्हणून केली आहे. इथली किनारपट्टी, नितळ सूर्यप्रकाशित, आल्हाददायक वातावरण यामुळे उच्च प्रतीचं जीवनमान अनुभवायला असंख्य लोक उत्सुक असतात.

अमेरिकेतील सुरक्षित, स्वच्छ, सदाबहार, शांत, देखणं, निसर्गरम्य बंदर-शहर, उपसागराच्या नयनमनोहर किनाऱ्यांच्या कुशीत पहुडलेलं शहर, प्रगतिशील चळवळींमुळे सजग असलेलं हे शहर खरंच मनात घर करून राहिलं ते कायमचंच!

**– डॉ. अजित मगदूम**
ajitbalwant@gmail.com



# सिलिकॉन व्हॅली एक जादूई जागा

प्रकाश पेठे

अमेरिकेला आल्याबरोबर पहिली भेट स्टॅनफर्ड विद्यापीठाला दिली होती तेव्हा वेगवेगळ्या 'फ्री वे'वरून जावे लागले होते. जाताना दिसलेल्या फ्लाय ओव्हर आणि क्लोवरलीफ पाहून सिव्हिल इंजिनीयरांचे कौतुक वाटले. अद्‌भुत रस्ते बनवले आहेत. ते रस्त्यांचे जाळे पाहून चाट पडलो होतो. नंतर वेळ मिळेल त्याप्रमाणे मुलगा सुट्टीच्या वारी आम्हाला सिलिकॉन व्हॅलीतील गावांना घेऊन जात होता.

त्या निमित्ताने कॅलिफोर्नियातील प्रसन्न निसर्ग डोंगर-दऱ्या व सपाट जागी वसवलेली गावे आणि टेकड्यांवर बांधलेली घरे दिसली. सगळेच भारतातील गावांपेक्षा वेगळे होते. तेथील जमीन सुपीक आणि येणारी डोकीही सुपीक! दोनच प्रकारची माणसे तेथे येतात. एक तर अगतिक अथवा समर्थ. तेथे दोन्हींचा अनुभव येतो. अगतिक म्हणजे कोणत्या तरी देशातून परिस्थितीला कंटाळून आश्रयाला आलेले आणि समर्थ म्हणजे हुशार आणि उच्च शिक्षण घेऊन जास्त विकास करून घेण्यासाठी आलेले. जमिनीवर थोडे पाणी पडण्याचा अवकाश की लगेच गवत, झुडपे, झाडे फोफावतात. एके काळी ज्याला हल्ली सिलिकॉन व्हॅली म्हणतात तिकडे फळाफुलांचा सुकाळ होता.

फक्त साठबासष्ट वर्षांपूर्वी सिलिकॉन व्हॅलीचे नाव Valley of Heart's Delight होते. कारण ती जगातील सर्वात मोठी फळाफुलांची बाग होती आणि फळांवर प्रक्रिया करणारे तेथे चाळीस कारखाने होते. आता व्हॅलीत काही द्राक्षांचे प्रचंड मळे आहेत.

अमेरिकेत शेतीची जमीन बिनशेतीची करण्याची काय प्रक्रिया असते ते कळले नाही, की फळबागेपासून होणाऱ्या उत्पन्नापेक्षा जास्त पैसे मिळत असतील तर विकून टाकण्याची सूट असते की काय ते कळण्यास मार्ग नाही.

ज्याप्रमाणे भारतातील वेगळे प्रांत तंत्रविषयाला प्राधान्य देण्यासाठी एमआयडीसीसारख्या सोयी उभ्या करतात. तसे अमेरिकेत नाही, पण अमेरिकेतील सिलिकॉन व्हॅली अजाणता सहजपणे जन्माला आली आणि वाढत गेली. तसेच दारू बनवण्याचे कारखाने आहेत. कॅलिफोर्नियातील दारू जगप्रसिद्ध आहे.



**डाव्या बाजूच्या प्रशांत महासागराचे पाणी घळीतून आत शिरून जो उपसागर तयार झाला आहे त्याच्या आजूबाजूच्या विस्ताराला बे एरिया तसेच 'सिलिकॉन व्हॅली' म्हणतात.**

---

माझ्या दैनंदिन जीवनात संगणक, गुगल, फेसबुक, फोटोशॉप या गोष्टींनी बदल घडवून आणला त्याला अठ्ठावीस

वर्षे झाली. पुन्हा, नव्याने काहीतरी शिकण्यास सुरुवात झाल्याने उत्साह होता. त्यावेळी माझ्याकडे ऑटोकॅड रिलीझ १४ होते. विंडोज सात असावी, पण मराठी टाईप करण्यास काही काळ जाणार होता. त्यापैकी बऱ्याच गोष्टींचा जन्म जेथे झाला ती जादूची जागा म्हणजे कॅलिफोर्निया राज्यातील सॅन फ्रान्सिस्को. इथे गोल्डन गेट ब्रिज बांधला आहे, त्याच्या खालून प्रशांत महासागर उजवीकडच्या भूभागात शिरला आहे. त्या शिरलेल्या प्रचंड पाण्याची उत्तरदक्षिण लांबी सव्वाशे किलोमीटर असावी. त्यामुळे तो प्रशांत महासागराला समांतर असणारा उपसागरच आहे असे वाटते. त्याच्या दोन्ही अंगांना डोंगराच्या रांगा आहेत. जेथे सपाट जागा मिळाली आहे त्या लांब पट्टीत एका मागोमाग नगरे वसत गेली आहेत. तो चिंचोळा पट्टा म्हणजेच सिलिकॉन व्हॅली.

सिलिकॉन व्हॅली हे नाव असे पडले, की सिलिकॉन हा धातुसदृश अर्धविद्युतवाहक रासायनिक पदार्थ आहे. ट्रान्सिस्टर आणि मायक्रोप्रोसेसरसाठी सिलिकॉन या सेमीकंडक्टर धातूचा उपयोग केला जातो. म्हणून त्या विशाल जागेला सिलिकॉन व्हॅली म्हणण्यास सुरुवात झाली. इलेक्ट्रिक न्यूजच्या लेखकाने सगळ्यात प्रथम १९७१ साली 'सिलिकॉन व्हॅली, यूएसए' असे म्हटले. मात्र सिलिकॉन सगळ्यात जास्त चीनमध्ये मिळते.

सिलिकॉन व्हॅलीचे क्षेत्रफळ एक हजार आठशे चोपन्न चौरस मैल आहे. अमेरिकेचा विचार केला तर सिलिकॉन व्हॅली अमेरिकेच्या कपाळावरील टिकलीसारखी आहे. या भूभागात सिलिकॉन व्हॅलीसारख्या चार-पाच व्हॅली आहेत, त्यांत सांता क्लारा व्हॅली दहा ते वीस किलोमीटर रुंद आणि दीडशे किलोमीटर लांब आहे. ज्या भागात सगळ्या आयटी इंडस्ट्री आणि वस्ती आहे. त्या मनप्रसन्न खोऱ्याचा कायापालट स्टॅनफोर्ड विद्यापीठामुळे १८८५ पासून सुरू झाला. त्या एकाच विद्यापीठाने आठ हजार एकर जमीन व्यापली आहे. म्हणजे एक गावच झाले. महाविद्यालयाने प्रतिभावान माणसे जन्माला घातली. स्टॅनफर्ड विद्यापीठातील माजी विद्यार्थ्यांची नावे बघितली तरी त्या विद्यापीठाची थोरवी लक्षात येते.

सिलिकॉन व्हॅलीची मुहूर्तमेढ स्टॅनफर्ड विद्यापीठातील फ्रेडरिक टर्मन या प्राध्यापकाने इलेक्ट्रॉनिक, पॉवर इंजिनीरिंग कंप्युटिंग आणि कम्युनिकेशन या क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी ह्युलीट आणि पॅकार्ड या दोन विद्यार्थ्यांना उद्युक्त केले. त्यांना कंपनी स्थापण्यास मदत केली आणि विद्यापीठाला त्या प्रकारच्या उद्यमात लक्ष घालण्यास मदत केली. ह्युलीट आणि पॅकार्टचे 'एचपी' हे नाव आज सर्वांच्या परिचयाचे आहे. प्रयोग करण्यास प्रेरणा देतो तो प्राध्यापक. नाहीतर...


अशा त्या महाविद्यालयाच्या ऋणातून अमेरिका कधी मुक्त होणार नाही. १८५० च्या काळात कॅलिफोर्नियात सोने सापडले. त्याची बातमी षट्कर्णी झाली. जो तो उठून कॅलिफोर्नियाकडे धावला. चिनी लोक बोटीत बसून आले. काहींना सोने मिळाले. काहींना नाही. जे आले त्यांनी सगळ्या प्रकारची जोखीम उचलली होती. अगदी स्वतःच्या जिवाचीही पर्वा केली नाही. ती प्रवृत्ती पुढे लोकांच्या रक्तात भिनली आणि त्याचा परिणाम कॅलिफोर्नियात येणाऱ्या लोकांवर पडला. त्यामुळे ते कोणताही उद्योग करताना जोखीम पत्करतात आणि अपयश आले तरी कोणी खचून जात नाही. कारण अपयशाला कोणी तिथे हसत नाही.




**अमेरिकेचा सगळी राज्ये दाखवणारा नकाशा. चित्रात डावीकडे राखाडी रंगातले कॅलिफोर्निया राज्य आहे.**

---

असे असताना सॅन फ्रान्सिको आणि सॅक्रामेंटो शहरात घर नसलेले बरेच लोक का दिसतात? याचे नवल वाटते. कॅलिफोर्निया हे अमेरिकेच्या पश्चिमेकडील प्रशांत महासागराच्या किनाऱ्यावरील राज्य आहे. ते मेक्सिकोशी लढाई झाल्यावर झालेल्या तहात १८५० साली मिळाले. सॅन फ्रान्सिकोचा बे एरिया अतिशय सुंदर आहे. पश्चिम दिशेला प्रशांत महासागर आहे. त्याला समांतर उजव्या बाजूला डोंगर आहेत. डोंगरांच्या उजव्या बाजूच्या पलीकडे पुन्हा पाणी आणि त्याच्या पलीकडे पुन्हा डोंगर, त्यानंतर दऱ्या. महासागराचे पाणी सखल भूभागात शिरल्याने झालेला उपसागर, त्याच्या आजूबाजूचे डोंगर आणि दऱ्या मिळून झालेल्या प्रदेशाला 'बे एरिया' म्हणतात. त्यात नऊ जिल्हे असून त्यांची लोकसंख्या सत्त्याहत्तर लाख पासष्ट हजार सहाशेचाळीस आहे. त्यात गोरे लोक एकोणचाळीस टक्के म्हणजे तीस लाख सत्तेचाळीस हजार आणि एकवीस लाख एक्काहत्तर हजार आशियाई लोक आहेत. त्यात भारतीय, चिनी



**Santa Clara गडद रंगात लांबलचक पट्टीत सिलिकॉन व्हॅली सामावलेली आहे.**

कोरियन, तैवानी वगैरे आहेत. तेथे बरीच मराठी वस्ती आहे.

सिलिकॉन व्हॅलीमधे फिरताना असे लक्षात आले, की संशोधन करून नव्या संस्था स्थापन करणाऱ्या बऱ्याच जणांनी स्टॅनफोर्ड विद्यापीठात शिक्षण घेतलेले होते. १९४० नंतर जवळजवळ दरवर्षी एक विद्यार्थी नवी संस्था स्थापन करत होता आणि तो सिलसिला कालपर्यंत चालू आहे.

गेल्या वर्षी, २०२२ साली सॅम अल्टमन नावाच्या सेंट लुईस मिसुरीच्या ज्यू मुलाने चॅट जीपीटी सुरू केले (स्टॅनफर्ड). त्याचा विचार केल्यावर माणूस थक्क होतो.

https://www.scaruffi.com/svhistory/silicon.html

१९४८ सालची गोष्ट. रसेल हॅरिसन व्हेरिअन आणि सिगुर्ड व्हेरिअन हे दोघे भाऊ राष्ट्रभक्त होते. त्यांनी क्लिस्त्रोन व्हॅक्युम ट्यूबचा शोध लावला. त्यांनी ॲटम बॉम्बचा उपयोग करता येईल हे दाखवले, पण नंतर त्यांना पश्चाताप झाला. त्यांनी तो नाद सोडून दिला.

१९५७ साली सॅन होजे येथे सेमी कंडक्टर, ट्रान्झिस्टर आणि इंटिग्रेटेड सर्किट बनवण्याचा कारखाना काढला. ते फार महत्त्वाचे काम होते. नंतर शेर्मन फेरचील्ड यांनी एरियल फोटोग्राफीचा उपयोग सुरू केला. चंद्राचेही फोटो काढले. विमाने बनवली. भरपूर उद्योग केले.

१९६४ साली खेळासाठी लागणारे सामान व पादत्राणे तयार करणारी नायके ही बहुराष्ट्रीय कंपनी जन्माला आली. त्याच्या फील नाईटने स्टॅनफर्ड विद्यापीठाला एकशेपाच मिलियन डॉलर देणगी दिली होती.

१९६५ साली डॉल्बी लॅबोरेटरीज स्थापन झाली. तिचे रे डॉल्बी यांनी स्टॅनफर्डमधून इलेक्ट्रिकल इंजिनीयरींग करून पदार्थविज्ञान शास्त्रात पुढील शिक्षण घेतले. डॉल्बी साउंड सर्वांचा परिचयाचा आहे.

जॉन स्टाइनबेक कल्पनारम्य आणि वास्तवतावादी लेखनासाठी प्रसिद्ध होते. स्टॅनफर्डचे माजी विद्यार्थी स्टाईनबेक यांना १९६२ सालचे साहित्यातील नोबेल पारितोषिक मिळाले होते.

स्टॅनफर्डहून पीएच.डी. घेऊन १९८७ साली मॉरिस चँग याने स्वदेशात तैवान सेमीकंडक्टर मॅन्युफॅक्चरिंग कंपनी स्थापली. आज त्याच्या कंपनीचा हात धरणारे कोणी नाही. ९१ वर्षांचा मॉरिस आजही बाजारात दबदबा धरून आहे. ७ ऑगस्ट २०२३ रोजी न्यू यॉर्क टाइम्समध्ये दोन पाने भरून त्याच्यासंबधी विशेष लेख प्रसिद्ध झाला आहे. सेमीकंडक्टरशिवाय कोणत्याही क्षेत्रात काही करू शकत नसल्याने भारत एकोणिस हजार सहाशे कोटी रुपयांचे सेमीकंडक्टर चीन, जपान, तैवान आणि दक्षिण कोरियाकडून आयात करतो. हे सगळे माहीत झाल्यावर त्या नव्वदीपार केलेल्या मॉरिस चँग याचे जितके कौतुक वाटले, तितकीच मला मनात लाज वाटली.

१९९५ साली आले. 'याहू'ला जन्म देणारे जेरी यांग आणि डेव्हिड फिलो. त्यातील जेरी यांग याचा जन्म तायवानमध्ये झाला. तो दोन वर्षांचा असता त्याची आई दोन मुलांना घेऊन अमेरिकेत आली.

१९९७ साली 'नेटफ्लिक्स'चा निर्माता रीड हेस्टिंग्ज (माजी स्टॅनफोर्ड) आणि मार्क रुडॉल्फ यांचे मुख्यालय लॉस गॅटोस (सिलिकॉन व्हॅली) येथे आहे.

सिलिकॉन व्हॅलीमध्ये १९९८ साली लॅरी पेज आणि सर्गेई ब्रिन हा ज्यू कुटुंबातला मुलगा सहाव्या वर्षी पालकांबरोबर अमेरिकेत आला. त्यांना सुरुवातीला रशिया सोडण्यास त्रास झाला होता. तो स्टॅनफर्डमध्ये दाखल झाला. त्या दोघांनी विद्यापीठातच सर्च इंजिनचा प्रयोग केला. तो यशस्वी झाला. ते समाजात लोकप्रिय होणार हे कळले होते. त्यात काही धोका नव्हता. पुढील यश सर्वांना माहीत आहे.

२००२ साली सर्वांना परिचित असलेल्या लिंक्डइनला जन्म देणारे रीड हॉफमॅन आणि जीन लूक वेलेट हे एकेकाळचे स्टॅनफर्डचे विद्यार्थी. इलॉन मस्क हा टेस्ला इलेक्ट्रिक कारमुळे जगाला माहीत आहे.

२००९ साली व्हॉट्सॲपचा जन्म झाला. त्याचा एक

निर्माता जेन कोऊम याची जन्मकहाणी वाचून पोटात गोळा येतो. तो ज्यू कुटुंबात युक्रेनमध्ये जन्माला आला. रशियातून वेगळे झाल्यावर जेनच्या आईने देश सोडला आणि मुलाला घेऊन ती अमेरिकेत आली. तेथेही प्रचंड गरिबी होती. त्या काळात सरकारकडून निर्वाहासाठी कूपन मिळे. मुलगा दोन कुपने घेऊन आईला जेवू घालत असे. तो एका किराणाच्या दुकानात काम करत होता. पुढे, त्याने शिकण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्याने 'याहू'मध्ये नोकरी केली. नातेवाईक आणि मित्रांशी बोलता यावे म्हणून खटपट करून शोध लावला. तो आणि त्याची आई त्याच्या वडिलांशी नेहमी बोलत असत. कोऊमचे वडील त्याला भेटण्यास कधीच येऊ शकले नाहीत. पुढे, त्याने स्टॅनफर्डला आणि ज्यू लोकांच्या कल्याणासाठी भरपूर देणगी दिली.

केविन सिस्ट्रॉम आणि माईक क्रियेंगेर (मूळचा ब्राझीलचा) यांनी २०१० साली इंस्टाग्राम बनवले. सिस्ट्रॉम याच्या छायाचित्रकलेच्या आवडीमधून इंस्टाग्रामचा जन्म झाला होता. आता ते फेसबुकने विकत घेतले आहे.

हार्वर्डचा मार्क झुकरबर्ग. तो ऑस्ट्रियातील ज्यू कुटुंबातील. शाळेतच हा हुशार होता. विसाव्या वर्षी काही मित्राच्या संगतीने हार्वर्डमध्ये २००४ साली त्याने फेसबुकची निर्मिती केली आणि जग जिंकले.

याशिवाय सिलिकॉन व्हॅलीत नसून जगाला माहीत झालेली व्यक्ती म्हणजे बिल गेट्स. त्याने मायक्रोसॉफ्टची स्थापना १९७५ साली केली. मात्र सिलिकॉन व्हॅलीमध्ये आला नाही. तरीही त्याच क्षेत्रात यशस्वी झाला. जगभर मायक्रोसॉफ्टमध्ये दोन लाख एकवीस हजार लोक काम करतात.

सिलिकॉन व्हॅलीच्या भूभागात जादू आहे हे नक्की. नवे तंत्रज्ञान शिकलेले तरुण तेथे त्यांच्या कल्पनांना आकार देऊ पाहतात. सिलिकॉन व्हॅलीचा इतिहास स्टॅनफर्डपाशी जाऊन थांबतो. सिलिकॉन व्हॅलीमध्ये प्रमुख तेरा गावे आहेत आणि त्याची लोकवस्ती सतरा लाख आहे. त्या तेरा गावांचे मिळून क्षेत्रफळ आठशेपंचाण्णव पूर्णांक त्रेचाळीस चौरस किलोमीटर आहे.

सिलिकॉन व्हॅलीमध्ये दर चौरस किलोमीटरमध्ये वस्ती घनता एक हजार नऊशे आहे. सांगलीत तीन हजार पाचशे, चंदीगड नऊ हजार दोनशेबासष्ट, बडोदा नऊ हजार पाचशे, तर पुणे तेरा हजार अशी आहे. यावरून सिलिकॉन व्हॅलीत वस्ती किती विरळ आहे याची कल्पना येते.

सिलिकॉन व्हॅलीतील सगळी गावे ही खेडी होती. त्यांची शहरे होण्याची सुरुवात १९६० नंतरच झाली. ज्या गावात ॲपल कंपनीचे कार्यालय आहे त्याची वस्ती १९६० साली फक्त साडेतीन हजार होती. आज ती साठ हजार आहे. ज्या गावात गुगलचे ऑफिस आहे त्याची वस्ती १९५० साली फक्त साडेसहा हजार होती. ती आज ब्याऐंशी हजार तीनशेशहात्तर आहे. सांता क्लारा गावाची वस्ती १९५० साली अकरा हजार होती ती आजमितीस शहाऐंशी हजार एकशे झाली आहे. मिलपिटास साडेसहा हजार वस्तीचा गाव ऐंशी हजार लोकवस्तीचा झाला आहे.

हा सगळा सिलिकॉन आणि आयटी इंडस्ट्रीचा प्रताप आहे. घरांचे भाव आस्मानाला टेकले आहेत. ज्या गावात गुगलचे ऑफिस आहे, तेथे घरांचे भाव पंचवीस ते चाळीस लाख डॉलर आहेत.

परंतु सध्या सिलिकॉन व्हॅलीची वस्ती वाढणे जवळ जवळ थांबले आहे. सॅन होजेमध्ये तर गेल्या बारा वर्षांत चाळीस हजार माणसे कमी झाली आहेत. त्याची कारणे नोकरी कपात, महागाई आणि कोविड ही होत. त्यांनी तेथून लहान गावात जाऊन राहणे पसंत केले आहे.

प्रत्येक माणसाला घर कौलारू असावे, घरासमोर चार फुलझाडे असावीत, परसदारी थोडा मोठा बगीचा असावा,





**वरील नकाशा सिलिकॉन व्हॅलीतील मिलपिटास गावातल्या घरांच्या रचनेचा आहे. तर शेजारचा कोकणातील वेंगुर्ला गावातील आहे.**

त्यात लतामंडप असावा असे स्वप्न असते. ते पूर्ण होण्याचे भाग्य फार थोड्यांच्या नशिबात असते. ते सिलिकॉन व्हॅलीत आलेल्यांचे पूर्ण झालेले दिसते. तेथे तीस फूट रुंद समांतर रस्त्यांना तोंड करून, घरांच्या दोनच रांगा असतात. तशी घरे कोकणातील काही गावांत पाहिली होती.

कॅलिफोर्नियामधील 'बे एरिया' हा डोकेबाज लोकांचा भाग आहे. सॅन फ्रान्सिस्को गाव जन्मापासूनच अनेक गोष्टी निर्माण करत आहे. त्यापैकी सोन्याच्या खाणीत काम करण्यासाठी दणकट कपडे हवेत म्हणून लेव्ही स्ट्रास ही जीनची पॅण्ट १८७३ मध्ये शोधून काढली. गंमत म्हणजे ती आज तरुणांच्यात ती फॅशन म्हणून वापरली जाते. १९२८ साली जॉर्ज व्हिटनी याने व्हॅनिला आइसक्रीमवर चॉकलेटचे आवरण लावण्याची नवी कल्पना केली होती. तेसुद्धा आजही चाकोबारच्या रूपात लाखोंच्या आवडीचे आहे. फिलो टेलर फ्रान्सवर्थ या एकवीस वर्षाच्या मुलाने १९२७ साली इलेक्ट्रॉनिक टेलिव्हिजन बनवला. विशेष म्हणजे त्याच्या वयाच्या चौदाव्या वर्षापर्यंत त्यांच्या घरी वीज नव्हती.

डब्लिनच्या बागेत एकजण त्याच्या छोट्या मुलाशी मराठीत बोलत होता, म्हणून त्याच्याशी बोललो, तो लिंक्डइनमध्ये नोकरी करतो. त्याला म्हटले तुम्ही इंजिनीयर आहात तर लिंक्डइनमध्ये काय करता? तो म्हणाला, इंजिनीयरांखेरीज लिंक्डइन चालणार नाही.

ज्या शाखांमध्ये नोकरी मिळणे शक्य असते तेथेच इंजिनीयर तरुण अमेरिकेत सामावले जातात. बाकी जीवनातील अन्य विद्याशाखांतील लोकांना स्थलांतर करणे अवघड असते. माझे आणि माझ्या विद्यार्थ्यांचे जीवन संगणकीय प्रणालींवर अवलंबून होते. त्या सर्व नव्या ज्ञानाचा उगम जिथे झाला त्या जागेला भेट देण्याचा प्रसंग आल्यावर आनंद झाला. एकदा सॅन फ्रान्सिकोहून परतताना दुरूनच फेसबुकची पाटी पाहिली होती. त्या वेळी फेसबुकच्या प्रांगणात पाऊल टाकणार होतो. बे एरियातील सगळ्यात लहान डंबरटन पूल संपला. आजूबाजूला पाहता मला मध्य रेल्वेवरील दिवा मुंब्रा किंवा पश्चिम रेल्वेवरील पाणथळ खाचरांची आठवण झाली. दूरवर मिठाची आगारे असावीत. आम्ही फेसबुकच्या (मेटा) आवारात शिरलो. साध्या सरळ काचा नसलेल्या इमारतींना पाहून नवल वाटले. तेवढ्यात सिक्युरिटीची एक गाडी आली. तिच्यातील माणसाने चौकशी केली. आम्ही का आलो आहोत हे सांगितले. त्याने सांगितले, पलीकडच्या रस्त्यावर जाऊन पाहू शकता. त्या जमिनींची उंची समुद्रसपाटीपासून फार कमी असावी असा अंदाज आला. इतकी विशाल जमीन खाचरांची असल्याने कदाचित स्वस्तात मिळाली असावी. स्वतःचे घर बांधायचे असेल तर खाचराजवळची जमीन सहसा कोणी घेणार नाही.

शनिवार असल्याने इमारतींच्या आत जाता आले नाही. फेसबुकच्या साध्या सरळ इमारती पाहून नवल वाटले. भारतात कंप्युटर आणि सॉफ्टवेअरचे काम चालते त्या इमारती काचेने मढवायची टूम निघाली होती. पुण्यात हिंजेवाडी आणि मगरपट्ट्याला गेलो. तेथेही तोच प्रकार.


पुढे, परदेशातील कंपन्याही आल्या. बंगलोरला लोक सिलिकॉन व्हॅली म्हणायला लागले होते. त्यांनतर दोन वेळा बंगलोरला गेलो होतो. फार गर्दी झाल्याने लोक गावाला नाक मुरडायला लागले होते. अमेरिकेत व्हॅलीला व्हॅली म्हटले म्हणून बंगलोरच्या समुद्रसपाटीपासून नऊशेवीस मीटर उंच असलेल्या पठाराला सिलिकॉन व्हॅली नाव दिले. मद्रासला भारताचे डेट्रॉईट म्हणत आहेत. आपल्या मंडळींना नामांतर करण्याची भारी हौस. कोणाला मुंबईचे शांघाय करायचे असते, विद्यापीठांची नावे बदलायची असतात, गावांची नावे बदलायची असतात.

आम्ही 'गुगल'च्या प्रचंड मोठ्या आवारात शिरलो. मन प्रसन्न झाले. सर्वत्र हिरवळ होती. सिमेंटच्या पायवाटा जिकडे नेतील तसे चालत गेलो. आणखी बरीच मंडळी आमच्यासारखीच पाहण्यास आली होती. काही सायकलींवरून आले होते. अमेरिकेत मोटारींच्या इतकेच लोकांना सायकलींचे आणि दणकट मोटारसायकलींचे कौतुक आहे. गूगल या संस्थेत अनेक भारतीय तरुण काम करतात.

स्टॅन्फोर्डच्या विद्यापीठाच्या प्रशस्त आवारात फिरताना भारतातील महाविद्यालयांची आठवण होत होती. वाटले, भारतात अशा संशोधनवृत्तीला उत्साह आणि प्रेरणा देणारे वातावरण हवे. पण ते करण्याची आमची संधी चुकली आहे. सगळ्या मुलामुलींना इंजिनीयर, डॉक्टर बनवायचे असल्याने. श्रीमंत गुंतवणूकदारांनी इंजिनीयरिंग कॉलेजे स्थापण्याचा सपाटा लावला. संस्थेच्या गुणवत्तेची कोणतीच कसोटी नसल्याने तो उद्योग फायद्याचा ठरला. निव्वळ फायद्यासाठी स्थापलेल्या अनेक संस्था बंद पडल्यात जमा आहे. आम्ही वर्ध्याला एक बंद पडलेले संकुल पाहिले होते. लोक त्यांच्याकडे पाठ फिरवतील अशी आशा वाटते.

महाविद्यालयात प्राध्यापकांची जागा भरताना फक्त पीएचडी असणे हा एकमेव निकष ठेवणे योग्य नाही. पूर्वी कारखान्यात काम करून गेलेल्या निवृत्त अनुभवी लोकांना नेमण्याची व्यवस्था झाली तर बराच फरक पडू शकेल.





**बनारसच्या घाट आणि बनारस जवळचे सारनाथ जिथे भगवान बुद्धांचे पहिले प्रवचन झाले होते.**

---

**इटली देशातील जादूची जागा**

आम्ही इटलीला गेलो तो वास्तुकलेच्या शिक्षणात शिकवला गेलेला इतिहास पाहण्यासाठी. फ्लोरेन्स या गावात पाऊल ठेवणे आमचे भाग्यच. त्या लहानशा गावात एकापेक्षा एक महान माणसे जन्माला आली आहेत. त्यात लिऑन बटिस्टा अल्बेर्ती याच्या खेरीज युरोपचा वास्तुकलेचा इतिहास शिकता येत नाही. लिओनार्दो दा विंची हे बहुआयामी होते. फिलिपो ब्रुनेलेस्ची इटालियन आर्किटेक्ट, डिझायनर, सोनार आणि शिल्पकार होता.

जिओट्टो जिओटस (हे मध्ययुगाच्या उत्तरार्धात फ्लोरेन्समधील इटालियन चित्रकार आणि वास्तुविशारद होते.), मायकलअॅन्जेलो (हा एक प्रसिद्ध इटालियन चित्रकार, शिल्पकार, वास्तुकार, कवी व अभियंता होता.), गॅलिलिओ हे सगळे एकाच गावाचे हा निव्वळ चमत्कार होता. एका गल्लीच्या तोंडाशी 'लिओनार्दो दा व्हिन्सी मार्ग' ही पाटी पहिली होती.

हे सगळे १३७० ते १५६५ म्हणजे जवळजवळ दोनशे वर्षाच्या काळात जन्मलेले होते. त्यानंतर तसं काही घडलं नाही. चौरस मैल आहे. इतक्या लहान जागेत खगोलतज्ज्ञ, शिल्पकार, चित्रकार वास्तुकलाकार आणि विद्वान जन्माला आले होते. नंतर तसे घडले नाही. कारण स्पेनच्या हल्ल्यामुळे फ्लोरेन्सची सगळी घडी विस्कटली. जसे भारतात यवनांच्या आक्रमणामुळे स्थानिक लोकांच्या कर्तृत्वाला बाधा पोचली होती. तेच फ्लोरेन्समध्ये घडले होते.

पुष्कळ वर्षांपूर्वीची गोष्ट. आम्ही काशीला गेलो होतो. काशी विश्वनाथाचे दर्शन करून पुढच्या गावी जायचा विचार होता. पण गंगेच्या घाटावर गेलो आणि काशीच्या प्रेमात पडलो. एक दिवसाच्या ऐवजी चार दिवस राहिलो ...त्या नंतर दोनदा गेलो. तीनही भेटीत मिळून काशीच्या सगळ्या गल्ल्या फिरून घेतल्या. तिसऱ्या वेळी बनारस विद्यापीठात राहिलो होतो. अस्सी घाटावर सुबह बारात संगीताचा कार्यक्रम ऐकला. बनारस गावात अनंत रत्ने जन्माला आली. त्यात संत कबीर (१३९८), संत तुलसीदास (१५३२), पंडित रविदास (१३७७), वैष्णव संप्रदायाचे वल्लभाचार्य, (१४७९) या महान विभूती काशीत जन्माला आल्या. हे फ्लोरेन्स सारखेच घडले होते.

संगीत कलाकारांपैकी पंडित सामता प्रसाद (१९२१), किशन महाराज (१९२३), बिस्मिल्ला खान (१९१६), सितारा देवी (१९२०), पंडित रविशंकर (१९२०) मात्र सहा वर्षांच्या काळात इतके तज्ज्ञ एकाच गावात जन्मले हेही नवलच. फ्लोरेन्स आणि काशी गावातून मोठे झालेले त्याच गावात जन्मलेले होते.

फक्त पन्नास वर्षांत सिलिकॉन व्हॅलीमध्ये बाहेरून येऊन नाव काढणाऱ्यांत सीरिया, इस्रायल, व्हिएन्ना, जर्मनी, तायवान, मुंबई, ब्राझील, न्यू यॉर्क, मिशिगन, पोर्टलँड ओरेगॉन, ॲडेलेड वगैरे ठिकाणचे तरुण होते, त्याप्रमाणे विशिष्ट जागेवर येऊन थांबण्याचे प्रसंग भारतात आहेत. एकदा आचार्य रजनीश भाषणात म्हणाले होते, की बिहारमध्ये समेत शिखर नावाचे एक जैन तीर्थ आहे तेथे चोवीस तीर्थकारांपैकी वीस जणांनी देह ठेवला हा एक चमत्कार आहे. ते एकाच कुटुंबातील नव्हते, पण सिलिकॉन व्हॅलीने जो प्रभाव समग्र जगावर पाडला त्याला तोड नाही. चारशेबत्तीस कोटी लोक गुगल वापरतात. दोनशे अडतीस कोटी रोज फेसबुक बघतात. दहा हजार कोटी लोक व्हॉट्सॲप वापरतात. चारशेन्नास कोटी विकिपीडिया बघतात. ते माहिती मिळवण्याचे मोठे साधन झाले आहे, पण सिलिकॉन व्हॅलीचा सध्याचा विस्तार संपृक्त झाला आहे. मग गृहनिर्मिती असो की कारखानदारी असो. एक मात्र खरे की सिलिकॉन या धातूला मरण नाही. त्याचा उपयोग चालूच राहील. अनेक देशांचा विकास होणे बाकी आहे. त्यांना संगणकाची गरज पडणारच आहे. तसेच, सॉफ्टवेअर अमर आहे. एके काळी माझ्याकडे सीडींचा ढीग झाला होता. त्यानंतर री-राइटेबल सीडी मिळू लागल्या होत्या. मी सीडी घेऊन प्रिंट काढून घेण्यास जात असे. पुढे, पेन ड्राइव्ह आले. मी पेन ड्राइव्ह घेऊन जाऊ लागलो. पुढे माझे विद्यार्थी प्रिंट काढून घेण्यासाठी मेल करून प्रिंट काढून घेत होते. एक तंत्रज्ञान नामशेष होऊन नवे तंत्रज्ञान येत असताना आढळते आहे. सिगेट, ट्रान्सेण्ड यांसारख्या हार्ड डिस्कमागे पडत आहेत. सगळे शोध अल्पकाळ टिकत आहेत. दररोज काहीतरी नवे जन्माला येते आहे. म्हणजेच दीर्घ काळ टिकत नाही. फेसबुकचा वापर भारतात आणि जगात कमी होत आहे. इन्स्टाग्रामची मागणी वाढत आहे. पुढे, त्याच्या अतिवापराचा कंटाळा येईलच, खुद्द अमेरिकेतच व्हॉट्सॲपची लोकप्रियता कमी झाली आहे. ते मेसेजचा वापर करतात. आज ज्या कंपन्या जोमात आहेत त्यांचा जोम तसाच राहील याची खात्री वाटत नाही. मी फेसबुक आणि इंस्टाग्राम वापरणे बंद केले आहे.

सिलिकॉन व्हॅलीकडे आकर्षित होणारे अगणित भारतीय आहेत. जे भारतीय तरुण तेथे जातात ते जीव ओतून काम करतात. ते अमेरिकन कंपन्यांना मोठ्या करतात. टिकून राहणे ही त्यांची प्राथमिकता असते. आशियायी लोकांसाठी सिलिकॉन एकांगी आहे. ज्यांचा जन्म तेथेच झालेला असतो त्यांचे बरे असते. ते अभ्यासाशिवाय इतर विषयात रस घेऊ शकतात. तसे भारतात घडत नाही. आम्ही आईवडिलांनी आमच्या मुलांसाठी शिक्षणास प्राधान्य दिले. इतर विषयांत प्राविण्य मिळवण्यास प्रोत्साहन दिले नाही. भारतात शिकणे सक्तीचे आहे हे जन्माला आल्यापासून मनावर बिंबवले जाते. कोणी आपल्या मुलाला अन्य विषयांत लुडबुड करू देत नाहीत. त्यामुळेच भारतीय इतर सर्व विषयांत मागे पडतात. सिलिकॉन व्हॅलीतील गावासंबंधी विकिपीडिया सविस्तर माहिती देते. गावातील उल्लेखनीय व्यक्तींची यादी दिलेली असते. त्यात प्रत्येक क्षेत्रातील माणसे आढळतात, पण त्यात आशियायी कोणी नसते. तसे असणे साहजिकच आहे. कारण फक्त तंत्रज्ञान प्राप्त करून घेऊन तरुण अमेरिकेत येत असतात. त्यापेक्षा अन्य विषयांत गती असणाऱ्याला व्हिसा मिळणार नाही. गणित विषयात प्राविण्य मिळवून अमेरिकेत धनाढ्य झाल्यावर, भरपूर दान दिल्याने त्याचे नाव उल्लेखनीय व्यक्तींच्या यादीत आहे. खन्ना नावाचा मूळचा पंजाबी, पण फिलाडेल्फियात जन्मलेला सांता क्लारा गावातून अमेरिकेच्या हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हमध्ये आहे. अमेरिकेत आलेल्या मुलांची मुले अमेरिकन संस्कृतीत वाढतील. ते सुसंस्कारित असल्याने अमेरिकेत नाव काढतील. असा विचार होत असताना सिलिकॉन व्हॅलीचे काय होईल? नावीन्याचा शोध घेत नवनिर्मिती करत मोठे होणे हे सिलिकॉन व्हॅलीचे जन्म ापासूनच ब्रीद आहे. १८५० साली कॅलिफोर्नियात सोने सापडले होते. ते मिळवण्यासाठी लांबून लांबून लोक आले होते. पडेल ते कष्ट त्यांनी उपसले होते.

त्यानंतर शंभर वर्षांनी जसे काही सोनेच सापडले आहे असे वाटून त्यांच्या कल्पनांना साकार करण्यासाठी तेथे तरुण येत राहिले आणि नवे काहीतरी देत राहिले. तेथे जाऊन काहीतरी मौलिक नवीन करणाऱ्यांची यादी उपलब्ध आहे. त्यातील प्रत्येकाचे जीवनचरित्र वाचले की खूप सारे कळते. त्यामधील बहुसंख्य श्रीमंत कुटुंबातील नव्हते. कित्येक लहान देशांतून आलेले होते. त्यांच्या आयांनी त्या मुलांना कष्ट सोसून वाढवले होते. कित्येकांच्या घरी शिक्षणाची पार्श्वभूमीही नव्हती, पण कशी काय ऊर्जा त्यांनी मिळवली आणि यश प्राप्त केले हेही एक कोडेच आहे!

**– प्रकाश पेठे**
prakashpethe@gmail.com



# बदनाम वस्ती

अपर्णा पाटील

> मुंबई शहराच्या आकाशाला भिडणाऱ्या इमारतींच्या पायाखाली अनेक इतिहास गाडले गेले आहेत. कोणी तरी, कधी तरी तो इतिहास खोदून काढण्याचा प्रयत्न करेलही. पण कामाठीपुरा नावाच्या वस्तीबाबत तसं घडेल का?

मुंबई शहराच्या निर्मितीमागे मोठा रंजक इतिहास आहे. या शहराच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात दीर्घकाळ स्मरणात राहावा, असा वैभवशाली खजिना आहे. याच शहरात एक अशीही वस्ती आहे जिचा इतिहास लक्षात राहावा किंवा त्याचं स्मरण व्हावं, अशी इच्छा कोणीच व्यक्त करणार नाही. अगदी त्या ठिकाणी राहणाराही नाही. जितक्या लवकरात लवकर ही ओळख पुसली जाईल, तितकं चांगलं. काही वर्षांत ते खरंही होणार आहे. मुंबईच्या भूगोलातून या भागाची ओळख पुसली जाईल. कदाचित त्याचं नावही बदललं जाईल. पुनर्विकासाच्या रेट्यात आता केवळ दोन गल्ल्यांमध्ये संकोचलेलं हे जग भविष्यात शोधूनही सापडणार नाही. त्या ठिकाणाचं नाव आहे 'कामाठीपुरा'.

*कामाठीपुरा*
*सर्व मोसमांना बगलेत मारून*
*तू फतकलास चिखलात*
*या छिनाल सुखदु:खाच्या पलीकडे जाऊन*
*मी पाहतो वाट तुझी कमळ होण्याची.*
*– चिखलातलं कमळ.*

नामदेव ढसाळ यांच्या या कवितेतून 'कामाठीपुरा' म्हणजे काय याचा परिचय मुंबईबाहेरच्या माणसाला होतो. मुंबईच्या इतिहासातल्या उण्यापुऱ्या अडीचशे वर्षांपूर्वी उदयास आलेल्या या भागाची ओळख इतकी बदनाम का झाली, यासाठी या शहराच्या जडणघडणीच्या काळापर्यंत जावं लागतं. मुंबई सात बेटांपासून बनली, असं सहज सांगितलं जातं. मात्र या सात बेटांमुळे ज्या वस्त्या तयार झाल्या, त्यामुळे खऱ्या अर्थानं हे शहर उभं राहिलं. इथे राहणाऱ्या माणसांमुळे, मुंबईला माणूसपण आलं. परंतु याच शहराच्या मध्यवर्ती भागात एक ठसठसती जखम असावी, असा भाग आकाराला आला. शोषणाचं अमर्याद जग या ठिकाणी उभं राहिलं. हे शहर स्वप्नांचं आहे, असं म्हणत अनेक जण या मुंबईला कवेत घेण्यासाठी आले. त्यांचे हात क्षितिजाच्या कक्षांनाही टेकले, पण याच शहरात स्वप्नांचा चुराडा झालेल्या हजारो स्त्रिया आणल्या गेल्या. ज्यांना इथल्या मोकळ्या हवेत कधी श्वासही घेता आला नाही. पराकोटीचा कोंडमारा त्यांना आयुष्यभर सहन करावा लागला. या सगळ्याला जबाबदार होती, ती इथली कामाठीपुरा नावानं अस्तित्वात आलेली वस्ती.

मुंबईचे गव्हर्नर असलेल्या विल्यम हॉर्नबीनं सात बेटांना एकत्र आणणारा कॉजवे बांधला. त्याचीच पुढे मुंबई झाली. महालक्ष्मी, त्यानंतर बेलासिस रोड कॉजवे, हे १७९३मध्ये माझगाव आणि मलबार हिलला जोडले गेले. त्यामुळेच सखल आणि समुद्रालगत असल्यानं दलदलीनं माजलेल्या भागांवर घरं बांधण्याची सोय झाली. आताचं भायखळा, ताडदेव, महालक्ष्मी, कामाठीपुरा, या नावांच्या वस्त्या अस्तित्वात येण्याची ती सुरुवात होती. त्या हिशोबानं कामाठीपुरा नावाची वस्तीच सुमारे २४० वर्षांपूर्वी आकाराला आली, असं म्हणता येईल. मुंबईच्या इतर कोणत्याही वस्तीपेक्षा ही सर्वात जास्त चर्चेत राहिली. पुस्तकांत सापडली. कवितांमध्ये भेटत राहिली. अगदी सिनेमांतून पाहता



आली. यापैकी कुठेही असली तरी ती 'बदनाम'च राहिली. ही वस्ती एका रात्रीत, अचानक उभी राहिली नाही. काही दशकांच्या घुसळणीतून तिची जडणघडण होत गेली. मात्र तिचं अस्तित्व मुंबई शहराशी जोडलेलं असूनही कायम या तिऱ्हाईतासारखी उपेक्षित राहिली.

सात बेटांवर वसलेली मुंबई मोठी डौलदार दिसावी, यासाठी ब्रिटिशांनी तिला सजवण्याचा घाट घातला. मोठमोठी बांधकामं हाती घेण्यात आली. राजाबाई टॉवर, मुंबई उच्च न्यायालय, व्हिक्टोरिया टर्मिनस म्हणजेच आताचं छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि महापालिका मुख्यालय अशा सगळ्या इमारतींचं बांधकाम हाती घेण्यात आलं होतं. या एवढ्या बांधकामांसाठी लागणारे मजूर त्यावेळी मुंबईत असायचं कारण नव्हतंच. कारण वस्त्या सुस्तावण्यासारखं हे शहर आजच्यासारखं सुजलेलं नव्हतं. मग मुंबईत हैदराबादहून मजूर आले. हैदराबादमधूनच का याचंही कारण आहे. १७९५मध्ये हैदराबादचे निजाम आणि पेशवे यांच्यातील संघर्षात निजामची हार झाली. निजामांच्या ताब्यात असलेल्या हैदराबादमध्ये प्रचंड उलथापालथ झाली. रोजगार, कामधंदा करणं अशक्य झालं. मग त्यावेळी मुंबईत मोठ्या प्रमाणावर बांधकाम सुरू असलेल्या दिशेनं अनेक मजूर निघाले. ब्रिटिशांना मजुरांची आवश्यकता होतीच मग त्यांच्यासाठी माझगावकडे जाणारी बेलासिस रोडच्या डावीकडची जागा देण्यात आली.

तेलुगू भाषक या मजुरांचं मुंबई घडण्यात खूप मोठं योगदान आहे. त्यांना कामठी (कामगार) म्हटलं जाई. त्यानंतर १७९५पासून बांधकाम मजूर राहणाऱ्या त्यांच्या वस्तीला कामाठीपुरा (मूळ नाव कामठीपुरा) असं म्हटलं जाऊ लागलं. १७९५नंतर मुंबईच्या पूर्वीच्या सात बेटांना जोडताना सर्वप्रथम वसवली गेलेली वस्ती असं ढोबळपणे म्हणता येईल. अशी ही कष्टकऱ्यांची वस्ती हळूहळू बदनाम का होत गेली, याची कारणं त्यावेळच्या राजकीय, आर्थिक आणि सामाजिक स्थित्यंतरात होती.

कमाठीपुराला बदनाम करण्याचं काम ब्रिटिश सरकारनं केलं. राज्य करण्याच्या उद्देशानं आपल्या फौजफाट्याला घेऊन भारतात पोहोचलेले इंग्रज मोठे धूर्त होते. आपल्या लष्कराच्या जोरावरच इथे साम्राज्य वाढवायचं किंवा राज्य करायचं हे माहीत असल्यानं ते ब्रिटिश जवानांची विशेष काळजी घेत. याच लष्कराच्या मागणीनुसार ब्रिटिश सरकारनं १८६४ मध्ये कन्टोनमेंट कायदा आणला. या कायद्याखाली ब्रिटिश लष्करातील साऱ्या तुकड्यांमधील जवानांसाठी शरीरविक्रय करणाऱ्या स्त्रियांच्या वस्त्या उभारल्या गेल्या. प्रत्येक रेजिमेंटमध्ये साधारणपणे एक हजार सैनिक असायचे. त्यांच्यासाठी साधारणपणे बारा ते पंधरा महिलांची व्यवस्था असावी, असा आदेशही दिला.

या शरीरविक्रय करणाऱ्या स्त्रियांसाठी जे कोठे बनवले गेले त्यांना परवाना देण्याचं कामही लष्करी अधिकाऱ्यांकडे सोपवलं. अगदी त्या महिलांचे 'दर' ठरवण्याचा अधिकारही या अधिकाऱ्यांकडे होता. या स्त्रियांनी फक्त लष्करातील जवानांनाच 'सेवा' पुरवावी, अशी अटही त्यांना होती. ब्रिटिशांनी भारतात शरीरविक्रय करण्यासाठी कायद्यानं परवानगी दिल्यानं एकूणच सामाजिक चित्र बदललं. या भागांत आलेल्या स्त्रिया अत्यंत गरीब घरातल्या होत्या. त्या काळातील अनेक प्रथांमुळे समाजातून बहिष्कृत ठरवलेल्या स्त्रिया सर्वप्रथम या व्यवसायात आल्या. नंतर मात्र आर्थिक लालसेनं 'दलाल' नावाच्या टोळ्यांनी अनेक महिलांना इथं आणलं.

मुंबईत लष्कराची छावणी कुलाबा आणि फोर्ट परिसरात होती. त्यामुळे कुलाबा, गिरगाव, खेतवाडी आणि

**चिनी नागरिकांचा रहिवास**

कामाठीपुरा आकारास येण्यापूर्वी या परिसरात चिनी नागरिक इथे आले होते, असा उल्लेख काही पुस्तकांतून आला आहे. चिनी नागरिक माझगाव बंदराच्या आसपास वस्ती करून राहत होते. चिनी महिला घरबसल्या चिनी पदार्थ बनवून विकत. पुढे काही चिनी दंतचिकित्सकही आले. त्यांनी आपली क्लिनिक या भागांत उघडल्याचं त्यात म्हटलं आहे.

मरीन लाइन्स या भागांत आधी कोठे सुरू झाले. परंतु कामाठीपुऱ्यात शरीरविक्रय सुरू होण्यामागचं कारण आर्थिक होतं. कामाठीपुऱ्याचा उगम भूसंपादनाशी संबंधित आहे. मुंबईतल्या विकासकामासाठी अनेकांच्या जमिनी ब्रिटिशांनी ताब्यात घेतल्या. शेतजमिनी आणि कुरणं काढून घेण्यात आली. ज्यांच्या जमिनी गेल्या, त्यांना छोट्या घरांमध्ये राहण्यास भाग पाडलं गेलं. कधीकाळी स्वत:चं शेत पिकवणारी माणसं मुंबई बंदराच्या पायाचे दगड झाले. बांधकामं जोमानं सुरू होती तोवर कामं मिळत गेली. मात्र इमारती आकारास येताच कामधंद्याविना पुरुष बेरोजगार होऊ लागले. अशावेळी जगण्याची लढाई इतक्या अगतिक टोकावर पोहोचली, की अनेक घरांतल्या स्त्रियांना शरीरविक्रय करण्याच्या कामात अक्षरश: ढकललं.

मुंबईच्या १८६४च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार, कामाठीपुऱ्यात फक्त ६०१ महिला शरीरविक्रय करण्याच्या व्यवसायात होत्या. त्या फक्त म्हणण्याचं कारण इतकंच, की त्यावेळी गिरगावात १,०४४, फणसवाडीत १,३२३ महिला या व्यवसायात होत्या.

सुमारे ४० एकर जागेत वसलेल्या कामाठीपुऱ्यात १४ वेगवेगळ्या गल्ल्या निर्माण झाल्या. कामाठीपुऱ्यात वसलेल्या कोठ्यांमध्ये काही वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी होत्या. बराकीसारख्या, अगदी छोट्या खोल्यांनी हा परिसर वसला, तेव्हा एक बंगाली गल्ली होती. काही नेपाळी, काही पंजाबी. ज्यू, जपानी आणि युरोपीय महिला असल्यानं त्या रस्त्यांची त्याच नावानं ओळख होऊ लागली. ज्यावेळी आधुनिक मुंबई शहराचा पाया रचला जात होता, त्यावेळी परदेशी व्यापारी, पर्यटक आणि ब्रिटिश सैनिक शहरात मोठ्या संख्येनं येऊ लागले. त्याकाळी ब्रिटिश सैन्याच्या वाढत्या फौजफाट्यामुळे इथे कितीही स्त्रिया आल्या तरी त्यांच्या गरजेपेक्षा कमीच होत्या. स्वत:च्या सोयीसाठी ब्रिटिशांनी इथे विशेष असे कोठे सुरू केले. फ्रान्स, जर्मनी, इटली, पोलंड आणि ऑस्ट्रियातून मोठ्या संख्येनं महिला इथे शरीरविक्रय करण्यासाठी येऊ लागल्या.

युरोप तसंच जपान आणि चीनमधून मोठ्या संख्येनं इथे मानवी तस्करीमार्फत स्त्रिया आणल्या गेल्या. ब्रिटिश राजवटीत इथे राहणाऱ्या युरोपीय महिलांमुळे कामाठीपुऱ्यातील एका गल्लीचा उल्लेख सफेद गल्ली (व्हाइट लेन) म्हणून केला जाऊ लागला. अर्थात हा सफेद शब्द परदेशी महिलांच्या उजळ रंगावरून होता, हे उघड आहे. कामाठीपुऱ्यातील युरोपीय स्त्रिया व्यवसाय करत. कामाठीपुऱ्याच्या व्यवसायात मोठी तेजी १८६९ या वर्षात आली. त्या वर्षी युरोपात सुएझ

**वास्तव पडद्यावर**

नव्या पिढीला मुंबईतला कामाठीपुरा समजला असेल तो या वर्षी राष्ट्रीय पुरस्कार मिळालेल्या 'गंगुबाई काठियावाडी' नावाच्या सिनेमामुळे. मागच्याच वर्षी प्रदर्शित (२०२२) झालेला हा चित्रपट कामाठीपुऱ्यातील एका महिलेच्या आयुष्यावर बेतलेला आहे. या सिनेमात येथील कोठे, तिथे होणारं शोषण, गुन्हेगारी, गुंडगिरी आणि या व्यवसायातील महिलांची आगतिकता, हतबलता चित्रित केली आहे. सिनेमा एका स्त्रीच्या आयुष्याची कथा सांगणारा असला तरी त्यातून या कोठ्यांमधलं भयावह चित्र समोर येतं. या सिनेमाच्या आधी श्रीजित मुखर्जी दिग्दर्शित 'बेगम जान' हा विद्या बालनचा चित्रपट प्रदर्शित झाला होता. अगदी ठळक उदाहरण द्यायचं झालं तर, शबाना आझमी आणि स्मिता पाटील यांचा 'मंडी' हा कोठ्यावरील महिलांना या व्यवसायात कसं ढकललं जातं, हे दाखवणारा अत्यंत संवेदनशील असा चित्रपट म्हणता येईल. 'प्यासा'मधील वहिदा रहमानची गुलाबो, 'सडक'मधून पूजा भट्टनं साकारलेली पूजा आणि नगमाच्या 'बागी'मधील पारो, यासह अनेक व्यक्तिरेखा कोठ्यावरील स्त्रियांचं आयुष्य मांडणाऱ्या होत्या. तर प्रत्यक्ष कामाठीपुऱ्याच्या लोकेशनवर चित्रित केला गेलेला सर्वात प्रसिद्ध चित्रपट म्हणजे मीरा नायर यांचा 'सलाम बॉम्बे'. या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट परदेशी चित्रपट विभागात ऑस्करसाठी नामांकन मिळालं होतं. त्यानंतर अनेकांनी या परिसराला आपल्या कॅमेऱ्यात कैद केलं. बरीच माहिती दस्तऐवज रूपात, माहितीपटांच्या माध्यमांतून समोर आली. असंख्य चित्रपटांतून कोठे, महिलांचं शोषण हा विषय मांडताना कामाठीपुऱ्याचा उल्लेख सहजपणे आलेला दिसतो. आता तर या स्त्रिया, त्यांच्या मुलांचं वेगळं जग मांडण्याचे प्रयत्न अशा असंख्य कहाण्या समाजमाध्यमांतून समोर आल्या आहेत.



### गाण्यांतून कवितेतून

नामदेव ढसाळ किंवा साहिर लुधियानवी यांच्यासारख्या कवीकाळजाच्या माणसांनी या मूक वस्तीला शब्दरूप दिलं आहे.

'जिन्हे नाज है हिंदपर वो कहा है', असं उपरोधिक आवाहन करत, या वस्तीतल्या स्त्रीची घुसमट, शोषण याची व्यथा साहिर लुधियानवी यांनी मांडली आहे. 'प्यासा' चित्रपटातील या गाण्याच्या प्रत्येक ओळीतून या बदनाम गल्लीच्या वेदनेला शब्दरूप दिलं आहे.

ये पुरपेच गलिया, ये बदनाम बाजार
ये गुमनाम राही, ये सिक्को की झंकार
ये इस्मत के सौदे, ये सौदो की तकरार..
ये सदियो से बेखौफ, सेहमी सी गलिया
ये मसली हुई खोखली रंग-रलिया
जिन्हे नाज है

शरीरविक्रय व्यवसायात आलेल्या स्त्रियांचं शोषण हा आत्यंतिक संवेदनशीलपणे मांडावा असा विषय आहे. देशातील बदलत्या राजकीय, आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीत येथील स्त्रियांच्या वाट्याला आलेलं शोषण अत्यंत भयावह आहे, असं म्हणता येईल. पण पांढरपेशा सुसंस्कृत म्हणवल्या जाणाऱ्या वर्गाने त्याकडे अत्यंत द्वेषपूर्णतेनं पाहिलंय, हेही तितकंच खरंय.

कालवा व्यापारासाठी खुला झाला. यामुळे आशिया आणि युरोपमधील व्यापारांना येण्याचा थेट मार्ग उपलब्ध झाला. युरोप आणि भारत यांच्यातील प्रवासाचं अंतर कमी झाल्यानं मोठ्या संख्येनं परदेशी स्त्रिया मुंबईत निव्वळ शरीरविक्रय व्यवसायासाठी आल्या. त्यांना इथे आणणारे दलाल मुंबईत हा व्यवसाय अधिक वाढवू लागले.

सन १८६४च्या कन्टोनमेंट कायद्यानुसार लष्करासाठी नियुक्त केलेले डॉक्टर या महिलांची तपासणी करत. आठवड्यातून एकदा तपासणी करणं सक्तीचं होतं. लैंगिक आजारांची लागण होऊ नये, हे त्यामागचं कारण होतं. विशेष म्हणजे इतक्या मोठ्या प्रमाणावर आलेल्या स्त्रियांना ब्रिटिश सरकार काही खास सोयी देई. परदेशी स्त्रिया असलेल्या कोठ्यांवर डॉक्टर रोज तपासणीला जात. याउलट भारतीय महिला असलेल्या कोठ्यांवर आठवड्यातून एकदाच जात. हा वंशभेद इतका पराकोटीचा होता, की पोलीसही परदेशी महिलांच्या व्यवसायाला संरक्षण देत, याउलट भारतीय महिलांना अनेकदा त्रासही देत. या महिला या गल्ल्यांमध्ये शरीरविक्रय करण्याचा व्यवसाय करत असल्या तरी सफेद गल्लीतल्या परदेशी महिलांकडून भारतीय महिलांना भेदभावाची वागणूक मिळत असे.

कधी काळी युरोपीय आणि अन्य देशांतील महिलांमुळे उत्सुकतेचा विषय असलेली ही गल्ली सध्या शापजी शुक्लाजी गल्ली म्हणून ओळखली जाते. याच भागातील पिला हाऊस हे सर्वात चर्चेत असलेलं ठिकाण म्हणून ओळखलं जातं. खरं



तर पिला शब्द एखाद्या पिवळ्या रंगाच्या इमारतीमुळे असावा, असं अनेकांना वाटतं. परंतु तो इंग्रजी शब्द प्ले-हाऊसचं देशी रूपांतर आहे!

सन १८८०मध्ये हा भाग कामाठीपुरा झोन म्हणून घोषित करण्यात आला होता. त्यावेळी गरीब आणि कष्टकरी तेलुगू कामगारांची ही वस्ती होती. मग कामाठीपुरा हा निवासी व व्यावसायिक परिसर असा दुहेरी पद्धतीनं विकसित झाला. इथे ८००हून अधिक इमारती आणि ८,०००हून अधिक भाडेकरू नंतर राहायला लागले. ज्यात कामगार राहू शकतील, अशा पद्धतीनं इमारतींचं बांधकाम केलं गेलं. त्यावेळी त्यांना ही घरं स्वस्त दरात देण्यात आली. जसा शरीरविक्रय व्यवसाय फोफावत गेला, तशी कामठीपुराची ओळख बदलली. नुसत्याच काडेपेटीच्या आकारच्या घरांच्या इमारती राहिल्या नाही, तर चित्रपटगृहं सुरू झाली. दारू, चहा आणि परफ्युमची दुकानं सुरू झाली.

साहजिकच हा भाग आर्थिक उलाढालीचा केंद्रबिंदू झाला. त्यामुळे देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काही गोष्टी बदलल्या तरी या भागाचा तोंडावळा तोच राहिला. उलट या भागात गुन्हेगारीनंही हातपाय पसरले. या परिसरात टोळ्यांच्या हालचालीही वाढल्या. सत्तर आणि ऐंशीच्या दशकात अंडरवर्ल्डचे डॉन असा उल्लेख होणारे अनेक जण इथे वेगवेगळ्या व्यवसायांत शिरले. हफ्तावसुली, तस्करीत उतरले.

स्वातंत्र्य मिळाल्यावर तस्करी आणि गरिबीमुळे देशाच्या अन्य भागांतील महिला येथे आल्या. मोठ्या प्रमाणावर नेपाळी आणि बांगलादेशी महिला आणि मुली तस्करीतून आणल्या गेल्यात. दिल्ली आणि कोलकात्यातील रेडलाइट एरियापेक्षाही येथे आणल्या गेलेल्या महिलांची संख्या वाढली त्यामुळे हा आशियातील शरीरविक्रय करणारा सर्वात मोठा परिसर ठरला. या परिसरातील कोठ्यांवर गर्दी होऊ लागली. भडक कपडे आणि गडद मेकअप केलेल्या, दाराजवळ बसलेल्या किंवा उंच खिडक्यांतून खाली डोकावणाऱ्या स्त्रिया पाहण्यासाठी अनेक जण या वस्त्यांमध्ये जाऊ लागले. मात्र त्या स्त्रिया राहत असलेल्या इमारतींना सोयीसुविधा मिळाव्यात यासाठी कोणीच, कधी लक्ष दिलं नाही. साधं स्वच्छ पाणीही त्यांना उपलब्ध झालं नाही.

कोलकात्यात सोनागाछी नावानं, दिल्लीतील जीबी रोडवर साधारण अशाच 'बदनाम' वस्त्या ब्रिटिशांच्या काळात उदयास आल्या आणि आजही त्याच ठिकाणी शरीरविक्रय व्यवसाय सुरू आहे. कामाठीपुऱ्यात मात्र तसं झालं नाही. १९९० च्या दशकाच्या उत्तरार्धात एड्सचा वाढता प्रादुर्भाव आणि सरकारच्या धोरणामुळे शरीरविक्रय करणाऱ्या स्त्रियांची संख्या कमी झाली. १९९२मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेनं केलेल्या नोंदीनुसार ४५ हजार महिला शरीरविक्रय व्यवसाय करत होत्या. ही संख्या २००९पर्यंत १,६०० आणि २०१८मध्ये ५०० इतकी कमी झाली. अर्थात याचं सगळ्यात महत्त्वाचं कारण ठरलं, ते शहरातील इतक्या मोक्याच्या जागेवर इमारती उभारण्याचं स्वप्न पाहणारे विकासक.

कामाठीपुरा रेडलाइट एरिया म्हणून ओळखला जात असला तरी अन्य छोटेमोठे उद्योग वाढण्यास मदत झाली, तो हा परिसर मुंबई या आर्थिक राजधानीचा मध्यवर्ती भाग असल्यामुळेच. त्यामुळेच अनेक व्यावसायिकांनी इथे आपला व्यवसाय सुरू केला. मात्र 'पत्ता' बदनाम होऊ नये म्हणून या भागाची ओळख 'केपी' अशी करून द्यायला सुरुवात केली. हळूहळू रिअल इस्टेटवाल्यांनी ताबा घेतल्यानं भाडेकरू म्हणून राहणाऱ्यांना इथून जाणं भाग पडलं. २०१८पासून तर या भागाला पुनर्विकासानं पार बदलून टाकलंय.

येथील बहुतांश शंभर वर्षांहून अधिक जुन्या इमारती पाडून नव्या उभ्या राहिल्या किंवा राहत आहेत. देशातील सर्वात मोठ्या रेडलाइट एरिया म्हणवल्या जाणाऱ्या कामाठीपुऱ्यात आता चौदा गल्लींपैकी केवळ दोन गल्ल्या उरल्या आहेत. म्हाडा या परिसराचा पुनर्विकास करणार आहे. हा प्रस्ताव अंतिम टप्प्यात असल्याची घोषणा मागच्या वर्षी विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान राज्य सरकारने केली होती. याच 'मेकओव्हर'च्या माध्यमातून या भागाला 'मेकअप' लावण्याचं काम होत आहे. पुढील काळात नुसतं नावच नाही तर या वस्तीचं अस्तित्व नामशेष होईल. त्याची खंत करावी, असं अजिबातच नाही. दुष्टचक्रात अडकलेल्या आयुष्याची राख झालेल्या अभागींच्या जगण्याचं थडगं झालेली ही वस्ती. तो भोगवटा जमीनदोस्त होईल. हे खरं, तरी डिजिटल युगात लैंगिक सुखासाठी  वेबसाइटच्या माध्यमातून बुकिंग करता येतं. हॉटेलमध्ये तासाच्या दरावर खोल्या मिळतात. अगदी अत्याधुनिक पद्धतीनं कॉल गर्ल, एस्कॉर्ट सर्व्हिसेस, अगदी मसाज पार्लरच्या नावाखाली ही सेवा उपलब्ध करून दिली जाते. फोन, ई-मेल आणि व्हॉट्सॲप असताना, बदनाम वस्तीची वाट वाकडी करण्याची वेळही येत नाही. त्यामुळे 'कशासाठी उतरावे तंबू ठोकून, कोण मेले कुणासाठी रक्त ओकून' असं म्हणत या वस्तीचं अस्तित्व इतिहासजमा होणार आहे.

**(छायाचित्रे – घनश्याम भडेकर)**

**– अपर्णा पाटील**

aparnapatil1@gmail.com



# वाचनसंस्कृती सजग समाजाचा पाया

राजीव श्रीखंडे

मी माझ्या वाचनाचा विचार करतो तेव्हा मला हे प्रकर्षाने जाणवते, की गेल्या पाच दशकांहून अधिक काळ मी सातत्याने वाचतो आहे. साहित्याच्या महासागरात थोडे पोहता येणे हा एक विलक्षण अनुभव आहे. मराठीपासून सुरुवात करून मी इंग्रजी साहित्याकडे वळलो आणि त्यानंतर जागतिक साहित्याकडे - फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, लॅटीन अमेरिकन, जपानी, चिनी, रशियन याकडे. अर्थात मला बाकीच्या भाषा येत नसल्यामुळे मी या साहित्याचे इंग्रजीत झालेले अनुवादच वाचत आलेलो आहे. प्रथम रहस्यकथा, साहसकथा यांच्याकडे असणारा ओढा कमी होऊन मग ज्याला मेन स्ट्रीम लिटरेचर म्हणतात त्याकडे मी जास्त आकर्षित झालो. हा बदल लगेच झालेला नाही, तर तो हळूहळू होत गेलेला आहे. जगातील सगळी प्रसिद्ध क्लासिक्स वाचायची ऊर्मी झाल्यामुळेच हा बदल झाला.

साहित्याचा कुठलाही प्रकार घेतला तरी त्यात काळानुरूप बदल झाल्याचे आपल्याला आढळून येते. बदल हा या विश्वाचा स्थायीभावच आहे. कादंबरी या साहित्यप्रकारात अनेक वेगवेगळे प्रवाह आहेत. या सर्वच प्रवाहांत लक्षणीय बदल झालेले आपल्याला दिसतात. गुप्तहेरकथा हा प्रकार घ्या. प्रथम प्रथम रस्किन चाइल्डर्सच्या (Erskine Childers) The Riddle of the Sands पासून आजच्या जॉन ल कारच्या कादंबऱ्या वाचल्या की हा बदल आपल्या पटकन ध्यानात येतो. जेम्स बाँडसारखा नायक आजच्या गुप्तहेर कथांमध्ये आपल्याला सापडत नाही. दिसायला देखणा, स्त्रियांना आकर्षित करणारा, निधड्या छातीचा, अतिशय उंची जीवनशैली असणाऱ्या नायकाची जागा तुमच्याआमच्यासारख्या सामान्य जॉर्ज स्माईलीने घेतलेली आहे. गुप्तहेरकथा पूर्वीच्या अतिरंजित जगातून बाहेर पडून खऱ्या जगाशी संलग्न झालेल्या दिसतात. लेन डेडन, ॲडम हॉल, जॉन ल कार यांसारख्या अनेक दिग्गज लेखकांनी परिश्रमपूर्वक हा बदल घडवून आणलेला आहे आणि बदलत्या जगात असे होणे हे साहजिकच आहे. गुप्तहेरांचा कारभार खरा कसा चालतो, विविध सरकारी संघटनांमधले हेवेदावे, स्वतःचा पक्ष पुढे नेण्यासाठी होणाऱ्या योजना, शह-काटशह हे सर्व अत्यंत परिणामकारकरित्या आजच्या गुप्तहेरकथांमध्ये चित्रित केले जाते. ग्रॅहॅम ग्रीन आणि जोसेफ कॉनराड यांसारख्या प्रतिभावंत लेखकांनी या बदलाची मुहूर्तमेढ रोवली हे आता सर्वमान्य झालेले आहे.

तसाच प्रकार भयकथांबाबत घडलेला आहे. ब्रॅम स्टोकर, मेरी शेलीच्या भडक भयकथांची जागा शेरीडन ला फेनू आणि रॉबर्ट लुई स्टीव्हन्सनच्या संयत भयकथांनी घेतली जिथे मानवी मनच केंद्रस्थानी आहे. या भयकथा जास्त अंगावर येणाऱ्या आहेत जरी त्यात भयंकर प्रसंगांचे तपशीलवार वर्णन नसले तरीही. पुढे स्टीफन किंगसारख्या प्रतिभाशाली लेखकांनी त्याला अतिशय वेगळे रूप दिले. आधीच्या थोड्याशा बालिश, अतिरंजित विज्ञानकथांना आयझॅक ॲसिमोव आणि ऑर्थर सी. क्लार्क यांसारख्या द्रष्ट्या लेखकांनी शक्यतेच्या आवर्तनात आणण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. पूर्वीच्या केवळ कपोलकल्पित साहसकथांना सध्याच्या युगाच्या जिओ पोलिटिकल (Geo Political) स्थितींचा संदर्भ घेऊन त्या अधिकच विश्वासार्ह करण्याचे काम फ्रेडरिक फॉरसिथ, डॅनियल सिल्वा यांसारख्या प्रथितयश लेखकांनी केले. अगदी रहस्यकथा घेतल्या तरी पूर्वीच्या ऑर्थर कॉनन डॉयल, अगाथा ख्रिस्ती यांच्या काळातल्या रहस्यकथांना सध्याच्या जगाचे खरे विदारक स्वरूप देण्याचे लक्षणीय काम डॅशिअल हॅमेट, रेमंड चॅन्डलर आणि रॉस


मॅक्डोनाल्ड या अमेरिकन लेखकांनी केले. या लेखकांच्या लेखनाला हार्ड-बॉइल्ड डिटेक्टिव्ह फिक्शन असे संबोधले जाते. मायकेल इनेससारख्या लेखकांनी रहस्यकथेला बुद्धिवादी आवरण देऊन एक वेगळाच प्रघात पाडला. गुन्ह्याकडे पूर्वीसारखे फक्त उकलायचे रहस्य म्हणून न बघता गुन्हा घडल्यामागची कारणमीमांसा आणि गुन्हेगारांच्या मानसिकतेचे विश्लेषण करणाऱ्या जबरदस्त कादंबऱ्या लिहिण्याचे काम रूथ रेंडल, टाना फ्रेंच, थॉमस हॅरिस यांसारख्या समर्थ लेखकांनी केलेले आहे. थॉमस हॅरिसची कादंबरी The Silence of the Lambs हे अशा साहित्याचे उत्तम उदाहरण आहे.

जागतिक साहित्यात काळानुसार जे बदल घडत गेले त्याची सुरुवात चळवळींच्या स्वरूपातच झाली. रेनेसान्स साहित्याच्या जडणघडणीची सुरुवात चौदाव्या शतकात इटलीपासून झाली. जगात मानवी धर्म हा एकच धर्म आहे हा या चळवळीचा पाया आहे. इटलीपासून सुरू झालेली ही चळवळ पुढे युरोपभर पसरली. निकोलो मॅकिव्हेली, फ्रँकॉईस रबाले, मिग्येल सर्व्हेंटिस, विल्यम शेक्सपीअर हे या चळवळीचे लक्षणीय लेखक. मिगेल सर्व्हेंटिसची कादंबरी Don Quizote तर जागतिक साहित्याचा फार मोठा मानदंड ठरलेली आहे. मानवतेलाच केंद्रस्थानी धरणारे हे साहित्य आहे. पुढे सतराव्या-अठराव्या शतकात क्लासिसिझमच्या साहित्याचा उगम झाला. एज ऑफ एनलाइटनमेंट किंवा एज ऑफ रिझनमुळे हा साहित्यप्रकार अस्तित्वात आला. मानवी सुख, ज्ञानाचा तर्कशास्त्र आणि आपल्या पंचेंद्रियांच्या साहाय्याने केलेला पाठपुरावा, धर्म आणि राज्यसत्ता यांची विभागणी, कायदा, स्वातंत्र्य, न्याय, बंधुभाव, सामाजिक उत्कर्ष यावर आधारलेली सत्ता हे विचार या चळवळीचा पाया होते. मॉईलिए, जॉन ड्रायडन, व्हॉल्टेअर, जोनाथन स्विफ्ट, ॲलेक्झांडर पोप हे या चळवळीचे प्रमुख लेखक होते.

यातूनच पुढे सेंटिमेंटॅलिझम या साहित्यप्रकाराचा जन्म झाला. पाप आणि पुण्य या गोष्टी अनुभवलेल्या प्रसंगांना दिलेल्या भावनिक प्रतिसादातून निर्माण होतात हा विचार या साहित्याच्या मुळाशी आहे. लॉरेन्स स्टर्न, ज्याँ जॅक्स रुसो, थॉमस ग्रे, फ्रेडरिक गॉहिलेब क्लेमस्टॉक हे या साहित्याचे प्रमुख लेखक मानले जातात. यातूनच पुढे रोमँटिसिझमचा जन्म झाला.

रोमँटिसिझमची सुरुवात एकोणिसाव्या शतकात झाली. या साहित्यात भावना आणि कल्पनाशक्ती यावर तर्कशास्त्र आणि वैज्ञानिक कल्पना यापेक्षा अधिक भर दिला गेला. ज्ञानालादेखील भावनिक आणि काल्पनिक प्रतिसाद सगळ्यात महत्त्वाचा आहे असे या लेखकांचे म्हणणे होते. व्हिक्टर ह्युगो, लॉर्ड बायरन, जोस द अलेनकार हे या प्रकारच्या साहित्याचे प्रमुख लेखक मानले जातात. वॉशिंग्टन, आयर्विंग, नाथनीएल हॉथॉर्न, अँब्रोस बिअर्स यांचीही नावे यात आघाडीवर आहेत. याच सुमारास अतिंद्रियवाद (Transcendentalism) साहित्याचा उगम त्या शतकाच्या मध्याला झाला. स्वबळ, स्वनिष्ठा यावर आधारलेले जीवन आणि आधुनिक तंत्रज्ञानापासून सुटका अशी या साहित्याची धारणा आहे. राल्फ वाल्डो इमर्सन, हेन्री डेव्हिड थोरो हे या चळवळीचे जनक मानले जातात. या प्रकारचे साहित्य मुख्यतः अमेरिकेत लिहिले गेले.

रोमँटिसिझमनंतर रिॲलिझम चळवळीचा जन्म झाला. रोमँटिसिझममध्ये अडकून बसलेल्या साहित्याला सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनात येणाऱ्या अनुभवांना स्थान देणारे आणि अलंकारिक, क्लिष्ट कथनशैलीपेक्षा साध्या, सरळ कथनशैलीला अग्रक्रम देण्याचे काम या साहित्याने केले. यात अनेक दिग्गज लेखकांचा समावेश आहे - स्टेंधाल, फ्लॉबर्ट, ऑनेरी दि बाल्झाक, लिओ टॉल्स्टॉय, फयोडोर



एमिले झोला

डोस्टोव्हस्की, अँटन चेकॉव्ह, मॅचिडो द ॲसिस इत्यादी. वास्तववादी साहित्याचा प्रभाव इतका प्रचंड आहे तो या दिग्गज लेखकांच्या अनेक विलक्षण कलाकृतींमुळेच – उदाहरणार्थ, वॉर अँड पीस, द रेड अँड द ब्लॅक, मॅडम बॉवरी, ओल्ड गोरिओ, क्राईम अँड पनिशमेंट इत्यादी.


एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी नॅचरॅलिझम या चळवळीचा उगम झाला. मानवाची वांशिक परंपरा, त्याचा वांशिक ठेवा आणि त्याच्या आजूबाजूची परिस्थिती याच बाबी मानवी जीवन नियंत्रित करतात अशी या साहित्यिकांची धारणा आहे. याचाही जगावर फार प्रभाव पडला कारण एमिले झोला, स्टीफन क्रेन, हेन्रिक इब्सेन, गाय द मोपांसा यांसारख्या लेखकांनी लिहिलेल्या असामान्य कलाकृतींमुळेच! एमिले झोला तर या साहित्यप्रकाराचा जनकच मानला जातो. त्याची Germinal ही कादंबरी फारच प्रसिद्ध आहे.

रिॲलिझमच्या चळवळीतून सोशल रिॲलिझम या चळवळीचा उदय झाला. कामगारवर्गाच्या जीवनाचे चित्रण या साहित्यात केले गेलेले आहे. बर्नार्ड शॉ, मॅक्सिम गॉर्की, एच.जी. वेल्स, थिओडोर ड्रेईसर यांसारख्या अनेक प्रतिभाशाली लेखकांनी या साहित्यप्रकाराला आकार दिला. यातूनच पुढे सोशॅलिस्ट रिॲलिझमच्या साहित्याचा जन्म झाला. कम्युनिझमविषयी प्रांजळ भाष्य करणारे हे साहित्य आहे. मिखेल शोलाकोव्ह, टाकीजी कोबायाशी हे या साहित्याचे काही प्रमुख लेखक. रिॲलिझमची एक शाखा अमेरिकेतही जन्माला आली. मार्क ट्वेन, जॅक लंडन, जे.डी. सॅलिंजर हे या साहित्याचे काही प्रमुख लेखक. अमेरिकन मूल्ये आणि अमेरिकन प्रगतीबद्दल सकारात्मक भाष्य करणारे हे साहित्य आहे, त्यातील उणिवांसकट.

रिॲलिझमची पुढची पायरी म्हणजे मॅजिक रिॲलिझम. या प्रकारच्या साहित्यात अविश्वसनीय गोष्टींची साध्या नेहमी घडणाऱ्या गोष्टीशी सांगड घातली जाते. विसाव्या शतकातील लॅटिन अमेरिकन साहित्यात याची ठळक उदाहरणे दिसून येतात. गॅब्रिएल गार्सिया मार्क्विस, इझाबेल ॲलंडे, ऑक्टोव्हिया पाझ, गुंथर ग्रास, ज्युलिओ कोर्टाझार, ओल्गा तोरकाच्यूक हे या साहित्यप्रकाराचे प्रमुख लेखक आहेत. मार्क्विझची One Hundred Years of Solitude ही कादंबरी जगभर गाजली.

रिॲलिझम किंवा नॅचरॅलिझमला पुढे विरोध झाला आणि त्यातून निओ-रोमँटिझम या चळवळीची सुरुवात झाली. ज्यूल व्हर्न, रॉबर्ट लुई स्टीव्हन्सन, केन्युट हॅमसन, खलिल जिब्रान, राफेल सॅबातिनी हे या चळवळीतले प्रमुख लेखक मानले जातात.

चार्ल्स बॉडिलिए, ऑस्कर वाईल्ड हे डिकेडन्ट साहित्यप्रकाराचे पुरस्कर्ते आहेत. पुढे सिम्बॉलिझम नंतर मॉडर्निझम या चळवळीचा जन्म झाला. विज्ञानशास्त्र आणि तंत्रज्ञान यांच्या झपाट्याने वाढणाऱ्या प्रभावाला हे जणू प्रत्युत्तरच होते. जुन्या काळातल्या घटनांची आठवण आणि त्यातून निर्माण होणारे भावनिक विश्व हा या चळवळीचा पाया होता. जोसेफ कॉनरॉड, केन्युट हॅमसन, जेम्स जॉईस, एझ्रा पाऊंड, जॉर्ज एलियट, फर्नांडो पेसो, गर्टुड स्टेन यांसारख्या दिग्गज लेखकांनी या साहित्यप्रकाराला मानाचे स्थान प्राप्त करून देण्यास फार मोठा हातभार लावला. एक्स्प्रेशनिझमचा जन्मच रिॲलिझमच्या विरोधी विचारधारेतून झाला आहे. मनात येणारे असंबद्ध विचार आणि माणसाचे असेच विस्कळीत असलेले भावनाविश्व हे चित्रित करणे हा या साहित्याचा गाभा आहे. फ्रान्झ काफ्का, हेन्रिक मान सारखे प्रतिभासंपन्न लेखक या साहित्यात अग्रस्थानी आहेत. तसंच इंप्रेशनिस्ट साहित्य व्हर्जिनिआ वुल्फ, नोबोकोव्हसारख्या दिग्गज लेखकांनी निर्माण केले जे फ्रान्समधल्या चित्रकलेच्या इंप्रेशनिस्ट चळवळीशी निगडित आहे. या चळवळीचे



**जाँ पॉल सार्त्र**

अत्यंत ज्वलंत उदाहरण म्हणजे प्रसिद्ध जपानी लेखक हारुकी युराकामी. या प्रकाराच्या साहित्यात अव्यक्त मनाच्या व्यापारावर अधिक भर दिला जातो. यातच डाव्या विचारसरणीचे विद्रोही लेखक हेन्री मिलर, अॅनास नीन यांचाही समावेश होतो.

पुढे विसाव्या शतकाच्या मध्याला अॅबसर्डिझम साहित्याचा पाया घातला गेला. या प्रकारच्या साहित्याची मूळ धारणा अशी आहे की मानवी जीवन हे पूर्णतः अर्थशून्य आहे आणि त्यामुळे त्यातल्या सगळ्याच मूल्यांवर प्रश्न उभे राहतात. जाँ पॉल सार्त्र, अल्बर्ट कामू, सॅम्युअल बेकेट, जिओ झियांगजिन हे या साहित्याचे अग्रगणी लेखक आहेत. १९६० च्या सुमारास अमेरिकन Beat कादंबरीचा उगम झाला. जगाने स्वीकारलेल्या एकंदर सांस्कृतिक मूल्यांच्या विरोधातले हे साहित्य आहे. जॅक कॅरॉक, अॅलन गिंसबर्ग, विल्यम बरोज हे या साहित्याचे काही मान्यवर लेखक. जॅक कॅरॉकची On the Road ही एक अतिशय प्रसिद्ध अशी Beat कादंबरी आहे.

पुढे या बरोबर पोस्ट मॉडर्निझम चळवळीचा उदय झाला. सगळ्याच अशाश्वतावरचा अविश्वास आणि शब्दांचा खेळ हा या साहित्याचा गाभा आहे. जॉर्ज लुई बोरेस, थॉमस पिंचोन, कुर्ट व्होनेगर हे अशा प्रकारच्या साहित्याचे प्रमुख लेखक मानले जातात. बोरेसचं The Labyrinths, पिंचोनचं Gravity's Rainbow आणि व्होनेगटचं Slaughterhouse Five ही यातली काही उल्लेखनीय पुस्तके.

काळानुसार मानवी जीवन बदलत जाते आणि त्याचप्रमाणे मानवी जीवनाची मूल्येही बदलत जातात. मानवनिर्मित आहे ते नेहमीच अशाश्वत आहे. ते चिरंतन कधीही नाही. त्यामुळे बदल हाच मानवी जीवनाचा स्थायीभाव आहे आणि त्याचा परिणाम साहित्यावरही होणे हे अपरिहार्यच आहे, कारण साहित्य हे मानवी जीवनाचा आरसाच आहे.

लिखाण बदलत गेले तसे वाचकांचे वाचनही बदलत गेलेले दिसते. मी 'ग्रंथाली'साठी 'ग्लोबल साहित्यसफर' हा जागतिक अभिजात साहित्याची ओळख करून देणारा कार्यक्रम गेली दोन वर्षे करत आहे, त्यात मला या साहित्याच्या पुनःप्रत्ययाचा आनंद मिळतो आहे तो अवर्णनीय आहे. सध्या जगभर वाचणाऱ्यांची संख्या कमी झालेली आहे ही वस्तुस्थिती आहे. परंतु आमच्या 'ग्लोबल साहित्यसफरी'ला मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद हा उमेद वाढवणारा आहे. शेवटी वाचनानेच माणूस प्रगल्भ होतो हे कसे नाकारता येईल? वाचाल तर वाचाल हे विधान अतिरंजित मुळीच नाही. त्यामुळे कितीही बदल घडले तरी वाचन हे अबाधित राहणार यात मुळीच शंका नाही. लेखनात कितीही बदल झाले, वाचनशैलीत कितीही बदल झाले, तरी काही पुस्तकांवर या बदलांचा कुठलाही परिणाम न होता काळाच्या प्रवाहात ती तशीच खंबीरपणे उभी आहेत. अशाच पुस्तकांनाच क्लासिक म्हटले जाते आणि प्रत्येक युगात अशा प्रकारच्या क्लासिकची निर्मिती झालेली आहे. आजही अलेक्झान्डर ड्युमाच्या The Count of Monte Cristo ची उदंड लोकप्रियता अबाधित आहे. कारण त्यात मूलभूत मानवी स्वभावाच्या काही पैलूंचे फार प्रभावी चित्रण आहे आणि मानवी स्वभावाचा मूळ गाभा तसा फारसा बदललेला नाही. आता ई-बुक्सचा जमाना आहे. पुढे आणखीही काही बदल होतील, पण वाचनसंस्कृती ही सजग समाजाचा पाया आहे हे सत्यच आहे आणि पुढची वाट कितीही कठीण असली तरी ही संस्कृती टिकून राहील असा विश्वास मला वाटतो.

**– राजीव श्रीखंडे**
rshrikhande@yahoo.com

ग्रंथाली

## रमेश कुलकर्णी यांची चार पुस्तके प्रकाशित



**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**



**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**



**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १३० रुपये**



**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**




# एका पुस्तकाची जन्मकथा

प्रभाकर भिडे

सन १८५७चा स्वातंत्र्यसंग्राम संपला. त्यामध्ये हिंदुस्थानाचे दिल्लीचे मोगल बादशहा बहादुरशहा, पेशवे धोंडोपंत ऊर्फ नानासाहेब (ब्रह्मावर्त-कानपूर येथील), सेनापती तात्या टोपे, झाशीची राणी ब्रिटिश सैन्यामधील अनेक स्वातंत्र्यप्रेमी व असंतुष्ट सैनिक यांनी भाग घेतला होता. मात्र एक नेतृत्व व आपापसांतील सहकार्य याचा अभाव यामुळे ब्रिटिशांकडून पराभव पत्करावा लागला. तरी ते भारतीय स्वातंत्र्याकरता युद्ध असल्यामुळे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी '१८५७चे स्वातंत्र्यसमर' हा अतिशय स्फूर्तिदायी ग्रंथ लिहिला. त्यामध्ये म्हटले, झाशीची राणी लक्ष्मीबाई ही एखाद्या विजेचा लोळ पडावा असा पराक्रम करून वीरगतीला प्राप्त करती झाली.

सन १८९४ मध्ये स्वातंत्र्यसंग्राम संपून ३६ वर्षे झाली तरी दुर्दैवाने महाराष्ट्रातील लोकांना झाशीच्या राणीविषयी फारशी माहिती नव्हती. खरे म्हणजे हिंदुस्थानामध्ये आजपर्यंत जी लोकोत्तर स्त्रीरत्ने प्रकाशमान झाली त्या सर्वांमध्ये शेवटचे व शौर्य गुणामध्ये अग्रेसर असे स्त्रीरत्न झाशी संस्थानच्या महाराणी लक्ष्मीबाईसाहेब ह्या होत्या. ह्या स्त्रीचे नाव १८५७ सालच्या बंडापासून सर्वतोमुखी गाजत आहे. उत्तर हिंदुस्थानमध्ये तर 'झाशीवाली राणी' हा एक सर्वप्रिय विषय होऊन राहिला आहे. तिकडील वृद्ध लोकांच्या तोंडून ह्या स्त्रीच्या कित्येक अतुलनीय पराक्रमाच्या आवेशयुक्त व रसभरीत गोष्टी सांगण्यात येतात ते ऐकून ऐकणाऱ्याचे चित्त वेधले जाते.

पुढे, १८९० मध्ये एक गमतीदार पण आकस्मिक रितीने योग जुळून आला. त्यामुळे ह्या विषयाकडे वाचकांची मने पूर्ववत वळली. तो योग असा- पुणे येथे वसंतोत्सवामध्ये (मे महिन्यात) पंडित वसंतराव या नावाच्या




एका गृहस्थाने वायव्येकडील प्रांत व अयोध्या परिसर येथील तीस वर्षांचा इतिहास या विषयावर एक व्याख्यान दिले. त्यामध्ये त्याने झाशीच्या राणीसंबंधाने पुष्कळ मनोरंजक गोष्टी सांगितल्या. त्यामध्ये काही दंतकथा किंवा कपोलकल्पित गोष्टी होत्या. ह्या व्याख्यानाचा सारांश पुणे येथील 'केसरी' वृत्तपत्रामध्ये तारीख २७ मे १८९०च्या अंकात प्रसिद्ध झाला. पंडित वसंतराव यांनी हा सर्व विषय कादंबरीच्या थाटात तिखटमीठ लावून सांगितला होता. त्यांची वक्तृत्वशैली आकर्षक असल्याने पुण्यातील लोकांना त्यांचे भाषण आवडले. 'केसरी'मध्ये ह्यावर थोडक्यात पण साररूपी लेख आल्यामुळे केसरीच्या वाचकांना त्याची गोडी लागली. या

साऱ्यामुळे झाशीच्या राणीविषयी आदराची भावना व तिचा पराक्रम ऐकण्याविषयी आतुरता व कळकळीचे उद्‌गार निघू लागले.

केसरीमधील पंडित वसंतराव यांच्या व्याख्यानाचे ते वृत्त झाशीची राणी लक्ष्मीबाई ह्यांचे दत्तकपुत्र श्रीमंत दामोदरराव झाशीवाले यांच्या वाचनात आले. ते प्रत्यक्ष राणीचे दत्तकपुत्र असल्याने राणीसंबंधी विशेष खरी माहिती त्यांना असणे स्वाभाविक होते. त्यांना केसरीतील व्याख्यानाबाबतचे कपोलकल्पित वृत्त वाचून अतिशय दुःख झाले. ते नुसते दुःख करून थांबले नाहीत तर त्यांनी केसरी वृत्तपत्रास पत्र पाठवले. त्यात त्यांनी राणीविषयी गैरसमज नाहीसा व्हावा म्हणून या सर्व गोष्टी असत्य असून पंडित वसंतराव यांच्याकडे काही पुरावा असल्यास तो सादर करावा असे जाहीर आव्हान दिले.

हे पत्र पाहिल्यावर केसरीकारांनी श्रीमंत दामोदरराव यांची माफी मागितली. हा माफीचा प्रकार पाहून पंडित वसंतराव आता काय करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले. दुर्दैवाने त्यांच्याकडे काहीच पुरावा नव्हता. त्यांनीपण २३ सप्टेंबर १८९० रोजी केसरीतून श्रीमंत दामोदरराव यांची जाहीर माफी मागितली.

लोकमान्य टिळकांनी झाशीच्या राणीच्या दत्तकपुत्राची माफी मागितली खरी, पण तेव्हापासून त्यांना झाशीच्या राणीसंबंधाने खरा इतिहास प्रसिद्ध व्हावा अशी तळमळ लागली. साधारण त्याच सुमारास साताऱ्याहून इतिहासकार दत्तात्रेय बळवंत पारसनीस 'महाराष्ट्र कोकीळ'नामक मासिक प्रकाशित करत. त्यामध्ये त्यांनी 'झाशीच्या राणीचा संक्षिप्त इतिहास' असा लेख प्रसिद्ध केला होता. त्यामुळे लोकमान्य टिळकांनी पारसनीस यांच्याकडे झाशीच्या राणीचा खरा इतिहास शोधून काढून स्वतंत्ररितीने चरित्र प्रकाशित करावे असा आग्रह धरला. टिळकांप्रमाणे लोकहितवादी गोपाळराव हरी देशमुख यांनीही पारसनीस यांची पुण्यात गाठ घेतली व त्यांना झाशीची राणी लक्ष्मीबाई व इंदूरच्या अहिल्याबाई होळकर यांची चरित्रे लिहिण्याची विनंती केली.

पारसनीस यांना टिळकांनी व लोकहितवादी यांनी प्रोत्साहन दिले खरे, पण हे काम तेवढे सोपे नव्हते. झाशीच्या राणीला जाऊन ३५ वर्षे झाली होती आणि तिच्याबद्दल तिच्या नावापलीकडे काही माहिती नव्हती. झाशीमध्ये इंग्रजाची मोठी छावणी होती. बंडात झाशीच्या राणीच्या राजवाड्याची पडझड/दुर्दशा झाली होती. त्यामुळे त्यांना शेंडीपासून तयारी करावी तशी झाशीच्या राणीच्या चरित्रासाठी तयारी करावी लागणार होती.

त्यांनी ती ज्या प्रयत्नांनी व कसोशीने केली ती पाहिली तर कौतुकच वाटते. त्यांनी प्रथम राणीचे दत्तकपुत्र श्रीमंत दामोदरपंत यांना विनंती केली. दामोदररावांनी त्यांच्या स्वतःच्या अनुभवावरून तसेच राणीसाहेबांच्या बरोबरच्या वृद्ध माणसांकडून, कागदपत्रांमधील एकदोन वर्षे प्रयत्न करून पुष्कळ माहिती जमवली. ती सर्व माहिती पारसनीसांकडे पाठवून दिली. अर्थात राणीच्या मुलाकडून मिळालेली माहिती अस्सल व विश्वसनीय होतीच, तरी त्यावर पारसनीस संतुष्ट नव्हते. दामोदरपंतांनी दिलेल्या माहितीची सत्यासत्यता पडताळून पाहणे गरजेचे वाटून पारसनीसांनी चि.वि. वैद्य आणि माधवराव लेले यांच्याकडून त्याची तपासणी केली. तसेच, डायरेक्टर ऑफ लॅन्ड रेकॉर्ड्स यांच्या साह्याने बंडाच्या वेळी साक्ष हजर असलेल्या राणीच्या पदरच्या एका गृहस्थाकडून राणीसाहेबांची व झाशी संस्थानची हकिगत लिहून घेतली.



**चार्ल्स ए. किंकेड आणि बापूसाहेब पारसनीस**

राणीसाहेबांच्या सापत्र मातोश्री व बंधू अद्याप विद्यमान आहेत तसेच राणीसाहेबांची एक बहीण काल्पीजवळील करवी म्हणून गाव आहे तेथील जहागीरदारास दिलेली आहे ही माहिती समजली तेव्हा त्यांनी राणीसाहेबांचे बंधू चिंतामणराव तांबे यांना भेटून विनंती केली. त्यांनी आपल्या मातोश्री चिमाबाईसाहेब यांनी विचारून-भेटून वेळोवेळी लागेल ती माहिती आनंदाने दिली.

एवढ्यावरच समाधान न मानता पारसनीसांनी विलायतेमध्ये असलेले हिंदुस्थानचे मित्र विल्यम डी.बी. यांच्याशी संपर्क साधला आणि त्यांच्याकडून तसेच अनेक युरोपीयन गृहस्थांकडून माहिती मिळवली तसेच इंग्लीश गृहस्थ मॅलेसन अनोल्ड, सिल्वेस्टर यांचे इंग्रजी ग्रंथ वाचले. हे सर्व

झाल्यावर उत्तर हिंदुस्थानचा स्वत: प्रवास करून कानपूर, आग्रा, दिल्ली, झाशी, लखनौ इत्यादी शहरांना भेटी दिल्या.

असे म्हणतात, की सोन्याच्या खाणीत काम करणारा माणूस कणाकणाने व क्षणोक्षणी सोने गोळा करतो, तशी पारसनीसांनी झाशीच्या राणीची बारीकसारीक माहिती गोळा केली. ही प्रचंड कष्टाने जमवलेली माहिती कलात्मकतेने लिहून काढणे एवढेच काम शिल्लक राहिले. याबाबतीच पारसनीसांना ईश्वराने प्रतिभेची भरभरून देणगी दिली होती. त्याचा उपयोग करून राणीच्या पूर्वजीवनापासून सुरुवात केली. तिच्या वीरमरणापर्यंतचा साद्यंत इतिहास लिहिला. एवढेच नव्हे तर तिचे दत्तकपुत्र दामोदरराव यांच्या जीवनकथेपर्यंत झाशीच्या राणीची चटका लावणारी जीवनकहाणी इतक्या आकर्षक पद्धतीने लिहिली की ती खरीखुरी कादंबरी वाटावी.



सातारा येथील पारसनीस यांची ग्रंथालयाची इमारत

झाशीच्या राणीचे हे चरित्र वाचले की आपल्या डोळ्यासंमोर पूर्जाअर्चा, तिची दिनचर्या, तिच्या बैठकीचे वर्णन, ती करत असलेली अश्वपरीक्षा, तिची देवदर्शनाची थाटाची स्वारी, तिच्यातील दृढनिश्चय तसेच खंबीरता, लढाई जिंकण्याची जिद्द आणि तिचे प्राणार्पण हे सारे वाचताना उभे राहते यातच लेखक/चरित्रकार म्हणून दत्तात्रेय बळवंत पारसनीस यांचे यश आहे. तीनशे अडुसष्ट पानाचे हे चरित्र हातात घेतले की पुरे केल्याशिवाय खाली ठेववत नाही. हे चरित्र म्हणजे लढताना वीरमरण पत्करणाऱ्या झाशीच्या राणीला पुन्हा जिवंत करणे होय. त्यात पारसनीस पूर्णपणे यशस्वी झाले.

हे चरित्र पारसनीसांनी टिळकांना दाखवले तेव्हा त्यांना अत्यंत समाधान वाटले. त्यांनी उद्‌गार काढले, की इतिहासातील खोट्या गप्पा प्रसिद्ध केल्याबद्दल मला माफी मागावी लागली. पण असे वाचनीय व सुंदर चरित्र बाहेर येत असेल तर मी माफी मागण्यास तयार आहे. अशा प्रकारे पंडित वसंतराव यांच्या खोट्या गप्पांमधून दत्तात्रेय ब. पारसनीस यांनी झाशीच्या राणीचे खरे चरित्र निर्माण केले.

इंग्रज सरकारला दुखवायचे नाही पण राणीच्या शौर्य व कर्तृत्वाचे गुणगान करायचे अशी तारेवरची कसरत करून लिहिलेल्या चरित्रग्रंथाचे त्यावेळी सर्वांनी स्वागत केले. केसरीने त्याच्या गुणगौरवपर अग्रलेख लिहिला व पारसनीसाचे नाव महाराष्ट्रात सर्वातोमुखी झाले.

पारसनीसांची निरीक्षणशक्ती, अभ्यासूपणा, लेखनकौशल्य याचा परिचय महाराष्ट्रातील वाचकवर्गाला झाला. ते साल होते १८९४. अजूनही त्याची वाचनीयता टिकून आहे त्यामुळे २०११ साली ते पुनर्मुद्रित झाले.

या एका पुस्तकामुळे पारसनीस यांना पुढे काय करायचे त्याचा मार्ग दिसला. महाराष्ट्राच्या क्षितिजावर एका तरुण इतिहासकाराचा जन्म झाला. त्यांचा जन्म १८७० साली झाला म्हणजे तेव्हा ते फक्त चोवीस वर्षांचे होते.

मराठी राज्यातील इतिहासकार म्हणून रियासतकार सरदेसाई, वि.का. राजवाडे, न्या. रानडे या सर्व नामवंत व निष्ठावंत लोकांमध्ये 'रावबहादूर दत्तात्रेय बळवंत पारसनीस' यांचे नावही आवर्जून घ्यावे इतके त्यांचे कार्य थोर आणि वैशिष्ट्यपूर्ण होते. मराठी राज्याचा इतिहासलेखनाची व ऐतिहासिक साधने संकलित व संपादित करण्याची उज्ज्वल परंपरा त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने पुढे चालवली.

लोकमान्य टिळकांच्या सांगण्यावरून त्यांनी 'झाशीची राणी लक्ष्मीबाई'चे उत्कृष्ट चरित्र वयाच्या २४ व्या वर्षी लिहिले, आणि त्यातून त्यांना आपल्या पुढील काळाची दिशा व प्रेरणा मिळाली. वास्तविक ते साताऱ्याला राहत होते. छत्रपतींचे वास्तव्य साताऱ्यालाच असल्यामुळे त्यांचे बहुतेक लेखन मराठ्यांच्या इतिहासाशी संबंधित आहे.

एखादा तरुण मनुष्य आपल्या २५-३० वर्षांच्या कर्तृत्वाच्या काळात किती चांगले कार्य करू शकतो याचे रावबहादूर द.ब. पारसनीस हे उत्तम उदाहरण आहे.

फारसे शिक्षण नसताना मेहनत, प्रतिभा आणि इच्छाशक्ती यांच्या जोरावर त्यांनी ज्या विविध प्रकारचे कार्य केले ते बघितले, की त्यांचे कौतुक वाटते. त्यांनी अनेक संस्थांनिकाशी मैत्री केली, विशेषत: कोल्हापुरात शाहूमहाराजांशी त्यांची मैत्री होती. तसेच अनेक इंग्रज ऑफिसरांशी त्यांचा चांगला परिचय होता.

इ.स. १८१८ मध्ये दुसऱ्या बाजीरावाचा पराभव केल्यामुळे मराठी राज्य इंग्रजांच्या ताब्यात गेले. त्याला

इंग्रजांनी पेन्शन देऊन कानपूरजवळील ब्रह्मावर्ताला नेऊन ठेवले. पण त्याचवेळी शंभर वर्षांचा प्रचंड इतिहास असलेले 'पेशवे दप्तर' त्यांच्या ताब्यात गेले.

पुढे इंग्रज सरकारने १९१९ साली 'हिस्टॉरिकल रेकॉर्ड कमिशन'ची स्थापना केली. या कमिशनच्या माध्यमांतून पेशवे दप्तरातील म्हणजे (पुणे एलिनेशन ऑफिसमधील) लाखो कागदपत्रांचे वर्गीकरण करण्यात आले. त्यांची फेरिस्ते म्हणजे मार्गदर्शिका निर्माण करण्यात आली. या कार्यांमध्ये पारसनीसांचा मोठा वाटा होता. गेली ४० वर्षे इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे पेशवे दप्तरातील मूळ मोडी कागदाच्या आधारे मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास करत आहेत. पारसनीसांमुळे पेशवे दप्तरातील फेरिस्तांच्या आधारे महत्त्वाच्या कागदपत्रांचा शोध घेणे सोपे झाले आहे असे त्यांनी आवर्जून सांगितले. अनेक नवीन अभ्यासकांना पारसनीसांच्या या संशोधनकार्याचा उपयोग होत आहे.

भारतातील एक इंग्रज अधिकारी सी.ए. किंकेड यांनी १९१८ ते १९२५ मध्ये मराठ्यांच्या इतिहासाचे तीन खंड प्रसिद्ध केले. या त्यांच्या संशोधनात पारसनीसांनी बहुमोल सहकार्य केले असे त्याने स्वत:च नमूद केले आहे. पारसनीस हे स्वभावाने गोड व अजातशत्रू होते.

त्यांनी छत्रपतींच्या संग्रहातील अतिशय महत्त्वाची ऐतिहासिक कागदपत्रे, जुनी ऐतिहासिक व्यक्तींची व इतर चित्रे, दुर्मिळ नाणी, विविध प्रकारच्या वस्तू, आपले परमस्नेही मुंबईचे मोठे उद्योगपती पु.वा. मावजी यांच्या आर्थिक मदतीने मिळवले. महाराष्ट्रातच नव्हे तर देशामध्ये जिथे जिथे मराठी राज्य पोहोचले (इंदूर, ग्वाल्हेर वगैरे) तिथे तिथे जाऊन पारसनीसांनी हजारो दुर्मिळ ऐतिहासिक कागदपत्रे जमवली.

या कागदपत्रांचा अभ्यास सुरू केला. यातून कळलेल्या गोष्टी व घटना यांच्या प्रसिद्धीसाठी १८९६ साली 'भारतवर्ष' नावाचे नियतकालिक चालू केले. एक वर्षभर या मासिकातून अनेक ऐतिहासिक बखरी, ऐतिहासिक घराण्यांच्या कैफियती, त्या त्या घराण्यांच्या वंशवेली, शेकडो ऐतिहासिक मोडीपत्रांची लिप्यंतरे (भाषांतर) प्रसिद्ध केली. परंतु समाजात असणारी अनास्था व उदासीनता यामुळे नियतकालिक तोट्यात आल्यामुळे बंद करावे लागले.

परंतु इतिहासाविषयी त्यांचे प्रेम व निष्ठा अफाट होती. त्यांनी पुन्हा आठ वर्षांनी १९०८ साली 'इतिहास संग्रह' या नावाने नियतकालिक सुरू केले. आणखी आठ वर्षे ते चालवले. या आठ वर्षांत त्यांनी ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर यांचे चरित्र व पत्रव्यवहार महेश्वर दरबाराची (होळकर) बातमीपत्रे, संकीर्ण ऐतिहासिक लेखाचे दोन खंड, महादजी शिंदे यांच्याकडील पत्रव्यवहार व राजकारणं, उत्तर पेशवाईंतील मराठी राज्याचे प्रमुख नाना फडणीस यांच्या मेणवली दप्तरांतील महत्त्वाची ६००० पत्रे/ऐतिहासिक कागदपत्रे त्यांनी 'इतिहास संग्रहा'च्या माध्यमातून प्रकाशात आणली. अनेक इंग्रज अधिकारी यांच्याशी संपर्क साधून, ग्वाल्हेरच्या शिंदे घराण्याशी संपर्क साधून त्यांच्या संग्रहातील ऐतिहासिक मोडी कागदपत्रे मिळवली. ही कागदपत्रे त्यांनी पाच खंडांत प्रकाशित केली.

**श्रीमंत महाराज शिंदे घराण्याची शकावली**

रावबहादूर पारसनीसांनी १९११ साली श्रीमंत महाराज शिंदे घरायाची शकावली प्रसिद्ध केली. यामध्ये राणोजी शिंदेपासून बायजाबाई शिंदे पाटीलच्या काळापर्यंत घराण्याला मिळालेली इनाम गावे, सनदा, युद्ध, तह इत्यादी माहिती तारखेनुसार दिली. सन १९१२ साली बापूसाहेब पारसनीसांनी 'तंजावरचे राजघराणे' नावाचा ग्रंथ लिहिला.

हे सर्व लिखाण असले तरी रावबहादूर पारसनीस यांचे तत्कालीन इतिहासकारामध्ये काही वेगळे स्थान किंवा कार्य असेल तर ते म्हणजे त्यांनी ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयाची (म्युझियम) सातारा येथे केलेली स्थापना हे आहे. इ.स. १९०२ साली कोल्हापूरच्या शाहू महाराजांच्या बरोबर त्यांना सातव्या एडवर्डच्या राज्यरोहण समारंभाच्या निमित्ताने इंग्लंडला जाण्याची संधी मिळाली. तेथील ऐतिहासिक दप्तरखाते व वस्तुसंग्रहालये पाहून त्याप्रमाणे आपल्याकडे काय करता येईल याचा त्यांनी विचार केला. असेच म्युझियम मराठ्यांच्या इतिहासाचे बनवावे असे त्यांना वाटले आणि भारतात परत आल्यावर मुंबई सरकारकडे त्याबाबतचा प्रस्ताव पाठवला. या प्रस्तावला मुंबई सरकारने इ.स. १९१४ मध्ये मंजुरी दिली. परंतु त्याचवेळी पहिले महायुद्ध सुरू झाले व हे काम रेंगाळत राहिले. परंतु पारसनीस त्याचा पाठपुरावा केला व त्यांच्या प्रयत्नांना यश आले. बापूसाहेब यांना संग्रहालयाची संकल्पना, उद्दिष्टे, उपयुक्तता याची माहिती होती म्हणूनच आपल्याजवळ असणाऱ्या ऐतिहासिक कागदपत्रे, चित्रे, नकाशे याचे जतन, रक्षण व संवर्धन करण्यासाठी एक संग्रहालय असावे अशी त्यांची फार इच्छा होती. त्यादृष्टीने त्यांनी प्रयत्न केले.

पारसनीसांनी आयुष्यभर ऐतिहासिक कागदपत्रांबरोबर मौल्यवान वस्तू दुर्मिळ, ग्रंथ, हस्तलिखित पोथ्या, ऐतिहासिक चित्रे, नाणी, शस्त्रे इत्यादी सामग्री अविश्रांत श्रम करून तसेच देशभर भ्रमंती करून जमवली. आपल्या रसाळ वाणीनेही खूप

मिळवली. इ.स. १९०२ पासून खूप परिश्रम केले. पुढे ब्रिटिश सरकारने त्यांना वस्तुसंग्रहालयासाठी सातारा येथे इमारत बांधून दिली. तेथे त्यांनी जमवलेल्या सर्व वस्तूंची मांडणी केली. ३ नोव्हेंबर १९२५ रोजी मुंबईचे गव्हर्नर सर लेस्ली विल्सन यांच्या हस्ते त्यांच्या ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयाचे उद्घाटन झाले. या संग्रहात इंग्रजी-मराठी कागदपत्रे, विविध भाषांमधील ग्रंथ, नाणी, चित्रे इत्यादी नाना प्रकारच्या गोष्टी होत्या. एखाद्या माणसाला आयुष्याचे ध्येय कळले, की तो चोवीस तास मेहनत करून काय करू शकतो याचे रावबहादूर पारसनीस हे उत्तम उदाहरण आहे.


दुर्दैवाने म्युझियमच्या उद्घाटनानंतर पाच महिन्यांनी म्हणजे ३१ मार्च १९२६ रोजी सातारा येथेच त्यांचे निधन झाले. त्यांना आणखी आयुष्य मिळाले असते तर त्यांनी वस्तुसंग्रहालयाची वास्तू उत्तम प्रकारे जतन करून नवीन इतिहासाच्या अभ्यासकांची सोय अधिक चांगल्या प्रकारे केली असती. त्यांच्या इतिहास संग्राहात ५० हजारांहून अधिक कागदपत्रे आहेत. पुढे १९३९ साली ब्रिटिश सरकारने काही कागदपत्रे विकत घेतली व पुण्यात आणून डेक्कन कॉलेजमध्ये ठेवली. इतिहासात पोस्ट ग्रॅज्युएट करणाऱ्या तसेच संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचा उपयोग व्हावा हा उद्देश होता. राहिलेली कागदपत्रे व वस्तूंचे जतन त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव अमृतराव पारसनीस यांनी पन्नास वर्षे केले. शेवटी हा संग्रह १९७५ साली सध्याचे बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा युनिव्हर्सिटी या विद्यापीठाने घेतला. या विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना (संशोधनास) उपयोग होत आहे. मात्र त्याचे स्वतंत्र दालन केले असून त्या दालनास रावसाहेब पारसनीस यांचे नाव दिले आहे. त्यांच्या या अफाट कर्तृत्वाने इ.स. १९१३ साली त्यांना ब्रिटिश सरकारने रावबहादूरही पदवी देऊन त्यांचा गौरव केला.

(संदर्भ : रावबहादूर दत्तात्रेय बळवंत पारसनीस चरित्र व कार्य, दिलीपराज प्रकाशन)

**– प्रभाकर भिडे**
bhideprabhakar@gmail.com


ग्रंथाली

# सफरनामा
## निवडक कलाकारांचा
**पल्लवी पंडित**




**मूल्य ५०० रु. ❖ सवलतीत ३०० रु.**
**टपालखर्च ३० रु.**

# चाकावरची चाकरी
**सुधाकर राऊत**




**मूल्य ४०० रु. ❖ सवलतीत २५० रु.**
**टपालखर्च ३० रु.**



# तांत्रिक उत्क्रांतीचा आत्मा मायक्रोचिप्स

डॉ. अनंत लाभसेटवार

> सध्या अतिसुधारित मायक्रोचिपवर जग विसंबून आहे. प्रतिभावंत चिपसाठी एनव्हिडिया ही कंपनी जगात पुढे आहे. तिच्या स्थापनेची कल्पना स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या तीन विद्यार्थ्यांना १९९३ मध्ये एका डेनीज नावाच्या सुमार उपाहारगृहात सुचली. तिथल्या तोंड पुसायला ठेवलेल्या कागदावर प्राथमिक आराखडा काढण्यात आला. आज त्या आराखड्यातून एक ट्रिलियन डॉलरचं बाजारमूल्य असलेली एनव्हिडिया नावाची कंपनी जन्माला आली.

उद्योजकता समाजाच्या विकासासाठी आवश्यक असते असं म्हणतात. हल्ली या उद्योजकतेचा महत्त्वाचा भाग कृत्रिम बुद्धिमत्ता (Artifical Intelligence) झाला आहे. त्यामुळे उद्योगांची कार्यक्षमता व उत्पादनशक्ती वाढून पुढील दहा-बारा वर्षांत जगाच्या ढोबळ उत्पन्नात १७.७ ट्रिलियन डॉलरची भर पडेल असा एक अंदाज आहे. त्याचा ७० टक्के हिस्सा मात्र अमेरिका व चीनच्या वाट्याला जाईल. पण या AI चा पाया म्हणजे ॲडव्हान्स मायक्रोचिप व सुपरकॉम्प्युटर. या दोन्ही घटकांमध्ये सध्या अमेरिका अग्रणी असून तिनं चीन पुढे येऊ नये म्हणून विशेष पावलं उचललीत. एक काळ असा असे की देश वादग्रस्त भूखंड किंवा तेलासाठी युद्ध पुकारीत. आता या द्वंद्वांचा केंद्रबिंदू मायक्रोचिप झाला आहे. या बाबतीत अमेरिकेनं ऑक्टोबर ७, २०२२ रोजी चीनविरुद्ध युद्ध पुकारलं आणि त्या लाल देशाची गळचेपी झाली. दोन देशातील राजनैतिक संबंध तळाला जाऊन त्यांनी ऐतिहासिक नीचांक गाठला. अध्यक्ष क्सी विनपिंगनी ज्यो बायडनचे फोन घेणं बंद केलं आणि गैरसमज होऊ नये म्हणून संदेशवहन मोकळं ठेवण्यासाठी बायडननी हात पुढे केला असता त्याकडे पाठ फिरवली.

**मायक्रोचिप्स म्हणजे काय**

या चिप्स म्हणजे असंख्य ट्रांझिस्टरची विशिष्ट मांडणी. ते सूक्ष्म जिवाणूंच्या (Virus) आकाराचे म्हणजे मानवी डोळ्यांना अगोचर. त्यांचा शोध अमेरिकेत १९५०च्या दशकात लागलाा. हे ट्रांझिस्टर म्हणजे संगणकीय भाषेची अक्षरच. त्यांच्या रचनेतून कथा-कादंबऱ्यांचं नव्हे तर आपण क्लिष्ट गणितांची उत्तरं प्राप्त होऊ शकतो. म्हणून त्यांच्या डिझाईनसाठी कमालीची प्रतिभा लागते. हे सगळं डोक्याचं काम प्रामुख्यानं सिलिकॉन व्हॅलीमध्ये होतं. हे अब्जावधी ट्रांझिस्टर एका फलकावर लावून त्यांचा समूह म्हणजे पोस्टाच्या तिकिटाच्या आकाराची चौकोनी चकती. तिला मायक्रोचिप्स म्हणतात. परवाला सिलिकॉन व्हॅलीमधल्या एका उद्यमारंभी कंपनीनं तर सुपरकम्प्युटरसाठी ताटाच्या आकाराची मायक्रोचिप तयार केली.

सर्वसामान्य काम करण्यासाठी बाजारात मिळणाऱ्या चिप चालतात, पण विशेष उद्दिष्ट पूर्तीसाठी खास चिप डिझाईन करावं लागतं. चॅटजिपीटी विकसित करण्यासाठी तिचा जनक ३७ वर्षीय सॅम आल्टमननं दहा हजार अतिसुधारित मायक्रोचिप वापरल्या म्हणे.

कृत्रिम प्रज्ञेमुळे अशा चिपची मागणी वाढतच राहील हे उघड आहे. काही अल्गोरिदम विकसित करण्यासाठी एक ट्रिलियनपेक्षा जास्त बदलती परिमाणं (Variables) लक्षात घ्यावी लागतात. त्यासाठी प्रचंड गणितीय क्षमता व सुधारित चिप लागतात. आयफोनसाठी ॲपल कंपनी स्वत:

डिझाईन केलेल्या चिप वापरते. तसंच गूगल, ॲमेझॉन किंवा मायक्रोसॉफ्टसारख्या कंपन्या करतात. त्यांचं वेगळेपण त्या अतिसूक्ष्म ट्रांझिस्टरच्या मांडणीत असतं. आजच्या साध्या आयफोनसाठी सुमारे २२ अब्ज असे ट्रांझिस्टर असलेल्या मायक्रोचिप लागतात. त्यांचं काम एकच. ते म्हणजे उघडझाप करणं. त्यातून वीज गेली की सर्किट उघडतं आणि संगणकाला 'एक' या आकड्याचा बोध होतो. तसंच ते बंद झालं की त्याला शून्य या आकड्याची आठवण होते. केवळ ० व १ हे दोन आकडे वापरून संगणक यंत्र क्लिष्ट गणितं करू शकतं. फरक एवढाच की ही क्रिया नॅनोसेकंदापेक्षा कमी वेळात होते.

हे ट्रांझिस्टर वाळूच्या कणावर कोरण्याचं काम लेझर (Laser)च्या साहाय्यानं ASML नावाच्या कंपनीचं यंत्र करते. ते नेदरलँड या देशात एक लाखापेक्षा जास्त सुटे भाग जुळवून करण्यात येतं. आज हे यंत्र दुसरा कुठलाच देश बनवू शकत नसल्यामुळे त्याला पुढे निर्देशित केलेले राजकीय रंग लाभले आहेत. सद्य:काळी हे ट्रांझिस्टर एकमेकांपासून १०-१४ नॅनोमीटर अंतरावर कोरले जातात. पण हे आता ४-५ नॅनोमीटरवर बसवण्याचा प्रयत्न सुरू आहे. (मानवी केसाचा व्यास ८०,००० ते १००,००० नॅनोमीटर). हेतू हा की जास्तीत जास्त माहिती किंवा आकडेवारी एका चिपवर बसवून गणितीय क्षमता वृद्धिंगत करणं. इथे Moore's Law लागू पडतो. त्या सिलिकॉन व्हॅलीतल्या शास्त्रज्ञानं संगणकाची गणितीय क्षमता दर दोन वर्षांनी दुप्पट होईल व कम्प्युटर वापरण्याचा खर्च कमी होईल असा सिद्धांत मांडला होता. आतापर्यंत तो खरा ठरला.

तर हे सर्किट वाळूच्या कणावर व महाभारताचे ८९,००० श्लोक तांदळाच्या दाण्यावर कोरण्याचं काम सारखंच म्हणावं लागेल. या सिद्धांतानुसार गणितीय क्षमतेत जेवढी प्रगती झाली तेवढी विमानाच्या वेगात झाली असती तर त्यानं प्रकाशाच्या वेगापेक्षा (तासी ६७.१ कोटी मैल) जास्त वेगानं प्रवास करून आइनस्टाइनच्या एका सिद्धाताचं उल्लंघन केलं असतं. त्यानुसार विश्वात कुठलीच गोष्ट प्रकाशाच्या वेगापेक्षा जास्त गतीनं धावू शकत नाही.

त्या चिप डिझाईन करण्यास जे डोकं लागतं ते चीनमध्ये अपुरं पडतं. ही बुद्धिमत्ता सिलिकॉन व्हॅलीमध्ये एकवटली आहे. तिचं वैशिष्ट्य म्हणजे AI वर काम करणारे ७५ टक्के अभियंते परदेशी. त्यातले बरेच भारतातून आलेले हे ओघानं आलंच. त्यांनी रेखाटलेल्या आराखड्यावरून चिप बेतल्या जातात. त्यासाठी खास कौशल्य व अब्जावधी डॉलरची गुंतवणूक लागते. ही क्षमता फार कमी देशात आढळते. या बाबतीत तैवान जगात सर्वात पुढे आहे. तैवान सेमीकंडक्टर मॅन्युफॅक्चरिग कंपनी (TSMC) जगातले ९० टक्के अतिसुधारीत अर्धवाहक (Semi Conductors) तयार करते. तिथली दुसरी कंपनी म्हणजे भारतात पंख पसरवणारी फॉक्सकॉन (Foxconn). दक्षिण कोरियातली सॅमसंगही (Samsung) प्रसिद्ध आहे. चीन संख्यात्मक बाबतीत पुढे असला तरी गुणात्मक दृष्टीनं तो बराच मागे आहे. त्याच्या चिप फोनसाठी किंवा वाहनासाठी ठीक आहेत. परंतु AI साठी त्या कमी पडतात. बायडेननी हा पुरवठा खंडित केल्यामुळे चीनच्या प्रगतीवर कुऱ्हाड पडली. चीन आतापर्यंत तरी अत्याधुनिक चिप बनवण्यात असमर्थ ठरला आहे.

उद्या तैवान युद्ध सुरू झालं आणि तिथल्या कारखान्यांना हानी पोचली तर काय होईल? औद्योगिक जग अपंग होऊन अर्थकारण कोलमडून जाईल. या जात्यात चीनदेखील भरडला जाईल. कारण जग त्याची निर्यात विकत घेण्यास असमर्थ झालं तर त्या देशाचं अर्थकारणदेखील कोसळून पडेल. म्हणून अतिसुधारित मायक्रोचिप ही युद्ध टाळण्यास रेतीची एक ढाल समजण्यात येते. हे ओळखून बायडेन शासनानं तैवानच्या TSMC कंपनीला अमेरिकेत कारखाने उघडण्याचं आमंत्रण देऊन अब्जावधी डॉलरचं अनुदान व सुविधा दिल्या. कंपनीनं ॲरिझोना या राज्यात ४० अब्ज डॉलर गुंतवून दोन कारखाने बांधण्याचं काम २०२१ मध्ये सुरू केलं आणि २०२४ मध्ये उत्पादन सुरू करण्याचं उद्दिष्ट जाहीर केलं. परंतु या कामासाठी जे खास कौशल्य लागतं ते अमेरिकेत नसल्यामुळे योजना रखडली. आता अमेरिकन कर्मचारीही प्रशिक्षणार्थ तैवानला पाठवून ज्ञानगंगा उलटी वाहणार आहे किंवा तिथले प्रशिक्षक अमेरिकेत येऊन ते कर्मचाऱ्यांना शिकवतील.

सध्या अतिसुधारित मायक्रोचिपवर जग विसंबून आहे. प्रतिभावंत चिपसाठी एनव्हिडिया (Nvidia) ही कंपनी जगात पुढे आहे. तिच्या स्थापनेची कल्पना स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या तीन विद्यार्थ्यांना १९९३ मध्ये एका डेनीज (Denny's) नावाच्या सुमार उपाहारगृहात सुचली. तिथल्या तोंड पुसायला ठेवलेल्या कागदावर प्राथमिक आराखडा काढण्यात आला. आज त्या आराखड्यातून एक ट्रिलियन डॉलरचं बाजारमूल्य असलेली एनव्हिडिया नावाची कंपनी जन्माला आली. २०२२ मध्ये कंपनीनं २७ अब्ज डॉलरच्या चिप विकून ४.२ अब्ज डॉलरचा नफा कमावला. तिची वाटचाल खडतर होती. अनेकदा ती नादारीच्या काठावर उभी राहिली. तिची सुटका झाली ती तिनं लावलेल्या एका शोधामुळे.

संगणक यंत्राचा मेंदू म्हणजे सीपीयू (Central

Processing Unit). तिथे त्या यंत्रात भरलेल्या विदावर गणितीय प्रक्रिया होऊन उत्तरं फलकावर दिसतात. पण एनव्हिडिया कंपनीनं ग्राफिक प्रोसेसिंग युनिट (Graphic Processing Unit, GPU) शोधून काढलं. त्यामुळे चित्रफीत, कार्टून, आलेख काढणं शक्य झालं. या शोधामुळे व वाढत्या गणितीय क्षमतेमुळे कंपनीची आर्थिक स्थिती स्थिर होऊन तिनं भरारी घेतली. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात या GPU ला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे नोव्हेंबर २०२२ मध्ये चॅटजीपीटी व त्यानंतर अवघ्या चार महिन्यांनी जीपीटी-४ च्या घोषणा होताच अतिसुधारित मायक्रोचिपची मागणी अक्षरश: गगनाला जाऊन भिडली. कुठलंही स्थित्यंतर विचारप्रेरित नसून उदरप्रेरित असतं. या नवीन क्षेत्राचे उद्योग विकसित करून अर्थनिर्मिती करण्यासाठी सिलिकॉन व्हॅलीत, युरोपमध्ये, भारतात व चीनमध्ये उद्यमारंभी कंपन्यांचं पेव फुटलं आहे. ही वाढलेली मागणी एनव्हिडिया कंपनीला संजीवक ठरली.

कृत्रिम प्रज्ञेमुळे मानवी सभ्यतेत अल्पकाळात क्रांतिकारक बदल झाले यात शंका नाही. त्याचं एक उदाहरण म्हणजे जीवनसाथी निवडणं. अमेरिकेतली तरुण पिढी एक तर कामव्यग्र नाहीतर फोनमग्न असल्यामुळे त्यांना प्रियाराधनासाठी बाहेर जाण्यास वेळ नसतो. जेवणासदेखील ते घराबाहेर पडत नाही. ते जेवण उपाहारगृहातून मागवतात. अशा लोकांजवळ पैसा असला तरी वेळ नसतो. म्हणून त्यांच्यासाठी भारतात प्रेम शोधणाऱ्यांसाठी जसं शादी डॉट कॉम नावाचं संकेतस्थळ आहे तशी अनेक संकेतस्थळं अमेरिकेत स्थापन झाली. ते इच्छुक तरुणतरुणींच्या अपेक्षा लक्षात घेऊन त्यांचे निकष जुळवतात. म्हणजे आपल्या पंचांगाचं काम कम्प्युटर करतात. त्यामुळे सोयरीक होतेच असं नाही, पण योग्य जीवनसाथी मिळण्याची शक्यता वाढते. यात एकच अडचण आहे. ती म्हणजे यश येवो न येवो ग्राहकांना प्रत्येकी पंधरा ते तीस हजार डॉलर (१२ ते २४ लाख) फी भरावी लागते.

त्यासाठी AI वापरलं तर? सेकंदाला ट्रिलियन गणितं करण्याची सवय असलेल्या AI ला दोन प्रेमळ जिवांची जुळवणूक करण्याचं काम सांगणं म्हणजे त्याच्या अकलेचा अपमान करण्यासारखं होईल. पण आता तसं होत आहे. महत्त्वाचं म्हणजे ते नाममात्र खर्चात होतं. याचा अर्थ अमेरिकेनं देशाचं संरक्षणच नव्हे तर मंगलकार्य त्या मायक्रोचिपवर सोपवलं असा नव्हे का? पण अतिसुधारित चिपवर त्या देशाची मक्तेदारी असल्यामुळे व अशा चिपना असामान्य महत्त्व लाभल्यामुळे एनव्हिडियाला मोक्ष मिळाला. तिचा आज कार्यकारी मुख्याधिकारी (CEO) जेन हसून (Jen Hsun) नावाचा सहसंस्थापक असून त्याचा जन्म तैवानमध्येच झालेला आहे. तो लहान असताना आईवडिलांबरोबर अमेरिकेला आला. आज अतिसुधारित मायक्रोचिपचा ९० टक्के पुरवठा या एका कंपनीकडून होतो. पण स्पर्धा सारखी वाढत आहे. ही व इतर कंपन्या आपल्या विशिष्ट गरजा पूर्ण करण्यासाठी लागणाऱ्या चिपची ऑर्डर प्रामुख्यानं TSMC कंपनीला देतात. त्या बनल्यानंतर ग्राहकांना विकण्याचं काम अमेरिकन उद्योग करतात.

**मायक्रोचिप्स व राजकारण**


आज अतिसुधारित अर्धवाहकांचा उपयोग अनेक क्षेत्रात वाढला आहे. अतिवेगाचं क्षेपणास्त्र (Hypersonic Missles), F-35 हे जगातलं सर्वाधिक सुधारित लढावू विमान, उपग्रह, रणगाडे, पाणबुड्या वगैरे शस्त्रं अधिक विकसित करणं या चिपशिवाय अशक्य. चालकरहित स्वयंचलित वाहनांसाठी तर या चिप म्हणजे प्राणवायूच. संगणकात त्या वापरून त्याची गणितीय क्षमता व चित्र प्रक्रियित करण्याची शक्ती वाढवण्यात येते. त्यामुळे असं म्हटलं जातं की जे राष्ट्र या मायक्रोचिप विकासाच्या व बांधणीच्या क्षेत्रात पुढे असेल ते जगावर प्रभुत्व गाजवेल. चीन व अमेरिकेत अतिसुधारित मायक्रोचिपसाठी तीव्र स्पर्धा सुरू झाली आहे. कृत्रिम प्रज्ञा व पूंजगणित (Quantitative Computing) हे आज गाभ्याचे विषय समजले जात असून त्यात कमालीची चुरस सुरू झाली आहे. त्याचा आत्मा या अतिसुधारित मायक्रोचिप असल्यामुळे ऑक्टोबर ७, २०२२ रोजी अमेरिकेनं घातलेली बंदी युद्धसदृश समजण्यात येते. त्यामुळे चीनची नाकेबंदी होऊन त्यानं छातीपीट केली. अध्यक्ष क्सी विनपिंग एवढे रुसून बसले की चीननं स्वत:हून अशा चिप निर्माण करण्याचा विडा उचलला. चीन २०२५ नावाची योजना स्थापन करून तिच्यात अब्जावधी डॉलर ओतले. सिलिकॉन व्हॅलीतल्या शास्त्रज्ञांना पैशाचं आमिष दाखवून घरी बोलवण्याचे प्रयत्न केले. तसंच तैवाममधील संशोधकांवर धाड घातली. हे सर्व अमेरिकेला



चांगलं ठाऊक. म्हणून बायडन शासनानं ते कठोर पाऊल उचललं आणि चीनमध्ये हाहा:कार माजला.

ही बंदी एवढी व्यापक आहे की तीमुळे चीनची गळचेपी झाली. एनव्हिडियाच्या मायक्रोचिप्स अनुपलब्ध होताच चीननं पळवाट शोधून काढली. अमेरिकेच्या क्लाऊड कंपन्यांची (Amazon, Google, Microsoft) सेवा उपयोगात आणण्यास सुरुवात केली. त्या कंपन्यादेखील त्याच अतिसुधारित चिप वापरत असल्यामुळे चीननं ती सोय वापरली. ते कळताच अमेरिकेनं त्यावरही बंदी घातली आणि त्या लाल देशाला प्रगतीपासून वंचित ठेवलं. अमेरिका आमच्या देशाला वर येण्यास अडसर आणत आहे असा घणाघाती आरोप क्सी विनपिंगनी केला आणि आपली अमेरिकेशी असणारी वागणूक पार बदलली. हा आरोप बिनबुडाचा नव्हता कारण २०१९ मध्ये ट्रंपनी संदेशवहन क्षेत्रात जगात सर्वात मोठी असलेल्या व्ह्यूवे (Huawi) नावाच्या कंपनीला मायक्रोचिप्सचा पुरवठा बंद केला आणि पुढील एका वर्षात कंपनीचा खप ७० टक्के घटला. तिच्या सोंडा जगभर पसरल्या असल्यामुळे व्ह्यूवे ही कंपनी साम्यवादाच्या यशाची पताका म्हणून क्सी विनपिंग टेंभा मिरवीत. ट्रंपनी एका कंपनीला ठेचलं तर तिची अशी गत झाली. बायडन शासनानं उभ्या देशावर गदा पाडली म्हणून त्याच्या अमेरिकेच्या पुढे जाऊन जागतिक नेतृत्व करण्याच्या स्वप्नांचं काय झालं असेल याचा विचारच केलेला बरा.

खुद्द चीनचे नव्हे तर अमेरिकेचे अर्थतज्ज्ञ म्हणत की २०३०पर्यंत चीन या महासत्ताक राष्ट्राला तंत्रज्ञानाच्या बाबतीत मागे टाकून पहिला नंबर पटकावेल व साम्यवाद लोकशाहीपेक्षा श्रेष्ठ आहे असं सिद्ध करेल. पुतनिक उपगृह अवकाशात पाठवल्यावर सोव्हियत युनियनविषयी डावे असंच म्हणत. पण मायक्रोचिपचं ब्रह्मास्त्र वापरून अमेरिकेनं त्या सर्वांना खोटं पाडलं. आता हे तज्ज्ञ खजील होऊन त्यांनी मान खाली घातली. याचा अर्थ चीन पुढे जाणार नाही असा नव्हे. व्ह्यूवे कंपनीनं नंतर स्वत:च्या मायक्रोचिप व यंत्रणा विकसित करून बरंचसं नुकसान भरून काढलं. चीनही तसंच करेल यात शंका नाही. तसं करण्यास काही वर्षं लागतील. त्या काळात अमेरिका व चीनमध्ये अनुल्लंघनीय अंतर निर्माण होईल. अमेरिकेच्या नियामक अधिकाऱ्यांनी तर म्हटलं की या मायक्रोचिपच्या बंदीमुळे चीन एवढा घायाळ झाला की त्याला पुन्हा आखाड्यात उतरण्यास एक नव्हे तर अनेक पिढ्या लागतील.



एनव्हिडीयासह सर्व चिप बनवणाऱ्या कंपन्यांच्या निर्यातीवर गदा तर पडलीच, पण चिनी कर्मचाऱ्यांच्या स्थलांतरावर संकट कोसळलं. जो कुणी मदत करण्यास चीनला जाईल त्याचं कष्टानं मिळवलेलं अमेरिकन पारपत्र किंवा ग्रीन कार्ड रद्द करण्याच्या धमकीमुळे मायदेशी परतणाऱ्या चिनी शास्त्रज्ञांच्या लढ्याला खीळ बसली. या शिवाय त्या देशातून अमेरिकेच्या ज्ञानगंगेत न्हाऊन निघण्यासाठी जे विद्यार्थी येतात त्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता व पूंजगणित यासारख्या संवेदनाशील विषयात अभ्यास करण्यास व्हिसा देणं बंद केलं. हेतू हा की अशा विद्यार्थ्यांपासून चीन ज्ञानसंपन्न होऊ नये. याशिवाय नेदरलँडच्या त्या ASML नावाच्या मायक्रोचिप बनवण्यास लागणाऱ्या यंत्राची निर्यातही बंद करण्यात आली. ते क्लिष्ट पण अनिवार्य असलेलं यंत्र चीन बनवू शकत नसल्यामुळे चीनची कोंडी झाली. याप्रमाणे ज्ञानगंगा आटल्यामुळे चीन अनेक पिढ्या मागे पडून अमेरिकेशी बरोबरी करू शकणार नाही असं शासकीय अधिकाऱ्यांनी जे भाकीत केलं ते खरं वाटतं.

**भारत आणि मायक्रोचिप्स**

या दोन शब्दांत एवढं अंतर असे आणि आहे की त्याचं एकाच वाक्यात नामोच्चार करणं हास्यास्पद व निषिद्ध सम जण्यात येई. पण भविष्य मायक्रोचिपधिष्ठित आहे हे ओळखून भारतानं अलीकडे या क्षेत्रात पहिलं पाऊल उचलण्यासाठी ठोस निर्णय घेतला. आपल्या देशात मायक्रोचिप तयार होत नसत. अजूनही ते खरं आहे. पण सरकारनं परदेशी कंपन्यांना देशात येण्यासाठी पैशांचं गाजर दाखवलं. त्यासाठी दहा अब्ज डॉलरचा निधी राखून ठेवला. त्या गळाला एक दोन मासे लागून करार करण्यात आले. मोठ्या कष्टानं आपण ॲपल

कंपनीला देशात आयफोन तयार करण्यास बोलावलं व चीनशी स्पर्धा सुरू केली. आज ती कंपनी जगभर जे फोन्स बनवते त्याचा ७ टक्के हिस्सा भारतात तयार होतो. त्यामुळे देशाला सात अब्ज डॉलरचं परदेशी चलन मिळतं. यात ॲपलच्या अतिसुधारित आयफोन-१४ चा समावेश होता. इथे आपण मनगटाचं काम करतो. डोक्याचं काम अमेरिकेत केलं जातं.

सध्या या सर्व फोनसाठी लागणाऱ्या मायक्रोचिप आयात केल्या जातात. त्यांची निर्मिती देशात व्हावी म्हणून भारतानं प्रथम मायक्रॉन (Micron) नावाच्या अमेरिकन कंपनीशी वाटाघाटी केल्या. ही मायक्रोचिप बनवणारी एक मोठी कंपनी समजली जाते. तिचे कारखाने चीनमध्येदेखील आहेत, पण साम्यवादी सरकारनं तिच्यावर बंधनं लावून तिची कोंडी केली. भारतात तिचं पायघड्या घालून स्वागत करण्यात आलं. तिला देशात आणण्यासाठी जो नजराणा द्यावा लागला तो अनेकांना अचंबित करण्यासारखा वाटला. फॅक्टरी उभारण्यासाठी एकूण २.७५ अब्ज डॉलर खर्च येणार असून कंपनी स्वत:चं फक्त ३० टक्के भांडवल (म्हणजे ८२५ दशलक्ष डॉलर) त्यात ओतणार आहे. उरलेलं ७० टक्के भारत सरकार भरणार. त्यातला ५० टक्के भार केंद्रीय सरकार आणि २० टक्के गुजरात सरकारच्या खिशातून येत आहे. सध्या कारखान्याची बांधणी सुरू असून २०२५ मध्ये उत्पादन उपलब्ध होईल. त्यासाठी कच्छ भागात कंपनीला जमीन मिळाली असून अशा कारखान्याला जो प्रचंड जल व वीजपुरवठा लागतो त्यांची सोय करण्यात आली.

बांधणी संपल्यावर तो कारखाना १०० टक्के कंपनीच्या मालकीचा होईल. हा एकतर्फी व्यवहार बघून विरोधी पक्षानं टोले मारले. त्याऐवजी आपल्या आयटी मंत्रालयावर ती जबाबदारी सोपवली तर कितीतरी भांडवल वाचलं असतं असं वरकरणी वाटणं साहजिक आहे. यातली गोम अशी की एवढी मोठी क्लिष्ट व यांत्रिक कौशल्य लागणारी योजना सरकारवर सोपवणं म्हणजे वास्तवावर देशनिष्ठेनं कुरघोडी करण्यासारखं. त्यातून मायक्रोचिपऐवजी भ्रष्टाचार निर्माण होण्याची शक्यता जास्त. त्यामुळे अननुभवी सरकारी मंत्रालय योजना वेळेवर व ठरावीक पैशांत पूर्ण करण्याची शक्यता उद्या देशात उल्कापात होण्यापेक्षा कमी. हे लक्षात घेऊन मोदींनी हे काम खाजगी क्षेत्रात ठेवलं. ती योजना एकदा पूर्णत्वास आली की दुसऱ्या अनेक कंपन्यादेखील देशात येतील हे उघड आहे. या योजनेतून ५००० भारी पगारवाल्या नोकऱ्या पैदा होऊन आपले कर्मचारी हे कौशल्य संपादन करतील. महत्त्वाचं म्हणजे देशाच्या निर्यातीत काही वर्षांत ६२ अब्ज डॉलरपेक्षा जास्त भर पडेल असा अंदाज आहे.

मायक्रोचिपबांधणीचे पाच टप्पे असतात. त्यातला पहिला म्हणजे चिपचे आराखडे तयार करणे. हे डिझाईन म्हणजे डोक्याचं काम. त्यातलं बरचसं भारतीय तज्ज्ञ सिलिकॉन व्हॅलीमध्ये करतात. कालांतरानं मायक्रॉन कंपनी किफायतशीर म्हणून भारतात स्थलांतरित करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्या लेखाशास्त्र, वास्तुशास्त्र व विधिशास्त्राची अनेक वेळखाऊ कामं भारतात केली जातात. त्यामुळे अमेरिकन कंपन्या कितीतरी पैसे वाचवतात.

त्यातला दुसरा टप्पा म्हणजे बांधणी. त्यादेखील खास कौशल्य लागतं. शिवाय त्यासाठी खास मंत्रणालेखन (Software writing) करावं लागतं. तिथे आपल्याशी जगातला कुठलाच देश स्पर्धा करू शकत नसल्यामुळे हे लेखन सिलिकॉन व्हॅलीमध्ये भारतीय अभियंते वापरून करणं म्हणजे कोळसा बल्लारशाला नेण्यासारखं होईल. आपले अभियंते कॅलिफोर्नियातल्या सिलिकॉन व्हॅलीमध्ये यशस्वी झाले तर ते गुजरातमधल्या ठेपला व्हॅलीत बाजी कशावरून मारणार नाहीत?

तिसरा टप्पा म्हणजे तयार झालेल्या चिपची योग्यतेसाठी पडताळणी करणं. हे काम आपल्याला आत्मसात करता आलं की मायक्रॉन इतर देशात तयार केलेल्या मायक्रोचिप भारतात त्यासाठी पाठवेल यात शंका नाही. एक उदाहरण म्हणजे चीनमध्ये सरासरी पगार वर्षाला १५,००० डॉलर (१२.५ लाख रुपये) तर भारतात फक्त ३००० डॉलर (अडीच लाख रुपये) आहे. म्हणजे चीनमध्ये तयार झालेल्या चिपची चाचणी भारतात केल्यानं पाच पट खर्च वाचेल. हे गणित जेवढं उघड तेवढंच मायक्रॉनसाठी फायदेशीर आहे.

चौथा टप्पा म्हणजे पॅकिंग. अर्थातच हे वर्तमानपत्राच्या कागदात चहाच्या पत्तीची पुडी बांधण्यापेक्षा जास्त डोक्याचं काम आहे. तिथे मंत्रणेनुसार या मायक्रोचिपचा क्रम लावून त्यांची मांडणी करावी लागते. त्याला डोक्यापेक्षा मनगटशक्ती जास्त लागते.

शेवटचा पाचवा टप्पा म्हणजे विपणन (मार्केटिंग). ते मायक्रॉन अमेरिकेत करेल.

याप्रमाणे वेगवेगळी कौशल्यं उत्पादकरित्या एकत्र आणून यश मिळवावं लागतं. थोडक्यात म्हणजे मायक्रोचिप हे उत्पादन अनेक कौशल्यवान लोकांच्या समन्वयित प्रयत्नांचा आविष्कार आहे हे मायक्रॉनला चांगलं ठाऊक आहे. दिल्लीतल्या बाबूंना ते कधीच जमणार नाही.

मग मोदींनी जून २०२३ मध्ये वॉशिंग्टनला भेट देताना फॉक्सकॉन या जगातली सर्वात मोठं तैवानी कंत्राट कंपनी

व लंडनस्थित अनिल अग्रवालची वेदांत कंपनी यांच्या भागीदारीला भारतात मायक्रोचिप बनवण्याच्या योजनेला हिरवा कंदील दाखवला. ते तसं करण्यास उद्युक्त होण्याचं कारण म्हणजे त्या दहा अब्ज डॉलरच्या निधीतून मिळणारी आर्थिक मदत. या युतीला मायक्रॉन कंपनीएवढ्या सवलती मिळाल्या नाहीत. त्यानंतर या दोन कंपन्यांची काडीमोड झाली. त्यामुळे भारतात कारखाने उघडण्याच्या उद्दिष्टाला वाटाण्याच्या अक्षता लागल्या नाहीत हे विशेष. आता त्या दोन कंपन्या वेगळे सहकारी शोधून स्वतंत्रपणे कारखाने बांधण्याच्या मार्गावर आहेत. मोदींच्या गाजराचं आकर्षण एवढं दांडगं ठरलं की त्यांनी माघार घेण्याचं नाकारलं. फॉक्सकॉनच्या मायक्रोचिप ॲपल कंपनीच्या आयफोनमध्ये वापरण्यात येतील. त्यामुळे तिला वेगळ्या बाजारपेठा शोधण्याची जरुरी नाही.

आपल्या देशात निर्माण होणाऱ्या मायक्रोचिप एनव्हिडिया कंपनीएवढ्या अतिसुधारित नसतील हे आज खरं असलं तरी भविष्यात ते बदलेल यात शंका नाही. मोदींनी दहा अब्ज डॉलरची उद्युक्तं (Incentives) दाखवून भारताला प्रथमच मायक्रोचिपच्या जगात स्थान मिळवून दिलं. तुलनेनं चीनमध्ये क्सी विनपिंगनी 'China 2025' नावाच्या योजनेसाठी पंचवीस अब्जांपेक्षा जास्त आणि बायडेननी मायक्रोचिप कायद्याखाली खाजगी कंपन्यांना ३८.५ अब्ज डॉलरच्या देणग्या देण्याच्या योजना आखल्या. याशिवाय अमेरिकन सरकार अशा कंपन्यांना स्वस्त दरात कर्ज किंवा कर्जाची हमी देणार. हे भांडवलशाहीला वर्ज्य समजण्यात येतं, कारण त्या राज्यप्रणालीत सरकारऐवजी बाजारपेठीय शक्ती महत्त्वाची असते. ही पथ्यं बायडेननी मोडली. यावरून हे क्षेत्र किती महत्त्वाचं आहे हे सिद्ध होतं. म्हणून आपण दहा अब्जांचा फाजील व्यय केला असं कोण म्हणेल?

गेल्या काही वर्षांत चीननं अनेक प्रकल्प मायक्रोचिपच्या क्षेत्रात सुरू करून त्यावर अब्जावधी डॉलर खर्च केले. न्यू यॉर्क टाइम्सनुसार यातल्या किमान सहा योजना बारगळल्या. त्याचे मुख्याधिकारी भ्रष्टाचार केला म्हणून सरकारच्या चौकशीच्या जाळ्यात अडकले आहेत. अनेक अननुभवी कंपन्यांनी अनुदान मिळावं म्हणून अर्ज केले. काहींनी खोटी माहिती दिली.

चीननं आजपावेतो जे बळ जागतिक पातळीवर दाखवलं ते जवळजवळ सर्व अमेरिका नियंत्रित अतिसुधारित मायक्रोचिपवर अवलंबून होतं. म्हणजे या बाबतीत त्या देशाची शेंडी अमेरिकेच्या हातात होती. याप्रमाणे तो लाल देश शोकमनस्क (Vulnerable) आहे असंच म्हणावं लागेल.

**– डॉ. अनंत पा. लाभसेटवार**

anantlabh@gmail.com


ग्रंथाली


# चॉईसेस

आत्मकथन

**लिव्ह उल्मन**

स्वैर अनुवाद

**मृणाल कुलकर्णी**




**मूल्य ३५० रु.**
**सवलतीत २०० रु.**
**टपालखर्च ३० रु.**

लिव्हसारखी अत्यंत संवेदनशील अभिनेत्री, तिचे आगळेवेगळे आयुष्य, त्यातले भावनांचे अनेक चढउतार, गुंतागुंतीची नाती – याबद्दल तिला नेमके काय म्हणायचे आहे, हे समजून घेऊन ते शब्दबद्ध करणे हे अत्यंत अवघड काम, पण मृणालने ते अप्रतिमरित्या पार पाडले आहे. यातला सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ते लेखन कुठेही अनुवाद वाटत नाही. मला तर हा मृणालने घेतलेला लिव्ह उल्मन या स्त्रीचा अनुभव वाटतो. एका अभिनेत्रीला, स्त्रीला, आईला, प्रेयसीला आणि व्यक्तीला जाणून घेताना, जणू परकायाप्रवेश करून मृणालने लिव्ह आपल्यापर्यंत पोहोचवली आहे.

**– डॉ. मोहन आगाशे**



# शिक्षणातील बदलते प्रवाह

रेणू दांडेकर

समाजात निर्माण झालेल्या अनेक प्रश्नांची पाळंमुळं शिक्षणयंत्रणेत आहेत. सर्व जण याला जबाबदार आहेत. त्यामुळे योजना, रचना, धोरणं कितीही उदात्त असली तरी सामाजिक विकासासाठी, मानसिक स्वास्थ्यासाठी त्या कशा कार्यान्वित होतात यावर सर्व अवलंबून आहे.

नुकतीच एका संस्थेत गेले होते. ही संस्था नावाजलेली सो कॉल्ड फेमस असावी. रस्त्यात या संस्थेच्या नावाची मोठी मोठी होल्डिंग लावली होती. मी कधी या आधी तिथे गेले नव्हते. त्याच संस्थेत माझा कार्यक्रम होता. म्हणजे शिक्षकांच्या एका गटाने तिथे आयोजन केलं होतं. आत पाऊल टाकलं नि मला कळेचना आपण कुठे आलो आहोत, भारतात की भारताबाहेर? सुसज्ज हॉल. सगळं तंत्रज्ञान नि त्याचा झगमगाट. संस्थाप्रमुखांचा एक मोठा फोटो. त्यांच्या स्वत:च्या विमानासमोर! हा फोटो अनेक ठिकाणी. त्यामुळे अनेकांच्या डोळ्याला सतत दिसत असावा. सगळीकडे फिरणाऱ्या पिवळ्या गाड्या... नि खेड्यापाड्यातून येणारी मुलं! सगळ्या शाखांचं शिक्षण. म्हणजे शिक्षणाच्या सर्व शाखा उपलब्ध. मॉलच म्हणूया किंवा वेगवेगळे 'मार्ट' असतात तसं! एकदा आत जायचं नि हवं ते विकत घ्यायचं! तस्संच माझ्या मनात आलं. बाहेर हे सगळं सरकारी यंत्रणा देते ना! तरी भरपूर पैसे देऊन इथे गर्दी का?... माझे स्नेही म्हणाले, 'आम्ही शॉपिंग कुठे केलं यालाही महत्त्व नव्हे प्रतिष्ठा आहेच की समाजात!' मी फक्त नि:श्वास सोडला. तिथे पगार त्या अर्थानं 'वाया', म्हणजे विद्यार्थीच नाहीत नि इथे संस्था देईल त्या वेतनात, त्या नियमात, त्या अपेक्षा पूर्ण करणारं अपुरं वेतन घेऊनही 'टकाटक' माणसं!... एका विद्यार्थ्याला विचारलं, 'तू काय करतोस?' तो म्हणाला, 'आयटीआय.' 'इथे का?' मी विचारलं. 'इथे मोठे मोठे सेलिब्रेटी येतात. कार्यक्रम होतात... बऱ्याच वेळा ई-लर्निंग होतं... आणि सगळं कसं डिसेंट...'

माझ्या मनात आलं अपेक्षाप्रमाणे पूर्तता की अपेक्षा निर्माण करणारं शिक्षण नि संस्था! आणि हे चित्र आता शहरातच नाही तर कुठेही तालुक्याच्या ठिकाणी, खेड्यातही दिसू लागलंय... हे चित्र शिक्षणाच्या पहिल्या पायरीपासून (बालशिक्षण) ते उच्चशिक्षणापर्यंत (विद्यापीठं खाजगी) दिसू लागलंय. इथली गुणवत्ता कशी मोजायची? अनेक संस्था मूल्यमापन करत आहेत. परंतु ते खाजगी संस्थांचं नाही तर स्वायत्त संस्थांच्या शिक्षणाचं. त्या दर्जावर बोललं जातं, मीडिया प्रसिद्धी देताहेत. समाज चर्चा करतोय. तेव्हा चर्चा करणाऱ्यांची मुलं मात्र मॉलमध्ये शिकत असतात. आर्थिक तयारी करून (कशीही) आपल्या मुलांसाठी मॉलमध्ये प्रवेश घेतात. शिक्षणात मूल्यव्यवस्थेवर किती विचार होतो? तो व्हायला हवा असं वाटतं. बरं हा दर्जाही प्राथमिक शिक्षणापर्यंतच मोजला जातोय हा मुद्दा वेगळाच.

आजकाल ब्रँडेडचा जमाना आहे. सगळं बदलतंय मग शिक्षणही. त्यामुळे मॉलही वेगवेगळ्या पाश्चात्त्य शिक्षणरचनेला आपलं मानतात नि पाश्चात्त्य म्हणून आकर्षण वाढतंय. ऑक्स्फर्ड, इंटरनॅशनल बोर्ड, केंद्रीय बोर्ड (CBSE), भारतीय शाळा प्रमाणपत्र परीक्षा (ICSE - Indian Certificate of Secondary Education) यांची आवक वाढलीय नि पदवी मिळवण्यासाठी परदेशी शिक्षणाला गेल्या तीस वर्षांत महत्त्व येऊ लागलंय. जागतिकीकरणाचा अर्थ खोलवर पसरू लागलाय. एअरपोर्टवर गेलं तर तरुणांची वर्दळ जास्त दिसते.

जिकडेतिकडे लॅपटॉप दिसतात. कानात, तोंडाशी वायरी गुंडाळलेल्या दिसतात नि करिअरमध्ये मग्न असलेली तरुण पिढी दिसते.

खेड्यापाड्यातली मुलं शहरात दिसतात कारण कुटुंबच्या कुटुंबं शहरात स्थलांतरित होताहेत नि शहरातली मुलं परदेशी स्थलांतरित होताहेत. हेतू शिक्षण हा आहे. काय खरं काय खोटं? काय योग्य काय अयोग्य? याचा विचार करायला कोणाला वेळ नाही, की डोळ्यांवर पट्टी बांधलीय? नि महात्मा गांधी नोटेत जाऊन बसलेत. समाजातला उच्चभ्रू समाज नि आर्थिक उच्चभ्रू समाजाचं अनुकरण तळागाळातला (आर्थिक) समाज करताना पिळवटून निघतोय... कसंही करू, जमीन विकू, कर्ज काढू पण मुलाला मॉलमध्ये जाऊ दे ही मानसिकता बळावत आहेत. शिक्षण महाग होऊ लागलंय नि जिथं शिक्षण आहे, फुकट आहे त्याकडे समाजानं पाठ फिरवली आहे.

किती पटापट वेगानं बदलतंय सगळं! पळायचं ठरवलं तरी पळता येत नाही इतका वेग आहे. काही प्रमाणात लोकांना कळतंय की आपण उगाच धावतोय. पण इतर धावताहेत मग मी शांत उभं राहून कसं चालेल, ही भीती मनात आहे. ''ही सगळी स्पर्धा मी स्वीकारली नाही तर माझ्या मुलांचं काय होईल? माझ्या मुलांचं का होऊ द्यायचं?' ही भाबडी वृत्ती यामागे आहे. अशा शिक्षणाच्या दारात नेऊन सोडणारा पालक बाहेरून-काचेतूनच ते चकचकीत विश्व बघतोय. ते खरं आहे का? कसलं मूल्य आपण भरतोय? ते मूल्य भरून तयार होणारं प्रॉडक्ट कसं आहे? हे प्रश्न ज्याचे त्यानं लक्षात घ्यायला हवे. पुन्हा एक प्रसंग आठवतोय. मुंबईत शिक्षणासाठी आपल्या मुलांना घेऊन गेलेला मुलगा/विद्यार्थी गावाकडे आला तेव्हा गप्पा मारताना म्हणाला, 'गावची मुलं जेवढं काम करतात, चालतात तेवढं आता माझा मुलगा नाही करू शकत. तो दमतो कारण गर्दीत चालणार कुठे? शिवाय इथल्या मुलांचा अभ्यास, अनेक गोष्टी करण्याची कौशल्यंही त्याच्यात नाहीत.' सर्वांचंच हे मत असणार नाही, पण काहींचं असू शकतं. समाजात होणाऱ्या बदलाच्या निरीक्षणाची ही नोंद आहे. गावागावातल्या संस्कृतीशीही मुलांचं नातं तुटत चाललं आहे नि वेगवेगळ्या (परदेशी) संस्कृतीशी जोडलं जाऊ लागलंय. (गावागावातले सणवार समाजाला बांधून ठेवतात. लोककलांना जपतात, समाजाला एकत्र आणतात. पण शहरात स्थलांतरित झालेल्या मुलांना सुट्टीची अडचण येते त्यामुळे ती गावाकडे येऊ शकत नाहीत. चांगल्यावाईट गोष्टींबद्दल इथे बोलत नाहीत. पण गावाकडे यायलाच मिळत नाही आणि तरी शहरी म्हणून अंतर पडताना दिसतंय नि शहर/खेडं हा कॉम्प्लेक्स येतोच.)

तात्पर्य, आज कदाचित काळानुसार नि अंधानुकरणामुळे शिक्षण शहरी बाजारू, खर्चीक आणि मातीशी नाळ तोडणारं, प्रतिष्ठेच्या पोशाखी कल्पना जपणारं झालं आहे. यात कुठेतरी 'नई तालीम'सारखी रचना अभ्यासपूर्वक प्रत्यक्ष पाहिली तर अंतर्मुख करते. याबरोबरच या व्यवस्थेवरचा विश्वास उडाल्यानं अनेक पालकांनी एकत्र येऊन होम स्कूलिंगचा पर्याय निवडला आहे. केवळ भारतानं नाही तर जगभरात या शिक्षणप्रणालीत काम सुरू झालं आहे. एका संस्थेत गेलं असता (शिक्षांतर) तिथं असं कळलं की जवळजवळ दहा हजार कुटुंबांनी होम स्कूलिंग हा पर्याय निवडला आहे. आपल्या आजुबाजूला अशी उदाहरणं आता दिसू लागली आहेत. असे गट समाजात निर्माण होऊन ते ओपन लर्निंगच्या खाली एकत्र येऊन विचार करताना दिसतात. या अनुषंगानं डेमोक्रॅटिक एज्युकेशन, इन्फर्म्ड चॉइस, ओपन लर्निंग, ओपन स्कूलिंग, होम स्कूलिंग अशा वेगवेगळ्या कल्पना विस्तारत आहेत.

हाही एक नेहमीच्या बाजारू/फॅक्टरी मेकिंग प्रवाहाला छेद देणारा प्रवाह म्हणता येईलच. नवा स्वतंत्र स्वत: अभ्यासक्रम शिकण्याच्या संधी, स्वयंशिक्षण, स्वयंशिस्त, पाहणं, समजून घेणं, स्वयंकृती कार्यक्रम, संधी यांचा विचार होत आहे. तोही आज ना उद्या कदाचित बळकट होईलच. ह्या प्रवाहाचा आकार उगमासारखा आहे पण निर्माण होणं याला महत्त्व आहे. या नव्या शिक्षणविचारात ज्यांनी शिक्षणक्षेत्रात अनमोल योगदान दिलं त्या रवींद्रनाथ टागोर, महात्मा गांधी, जे. कृष्णमूर्ती, डेव्हीड ऑसबरो त्यांची नावं आदरपूर्वक घेतली जात असून नव्या दृष्टीनं अभ्यास केला जातोय. यातच जगात चाललेले शिक्षणातले प्रयोगही अभ्यासले जात आहेत. (रुडॉल्फ स्टॅन संगीतकेंद्री शिक्षण, चित्रकलाकेंद्रित शिक्षण, आनंदभवन, कलेतून शिक्षण तसंच विविध देशातलं जसे कॅनडातील 'सहिष्णुता', दक्षिण आफ्रिकेतील 'उबंटू भान', ऑस्ट्रेलियातील स्वयंपूर्ण व्यक्तिविकास, नेदरलँडमधील 'माणूस घडवणारी शिक्षणपद्धती', फिनलंडची 'शिक्षणरचना', इस्रायलची 'लोकशाही शिक्षणपद्धती' इत्यादीचा समावेश करता येईल.) जे जे चांगलं, वेगळं, वैशिष्ट्यपूर्ण आहे ते ते एकत्र जुळवून, मुळात स्वत:चा वेगळा विचार करून आपल्या देशात गेल्या पंचवीस-तीस वर्षांत शिक्षणात नवे प्रयोग सुरू झाले आहेत. हे प्रयोग करणारी माणसं आत्मविश्वासानं हे विचार ठामपणे मांडत आहेत. यातले काही प्रयोग आर्थिक अडचणीमुळे बंद पडले तरी केलेला विचार महत्त्वाचा आहेच. काही शिक्षणरचनांचा अभ्यास करून, प्रत्यक्ष पाहून मी 'सृजनाच्या

नव्या वाटा', 'कणवू' ही पुस्तकं लिहिली. मी पुस्तकं लिहिली हे सांगण्याचा उद्देश नाही तर आपणास या प्रयोगांची ठिकाणं माहीत होण्यासाठी नोंद केली आहे. (राजस्थान-दिगंतर, शिक्षांतर, उत्तराखंड-लक्ष्मी आश्रम, गुजरात-गिजुभाई बधेकांचं बालशिक्षण, छत्तीसगड-इमली महुआ, मध्यप्रदेश-मुस्कान, द ग्रीन स्कूल, केरळ-कणवू, कर्नाटक, विकासना, सीता स्कूल इत्यादी, तामिळनाडू-विद्योदय, आंध्रप्रदेश-व्हॅली स्कूल इत्यादी.)

या पार्श्वभूमीवर ३६ वर्षांनी आपल्या देशानं राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तयार करावे ही महत्त्वाची नि तेवढीच विचार करायला लावणारी घटना घडली आहे. एवढी वर्षं का जावी लागली? शिक्षणात आधी घटना घडल्या, बदल झाले नि ३६ वर्षांनी धोरण तयार झालं, असो. त्यावर आज समाजात-शिक्षणक्षेत्रात उलटसुलट चर्चा सुरू आहे. देशातल्या सिमला-हिमाचल प्रदेश इथे याचा अवलंब झाला, उत्तर प्रदेशात अंमलबजावणी झाली. काही राज्यं अमान्य करत आहेत. महाराष्ट्रात काम सुरू झालं आहे. यातल्या काही ठळक वेगळ्या बाबींची काहीशी नोंद करून पुढे जावंसं वाटलं. या धोरणानुसार ५+३+३+४ असा आकृतिबंध असणार आहे. बालशिक्षणाचा समावेश या प्रणालीत करून बाजूला-दुर्लक्षित राहिलेल्या बालशिक्षणाला महत्त्व दिलं आहे. मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण, कौशल्यशिक्षण, महाविद्यालयीन शिक्षणात आंतरशाखीय विषयांची निवड अशा अनेक वैशिष्ट्यपूर्ण बाबी जाणवतात. वैज्ञानिक दृष्टिकोनावर भर, प्राचीन परंपरांचा अभ्यास, कलांचा अभ्यास, मूल्यशिक्षण यावर भर देण्यात आला आहे. विशेषत: सर्व स्तरावरील शिक्षण-प्रशिक्षणाचा विचार केलेला आहे. कृतियुक्त शिक्षण, स्वयंशिक्षण इत्यादी यांचा विचार केल्यानं कदाचित शिक्षणात आलेली रुक्षता, कृत्रिमता नष्ट होण्यास मदत होईल असं वाटतं. या धोरणाकडे समाजात राजकीय, सामाजिक बाजूंनीही बघितलं जाऊन साधकबाधक, पक्षपाती-निःपक्षपाती चर्चा होताना दिसते. खरं म्हणजे लेखनाचा हा स्वतंत्र विषय आहे हे नक्की! शेवटी समाजाच्या तळागाळात काय होईल हे वेगळे!

शिक्षणक्षेत्रात अनेक दिशांनी, बाजूंनी बदल होताहेत तरी प्राचीन शिक्षणप्रणालीकडेही लक्ष जात आहेच. पूर्वप्राथमिक, प्राथमिक शिक्षणात बदल होत आहेत, प्रयोग होत आहेत, काम होत आहे. त्यामानानं माध्यमिक स्तरावर काम नव्यानं झालेलं दिसत नाही. महाविद्यालयीन शिक्षण आजही व्याख्यानपद्धतीत अडकलं आहे. मुळात नवीन शैक्षणिक धोरण, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, राज्यअभ्यासक्रम आराखडा खडा (ध्येय-उद्दिष्टे), पाठ्यक्रम, पुस्तकं, अध्यापनपद्धती, प्रशिक्षण असे एकमेकांशी असलेले नातेबंध जोडत शिक्षणानं पुढे जायला वेळ लागेल. एवढी मोठी लोकसंख्या असलेल्या देशात हे घडणार नाही असं नाही. त्यासाठी आपापल्या स्तरावर व्यासपीठं निर्माण होतील. ती गरज आहे.

आज ज्या प्रकारच्या शाळा, महाविद्यालयं, शैक्षणिक संस्था निर्माण होत आहेत, त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होते, यामागचं कारण आज अशा संस्थांची भुरळ जगाला पडली आहे, आकर्षण आहे, कारण पालकांची मानसिकता. इंग्रजी माध्यमाचं वेड! सगळ्याचं ओझं, दडपण मुलांच्या मनावर आहे. शाळा अधिक शिक्षण मिळावं, संधी मिळाव्या, पुस्तकं पक्की व्हावी म्हणून शाळेला समांतर शिकवणीवर्गही मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. हे वर्ग अधिक चालावे अशीच शिक्षणाची यंत्रणा आहे, बोगस प्रवेश दाखवणारी महाविद्यालयं असल्यानं अशी मुलं शिकवणीवर्ग/क्लासना उपस्थित राहतात. शिक्षणात अनेकानेक सूक्ष्मातिसूक्ष्म शाखा निर्माण झाल्या आहेत. मुख्य म्हणजे समाजही अशा शिक्षणाचा विचार करतो जे शिक्षण पटकन नोकरी देईल, परदेशी जाता येईल, पैसा देईल. यातून इंजिनीयरिंग, मेडिकलकडे ओढा निर्माण होणं ही परिस्थिती आहे. यातही प्रचंड प्रमाणावर खाजगीकरण झाल्यानं आणि या शाखांचं आकर्षण असल्यानं खूप मोठ्या प्रमाणावर फी, देणग्या घेणाऱ्या शिक्षणसंस्था वाढल्या आहेत. राखीव जागाही म्हटलं तर वेगळे प्रश्न मुलांच्या मनात निर्माण करणारी घटना आहेच. पालकांना आर्थिक ताण आहे, मुलांना गुणांचा (मार्क) ताण आहे. याचा परिणाम आत्महत्येत झालेला दिसतो. मुलं मोकळी दिसत नाही. मुलांचं बालपण हरवत चाललंय. मुलांच्या मूल्यपणावर पालक आणि शिक्षण म्हणजे शाळा हुकूमशहासारखं राज्य करताना दिसतात. शाळा-शिक्षण हे स्थान आदराचं, समाज घडवणारं होतं. जवळजवळ सर्व समाजसुधारकांनी शिक्षण हे परिवर्तनाचं माध्यम आणि साधन मानले म्हणून १००-१५० वर्षांपूर्वी शिक्षणसंस्था त्यांनी सुरू केल्या. आजही देशाचे पंतप्रधान 'मन की बात'मधून विद्यार्थ्यांशी संवाद साधताना दिसतात हे वेगळे दृश्य आहे.

आज समाज ज्ञानार्जनासाठी फक्त शिक्षणकेंद्रांवर अवलंबून नाही. कोविडमुळे तर ऑनलाइन एज्युकेशनची नवी वाट सापडली, त्याचा दर्जा नि उणिवा- महत्त्व वेगळी बाब आहे. परंतु आधुनिक तंत्रज्ञानानं एखाद्या खेड्यातला मुलगाही परदेशी वर्गात जातो, तिथल्या मुलांशी संपर्क साधतो. विज्ञान हे जसं दुधारी शस्त्र आहे तसं तंत्रज्ञान हेही दुधारी शस्त्र आहे. शिक्षणातला आजचा सर्वांत महत्त्वाचा

बदल म्हणजे आजच्या तरुण, बालपिढीच्या हाती मोबाइल आला आहे. एका क्लिकवर सर्वकाही त्याला मिळतं. गूगलबाबा सर्व शंका दूर करतो. स्क्रीनवर पुस्तकं वाचता येतात. शोध बघता येतात, जगातल्या बातम्या कळतात आणि वाईट गोष्टीही पाहता येतात. कारण शिक्षणासाठी आणि शिक्षणाच्या नावाखाली रिमोट त्याच्या हाती आहे. लैंगिक समस्या, विविध मानसिक आजार, मीडिया ॲडिक्शन यांसारख्या नव्या समस्या निर्माण झाल्या आहेत, शिक्षणात पूर्वी असलेलं कुणावरचं तरी अवलंबित्व कमी झालं आहे. शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर होणं हा महत्त्वाचा बदल मानावा लागेल, कितीतरी शाळा ई-स्कूल झाल्या आहेत. अनेक चांगले पाठ मुलांना बघायला मिळत आहेत. खडू-फळ्याची जागा व्हाईट बोर्ड, टॅब यांनी घेतली आहे. तंत्रज्ञानानं मुलांना आकर्षित केलंय. नोकरी घरी बसून करता येऊ लागली तसं शिकण्याचंही झालं. शिक्षणाचं रूप काही प्रमाणात तरी या तंत्रज्ञानानं बदललं आहे. दुर्दैवानं इंग्रजीच्या लाटेमुळे मुलं शाळांतून बाहेर पडली आणि शाळा नटू-सजू-रंगून गेल्या. अनेक ठिकाणी वर्गखोली चाइल्ड थिएटर बनली आहे. जे शिक्षक तंत्रस्नेही झाले, हे कसं वापरायचं हे ज्यांना समजलं त्यांनी सर्व थरांतील शिक्षणात याचा प्रभावी वापर केलाय, प्रत्यक्ष एखाद्या ठिकाणी क्षेत्रभेटीला जाणं अवघड असलं तरी जपानमधल्या शाळेत मुलं जातात. व्हर्च्युअल फील्ड ट्रिपच्या माध्यमातून विविध ॲपचा वापर करून परस्परांना भेटता येतंय. ई-कंटेट तयार करणे, त्यात क्वॉलिटी मेंटेन करणं हे आज शिक्षणातील आव्हान आहे. इतकंच काय, परीक्षाही ऑनलाइन होताहेत नि निकालही लगेच मिळू लागले आहेत. वेगळा मुद्दा म्हणजे आज मेंदूच्या संशोधनानं खूप वेग घेतला आहे, संशोधनाद्वारे मेंदूपोषण करणं ही एक ॲक्टिव्हिटी झाली आहे नि दुसऱ्या बाजूला खेड्यापाड्यात शिकणाऱ्या मुलाला अनेक गोष्टी मोफत (गणवेश, वह्या, भोजन, फी इ.) मिळताहेत. आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या आधारे शिक्षणात आमूलाग्र बदल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याला दुसऱ्या बाजूही आहेत, माणसांना माणसापासून दूर नेणाऱ्या या ऑनलाइन शिक्षणामुळे सर्व टप्प्यावर मुलांचं भावनिक भरणपोषण, भावनिक बुद्ध्यांक वाढणं, सामाजिक संवेदनशीलता वाढणं, कौटुंबिक समस्या साधणं नि उपाय करणं, समुपदेशन करणं, बोलणं याची तीव्र गरज निर्माण झाली आहे.


समाजात निर्माण झालेल्या अनेक प्रश्नांची पाळंमुळं शिक्षणयंत्रणेत आहेत. सर्व जण याला जबाबदार आहेत. त्यामुळे योजना, रचना, धोरणं कितीही उदात्त असली तरी सामाजिक विकासासाठी, मानसिक स्वास्थ्यासाठी त्या कशा कार्यान्वित होतात यावर सर्व अवलंबून आहे. आपण निराश नाही व्हायचं, शिक्षणामुळेच समाजात चांगलंही घडलंय. म्हणतात ना 'तरीही फुलतात गुलाबही ताजे'. हेच खरे! चांगले बदल घडवणं हेही आपल्याच हाती आहे.

**– रेणू दांडेकर**
renudandekar@gmail.com


ग्रंथाली

# गल्फस्थ

**सतीश थत्ते**




**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**
**टपालखर्च ३० रु.**

'गल्फस्थ' वाचताना सतीश थत्ते या इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्समधल्या निष्णात इंजिनीयरची नवीच ओळख लाभली. १९८५-८८ या काळात, सौदी अरेबियात, जुबैल हे जगातलं सर्वात मोठं पेट्रोकेमिकल औद्योगिक शहर वसत, घडत होतं. त्या घडणावळीतला सतीशचा हातभार या पुस्तकातून समजला. 'गल्फस्थ' मजेशीरही आहे; भरपूर माहितीही देतं आणि मध्यपूर्वेशी संबंधित असलेल्यांना पुनःप्रत्ययाचा आनंदही देतं. हनिवेलच्या मधाच्या विहिरीचा गोडवा ल्यालेलं हे पुस्तक छान वाचनीय झालेलं आहे.

**– डॉ. उज्ज्वला दळवी**



# भाषेविषयी जागरूकता

अपर्णा महाजन

> कोणत्याही भाषेचा वापर जाणीवपूर्वक आणि संवेदनशीलतेने करणे, तिला न दुखावता, मोडतोड न करता, हळुवारपणे तिचे अंतरंग समजून घेऊन करणे, म्हणजे भाषेविषयी जागरूकता असणे. माणसाने स्वतः च्या प्रतिमेसाठी, आपल्या सामाजिक, राजकीय किंवा आर्थिक वर्चस्वाने एखादी भाषा अधिक चांगली असे इतरांच्या मनावर लादले आहे. त्यामुळे लोकांच्या मनात त्या भाषेविषयी न्यूनगंड, भीती किंवा राग निर्माण होतो. या कारणाने भाषा घाबरून वापरली जाते आणि त्यामुळे भाषेची मोडतोड केली जाते आणि अधिक गोंधळ निर्माण होण्याची शक्यता असते. अशी भाषेबद्दलची मोडतोड म्हणजे असंवेदनशीलता असणे. हे भाषेसाठी खूपच हानिकारक असते.

माझ्या महाविद्यालयात मी नाटक विषय शिकवत असे. शाळेमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत असलेले काही विद्यार्थी मुले-मुली त्यांची शैक्षणिक पात्रता वाढण्यासाठी इंग्रजी विषय घेऊन बाहेरून (एक्स्टर्नल) परीक्षा देत. अधूनमधून माझ्या तासांना येऊन शंका विचारत. एकदा एका शिक्षिकेने अत्यंत गंभीर चेहऱ्याने मला विचारले होते, 'मॅडम, नाटकाच्या पेपरमध्ये 'ग्रामर' नसते ना?' मी तिच्याकडे पाहत राहिले. मी म्हटले, 'अग, भाषा आणि व्याकरण यांना वेगळे करता येते का?' व्याकरण हा विभाग वेगळा, गद्य आणि पद्य वेगळा असे पुस्तकात असल्यामुळे पद्याचा सारांश, गद्यातील कथानक आणि व्याकरण पाठ करून लिहिणे असे संस्कार विद्यार्थ्यांवर होतात. माझ्या शालेय जीवनात माझेही मत असेच झाले होते. या सगळ्यांची एकमेकांबरोबर असणारी संगती मला मोठे होताना माझ्या शिक्षकांमुळे, वडिलांमुळे लक्षात येऊ लागली. बहुतांश विद्यार्थ्यांना हे समजावून न सांगितल्यामुळे त्यांना यातील नाते उमजत नाही. त्यामुळे व्याकरणाचा अभ्यास म्हणजे प्रयोग बदला, वाक्याचे दुसऱ्या वाक्यात रूपांतर करा, काळ बदला... हे आणि एवढेच त्यांच्या मनात असते. त्यात व्याकरणाचा अभ्यास करताना त्याचा आपल्या दैनंदिन पातळीवर कसा उपयोग करायचा, किंवा उपयोग करायचा असतो, हेच त्यांना माहीत नसते. त्यामुळे, काळ शिकणे म्हणजे 'I eat a mango, I am eating a mango' या पलीकडे काळाचा उपयोग नसतोच जणू!

व्याकरण हा भाषेचा कणा आहे. तो सुदृढ करण्यासाठी भाषेच्या विद्यार्थ्याने नेटाने त्या त्या भाषेतील व्याकरण समजून घेतले पाहिजे. त्याचे केवळ पाठांतर न करता, त्याचा लक्षपूर्वक समजून वापर केला पाहिजे. मोडतोडीपासून भाषा वाचवण्यासाठी या सुरुवातीच्या पायऱ्या आहेत. त्या त्या भाषेत नीटपणे विचार मांडता आले पाहिजेत, त्यासाठी शब्दांचा भरपूर साठा असला पाहिजे, ही जबाबदारीची भावना बाळगली पाहिजे. त्या शब्दांचे वेगवेगळ्या संदर्भातील अर्थ समजून, उमजून घेण्याची उत्कंठा मनात असली पाहिजे. याच्या सरावाने हळूहळू, स्वतःला समजलेले, जाणवलेले, आवडलेले चांगल्या शब्दांत मांडण्याची क्षमता आपोआप वाढू लागते. जसे, पोहताना आधी पाण्याची भीती जाणे, मग पाण्यात तोंड घालून श्वास घेता येणे, त्याबरोबर हातापायांच्या हालचाली सहजपणे होणे जमले म्हणजे आपण पाण्यावर तरंगू लागतो. पण पोहण्याची शैली सुधारायची असेल तर हाताचा, पायाचा कोन, पाण्यावर आडवे पडून तरंगण्याची क्षमता, मानेचा कोन, श्वासाचे गणित याचा खूप सराव करावा लागतो म्हणजे तो 'स्ट्रोक' सुधारतो. अगदी तसेच भाषेचे आहे.

लहानपणी जिभेला लवचीकता यावी म्हणून मोठ्याने वाचन असे, मग समजून वाचणे, समजलेले सांगणे आणि पुढे आपल्याला वाटणारे छान शब्दात मांडणे किंवा व्यक्त करणे, असा भाषेचा अभ्यास असे. मला एका चांगल्या महाविद्यालयातील मुलीने सांगितले की त्यांचे शिक्षक 'अभ्यास कसा करावा?' यावर मार्गदर्शन करताना सांगत होते, 'उत्तरातले मुद्दे लक्षात ठेवा, ते पाठ करा आणि उत्तरपत्रिकेत लिहा. त्याच्या पुढे तुम्ही दोन-तीन वाक्ये काहीही लिहिले तरी चालेल, परीक्षक फक्त मुद्दे पाहतो.' अशा अभ्यासाने त्यांना सहज ६० ते ७० टक्के गुण मिळतात. अशा प्रवृत्तीमुळे भाषेच्या किंवा कोणत्याही विषयाच्या आकलनाकडे लक्ष न देता विद्यार्थी चांगल्या गुणांनी पास होतात. मात्र बोलताना आणि लिहिताना पाहिजे असलेल्या अभिव्यक्तीमध्ये ते सपशेल नापास झालेले दिसतात. समाजमाध्यमांचे स्तोम वाढल्यामुळे, समाजमाध्यमातील अभिव्यक्ती, त्यासाठी सहजसोपे वाटते ते भावचिन्हातून व्यक्त होणे किंवा आवडलेली एखादी कॉमेंट 'कॉपी पेस्ट' करून डकवण्याची सवय, यामुळे केवळ भाषेत नव्हे तर व्यक्तिमत्त्वामध्येसुद्धा हिणकसपणा येतो.

भाषा शिकण्याची सुरुवात अनुकरणाने होते. भाषा हा जगण्याचा एक अविभाज्य भाग आहे. विचार करणे, त्याचे आकलन होणे आणि ते अभिव्यक्त करणे ही सतत आणि अविरत चालू असणारी प्रक्रिया आहे. व्यक्तिमत्त्व या संकल्पनेत दिसणे, बोलणे, वागणे हे बाह्य स्वरूपातील काही काळ छाप पडणारे घटक आहेत. त्यापेक्षा अधिक प्रभाव न दिसणाऱ्या मनातले विचार, भावना, विचारसरणी, वृत्ती यांमुळे पडत असतो. ते खरे व्यक्तिमत्त्व असते. ते आपल्या नजरेतून, वापरणाऱ्या शब्दांतून, वाक्प्रचारातून, भाषेतून आणि कधी मौनातूनसुद्धा व्यक्त होत असते. फोटोशॉपिंग करून आपला फोटो आदर्श देखणा करण्याची आता प्रत्येक फोन कॅमेरामध्ये सोय असते. फोटो आणि वास्तव यातली तफावत डोळे विस्फारित करायला लावणारी असते. फोटो म्हणजे व्यक्तिमत्त्व नव्हे, वरकरणी दिसणारे आधुनिक रूप म्हणजे व्यक्तिमत्त्व नव्हे. कपडे, आधुनिकता, याच्यापलीकडे जे म नात चाललेले असते, जे आपल्या प्रतिक्रियांतून, बोलण्यातून, भावनेच्या व्यक्त करण्याच्या पद्धतीतून दिसते, जे शब्दांच्या वापरातून दिसते, ते आपले व्यक्तिमत्त्व असते.

भाषेचे महत्त्वाचे काम तर संवाद साधणे हे आहेच. संवादासाठी एकमेकांची एकच भाषा नसेल तर आपण खाणाखुणा करून किंवा दुसऱ्या भाषेची मदत घेऊन सांगायचा प्रयत्न करतो. मी जर्मनीमध्ये गेले असताना एका मॉलमध्ये गेले होते. मला एक ठरावीक प्रकारची कॉफी पाहिजे होती. तिथे लांबलचक भिंत भरून तऱ्हेतऱ्हेचे कॉफीचे प्रकार होते. तिथे कोणीही इंग्रजी भाषा बोलत नाही. आपण इंग्रजीमधून विचारायचा प्रयत्न केला तर हात उडवून 'नो इंग्लीश' म्हणतात. मग मी माझ्याच वयाच्या एका जर्मन बाईंना, माझा अभिनय पणाला लावून, त्या कॉफीबद्दल विचारले. तिनेपण खाणाखुणा करून मला त्याची माहिती दिली. माझे शंकानिरसन झाले, तेव्हा आम्ही दोघी खळखळून हसलो आणि एकमेकींना मिठी मारली. हीपण एक भाषाच होती ना? या भाषेतून आम्ही संवाद करू शकलो.

भाषेच्या वापरामध्ये संवाद हे महत्त्वाचे माध्यम असले तरी एकमेव उद्दिष्ट नाही. भाषेतून संवाद साधता येणे हे भाषेचे महत्त्वाचे कार्य याभोवतीच आपली भाषा अडकली आहे. संवाद हे महत्त्वाचे आहे, याबद्दल कोणाचे दुमत कसे असणार? पण, एखाद्या भाषेचा अभ्यास करताना 'संवाद' या संज्ञेच्या पलीकडे जाण्याची गरज आहे, याची जाणीव सगळ्या पातळ्यांवर वाढवण्याची गरज आहे. स्वत:पासून सुरुवात करणे ही त्याची पहिली पायरी. त्या भाषेतील उच्चारण, शब्दांची मांडणी, त्या भाषेचे व्याकरण याचा अभ्यास केला तर त्या भाषेचा पाया भक्कम होतो. वाचनाने अभिव्यक्ती सुधारते, शब्दांच्या छटा लक्षात येतात. भाषा सुधारण्यासाठी, चांगली भाषा बोलणाऱ्या लोकांचे ऐकणे, चांगले लिहिणाऱ्या लोकांचे लिखाण वाचणे यातून चांगले म्हणजे काय, याबद्दल आपली स्वतःची व्याख्या तयार होण्यास आणि ती समजण्यास मदत होईल. आपल्याला एकाच भाषेत, बोलता आले पाहिजे, भाषांची अनावश्यक सरमिसळ कशी टाळता येईल याचा विचार करण्याची सवय लावून घ्यायला पाहिजे. स्वतःचे भाषिक व्यक्तिमत्त्व सुधारायचे आहे, ही इच्छा भाषा सुधारण्यासाठी सर्वात महत्त्वाची आहे, असे मला वाटते. मग ती भाषा कोणतीही असो.

आपण औपचारिक आणि अनौपचारिक हे शब्द शाळेत असल्यापासून ऐकत आलो आहोत. अशा प्रसंगी बोलण्याची, लिहिण्याची भाषा संवादापेक्षा वेगळी असते. त्यात बोलण्याचे, लिहिण्याचे नियम पाळले जातात. मला जाणवलेली गोष्ट म्हणजे, शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना हा फरक नीट उमजलेला दिसत नाही. अनौपचारिक भाषेबद्दल त्यांना माहीत असते. ती प्रासंगिक आहे. उत्कट आणि उत्स्फूर्त आहे. वैयक्तिक पातळीवर आपल्या जवळच्या व्यक्तींशी बोलताना आपलेपणाने शब्द वापरले जातात. ते शब्द आणि त्यांचा अर्थ, अर्थाच्या छटा

फक्त आपल्या जवळच्यांना माहीत असतात. ती सगळ्यांना समजण्याची गरज नाही. बोलीभाषेत आपल्या जवळच्या, रोजच्या, शेजारपाजारच्या लोकांशी किंवा मित्रमैत्रिणींशी बोलताना, एकमेकांना परिचित संज्ञा वापरल्या जातात. त्या इतरांना कळणार नाहीत, पण ज्यांना कळायला पाहिजेत त्यांना समजतील. त्यात अनौपचारिकतेचा भाग असल्याने त्या भाषेला नियमांमध्ये बंदिस्त करण्याची आवश्यकता नसते. हे सगळे ते जाणतात. मग यातच औपचारिक भाषा का महत्त्वाची याचे उत्तर आहे. 'कार्यालयाला पत्र लिहिणे म्हणजे औपचारिक भाषा' असे समीकरण अनेक विद्यार्थ्यांच्या मनात असलेले दिसते. अशी अस्पष्टता त्यांच्या विचारात दिसते. ज्या प्रसंगांमध्ये औपचारिक नाते असते, तिथे औपचारिक भाषा वापरावी लागते. महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये, अनोळखी व्यक्तींमध्ये व्यवहारी जगात, संभाषण करताना किंवा लिखित पातळीवर संदेश लिहिताना समान आकलन होणे आवश्यक असते. त्यातून दुसरा अर्थ निघताच कामा नये. अशी भाषा लिहिताना ती औपचारिक भाषा, प्रमाण भाषा असावी असा संकेत आहे. मराठी, इंग्रजी किंवा अन्य कोणतीही भाषा असो.

भाषेच्या दैनंदिन अथवा औपचारिक वापराबद्दल मनात गंड, भीती असते. याचे एकमेव कारण म्हणजे भाषेला आपलेसे न केल्यामुळे तिचा नीट वापर करता येत नाही. आणि त्या कारणाने आत्मविश्वास वाटत नाही. आपल्या कपड्याच्या कपाटात जसे अनेक कप्पे असतात. त्यात ठेवणीतले, कामावर जायचे, व्यायामाचे, रात्री घालायचे, थंडीचे, उन्हाळ्याचे असे कपडे ठेवलेले असतात. प्रसंग असेल तसे आपण त्यातला कपडा निवडतो आणि घालतो. अगदी तसेच, आपल्याकडे शब्दांचा मोठा संग्रह असेल, तर प्रसंगानुरूप आपल्याला लगेच तो शब्द वापरता येतो. आणि भाषावापराचा आत्मविश्वास वाढू लागतो.

दररोजच्या साध्या संभाषणात बोलली जाणारी भाषा, याकडे वस्तुनिष्ठपणे पाहिले असता, सहजपणे जाणवते की त्यात अनेक भाषांची सरमिसळ आहे. ते स्वाभाविकही आहे. कारण आपल्याकडे भाषाभिन्नता आहे. अनेक बोलीभाषा आहेत. इतर भाषांमधल्या सरमिसळीमुळे नव्याने निर्माण झालेली भाषा संवादपातळीवर तारून नेते. संवाद हे भाषेचे महत्त्वाचे अंग आहेच. बोलली जाते ती बोली, असे मानले जाते. त्याचे स्वतंत्र शास्त्र आहेच. त्यात उत्तम आणि निकृष्ट अशी कोणतीच भाषा नाही. आता याखेरीज मोबाइलवर लिहिण्याची 'एसएमएस' भाषा अस्तित्वात आली आहे आणि अनेक गटांतून ती लोकप्रिय झाली आहे. याचे कारण त्यात कुठलेच नियम नसले तरी चालतात, हे आहे. मोबाइलवर संदेश लिहिताना अनेक जण आपल्या मातृभाषेतून बोलावे तितक्या सहजतेने रोमन लिपीतून कोणतीही भाषा लिहीत असतात. अनौपचारिक पातळीवर हे मान्यही होते.. रोमन लिपीचा मराठी लिहिण्यासाठी वापर हे सर्वमान्य झाले आहे. त्यामुळे संदेश पोचतो पण अत्यंत जखमी भाषेतून! हे सगळ्या स्तरावर दिसते. माझ्याकडे इस्त्रीचे कपडे घेऊन जाणाऱ्या बाईने मला लिहिलेला हा संदेश वाचून पाहा. Gare kone nhe ata. Night la data. (घरी कोणी नाही आता, रात्री (कपडे) देते) ही कोणती भाषा? ना मराठी.. ना इंग्रजी...! मराठीतले इंग्रजी की इंग्रजीतील मराठी? अशा प्रकारे रोमन लिपीतून मराठी लिहिणारे लोक सर्वस्तरीय आहेत. मला स्वतःला असे मराठी वाचणे खूप अवघड जाते. मी त्यांना तशी विनंती करते की तुम्ही मराठीत लिहा किंवा इंग्रजीमध्ये लिहा. अशी भाषा मान्य न करणे, विशेषतः शिक्षण देणाऱ्या आणि घेणाऱ्या समाजाने हे पाळले आणि सुशिक्षित लोकांनी असे न लिहिण्याचे ठरवले तरी भाषेतील ही मोडतोड कमी होईल.

कोणत्याही भाषेचा वापर जाणीवपूर्वक आणि संवेदनशीलतेने करणे, तिला न दुखावता, मोडतोड न करता, हळुवारपणे तिचे अंतरंग समजून घेऊन करणे, म्हणजे भाषेविषयी जागरूकता असणे. माणसाने स्वतःच्या प्रतिमेसाठी, आपल्या सामाजिक, राजकीय किंवा आर्थिक वर्चस्वाने एखादी भाषा अधिक चांगली असे इतरांच्या मनावर लादले आहे. त्यामुळे लोकांच्या मनात त्या भाषेविषयी न्यूनगंड, भीती किंवा राग निर्माण होतो. या कारणाने भाषा घाबरून वापरली जाते आणि त्यामुळे भाषेची मोडतोड केली जाते आणि अधिक गोंधळ निर्माण होण्याची शक्यता असते. अशी भाषेबद्दलची मोडतोड म्हणजे असंवेदनशीलता असणे. हे भाषेसाठी खूपच हानिकारक असते.

मी लहान असताना, 'शुद्ध भाषेत लिही', असे सांगितले जायचे. तेव्हा माझ्या मनात शुद्ध भाषेत लिहायचे म्हणजे व्याकरण नीट असले पाहिजे असे असायचे. अलीकडे प्रमाण भाषा आणि प्रमाणेतर भाषा असे शब्दप्रयोग वापरले जातात. सर्वमान्य बोली लिखित स्वरुपात वापरली जाऊ लागली की तिला आपण प्रमाण भाषा म्हणतो. प्रत्येक भागाची बोली असते. ती आजूबाजूच्या परिसरातील शब्द, त्यांचे उच्चार आणि बोलण्याची ढब यावर अवलंबून असते. अशा त्या परिसरामध्ये एखाद्या वस्तूला, संकल्पनेला वेगळी संज्ञा असेल. वेगळी म्हणजे प्रमाणेतर नव्हे. त्या त्या भाषेचे निकष असतात, त्याचेही शास्त्र असते, त्यातले सौंदर्य लक्षात घ्यायला पाहिजे. कोणत्याही भाषेबद्दल असे म्हणता येईल.

हिंदी भाषेतून संवाद साधणे, संदेश पोचवणे हे वेगळे आणि ते हिंदी लहेजानुसार बोलणे वेगळे. तसेच इंग्रजी भाषेचे आणि तसेच मराठी भाषेचेही.

भाषा अवतीभोवती घडणाऱ्या घटनांनुसार, बदलांनुसार बदलत जाते. ती प्रवाही असते. बदल हा काळाचा स्थायी भाव आहे. आताच्या बदललेल्या जगात, तंत्रज्ञान, मोबाइल, समाजमाध्यमे, इंटरनेट, परदेश प्रवास, या सगळ्यामुळे आलेली नवी दृष्टी, नव्या संधी, ओटीटीसारखी माध्यमे यामुळे ते योग्य असो अथवा अयोग्य, पण मानसिकतेत आणि राहणीमानात लक्षणीय बदल होत आहेत. स्वयंपाकघरातील पदार्थ करण्यातील आधुनिक पद्धती, आधुनिक यंत्रे, खाण्याच्या पदार्थांच्या चवी, मसाले, चहा-कॉफीचे ब्रॅण्ड हे झपाट्याने बदलत आहेत. पेहेराव, केसांची रचना, नैतिक मूल्ये, नात्यांना एकत्र करणारी आधुनिकता हे बदल स्वाभाविकपणे होत आहेत. तसेच बदल तितक्याच सहज आणि स्वाभाविकपणे भाषेत होताना दिसत आहेत. सभोवतालात घडणाऱ्या आधुनिकतेचे ते द्योतक आहेत. ते पटतील किंवा नाही हा वेगळा मुद्दा; पण हे घडत आहे. घडणारे बदल भाषेची मोडतोड करण्याकडे झुकले तर त्यामुळे भाषेची अनेक दुखणी निर्माण होतात.

उदाहरणादाखल काही नमूद करायचे झाल्यास, अशुद्ध व्याकरण असलेले मराठी, ऱ्हस्व दीर्घ, योग्य उच्चार याकडे दुर्लक्ष झालेली भाषा असेल, तर त्याबद्दल अपराधी भाव वाटून न घेता उलट त्यात पुढारलेपण समजण्याची अपवृत्ती वाढलेली दिसते. मराठी माध्यमात शिकलेली एखादी व्यक्ती काही काळ परदेशात राहून आल्यावर, चुकीचे मराठी बोलू लागते आणि त्यात तिला आणि (त्या व्यक्तीच्या घरातल्या लोकांनासुद्धा) आपल्याला इंग्रजी छान येते आणि मराठीत शब्द, अर्थ यात गफलत होते, याबद्दल कौतुक वाटताना दिसते. शब्दांचे अर्थ, छटा, त्याचा वापर या गोष्टींकडे लक्ष द्यायला पाहिजे याचे भान नसते. त्याबद्दल आत्मीयता नसते. मराठी चुकण्याचे कारण परदेशी असणारे वास्तव्य असू शकत नाही. इंग्रजीतून संभाषण करण्याची सवय लागणे हे स्वाभाविक आहे. त्यामुळे मराठी चुकणे हे समर्थनीय आहे का?

महाराष्ट्रातील विद्यार्थी कोणतीच भाषा नीट आत्मसात न करता पदवी घेतो, नोकरी मिळवतो हे वास्तव आहे. आपल्याला भाषा नीट वापरून आपले म्हणणे नीट कळवायला पाहिजे, ही जबाबदारीची जाणीव असायला पाहिजे. मात्र त्याकडे बघण्याची वृत्ती बेफिकीर दिसते. पदवी परीक्षा देणारी विद्यार्थिनी, बी.ई. झालेला विद्यार्थी यांचा मराठीत जोडाक्षरे लिहिताना गोंधळ उडालेला दिसतो. स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष, सद्‌भावना, यजुर्वेंद्र, अपर्णा, कौस्तुभ हे लिहायला सांगितल्यावर महत्प्रयासाने त्यांनी यजुरवेन्द्र, अपरणा, कोस्तूब असे लिहिले होते. मी त्यांना विचारले, 'का बरं अशी अडचण येते आहे?' त्यावर कौतुकाने त्यांनी हसत सांगितले, 'दहावीनंतर मराठीचा संबंधच नाही आला नं..!' म्हटले, तुम्ही घरी, कॉलेजमध्ये, आजूबाजूला कोणत्या भाषेतून बोलता? तर 'मराठी' हे उत्तर. इंग्रजीत झालेल्या चुका का? विचारले तर, आम्हाला आठवीपासून इंग्रजी होते आणि ती आपली मातृभाषा नाही.. त्यामुळे चुका होतात मॅडम. ही उत्तरे प्रातिनिधिक आहेत. भाषेबद्दल असणाऱ्या मोडतोडीच्या या दृष्टिकोनाबद्दल त्यांना संकोच नसतो, आपले चुकते आहे हा भाव नसतो, अपराधीपण मुळीच नसते. इंग्रजी भाषा आपली नाही म्हणून त्यात चुका होऊ शकतात अशी समजूत एका बाजूला आणि इंग्रजी माध्यमाचा पगडा असल्याने, इंग्रजीतून शिक्षण घेतले जाते म्हणून मराठी येत नाही ही कौतुकाची बाब झाली आहे.

ज्यांच्याकडे पैसे आहेत ते इंग्रजी माध्यमात आपल्या मुलांना घालतात, पैसे नसलेले साध्या मराठी शाळेत जातात. इंग्रजी माध्यमातल्या मुलांना रेटून इंग्रजी बोलता येते आणि मराठी ही त्यांच्यासाठी तिसरी भाषा असल्याने ती परीक्षेपुरती लिहिता येणे हा भर दिसतो. हेच उलट... मराठी माध्यमातल्या मुलांसाठी. इंग्रजी माध्यमातल्या मुलांना तुमची मातृभाषा कोणती, असे विचारले तर ते 'इंग्रजी' सांगतात. कारण त्यांची आई त्यांच्याशी इंग्रजीतून बोलत असते. घरी काम करायला येणाऱ्या मदतनीस बायका आणि पुरुष यांच्याबरोबरच फक्त ते मराठी बोलतात, असे भाबडेपणाने त्यांनी मला सांगितले.

भाषावापरातला एक प्रवाह वेग पकडू लागलेला दिसत असला तरी भाषेबद्दल जागरूक असलेले लोक भाषा वाचवण्याचा प्रयत्न करत राहतील. अशोक केळकर यांनी एका निबंधात म्हटले आहे,'भाषेमध्ये सुदृढ गरिबी आणि लुळी पांगळी श्रीमंती आहे'. भाषेचा थेटपणा आणि जोरकसपणा, रांगड्या शब्दांत अभिव्यक्ती, आडवळणाने सांगणे नाही. जे सांगायचे ते थेट. उदाहरणार्थ, गेल्या महिन्यात माझ्या परिचयाचा एक आठ-नऊ वर्षांचा शाळेत जाणारा एक मुलगा मला सांगत होता, 'आपला मच्छिंद्र मेला. त्याची मयत जाळायला माझी मम्मी गेलीय.' हे ऐकून मी क्षणभर स्तब्ध झाले. हे त्याला कळलेले सत्य तो ऐकत असलेल्या भाषेत मांडत होता. रांगडे, स्पष्ट! त्याला, अरे, 'मच्छिंद्रकाका गेले. आई त्यांच्या अंत्यविधीसाठी गेली

आहे.' असे बोलणे शिकवणे योग्य की अयोग्य, असा विचार माझ्या मनात आला. मला त्याच्या स्पष्टतेचे कौतुक वाटले, पण त्याच्या शब्दांतून व्यक्त होणारी असंवेदनशीलता त्रासदायक वाटली. त्याची जाणीव त्याला झाली म्हणजे तो आपोआप, त्याच्याच भाषेत संवेदनशीलतेने बोलेल. त्यासाठी त्याला बोलताना दुसऱ्यांच्या बोलीची मदत घेण्याची गरज नाही.

होते असे, की अशा भाषेकडे नागरी उच्चभ्रू लोक असभ्य, अशिष्ट आणि हीन दर्जाची अशा तुच्छ नजरेने बघू लागले की अशी भाषा बोलणारे लोक त्यांना घाबरू लागतात. त्यांच्यापासून दूर जातात. काहींना न्यूनगंड वाटू लागतो, मग ते बोलायला संकोचतात किंवा बोलणे टाळतात. काहींची प्रतिक्रिया उग्र असते. भाषेत दोन गट पडतात. 'आम्ही असेच बोलणार. तीच आमची भाषा आहे. तुम्ही कोण त्याला अशुद्ध म्हणणार?' असा प्रतिवाद सुरू होतो आणि बऱ्याच वेळा तो टोकाला जाऊन त्याचा विपर्यास होऊ शकतो. जातिनिहाय भाषा आणि त्याबद्दल द्वेष असलेला बहुजन समाज याचे मूळ भाषेच्या वापरात नसून ते द्वेषभावनेत आहे. त्यामुळे 'तुमची शुद्ध भाषा तुम्हाला लखलाभ, आमच्या दृष्टीने आमची भाषा आम्हाला शुद्ध वाटते,' असे त्यांना वाटणे यात गैर काय? यासाठी भाषेचा आणि जातीचा, वर्गाचा किंवा सामाजिक स्तराचा संबंध नाही हे प्रस्थापित झाले पाहिजे.

(द्वेषभावना कधीही कोणत्याही बाबतीत वाईटच! धर्माच्या, जातीच्या, द्वेषाच्या विळख्यातून सुटलेला समाज किती चांगला असेल? असे स्वप्न सत्यात उतरले तर? हा केवळ निबंधाचा विषय न राहता, तो प्रत्यक्षात आणायला आपणच प्रयत्न करायला पाहिजे असे मला कळकळीने वाटते.)

सुधारलेल्या भाषेत बोलायचा अट्टहास करणाऱ्यांची भाषा चमत्कृतिपूर्ण आणि जड शब्दभांडाराचे प्रदर्शन करणारी असते. अशी भाषा ऐकणाऱ्याला आणि वाचणाऱ्यालाही नीट बोध होणारी नसते. भाषेतील 'स्कॉलरशिप' दाखवण्याच्या फंदात सहजसुलभ भाषा लोपली जाते. नागरी, अनागरी भाषा असे भाषांमध्ये गट पडू लागतात. प्रमाणभाषा हा राजदंड अस्तित्वात आला की दरी आणखीच वाढू लागते. 'प्रमाण' म्हणजे शुद्ध अशा समीकरणामुळे इतर बोलीभाषा सात्त्विक संतापाचे प्रदर्शन करू लागतात. इथे भाषेतले राजकारण वाढीस लागते आणि भाषा अशा प्रकारच्या वातावरणात गुदमरली जाते.

शालेय आणि महाविद्यालयीन आयुष्यात विद्यार्थ्यांना भाषेतील बारकावे माहीत करून दिले नसतील, आणि माहीत करून देण्यात आणि घेण्यात रसही नसेल, शिवाय तसे करून काम न अडता पुढे जाते आहे असे जाणवल्याने, भाषेकडे लक्ष नाही दिले तरी चालते, असा त्यांचा समज होतो. तसा संदेश विद्यार्थ्यांना नकळत मिळतो आणि ते तसेच लिहू/बोलू लागतात. भाषा नीट नसली तरी नोकरी मिळते, पैसे मिळतात. जीवनशैली सुधारते. त्यामुळे 'चालून जातंय तर हरकत नाही', अशा मानसिकतेमुळे आपल्या आयुष्याचा, व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा घटक असलेल्या भाषेची मोडतोड सहजपणे झालेली दिसते.

गंमत अशी, की हे सारे एका पातळीवर चालू असताना, बोलीभाषेची अस्मिता आणि प्रमाणभाषेचा दुराग्रह यांच्यातला संघर्ष ठाय ठायी दिसतो. यामुळे भाषा भगिनी न राहता त्या विरोधी होऊ लागल्या आहेत. हिंदी, इंग्रजी भाषांच्या स्वीकारामुळे त्यांच्याबद्दल दुस्वासाची भावना टोकदारपणे मांडली जाऊ लागली आहे.

वास्तविक विचार करता, जगातील प्रत्येक भाषा संदेश पोचवण्यासाठी, संवाद साधण्यासाठी, घडवण्यासाठी समर्थ आहे. तिच्याविषयी असलेली साशंकता त्या भाषेच्या वापरकर्त्याला त्या भाषेतून बोलायला असमर्थ करते आणि म्हणून इतर भाषेतील शब्दांची मदत घेतली जाते. भाषेची सरमिसळ ही संदेश पोचवणे यापुरतीच मर्यादित राहिली पाहिजे. आता भाषा केवळ जणू संदेशासाठी.. असे वाटून, तो एकमेव घटक महत्त्वाचा समजला जाऊ लागला आहे की काय, असे मनात येते.

इंग्रजी माध्यमातून शिक्षण, मनोरंजनाची हिंदी ही मोठी बाजारपेठ आणि उच्चस्तरीय लोकांचे परदेशाकडे डोळे लावून पाल्यांना मोठे करण्याचे स्वप्न, यामुळे त्यांचे अनुकरण करणारे निम्नस्तरीय लोक जितके जमेल तितके त्यांचे अनुकरण करतात. त्यामुळे 'मेट्रोपोलिटन' असे नामाभिधान अशा सरमिसळ भाषेला दिले गेले. याची जाणीव जागृत झाली की भाषेची शुद्धता आणि भाषेवरील इतर भाषांचे आक्रमण अशी उद्रेक जागवणारी भाषणे केली जातात आणि लेख लिहिले जातात. हा एक ' इव्हेंट' पार पडला, त्याची बातमी झाली की हलली गेलेली मने आणि विचार पूर्वपदावर येऊन ... पुन्हा आहे ते चालू राहते.

त्यात आता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने यंत्राच्या भाषेतून स्वतःला व्यक्त करण्याची सुलभता घरोघरी पोचली आहे. त्यावर कार्यशाळा होत आहेत. भाषा नीट लिहिता बोलता येत नसली तरी एआयच्या मदतीने लिखाणात त्याचा परिणाम दिसत नाही. मात्र आपल्याला असे लिहिता येत

नाही, याबद्दल कमीपणा, अपराधीपणा वाटणे अगदीच दुर्मिळ झाले आहे. Chat gpt चा वापर धुके पसरावे, तसा पसरला आहे. मोबाइलचे व्यसन पसरले त्याच्या कितीतरी पट वेगाने आत्मसात होत आहे. विद्वान समजले जाणारे अनेक जण या chat gpt चे दाखले देऊ लागले आहेत. एका सुविद्य नागरिकाने वर्ल्डस्वर्थच्या शैलीत मला एक कविता पाठवली. मी ही कविता वाचल्याचे आठवत नव्हते. म्हटले, कुठली कविता ही? तर त्याने सांगितले, 'माझी! gpt च्या मदतीने केलेली.' ही त्याची कविता कशी होऊ शकेल? हा भस्मासुर किती विकोपाला जाईल याची कल्पनाच करता येत नाही. हे लिहीत असताना त्यात आणखी काही आणखी 'सुधारणा' झाल्याही असतील. मी महाविद्यालयात शिकवत असताना, पीएचडीचे एक मार्गदर्शक गुगलमधून संदर्भ घेणे कसे बरोबर आहे, पुस्तके वाचायची गरज नाही, हे बेधडकपणे सांगत होते, हे ऐकून तेव्हा सुन्न झाले होते. आज या 'एआय'मुळे याच्याही पुढे एक पाऊल पडले आहे असे वाटते. काही दिवसांनी खरे-खोटे समजेनासे होऊन अभिव्यक्तीमध्ये व्यभिचार माजेल, अशी भीती माझ्या मनात आल्यावाचून राहत नाही.

भाषेमध्ये विस्तारलेपण असायला पाहिजे, दुसऱ्या भाषांचा आदर पाहिजे, नव्या विचारांचे, जाणिवांचे पाझर आत्मसात करून ती नदीसारखी प्रवाहीच असली पाहिजे. त्यातली ऊर्जा, ऊर्मी, चैतन्य आणि जिवंतपणा असेल तरच ती रसरशीत आणि आरोग्यपूर्ण राहील. बोलताना; हिंदी, संस्कृत, फारसी आणि इंग्रजी, प्राकृत; कदाचित इतर आणखी भाषांधील शब्द येण्याने ती गढूळ होत नाही.. उलट संवादपातळीवर अशा भाषेला एक नवा आकर्षक पैलू प्राप्त होतो, असे मला प्रामाणिकपणे वाटते. भाषेची गोडी एकदा समजली की त्या भाषेतील साहित्याचा आस्वाद घेऊन आंतरिक आनंद घेता येतो. अधिक समृद्धपणे त्यातील सौंदर्याचा आस्वाद घेता येतो. भाषा आपली झाली की त्या भाषेतून चांगले व्यक्त होता येते. संस्कृत भाषेमध्ये व्यक्ती म्हणजे व्यक्त होणारा माणूस. मग माणूस ते व्यक्ती हा प्रवास सुरू होतो. आपण जे वाचतो, बोलतो त्यावरून आपल्या अनुभूतीचा दर्जाही ठरत असतो.


मी विद्यार्थ्यांना या मोडतोडीबद्दल दूषण देणार नाही. 'भाषा'व्यतिरिक्त विषयांचा आणि शुद्धलेखनाचा काय संबध? या विचारात त्या दूषित भाषेच्या रोगाचे मूळ आहे. असा भाषेचा वारसा पुढे पोचवला न जाण्याची आपल्या प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. भाषेतील ठळक असणारे बारकावे. 'सुध्लेखनाचा मात्र माझा गोंधळ होतो' असे म्हणणे हे कौतुकाने सांगण्याची बाब नाही, हे जाणवून दिले आणि ते जाणवून घेतले तर कदाचित हा कमीपणा आहे, खरे न्यूनत्व हे आहे असे वाटू लागेल. हे चालते आहे, असे दिसले की ते सर्रास चालू लागते. यासाठी नको आहे ते नाहीसे करण्याची आपली सगळ्यांची जबाबदारी नाही का?

**– अपर्णा महाजन**
aparnavm@gmail.com

ग्रंथाली

मुक्काम
पोस्ट
अटलांटा
व्हाया दहिसर

रवी मल्ल्या




**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**
**टपालखर्च ३० रु.**

हे लिखाण म्हणजे अटलांटा किंवा अमेरिकेचा इतिहास नाही किंवा अमेरिकन संस्कृतीचे उदात्तीकरणही नाही, गेल्या काही महिन्यातील माझ्या जॉन्स क्रीक, अटलांटा येथील वास्तव्यात मला जे आढळून आले, जे माझ्या दृष्टिपथात आले अशा अनेक गोष्टी मी इथे नमूद करण्याचा प्रयत्न केला आहे. या पुस्तकात अटलांटाचे प्रवासवर्णन जरी असले तरी त्याचबरोबर अमेरिकन जीवनमान, तिथे स्थायिक झालेल्या आपल्या तरुण पिढीची बदललेली जीवनशैली, त्या तरुण पिढीचा आणि इथल्या ज्येष्ठ पिढीचा होणारा वैचारिक आणि मानसिक संघर्ष याचेही लिखाण करण्याचा मी प्रयत्न केला आहे.



# गेल्या तीन दशकांतील मराठी कथा : काही निरीक्षणे

प्रा. डॉ. अजय देशपांडे

ललित साहित्यकृतींतून समाजाच्या सांस्कृतिक इतिहासाचे दर्शन होत असते. खरे तर ललित साहित्य हा व्यापक अर्थाने समाजाचा इतिहासच असतो. समाज आणि साहित्य यांचे संबंध परस्परपूरक असतात.

''साहित्य आणि समाज यांच्यातील संबंध अन्योन्य असतात, साहित्य हे केवळ सामाजिक कारणांचा परिणाम नसते तर ते सामाजिक परिणामांचे कारणही असू शकते,'' हे हॅरी लेविन यांचे विधान अन्वर्थक आहे. विशिष्ट सामाजिक परिणामांतून निर्माण झालेले ललित साहित्य अनेक सामाजिक परिणामांचे कारणही होऊ शकते. गेल्या तीन दशकांतील बदललेल्या सामाजिक सांस्कृतिक पर्यावरणाने मराठी ललित साहित्य अंतर्बाह्य बदलले. बदललेल्या ललित साहित्याच्या आशय आणि रूपबंधाची चर्चाही फार झाली. सामाजिक परिणामांच्या सृजनशील पर्यावरणातून अंकुरलेले ललित साहित्य समाजजीवनास मानुष विचारांनी जगण्याची नवी ऊर्मी देत आले. प्रत्येक कलाकृती तिच्या काळाचा स्वतंत्र उच्चार असते. त्या विशिष्ट काळातील मानवाच्या जगण्याचे अर्थपूर्ण विधान असते. या तीन दशकांतील मराठी माणसांच्या जगण्यातून अंकुरलेल्या मराठी साहित्याने मराठी माणसाच्या जीवनाचा अत्यंत गंभीरपणे विचार केला आहे.

गेल्या तीस वर्षांतील कथा, या ललित साहित्य-प्रकाराच्या प्रवाहाची स्थितिगती, वैशिष्ट्ये, लेखन प्रेरणा व प्रवृत्ती, आशयवैशिष्ट्ये, भाषावैशिष्ट्ये, वेगळेपण आदी विषयांची संक्षिप्त चर्चा-चिकित्सा करत काही निरीक्षण येथे नोंदवावयाची आहेत.

सन १९९० ते २०२० किंवा त्यानंतरच्या काळात कथालेखनात स्थिरावलेले आणि आजचे लेखक म्हणून ज्यांचे कथालेखन उल्लेखनीय, मौलिक असे ठरले आहे त्या काही कथाकारांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

राजन गवस, उत्तम कांबळे, जयंत पवार, सदानंद देशमुख, आसाराम लोमटे, प्रज्ञा दया पवार, नीरजा, प्रिया तेंडुलकर, मेघना पेठे, प्रतिभा जोशी, अरुणा ढेरे, लक्ष्मीकांत देशमुख, अनंत सामंत, ऊर्मिला पवार, सतीश तांबे, बाबाराव मुसळे, रवीन्द्र शोभणे, धर्मराज निमसटकर, मधुकर धर्मापुरीकर, बाळ फोंडके, सुबोध जावडेकर, माधुरी शानबाग, लक्ष्मण लोंढे, मिलिंद बोकिल, सुमेध वडावाला (रिसबूड), विजय पाडळकर, गणेश मतकरी, अर्जुन व्हटकर, कृष्णात खोत, मनोहर सोनवणे, अशोक कोळी, प्रणव सखदेव, ऊर्मिला शिरूर भारत काळे, मोहन पाटील, कृष्णा किंबहुने, किरण गुरव, बाबाराव मडावी, प्रशांत बागड, समर खडस, सचिन कुंडलकर, योगीराज वाघमारे, संजीव लाटकर, विजय गोविलकर, श्याम पेठकर, रवीन्द्र लाखे, शिल्पा कांबळे, दिवाकर कृष्ण, मनस्विनी लता रवीन्द्र, अरुण मांडे, अस्मिता नाईक, रूपेश पाटकर, किरण येले, जी.के. ऐनापुरे, सुरेन्द्र दरेकर... ही नामसूची आणखी वाढवता येईल.एकूणच काय तर आज मराठीत कथालेखन करणारे अनेक कथाकार आहेत आणि वृत्तपत्रांच्या साहित्यविषयक पुरवण्या आणि नियतकालिकांच्या पडझडीच्या काळातही दिवाळी अंकांत आणि संग्रहस्वरूपात प्रकाशित होणाऱ्या कथांची संख्या लक्षणीय आहे.

जयंत पवार यांचे 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर', 'वरनभातलोन्चा नि कोन नाय कोन्चा', 'मोरी निंद नसानी होय', 'लेखकाचा मृत्यू आणि इतर गोष्टी' हे चार कथासंग्रह आहेत. जयंत पवार यांनी पूर्वकालीन आणि समकालीन कथाकारांपेक्षा वेगळी आणि महत्त्वाची कथा लिहिली. २०१० मध्ये जयंत पवार यांच्या 'फिनिक्सच्या राखेतून उठला

मोर' कथासंग्रहापासून मराठी कथेचे नवे पर्व सुरू झाले आहे.

या तीस वर्षांतील मराठी कथेचे चित्र निराशाजनक नाही, उलट ते बरेच आशावादी आहे. आजची मराठी कथा प्रयोगशील आहे. आशय, रूपबंध आणि भाषा या दृष्टीने नवे कालसुसंगत प्रयोग कथा या वाङ्मयप्रकारांतच होत आहेत. हे प्रयोग मराठी कथेचे नवे रूप घडवण्यास उपकारक ठरत आहेत. जयंत पवार, नीरजा, मोनिका गजेंद्रगडकर, गणेश मतकरी, अभिराम भडकमकर, विजय पाडळकर, प्रणव सखदेव या कथाकारांच्या कथा यासंदर्भात लक्षणीय आहेत.

आज मराठी कथेच्या ऐरणीवर नवे आणि अलक्षित विषय घेतले जात आहेत. कथानकाचे पठडीबाज रूप आजची उत्तम कथा नाकारते. सशक्त कथाबीज आणि समाज वास्तवाची उत्तम जाण असणारा लेखक असे समीकरण आजच्या कथेसाठी उपयुक्त ठरले आहे. आसाराम लोमटे यांच्या 'इडा पिडा टळो', 'खुंदळण', 'ओझं', 'वळण', 'होरपळ' या कथा, प्रतिमा जोशी यांच्या 'जहन्नम', 'तेरावी गल्ली', 'नग्नसत्य', 'सत्यकाम जाबाली' या कथा, प्रज्ञा दया पवार यांच्या 'एक्झिट', 'विहार', 'तिघाडा', 'टॅग्ड अगेन' या कथा, सदानंद देशमुख यांच्या 'लाल अंधार', 'गाभूळगाभा', 'मांडव', 'महालूट' या कथा, जी.के. ऐनापुरे यांच्या 'अंतर', 'राप' या कथा, गणेश मतकरी यांच्या 'इन्स्टॉलेशन्स', 'रिमाइंडर', 'ट्रामा', 'गेम' या कथा, प्रणव सखदेव यांच्या 'नाभितून उगवलेल्या वृक्षाचं रहस्य', 'भाजीवाला', 'ग्लोरिया' या कथा सुबोध जावडेकर यांच्या 'मेंदूची बाळं', 'ऑपरेशन राहत', 'अखेरची साक्ष' या कथा, नीरजा यांच्या 'ओल हरवलेली










माती', 'सुशांतचा सोळावा वाढदिवस', 'विटाळ' या कथा समकालीन वास्तवाचे विविध आणि अलक्षित पैलू उलगडून दाखवणाऱ्या आहेत. सशक्त आशयद्रव्य आणि वास्तवदर्शी शैली, तंत्रकुशलतेपेक्षा, रचनासौंदर्यापेक्षा जीवनाचे आहे ते रूप प्रकट करण्याची स्वाभाविक प्रवृत्ती आणि कालसुसंगतता यांमुळे या कथा आजच्या मराठी साहित्याच्या प्रवाहात लक्षणीय ठरल्या आहेत. कथेचे कथापण सशक्त आशयबीजासह भाषेवरही अवलंबून असते. कथानक-कथाविषय साकार करण्यासाठी साजेशी भाषा हवी. ज्या माणसांचे जगणे कथेत आले आहे त्या माणसांची भाषा जगण्याच्या साऱ्या ताण्या-बाण्यांसह कथेत येणे अपेक्षित आहे. उत्तम कांबळे, जयंत पवार, सदानंद देशमुख, प्रज्ञा दया पवार, अभिराम भडकमकर, गणेश मतकरी, अशोक कौतिक कोळी, जी.के. ऐनापुरे, श्याम पेठकर, नीरजा, किरण येले, प्रणय सखदेव या आजच्या कथालेखकांची भाषा वास्तवाचे आहे तसे अंकन करण्यात यशस्वी ठरली आहे. या लेखकांनी जीवनाची-जगण्याची आहे ती भाषा धीटपणे स्वीकारली. जसे जगणे तशीच कथा म्हणून प्रत्यक्ष जगण्याच्याच भाषेचे कथेत उपयोजन हे सूत्र या कथाकारांनी स्वीकारले आहे. राजन गवस यांच्या 'रिवणावायली मुंगी', 'आपण माणसात जमा नाही' या संग्रहांतील कथांमधील भाषेने आजच्या मराठी कथेच्या भाषेला घडणीचे नवे परिमाम दिले आहे.

जयंत पवार यांच्या कथांची भाषा आणि कथेतील सांस्कृतिक पर्यावरण लक्षणीय आहे. नवी कथा घडवणारा लेखक म्हणून जयंत पवार यांचे मोलाचे योगदान आहे. भाषा समाजवास्तवाचे निर्देशन करत असते, आजच्या समाजवास्तवाचे भाषेच्या अंगाने कथेतील निर्देशन फार मौलिक आहे.

जयंत पवार यांचे एक सामर्थ्य असे, की प्राचीन कहाण्यांचा भाषिक रूपबंध आणि आजचे व्यामिश्र जीवन यांचे अनोखे मिश्रण (यासाठी संगीतातली फ्युजन ही संकल्पना अधिक नेमकी वाटते) त्यांनी केले आहे. आशयद्रव्य आणि रचना या दोन्ही पातळयांवर हे फ्युजन आजच्या मराठी कथेला उपकारक ठरणार आहे. या संदर्भात 'शीवलीलामृता'च्या कथनशैलीतून साकारलेली 'बैल' ही अल्पाक्षरी कथा, महाभारतातील लाक्षागृह जाळण्याच्या घटनेमागील शहकाटशहाच्या रक्तरंजित राजकारणाचे समकालीन वास्तवापर्यंत आलेले क्रूर धागेदोरे उकलणारी 'लाक्षागृह' ही कथा, मौखिक परंपरेतील कथनशैलीतून साकारलेली 'तुझीच सेवा करू काय जाणे' ही गिरणगावातील सांस्कृतिक परिवर्तनाच्या माध्यमातून एकूणच महानगरीय जीवघेण्या स्थित्यंतराचा वेध घेणारी कथा, या आणि अशा काही त्यांच्या कथा लक्षणीय आहेत. महानगरीय बहुलक्षी वास्तवाचे पीळ उकलून आणि पैलू दर्शवताना जयंत पवार इतिहासातील आणि पौराणिक साहित्यातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय अशा बहुविध पर्यावरणाचा, माणसांच्या जगण्यातील ताण्याबाण्यांचा, वृत्तीप्रवृत्तींतील विकृतींचा साक्षेपी शोध घेतात आणि त्यांचे वर्तमान वास्तवाच्या पार्श्वभूमीवर नवे अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करतात. 'लाक्षागृह'सारखी कथा वाचताना हा प्रत्यय येतो. मिथकांच्या पुनर्वाचनाच्या निमित्ताने जयंत पवार इतिहासाची आणि पौराणिक साहित्याच्याही पुनर्वाचनाची गरज अधोरेखित करतात. 'जे हत्ते कालाचे ठायी', 'तुझीच सेवा करू काय जाणे' या कथा यासंदर्भात लक्षणीय आहेत.

कथा या ललित साहित्यप्रकाराच्या माध्यमातून सांस्कृतिक इतिहासाचा










डोळसपणे शोध घेण्याचा हा प्रयत्न फार मोलाचा आहे. 'बाबू भंगारवाल्याच्या वखारीतील दुपार' या कथेत ऐतिहासिक संदर्भ आणि वास्तव यांच्या मिश्रणातून समकाळाचे प्रत्ययकारी आकलन मांडलेले आहे.

आजची गावगाड्याची मराठी कथा पूर्वीच्या निव्वळ मनोरंजनासाठीच्या निर्मितिप्रयोजनातून बाहेर पडली आहे. मनोरंजन करणाऱ्या या कथा नव्हेत. या कथांच्या तळाशी संक्रमणकालीन विपथगामी समाजवास्तवाच्या असंख्य रूपांची गुंतवळ आहे. गावगाड्याच्या सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, तांत्रिक, परिसरीय, अस्मानी, सुलतानी वगैरे अनेक प्रश्नांची जाण ज्यांच्या हाती सत्तासूत्रे आहेत अशांना अजिबात नाही, ही स्पष्ट जाणीव बऱ्यापैकी संवेदनशून्य बनलेल्या गावगाड्याबाहेरच्या शहरी जगाला करून देण्याची आणि जगाचे लक्ष गावगाड्यावर केंद्रित करण्याची प्रामाणिक धडपड या कादंबऱ्यांच्या लेखनप्रेरणांच्या तळामुळाशी आहे. या कादंबऱ्यांमधून मांडलेल्या समकालीन समाजवास्तवातच परिवर्तनाच्या प्रेरणा दडल्या आहेत. समाजसापेक्ष साहित्यकृतींच्या अंतरंगातच परिवर्तनाची बीजे दडलेली असतात ती वाचकांच्या संवेदनशील मनात रुजणे हे त्या साहित्यकृतीचे खरे कार्य असते गावगाड्याचा वाईट वर्तमानकाळ हा त्याचा भविष्यकाळ असू नये असा विचार प्रस्फुटित करण्याची ऊर्जा सदानंद देशमुख, आसाराम लोमटे यांच्या कथांमध्ये दडली आहे.

दर दिवशी ढासळत जाणाऱ्या गावगाड्याचे चित्रण असणाऱ्या या कथांची भाषा साक्षात ग्रामजीवनाची जिवंत अशी भाषा आहे. सदानंद देशमुख यांच्या कथांच्या शीर्षकांकडे नजर फिरवली तरी ग्रामजीवनातील भाषेतील

जिवंत आणि आशयप्रधान शब्दांचा प्रत्यय येतो. उदाहरणार्थ– 'भोगवटा', 'कडकी', 'चिरोटी', 'भणक', 'इळद', 'सारवण', 'लचांड', 'उठावण', 'वाघरुळ', 'पोटमारा', 'चूलखांड', 'काऊस', 'बरास', 'भगदाड', 'हेळणा', 'कचाटा', 'घरभुली', 'गव्हाण', 'रगडा', 'जंजाळ', 'उतारा', 'खूरतुडवा', 'सर्कती', 'लवकांड', 'बखाड', 'उकीर', 'जुडगा', 'पळसपापडी', 'गाभुळगाथा', 'घेवपाठ', 'मूळतुडवा', 'घसमट', 'गदका', 'हिकमत' ही सारी कथाशीर्षके ग्रामीण बोलीतली आहेत; हे सारे शब्द कथेच्या आशयाचे नेमके, नेटके, प्रत्ययकारी दर्शन घडवणारे आहेत. अर्थसघन हेल, आशयसमृद्ध म्हणी, वाक्प्रचार, शब्दांच्या पलीकडचा आशय मांडणारी काव्यात्मकता ही आणि अशी सारी सामर्थ्य एकवटलेली बोली सदानंद देशमुख यांच्या कथांमध्ये साऱ्या स्वरूपवैशिष्ट्यांसह प्रकटली आहे. बोलीभाषेतील शब्दश्रीमंतीचा प्रत्यय सदानंद देशमुख, आसाराम लोमटे यांची प्रत्येक कथा वाचताना येतो.

मराठीत विज्ञानकथा लेखकांची संख्या फार कमी आहे, निरंजन घाटे, जयंत नारळीकर, बाळ फोंडके, लक्ष्मण लोंढे, शुभदा गोगटे, माधुरी शानभाग, अरुण मांडे, सुबोध जावडेकर यांच्यासह आणखी काही लेखकांनी विज्ञानकथेचा प्रवाह जिवंत ठेवला आहे. 'करड्या छटा', 'रोबोट फिक्लिंग', 'स्वप्न–चौर्य', 'जीवनचक्र' हे निरंजन घाटे यांचे या पंधरा वर्षांतले महत्त्वाचे विज्ञानकथा संग्रह आहेत. 'उद्याची चाहूल' (सुबोध जावडेकर), 'तीन पायांची शर्यत' (बाळ फोंडके) 'चिक्कार नंतरच्या गोष्टी' (मेघश्री दळवी), 'तेथे जिवाणू जगती' (मधुकर दिवेकर) हें विज्ञानकथा संग्रह समकालीन संदर्भात महत्त्वाचे ठरतात.

समग्र जीवनव्यवहाराचे व्यापक भान, समकालीन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारण, अर्थकारण, धर्मकारण यांसह एकूणच सांस्कृतिक पर्यावरणाची साद्यंत माहिती, इतिहास व समकाळाचे भान, समाजव्यवस्था जात, धर्म यांतील सूक्ष्म ताण्या–बाण्यांची जाण, शेती, शेतीचे व गावगाड्याचे प्रश्न, गावगाड्याचे सांस्कृतिक वास्तव यांसह एकूणच महानगरांतील उद्योगविश्वासह तळपातळीपासूनच्या जीवन वास्तवाची जाण, समकालीन चंगळवाद, बाजारूपण, सर्व पातळ्यांवरची अनास्था व दुराचार, मूल्यभ्रष्टता, मूल्यहीनता अशा एकूणच समाजवास्तवाचे आकलन करण्याची क्षमता आजच्या या कथाकारांजवळ आहे. मुख्य म्हणजे या कथाकारांजवळ भाषेची उत्तम जाण आणि कथा या ललितसाहित्य लेखनप्रकाराचे उत्तम ज्ञान, त्याचे सामर्थ्य आणि मर्यादा याचीही जाण असल्याचे दिसते. त्यामुळे कथा या साहित्यप्रकाराच्या रचनातंत्रासह एकूणचच रूपबंधात काही बदल घडवून आणण्याची क्षमता या कथाकारांजवळ आहे. आजची कथा आशयनावीन्य आणि रूपबंध दृष्ट्या बदलत आहे. हा बदल फार मोलाचा आहे.

आजच्या स्त्री कथाकारांनी दर्जेदार अशा लक्षणीय मराठी कथा लिहिल्याचे दिसते. समकालीन वास्तवात वेगवेगळ्या पातळ्यांवर होणारी स्त्रीची कुचंबणा, घुसमट काही लेखिकांच्या कथांचा विषय झाला आहेच, स्त्रीकेंद्री प्रश्नांच्या पलीकडे जाऊन व्यापक अशा सामाजिक–सांस्कृतिक पर्यावरणाचे अंकन करणारी नवी कथा या लेखिकांनी धीटपणे, आणि कलात्म रितीने साकार केली आहे. या लेखिकांनी कथेच्या माध्यमातून साकार केलेली वाङ्मयीन प्रयोगशीलता कथेच्या प्रवासाला नवी ऊर्मी देणारी आहे. या लेखिकांच्या कथा समकालीन स्त्रीप्रतिमेचे वास्तवदर्शी आणि कलात्म दर्शन घडवण्यातही यशस्वी ठरल्या आहेत. वैशिष्ट्यपूर्ण निवेदनतंत्र, कथानकाच्या गरजेनुसार मांडणी, प्रभावी कथा घाट आणि आशयाशी सुसंगत अशी शैली व भाषा यांमुळे या काळातील कथालेखिकांचे कथालेखन मौलिक ठरले आहे. यासंदर्भात उदाहरण म्हणून नीरजा यांचे 'जे दर्पती बिंबले', 'ओल हरवलेली माती', 'पावसात सूर्य शोधणारी माणसं' हे कथासंग्रह, प्रज्ञा दया पवार यांचा 'अफवा खरी ठरावी म्हणून' हा कथासंग्रह, मोनिका गजेन्द्रगडकर यांचे 'भूप', 'आर्त', 'शिल्प' हे कथासंग्रह, प्रतिमा जोशी यांच्या कथा. मेघना पेठे यांचा 'आंधळ्याच्या गायी' हा संग्रह, ऊर्मिला पवार यांचा 'हातचा एक' हा कथासंग्रह, मनस्विनी लता रवीन्द्र यांचा 'ब्लॉगच्या आरशापल्याड' हा कथासंग्रह या संग्रहांची नावे नोंदवता येतात.

आजच्या काही कथाकारांचे वैशिष्ट्य असे की ते अत्यंत सूक्ष्मपणे जीवनाचा अभ्यास करत कथेत जीवनाची अनेक रूपे साकारताना प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे नैतिकतेचा आग्रह धरतात. केवळ वेगळेपण किंवा वैविध्य म्हणजे गुणवत्ता नव्हे याचे भान आजच्या लेखकांना आहे. त्यामुळे केवळ वेगळेपण अथवा केवळ वैविध्य यांमागे लागून रंजक, शैलीबाज लेखन करणे आजच्या काही कथाकारांनी टाळले आहे. आजच्या अनेक कलाकारांनी तर अगदी मोजके कथालेखन केले असल्याचेही दिसते. जागतिकीकरणाच्या या स्थितीत गोंधळलेल्या, घाबरलेल्या, आर्थिक दृष्ट्या नागवलेल्या. चंगळवादाने मुक्त लैंगिक स्वैराचाराने बावरलेल्या, हिंसाचाराने अत्याचाराने स्तिमित–निःशब्द झालेल्या, उदासवाणे भयग्रस्त जीवन जगणाऱ्या हतबल


अशा शहरी व ग्रामीण माणसाला वास्तवाचे आकलन करून देत, नैतिकला न सोडण्याचे पटवून देत निर्भय वातावरणात सकारात्म कृतीने जगण्याचे बळ देण्याचा प्रयत्न आजचे कथाकार कथालेखनातून करत आहेत. माणसांना आणि विचारांना केंद्रबिंदू मानणारी कथा लिहिली जात आहे. साहित्य जीवनाच्या शाश्वत सत्याचा शोध घेत असेल तर त्या शोधाची वाट समकालीन घटनांमधूनच जात असते. आजचे मराठी कथाकार वेगवेगळ्या पद्धतीने आणि अनेक बाजूंनी समकालीन समाजवास्तव पिंजून काढत आहेत. हे चित्र आशादायी आहे. आजच्या मराठी कथेसमोर मोठी आव्हाने निश्चितच आहेत, पण या आव्हानांना पेलण्याचे सामर्थ्यदेखील आजच्या कथेच्या ठायी आहे. आजची मराठी कथा विशिष्ट काळाची असतानाच कालातीत होण्याचे सामर्थ्यही काही कथांच्या ठायी निश्चितच आहे. या तीस वर्षांत कथा या वाङ्मयप्रकाराचा बराच विकास झाल्याचे दिसते. लघुकथा, लघुरूपकथा, क्षणकथा, अपहरणकथा, राजनीतिककथा, पर्यावरणकथा, रूपककथा, भयकथा, सूडकथा, गूढकथा, विज्ञानकथा, रहस्यकथा, शौर्यकथा, संदेहकथा या आणि आणखी अनेक प्रकारच्या कथा लिहिल्या जात आहे. जुने जाणते आणि नवे लेखक नव्या आणिवांच्या नव्या कथा लिहीत आहेत. कथेचा प्रवाह मोठा मोठा होत आहे.

साहित्यकृतींचा विचार सौंदर्यशास्त्रीय पद्धतीने करण्यापेक्षा संविधानाच्या मूलभूत तत्त्वांशी बांधिलकी ठेवणाऱ्या सामाजिक जाणिवांच्या मानवतावादी तत्त्वविचारांनी होण्याची गरज असते. लेखकाचे प्रतिभावंत मन माणसांच्या जगण्याशीच सहकंप पावलेले असते. सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणाशी लेखकाचे अतूट नाते असते आणि लेखकाच्या कलाकृतीतून ते अभिव्यक्त होत असते. खरे तर समाजसापेक्ष सहित्यकृतींचे सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणाशी जैविक नाते असते. माणसांच्या जगण्याचे ऐतिहासिक, मानसशास्त्रीय, समाजशास्त्रीय, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय असे आणि आणखी कितीतरी पदर समाजसापेक्ष साहित्यकृतींमधून आविष्कृत होत असतात. अशा कलाकृती माणसांचे जगण्याचे भान जागृत करत असतात. ज्यांचे कोणी नाही आणि ज्यांच्या आयुष्यात अन्याय, वंचितता, दुःख यांचेच साम्राज्य आहे अशा वंचितांचे अश्रू पुसण्याचे, त्यांच्या अश्रूंना शब्द देण्याचे त्यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडण्याचे, त्यांच्या जगण्याला नैतिक ऊर्जा देण्याचे, विचारांची लढाई विचारांनी लढण्याची उमेद देण्याचे, संविधानाच्या मूलभूत तत्त्वांशी बांधिलकी ठेवून नव्या क्रांतीचे समाजशास्त्र ठरवण्याचे महत्त्वाचे कार्य या समाजसापेक्ष कलाकृती करत असतात. या कलाकृती कणा मोडून पडणाच्या माणसांना पुन्हा ताठ कण्याने उभे राहून लढण्याची वैचारिक-नैतिक-मानसिक ऊर्जा देत असतात. अशा कलाकृतींची संख्या कमी असली तरी त्यांचे सामाजिक परिणाम फार मोठे आणि मूल्याधिष्ठित म्हणून फार महत्त्वाचे असतात. या दृष्टीने गेल्या तीस वर्षांतील मराठी कथेच्या प्रवाहाचा विचार केला तर पदरी निराशा येत नाही. मराठी कथेची वाटचाल आश्वासक असल्याचे स्पष्ट दिसते.

सांस्कृतिक इतिहासाच्या लेखनाची सामग्री शोधणे, पुरावे गोळा करून त्या सामग्रीचे नीरक्षीरविवेकाने विश्लेषण करणे आणि सांस्कृतिक इतिहासाचे लेखन करणे आदी कार्ये अत्यंत महत्त्वाची आणि परिश्रमाची पराकाष्ठा पाहणारी असतात. सांस्कृतिक इतिहासाची एक सामग्री म्हणजे ललित साहित्य होय. आजची मराठी कथा सांस्कृतिक इतिहासाच्या लेखनाला पूरक असा मौलिक ऐवज देणारी आहे.

**– प्रा. डॉ. अजय देशपांडे**
deshpandeajay15@gmail.com

॥ग्रंथाली॥




**आणि मी रस्ता ओलांडला**

**श्रीकांत बोजेवार**

**मूल्य १५० रु.**
**सवलतीत १०० रु.**
**टपालखर्च ३० रु.**



# पेंटहाऊस

वसंत वसंत लिमये

काळी सॅक पाठीवर लटकवत, राजेश घाईघाईनं घराबाहेर पडला. मनगटावरील घड्याळाचे काटे ९.२५ अशी वेळ दाखवत त्याच्याकडे रागावून पाहत होते. गावाकडून रमेशकाकांचा फोन आल्याकारणानं निघायला तसा उशीरच झाला होता. राजेश रमाकांत जाधव, वय ४५, मूळचा कोकणातील पाटणूस जवळच्या सावलेवाडीचा. खाली, 'अंबा मॅन्शन'च्या चौथ्या मजल्यावरून धडधडत जाणाऱ्या लोकल दिसत होत्या. शेजारीच मस्जिदबंदर स्टेशन होतं. वर्षानुवर्षांच्या वापरानं जिन्याच्या पायऱ्यांना गुळगुळीत होऊन खड्डे पडले होते. खडखडणाऱ्या खटारा लिफ्टची वाट न पाहता, राजेश घाईगडबडीनं जपून खाली उतरून सुरत स्ट्रीटवर बाहेर पडला. इमारतीच्या मागच्या बाजूस मस्जिदबंदर सायडिंग रोडवर दीडशे वर्षं जुनं 'राम तेरी माया' हे मंदिर होतं. मंदिरापाशी जाऊन बाहेरूनच नमस्कार करून तो सुरत स्ट्रीटवर परत आला. वेगवेगळ्या आकारांच्या हातगाड्या, ठेले आणि 'पैस' असं ओरडत चाललेले, घामानं निथळणारे हमाल यांची वर्दळ जोरात सुरू झाली होती. या परिसरात कळकटपणा असला तरी बकालपणा नव्हता. सकाळची खचाखच रहदारी इथे नेहमीचीच. इतक्या वर्षांनंतर ओसाड पडलेली, पण शिस्तीत बांधून काढलेली, थकत चाललेली गोदामं दुतर्फा होती. आज मुंबई बंदर भरभराटीस आलं असलं तरी आता सभोवतालची बाजारपेठ रोडावत चालली आहे. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटापासून हे बंदर भरभराटीस आलं. पूर्वी बंदराला समांतर असलेल्या, आसपासच्या दहा चौरस किलोमीटर क्षेत्रातून भारतातील फार मोठा व्यापार चालत असे. १८५७ चे स्वातंत्र्यसमर, १८६९मधील सुवेझ कालवा, चिनी ओपियम (अफू) वॉर आणि अमेरिकन यादवी अशा विस्कळीत, असंबद्ध वाटणाऱ्या घटना, पण यांच्या जोडीला भारतीय कापसाची निर्यात असा विषय येताच मुंबई बंदराचं महत्त्व आपल्या लक्षात येतं. किंबहुना यामुळेच सात बेटांच्या समूहाचा विकास होऊन 'बॉम्बे'चा जन्म झाला! ऐतिहासिक घटना आणि भूगोल विलक्षण पद्धतीनं तेव्हा एकत्र आले येवढं मात्र खरं! बाहेर नुकतीच पावसाची सडकून सर येऊन गेली होती. हातातील छत्री काळ्या सॅकमध्ये कोंबत, सवयीनं त्यानं वर पाहिलं.

बाबा, संध्याकाळी चॉकलेट विसरू नको हं! हात हलवत शिवानीनं ओरडून 'बायबाय' केला. शिवानी म्हणजे धाकटी मुलगी, वय १५, या वर्षी दहावीला होती. मेट्रोजवळच्या नामांकित सेंट झेव्हियर्स या इंग्रजी मिडीयम शाळेत जात असे. फार पूर्वी राजेश आणि राधिकानं खर्चीक असूनही दोन्ही मुलांना उत्तम शिक्षण द्यायचा निश्चय केला होता. शिवानी तिचा एवढी मोठी झाली तरी चॉकलेटचा हट्ट काही सुटत नव्हता! बायबाय करून हसत हसत राजेश झपझप पावलं टाकत पी. डिमेलो रोडकडे निघाला. आडव्या जाणाऱ्या संत तुकाराम रस्त्यावरील 'झिप्पो' चौकात गणेशोत्सवाच्या मांडवाची जोरदार तयारी सुरू होती. १९२३ साली, लोकमान्यांच्या प्रेरणेनं सुरू झालेल्या गणेशोत्सवाचा या वर्षी शतकमहोत्सव होता! याचं नाव पूर्वापार 'झिप्पो गणपती' असंच होतं. गेल्या दहा वर्षांत नवीन फॅशनप्रमाणे त्याचं 'सुरतचा राजा' असं नामकरण झालं होतं. रोजची बस चुकल्यानं, वाटेतील चिखल, पाण्याच्या डबक्यांची फारशी पर्वा न करता तो धावतपळत बस स्टॉपकडे निघाला होता. राजेश धापा टाकत डिमेलो रोडवरील 'लोहा भवन'च्या स्टॉपवर पोचला. शेजारून धडधडत जाणाऱ्या बुलेटचा वेग थोडा मंद झाला.

सलाम आलेकुम राजेशभाई! जवळ आलेल्या मोटारसायकलरील अस्लम ओरडून म्हणाला. वालेकुम अस्सलाम अस्लम मियाँ! असं म्हणत राजेशनं हात केला. अस्लम बहुधा घाईत असावा, शामकू क़ैसर-ए-हिंद होटल में मिलते हैं, असं म्हणून मोटारसायकल धडधडत निघून गेली. दोनच मिनिटांत राजेश मान हलवत, मागून आलेल्या १० नंबर बसमध्ये शिरला. नशीब जोरावर म्हणून लगेच बसायला जागा मिळाली. त्याच्या डोक्यात मात्र रमेशकाका, सावलेवाडी आणि मुख्य म्हणजे नानाआजोबा असे विषय घोळत होते. फार फार वर्षांपूर्वी नानाआजोबा मस्जिदला 'अंबा मॅन्शन'मध्ये राहायला आले. त्या काळी जेमतेम ३१० चौरस फुटांच्या, भाड्याच्या बिऱ्हाडात बारा जण राहत असत. नाना त्यांच्या गावाकडेचा, म्हणून त्यात तेरावा म्हणून राहू लागला! नाना जेमतेम विशीचा, अंगापिंडानं चांगला मजबूत. गोल चेहरा, जाडजूड मिशी, चौकस पिंगे डोळे आणि हसरी जिवणी. उंचीला तसा बुटका म्हणजे पाच फुटाला एक इंच कमी. नोकरी मिळण्यात तीच मोठी अडचण होती. त्या काळी साहेबाचं राज्य होतं कडक शिस्तीचं, त्यामुळे पंचाईत झाली. शेवटी बऱ्याच लटपटी करून, उंच टाचांचे बूट घालून नानांची कशीबशी फायर ब्रिगेडमध्ये वर्णी लागली. तिथे मात्र नानानं चांगलंच नाव कमावलं. सणसणीत तब्येतीबरोबर नाना चपळही होता. सर्व कवायती आणि प्रात्यक्षिकांत नानांचा नंबर पहिला असे. ट्रेनिंगनंतर नानांची नेमणूक वल्लभभाई पटेल रोडवरील मांडवी फायर ब्रिगेड स्टेशनमध्ये झाली. नानांच्या उंचीमुळे त्यांना टोपणनाव मिळालं, 'वामन्या!' मुंबईत कुठेही गोऱ्या साहेबांसमोर प्रात्यक्षिक असलं की हटकून वामन्याला पाचारण केलं जाई. याच काळात भायखळा येथील फायर ब्रिगेडच्या मुख्यालयातील नॉर्मन कुम्ब्झ या साहेबांचा वामन्या विशेष लाडका होता! पुढे रोल्स रॉइसचं इंजिन असलेल्या १३ नंबरच्या आगीच्या बंबावर वामन्याची नेमणूक झाली.

नाना तरुणपणी दिसायचे मोठे देखणे! प्रमाणबद्ध पीळदार शरीर, चामड्याचं काळं उभं हेल्मेट आणि निळा कडक इस्त्रीचा गणवेश! राजेशच्या वडिलांनी त्यांचा एक छोटा फोटो देवघरात हनुमंताच्या तसबिरीखाली लावला होता. रोज सकाळी घरचे सारेच त्याला नमस्कार करून दिवसाची सुरुवात करत. राजेशचे वडील म्हणजे रमाकांत जाधव, मुंबईत एका सिव्हिल कॉन्ट्रॅक्टरकडे तीस वर्षं काम करून ते गावी परत गेले. तिथेच त्यांनी सिव्हिल कॉन्ट्रॅक्टिंगचा व्यवसाय सुरू केला. पाच वर्षांपूर्वी हार्ट अ‍ॅटॅकचं निमित्त होऊन ते गेले. टाटा पॉवर कंपनीत काम करणारा धाकटा रमेशकाका मात्र राजेशचा विशेष आवडता होता. याच वर्षी मार्च महिन्यात नानाआजोबांनी शंभरीत पदार्पण केलं म्हणून भिऱ्यातील टाटा कंपनीत त्यांचा विशेष सत्कार झाला. एक नक्की की नानाआजोबा आता खूपच थकले होते. तरी या वर्षी गणपतीत रमेशकाका त्यांना मुद्दाम 'झिप्पो गणपती'ला घेऊन येणार होता. तिथेही त्यांचा सत्कार करायचं ठरलं होतं. इकडे संध्याकाळी भेटल्यावर, अस्लम रिडेव्हलपमेंटची पुन्हा भुणभुण लावणार म्हणून राजेशच्या कपाळावर आठ्या उमटल्या. त्याच्या डोक्यात '१४ एप्रिल १९४४' ही तारीख घोळत होती. त्या आठवणीचा एक खोल चरा त्याला आजही सतावत असे!

'१४ एप्रिल १९४४.

प्रिय लिंडा गिलरॉय,

....सगळं वातावरणच विचित्र आहे. गेल्या सुमारे दोन महिन्यापासून, 'आपण कधीही संपून जाऊ शकतो!' ही भीती साऱ्यांच्याच चेहऱ्यावर दिसते. चीफ इंजिनीयर रॉबर्ट गाव याच्यापासून डेकवर काम करणाऱ्या डेकहँड्सच्या चेहऱ्यावर हास्याच्या आड दडलेलं, ठुसठुसणारं भय जाणवत राहतं. गेले दोन महिने दारू, सिगारेटवर पूर्ण कडक बंदी आहे. गंमत म्हणजे त्यामुळे प्रत्येक बंदरात बहुतेक सारे खाली उतरून भसाभस चार/पाच सिगारेटी ओढून परत येतात! तसं पाहिलं तर आमचा सारा प्रवास निर्विघ्न पार पडला. आज संध्याकाळची सारेच जण वाट पाहत असतील. जहाज एकदा अनलोड झालं की आम्ही सुटलो! मला खात्री आहे, आज रात्री कुणीच शुद्धीवर असणार नाही....'

'बंक बेड' असलेल्या आठ बाय दहाच्या अरुंद केबिनमध्ये, 'एस.एस. फोर्ट स्टायकिन' नावाच्या मालवाहू जहाजावर होल्ड क्रमांक २ जवळ असलेल्या छोट्याशा केबिनमध्ये बोटीचा कॅप्टन अलेक्झांडर जेम्स नायस्मिथ आपल्या लाडक्या बायकोला पत्र लिहीत बसला होता. कॅप्टन अ‍ॅलेक्सनं मोठ्या मनानं, कराचीमध्ये मुंबईसाठी बोटीवर चढलेल्या एका उच्च शासकीय गोऱ्या अधिकाऱ्याला आपली अपरडेकवरील प्रशस्त केबिन देऊ केली होती. 'एस. एस. फोर्ट स्टायकिन' हे मालवाहू जहाज नॉर्थ इंग्लंडमधील लिव्हरपूलजवळच्या बर्कनहेड या बंदरातून २४ फेब्रुवारी रोजी निघालं. गेली पाच वर्षं रेंगाळलेल्या दुसऱ्या महायुद्धाची संहारक झळ साऱ्या युरोपला जाणवत होती.

कॅनडातील ब्रिटिश कोलंबियामध्ये प्रिन्स रुपर्ट ड्रायडॉक येथे फोर्ट स्टायकिन हे जहाज १९४२ साली बांधण्यात आलं होतं. दुसऱ्या महायुद्धाच्या धामधुमीत हे जहाज युद्धोपयोगी

सामग्रीच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येत होतं. मर्झी नदीवरील बर्कनहेड बंदरात ७१४२ टनी फोर्ट स्टायकिन जहाजावर एकोणीसशे चव्वेचाळीस सालच्या फेब्रुवारी महिन्यात विविध युद्धोपयोगी सामग्री चढवण्याची लगबग सुरू होती. लढाऊ विमानांचे आणि जहाजाचे सुटे भाग, वेगवेगळ्या क्षमतेचे बॉंब, बंदुकीच्या गोळ्या, भू आणि पाणसुरुंग आणि अतिशय संहारक क्षमतेचा १४०० टन दारुगोळा या जहाजावर चढवला गेला. ४५ वर्षांच्या कॅप्टन ॲलेक्सची ही पाचवी सफर होती. कॅप्टन ॲलेक्सचा फोर्ट स्टायकिनवर अफाट जीव होता. उन्हापावसात, वादळवाऱ्यात गेल्या साऱ्या सफरीत 'फोर्ट स्टायकिन'नं, कुठलाही नाठाळपणा न करता प्रामाणिकपणे सेवा बजावली होती. इतर सामानासोबत बँक ऑफ इंग्लंडनं भारतात रिझर्व बँकेत जमा करण्यासाठी ३८२ किलो वजनाच्या अस्सल सोन्याच्या विटाही या जहाजावर चढवल्या होत्या. या सोन्याची त्या काळची किंमत होती १० लाख पाउंड, म्हणजेच आजचे सुमारे २ अब्ज ३१ लाख रुपये! मजबुतीसाठी लोखंडी पट्ट्या ठोकलेल्या या तीस पेट्या होल्ड क्रमांक २ मध्ये ठेवण्यात आल्या होत्या.

फेब्रुवारी महिन्यातील मर्झी नदीच्या किनाऱ्यावर बोचऱ्या वाऱ्यात, थंडीची पर्वा न करता कॅप्टन ॲलेक्स अस्वस्थपणे डेकवर येरझाऱ्या घालत होता. हातातील पॅडवरील स्टोवेज प्लॅनवर चढवल्या जाणाऱ्या सामानाची तो काळजीपूर्वक नोंद करत होता. स्फोटकं आणि दारुगोळा लादलेलं जहाज घेऊन दूरच्या सफरीवर जाण्याची ही त्याची पहिलीच वेळ नव्हती; पण ॲलेक्सचा आक्रसलेला चेहरा, कपाळावरील असंख्य आठ्या फार मोठ्या जोखीमीची साक्ष देत होत्या. दुसऱ्या महायुद्धाचे दिवस, जर्मन यू-बोटींचा, पाणबुड्यांचा आणि जपानी विनाशिकांचा अटलांटिक महासागरात घातक स्वैर संचार होता. या साऱ्या धोक्यांपासून सावधगिरी बाळगत, ते जहाज चार हजार नॉटिकल मैलांच्या अंतरावर असलेल्या 'बॉम्बे'पर्यंत घेऊन जायचं हे एक धाडसच होतं. काळजीचं सावट त्यांची अखंड पाठराखण करणार होतं. जहाजावर केवळ दारुगोळाच नव्हता, तर फार मोठ्या प्रमाणावर सोनंदेखील होतं. न जाणो, ते शत्रूच्या गोटात कळलं तर शत्रू काहीही करून 'फोर्ट स्टायकिन'वर हल्ला करेल अशी अखंड टांगती तलवार होती. पुढील दोन म हिने कॅप्टन नायस्मिथला शांत झोप लागणं शक्यच नव्हतं. तो रात्रीबेरात्री अचानक बिछान्यात उठून बसत असे आणि मग पुढील रात्र तळमळत झोपेची आराधना करण्यात जात असे!

फोर्ट स्टायकिनची लांबी होती ४४२ फूट तर रुंदी ५७ फूट. पाण्यावरील उंची ३५ फूट तर पाण्याखालील ड्राफ्ट २७ फुटांचा. जहाजाचा चीफ इंजिनीयर होता रॉबर्ट गाव. बॉब हे त्याचं टोपणनाव! जहाजाच्या राक्षसी इंजिनवर त्याची हुकुमत होती. लहान/मोठ्या आकाराच्या असंख्य पायपांचं गुंतागुंतीचं जाळं असणारी इंजिन रूम म्हणजे बॉबचं साम्राज्य. जोखमीच्या कामगिरीवर असताना इंजिन सतत चालू ठेवण्याची जबाबदारी बॉबची होती. केवळ इंजिनच नव्हे तर, जहाजाला लागणारं इंधन, विजेसाठी लागणारा डायनॅमो, रेडिओ सिस्टीम या साऱ्याची जबाबदारी बॉब आणि त्याच्या टीमची होती. या खेपेस 'बॉब' विशेष चिंतेत होता. सामग्रीची सातत्यानं वाहतूक करावी लागल्यानं, गेल्या वर्षभरात इंजिनाची आवश्यक ती देखभाल (सर्व्हिसिंग) करण्यासाठी त्याला वेळच मिळाला नव्हता. काही किरकोळ दुरुस्त्या आवश्यक होत्या. कॅप्टन ॲलेक्सला तसं सांगण्याचा प्रयत्न त्यानं अनेकदा केला. परंतु युद्धपरिस्थितीत त्याला सबुरीचा सल्ला देण्यात आला. त्या काळी असे सल्ले म्हणजे आदेशच असायचे. काही पर्यायच नसल्यानं बॉबनं लिव्हरपूल ते बॉम्बे व्हाया कराची या प्रवासात संधी मिळेल तेव्हा इंजिनाचं सर्व्हिसिंग करण्याचं ठरवलं होतं. शक्य झाल्यास पोर्ट तौफिकमध्ये, एडनमध्ये, कराचीत, नाहीतर शेवटी मुंबईत पोचल्यावर.

२४ फेब्रुवारी रोजी अनेक मालवाहू जहाजांचा एक काफिला फोर्ट स्टायकिनसोबत निघाला. सोबत दोन संरक्षक बोटीही असणार होत्या. त्या काफिल्यात फोर्ट स्टायकिनची जागा नक्की ठरलेली होती. तिनं सरळ रांगेत न जाता, मुख्य रांगेपासून थोडं फटकून, डाव्या अथवा उजव्या बाजूनं मार्गक्रमणा करायची होती. दुर्दैवानं शत्रूचा हल्ला झाल्यास फोर्ट स्टायकिनमुळे इतर जहाजांचा विध्वंस होऊ नये म्हणून ही योजना करण्यात आली होती. निघताना हवामान फारसं चांगलं नव्हतं. धुवाँधार पाऊस पडत होता. आर्क्टिक प्रदेशातील वाऱ्यासोबत येणारा कडाक्याचा गारवा होता. वास्तविक अशा हवामानात सफरीला निघत नसत, परंतु युद्धामुळे सारेच नियम धाब्यावर बसवण्यात आले होते. साऱ्या युरोपला बेचिराख करण्याचा विडा जर्मनीनं उचलला होता. भारतावर जपानच्या आक्रमणाचं सावट होतं. पूर्वेकडील युद्ध इम्फाळपर्यंत येऊन भारताचा दरवाजा ठोठावत होतं. त्यामुळेच विविध आघाड्यांवर लढत असलेल्या दोस्त राष्ट्रांच्या सैन्याला वेळेवर रसद पोचणं, याला सर्वाधिक प्राधान्य होतं. म्हणूनच खराब हवामानाचा धोका पत्करून, जहाजाच्या कप्तानांनी जिवावर उदार होऊन आपापली जहाजं समुद्रात लोटली होती. पुढील तीन दिवस हवामान खराबच होतं. जहाजांचा काफिला इंग्लिश खाडी पार करून फ्रान्सच्या

पश्चिम किनाऱ्यावर असलेल्या बे ऑफ बिस्केमधून स्पेन, पोर्तुगाल असं करत जिब्राल्टरपर्यंत जाणार होता. इंग्लिश खाडी पार करताना, पूर्वेकडील किनाऱ्यावर इंग्लंड आणि फ्रान्समध्ये जागोजाग उसळणारे धुराचे लोट, बॉम्बस्फोट, लढाऊ विमानांची घरघर यामुळे युद्धाची भीती आणखी गडद होत होती.

साऱ्या समुद्रावर धुक्याचं साम्राज्य होतं. करडं आकाश आणि खवळलेला करडा समुद्र यात फरक करणं जड जात होतं. निघाल्यापासून तिसऱ्या दिवशी थोडी उघडीप मिळाली. पुढील तीन-चार दिवस सारं काही शांत होतं. निरभ्र आकाश आणि समुद्रही शांत होता. हे समाधान फार काळ टिकलं नाही! अचानक लांबून विमानांची घरघर ऐकू येऊ लागली. सगळेच सावध झाले. एकूण सहा विमानं घिरट्या घालताना दिसू लागली. कुणाची विमानं आहेत, ते कळेना. सावधगिरी म्हणून संरक्षक बोटीवरील विमानविरोधी तोफा आकाशाच्या दिशेनं रोखल्या गेल्या. परंतु काहीच झालं नाही! काही वेळ घिरट्या घालून विमानं उत्तरेकडे गायब झाली. सुटकेचा नि:श्वास टाकत बोटींचा ताफा पुढच्या प्रवासाला निघाला. जिब्राल्टरपाशी काफिल्यातील काही बोटी उजवीकडे वळून दक्षिणेला आफ्रिकेकडे निघून गेल्या. फोर्ट स्टायकिन आणि उर्वरित बोटी भूमध्य समुद्रात शिरून, दक्षिणेकडील आफ्रिका खंडाचा उत्तर किनारा पकडून अल्जिरिया, ट्युनिशिया, लिबिया आणि इजिप्त असे देश पार करत. पोर्ट सैद इथे पोचल्या. सुएझ कालव्यापर्यंतचा जवळपास हजार मैलांचा आणि पंधरा दिवसांचा टप्पा निर्विघ्नपणे पार पडला होता.

त्या प्रवासातील शांततादेखील बेचैन करणारी होती. चीफ इंजिनीयर बॉब बोटीचं इंजिनमध्येच बंद पडू नये यासाठी मनात येशूचा धावा करत होता. मनातील घालमेल चेहऱ्यावर न दाखवणं त्याला जड जात होतं. सुएझ कालव्याच्या रांगेत उभं राहण्याची घाई असल्यानं, सर्व्हिसिंगसाठी पोर्ट सैद इथे थांबता आलं नाही. बॉब हिरमुसला. सुएझ कालवा पार करून काफिला दक्षिण टोकाला असलेल्या पोर्ट तौफिक इथे इंधन घेऊन २४ मार्चला एडनला पोचला. एडनपासून कराची जवळपास पाचशे मैलांवर होतं. या प्रवासात फोर्ट स्टायकिनसोबत फक्त आणखी एक ब्रिटिश मालवाहू जहाज असणार होतं आणि हा प्रवास एकूण सहा-सात दिवसांचा होता. ३० मार्चला कराची बंदरात पोहोचलेलं फोर्ट स्टायकिन, पुढचे तब्बल १० दिवस कराची बंदरातच होतं. बोटीवरचं बरचसं समान उतरवलं गेल्यामुळे मुंबईपर्यंतच्या प्रवासात बोटीचा वेग वाढून आपण लवकर मुंबईला पोहोचणार याचा सर्वांना आनंद झाला होता. अर्थात प्रत्येकाच्या आनंदाची कारणं वेगळी होती. चीफ इंजिनीयर बॉब बोटीच्या इंजिनाची दुरुस्ती आणि देखभाल निवांतपणे करता येईल म्हणून खुशीत होता. खलाशी 'जिवाची मुंबई' करता येईल म्हणून खुश होते.

हा आनंद फार काळ टिकला नाही. ३ एप्रिलच्या सकाळी ९ वाजता, कराची बंदारावरच्या अधिकाऱ्यांनी बोटीवर आणखी काही सामान लादून ते मुंबईला पाठवण्यात यायचं आहे, याची वर्दी कॅप्टन नायस्मिथला दिली. त्याचा आनंद कुठल्या कुठे गायब झाला आणि त्याची जागा संतापानं घेतली. परंतु त्याच्या विरोधाला न जुमानता, बोटीत माल चढवायला सुरुवात झाली. युद्धामुळे बिचाऱ्या अधिकाऱ्यांचादेखील नाइलाज होता. नव्यानं भरल्या जाणाऱ्या सामानात कापसाच्या ८७ हजार गासड्या, ३०० टनांपेक्षा जास्त कच्चं गंधक, इमारती लाकडाचे मोठे १० हजारांपेक्षा जास्त ओंडके, मोठ्या प्रमाणावर राळ (Resin), तेलाची शंभर पिंपं, भंगार आणि तांदळाची पोती असं सारं काही होतं. हे कमी म्हणून की काय तर सोबत मासळीपासून बनवलेलं खत! त्याची तर भयानक दुर्गंधी सुटली होती. हे सर्व सामान भरलं गेलं बोटीतल्या दारुगोळ्याच्या आसपास. कापसाच्या गासड्या तर नेमक्या स्फोटकं असलेल्या होल्ड क्रमांक २मध्ये ठेवल्या गेल्या होत्या. ३० मार्चला कराचीत पोहोचलेली बोट, ९ एप्रिलच्या सकाळी मुंबईच्या दिशेने निघाली. बोटीवरच्या मच्छीच्या खताचा कुजलेला वास सर्वत्र भरून राहिला होता. त्या दुर्गंधीमुळे होणाऱ्या उलट्यांनी जहाजावरचे सारेच हैराण झाले होते. कडक उन्हातून, खुल्या समुद्रातून दीड-दोन हजार मैलांवरच्या मुंबईकडे ते जहाज घेऊन जाणं, म्हणजे कोणत्याही क्षणी मृत्यूला कवटाळण्यासारखंच होतं. कधीही फुटेल असा जिवंत बॉम्ब मुंबई बंदराच्या दिशेनं निघाला होता!

सुदैवानं आणखी काहीही विघ्न न येता, १२ एप्रिलच्या पहाटे 'फोर्ट स्टायकिन' मुंबई बंदरात दाखल झालं आणि त्याला बंदरात ओढून नेणाऱ्या पायलट बोटीची वाट पाहू लागलं. जहाज मुंबई बंदरात पोचल्यापासून चुकांची मालिकाच सुरू झाली. पहिली चूक म्हणजे कुठल्याशा नवीन नियमामुळे जहाजावर 'रेड फ्लॅग' लावला नव्हता. जहाजावर लाल रंगाचा झेंडा दिसला, की जहाजावर धोकादायक समान आहे असा संकेत बंदरातील अधिकाऱ्यांना आणि इतर जहाजांना मिळतो. त्या जहाजातलं साहित्य रिकामं करण्यासाठी प्राधान्य दिलं जातं. सकाळी १०-१०.३०च्या दरम्यान बंदरावरील अधिकारी फोर्ट स्टायकिनची कागदपत्रं तपासण्यासाठी बोटीवर पोचले, तेव्हा मालाची यादी पाहताच

'फोर्ट स्टायकिन'ला लगेच 'व्हिक्टोरिया डॉक'मधील, क्रमांक १च्या धक्क्यावर आणण्याचे आदेश दिले गेले. युद्धकाळामुळे तेव्हा विशेष काळजी घेण्यात येत असे. धोकादायक असल्यानं, बोटीवरील स्फोटकं उतरवताना ती धक्क्यावर न उतरवता, लहान लहान बोटींमध्ये (lightersमधे) उतरवून घ्यावीत अशा सूचना होत्या. दुर्दैवानं लहान बोटी आणि बार्जेस दुसऱ्याच दिवशी उपलब्ध होऊ शकणार होते. बोटीवरील स्फोटकं उतरवून घ्यायला अक्षम्य दिरंगाई होत होती, ही दुसरी, मोठी गंभीर चूक! चीफ इंजिनीयर बॉबला इंजिनदुरुस्तीची घाई झाली होती आणि त्याच्या नशिबानं परवानगी लगेच मिळाली! बॉब आणि त्याची टीम यांनी इतर मेकॅनिक्सच्या साहाय्यानं तातडीनं इंजिन खोललं. इंजिनच खोलल्यामुळे बोटीचा आणि इंजिनाचा संबंध तुटला आणि आता बोट एक इंचही पुढे-मागे हलू शकण्याची शक्यता मावळली. ही आणखी एक भयानक चूक! १४ एप्रिलचा दिवस उजाडला. 'व्हिक्टोरिया डॉक'मध्ये फोर्ट स्टायकिनसारख्याच आणखी दहा बोटी तर शेजारच्या प्रिन्सेस डॉकमध्ये नऊ बोटी लागलेल्या होत्या. सकाळी ८ वाजल्यापासूनच विविध प्रकारचा माल उतरवून घेण्याची एकच धांदल उडाली होती. जसजसा वेळ जात होता, तसतसा ॲलेक्स आणि बॉबचा धीर सुटत चालला होता! दुपारच्या जेवणाची सुटी झाली. आता पुढील तासभर कुठलंच काम होणार नव्हतं. कॅप्टन ॲलेक्स सँडविचेस घेऊन त्याच्या छोट्याशा केबिनमध्ये पोचला. अस्वस्थपणे सँडविचचा आस्वाद घेता घेता ॲलेक्सनं समोरच्या पॅडवर पत्र लिहायला सुरुवात केली. दुपारचा दीड वाजला होता. धाडकन केबिनचा दरवाजा उघडून, आत डोकावत फर्स्ट ऑफिसर हेन्डरसन घाबऱ्याघुबऱ्या आवाजात म्हणाला, कॅप्टन, होल्ड नंबर २मधून धूर येतो आहे!

ओह, माय गॉड! ओह, माय गॉड! नकळत कॅप्टन ॲलेक्सच्या तोंडून शब्द उमटले. घाईघाईनं जॅकेट चढवून हेन्डरसनच्या पाठोपाठ कॅप्टन ॲलेक्स धावतच डेकवर दाखल झाला.

दहा नंबरची बस कर्नाक बंदर स्टॉपपाशी पोचेपर्यंत संध्याकाळचे साडेसहा वाजून गेले होते. राजेशला बसमधूनच अस्लमची बुलेट कैसर-ए-हिंद हॉटेलपाशी उभी असलेली दिसली. डिमेलो रोड क्रॉस करून, 'उत्तम हाउस'समोर तो पलीकडे पोचला. डावीकडे बॉम्बे पोर्ट ट्रस्टच्या 'यलो गेट'कडे जाणारा रस्ता होता. कोपऱ्यावरच कैसर-ए-हिंद हॉटेल होतं. यलो गेट हे मुंबई बंदराचं खूप महत्त्वाचं गेट. तिथून आत शिरताच डावीकडे जुनी, आता बुजवलेली 'प्रिन्सेस डॉक' आणि 'व्हिक्टोरिया डॉक' लागतात, तर समोरच क्रॉस आयलंडशेजारी नव्यानं बांधलेली 'न्यू डॉक'ची प्रशस्त जेट्टी आहे. इथूनच मोठमोठ्या जहाजांवर आयात-निर्यात होणाऱ्या गाड्यांची चढउतार होते. उजवीकडे भल्याथोरल्या 'इंदिरा डॉक'चा पसारा सुमारे किलोमीटरभर पसरलेला आहे. प्रिन्सेस डॉकच्या पश्चिमेला तीन मजली दगडी बांधकाम असलेली ब्रिटिशकालीन इमारत आहे. १८७३ साली 'बॉम्बे पोर्ट ट्रस्ट'ची ही इमारत बांधून पूर्ण झाली. इथे मुंबई बंदराचं त्या काळचं 'डॉक ट्रॅफिक ऑफिस' होतं. काळ्या मालाड स्टोनमध्ये बांधलेल्या या इमारतीच्या वायव्य कोपऱ्यावर पाच मजली देखणं घड्याळ असलेला दगडी टॉवर आहे. याच 'घड्याळा'मुळे 'प्रिन्सेस डॉक' आणि 'व्हिक्टोरिया डॉक्स' या भागाला तेव्हापासून अजूनही 'घडियाल गोदी' म्हणतात. याच टॉवरवर १८९१ साली 'Time Ball' बसवण्यात आला. 'Time Ball' ही संकल्पना १८३० साली शोधून काढण्यात आली. कुठल्याही बंदरात नव्यानं आलेल्या जहाजावरील नाविकांना 'त्या ठिकाण'ची वेळ कळणं अवघड असे. यासाठी 'Time Ball' म्हणजे एक पोकळ सुमारे चार फूट व्यासाचा, लाल/शेंदरी रंगाचा लोखंडी गोळा सुमारे सहा फूट अंतरावरून धाडकन खाली कोसळत असे. दुपारी एक आणि चार वाजता तो आवाज बंदरातील साऱ्या बोटींना ऐकू जात असे. ब्रिटिश साम्राज्यात सुमारे ६० ठिकाणी असे 'Time Ball' बसवण्यात आले होते. मुंबईत १८४० साली कुलाबा तर १८९१ मध्ये घडियाल गोदी इथे Time Ball बसवण्यात आला. आजही पी. डिमेलो रोडवरून माझगावजवळ दिमाखात उभा असलेला हा घडियाल गोदीचा टॉवर दिसतो.

स्टेनलेस स्टीलची चकचकीत टेबलं आणि बाकं यांच्या पसाऱ्यात अस्लम हॉटेलच्या एका कोपऱ्यात रिकामा चहाचा कप घेऊन बसला होता. सलामांची देवाणघेवाण झाल्यावर अब्दुल वेटरला थांबवत अस्लमनं राजेशला विचारलं,

क्यौं बे, चाय लेगा या खिमा-पाव?

अरे साल्या, अजून श्रावण चालू आहे! मला फक्त चहा आणि बन-मस्का! समोरच्या बाकावर बसत राजेश म्हणाला. कर्नाक बंदरच्या गजबजलेल्या कोपऱ्यावरच्या या हॉटेलात नेहमीच गर्दी असे.

हाँ राजा, बोल, क्या सोचा है तुमने? अब्दुलनं आणलेल्या चहाचा घोट घेत अस्लमनं विचारलं.

अस्लम यार, मैंने तुझे पहलेही बता दिया था की मैं

कभीभी 'अंबा मॅन्शन' छोडकर नहीं जाउंगा। नये होनेवाले बिल्डिंग में मुझे एक फ्लॅट दे दे, काम खतम! राजेश ठामपणे म्हणाला.

ये लो, एक तू है और दुसरा वह पागल पार्सी बाबा फिरदौस! यार समझने की कोशिश कर। हम लोग यह पूरा बिल्डिंग कमर्शियल करना चाहते है। कमर्शियल बिल्डिंग में रेसिडेन्शियल फ्लॅट होना बहुत मुश्कील है। वह BMC का DCPR का कुछ सेक्शन नंबर ३३/७/ है। उसके मुताबिक ऐसे पुरे कमर्शियल बिल्डिंग में रेसिडेन्शियल फ्लॅट नहीं हो सकते है। मैंने पार्टनर लोगों के साथ बात करके तेरे लिये बीस पर्सेंट ज्यादा कॉम्पेनसेशन तय किया है। पुरे एक करोड बीस लाख! अब तो मान जा! अस्लमच्या स्वरात एक चिडचिड होती. अस्लम हा राजेशचा लहानपणापासूनचा मित्र. दोघंही एकाच शाळेत दहावीपर्यंत शिकलेले, 'राम तेरी माया' मंदिरासमोर एकत्र खेळलेले. एवढंच कशाला 'झिप्पो गणपती'च्या सजावटीतदेखील राजेशबरोबर अस्लम उत्साहानं भाग घेत असे. दहावीनंतर अस्लम दुसरीकडे राहायला गेला परंतु मैत्री अबाधित राहिली. अस्लम गेल्या दहा वर्षांपासून बिल्डर झाला होता. 'अंबा मॅन्शन' इमारतीचा मालक होता मारवाडी. तरुणपणी पैसे साठवून रमाकांत जाधवानं म्हणजेच राजेशच्या वडिलांनी नानाआजोबांची ती भाड्याची जागा डबल पागडी देऊन स्वतःच्या नावावर करून घेतली होती. गेल्या तीस वर्षांत, एक जाधव आणि दुसरा फिरदौस इराणी यांचा फ्लॅट सोडता, एकेक करून इतर साऱ्या इमारतीत कम र्शियल ऑफिसे झाली होती. नुकतीच अस्लम आणि त्याच्या पार्टनरांनी मिळून 'अंबा मॅन्शन' विकत घेतली होती. आता तिथे टोलेजंग कमर्शियल कॉम्प्लेक्स उभा करण्याचा त्यांचा मानस होता. राजेश आणि फिरदौस दोघेही मात्र अडून बसले होते आणि अस्लमसाठी ती फार मोठी डोकेदुखी झाली होती.

अबे साले, अब तो मान जा! एक बताता हूँ, मेरे पार्टनर का मुझे भरोसा नहीं। दोनों बडे हरामी है और उनकी पहूँच भी बहुत बडी है। तुम दोनों को हटाने के लिये वह किसी भी हद तक जा सकते है! अस्लमच्या समजावणीच्या सुरात आता गर्भित धमकी होती. त्यावर राजेश म्हणाला,

रुक, मैं तुझे एक स्टोरी बताता हूँ! १४ अप्रैल, जुम्मे का दिन था! वर्ष होतं १९४४! स्वातंत्र्यापूर्वीचा काळ आणि मुंबई बंदराची मोठी शान होती. त्याच वर्षी माझे आजोबा, मतलब मेरे दादा, नाना जाधव 'अंबा मॅन्शन' में रहने के लिए आए, अस्सी साल पुरानी कहानी है। राजेश सांगू लागला. अस्लमनं अब्दुलला आणखी दोन चहांची ऑर्डर दिली आणि तो सरसावून बसला. कशामुळे कुणास ठाऊक, अस्लम राजेशची स्टोरी लक्षपूर्वक ऐकू लागला.

राजेशनं नानाआजोबांच्या कहाणीनं सुरुवात केली. नानाआजोबांसाठी शुक्रवारचा दिवस नेहमीसारखाच उजाडला. दुपारी जेवणं झाल्यावर शेजारच्या जाफर सुलेमान मुसाफिरखान्यात इतर सहकाऱ्यांबरोबर वामन्या पत्ते खेळत बसला होता. मेंढीकोटचा डाव रंगात आला होता. व्हिक्टोरिया डॉकमध्ये, फोर्ट स्टायकिनपासून चार/पाच जहाजांपलीकडे उभ्या असलेल्या 'एस.एस. इराण' या जहाजावरील दोन अधिकारी जेवणानंतर वारा खात गप्पा मारायला डेकवर आले होते. बोलता बोलता अचानक फोर्ट स्टायकिनच्या २ नंबरच्या होल्डमधून (कप्प्यातून) धूर येतोय असं त्यांना वाटलं. त्यांनी अधिक काळजीपूर्वक तिकडे पाहिलं, पण आता धूर दिसत नव्हता. कदाचित भास झाला असावा म्हणून तिकडे दुर्लक्ष करून त्यांच्या गप्पा सुरूच राहिल्या. दुपारी १२.४५च्या सुमारास धक्क्यावर उभ्या असलेल्या सिक्युरिटी ऑफिसर मुबारक सिंगलाही तसाच भास झाला होता. दुपारचा दीड वाजला. गोदीच्या आसपासच्या आणि बाहेरच्या परिसरात लोकांचे नेहमीचे व्यवहार सुरू होते. जेवणाची सुट्टी संपली आणि कामगारांनी पुन्हा काम सुरू केलं. बराच काळ क्रेन न आल्यामुळे फोर्ट स्टायकिनवरचं काम तसंच खोळंबलं होतं. बोटीवरील स्फोटकं उतरवून घेण्याऐवजी, मजुरांच्या टोळ्या, इमारती लाकडाचे मोठे ओंडके, विविध भंगार उतरवून घेण्याच्या मागे लागले. गोदी अजूनही तशी शांत होती. नव्यानं आलेल्या जड क्षमतेच्या क्रेनचा हुक भंगार ठेवलेल्या दोन नंबरच्या होल्डमध्ये जाईना. दोन-तीन वेळा प्रयत्न केल्यानंतर तो एकदाचा गेला. भंगाराचा मोठा गठ्ठा क्रेनच्या हुकला अडकून वर आला, तसा त्याचबरोबर पांढऱ्या धुराचा एक लोट त्या होल्डमधून भसकन वर आला. प्रथम पांढरा, विरळ असलेला तो धूर, हळूहळू काळपट आणि दाट होऊन येऊ लागला. दोन नंबरच्या होल्डमध्ये, खाली कुठेतरी आग धुमसत असल्याचं सर्वांच्याच लक्षात आलं. फर्स्ट ऑफिसर हेन्डरसन धावतपळत बोटीवरून खाली उतरून शेजारच्या पोर्ट ऑफिसमधे शिरला. दुर्दैवानं टेलिफोन लाइन डाऊन होत्या. नाइलाजानं त्यानं फायर अलार्मची काच फोडली आणि मांडवी फायर स्टेशनमध्ये अलार्म खणखणू लागला. अचानक धावपळ सुरू झाली. हातातले पत्ते फेकून वामन्यासह सारे फायर इंजिनकडे धावले. पुढील आठ मिनिटांत इंजिन नंबर १३ आणि १९ अशी दोन फायर इंजिन घणाघणा घंटा बडवत यलो गेटपाशी पोचली.

बोटीवर असलेले आग विझवण्याचे तीन पंप सुरू

करून दोन नंबरच्या होल्डमधे पाण्याचा जोरदार मारा सुरू केला होता. पुढे १३ तर मागे १९ अशी दोन्ही फायर इंजिन घणघणाट करत प्रिन्सेस आणि व्हिक्टोरिया डॉक यांच्यामध्ये असलेल्या रुंद, प्रशस्त जेट्टीवर फोर्ट स्टायकिन शेजारी येऊन थांबली. लगबगीनं फायर ब्रिगेडचे कर्मचारी जहाजावर चढून फोर्ट स्टायकिनच्या डेकवर पोचले. अर्थातच वामन्या आघाडीवर होता. दोन्ही इंजिनवरील चार होज डेकवर घेण्यात आले आणि ते देखील धूर ओकणाऱ्या होल्ड नंबर २ मध्ये पाण्याचा मारा करू लागले. पाणी मारण्याचं काम सुरू होताच, वामन्या अखंडपणे होल्ड नंबर २च्या 'हॅच' भोवती घिरट्या घालत होता. आतून बाहेर पडणाऱ्या काळपट धुरासोबत चांगलीच धग जाणवत होती. सुरुवातीच्या दहा मिनिटातच वामन्या घामाघूम होऊन निथळत होता. नक्की कुठे आग लागली आहे, याचा शोध घेण्याचा वामन्याचा प्रयत्न सुरू होता. दोनदा त्यानं आत उतरण्याचा प्रयत्नदेखील करून पाहिला. आगीच्या उसळणाऱ्या लालनिळ्या ज्वाळांच्या लोळांमुळे ते शक्य झालं नाही. सिक्युरिटी ऑफिसर मुबारक सिंग यानं मुंबई फायर ब्रिगेडला दुसरा कॉल २ वाजून ३० मिनिटांनी करून 'नंबर दोन' धोक्याची सूचना दिली आणि मग मात्र खूप मोठी आग लागल्याची खात्री होऊन, आणखी आठ बंब तातडीनं गोदीकडे निघाले. व्हिक्टोरिया डॉकच्या धक्क्यावर ३०-४० जाडजूड पाण्याचे होज एकमेकांवर अजगराप्रमाणे अस्ताव्यस्त पसरले होते. एकाच वेळी पाण्याचे २०-२५ पंप दोन नंबरच्या होल्डमध्ये पाणी मारू लागले. एव्हाना मुंबई फायर ब्रिगेडचे मुख्याधिकारी नॉर्मन कुम्ब्झ फोर्ट स्टायकिनच्या डेकवर येऊन कॅप्टन नायस्मिथ सोबत हलक्या आवाजात चर्चा करू लागले. वामन्याला नॉर्मनसाहेब दिसताच तो घाईघाईनं त्यांच्यापाशी गेला. नॉर्मनसाहेबांनी प्रेमानं त्याची पाठ थोपटली. एव्हाना सुमारे ९०० टन पाणी होल्ड नंबर २मध्ये सोडण्यात आलं होतं. सुट्या कापसाच्या गासड्या, तेलाचा जाड तवंग पसरलेल्या पाण्यावर होल्ड नंबर २ मध्ये तरंगत होत्या. त्यातील काही गासड्यांनी धुमसत पेट घ्यायला सुरुवात केली होती. होल्ड नंबर २च्या हॅचमधून काळ्याकुट्ट जाड धुराचे लोट बाहेर पडत होते. पायाखालील डेकवरील १२ एम.एम. जाडीची लोखंडी प्लेट तापून काही ठिकाणी लाल झाली होती. डेक थंड करण्यासाठी मारलेलं पाणी आता साचल्या जागी उकळू लागलं होतं.

डेकवर जनरल मॅनेजर कर्नल सॅडलर, ऑर्डनन्सचे मेजर ओबर्स्ट, साल्व्हेज डिपार्टमेंटचे कमांडर लाँगमायर, फायर ब्रिगेडचे कुम्ब्झसाहेब, फर्स्ट ऑफिसर हेन्डरसन आणि कॅप्टन नायस्मिथ यांच्यात गरमागरम चर्चा सुरू होती. सारेच अतिशय जबाबदार अधिकारी होते! बोट फोडून बुडवणे (व्हिक्टोरिया डॉकला पुरेशी खोली नव्हती!), बोटीला भोकं पाडून आत पाणी सोडणं (चालू अवस्थेतील गॅस कटर उपलब्ध नव्हते!), बोटीचं इंजिन सुरू करून बोट खुल्या समुद्रात नेणं (बोटीचं इंजिन पूर्णपणे खोललेलं होतं!) अशा विविध पर्यायांवर गंभीरपणे चर्चा चालली होती. दुपारचे तीन वाजत आले होते. दुर्दैवानं सारेच अव्यवहार्य पर्याय निष्प्रभ ठरले होते. आता



हताशपणे प्रलयाची वाट पाहणं एवढंच हातात होतं.

होल्ड क्रमांक २ मधील स्फोटकं आणि सोन्याची कल्पना फक्त फर्स्ट ऑफिसर हेन्डरसनला पूर्णपणे होती. सतावणाऱ्या काळजीमुळे, आग नक्की कुठे लागली आहे हे पाहण्यासाठी अंगावर जाडजूड ब्लँकेट पांघरून हेन्डरसन दुपारी तीन वाजताच वामन्यादेखत अतिशय जपून होल्डमध्ये उतरला होता. उघड्या हॅचमधून काळपट धुराच्या लोटांबरोबर जळक्या कापसाच्या पुंजक्यांची कारंजी उसळत होती. आतील आग खालून, जहाजाच्या पोटातून सर्वदूर पसरत होती. आत धगधगत असलेल्या अफाट उष्णतेमुळे जहाजाच्या विविध भागांतील जाड लोखंडी पत्रे वितळू लागले होते. साऱ्या आसमंतात पसरलेल्या प्रचंड धुरामुळे श्वासही घेणं मुश्किल होऊ लागलं. कामाच्या धावपळीतही वामन्याची नजर वारंवार होल्ड नंबर २ च्या हॅचकडे जात होती. साडेतीन वाजून गेले तरी फर्स्ट ऑफिसर बाहेर न आल्यानं घाबरलेला वामन्या डेकवर हताशपणे येरझाऱ्या घालणाऱ्या कॅप्टन ॲलेक्सपाशी जाऊन पोचला. कुठल्याही परिस्थितीत फर्स्ट ऑफिसर आत अडकल्याची खबर कॅप्टनला देण्यासाठी तो धडपडत होता. काळ्या काजळीनं माखलेला चेहरा, फाटून लक्तरं झालेला निळा गणवेश आणि तुटकं चामडी हेल्मेट अशा अवतारात धापा टाकत वामन्या कॅप्टन साहेबांना म्हणाला,

वह तुम्हारा 'इंद्रासन' साहब नीचे फस गया है! आधा कलाक हो गया, अबी भी बाहर नाही आया! उसवलेल्या

श्वासातील शब्द धडपडत बाहेर पडले. कॅप्टन ॲलेक्सला काहीच उलगडा न झाल्यानं वामन्यानं क्षीण आवाजात पुन्हा ओरडून तेच कॅप्टन साहेबांना सांगितलं. कॅप्टन ॲलेक्सनं दुसऱ्या अधिकाऱ्याच्या मदतीनं वामन्याचं बोलणं समजून घेतलं. मग मात्र अचानक फर्स्ट ऑफिसर हेन्डरसनसाठी ('इंद्रासन'साठी!) शोधाशोध सुरू झाली. फर्स्ट ऑफिसर





हेन्डरसन त्यानंतर कधीच दिसला नाही!

रात्रीच्या जेवणासाठी येणाऱ्यांची हॉटेलात वर्दळ वाढू लागली होती. समोरचे चहा थंड झाल्याचं दोघांच्याही लक्षात आलं. अब्दुल्मियाँ, और दो चाय ले आओ! असं अस्लमनं ओरडून फर्मान सोडलं आणि इकडे राजेश पुढे सांगू लागला.

नानाआजोबांच्या तोंडून ही कहाणी ऐकताना अंगावर नेहमीच काटा येतो! त्यांचा घोगरा झालेला आवाज मला आजही आठवतो! राजेशच्या डोक्यात नानाआजोबांचा घोगरा आवाज घुमत होता. त्याला नानाआजोबांचे शब्द ऐकू येऊ लागले,

पोरा, चार वाजून गेले होते. डेकवर कॅप्टन 'गेट क्लेअर' म्हणून ओरडत, हातवारे करत वेड्यासारखा धावत होता. साऱ्या गोदीत एकच कालवा झाला. लोक धरण फुटल्यागत धावत सुटली. कुठे जायचं कुणालाच कळत नव्हतं. मला दोनच तासांत अचाट थकवा आला होता. झोक जात होता. आकाश पार काळा ठिक्कर झाला होता! डेकवर तर सारा चिखुल माजला होता. धावताना पाय सटकत होते. पायाखाली, सारं जहाज संतापलेल्या, नाल मारण्यासाठी धरलेल्या गुरासारखं थरथरत होतं. काळपट, तिखट धुरामुळे सारखी धाप लागत होती. तापलेल्या जहाजाच्या पोटातून स्फोटाचे आवाज ऐकू येऊ लागले. आग विझून जहाज वाचणं आता शक्यच नव्हतं. खाली उतरणाऱ्या कामगारांची फळ्यांवर, शिड्यांवर एकच झुंबड उडाली होती. कुणीच जहाजावर थांबायला तयार नव्हतं. दोन्ही हात गुडघ्यावर टेकवून मी एका पेटाऱ्याला रेलून उभा होतो. अचानक समोरच्या कप्प्यातून, आगीच्या लखलखत्या ज्वाळेचा दोन-तीनशे फुटांचा लोळ उसळत आकाशातल्या धुरात मिसळून गेला. कुठचाही विचार न करता, जिवाच्या आकांतानं सोबतच्या पाच/सहा सहकाऱ्यांनी प्रिन्सेस डॉकच्या दिशेला असलेल्या दगडी धक्क्यावर उड्या मारल्या. धक्क्यावर बहुतेक जणांचे हातपाय मोडून ते मेले असावेत! जीव वाचवणं मोलाचं होतं. मी लटलटणाऱ्या पायांनी धडपडत जहाजाचा पलीकडला कठडा गाठला आणि नाक दाबून खाली उसळणाऱ्या काळपट पाण्यात उडी मारली. मागोमाग एक कानठळ्या बसवणारा स्फोट झाला आणि माझी शुद्ध हरपली. मध्ये किती वेळ गेला कुणास ठाऊक? नाकातोंडात काळपट, तेलकट, खारट पाणी जाऊन मला जबरदस्त ठसका लागला. हाताला येईल त्या लाकडाला धरून मी पाण्यावर तरंगत राहण्याचा प्रयत्न करत होतो. पाठोपाठ आणखी एक मोठा स्फोट होऊन, आमच्या बोटीचा बंदराकडे तोंड केलेला मागचा भाग तुटून अस्मानात उडाला. पेटत्या गासड्या आणि तेलाची पिंपं, दीपवाळीतील भुईनळ्याप्रमाणे काळ्या आकाशात आतषबाजी केल्यागत उडत होती. आश्चर्य म्हणजे मला सारं दिसत होतं, पण काहीच ऐकू येत नव्हतं! आजूबाजूच्या बोटींवर स्फोट होऊन त्या धडाधडा जळत होत्या. बंदरात आमच्या बोटीच्या पुढे असलेली एक मोठी बोटच गायब झाली होती. आजूबाजूला मोडक्या तोडक्या लाकडांचा खच होता. पालथी पडून काही प्रेतं तरंगत होती. एक प्रेत आकाशाकडे तोंड करून उचंबळणाऱ्या लाटांसोबत हलत होतं. त्याचे कायमचे विस्फारलेले निश्चल डोळे मला आजही आठवतात. लाकडांसोबत अर्धवट जळलेले, तुटके हातपायदेखील तरंगत होते. नाकातोंडात करपट धुराची चव होती. मी काहीसा भानावर येऊन, कष्टानं हातपाय मारत आमच्या बोटीपासून दूर निघालो. तरंगण्यासाठी मी मोठं लाकूड, ओंडका शोधत होतो. त्याच वेळी दूरवर गोदीच्या इमारतीवरील टॉवरवरील बंद पडलेलं घड्याळ दिसत होतं. त्यावर वेळ होती ४ वाजून ६ मिनिटं!

चल राजा, हम निकलते हैं। असं म्हणत तडकाफडकी अस्लम उठला. टेबलावर पाचशेची नोट टाकून त्यानं बिल घेण्यासाठी अब्दुलला आवाज दिला. उरलेले सुटे पैसे परत घेण्याच्या फंदात न पडता अस्लम तरातरा हॉटेलच्या बाहेर निघाला. सॅक वगैरे आवरून राजेश हॉटेलबाहेर पडेपर्यंत अस्लमनं बुलेटला किक मारली होती. मागच्या सीटकडे निर्देश करत अस्लम म्हणाला, चल, जल्दी बैठ!



अरे, आपण कुठे चाललो आहोत? काहीतरी सांगशील? बुलेटच्या धडधडाटामुळे राजेशनं ओरडून विचारलं. डावा हात उडवत, 'बाद में!' एवढंच त्रोटक उत्तर देऊन बुलेट धडधडत निघालीसुद्धा! सिग्नलकडे दुर्लक्ष करून अस्लमनं गाडी उजवीकडे 'पी डिमेलो रोड'वर वळवली. डावी–उजवीकडे सुरत स्ट्रीट आणि लोहा भवन लागून गेलं. रात्रीचे आठ वाजून गेले होते आणि आता ट्रॅफिक विरळ होऊ लागला होता. इस्टर्न फ्रीवे घेऊन परतणारी चाकरमन्यांची गर्दीदेखील आता ओसरू लागली होती. अंधुक उजेडात, डावीकडे शिस्तीत उभी असलेली जुनी गोदामं विस्मरणात हरवून गेली होती. अचानक अस्लमला काय झालं, ह्या आश्चर्याच्या धक्क्यातून सावरताना आपण कुठे चाललोय? हा प्रश्न राजेशला छळत होता. वाडीबंदरपाशी डावीकडे वळत, गाडीनं सरदार वल्लभभाई पटेल रोड घेतला. थोडंच अंतर गेल्यावर राजेश ओरडून म्हणाला, अरे ते पाहा, नानाआजोबांचं मांडवी फायर स्टेशन! बुलेटचा वेग अजिबात कमी न करता गाडी सुसाट पश्चिमेकडे निघाली होती. जुन्या एल्फिन्स्टन पुलावरून त्यांनी सेन्ट्रल रेल्वे पार केली. मुहम्मद अली रोडपाशी फ्लायओव्हर खालून अस्लमनं गाडी पटेल मार्गावरून तशीच पुढे दामटली. जुनी मुस्लीम वस्ती आणि मशिदींचे मनोरे दुतर्फा दिसत होते. अनेक छोटेमोठे रस्ते लागून जात होते. डावीकडे 'गोकुळ व्हेज' लागून गेलं. आपण गिरगाव चौपाटीला निघालो आहोत का? राजेशच्या प्रश्नाला उत्तर मिळालं नाही. मधे लागणाऱ्या सिग्नल्सची अस्लमला फारशी पर्वा नव्हती. पुढच्याच चौकात डावीकडे, नवी झळाळी चढलेलं ऑपेरा हाउस दिसून गेलं. अचानक गाडीचा वेग मंदावला. जेमतेम दीडशे मीटरवर गाडी संथपणे उजवीकडच्या तिरक्या एन.एस. पाटकर मार्गावर वळली आणि डावीकडील तिसऱ्याच पन्नास मजली टोलेजंग इमारतीच्या पार्किंगमधे शिरली. इमारतीच्या बाहेरील उंच भिंतीवर लिहिलं होतं 'सुहाना मंजिल, ७४, एन.एस. पाटकर मार्ग'! अशा इमारतीतील सिक्युरिटी मोठे माजोरडे आणि नाठाळ असतात. अस्लम बहुधा त्याच इमारतीत राहत असावा. इमारतीतल्या दोन्ही वॉचमननी अस्लमला खाड्कन सॅल्युट ठोकला. अस्लमची बहुधा इथे वट असावी. गाडी पार्क करून अस्लम थेट लिफ्टकडे निघाला आणि पाठोपाठ राजेशदेखील. लिफ्टपाशी वाट पाहत असताना अस्लम म्हणाला,

राजा, सॉरी यार! तुझे मैं उपर जाने के बाद सब बताता हूँ। हम मेरे अब्बूजान के पास जा रहे है। उनका नाम है, नियामत अली खानसाब! अस्लम पुन्हा गप्प झाला. लिफ्टला चांगली चार-पाच मिनिटं लागल्यासारखं भासलं. ते टॉप फ्लोअरवर, थेट पेंटहाऊसमध्ये पोचले. आत शिरताच उजवीकडे पायातलं काढून डावीकडच्या प्रशस्त श्रीमंत दिवाणखान्यात त्यांनी प्रवेश केला. काळी संगमरवरी फरशी आणि भिंतीला उंची इटालियन मार्बल लावला होता. तीन बाजूंना असलेल्या काचेतून सभोवतालचं विहंगम दृश्य दिसत होतं. खाली, पश्चिमेकडे असंख्य दिव्यांनी उजळलेली गिरगाव चौपाटी आणि लपलपणाऱ्या लाटा चमचमत होत्या. जाड गालिच्यावर एका कडेला बैठक होती. उंचशा आसनावर एक वृद्ध व्यक्ती बसली होती. पांढरीशुभ्र लांब दाढी, मानेवर येणारे लांब पांढरे केस, चेहऱ्यावर असंख्य सुरकुत्या, पण जाड काळ्या फ्रेमच्या आडून डोकावणारी स्वच्छ घारी नजर तिखट होती. दुरून पाहताना काळ्या फ्रेमच्या चश्म्यामुळे राजेशला गणेशोत्सवातील कोकणी नाटकातला दशरथ आठवला. म्हातारबुवांचं वय नक्की नव्वदीच्या पुढे असणार या विचारामुळे त्यानं कसंबसं आपलं हसू दाबलं.

सलाम आलेकुम, अब्बूजान! पुढे होत अस्लमनं आजोबांच्या पायाला हात लावून प्रणाम केला. राजेशनंही अब्बूजानला वाकून नमस्कार केला. अब्बूजाननी नीटपणाने चष्मा काढून ठेवला. दाढीवरून सावकाश हात फिरवत, हसत हसत शांत खर्जातल्या स्वरात अब्बूजान म्हणाले,

आओ, आओ प्रिन्स अस्लम, आज कैसे राह भूल गये?

अब्बूजान! खोट्या खोट्या रुसक्या आवाजात अस्लम म्हणाला. अब्बूजानच्या पायाशी बसत त्यानं राजालाही निर्देश केला. राजा बसल्यावर तो पुढे म्हणाला, आप वह 'बॉम्बे डॉक्स'वाली कहानी सुनाते थे, वह पुरी कहानी राजा को मालूम है!

हाँ, बहुत ही खौफ़नाक, दर्दनाक हादसा था! अप्रैल १९४४ की बात है। जुम्मे का दिन था। अब्बूजाननं बोलता बोलता डोळे मिटून घेतले. अस्लम घाईघाईनं म्हणाला,

अब्बूजान, राजा यहीं बता रहा था!

बॉम्बे डॉक्स में पुरी तबाही मची थी, आप अंदाजा भी

नहीं लगा सकते! करीब तेरह सौ लोग मारे गये और उससे दुगने घायल हुए। पुरे घर बर्बाद होकर पचास हजार लोग बेघर हो गए। गोदी के आसपास तीन मील का सारा इलाका बेचिराख हो गया था। माना जाता है की १५०० लाख ब्रिटिश पौंड का नुकसान हुआ। प्रिन्सेस और व्हिक्टोरिया डॉक में तेरह बड़े जहाज बर्बाद हो गए। छोटे जहाज और लाँचेस की तो कोई गिनती नहीं। चांवल जैसा पचास हजार टन अनाज बर्बाद हो गया। कुछ ही दिनों में बंबई में अनाज की कालाबाज़ारी होने लगी।

वर्ल्ड वॉर की वजह से अखबार, रेडियो इन सबपर सेन्सर की पाबंदी थी। १५ अप्रैल को जापान के 'रेडियो सायगाव' ने पहली खबर दी थी। अमरीकी 'Time' मॅगेझिन में २२ मई को पुरी स्टोरी छपी थी।

अब्बूजानच्या खर्जातल्या आवाजात एक कंप होता. अब्बूजानचं नाव नियमात अली खान असलं तरी ते अस्खलित मराठी बोलत असत. त्याकाळी काय वाटेल त्या अफवांचं पेव फुटलं होतं. 'फोर्ट स्टायकिन' या जपानी जहाजावर दारुगोळ्याचा भयानक स्फोट, 'जपानचं भारतावर आक्रमण', 'मुंबईत जीवघेण्या भीतीचे वातावरण', 'आपली घरदारं सोडून मुंबईकरांचं कोकणाकडे पलायन', 'गिरगावातील बर्जोरजी मोतीवाला यांच्या घरावरील कौलारू छप्पर फोडून सोन्याच्या विटांचा वर्षाव', 'न्यायमूर्ती एम.सी. छागला यांनी कोर्टाला बेमुदत सुटी दिली'! यावर राजेश म्हणाला,

खरं म्हणजे, व्हिक्टोरिया डॉकमधील एक नंबरच्या बर्थवरील 'एस.एस. फोर्ट स्टायकिन' या दारुगोळा आणि ज्वालाग्रही सामानानं भरलेल्या ब्रिटिश जहाजावर दुपारी ४ वाजून ०६ मिनिटांनी आणि ४ वाजून ३३ मिनिटांनी असे दोन भयानक स्फोट झाले. अक्षरशः होत्याचं नव्हतं झालं! पुढचे तीन दिवस सतत व्हिक्टोरिया गोदीतील आग विझवण्याचं काम सुरू होतं. स्फोट झाल्याच्या अगदी दुसऱ्या दिवसापासून लष्करानं गोदीचा ताबा घेतला आणि जे जे नष्ट झालं होतं, ते ते नव्यानं उभारण्याचं कार्य जोमानं सुरू केलं. सतत सहा महिने अविश्रांत कष्ट उपसून व्हिक्टोरिया आणि प्रिन्सेस गोदीचं कामकाज पूर्वपदावर आणलं गेलं. गोदीतील स्फोटानंतर अस्ताव्यस्त पसरलेलं लोखंडी भंगार, जळलेल्या घरांचा राडारोडा असं सारं वरळीला रेसकोर्सच्या परिसरात नेऊन टाकण्यात येत होतं. असं म्हणतात, हा सारा माल एकंदर पन्नास हजार टन होता! बोलता बोलता राजेशनं एक क्षणभर उसंत घेतली. अब्बूजान पुढे सांगू लागले,

मी असेन बारा तेरा वर्षांचा. अस्लम, राजा, असे तुमच्यासारखेच माझे शब्बीर आणि भोलानाथ सख्खे मित्र होते. शब्बीर होता गोलमटोल म्हणून त्याला आम्ही लाडू म्हणत असू. गोदीतील यूपीकडचा सिक्युरिटी मुबारक सिंग आमचा छान दोस्त झाला होता. 'ठाणे स्ट्रीट'च्या समोर एका कोरड्या नाल्यावर, कंपाउंडच्या भिंती खालून जाणारा तीन फुटी रुंद पाइप होता. आम्ही त्याला 'सुरंग' म्हणायचो. पावसाळ्यात आम्ही मासे पकडायला त्या नाल्यावर जात असू. क्रिकेट आम्हाला प्राणाहूनही प्रिय! त्या दिवशी आम्ही क्रिकेटची मॅच खेळायला आझाद मैदानात गेलो होतो. अचानक अडीच वाजता बातमी आली की व्हिक्टोरिया डॉकमध्ये मोठी आग लागली आहे! झालं, आम्ही हातातला खेळ तसाच टाकून, तातडीनं धावत व्हिक्टोरिया डॉकजवळील आमच्या खास 'सुरंग'कडे निघालो. ते वयच तसं होतं!

क्या अब्बूजान, उस दिन आप वहाँ थे? यह तो आप ने पहले कभी बताया नहीं! थक्क झालेला अस्लम म्हणाला. अस्लम आणि राजेश डोळे मोठे करून, एकाग्र चित्तानं अब्बूजानकडे पाहत होते. ते पुढे सांगत होते,

वाटेत 'मला घरी ओरडतील' असं म्हणत रडूबाई भोलानाथ घराकडे निघून गेला. आम्ही धावत पळत 'सुरंग'पाशी पोचलो तेव्हा नाला तसा कोरडा होता. आश्चर्य म्हणजे फासफूस करत लाडू सोबत आला होता. मी धीर करून नाल्यात उतरलो आणि रांगत पलीकडे गेलो. लाडू काचकूच करत होता. 'चल यार!' असा आग्रह केल्यावर धडपडत लाडूदेखील पाइपातून पलिकडे आला. आम्हाला उजवीकडे 'घडियाल गोदी'ची इमारत दिसत होती. अचानक कानठळ्या बसवणारा आवाज झाला! व्हिक्टोरिया गोदीच्या दिशेनं आकाशापर्यंत जाणारा आगीचा लोळ उसळला! थरकाप उडवणारा स्फोट झाला होता. माझ्या कानाला दडे बसल्यागत मला कमी ऐकू येत होतं. भयानक भूकंप झाल्यागत पायाखालची जमीन हादरत होती. जागीच थिजल्याप्रमाणे लाडू गोदीच्या भिंतीला टेकून मटकन खाली बसला. तो काही केल्या पुढे यायला तयार होईना. मी वेळ न दवडता, मॅन्शन रोडनं व्हिक्टोरिया डॉककडे धावत निघालो. साऱ्या गोदीतच हाहा:कार माजला होता. वाट फुटेल तसे लोक सैरावैरा पळत होते. अस्मानातून भिरभिरत आलेल्या अवजड लोखंडी पत्र्यामुळे माझ्यासमोर एक माणूस उभा फाटला! मी दबकत प्रिन्सेस आणि व्हिक्टोरिया डॉकमधील प्रशस्त जेटीपाशी पोचलो. समोरच आतील एका जहाजाला डोंगराएवढी आग लागली होती. धाड्धूड करत छोटेमोठे स्फोट होत होते. जळणारी तेलाची पिंपं आणि पेटत्या गासड्या यांचा वर्षाव होत होता. समोरचे

गोरे सोजिर कुणालाच आत सोडत नव्हते. त्यांच्या मागे अजगराप्रमाणे पसरलेल्या पाण्याच्या पाईप्सचं जाळं दिसत होतं. आगीचे अनेक बंब उसळणाऱ्या काळपट धुरातदेखील आपल्या प्रयत्नांची शर्थ करत होते. पाहता पाहता एक पेटता आगीचा बंब हवेत उडाला! मी चतुराईनं एक नंबर बर्थच्या अलीकडे उभ्या असलेल्या 'जलमग्न' जहाजाच्या आडोशानं पलीकडल्या जेटीवर पोचलो. मागच्या बाजूला एस.एस. बरोडा उभं होतं. मी लपतछपत जेट्टीच्या टोकापाशी पोचलो. मागे वळून पाहिलं तर घडियाल गोदीच्या टॉवरवरील घड्याळ ४ वाजून ०६ मिनिटांनी बंद पडलं होतं! तेव्हा साडे चार वाजले होते.

अब्बूजान, उस समय राजा के दादाजी फायर ब्रिगेड में तेरह नंबर के इंजिन पर काम करते थे। उसी समय, वह 'फोर्ट स्टायकिन' के डेकपर मौजूद थे! ट्रान्समध्ये असल्यासारखा अस्लम म्हणाला. थरथरत्या आवाजात अब्बूजान पुढे म्हणाले,

दोनच मिनिटांत पुन्हा महाभयानक स्फोट झाला. 'फोर्ट स्टायकिन'चा मागचा भाग प्रॉपेलरसह तुटून खेळण्यातील सोंगटीप्रमाणे हवेत उडाला! कानठळ्या बसून मी ठार बहिरा झालो होतो. पाठोपाठ 'जलपद्म'वरदेखील स्फोट झाला आणि मी हवेत फेकला गेलो. त्यानंतर माझी शुद्ध हरपली. तेव्हाच मला काहीच आठवत नाही! माझी शुद्ध परत आली तेव्हा उसळणाऱ्या प्रचंड काळपट लाटांच्या पसाऱ्यात, मी एका फळकुटाला उजव्या हातानं जिवाच्या आकांतानं धरून कसाबसा तरंगत होतो. काही केल्या माझा डावा हात मला हलवता येत नव्हता. कुठल्याशा धारदार पात्यानं खांद्यापासून मनगटापर्यंत माझा डावा हात फाटला होता. नकळत अब्बूजाननी सैलसर लखनवी कुर्त्याची डावी बाही वर करून डाव्या हातावरील वेडावाकडा लालसर वण दाखवला. तो वण उग्रपणे अस्लम आणि राजेशकडे पाहत होता. त्यावर ट्रान्समध्ये असल्याप्रमाणे राजेश म्हणाला,

पहिल्या स्फोटाच्या वेळेला नानाआजोबांनीदेखील 'फोर्ट स्टायकिन'च्या डेकवरून पाण्यात उडी मारली! काहीशा थकलेल्या स्वरात अब्बूजान पुढे सांगू लागले,

बराच काळ खाऱ्या पाण्यात काढल्यानं माझा डावा हात पांढराफटक पडला होता. त्या लांबलचक जखमेतून क्वचित कुठेतरी रक्त येत होतं. गमतीचा भाग म्हणजे एवढी मोठी जखम होऊनही मला कुठेच वेदना जाणवत नव्हती. दूरवर मुंबई गोदी उसळणाऱ्या काळपट धुराच्या साम्राज्यात हरवून गेली होती. त्यातूनच कुठेकुठे, मधेमधे आगीचे लोळ उसळत होते. गोदीपासून खूप दूरवर आल्याकारणानं स्फोटांचे पुसट आवाज ऐकू येत होते. मधेच माझी शुद्ध एक-दोनदा हरपली असावी. मी पुन्हा खडबडून जागा झालो! कारण माझ्या उजव्या हातातलं फळकूट निसटत होतं आणि आता ते पकडून ठेवण्याचं माझ्यात त्राण शिल्लक नव्हतं. अचानक अल्लामियाँनं, मोठ्या ओंडक्याला गच्च पकडून तरंगत असलेल्या एका देवदूताला माझ्याकडे पाठवलं. हातानंच खूण करून त्या माणसानं मला त्या ओंडक्यावर घेतलं. तो माणूसदेखील पांढराफटक पडला होता. मला आजही त्या माणसाचे पिंगे डोळे आणि जाडजूड मिशी आठवते!

अब्बूजान, वह फ़रिश्ता कौन था? आप जानते हैं उसे? अधीर स्वरात अस्लमनं विचारलं. काहीशा हताश स्वरात अब्बूजान म्हणाले,

पता नहीं मियाँ, मैंने खूब तलाश की। हम दोनों क़रीब ड़ेढ़ दिन पानी में थे। हाँ हाँ, पुरे छत्तीस घंटे! इतवार की सुबह 'मोरा' के मछेरों ने पुराने 'शेवा' के पास हमें पानी से बाहर निकाला। यह जगह JNPT के पास है। हम दोनों होश में नहीं थे। हमें उठाकर पनवेल के 'धूतपापेश्वर' नाम के आयुर्वेदिक अस्पताल में ले जाया गया। वहाँ कोई 'पुराणिक' नाम के नेकदिल इंसान थे, जिन्होने हमारा खयाल रखा। मेरा जख़्म तो एक हफ्ते में भर आया। मैने सुना था की उस फरिश्ते को न्यूमोनिया हो गया था। वह कोई तीन महिने के लिये उसी अस्पताल में पडा रहा। बाद में मैंने उस आदमी का पता खोजने की काफी कोशिश की। लेकिन जिंदगी किसी के लिये रुकती नहीं! फिर भी मैंने खोज जारी रखी थी। एक मुसलमान हिंदू आदमी के बारे में सवाल पूछे, यही लोगों को अजीब लगता था। एक बताऊँ, पिछले पचास सालों में सारा महौल ही बिगड गया है! हाँ, अभी याद आया! उसका नाम था 'वामन्या'!

चकित होऊन बसल्याजागी दोघंही थिजले. काही क्षण शांततेत गेल्यावर अस्लम म्हणाला, अब्बूजान, राजा के दादाजी का एक नाम था 'नानाआजोबा'। वह कद में छोटे थे, इसलिये उनका दुसरा नाम था 'वामन्या'! यानंतर राजेशला कंठ फुटला,

अब्बूजान, आप की उमर कितनी है? राजेश अजूनही सावरला नव्हता.

९३! क्यों पूछ रहे हो? हसत हसत अब्बूजाननी विचारलं.

नानाआजोबा, याने की 'वामन्या' की उमर है सौ साल! अब्बूजान, आप को जानकर बडी ख़ुशी होगी की कुछही दिनों में नानाआजोबा बंबई आ रहे हैं।

अब्बूजान काहीसे धडपडत उठून शेजारच्या

अलमारीकडे गेले. आतून एक मिठाईचा बॉक्स काढून त्यांनी दोघांच्याही हाती चॉकलेट बर्फी ठेवली. स्वतःही बर्फीचा एक तुकडा खात स्वतःशीच पुटपुटले,

वाह! माशाअल्लाह! अल्लाह मियाँ, मेहरबान है! राजेशकडे वळत ते म्हणाले, राजा, यहाँ नीचे मेरे पास एक फर्निश्ड फ्लॅट खाली पडा है। बंबई में आने के बाद आप के दादाजी वही रहेंगे। पुढील पाचेक मिनिटं सारेच आता एका वेगळ्या आनंदात गप्पा मारत होते. निघताना राजेश अब्बूजानच्या पाया पडला. न राहवून, नियामत अली खानसाहेबांनी राजेशला घट्ट मिठी मारली. त्यांचे डोळे पाण्यानं डबडबले होते. दूर होताना सद्‌गदित स्वरांत अब्बूजान म्हणाले,

बेटा, एकही चीज़ ध्यान में रखना – इन्सानियत!

राजेश आणि अस्लम लिफ्टमध्ये शिरताच मिनिटभर काहीच बोलले नाहीत. अस्लम म्हणाला,

राजा, मेरी फ़ातिमा शिवानी के क्लास में है। तुझे एक इंट्रेस्टिंग बात पता है?

क्या?

सेंट झेव्हियर्स स्कूल व्हिक्टोरिया डॉक से कम से कम दो किलोमीटर की दुरी पर है। इसी 'फोर्ट स्टायकिन' के प्रॉपेलर का एक टुकडा झेव्हियर्स स्कूल में आ गिरा था। साले का वेट कुछ सत्तर-अस्सी किलो होगा! आज भी '१४ अप्रैल १९४४' की याद दिलाने के लिये स्कूल ने मेन गेट के बगल में ही उसका स्मारक बनाया है।

हाँ हाँ, मैने देखा है! काहीशा अवघडलेल्या स्थितीत, 'विषयाला हात कसा घालायचा' अशा विचारात राजेश मोटारसायकलवर बसला. अस्लमनं बुलेट 'सुहाना मंजिल'च्या आवारातून बाहेर काढली. दोन्ही वॉचमननी पुन्हा सॅल्युट ठोकला. एक चकार शब्दही न बोलता पुढल्या दहा-बारा मिनिटांत गाडी वाडीबंदरपाशी पोचली. डिमेलो रोडला वळण्यापूर्वी राजेशनं अस्लमच्या खांद्यावर थोपटत, गाडी डावीकडे थांबवण्याचा इशारा केला. राजेशनी विचारलं,

अस्लम मियाँ, अब तो बता, क्या ख़याल है? आपण त्या गावचेच नसल्याप्रमाणे, गालात हसत अस्लमनं विचारलं,

किस के बारे में?

साल्या, अरे त्या फ्लॅटचं काय करायचं? राजेशनं थेट विचारलं.

हाँ, उस बिल्डिंग के छतपर मैं मेरे लिये एक दो हजार स्क्वेअर फीट का पेंटहाऊस बनाने वाला हूँ। आधा तेरा, आधा मेरा! अस्लम म्हणाला.

पेंटहाऊस म्हणजे? राजेशचा प्रश्न.


अरे यार, पेंटहाऊस याने की टेरेसपर बनाया गया फ्लॅट! हजार स्क्वेअर फीट का फ्लॅट और आधी टेरेस तेरे नाम हो जायेगी। यार, '१४ अप्रैल १९४४' की वजह से तो आज हम है! चल, तुझे घर छोडकर आता हूँ। असं म्हणत अस्लमनं गाडी पी. डिमेलो रोडवर वळवली. त्याचा आवाज घोगरा झाल्याचा राजेशला भास झाला. त्याचा आपल्या कानांवर विश्वास बसत नव्हता. गाडी सुरत स्ट्रीटला उजवीकडे वळली. 'झिप्पो' चौकात गणेशोत्सवाच्या मांडवात अजूनही जाग होती. गाडी सरळ 'अंबा मॅन्शन'कडे निघताच, न राहवून राजेश ओरडला,

'गणपतीबाप्पा मोरया!'

**– वसंत वसंत लिमये**

vasantlimaye@gmail.com

ग्रंथाली




**साद हिमालयाची**

**वसंत वसंत लिमये आणि हिमयात्री**

**मूल्य ३५० रु.**
**सवलतीत २०० रु.**
**टपालखर्च ३० रु.**

## संचित

कुठल्या कामाला बाहेर पडलो होतो कुणास ठाऊक
पण कुठल्यातरी वाटेनं निघालो

चार पावलं चाललो तर
पाचपन्नास फुगे कुठे कुठे भेटले
मग एकेकाला भारावलेल्या देहानं
कंबरेत वाकून नमस्कार करावा लागला,
त्यांनी मला नम्रतेचं सर्टिफिकेट दिलं,

निघालो पुढे

असाच पुढे चार पावलं चाललो तर
कितीतरी तऱ्हेतऱ्हेचे बुडबुडे भेटले
मग एकेकाला विस्फारलेल्या डोळ्यांनी
जबडा रुंदावत हसत म्हणावं लागलं,
'तू ग्रेट आहेस, कमाल आहे तुझी!',
त्यांनी, 'याला म्हणतात खरी दोस्ती'
अशी माळ माझ्या गळ्यात घातली,

पुढे सरकलो

चार पावलं चालून पुढे आलो तर
कितीतरी कोळीष्टकं भेटत गेली
मग एकेकाला मोरपीसगुच्छ भेट देऊन
'लव्ह यू यार' म्हणावं लागलं,
त्यांनी, 'पाय जमिनिवर असलेला'
या ब्रँडचा बुक्का माझ्या कपाळाला लावला

मी आपला रस्ता धरला



अजून चार पावलं पुढे चाललो तर
कितीतरी जळमटं भेटत गेली, मग एकेकाला
हिरेजडित तलम रेशमाच्या शाली घालून
'यू डिझर्व मच मोअर दॅन धिस',
असं म्हणावं लागलं,
त्यांनी मला 'याला म्हणतात माणुसकी'
नावाची पगडी घातली,

चालता झालो तिथून

हे कुठल्या वाटेवर चालतोय आपण
असा विचार करत निघालो, तर पुढे
अनेक झापडं, ओरखडे, चिंध्या भेटत गेली
मग एकेकाला म्हणत गेलो,
'किती छान दिसताय तुम्ही!',
त्यांनी 'देवमाणूस' अशा डिझाइनचा शिक्का
माझ्या पाठीवर मारला

मी आपली वाट धरली

मग खूप दमून, थकून-भागून,
घरी परतलो
अंघोळ केली आणि
काहीतरी टवटवीत बघूया म्हणून
आरशासमोर आलो
तर तिथे दिसली

खच्चून भरून वाहणारी
कचराकुंडी

**– चंद्रशेखर सानेकर**
chandrashekhar.sanekar@gmail.com

## कर्ज निळाईचे



तुझे जुने काहूर मला दे
तो शब्दांचा ऊर मला दे!

पुलाखालुनी वाहून जाईन
तो पूर्वीचा पूर मला दे!

सत्याला लावेन चाल मी
तो स्वप्नातील सूर मला दे!

गूढ धुक्यापरी लिहून जाईन
गहाळ माझा नूर मला दे!

अंतर आणि एकत्रितपण
गुंफण्यास मजकूर मला दे!

खरवडला जाणारच नाही
वज्रलेप शेंदूर मला दे!

दुःख, शाप बेभान निळाई
कर्ज तुझे मंजूर... मला दे!

**– नीता मुरलीधर भिसे**
neetabhise27@gmail.com



## ...अपुल्या हाती काही नसते

नशीब घडते आणि बिघडते, अपुल्या हाती काही नसते
'होत्या'चेही होते 'नव्हते', अपुल्या हाती काही नसते

कुणी भिकारी, कुणी खलिफा, कुणी संत तर कुणी माफिया
ज्याचे त्याचे प्राक्तन असते, अपुल्या हाती काही नसते

हसता-हसता रडू फुटावे तसे सुखाला दुःख घेरते
एकाएकी सर्व बिनसते, अपुल्या हाती काही नसते

जरी पूजिले देव शेकडो, जरी प्रार्थना हजार केल्या
पदरी अपुल्या पडते भलते, अपुल्या हाती काही नसते

बटण दाबुनी मत नोंदवता 'दिलीप' अपुला रोल संपतो
दर दिवशी सरकार बदलते, अपुल्या हाती काही नसते

**– डॉ. दिलीप पांढरपट्टे**
dilip.pandharpatte@gmail.com

## बदलत गेलेला संदर्भ

तुझ्या आकाशाने दिलेला शब्द
परतत आहे,
मौनावल्या कोटरात.

लाटांचेच होत गेलेले ठसे
पंखावरून नेण्यासाठी
झेप घेत आहेत
दमलेली मनोगते.

संदर्भ बदलतात,
की आपण बदलतो संदर्भाने..
या संभ्रमातील किनाऱ्यावर
रुतलेली संध्याकाळ
किती अनोळखी,
स्वतःच्या पाठीसारखी!

जात जावे पुढे.. आणखी पुढे..
आता काही पुढेच नसण्याच्या
निराकारात.

शब्दांना नव्हते ठाऊक परतायचे..
ते शांत होते पंखाना एकाकार करून
आकाशाशी.
तेही होत चालले आहे शब्द
नेत आहे पंखावरून
किनाऱ्यासह
माझा समुद्र!

**– प्रवीण दवणे**
भ्रमणध्वनी : ९८२०३८९४१४



## ओझरती भेट तुझी

ओझरती भेट तुझी, चुटपुटसे आलिंगन
अधरांनी अधरांना, केलेले.... अभिवादन!

सायीचे हात तुझे, चाफ्याचा स्पर्श तुझा
जुळलेल्या हातांचे हलकेसे...आंदोलन!

केस तुझे विस्कटले, स्वैर बटा वाऱ्यावर
गंधर्वच गाताना... घेत जणू आवर्तन!

घुंगुराविनाच सखे, थिरकतात पाय तुझे,
घरभर तू फिरताना, घर भासे वृंदावन!

तू अशीच मनमुक्ता, तू तुझीच, फक्त तुझी,
अस्फुटसे हास्य तुझे, गूढ तरी मनभावन!

भेट जरी ओझरती, खूण पटे जन्मांची
दूर जरी देह पुन्हा... झालेले चिरमीलन!



**– सदानंद डबीर**
भ्रमणध्वनी : ९८१९१७८४२०

## स्वप्न

वेडच म्हणतील शहाणे लोक
तरी स्वप्न पाहायला हवे...
आकाशीच्या चंद्रासाठी कधी
पाण्यातही उतरायला हवे...

अंतराचे हिशेब नसतील
तर रस्ते सरळसोपे होतात..
भीती नसेल मनात तरच
धक्क्यांचे झोके होतात...

म्हटले तर आकाश आभासी
अन् पाण्यातही तरंग
पापण्यांआतच असतो
खरा एक चंद्र अभंग...

**– लिना संखे**
leena.sankhe@mah.gov.in



## बाई बाई गोष्ट सांग

गोष्ट नको साड्यांची, माहेरच्या वाड्यांची
गोष्ट नको रडण्याची,
आत आत कुढण्याची
गोष्ट सांग घडण्याची, एकटीने लढण्याची
मौन धरलंस इतकी वर्षे, आवाजात आलाय जाळ
उच्चारशील जो पहिला शब्द, तोच असेल त्यांचा काळ

म्हणून बये विचार कर, पहिल्या शब्दाला तूही डर
मुका बोलेल तो पहिला शब्द काय असेल तू सांग
आंधळा बघेल ते पहिले दृश्य काय असेल तू सांग

अडजिभेने खूप बोललीस आता पडजीभ बाहेर काढ
आत जे कुजत पडलाय, तेच सगळ्या ताटात वाढ
एकच अशी टाक ढांग,
लांघून जाईल कल्लोळ दांग

बाई बाई गोष्ट सांग
कोंबडा बघ देतोय बांग
बाई बाई गोष्ट सांग
वेळ जाण्या आधी सांग

**– किरण येले**
kiran.yele@gmail.com

## बापाच्या प्रेताशेजारी बसलेल्या लेकीची गोष्ट



थांबत नाही अश्रूंचा पूर, सर्वत्र धूर, सर्वदूर
पापण्यांपलीकडचे दिसत नाही काहीच, शांत हुरहुर.

कसले नवेकोरे राजवस्त्र लेऊन कुठे चालला आहेस मित्रा?
मिटवून, फाटवून आणि गोठवून स्वत:च्याच चरित्रा?
या आक्रोशलेल्या शांततेत चितेवरती नि:शब्द झोपलेल्या ए खुळ्या मुला
हा तुझा जीवघेणा स्मशानजोगवा हादरवे मला..

हा कोणता जाणिवेनेणिवेचा खेळ आणि कोणता हा पेच?
कोणत्या दु:खद वाटेवरचा हा नियतीचा डावपेच?

हे कसले बहिरेपण, तुला ऐकू येते आहे का जरासे स्पष्ट,
ही आहे बापाच्या प्रेताशेजारी अगरबत्ती हातात घेऊन बसलेल्या एका
अभागी मुलीची गोष्ट...

**– संजय कृष्णाजी पाटील**

## वाऱ्यावर उडणारी कवितांची पाने



मातीत गाडून घेण्याचे दिवस
लख्खपणे समोर दिसत असतानाही,
'मृद्गंधाने नटलो जेव्हा नावाचे'
आत्मकथन लिहावेसे वाटणे.
हे येड्यागबाळ्याचे काम नोहे,
नोहे आमच्या पारदर्शी जगण्याची
तुलना होणे देशविदेशात...


वाऱ्यावर उडणारी कवितांची पाने,
विस्मरणात नेतात जुने सगळे ऋतुसंहार,
नव्या-जुन्या स्थलांतरितांचे प्रदेश
आताशा खुपत नाहीत नजरेला.
कारण दृष्टीचे अर्धांगलेपण
सतत सोबत घेऊन फिरत आहे.
कंपवात झालेल्या बुद्धीचे अमर्याद भ्रष्टपण...

पुस्तकं आणि मस्तकं जेव्हा
एकसामायिकपणे नीचांकी पातळीवर जातात
तेव्हा जागतिक समृद्धीचा शेअरबाजार
उच्चांकी पातळीवर पोहोचतो म्हणतात...
भरभटलेला बाजार घेत नाही दखल
लुप्त आणि गुप्त दारिद्र्यरेषेखालचे नागडेपण
सगळेच टाहो आणि आकांत रोजच
थेटपणे एकांतात जाऊन बसतात आताशा
कसे आहे शीर्षक हे? उद्ध्वस्त वर्तमानाच्या दाहीदिशा?

**– संजय कृष्णाजी पाटील**
sanjaykpatil1967@gmail.com

## स्वत:शीच बोलणारी माणसं...

स्वत:शीच बोलणारी माणसं पाहून मनात खोल हुळहुळते काही
पल्याडचे ते काय पाहतात, मुळीच कळत नाही, मुळीच कळत नाही...



का बरं त्यांना कोणीच नाही आपलं म्हणणं ऐकवण्यासाठी?
गर्दीतून, माणसांतून आरपार पाहत ते काय सांगतात उरीपोटी?
पल्याडच्या जगाशी कधी हळुवार, कधी तावातावाने बोलतात
प्राक्तनाशी भांडतात, नियतीला शिव्या देतात, थुंकतात
कधी ऊर बडवत रडतात, कधी निरागसपणे खदाखदा हसतात,
त्यांना भान नसतं कपड्यांचं, वाहत्या जखमांचं, तहान-भुकेचं
हा कसला केमिकल लोचा? थैमान कुठल्या मनोव्यथांचं?
अल्झायमर? स्किझोफ्रेनिया? स्वमग्नता? की आणिक काही...
स्वत:शीच बोलणारी माणसं पाहून मनात खोल हुळहुळते काही
दृष्टिपल्याडचे ते काय पाहतात, मुळीच कळत नाही... मुळीच कळत नाही...

मंदिरांमध्ये, उद्यानांमध्ये, झाडाखाली, किंवा डोंगरदऱ्यांत
स्तोत्रे, प्रार्थना, प्राणायाम, ध्यानधारणा... असं सारं करत असतात
परमेश्वराशी...? अहं! बहुधा स्वत:शीच माणसं बोलत असतात...
तुकोबाप्रमाणे 'आपुलाच वाद आपणाशी...' घालतात, कधी खिदळतात...
बोलता बोलता हात जोडतात, आपल्याच गालांवर थापट्या मारतात
कुठल्याशा पापाची वा चुकीची कबुली देतात, रडत ऊर बडवतात
गाभाऱ्यातल्या घंटानादाचा घुमारा कालवत राहतो देहापार काही
प्रार्थनेपल्याडचे ते काय पाहतात, मुळीच कळत नाही... मुळीच कळत नाही...

काही बायका स्वयंपाकघरात भांड्यांशी, दारं-खिडक्यांशी बोलतात
त्यांच्या चेहऱ्यावरची वेडसर झाक लहरत राहते पसाऱ्यात
भुकेल्या चुलीसाठी, तहानल्या माठासाठी स्वत्वच नाचवत ठेवतात
पुरुषप्रधानतेच्या आचीवर पोळ्या-भाकरींची चवड रचत राहतात
मोबाइलच्या खिडकीतल्या कुठल्याशा गाण्यानं रडू लागतात बायका
'कशासाठी मी फ्रीज उघडला? मला काय हवंय?' भ्रमिष्ट होतात बायका
जुनाट, पारंपरिक असतानाच नवीन, कालसुसंगत होण्याची त्यांना घाई...
स्वत:पल्याडचे त्या काय पाहतात, मुळात काही पाहतात का? मुळीच कळत
नाही...



रुमालाने वा मास्कने तोंड झाकलेली, न झाकलेली कित्येक माणसे
दुचाकीवरची, चारचाकीतली, रेल्वेतली, विमानातली कित्येक माणसे
कार्यालयातली, घरातली... शून्यात बघत, स्वत:शीच बोलणारी माणसे
ऑनलाइन कार्यक्रम करतानाच 'नेटाने' व्हायरल होतात माणसे
चेष्टामस्करी, उपदेश, आज्ञा, बिझनेस कॉल वा मनोरंजनात रमतात
प्रियकराशी भांडता भांडता काही व्यक्ती व्हर्चुअल प्रेमही करतात...
ओठाशी मोबाइलच्या स्पीकरची कळी... नि कानाशी- इयरबडची पाकळी...
भ्रमयुगाला मिठीत घेणाऱ्यांना अपुरेच स्थल-काळ नि दिशा दाही...
मुठीपल्याडचे ते काय पाहतात, मुळीच कळत नाही... मुळीच कळत नाही...

आणि... इकडे कविता सतत मला साद घालते, धूसर पोकळी सैरभैर करते
हुलकावते, गवसते, अनुभूतीच्या आतला गूढ अर्थ सोलून काढते
तेव्हा...तेव्हा मीही स्वत:शी बोलत, भांडत, रडत, हसत, भरकटत असते
मीही तमाम वेड्यांसारखी स्वत:शीच बोलत प्रतिसृष्टीत भ्रमिष्ट वणवणत असते.
मन पोखरून, विस्कटून, कालवून मग... क्वचितच कविता शब्दांत येते...
नवसानं व्हावं मूल, तशी ती कविता अटीतटीवर हळुहळू आशयात येते..
स्वत:शीच बोलणाऱ्या त्या जाणिवांचे रूपबंध नवसानेच होतात- प्रवाही...
नेणिवेपल्याडचे झळझळले होते काहीबाही... एवढेच आठवते... बाकी काही नाही...

**- आश्लेषा महाजन**

ashlesha27mahajan@gmail.com

## कधीतरी असेही व्हावे...

कधीतरी असेही व्हावे
तू, मी अन् पाऊस
आपसूक भेटावे

तुझ्या ओठी
भावनेच्या दिठी
मेघमल्हार उमलावे

ओलेचिंब व्हावे
तू निथळावे
तुझे लाजणे
पाऊसथेंब व्हावे

इंद्रधनु पंख ल्यावे
कधी पाऊस किरणात
दाटून यावे

पाऊस ही थांबावा
तुझ्याभोवती गावा
ओलाशार व्हावा

गाली हसत
गिरकी घेत
पिंपळपानी
बरसत राहावा

मी एकला
प्रेमात ओला
कधी तुला
कधी पावसाला
आत साठवत
भिजत राहावा

तू, मी अन् पाऊस
एकदा भेटावे
पिंपळपानाखाली
कधीतरी असेही व्हावे

**- जितेंद्र कुवर**

jitendrakuwar206@gmail.com

## थोडी तरी उसंत दे

निघून जावं लागलं तुला सीमापार
अतीत झालास
तरीही का रेंगाळतोयस अजूऽऽऽन
सगळ्याचा सगळा... अख्खाच्या अख्खा
कोसळणारा आठवणींचा धबधबा
भिजवून भिजवून... बुडवून बुडवून...
स्तब्ध होतोयसा वाटतोय तोच
हलायला लागतो इथूनतिथून, खालूनवरून, आडवातिडवा
भासमान होत राहतात वेगानं एक एक आठवणी

ढगाआड गेलेल्यांनी असं येत राहू नये रे पुन्हा पुन्हा
राख झालेल्यांनी उसवत राहू नये मन मागे राहिलेल्याचं
तुमचं काय बाबा...
तुम्ही झऱ्यांमधून खळाळता
निळा पक्षी होऊन गात राहता
चांदण्यांशी बोलता नि फुलांबरोबर झुलता
पावसातही रिमझिम चालूच तुमची
मग आम्ही कसं रे जगायचं या कमाल कठोर वास्तवात?
थोडीतरी उसंत देना चंद्रहास
एकटीनं जगायला, एकटीनं लढायला...

**– उषा मेहता**
ushasmehta@gmail.com

## नाते

मारा तुम्ही कसेही मी बोलणार नाही
झालो जरी भिकारी मी तोलणार नाही...

तुमचेच हात मोठे तुमच्याच या मशाली
बंदिस्त हात माझे मी खोलणार नाही...

ज्वाला अशा जिव्हारी छळतात काळजाला
गेलो जरी तुटूनी मी जोडणार नाही...

तुमच्याच लांडग्यांनी केली शिकार जेव्हा
छेदून बाण गेला मी मोडणार नाही...

आला कधी उमाळा नात्यास सांधणारा
नाते तुझे नि माझे मी तोडणार नाही...!!

**– अशोक लोटणकर**
ashoklotankar@yahoo.com



## आत–बाहेर

आणि रंग उधळले
आभाळाच्या पानावर
ती होत असताना
धूसर क्षितिजावर

पाखरांची किलबिल
थव्याथव्याने लाटांवर
लाटांची आवर्तनं
किनाऱ्याच्या समेवर

सांज–संगीताचा रियाज
मिटणाऱ्या रेषेवर
ऐकतो डोळे भरून
एकटाच किनाऱ्यावर



शब्द घुटमळतात,
रंग रेंगाळतात
अवतीभवती आत
रेषेच्या प्रतिबिंबावर

हे, असं आत बाहेर
येरझाऱ्या घालणं
लाटांसारखं विरून जाणं
ऐलतीरावर
कधी पैलतीरावर

**– हेमंत जोशी**
hemantjoshi023@gmail.com

## ओठ


नदी किनाऱ्याला सांगत राहते गुज
किनारा नि:शब्दपणे ऐकत राहतो तिला
सोबत करतो तो तिची
अगदी जन्मापासून
प्रत्येक वळणावर
समुद्राच्या हातात हात घालून
ती दिसेनाशी होईपर्यंत
बाप भाऊ आणि तिचा इमरोजही तोच–
तिला मात्र सागराची ओढ

**– संगीता अरबुने**
sangita.suhas@gmail.com

## रोटी ‘डे’

मी विनवितो तुला
आज हा गुलाबाचा पुष्पगुच्छ घेऊन
तू तुझ्या प्रेयसीला दे
या फुलांच्या गुच्छामधून
मला काही पैसे मिळतील
तर
पोटाची आग विझवता येईल
आणि
ती गुलाबाच्या फुलांना बघून
प्रेमानं तुला मिठी मारेल
ती आणि तू
सागराच्या किनाऱ्यानं फिराल
तर
थोडी नजर फिरव
ब्रिजच्या खाली, फूटपाथच्या कडेला
कचऱ्याच्या ढिगाऱ्याकडे
मळकट पिशवी घेऊन
भुकेनं व्याकूळ झालेला
मी दिसेन...
तू
एकदा भेटायला ये
मोकळा श्वास घेण्यास
घनदाट जंगलात
मेळघाट, तलासरी, पालघर
जव्हार, मोखाडा, गडचिरोली
आदिवासीच्या पाड्यावर,
भुकेचा टाहो ऐकू येईल!
मलाही वाटते
तुझ्या हातातील गुलाबी
सुंदर फुलं बघून
आज
‘रोज डे’ऐवजी
‘रोटी डे’ असता तर
भुकेनं व्याकुळलेले चेहरे
गुलाबाच्या फुलांसारखे
आनंदून गेले असते!

**– शिवकुमार आडे**
shiv67612kumar@gmail.com



## छाया

खूप काही भोगले आहे
सावकाश सावकाश; अवकाश
पाहून वारही केले आहेत
उपभोगलेही आहे सावधपणे.
त्यानेच तर चालायला शिकवले आहे.

वाट चुकीची की बरोबर
या फंदात पडलोच नाही
वाटही लागली असती
मिळालीही.

एक मात्र आहे
आपल्या मरणावर नसेल छाया प
श्चात्तापांची.

**– प्रकाश हरी कार्लेकर**
भ्रमणध्वनी : ९८३३३९१३४४

## जीवाश्म

शुष्क पानांची वेळू वाजवतो
शुष्क वारा
शुष्क झाडांच्या मुळाशी
तहानलेली धरती
सोनेरी ऊन ओतून
सोनेरी पानांवर
चित्र काढतो ऋतुराज
युगाश्म जुन्या
स्तब्ध एकांतात
तू नि मी आगंतुक
पण सरमिसळलेले
या चित्रात

कारवीच्या ताट्या
नष्ट करेल वाळवी
एक ना एक दिवस
तू नि मी नि हे चित्र
उडून जाऊ असेच
निसर्ग कोरा करेल कॅनव्हास
पुन्हा रंग उधळण्यासाठी

शून्यात पुन्हा एकदा विश्व गोठेल
तेव्हा मात्र हा क्षण सीलबंद झाला
असेल.

**– रश सोवनी**
rushsovani89@gmail.com

ऋतुरंग वर्ष ३१वे । दिवाळी २०२३ ।
संपादक : अरुण शेवते

## ।। विशेषांक : 'आपलं माणूस' ।।

'ऋतुरंग' दिवाळी अंकाचे हे ३१वे वर्ष आहे. या वर्षीचा 'आपलं माणूस' हा विशेषांक आहे. घरातील माणसे आपलीच असतात. घरातल्या माणसांपुरते आपले आयुष्य मर्यादित नसते. उंबरठ्याबाहेरची आपल्याला भेटणारी, न भेटणारी माणसेही आपलीच असतात. समाज सर्वार्थाने निरोगी आणि प्रगतिशील राहावा म्हणून मोठ्या माणसांचे योगदान असते. आपल्यासाठीच त्यांनी वेगळा मार्ग निवडलेला असतो. त्यांच्या प्रभावाने आपल्याला चैतन्य लाभते.

**या अंकातील लेखक**

गुलज़ार, जावेद अख्तर, गिरीश कुबेर, राजीव खांडेकर, श्रीराम पवार, सुप्रिया सुळे, विनय सहस्रबुद्धे, सुशीलकुमार शिंदे, विश्वास पाटील, श्रीनिवास ठाणेदार, संदीप वासलेकर, दिलीप माजगावकर, प्रदीप चंपानेरकर, अंबरीश मिश्र, रामदास भटकळ, किशोर मेढे, प्रदीप निफाडकर, समीर गायकवाड, पंकज भोसले, संपत मोरे, श्रीकांत बोजेवार, संजय भास्कर जोशी, द. वि. अत्रे, प्रगती बाणखेले, शुभदा चौकर, अरुण शेवते, राधिका टिपरे, अरुंधती देवस्थळी, अशोक राणे, सचिन इटकर, धीरज अकोलकर, मृदुला बेळे देशमुख, सुधीर देवरे, डॉ. संग्राम पाटील, मिलिंद चौबळ, यशोदा वाकणकर, शिरीन कुलकर्णी, जाई गुलमोहर (आपटे), नितीन आरेकर, सविता दामले, प्रतिमा पंकज, पूजा सामंत, शर्वरी शेवते, सिद्धार्थ अकोलकर, जयश्री देसाई

**मुखपृष्ठ छायाचित्र** : कार्तिकी गोन्सालीस
('एलिफंट विस्परर्स' या लघुचित्रपटाला ऑस्कर अॅवार्ड मिळाले.
त्या लघुचित्रपटातील 'आपल्या माणसाचे' उत्कट छायाचित्र)

**रेखाटने** : विजयराज बोधनकर, अन्वर हुसेन

**लेखांची शीर्षके** : अक्षरसुलेखन बी. जी. लिमये

**मूल्य : ३०० रुपये । पृष्ठसंख्या : ३२०**

ऋतुरंग प्रकाशन

संपर्क : **अरुण शेवते**
भ्रमणध्वनी : ९८९२४३८५७४ **अंक सर्व विक्रेत्यांकडे उपलब्ध.**
shevatearun@gmail.com



# आता आणि ते दिवस

सर्वोत्तम ठाकूर

> अगदी हल्ली हल्लीपर्यंत जी बाब आपल्याला बरीच किंवा खूपच मोलाची वाटत असे, पण जिचं महत्त्व कमी कमी होत होत आता अगदी नगण्य होत चाललीय ती म्हणजे कोण कुठे आहे यातील अंतर. मानसिक नव्हे, तर प्रत्यक्ष अंतर.

ते दिवस म्हटले, की त्या वेळेची, म्हणजे एकोणीसशे पन्नास-बावन सालच्या दरम्यानची, सर्वसामान्य परिस्थिती डोळ्यांपुढे येते. आमच्या पिढीनं ती पाहिलीय, अनुभवलीय, इतकंच नव्हे तर वीस-पंचवीस वर्षांपूर्वीची परिस्थिती अधिकच त्रासदायक होती हे पण आईवडिलांकडून, त्याबद्दल काहीही तक्रार न करता बोललेलं ऐकलंय. नाहीतर अशा परिस्थितीत आपले लोक राहत होते, यावर आपला विश्वासच बसला नसता. त्या सर्व इतिहासातील गोष्टी आहेत असं वाटलं असतं. आणि आपण त्याला फारसं महत्त्व दिलं नसतं, म्हणून त्या काळाची थोडी माहिती.

तेव्हा सर्वच गोष्टींचं खूपच दुर्भिक्ष होतं. विशेषतः अन्नधान्याची टंचाई फारच भयानक होती. आज आपण एकशेचाळीस कोटींच्या जवळपास आहोत आणि तरीही गहू, तांदूळ, वगैरे निर्यात करतो. तेव्हाच्या पस्तीस-चाळीस कोटी लोकसंख्येला पुरेसं होईल इतकंसुद्धा आपलं शेतीचं उत्पन्न त्यावेळी नव्हतं. आणि ते बाजारात येई तेव्हा त्याचं वजन विकताना वाढावं म्हणून त्यात बारीक दगडाचे खडे, कचरा वगैरे मुद्दाम घातलेले सर्रास सापडत. विकत आणलेलं कोणतंही धान्य स्वयंपाकाला वापरण्यापूर्वी निवडून म्हणजे हा कचरा काढून नंतरच घ्यावं लागे.

गेल्या तीस-चाळीस वर्षांत हे सर्व कसं झपाट्याने बदलत गेलंय याची नव्या पिढिलाच नव्हे, तर कदाचित त्यांचे आईवडील व एखादे वेळेस त्यांच्या आजी-आजोबांनासुद्धा कल्पना नसेल. आठवड्यातून एकदाच ठरावीक दिवशी येणाऱ्या टँकरनं बऱ्याच गावांची पाण्याची थोडीतरी सोय करण्याचा प्रयत्न केला जाई. पण हे खूपच अपुरं पडल्यामुळे खेड्यापाड्यातून मोठ्या गावात येऊन, मिळेल तिथे आपला बिस्तरा पसरणाऱ्यांचे थवेच्या थवे आमच्या पिढीनंसुद्धा पाहिलेत. याहूनही भयंकर म्हणजे अन्न न मिळाल्यामुळे मृत पावलेले भूकबळी. हे सत्य आहे. भारतात फार पूर्वी नव्हे तर आमच्याआधी पंधरा-वीस वर्षांपूर्वी सर्व राज्यांत (त्यावेळी राज्य न म्हणता प्रांत म्हणत) अन्न धान्यच नव्हे, तर सर्वच गोष्टींच दुर्भिक्ष होतं. खुली अर्थव्यवस्था सुरू झाली नव्हती. घरी टेलिफोन पाहिजे असेल, (तेव्हा मोबाइल नव्हते.) तर सरकारातच अर्ज करावा लागे. साधारणत: पाच-सहा वर्षानंतर आपला नंबर लागून फोन मिळे, आणि फोन केल्यावर बऱ्याच वेळा सॉरी, रॉंग नंबर हे उत्तर ऐकावं लागे. मुंबईतील घाटकोपर या भागात तर फोन मिळण्याचा प्रतीक्षाकाळ पंधरा वर्षं होता. त्यातूनही काही मजेदार गोष्टी होत.

कोणीही सार्वजनिक निवडणुकीला उमेदवार म्हणून ऊभं राहिल्यास त्यांना दोन महिन्यांपुरता ताबडतोब फोन मिळे. या सवलतीचा फायदा घेऊन काही लोक उमेदवार म्हणून अर्ज भरत. ते स्वतःचा प्रचार तर सोडाच, पण निवडणुकीच्या दिवशी स्वतःला मत देण्याकरतासुद्धा जात नसत. शून्य मतं मिळवून त्यांचं डिपॉझिट (अनामत रक्कम) जप्त होई. परंतु दोन महिने फोन वापरता आला ही सोय आणि हा आनंद त्यांना बराच अधिक महत्त्वाचा असे.

मोटार, मोटारसायकल, स्कूटर, वगैरे करता अर्ज केल्यावर ती ताब्यात येई त्यावेळी आपल्याकडे जुनी गाडी असल्यास ती नव्या गाडीच्या किमतीपेक्षा अधिक किमतीला ताबडतोब विकली जाई. विकत घेणारा एकच गोष्ट पाही, गाडी चालू स्थितीत आहे ना? ती जुनी की नवी याला फारसं महत्त्व नव्हतं. लगेच वापरता आली की बस्स. जुनी असल्यास किंमत ठरवताना त्याबद्दल घासाघीस होईल तेवढीच. सर्व मामला अगदी उघडउघड. यात कोणतीही बेकायदा लबाडी नव्हती. थोडक्यात, आपल्याकडे जुनी गाडी असल्यास खिशातले पैसे खर्च न करता जुन्या ऐवजी नवीन गाडी आणि शिवाय थोडेफार पैसेपण घेऊन घरी परतता येत असे.

मुंबईसारख्या मोठ्या शहरातसुद्धा, इतर टंचाईबरोबर दुधाची पण टंचाई होती. मुंबईच्याच सरकारी आरे कॉलनीचं दूध पाहिजे असल्यास मिल्क कार्ड मिळवण्याकरता अर्ज करावा लागे.

पुरेसा वशिला लावल्यावर मला मिल्क कार्ड मिळालं तेव्हा जो आनंद झाला, तो माझ्या मुलाला अमेरिकेत नोकरी मिळाल्याचं समजल्यावर झालेल्या आनंदापेक्षा कितीतरी अधिक होता, हे माझ्या एका मित्रानं मला प्राजंळपणे सांगितलं होतं.

ते दिवस आणि आजची परिस्थिती यात खूप फरक आहे, यात नवीन काहीच नाही. मोबाइल फोन, टीव्ही यांसारख्या नवीन नवीन शास्त्रीय शोधांमुळे बदलणाऱ्या परिस्थितीचा परिणाम जगभर लगेच सुरू होतो. पण सामाजिक बदलांचे परिणाम दिसायला बराच वेळ जातो. कधी कधी एक दोन पिढ्यासुद्धा. त्या दष्टीनं आपल्याकडचा एक सामाजिक फरक खरोखरच क्रांतिकारक म्हणावा लागेल.

मुंबईच्या किंग्ज सर्कल / पारशी कॉलनीतील खालसा कॉलेजात मी लेक्चरर होतो. या, सर्व दृष्टीनं वरच्या स्तरावर असलेल्या कॉलेजातील माझ्या दीडशे विद्यार्थी असलेल्या वर्गांत चार-पाचच मुली असत. बाकी सर्व मुलगे. आता मुलगे आणि मुली जवळजवळ सारख्याच प्रमाणात दिसतात. कदाचित मुलीच अधिक असतील. हा फरक खरोखर क्रांतिकारकच आहे आणि तो फक्त दोन-चार वर्षांत घडून आला. मुलींच्या शिक्षणाकडे वर्षानुवर्षं आणि पिढ्यान पिढ्या झालेलं दुर्लक्ष दोन-चार वर्षांतच नाहीसं झालं. सामाजिक दृष्टीनं हा झालेला बदल ही एक मोठीच क्रांती आहे.

मुद्दाम सांगण्यासारखी एक गोष्ट म्हणजे महाराष्ट्र सरकारच्या त्या वेळच्या हाउसिंग बोर्डानं राहण्याच्या घरांकरता चालवलेल्या सोडतीन महिना पंधराशे रुपये हे उच्च उत्पन्न (Higher Income Group) वर्गात मानलं जाई. अगदी सन १९९०-९२ पर्यंत. आणि त्या पारशी कॉलनीतील घरातील बहुतेक प्रत्येकाची कमाई मासिक पंधराशे रुपयांपेक्षा जास्त असण्याचीच शक्यता होती. तरीही मुलींना सरसकट कॉलेजात पाठवत नसत. मला वाटतं ते दिवस आणि आजचे हे दिवस यातला सर्वात मोठा आणि महत्त्वाचा फरक म्हणजे आर्थिक नव्हे, तर तो मुलींच्या शिक्षणाला चालना हाच आहे.

मिळकतीत फरक नक्कीच आलाय. माझ्या घरचंच उदाहरण घ्यायचं म्हणजे माझी एक नात एमबीएच्या परिक्षेत पहिल्या वर्गात पास झाल्यावर मला पेढे द्यायला आली.

मी म्हटलं, ''शाब्बास. आता तू नोकरीकरता अर्ज कर. दोन-चार वर्षांत चांगली ऑफिसर होशील.''

ती म्हणाली, ''आजोबा, मी कँपस इंटरव्ह्यूत आधीच नोकरी घेतलीय. आता परीक्षेचा रिझल्ट लागल्यावर त्यांनी मला नोकरी दिल्याचं पत्रपण दिलं. हातात काहीतरी असावं म्हणून, ती स्वीकारल्याचं मी त्यांना कळवलंय. परंतु दुसरी एखादी अधिक बरी नोकरी मिळाल्यास ही सोडून दुसरीकडे जायचं मी ठरवलंय. मला त्यांनी फक्त अठरा हजार रुपये मासिक पगार दिलाय.''

''अग, मला पहिली नोकरी लागली ती कॉलेजात लेक्चरर म्हणून. पगार महिना दीडशे रुपये म्हणजे एका वर्षाला अठराशे रुपये होता. तुझा महिना अठरा हजार रुपये पगार म्हणजे माझ्या दहा वर्षांच्या एकूण पगारा एवढा आहे. अर्थात तू अधिक पगाराकरता प्रयत्न करायला काहीच हरकत नाही.'' मी तिला सांगितलं. मात्र आमच्या वेळच्या रुपयाची खरी किंमत आणि आजच्या रुपयाची किंमत यांत जमीन आस्मानापेक्षाही अधिक फरक आहे, यात नवीन काहीच नाही. मोबाइल फोन, टीव्ही यांसारख्या नवीन नवीन शोधांमुळे बदलणाऱ्या परिस्थितीचा परिणाम जगभर काही महिन्यांतच सुरू होतो आणि आपल्या गरजा आणि अपेक्षा त्याबरोबर नेहमी वाढतच जात असतात.

माझ्या लहानपणी पैशांचे सर्व व्यवहार पै, पैसा, आणा व रुपया या चार युनिटमध्ये चालत. तीन पै म्हणजे एक पैसा, चार पैसे किंवा बारा पै म्हणजे एक आणा, आणि सोळा आणे किंवा चौसष्ट पैसे किंवा एकशे ब्याण्णव पै (जवळजवळ दोनशे पै) म्हणजे एक रुपया असं गणित असे. सरकारी टाकसाळीत ही चारही नाणी नियमित छापली जात. (कागदावर नव्हे, तांबा वगैरे धातूवर उमटवली जात.) याचा सरळ सरळ अर्थ म्हणजे एक पैच्या नाण्याला पंधरा-वीस तरी छोट्या-मोठ्या वस्तू विकत मिळत असल्या पाहिजेत.

(नाहीतर सरकारी टाकसाळीत धातूचं ते नाणं छापणं चालू ठेवलं नसतं.) एका पैला दहा-बारा वस्तू म्हणजे एका रुपयाला शंभर दिडशे पेक्षा जास्त वस्तू विकत मिळत. ही गोष्ट पुरातन काळची नव्हे, मी स्वत: आणि आमच्या पिढीतील सर्वांनीच हे व्यवहार केलेत.

आता आपल्या चलनात दशमान पद्धती आली आहे. एक रुपया आणि त्याचा शंभरावा भाग म्हणजे एक पैसा. सुरुवातीला त्यावेळच्या चलनातील एक पैसा आणि हा एक पैसा यातील फरक कळावा म्हणून त्याला नया पैसा असं नाव देण्यात आलं होतं. थोड्या दिवसांच्या वापरानंतर यातील नया गेला. त्यानंतर आला नया नसलेला नवा पैसा. त्यात काहीच विकत मिळत नसे म्हणून लवकरच तो अस्त पावला.

या पै, पैसे, आणे, रुपयाबाबत काही गमतीदार गोष्टी.

आमच्या रत्नागिरीच्या बंगल्यातील पाच खोल्यांच्या एका ब्लॉकमध्ये बापूसाहेब देशमुख, बंगला बांधला तेव्हापासून महिना सोळा रुपये भाड्यानं राहत होते. त्यांचे आमचे घरगुती संबंध फार खेळीमेळीचे होते. दिवसां दिवस वाढणाऱ्या महागाईमुळे शेवटी दहा-बारा वर्षांनी माझ्या वडिलांनी या पाच खोल्यांच्या ब्लॉकचं भाडं सोळा रुपयांवरून सतरा रुपये म्हणजे महिन्याला एक रुपयानं वाढवलं तेव्हा बापूसाहेब देशमुख तो ब्लॉक सोडून गेले.

'महिन्याला एक रुपया वाढ! बाप रे!' असा तो काळ होता.

रत्नागिरीला कॉलेजात इंटरनंतरचे (आताची बारावी) वर्ग नव्हते म्हणून मी पुढील शिक्षणाकरता पुण्याला आलो आणि कॉलेजच्या वसतिगृहात राहू लागलो, हे सन १९४७मध्ये. मी कॉलेजमध्ये शिकत असताना एका महिन्याचं हॉस्टेल मेसचं बिल 'सत्तावीस रुपये अकरा आणे तीन पैसे दोन पै' इतकं भरलेली पावती माझ्या कागदांत नुकतीच मला मिळाली. तेव्हा मासिक उत्पन्न म्हणजे मिळकतही तशीच कमी होती. यांत बरंवाईट वाटण्याचं काहीच कारण नाही. आठवड्यातून दोनदा मटण, दर रविवारी एक फीस्ट व मध्ये एक चेंज. शिवाय सकाळीच आम्हाला आमच्या खोलीवर रोज चहा, आणि हे सर्व महिना तीस रुपयांपेक्षा कमी किमतीत. म्हणजे दिवसाला सरासरी एक रुपयापेक्षा कमी पैशांत. आमच्या अशा राहण्याबद्दल, ''खाण्यापिण्याच्या नावाखाली ही पोरं आपल्या बापाचा पैसा काय उधाळताहेत'' हे टोमणे वारंवार कायची आम्हाला सवय करून घ्यावी लागली.

दिवसाला एक रुपया ! बापरे, काय ही उधळपट्टी!

आमची मेस सुरू होऊन एक-दोन महिने झाल्यावर वसतिगृहातील काही मुलं आम्हाला स्पष्ट ऐकू जाईल अशा आवाजात पण आपापसातच बोलत आहेत असं करत, ''दर आठवड्याला एक फीस्ट आणि सकाळीच उठायला नको म्हणून खोलीवर चहा! मोठे सरदारच लागून गेलेत! खाण्यापिण्याच्या नावाखाली हे बापाचा पैसा काय उधळताहेत!'' हे टोमणे ऐकावे लागत.

वास्तविक आमच्या मेसचं महिन्याचं बिल सव्वीस ते अठ्ठावीस रुपयेच असायचं, म्हणजे दिवसाला एक रुपयासुद्धा नाही. पण दिवसाला एक रुपया ही 'बापाच्या पैशांची उधळपट्टी' होती कारण महिन्याला दहा-बारा रुपयांत दिवसाचं दोन वेळचं जेवण देणाऱ्या पुण्यात तेव्हा बऱ्याच खानावळी होत्या, त्या दृष्टीनं दिवसाचा एक रुपया ही मुलांनी खर्च करायला मोठीच रक्कम होती.

परवा ते बिल बघितलं तेव्हा माझा स्वतःचाच त्यावर विश्वास बसेना. मग लक्षात आलं की त्यानंतर सहा-सात वर्षांनी जेव्हा मला कॉलेजात लेक्चरर म्हणून नोकरी लागली तेव्हा मला मासिक दीडशे रुपये, म्हणजे दिवसाला सरासरी पाच रुपयेच पगार होता. आणि मी माझ्या दीडशे रुपये पगारातले तीस रुपये गावी घरखर्चाला पाठवून महिना एकशेवीस रुपयांत म्हणजे दिवसाला चार रुपये पगारात आरामात राहत होतो. महिन्यातून एकदोन सिनेमे, नाटक, कधी पिकनिकला गेलो, वर्षातून एकदा कोकणात घरी जाऊन आलो तो प्रवासखर्च हे सर्व प्रतिदिन, चार रुपयात भागत असे.

'घन:श्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला...' या इतकी वर्षं झाली तरीही बऱ्याच घरात सकाळीच म्हटलं जाणाऱ्या गाण्याचे संगीतकार महिना तीन रुपये पगारावर संगीतदिग्दर्शक म्हणून नोकरी करत होते. यानंतर पाच-सहा वर्षांनी एमएससी झाल्यावर मला पहिली नोकरी लागली तेव्हा माझा पगार महिना दीडशे रुपये होता.

आता, माझा प्रत्यक्ष संबंध आला म्हणून नव्हे, तर अधिक महत्त्वाचं आहे म्हणून, थोडं सविस्तर-

आपल्या हाताचा अंगठा हा उरलेल्या चारही बोटांना कुठेही स्पर्श करू शकतो. पण माझ्या हाताबाबत काही समस्या निर्माण झाली, आणि ही क्रिया कमी कमी होत हळूहळू थांबली. त्यामुळे छोट्या छोट्या गोष्टी उचलणं मला कठीण जाऊ लागलं. कारण अंगठा व बोटात त्या सापडेनात. शिवाय, मनगट व बोटं यांच्यामध्ये बाहेरच्या बाजूला कसलीतरी सूज आली. दुखत नव्हतं, इतर काही त्रास नव्हता, त्यामुळे मी तिकडे दुर्लक्ष केलं. शेवटी, जेवताना घास घेतानाही थोडी अडचण भासू लागली. मी तेव्हा मुंबईला

राहत होतो. तीन-चार तज्ज्ञ डॉक्टरना दाखवलं.

त्या सर्वांनी अमुक अमुक निरनिराळ्या टेस्ट करून घ्यायला पाठवलं. त्या टेस्टसचे रिपोर्ट वाचून सर्व तज्ज्ञांनी एकच मत दिलं, की ''तुम्ही तीन-चार वर्षापूर्वीच यायला पाहिजे होतं. मोठी शस्त्रक्रिया करावी लागेल. पण त्यामुळे पूर्ण बरं वाटेल ही खात्री देता येत नाही.'' हे ऐकायला मला प्रत्येकी तीन तीन हजार रुपये द्यावे लागले होते.

शेवटी एक डॉक्टर भेटले. ते म्हणाले, ''ECG काढतात तसं हल्ली EMG काढतात, ते करून घ्या, यात हाताला विजेचे चटके देतात व त्याचे परिणाम मॉनिटर करतात. घाबरण्यासारखं काही नाही.'' मी रुग्णालयात जाऊन ईएमजी करून आलो. ते विजेचे चटके घेतल्याचा खिशाला दीड हजार रुपयांचा चटका दिला आणि अहवाल डॉक्टरांना दाखवला. ते म्हणाले,

''हे बघितलंत, इथपर्यंतच रिॲक्शन येते. पुढे जातच नाही. आपण प्रयत्न करू. पण दोन-चार वर्षापूर्वीच काहीतरी करायला पाहिजे होतं.''

नंतर मी माझ्या गावी रत्नागिरीला गेलो. माझ्या नातेवाईकांना मुंबईच्या डॉक्टरांची नकारघंटा माहीत होती. पण त्यांनी, रत्नागिरीला आपलं स्वत:चं हॉस्पिटल असलेल्या डॉ. मिलिंद पटवर्धन यांना या हाताच्या दुखण्याबद्दल विचारा म्हणून मला सांगितलं. मुंबईच्या एक्स्पर्ट डॉक्टरांनी दिलेल्या सल्ल्याबाबत रत्नागिरीसारख्या गावातल्या डॉक्टरचं सेकंड ओपिनियन घ्यावं हा विचारच हास्यास्पद होता. आता मी, 'नाही, नाही'ला कंटाळलो होतो म्हणून शेवटी त्या डॉक्टरांना भेटायला तयार झालो.

इंग्लंडमध्ये एफआरसीएस होऊन आलेल्या डॉक्टर मिलिंद पटवर्धनांनी मुंबई-पुण्यासारखी शहरं सोडून रत्नागिरीलाच आपलं हॉस्पिटल सुरू केलं होतं.

त्यांच्या स्वागतकक्षात खुर्च्या व बाकं होती. सोफासेट नव्हते. विजेचा पंखा होता. ऑपरेशन थिएटरमध्ये एक एअरकंडिशनर होता, स्वागतकक्षात नव्हता. भिंतीवर महागडी पेंटिंग नव्हती, जमिनीवर मऊ गालिचे नव्हते.

"Sir, what will you prefer? Coke or Hot Tea or Coffee?" असं आग्रहानं विचारणाऱ्या रिसेप्शनिस्ट नव्हत्या. त्यामुळे या सर्वांवर भरमसाठ खर्च करून, तो रुग्णांकडून वसूल करून घेण्याची त्यांची इच्छा नव्हती. त्यांना गरज वाटत नव्हती. सर्वसामान्य लोकांना परवडतील अशीच फी आकारून ते त्यांचं रुग्णालय चालवीत होते, चालवत आहेत.

मी डॉक्टर मिलींद पटवर्धनना तो ईएमजीचा रिपोर्ट दिला. त्यांनी तो पाहिलाच नाही.

''आपण इथे असा कट घेऊ, मग इथे असं असं करू. पण ऑपरेशनमुळे झालेला परिणाम दिसायला थोडा वेळ लागेल.'' ते म्हणाले.

''मी पूर्ण बरा होईन?'' मी विचारलं.

''शंभर टक्के खात्री, पण पूर्ण बरं व्हायला थोडे महिने लागतील. कारण व्याधी जुनी आहे.'' ते म्हणाले.

डॉक्टरांनी माझ्या हातावर स्वत: ऑपरेशन केलं. त्यांची फी, ऑपरेशन थिएटर फी, खोली भाडं वगैरे मिळून साडेचार हजार रुपये आणि भूलतज्ज्ञ याला एक हजार रुपये मिळून साडेपाच हजारात माझी ही जुनीपुराणी व्याधी चार-पाच महिन्यांत पूर्ण बरी झाली.

डॉक्टर मिलिंद पटवर्धन मला म्हणाले, ''हॉस्पिटलमध्ये गेल्यास तो खर्च आपल्याला परवडणार नाही, त्यापेक्षा घरीच काय उपाय करता येईल ते करुया. असं मानणारे इथे खूप लोक असतात. त्यांना वाटलं होतं त्यापेक्षा कमी खर्च होणार हे कळल्यावर ते माझ्याकडे येतात. ऑपरेशन झाल्यावर घरी जाताना ते आणि त्यांचे नातेवाईक ज्या आनंदानं आणि आस्थेनं मला भेटायला येतात, तो पाहूनच माझ्या कामाची पावती मला मिळते. कुठल्याही व्यवसायिकाला यापेक्षा दुसरं काय हवं असतं?''

मी याबद्दल पुण्यातील माझ्या एका नातेवाईक सर्जनला विचारलं, त्यावर ते मला म्हणाले, ''पुण्याला या ऑपरेशनला पंचवीस ते तीस हजार रुपये खर्च आला असता, मुंबईला तो पन्नास हजारांवर सहज गेला असता. आणि यातल्या कुणीही तुम्हाला कसलीही खात्री दिली नसती.''

मुंबई पुण्याबाहेरही अतिशय तरबेज डॉक्टर आहेत आणि ते तिथल्या सामान्य लोकांना परवडेल अशी फी आकारून आपली हॉस्पिटलं चालवत असतात. ही सत्यस्थिती आहे.

महाराष्ट्रातील आर्थिक दृष्ट्या मागासलेला भाग म्हणजे कोकण, त्यावेळच्या अशा कोकणाबद्दल थोडी माहिती.

आताशी तुलना करता अख्ख्या कोकणात तेव्हा रेल्वेचा पत्ताच नव्हता. आमच्या रत्नागिरीहून मुंबईला जायचं तर रस्त्यानंच जावं लागे. पावसाळा संपल्यावर पुन्हा समुद्र थोडा खवळायला लागेपर्यंत बोटीनं, (खरं तर मोठ्या लाँचनं) मुंबई गोवा मार्गावर या बोटी असत. पण ही बोट लागणं (म्हणजे ओकारी होणं) याचा बऱ्याचशा प्रवाशांना त्रास होई. रस्त्यानं जायचं तर मुंबईपर्यंतच्या अडीचशे मैलपर्यंतच्या (आताचे साडतीनशे किलोमीटर) अंतरात डांबरी रस्ता आणि काँक्रिट रस्ता अजिबात नव्हता. सर्व रस्ता लाल मातीचा, गाडी गेल्याबरोबर धूळ उडवणारा. पनवेलला आल्यावर धूळ

नसलेला बराचसा चांगला रस्ता लागे. (तेव्हाचा पुणे-मुंबई रस्ता) मुंबईहून कोणी आपली मोटार घेऊन रत्नागिरीला आलाच, तर वाटेत पेट्रोल घ्यायचं आहे, गाडी फार गरम होतेय, रस्त्याचं दुरुस्तीचं कामं ठिकठिकाणी चाललयं, टायर पंक्चर झालाय, थोडी विश्रांती, वगैरे नित्य अडचणींना तोंड देत रत्नागिरीला पोहोचायला जवळजवळ वीस तास तरी लागत. कोणी यापेक्षा कमी वेळात आलाच, तर आता रस्ते सुधारलेत आणि आणखी सुधारताहेत. लवकरच आपण वीस तासांपेक्षा कमी तासातपण येऊ शकू, असे विश्वासानं आणि आनंदानं आम्ही बोलत असू. त्या जमान्यात वाढलेल्या माझ्यासारख्याला आता मुंबई ते अमेरिकेतल्या न्यू यॉर्कपर्यंतचं हजारो मैलांचं अंतर आपण सोळा तासांत पोहोचतो हे पाहण्याचा सुखद अनुभव मिळत असे. सर्व बऱ्यावाईट गोष्टी लक्षात घेता, दिवसेंदिवस आपली प्रगती होत आहे आणि ती तशीच होत रहाणार, ही आनंदाची भावना खूपच दिलासा देत असे.

आता रुपया तोच, पण त्याची किंमत किती घसरलीय! मुंबई-रत्नागिरी अंतर तेच, पण मुंबई न्यू यॉर्क पल्ल्याच्या तुलनेनं अगदीच नगण्य वाटायला लागलयं.

आपण ज्याबद्दल काहीच करू शकत नाही, नुसते प्रेक्षकासारखे पाहतच राहतो अशा या 'नाही नाही'च्या काळ्याकुट्ट ढगांच्या आकाशात त्या ढगांना थोड्याफार सोनेरी कडापण दिसतात. हाती लिहिलेलं कोणाचं पत्र कधी आलंच, तर मजकूर तोच, पण मोबइलवरच्या मेसेजपेक्षा ते कितीतरी कौतुकाचं वाटतं. खूप आनंद देणारं, खूप काळ लक्षात राहणारं.

अगदी हल्ली हल्लीपर्यंत जी गोष्ट आपल्याला बरीच किंवा खूपच मोलाची वाटत असे, पण जिचं महत्त्व कमी कमी होत होत आता अगदी नगण्य होत चाललीय ती म्हणजे कोण कुठे आहे यातील अंतर. मानसिक नव्हे, तर प्रत्यक्ष अंतर.

भगवद्‌गीतेतील, कुठे काय चाललंय, कोण काय बोलतंय हे सर्व जाणणाऱ्या, त्यांच्याशी कायम संपर्क असणाऱ्या, त्यांची आणि त्यांनी वापरलेल्या आयुधांची, शंखांची, घोड्यांची, रथांची, नावं अचूक जाणणाऱ्या पण स्वतः कुठे आहोत असल्या गोष्टींना महत्त्व न देणाऱ्या संजयसारखी आपण आज शास्त्रीय प्रगती केली आहे. मोबाइल, संगणक यांच्या साहाय्यानं. पण, अजून आपण पक्ष्यांसारखे एकमेकांशी कायम uninterrupted संबंध ठेवण्याएवढे प्रगत झालेलो नाही.

जिकडेतिकडे फिरणारे, पण रोज न चुकता घरट्याकडे वा झाडाकडे परतणारे पक्षी आपण नेहमीच पाहतो. परंतु सायबेरियापासून आपल्यापर्यंतचे हजारो किलोमीटर अंतर न चुकता येणारे (आणि हवामानबदलानुसार परत जाणारे) पक्षांचे थवेच्या थवे आपापसात सतत संपर्क ठेवून, वेग, उंची, दिशा अगदी न चुकता सांभाळणाऱ्या, तरबेज मिलिटरी सैनिकांसारखे कसे जातात, हे आपल्याला अजून समजलेले नाही. एवढी प्रगती आपण आजवर केलेली नाही. आजवरचा इतिहास पाहता, आपण ती करणारच.

**– सर्वोत्तम ठाकूर**


sarwottamthakur@hotmail.com

॥ग्रंथाली॥

## प्रकाश अंबुरे लिखित मराठी व हिंदी आवृत्ती

**आरवली ते अरावली**




**आरवली से अरावली**

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु. । मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

**टपालखर्च प्रत्येकी ३० रु.**



# हे कोणते पुण्य आले फळाला...

नीला उपाध्ये (पाटील)

एकविसाव्या शतकातही, जातीयतेच्या अदृश्य काचात, वंचिताचे साधंसरळ आयुष्य कष्टाने जगत असताना, काही भाग्ययोग आकस्मिक असे काही जुळून येतात, की ते आपल्या सामान्य, सरधोपट आयुष्याला एक संपूर्णपणे नवी अकल्पित कलाटणी देऊन जातात. काही महाभाग असे भेटतात, की जे पहिल्याच भेटीत, एकाच वाक्यात आपल्याला जगण्याचा खरा अर्थ शिकवून जातात. आपली आपल्याला नवी ओळख करून देतात.

असाच एक आगळावेगळा सुखद भाग्ययोग बरोबर ६१ वर्षांपूर्वी, शीवजवळच्या चुनाभट्टी या (तेव्हा शब्दश: कुग्राम असलेल्या) गावच्या एका आगरी कुटुंबात जन्मलेल्या माझ्या बाबतीत, शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर जुळून आला! खरे तर, त्या काळी मुंबई उपनगरांत राहणाऱ्या, शालान्त परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना कॉलेजप्रवेशासाठी माटुंगा-दादरची रुईया-रूपारेल हीच महाविद्यालये केवळ ठाऊक असायची! पण मी मात्र १९६२ साली शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर, जन्मग्राम चुनाभट्टीपासून जवळच असलेल्या शीव इथे नव्याने सुरू झालेल्या एस.आय.ई.एस. कॉलेजात प्रवेश घेतला.

त्याचे एक कारण होते, ते म्हणजे, माझी थोरली बहीण शैलजा (पाटील-घरत) 'पोलिटिकल सायन्स' हा विषय घेऊन बीएला त्या कॉलेजातून पहिली आल्यावर तिला फेलोशिप मिळाली होती. ताईकडून तिचे अध्यापक-कॉलेजचे प्राचार्य प्रा. राम जोशी यांच्या अध्यापन नि प्रशासन कौशल्याविषयी भरभरून ऐकले होते! दुसरे कारण म्हणजे, तिच्याकडून मला हेही कळले होते, की बालपणापासूनच ज्या मराठी साहित्य विषयात पदवी घ्यायचे मी मनात योजले होते; त्या मराठी विभागाचे प्रमुख या पदाची जबाबदारी त्या काळी साहित्यक्षेत्रात मोठाच दबदबा असलेल्या 'मौज', 'सत्यकथा'चे साक्षेपी संपादक श्रीकृष्ण पुरुषोत्तम तथा श्री.पु. भागवत यांनी तिथे स्वीकारली होती.

**पहिल्याच भेटीत, पहिल्याच वाक्यात**

कॉलेजप्रवेशासाठी शैलाताई 'ट्यूटर'च्या तिच्या अधिकारातून मला थेट प्राचार्य राम जोशीसरांच्या केबिनमध्येच घेऊन गेली तेव्हा, त्यांच्या उंचनिंच, देखण्या, भारदस्त प्रथमदर्शनाने मी दबूनच गेले होते! पण सरांनी माझी गुणपत्रिका बघितली मात्र; उत्स्फूर्तपणे ते उद्गारले, ''विदाऊट मॅथेमॅटिक्स-सो मच परसेन्टेज? अँड स्टिल यू आर सीकिंग ॲडमिशन फॉर आर्ट्स? दॅट मीन्स युवर कमांड ओव्हर लँग्वेजेस मस्ट बी एक्स्ट्राऑर्डिनरिली गुड! कॉलेज एक्स्पेक्ट्स मच फ्रॉम यू!''

प्रिय वाचक, एकच विनंती आहे- मी तुम्हाला हे जे स्वानुभव सांगतेय, त्यांना कृपया कपोलकल्पित आत्मश्लाघा किंवा स्वत:चीच डिंग मारण्याचा अश्लाघ्य प्रयत्न असा शिक्का मारून मोडीत काढू नका! एखादा हाडाचा शिक्षक प्रथम भेटीतच, उत्तम विद्यार्थ्यामधील सुप्त गुण नेमके हेरून, आपल्या प्रेरक शब्दांनी (एखादा प्रतिभावंत शिल्पकार ओबडधोबड दगडातून देखणी/कलात्मक मूर्ती घडवतो, तसा!) त्याला कसा घडवतो, याचे उत्तम उदाहरण म्हणजे एस.आय.ई.एस.मधला तो अनुभव होता.

मला ठाऊक आहे- व्यक्तिश: पूर्वापार मला न वाचलेल्या-भेटलेल्या कोणालाही मी जे सांगतेय ते कदाचित खरे वाटणारही नाही! परंतु पहिली ते सातवीपर्यंत चुनाभट्टीची पालिका शाळा आणि नंतर आठवी ते दहावी दादरची छबिलदास मुलींची शाळा - यापर्यंतच्या संपूर्ण शालेय



श्री.पु. भागवत



प्रा. राम जोशी

जीवनात ताराबाई खेर, सीताबाई क्षीरसागर यांसारख्या सर्व मायाळू शिक्षिकांनी कळकळीने विनवूनही, कधीही, एकाही विषयाचा रीतसर गृहपाठ करून अभ्यास पूर्ण वर्षभर मी केला नव्हता. तेव्हा प्रचंड तैलबुद्धी, एकपाठी, भाषेवर असाधारण प्रभुत्व असलेली होते मी! त्यामुळे सहामाही-वार्षिक परीक्षांच्या वेळी, त्या-त्या प्रश्नपत्रिकेच्या आदल्या दिवशी, त्या विषयाचे पाठ्यपुस्तक एकदा नुसते वाचून टाकले, तरी उत्तम उत्तरे लिहून, त्या विषयात सर्वाधिक गुण मिळवण्याचा अविश्वसनीय चमत्कार पहिली ते दहावीपर्यंत वर्षानुवर्षे मी केला होता. पाठ्यपुस्तकांचा अभ्यास करण्याऐवजी, मुक्त ग्रंथवाचन हौसेने करणे, शाळेच्या सेविका पथकाची प्रमुख म्हणून शाळेच्या सर्व सांस्कृतिक क्रीडा-कला उपक्रमांत हिरिरीने सहभागी होण्यातच तेव्हा मला विशेष रस असायचा! सर्व शिक्षिकांनी माझ्यासमोर हात टेकले होते.

**प्रथमच 'विद्यार्थी' घडले!**

राम जोशीसर मला थेट शिकवायला कधीच नव्हते. परंतु कॉलेजप्रवेशाची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर, कॉलेजच्या भव्य सभागृहात सर्व नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करताना, आपल्या ओघवत्या, स्फूर्तिदायी वाणीने, अस्खलित इंग्रजीत सरांनी केलेले आम्हा विद्यार्थ्यांकडून कॉलेजच्या अपेक्षा सुस्पष्ट करणारे भाषण आजही काळजावर कोरलेले आहे! कॉलेजच्या कॉरिडॉरमधून चालताना सरांच्या करारी चेहऱ्यावर नेहमी एक मंद स्मित कोरलेले असे, तरी त्यांचा वचक प्रत्येक विद्यार्थ्याला जाणवायचाच! सरांसमोर पॅसेजमध्ये हत-हूत करत खिदळणे, रिकामटेकडेपणी रेंगाळणे वगैरे प्रकार करण्याचे विद्यार्थ्यांच्या मनात येतच नसे! आमच्या कॉलेजात एखाद्या 'स्ट्रिक्ट' शाळेसारखी शिस्त असायची! त्यामुळे लेक्चर सुटली, की कॉलेजच्या सुसज्ज लायब्ररीत जाऊन बसणे ओघाने यायचेच! अन् ती लायब्ररी तर सुसज्ज म्हणजे वैविध्यपूर्ण ग्रंथांनी किती समृद्ध असावी? तिथल्या विपुल ग्रंथसंग्रहाने माझ्यासारखी ग्रंथवेडी प्रथमदर्शनीच प्रेमात पडेल, अशी चोखंदळ निवड होती त्यात!

'ऑल ग्रेट मेन थिंक अलाईक!' म्हणजे सर्व मोठ्या मनाची माणसे एकाच पद्धतीने विचार करत असतात! राम जोशीसरांनी या नव्या कॉलेजच्या प्राचार्यपदाची धुरा स्वीकारताना, रुईयापासूनचे त्यांचे मित्र श्री.पु. भागवत यांनाही इथे खेचून आणले होते. या दोघांची नावे ऐकून, पुण्याच्या प्रा. श्री.म. माटेसरांच्या ख्यातनाम शिष्या (पुढे २००७ साली 'मराठी शब्दलेखनकोश' सिद्ध करून, मराठी वाङ्मयव्यवहाराला अमूल्य हातभार लावलेल्या!) अजोड अध्यापिका यास्मिन शेख याही भागवतसरांना साहाय्यक अध्यापिका म्हणून आल्या होत्या. या दोन्ही गुरूंचीही नजर रत्नपारख्याची होती! कॉलेजची तिमाही परीक्षा झाली. भागवतसरांच्या मराठीच्या प्रश्नपत्रिकेत सर्वाधिक गुण पटकावून मी वर्गात पहिली आले. आम्हा विद्यार्थ्यांच्या तपासलेल्या उत्तरपत्रिका परत द्यायला सर वर्गात आले तेव्हा संतापाने त्यांचा गोरापान चेहरा लालबुंद झाला होता. लाह्या तडातडा फुटाव्यात, तसे त्यांच्या तोंडून शब्द फुटत होते-

''किती वाईट लिहिलेयंत बहुतेक जणांनी पेपर! तपासताना राहून राहून मला वाटत होतं- माझ्यासमोर विद्यार्थी नव्हेत, तर मार्कांची भीक मागणारे भिकारीच बसलेत कटोरे घेऊन! त्या सगळ्यांत एकाच विद्यार्थ्याचा पेपर असा आहे, की त्याने ठणकावून हक्काने माझ्याकडे मार्क मागितलेत आणि मीही त्याला पन्नासपैकी चाळीस गुण सहजपणे दिलेत, कारण शेवटी मार्क म्हणजे काही आम्हा परीक्षकांची वडिलोपार्जित इस्टेट नसते! कोण आहे हा १२० नंबरचा विद्यार्थी?''

हरखून मी उभी राहिले नि म्हटले, ''सर, मी नीला पाटील - १२० नंबर!''

''पाटील?'' सानंदाश्चर्याने सरांनी विचारले, ''कुठले

पाटील तुम्ही, अष्टागरातले की पश्चिम महाराष्ट्रातले?''

बिचकतच मी उत्तर दिले, ''दोन्हीकडची नाही सर! मी या शीवजवळच्या चुनाभट्टी गावातीलच आहे; अष्टागराशी माझा संबंध केवळ जन्मानं आगरी असण्यापुरताच आहे!''

''खऽऽऽरं! बीएला कुठला विषय घेणार आहात? काही ठरवलंय का?'' सरांनी विचारलं.

''मराठी नि संस्कृत, सर! शाळेत असल्यापासूनच ठरवलंय मी!'' - असे उत्तर मी देताच, सरांची कळी खुलली.

''पाटील, मधल्या सुटीत आपल्या मराठी विभागाच्या माझ्या कार्यालयात येऊन आम्हाला भेटा!'' त्यांनी फर्मावलं.

मधल्या सुटीत सरांच्या केबिनमध्ये गेले, तर तिथे शेखबाईही होत्या. त्या दोघांनी मुलाखत घेऊन, आतापर्यंत मी काय-काय वाचलेय, याची चाचपणी केली आणि बीएला अव्वल यायला, अजून काय-कसे वाचायला हवे, याचे मार्गदर्शन केले. त्या दिवसापासून आठवड्यातून एकदा शेखबाई नेमाने मला शीव नाक्यावरच्या भागवतसरांच्या - जणू पुस्तकांच्या भिंती असलेल्या घरी नेमाने घेऊन जायच्या. एक-एक लेखक पूर्णपणे वाचून, त्याच्या संपूर्ण साहित्याची टिपणे काढून, कसा आत्मसात करायचा; मुख्य म्हणजे, आपल्या भारतीय संस्कृतीचा मूलाधार असलेली रामायण-महाभारत यांसारखी महाकाव्ये, भगवद्गीता, भागवतपुराण यांसारखे धार्मिक ग्रंथही अभ्यासून साहित्यातील सांस्कृतिक संदर्भही कसे आत्मसात करायचे, ते सर-बाईंनी प्रथम वर्षापासून दोन वर्षे मला सातत्याने शिकवले.

**वाचनसमृद्धीतून आत्मविश्वास**

पद्धतशीरपणे करून घेतलेल्या त्या अभ्यासेतर पूरक वाचनामुळेच साहित्याची विद्यार्थिनी म्हणून माझा आत्म विश्वास प्रथम वर्षापासूनच सर-बाईंनी वाढवत नेला! विद्यापीठाने पाठ्यक्रमात लावलेल्या लेखकाच्या एकाच पुस्तकाचा अभ्यास केवळ परीक्षेपुरताच करण्याऐवजी, त्या लेखकाचे सर्व साहित्य-प्रत्येक पुस्तकाची स्वतंत्र टिपणे वाचनानंतर काढून, एक रसिक म्हणून आपल्यात कसे जिरवावे, हे त्या पूरक वाचनातून मी शिकत गेले. आपण वाचलेल्या वेगवेगळ्या पुस्तकांतले आशयद्रव्य-एकमेकांच्या संदर्भांतून अधिक भरीवपणे अनुभवून, अधिकाधिक वाचनसमृद्ध कसे व्हावे, हे त्या विपुल अभ्यासेतर - तरीही शिस्तबद्ध वाचन-मननातून आत-आत जिरत गेले. माझा आत्मविश्वास नकळत वाढवत गेले.

तसे ते मनात सखोल जिरले, त्यामुळेच १९६२ साली सुरू झाल्यापासूनची आठ वर्षे, स्त्रीप्रवेशबंदी कटाक्षाने पाळलेल्या, 'महाराष्ट्र टाइम्स'सारख्या प्रतिष्ठित दैनिकात, १९७० साली मी घुसू शकले होते. धकाधकीची राजकीय बातमीदारीदेखील करतानाच, चित्रपटशौकापोटी 'चित्रपश्चिमा' हे आंग्ल-चित्रपट-समीक्षणाचे (झटपट वाचकप्रिय ठरलेले!) सदर एक तपाहूनही अधिक काळ चालवू शकले होते. चित्रपटतंत्राचा विशेष अभ्यास नसतानाही, केवळ भाषासौष्ठवाच्या बळावर केलेल्या त्या सदरलेखनासाठी मी, चक्क आदरणीय दुर्गाबाई भागवत, शांता शेळके, विजय तेंडुलकर यांच्यासारख्या थोर-थोर साहित्यिक सदर लेखकांकडूनही दाद मिळवू शकले होते. कारण मरणावर प्रयोग करणाऱ्या तरुण वैद्यकीय विद्यार्थ्यांची कथा सांगणाऱ्या 'फ्लॅटलायनर्स' या चित्रपटाचे समीक्षण करताना, त्या मजकुराला 'आधुनिक नचिकेतांची कथा' असे लक्षवेधी शीर्षक मी सहजपणे देऊ शकले होते-माझी बहुश्रुतताच सिद्ध करू शकले होते! तेव्हा मला सार्वजनिक वक्तृत्वाची अजिबात सवय नव्हती. खाजगी बोलतानाही, शब्दांच्या तंगड्या एकात एक गुंतवून खूप जलद बोलण्याची खोड मला आहे, हे लक्षात आल्यावर, वर्गातल्या तासाचा एक भाग म्हणून वर्गात त्या दिवशी शिकवलेल्या विषयाचे सार पाच-दहा मिनिटांत वर्गासमोर सांगण्याचा कार्यानुभव सरांनी लावला. त्यातूनच मी विद्यापीठाच्या गरवारे शिक्षणसंस्थेत वृत्तविद्या अध्यापनाचा मराठी वर्ग - तेव्हाच्या कुलगुरू डॉ. स्नेहलता देशमुख यांच्या सूचनेवरून १९९७ साली निर्माण करून, तो आजतागायत चालवू शकले.



यास्मिन शेख

**रडायचे नाही; लढायचे!**

मी हे सारे करू शकले आणि अगदी म्युझियमसाठी वयाच्या पंचाहत्तराव्या वर्षी इंग्रजीतून ग्रंथलेखनही करू शकले कारण, बीए निकालाच्या त्या पहिल्या अपेक्षाभंगाच्या क्षणी, भागवतसरांनी दिलेला परखड पण मौलिक सल्ला!

सर म्हणाले होते, ''पाटील, आपणां सर्वांना तुमच्याकडून अपेक्षित सुवर्णपदक तर सोडाच पण प्रथम श्रेणीही वशिलेबाजीतून नाकारली जाण्याचा हा फटका तुम्हाला बसला, हे एका परीने चांगलेच झाले! आतापर्यंत आपल्या कॉलेजच्या संरक्षित वातावरणात, हमखास यशच यश मिळायची सवय तुम्हाला झाली होती. परंतु पदवी संपादनानंतर तुम्ही कुठेही पूर्णवेळ नोकरी करू लागाल, तेव्हा त्या व्यावसायिक जगात यश-अपयशाची प्यादी कशी मनमानीपणे हलवली जातात, ती आपला मनोभंग कसा करू शकतात, याचा अनुभव तुम्हाला आतापर्यंत आलाच नव्हता. पण या पुढच्या आयुष्यात पदोपदी असे झुंजत, कठोर कष्टाने स्वत:ची वाट तुम्हाला स्वत:च निर्माण करावी लागणार आहे! पण मला विश्वास आहे- तुम्ही इतक्या हुशार नि मेहनती आहात, की तुम्ही आपले ईप्सित साध्य करालच! एवढंच लक्षात ठेवा, कधीच रडायचं नाही, उलट रडवू पाहणाऱ्यालाच रडवायचं...''

**म.टा.त टिकू शकले**

भागवतसरांनी दिलेला तो सल्ला लक्षात ठेवला, म्हणून तर म.टा.मध्ये घुसून, तिथे साठी पूर्ण करेस्तोवर टिकून, 'मराठी पत्रकारितेतील पहिली पूर्णवेळ महिला बातमीदार' ठरण्याचे आणखी एक बिरुद माझ्यामागे लागू शकले! 'रडायचे नाही, लढायचे' या सरांनी दिलेल्या कानमंत्राच्या बळावरच, कामगार न्यायालयापासून दिल्लीत सर्वोच्च न्यायालयापर्यंत, स्त्रीद्वेष्ट्या संपादकांच्या तालावर नाचणाऱ्या टाइम्सव्यवस्थापनाविरुद्ध कडवी लढत ३६ वर्षे देऊन, अगदी राजकीय ते सांस्कृतिक सर्व वार्ताक्षेत्रांत लक्षणीय वृत्तांकन करून, साडेतीन डझनहून अधिक मानाचे पत्रकारिता पुरस्कार पटकावून, सेवाशर्तीनुसार वयाची साठ वर्षे पूर्ण करूनच १४ नोव्हेंबर २००५ रोजी 'महाराष्ट्र टाइम्स'मधून मी निवृत्त होऊ शकले.

श्रीपु व राम जोशी या दोन गुरुवर्यांच्या जन्मशताब्दी-निमित्त, माजी विद्यार्थिनी म्हणून आठवणी जागवून भावविभोर होण्याची संधी दिल्याबद्दल ग्रंथाली-शब्द रुचीचे आभार.

**- नीला उपाध्ये (पाटील)**
भ्रमणध्वनी : ७०२१३४६०३३

ग्रंथाली

# अवघा रंग.. एक झाला

**समरेंद्र निंबाळकर**




**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**
**टपालखर्च प्रत्येकी ३० रु.**

# दिवेलागणीच्या वेळी...

**जगदीश आचरेकर**




**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**
**टपालखर्च प्रत्येकी ३० रु.**



सुधीर शं. कुलकर्णी

# त्रिशंकू

(ठिकाण : अमेरिकेतील एका भारतीयाचे घर; घरात पती-राज, पत्नी-शुभा व शाळेत जाणारी दोन मुले. वेळ : मंगळवार सकाळ, मुले शाळेत गेलेली आहेत; राज व शुभा कामावर जाण्याच्या तयारीत किचनमध्ये.)

राज : शुभा, घरी यायला आज मला थोडा उशीर होईल! कारण बॉबला गॉल्फ गेमनंतर माझ्याशी काहीतरी बोलायचे आहे!

शुभा : तरीच आपण बेडरूममध्ये असताना काल रात्री त्याचा फोन आला होता! बॉब हा तुझ्या ऑफिस गॉल्फ लीगमध्ये आहे आणि तुमची ओळख तिथल्या क्लब हाऊसमधील!

राज : हो, तो आहे A डिव्हिजन प्लेअर म्हणजे फार सरस तर मी आहे C - साधारण! मात्र तो भारतात जाऊन आल्याने आमच्यात आत्मीयता निर्माण होऊन हळूहळू मैत्री निर्माण झाली! त्याने स्त्री व्हायचे ठरवले आहे असे मी उडत उडत ऐकले! त्यासंबंधी बोलायचे असावे असा माझा अंदाज आहे. घरी आल्यावर त्या विषयी सविस्तर सांगू शकेन. त्यावेळी मुलेही झोपलेली असतील. बाय!

शुभा : राज, मी पण निघतेच आहे ऑफिसला. टाऽटा! (राज व शुभा दोघेही त्यांच्या कारमधून घराबाहेर पडतात.)

(वेळ : मंगळवार संध्याकाळ; स्थळ : गॉल्फ क्लब हाऊसचे १०वे किंवा १९वे Hole म्हणजेच बार! : काही गॉल्फ खेळाडू



बारजवळच्या स्टुलांवर बसून ड्रिंक घेता घेता बोलत आहेत. कोपऱ्यावरील एका टेबलावर बॉब व राज बीअरचे ग्लास घेऊन गप्पा मारत आहेत.)

राज : बॉब, कसा झाला तुझा गेम? नशिबाने हवा फार चांगली होती नाही का?

बॉब (बीअरचा एक घुटका घेत) : काही काही easy shots मला मारता आले नाहीत. माझा लिंग परिवर्तनाचा निर्णय ऑफिसमध्ये जाहीर झाल्यापासून माझा मूड थोडा बिघडलेला आहे!

राज (बीअर पिता पिता) : हो, आजच त्यासंबंधीचे सरक्युलर वाचले! म्हणजे आतापर्यंतच्या ऐकलेल्या अफवा खऱ्या ठरल्या तर! ...ह्याबाबत मी तुला काय मदत करू शकतो?

बॉब (बिअर ग्लास खाली ठेवत) : मला माहीत आहे की काही लोक माझ्या ह्या निर्णयाची तर उडवत आहेत, तर काहींना वाटत आहे हे खूळ तात्पुरते आहे, काही महिन्यांनी येईल ताळ्यावर, वगैरे वगैरे. मला तुझ्यासारख्या मित्रांची नैतिक पाठिंब्याची जरुरी आहे. पुढच्या शुक्रवारी, लंच टाइममध्ये, माझ्या 'स्त्री रूपांतरा'संबंधी माझा थेरपिस्ट - मि. कारपेंटरची माहिती देणार आहे! त्याला तू उपस्थित राहावे अशी माझी विनंती आहे!

राज : त्या मीटिंगला मी अवश्य येईन. आज घरी यायला उशीर होणार म्हणून मी सांगून आलेलो आहे. तुझ्या 'लिंगपरिवर्तना'बद्दल मला कुतूहल आहे. तेव्हा त्याविषयी तू सविस्तर सांगितलेस तर जाणून घ्यायला आवडेल!

बॉब (बीअरचा एक मोठा घुटका घेऊन) : माझा जन्म एका कॅथॉलिक कुटुंबात झाला. चार बहिणींनंतर झाल्याने माझे फार लाड झाले! मला इतर मुलांप्रमाणे कार, गन, वगैरे पुरुषी खेळण्यांत इंटरेस्ट नव्हता, पण मी माझ्या बहिणींच्या बाहुल्या, भातुकलीचा डाव, अशा मुलींच्या खेळण्यात रमत असे! त्यावेळी माझ्या आई-वडिलांना व नातेवाईकांना वाटायचे की मोठ्या बहिणींचा माझ्यावर प्रभाव पडत असेल. हळूहळू मी तारुण्यात पदार्पण केले पण मुलींच्यात इंटरेस्ट निर्माण झाला नाही. मी लाजाळू असावा असे समजून माझ्या होणाऱ्या बायकोने - सुझीने डेटिंगसाठी पुढाकार घेतला व काही वर्षांनी आमचे लग्न झाले! (बीयरचा आणखी एक घुटका घेऊन) यथावकाश आम्हाला दोन मुले झाली. सुझी नर्स असल्यामुळे रात्रपाळी करत असे! त्याकाळात मुलांचा सांभाळ मी स्वखुशीने करे! त्यांचे खाणेपिणे, डायपर बदलणे, आजारी असताना त्यांची देखभाल करताना मला एखाद्या मातेप्रमाणे आनंद होई. थोडक्यात मुलांचा मी 'Mr. Mom झालो!

(त्या दोघांनीही आणखी एक एक बीअरची बाटली मागवली.)

बॉब : हां, तर जसजशी वर्षे जात राहिली तसतसा मी पुरुषी जीवनाचा तिरस्कार करू लागलो! अशा वेळी मनात विचार यायचा की हा पुरुषी मुखवटा फेकून द्यावा; सरळ स्त्री म्हणून उघड्यावर यावे! परंतु, सुझी व मुलांना काय वाटेल? ज्या समाजात वावरतो त्यांचे तोंड कसे बंद करायचे? अशा प्रश्नांमुळे मनात एक प्रकारची विफलता येऊ लागली. ते सुझीलाही जाणवले व तिने खोदून विचारता मी माझ्या डिप्रेशनचे कारण तिला सांगितले. लहानपणापासून एक स्त्री म्हणून जगण्याची सुप्त इच्छा माझ्यात होती व ती एका ज्वालामुखीप्रमाणे वर यायला धडपडत आहे. आणि माझी ही इच्छा, वाढत्या वयामुळे साध्य होईल की नाही ह्या शंकेमुळे मला खिन्नता येते! मी त्यासाठी थेरपिस्टला कन्सल्ट केले व त्याने मला प्रथम तुझ्याशी बोलायचा सल्ला दिला. मग सुझीला समजावले की तुला ह्याचा धक्का बसला असला तरी माझ्या ह्या वर्तनबद्दल तू स्वतःला मुळीच दोष देऊ नकोस. लिंगपरिवर्तन झाल्यावरही मी आर्थिकदृष्ट्या तुझी व मुलांची आबाळ होऊ देणार नाही तसेच नंतरच्या काळात मी तुम्हाला कायमचे मुकणार नाही याचे आश्वासनही देतो. मग मी सुझीला एक उदाहरण दिले- एकाद्या पुस्तकाचे कव्हर बदलले तरी आतील मजकूर किंवा चित्रे बदलत नाहीत. सुझीला बहुतेक माझे म्हणणे पटले नसले तरी येणाऱ्या परिस्थितीला तोंड देण्याची तयारी तिने दाखवली! नंतर मी तिला मि. कारपेंटर ह्यांनी दिलेल्या लिंगपरिवर्तन यासंबंधीची माहितीपत्रके वाचायला दिली!

(बॉबने बीरचा शेवटचा घुटका घेत, राजलाही त्या माहितीपत्रकाची एक प्रत घरी नेण्यासाठी दिली. राजनेही आपली बीअर संपवून पुढच्या शुक्रवारच्या माहिती सभेसाठी येणार असल्याचे आश्वासन देऊन बॉबचा निरोप घेतला. घरी येऊन जेवणानंतर मुलांबरोबर थोडा वेळ घालवून राज आपल्या बेडरूममध्ये आला व त्याने ते माहितीपत्रक वाचून शुभालाही वाचायला दिले. दुसऱ्या दिवशी रात्री मुले झोपल्यावर आपल्या बेडमध्ये राज व शुभा गप्पा मारत बसले.)

राज : अग शुभा, काल मी दिलेले माहितीपत्रक वाचायला वेळ मिळाला का?

शुभा : हो, लंचमध्ये थोडे चाळले. पण आता तूच त्यात काय लिहिले आहे हे मला सांग!

राज : जरूर. पण थोडक्यात सांगेन. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्या मनाची कवाडे उघडी ठेवा. बदल हा आयुष्याचा

अविभाज्य भाग आहे हे विसरू नका. लिंगपरिवर्तन केलेल्या व्यक्तीची सवय होईल कालांतराने. त्या बदलणाऱ्या व्यक्तीकडे नवीन व सुधारलेली आवृत्ती म्हणून बघा. जसे आपण एखाद्या कपड्याच्या साबणाच्या जाहिरातीत बघतो त्याप्रमाणेच! जीवन ही एक अडथळ्यांची शर्यत आहे. त्या व्यक्तीची ही स्थिती हा त्यातील एक अडथळा म्हणून नातेवाईक व मित्रांनी समजणे महत्त्वाचे आहे. बरेच लोक लिंगपरिवर्तनाची बातमी ऐकून गारठतात व त्यांची अवस्था बोगद्यात शिरल्याप्रमाणे होते, पण बोगद्याच्या अखेरीस प्रकाशाचे किरण दिसू लागतात हे विसरतात आणि महत्त्वाचे म्हणजे ह्या माहितीपत्रकाद्वारे पूर्वग्रह दूर करून, खुल्या मनाने अशा व्यक्तीचा स्वीकार करा व त्याचबरोबर त्याला पाठिंबा द्या. ह्या कारणाने पुढच्या आठवड्यातील माहितीसभेसाठी मी वाट बघत आहे. त्या सभेचा अहवालही मी तुला देईन. आता आपण झोपूया. (राज व शुभा डोळे मिटून झोपेची आराधना करतात.)

(स्थळ : ऑफिसमधील कॉन्फरन्स रूम. वेळ : शुक्रवारचा लंच टाइम. व्यासपीठावर स्त्रीवेषातील बॉब व शेजारी त्याचा थेरपिस्ट मि. कारपेंटर बसलेले आहेत. त्यांच्या समोरील टेबलावर माहितीपत्रकांचा गठ्ठा होता. राजने आपले सँडवीच घेऊन त्या रूममध्ये प्रवेश केला. बसलेल्यांत काही बॉबचे सहाध्याही तर काही गोल्फ लीगमधील खेळाडू त्याच्या नजरेस पडले.)

बॉब (उठून) : तुम्ही सर्व वेळ काढून इथे आल्याबद्दल मी तुमचे आभार मानतो! वेळेअभावी जास्त न बोलता पुढची सूत्रे माझे थेरपिस्ट मि. कारपेंटर यांच्याकडे सोपवतो!

कारपेंटर : तुम्हा सर्वांचे, बेकीच्या हितचिंतकांचे, मी स्वागत करतो. ह्यापुढे बॉब, बेकी म्हणून ओळखला जाईल. सभेनंतर ही माहितीपत्रके तुम्हाला दिली जातील. त्यात नमूद केल्याप्रमाणे 'लिंग परिवर्तनाचे' चार टप्पे आहेत आणि मी त्यांची माहिती सांगणार आहे! चिकित्सा (Therapy) हा पहिला महत्त्वाचा टप्पा ज्यात लिंग परिवर्तनाच्या निर्णयासाठी माझ्यासारख्या थेरपिस्टच्या सल्ल्याची जरुरी आहे. तसा सल्ला माझ्याकडून घेऊन तसेच माझ्या विनंतीनुसार ह्या भागातील आधारगटाच्या (Support Group ) सभांना बेकी हजर राहू लागली. गटाच्या सदस्यांनी बेकीला सर्व प्रकारच्या मदतीचे आश्वासन दिले आहे. दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यातील संक्रमणतणाव काळात, तसेच पुढील काळातील मानसिक तणाव कमी करण्यासाठी बेकीला ह्या गटाच्या पाठिंब्याची जरुरी आहे. हार्मोनल थेरपी व Electrolysis हा दुसरा टप्पा. त्यात सेक्स हार्मोन घेऊन पुरुषाचे रूपांतर हळूहळू बाईच्या शरीरामध्ये होते, पण त्यामुळे बेकीच्या शरीराव्यतिरिक्त मनोभावनांवरही परिणाम होतो. Electrolysisच्या साहाय्याने पुरुषांच्या शरीरावरील केसांचे निर्मूलन केले जाते.

तिसरा महत्तवाचा टप्पा - याबद्दल मी सविस्तर बोलणार आहे! बेकीची प्रगती ह्या टप्प्यापर्यंत झाली आहे. तो टप्पा सुरू करताना बेकीला तुमच्या सर्वांच्या सहकार्याची आवश्यकता आहे व त्यासाठी ही सभा आयोजित केलेली आहे. रिअल लाईफ टेस्ट ह्या तिसऱ्या टप्प्यात बेकी घरीदारी चोवीस तास स्त्री म्हणून वावरायला सुरुवात करणार आहे. आणि हे 'नाटक' तिला वर्षभर करावे लागणार आहे! ह्या काळात तिला 'पल्याडचे' आयुष्य कसे असते ह्याची चुणूक मिळावी हा हेतू! तसेच 'आँखो देखा हाल'ही अनुभवता येईल! एकदा का लिंगपरिवर्तनाची शस्त्रक्रिया (चवथा व शेवटचा टप्पा) झाली की ती काळ्या दगडावरची रेघ आहे. शस्त्रक्रिया उलट फिरवता येत नाही. त्यानंतरच्या काळात बेकीला बाहेर Discrimination, नातेवाईक आणि मित्रमंडळींकडून नापसंती, तसेच अवहेलना व त्रास सहन करावा लागेल. शस्त्रक्रियेसाठी एक महत्त्वाची अट आहे- त्यात आधी शरीर धडधाकट असले पाहिजे, तसेच कुठल्याही प्रकारची शारीरिक व्याधी असता कामा नये. आता कोणाला प्रश्न विचारायचे असतील त्यांनी विचारावे!

(एवढे बोलून कारपेंटर- थेरपिस्ट खाली बसले. हॉलमधील एक पुरुष उठला.)

एक पुरुष : एखाद्या पुरुषाचे स्त्रीत रूपांतर झाल्यावर तिला कोण-कोणत्या प्रश्नांना तोंड द्यावे लागते!

कारपेंटर (हसत-हसत) : कोणत्याही स्त्रीला पडणाऱ्या प्रश्नांशी बेकीला सामना करावा लागणार आहे. काही बाबतीत दुय्यम दर्जाची वागणूक मिळेल. मुख्य म्हणजे, इतर स्त्रियांप्रमाणे ह्या 'नवस्त्री'वरही बलात्काराची टांगती तलवार सतत असणार. थोडक्यात 'नको हा बायकांचा जन्म' अशी उपारती येऊ शकते. म्हणून येते वर्ष बेकीच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. (लंच अवर संपत आल्याने कारपेंटर यांनी सर्वांचे आभार मानून, प्रत्येकाला एक-एक माहितीपत्रक दिले व सभा संपली.)

(काही दिवसांनंतर रात्री, बेडरूममध्ये राज व शुभा बोलत आहेत.)

शुभा : त्या माहितीसभेनंतर तुला ऑफिसमध्ये काही शेरे ऐकायला मिळाले का?

राज : होय, दुपारच्या कॉफी ब्रेकमध्ये कॅफेटेरियात असताना काही टवाळखोर लोकांची मुक्ताफळे ऐकायला मिळाली.

एक म्हणाला, आता काय बेकीच्या मुलांना दोन-दोन आया मिळत आहेत : एक जन्मदाती, तर दुसरी ‘स्त्रीवेषधारी’! दुसरा, एक दीड शहाणा बोलला : बॉब नव्हे बेकी आता कुठले टॉयलेट वापरणार? पुरुषांचे की स्त्रियांचे?

शुभा : तू त्यांना प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केलास का?

राज : नाही, मात्र बेकीला त्याच्या ऑफिसमध्ये भेटतो. त्यावेळी लोकांचे ऐकायला आलेल्या कॉमेंट त्याला सांगत असतो. त्याने त्याकडे दुर्लक्ष करायला सांगितले आहे.

शुभा : अरे, त्याचे सध्या काय चालले आहे? त्याला ‘स्त्री नाटकाचा’ कंटाळा तर आला नाही ना?

राज : अग, त्याच्या बोलण्यावरून अजून तरी वाटत नाही! आता त्याला दर तीन महिन्यांनी संपूर्ण फिजिकल टेस्टसाठी डॉक्टरकडे जावे लागते, असे त्याने सांगितले.

शुभा : चल रात्र झाली. गुड नाईट! (दोघेही दिवा मालवून झोपून जातात.)

(सहा महिन्यानंतर राजचे ऑफिस. हिवाळ्याचे दिवस, त्यामुळे गॉल्फ लीगही संपलेली होती. त्याचा फोन वाजतो, उचलून तो बोलू लागतो.)

राज : हॅलो, बेकी कशी आहेस? फिजिकल टेस्टचा रिपोर्ट आला का? मागच्या वेळी डॉक्टरांना डायबेटिसचा संशय आला होता व तेव्हापासून तू डाएटिंग करत आहेस. वजन कमी झाले का?

बेकी (उदासी स्वरात) : आपण ऑफिसनंतर Starbucks मध्ये भेटूया का? बारमध्ये नको कारण वजन कमी करण्यासाठी मी आता दारू सोडली आहे!

राज : बेकी, तुला मी अवश्य भेटेन! आता मी फोन करून शुभाला घरी यायला उशीर होईल याची कल्पना देतो! I will see you later (त्याने फोन ठेवला व घरचा लावला.)

(स्टारबक्स कॉफी शॉप. बाहेर पावसाची रिप रिप चालू आहे. एका कोपऱ्यात राज व बेकी, कॉफी घेता घेता, बोलत बसलेले आहेत.)

बेकी (कॉफीचा घोट घेऊन, रडवेल्या सुरात) : माझ्या स्वप्नांचा चक्काचूर झाला रे, राज!

राज (समजुतीच्या स्वरात) : शांत हो बेकी. मला नीट समजावून सांगशील का?

बेकी : माझे नशीबच फुटके म्हणायचे. नुकत्याच झालेल्या फिजिकलमध्ये माझ्या हृदयाच्या व्हॉल्वमध्ये एक छोटेसे छिद्र एक्स-रेमध्ये सापडले आहे! त्या कारणाने माझी लिंग परिवर्तनाची शस्त्रक्रिया होऊ शकणार नाही.

राज (कॉफीचा एक घुटका घेत) : अग, पण त्यातून दुसरा मार्ग नाही का?

बेकी (रडवेल्या सुरात) : नाही, कारण डायबेटिसही अजून कमी झालेला नाही-वजन कमी करूनसुद्धा! या छिद्रामुळे कोणताही सर्जन शस्त्रक्रियेला तयार नाही. काही वर्षांपूर्वी मी तुमच्या भारतातील बँगलोरला गेले होते. त्यावेळची मला आठवण झाली. शॉपिंगसाठी खादी एम्पोरियममध्ये जात असताना काही पुरुषांना बायकांच्या साडीत बघितले. चौकशी केल्यावर समजले की त्यांना तृतीयपंथी किंवा हिजडे म्हणतात. मी आता त्यांच्यासारखी दिसायला लागली का रे? (त्यानंतर बेकी डोळ्यांवर हात ठेवून चक्क रडू लागली.)

राज (समजुतीच्या स्वरात) : हे बघ, बाहेर पडणाऱ्या पावसाला मी काही थांबवू शकत नाही, पण तुझे अश्रू मला थांबवणे भाग आहे. त्यासाठी मी रामायणातील त्रिशंकूची गोष्ट तुला सांगतो. सूर्यवंशी घराण्यातील त्रिशंकूराजाला मेल्यानंतर स्वतःच्या शरीरासह स्वर्गात जायचे होते! यासाठी त्याने वशिष्ठऋषींची मदत मागितली. त्यांनी मागणी अशक्य म्हणून धुडकावून लावल्याने त्रिशंकू त्यांच्या मुलांकडे गेला. तुला माहीत आहे की हिंदू धर्मात फक्त आत्मा परलोकी जाऊ शकतो. त्यांनीही त्याची मागणी फेटाळल्याने त्रिशंकूने त्यांचा अपमान केला. त्यावर वशिष्ठपुत्रांनी त्रिशंकूला ‘तू चांडाळ होशील’ असा शाप दिला. मग त्रिशंकू विश्वामित्रऋषींकडे गेला. त्यांना त्रिशंकूची दया आली व त्यांनी केलेल्या तपाच्या सामर्थ्यावर त्रिशंकू स्वर्गात जायला निघाला. स्वर्गाच्या दारात इंद्राने ‘चांडाळरूपी’ त्रिशंकूला आत यायला अटकाव केला. तुझी जागा इथे स्वर्गात नसून नरकात आहे असे म्हणून इंद्र त्याला नरकात ढकलू लागला. परत त्रिशंकूने विश्वामित्रांची मदत मागितली. विश्वामित्र व इंद्र ह्यांच्यात तडजोड होऊन अखेर त्रिशंकू स्वर्गात किंवा नरकात न जाता, मध्येच अंतराळात लटकत राहिला. (ही कथा ऐकून बहुधा बेकी आता रडायची थांबली होती.)

बेकी (चेहऱ्यावर हास्य आणत) : राज, तुझ्या ह्या कथेमुळे आता मला थोडा धीर आला आहे! थँक्स!

राज : हे बघ, ‘बॉब म्हणून धड पुरुषही नाही व बेकी म्हणून धड स्त्रीही नाही अशी तुझी अवस्था... आधुनिक युगातील त्रिशंकूची!

(एकमेकांना गुड नाइट करून दोघेही Starbucksच्या बाहेर पडतात. बाहेर पाऊसही आता थांबलेला आहे. पडदा पडतो!)

**– सुधीर शं. कुलकर्णी**
sudhirs.kulkarni@gmail.com

## ‘अवघा रंग... एक झाला’ काव्यसंग्रहाचे प्रकाशन


‘निखळ, नितळ आणि प्रामाणिक कवितांचा अंतर्मनाला छेडणारा संग्रह’ ह्या शब्दांत कौतुक करत मुंबई उच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांनी जिल्हा न्यायाधीश म्हणून कार्यरत असलेल्या समरेंद्र निंबाळकर लिखित ‘अवघा रंग.. एक झाला’ ह्या कवितासंग्रहाचे प्रकाशन मुंबईतील के. सी. महाविद्यालयाच्या सभागृहात केले. त्यावेळी ज्येष्ठ साहित्यिक व संपादक अरुण शेवते मुख्य वक्ते म्हणून उपस्थित होते.

समरेंद्र यांच्या काव्यातील प्रामाणिक भावना थेट अंतर्मनाला जाऊन भिडतात. समर्पक शब्दयोजना करून कवितेचा आशय मांडण्याचे कौशल्य प्रत्येक कवितेत प्रकर्षाने जाणवते, असे मृदुला भाटकर म्हणाल्या. ग्रंथालीने न्यायव्यवस्थेतील कवीला या काव्यसंग्रहांमार्फत रसिक वाचकांपर्यंत पोहोचवून मराठी साहित्यात अतुल्य भर टाकली आहे, असेही त्या म्हणाल्या.

आशयघन काव्य दुर्मिळ होत असताना आणि उथळ यमक जोडलेल्या कवितेचे बाजारीकरण होत असताना निंबाळकर यांच्या कवितांचे वेगळेपण प्रशंसनीय आहे असे परखड प्रतिपादन ज्येष्ठ कवी अरुण शेवते यांनी केले. ग्रंथालीच्या विश्वस्त डॉ. लतिका भानुशाली यांनी यावेळी प्रकाशकाचे मनोगत व्यक्त केले आणि काव्यसंग्रहाची मार्मिक समीक्षा केली. मृदुला मॅडमनी पायवाट निर्माण केली, ज्यामुळे आज आम्ही लिहू शकत आहोत अशा भावना समरेंद्र यांनी व्यक्त केल्या. एखादा प्रसंग अस्वस्थ करतो, त्यातून कवितेची एखादी ओळ सुचते आणि त्यातून पूर्ण कविता निर्माण होते अशा शब्दात त्यांनी निर्मितीची प्रक्रिया उलगडली. पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे प्रास्ताविक ग्रंथालीचे मुख्य विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी केले, तर सूत्रसंचालन जीएसटीच्या उपायुक्त व कवयित्री गीतांजली टेमगिरे व प्रा. डॉ. प्रताप साळुंके यांनी केले. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात कवी समरेंद्र निंबाळकर, डॉ. उल्का निंबाळकर, डॉ. आरती चव्हाण, रणजित फरांदे, सई निंबाळकर, स्वराज निंबाळकर यांनी काव्यसंग्रहातील निवडक कविता सादर करून श्रोत्यांची दाद मिळवली. •

• • • • • • • • • • • • • • • •

## ‘गल्फस्थ’ पुस्तकाचे प्रकाशन




**प्रकाशनसमयी – सुदेश हिंगलासपूरकर, लेखक सतीश थत्ते, संजय उपाध्ये आणि सतीश भुजबळ**

ग्रंथाली प्रकाशित २ ऑक्टोबर रोजी सतीश थत्ते लिखित ‘गल्फस्थ’ ह्या पुस्तकाचे प्रकाशन झाले. मध्यपूर्वेतील आखातात म्हणजेच गल्फमध्ये, ‘हनीवेल’ कंपनीचे टेक्निकल ट्रेनिंग इन्स्ट्रक्टर म्हणून कार्यरत असताना, तेथील आठवणींवर आधारित हे पुस्तक सतीश थत्ते ह्यांनी लिहिले आहे. तेथील वास्तव्यातही आपले लेखन, कविता, अभिनय हे छंद त्यांनी जोपासले. एका आगळ्यावेगळ्या विषयावरच्या ह्या पुस्तकाचे प्रकाशन, ‘गपाष्टक’ आणि ‘मन करा रे प्रसन्न’ ह्या प्रसिद्ध कार्यक्रमांचे सादरकर्ते, संजय उपाध्ये आणि भारतातील ‘कल्पतरू’ ह्या आंतरराष्ट्रीय उद्योगसमूहाचे माजी संचालक सतीश भुजबळ ह्यांच्या हस्ते झाले. गल्फमध्ये नव्याने जाणाऱ्या अनेकांसाठी हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल, असे प्रतिपादन ह्या मान्यवरांनी केले. ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर ह्यांनी प्रास्ताविक केले. •

## संत बहेणाबाई पुस्तक प्रकाशन समारंभ वृत्तांत

जगद्‌गुरू संत तुकाराम महाराजांच्या एकमेव शिष्या संत बहेणाबाईंच्या जयंतीदिनाचे औचित्य साधून योजना शिवानंद लिखित 'संत बहेणाबाई शिऊरकर' या ग्रंथाली'च्या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ विधिज्ञ राजेंद्र पै व ज्येष्ठ साहित्यिक संजीवनी खेर यांच्या हस्ते शनिवार, १४ ऑक्टोबर २०२३ रोजी वांद्रे येथील प्रतिभांगण येथे झाले. संतसाहित्यात व वारकरी संप्रदायात काहीशा दुर्लक्षित असणाऱ्या संत बहेणाबाई योजना शिवानंद यांच्या पुस्तकांमुळे प्रकाशझोतात आल्या आहेत. त्यामुळे त्यांना डॉक्टर ही उपाधी लावणे सयुक्तिक ठरेल, असे गौरवोद्‌गार संजीवनी खेर यांनी काढले. पुढे त्या म्हणाल्या, की बहेणाबाई आपल्या काव्यात म्हणते, 'प्रपंच परमार्थ समान चालविला । तिनेच गगन झेलियले ।।' या काव्यपंक्तीमधून तिने स्त्रीसामर्थ्याबद्दलचा आत्मविश्वास व्यक्त केला आहे. ज्येष्ठ विधिज्ञ राजेंद्र पै यांनी खुमासदार शैलीत आपले मनोगत मांडले. आचार्य अत्रेंच्या आठवणींना उजाळा देत तुकाराम महाराजांच्या साहित्याशी असलेला त्यांचा अनुबंध उलगडला. संत बहेणाबाई या तुकाराम महाराजांच्या एकमेव स्त्री-शिष्या आहेत. त्यांची अभंगवाणी व त्यामागच्या निर्मितीकथनाचा प्रवास प्रस्तुत पुस्तकातून उलगडला गेला आहे, त्यामुळे हे पुस्तक एक महत्त्वाचा दस्तऐवज आहे, असे राजेंद्र पै म्हणाले.

प्रस्तुत कार्यक्रमात प्रा. मीना गोखले, डॉ. मुकुंद कुळे, डॉ. मीनाक्षी पाटील, श्रीमती स्नेहा ओझा यांनी शुभेच्छापर भाषणे केली. योजना शिवानंद यांनी संत बहेणाबाई अभंगवाणी कार्यक्रमाची झलक म्हणून ओवी, आर्या व श्लोक गाऊन सादर केले. योजना यांनी बहेणाबाईचे काव्य आजच्या काळाशी जोडून निरुपणात्मक विचार मांडले. प्रस्तुत पुस्तकाचे प्रकाशन देहू येथील विठ्ठल रखुमाई मंदिरात संतसाहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते १२ ऑक्टोबर २०२३ रोजी झाले होते. त्या प्रकाशन समारंभाचा व्हिडिओ या कार्यक्रमात दाखवण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथालीचे मुख्य विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी केले तर सूत्रसंचालन अश्विनी भोईर यांनी केले. पुस्तक प्रकाशन समारंभ ग्रंथाली आणि शिवगंधार प्रतिष्ठान यांनी आयोजित केला होता. •

• • • • • • • • • • • • • • • • •

## अटलांटा व्हाया दहिसर पुस्तक प्रकाशन

'ग्रंथाली' प्रकाशित, रवी मल्ल्या लिखित 'मुक्काम पोस्ट अटलांटा व्हाया दहिसर' या पुस्तकाचे प्रकाशन समाज कल्याण केंद्र, दहिसर, मुंबई येथे रविवार, १५ ऑक्टोबर २०२३ रोजी झाले.

'वस्त्रहरणकार' गंगाराम गवाणकर, मुंबई बँकेचे संचालक अभिषेक घोसाळकर आणि शिरीष वराडकर या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. ग्रंथालीचे प्रमुख विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी ग्रंथालीबद्दल माहिती दिली.

लेखक रवी मल्ल्या यांनी आपले मनोगत व्यक्त केले. पुस्तकाची कल्पना कशी सुचली हे सांगताना पुस्तकातून होणारे प्रबोधन, सद्य:परिस्थिती आणि लेखन करतेवेळी पुस्तकाचा होणारा वैचारिक प्रवास याबद्दल माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे गंगाराम गवाणकर यांनी मार्मिक शैलीत आणि खुमासदार किश्शांनी बहार आणली. रवी मल्ल्या यांच्या लोकसंग्रहाचे कौतुक करून त्यांना नकार देणे शक्य नसते असे सांगत या प्रकाशनाला उपस्थितीत राहण्याबाबत सांगितले. त्यांच्या लेखनाचे कौतुक केले व त्यांच्या मुलींनी त्यांच्याविषयी लिहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

माजी नगरसेवक आणि मुंबई बँक संचालक अभिषेक घोसाळकर यांनीही, मी प्रथमच एखाद्या पुस्तकाच्या प्रकाशनाला वक्ता म्हणून आलो आहे, तेव्हा काय बोलावे हा प्रश्न आहे, असे म्हणत उत्स्फूर्त भाषण करून लोकांना मोहित केले.

अपेक्षित पाहुणे विनोद घोसाळकर, उपनेते शिवसेना, माजी आमदार हे अचानक निघालेल्या महत्त्वाच्या कामामुळे कार्यक्रमासाठी येऊ शकले नाहीत. त्यांनी पाठवलेला संदेश डॉ. लतिका भानुशाली यांनी वाचून दाखवला.

कार्यक्रमाची सुरुवात सुप्रसिद्ध गायिका संगीता मिरकर यांच्या गणेशस्तवनाने झाली. डॉ. लतिका भानुशाली यांनी सुंदर आणि मार्मिक विवेचन करत सूत्रसंचालन केले. यावेळी सादर करण्यात आलेल्या संगीत कार्यक्रमात संगीता मिरकर, गिरीधर घाटे, केतुल देसाई, सुरेश साळवी आणि पंढरीनाथ लाड यांनी आपल्या अप्रतिम गायकीने जमलेल्या रसिकांना मंत्रमुग्ध केले. •

# ‘आरवली से अरावली’ – राजस्थानमधील पहिलं पुस्तक प्रकाशन!

प्रकाश अंबुरे लिखित, ‘ग्रंथाली’ प्रकाशित ‘आरवली ते अरावली’ या आत्मकथनाचा हिंदी अनुवाद ‘आरवली से अरावली’ या पुस्तकाद्वारे प्रसिद्ध झाला. राजस्थानमधील ब्यावर या नुकत्याच जिल्हाची मान्यता लाभलेल्या ठिकाणी ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हे पुस्तक प्रकाशित झाले. यापूर्वी तिथे कोणत्याही पुस्तकाचे प्रकाशन न झाल्याने हे पहिलंच पुस्तक प्रकाशन ठरलं. भाभा अणुसंशोधन केंद्राचे माजी शास्त्रज्ञ शरद काळे, कोटाहून खास या कार्यक्रमासाठी आलेले उद्योजक आणि लघुउद्योग भारतीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष ताराचंद गोयल आणि ‘भास्कर’ दैनिकाचे पत्रकार अमित शर्मा यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले. अमित शर्मा यांनी पुस्तकाचे सारच सांगितले. ते म्हणाले, ‘देशभरात मारवाडी समाजानं उद्योगात पाय रोवले आहेत, तर हे पुस्तक महाराष्ट्रातून मारवाडी प्रदेशात येऊन विदेशापर्यंत आपल्या उद्योगाचा विस्तार केलेल्या सामान्य माणसाचं आहे. रिक्षा चालवणाऱ्या, आंबे विकणाऱ्या, क्लर्क म्हणून नोकरीची सुरुवात करणाऱ्या माणसाची ही भरारी किती कौतुकास्पद आहे, हे पुस्तक वाचल्यावर कळतं. इथल्या प्रत्येकानं ते वाचायला हवं.’ शरद काळेंनीही अंबुरे यांचे कौतुक करताना, ‘इमानदारीनं, सचोटीनं व्यवसाय करताना केलेला संघर्ष आणि अडचणींचा केलेला सामना प्रेरणादायी आहे. आपल्या उत्कर्षाबरोबर सहकाऱ्यांचाही उत्कर्ष पाहणं, अनुकरणीय आहे,’ असे उद्‌गार काढले. ताराचंद गोयल म्हणाले, ‘समाजात नकली मालाची मागणी आणि खप इतका असताना असली मालच विकण्याची वृत्ती ठेवणं आणि स्वत:ला सिद्ध करणं, हे कठीण काम असतं. अंबुरे यांनी ते कष्टसाध्य केलं आहे.’ यावेळी ग्रंथालीचे विश्वस्त पद्‌भूषण देशपांडे यांनी ‘ग्रंथाली’च्या वाटचालीबद्दल ब्यावरकरांना माहिती दिली. लघुउद्योग भारतीच्या रमेश भराडिया, अजय खंडेलवाल, गगन भारद्वाज, विजय मेहता, जय आनंदानी व दीपक झवर आदींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. लघुउद्योग भारतीतर्फे सचिन नाहर यांनी प्रकाश अंबुरे यांच्याबद्दल मनोगत व्यक्त केलं. अनुवादक आशिष कुलकर्णी व भाषेतील हिंदी लहेजा नीट करून उत्तम संपादन केलेले रामप्रसाद कुमावत यांचा सत्कार करण्यात आला. कुलकर्णींनी अनुवादक म्हणून मनोगत मांडले. लेखक प्रकाश अंबुरे यांनी त्यांचे गुरू अल्मित्रा पटेल आणि हिलेल ज्युडा यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. ‘इथल्या समाजानं मला स्वीकारलंच; शिवाय महत्त्वाचं स्थानही दिलं’ याबद्दलही समाधान व्यक्त केले. शेवटी अंबुरे यांची डॉ. लतिका भानुशाली, डॉ. मृण्मयी भजक आणि विनायक कुळकर्णी यांनी प्रकट मुलाखत घेतली. त्यापूर्वी प्रकाश अंबुरे यांचा ग्रंथालीतर्फे विशेष सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रम अर्थातच हिंदी भाषेत झाला व त्याचे सूत्रसंचालन डॉ. लतिका भानुशाली आणि डॉ. मृण्मयी भजक यांनी उत्कृष्ट केले. त्याला उत्तम प्रतिसाद लाभला.

या प्रकाशनासाठी ‘ग्रंथाली’ची टीम गेली होती. त्याचाच एक भाग म्हणून शरद काळेसरांनी ‘विज्ञानधारा’ उपक्रमांतर्गत ‘वर्धमान कन्या पी.जी. महाविद्यालय’ आणि ‘भवरलाल गोठी पब्लिक सेकंडरी स्कूल’ या शिक्षणसंस्थांच्या शिक्षक-विद्यार्थी आणि पदाधिकारी यांच्या समक्ष पर्यावरण संरक्षणविषयक मार्गदर्शन केले. प्लास्टिकच्या वाढत्या समस्येबद्दल जागृती केली. घरच्या घरी खत कसे बनवावे याबद्दल विशद केले.

या एकूण कार्यक्रमाचे उत्तम नियोजन श्रद्धा आणि अभिजित अंबुरे यांनी केले.




**प्रकाशनाच्या वेळी प्रकाश अंबुरे यांचे ‘लघुउद्योग भारती’मधील सहकारी**

## डॉ. प्रदीप आगलावे यांच्या दोन कादंबऱ्यांचे प्रकाशन

'असामान्य व्यक्तींवर खूप लेखन होत असते. मात्र, सामान्य माणसांच्या आयुष्यातीलही अनेक गोष्टी प्रेरक असतात. सामान्य माणसांतील असामान्यत्वावर लेखन करतो तो खरा लेखक होय. असे लेखन अधिक प्रमाणात होणे जास्त महत्त्वाचे आहे', असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी शनिवारी केले.

ग्रंथाली प्रकाशित, दीक्षाभूमीवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील एन. एच. कुंभारे सभागृहात डॉ. प्रदीप आगलावे यांच्या 'फुले फुलली श्रमाची' आणि 'रजनी' या कादंबऱ्यांच्या प्रकाशन समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी होते. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार श्रीमंत माने, कमलाकर धारप, राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे, ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर उपस्थित होते.

'डॉ. आगलावे यांच्या दोन्ही कादंबऱ्या कलात्मक आहेत. दु:खमुक्त मानवता निर्माण करण्यासाठी लेखकाची भूमिका महत्त्वाची ठरते. डॉ. आंबेडकर आणि बुद्धवादाचे संस्कार असनूही कादंबरीत इतर धर्माच्या व्यक्तिरेखांनाही न्याय देण्यात आला आहे', असे डॉ. सबनीस म्हणाले.

पुस्तकावर भाष्य करताना डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी दोन्ही कादंबऱ्यांमध्ये वास्तव आणि कल्पित यांचा उत्तम संगम साधण्यात आल्याचे सांगितले. डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी रियाज नसलेले लेखक वाढल्यामुळे साहित्याचा दर्जा घसरत असल्याची खंत व्यक्त केली.

'आपण भोगलेले इतरांना सांगितले की त्यांना प्रेरणा मिळते. त्यामुळेच मराठीमध्ये मोठ्या प्रमाणात आत्मकथनपर लेखन झाले', असे श्रीमंत माने म्हणाले. इतर मान्यवरांनीही मनोगत व्यक्त केले.

लेखक डॉ. प्रदीप आगलावे यांनी लेखनामागील भूमिका मांडली. सूत्रसंचालन आणि आभारप्रदर्शन डॉ. वीणा राऊत यांनी केले. •

• • • • • • • • • • • • • • • • •

## विजय बुक्कावार यांच्या 'चिरंजीव भारत – धर्मेतिहासाचे वेगळे आकलन' पुस्तकाचे प्रकाशन

विजय बुक्कावार यांच्या 'चिरंजीव भारत' पुस्तकाचे प्रकाशन वांद्रे येथील ग्रंथाली-प्रतिभांगण येथे २५ ऑक्टोबर २०२३ रोजी ज्येष्ठ पत्रकार निळू दामले यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी बोलताना निळू दामले म्हणाले, की विविधता हे भारताचे वैशिष्ट्य आहे. इतकी विविधता असलेल्या भारतात माणसे एकत्रित राहतात. त्यांना जोडणारी अशी कोणती गोष्ट आहे, याचे मला राहून राहून कुतूहल वाटते. बुक्कावार यांचे हे पुस्तक इतिहासाचे संशोधन करत असताना साधनांचा शोध कसा घ्यावा, याचा परिपाठ देणारे आहे. धर्मेतिहासाचे त्यांना झालेले आकलन त्यांनी या पुस्तकात मांडले आहे. त्याचबरोबरीने त्यांनी औद्योगिक सुरक्षितता क्षेत्रात आलेले अनुभव, आपले जगणे शब्दबद्ध करावे, जे सर्वांना प्रेरणा देणारे असेल.'

या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात पुस्तकाच्या अनुषंगाने खुली चर्चा करण्यात आली. विज्ञान मराठी परिषदेचे अ.पां. देशपांडे म्हणाले, की 'हे पुस्तक वाचताना मला महापोध्याय पां.वा. काणे यांच्या पुस्तकाची आठवण होते. आपल्या शिक्षणव्यवस्थेत इतिहास एकांगी पद्धतीने शिकवला जातो. इतिहास म्हणजे केवळ लढाया नव्हेत. तर त्या त्या काळाचा इतिहास सामाजिक अंगानेदेखील शिकवला गेला पाहिजे.' हे पुस्तक इतक्या अभ्यासपूर्ण पद्धतीने लिहिले गेले आहे की ते संदर्भग्रंथ म्हणून उपयुक्त ठरेल असे नंदकुमार महाजन म्हणाले. तर बुक्कावार यांनी अत्यंत विचार करून लिहिलेले हे पुस्तक विचार करायला लावणारे आहे, असे दिलीप लोथे म्हणाले. बुक्कावार यांनी अतिशय निर्भीडपणे पुस्तक लिहिले असून इतिहास जसा आहे तसा सांगितला आहे, असे मुकुंद जोशी म्हणाले. डॉ. आनंद मुकेवार, सीए प्रवीण शिंदे, राजू कदम इत्यादी विविध क्षेत्रांतील मान्यवर चर्चेत सहभागी झाली होते. प्रस्तुत पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे प्रास्ताविक ग्रंथाली विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी केले. अश्विनी भोईर यांनी ग्रंथालीच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. •

# ग्रंथपरिचय




**डॉ. निर्मोही फडके**

९९२०१ ४६७११


**प्रवाह**

**डॉ. रवींद्र शोभणे**




नुकत्याच वाचनात आलेल्या एका अहवालानुसार, आजही विवाह जुळवणाऱ्या संस्थांकडे मुलांकडून भावी पत्नीच्या बाबतीत असणाऱ्या निकषांवर सौंदर्य हा निकष पहिल्या क्रमांकावर आहे. (जात हा निकष अर्थातच सगळ्याला व्यापून असलेला.) त्यामुळे 'स्त्री ही जन्मत नाही, तर घडवली जाते.' ह्या सीमोन द बोव्हुआरच्या 'द सेकंड सेक्स' पुस्तकाच्या प्रारंभीच असलेली उक्ती दुर्दैवानं आजही अर्थपूर्ण ठरते. एकविसाव्या शतकातल्या आधुनिक मानवतावादी विचारसरणीच्या पिढीला कदाचित ती पटणारी नाही. तरी आजही वर्तमानपत्रांत येणाऱ्या किंवा सोशल मीडियावर झळकणाऱ्या स्त्रियांबाबतच्या बातम्या, घटना, किस्से, चित्रपट इत्यादी वाचलं, पाहिलं, की लक्षात येतं, वर्षं फक्त आकड्यांनी पुढे सरकली आहेत. स्त्रीबाबतची मानसिकता विसाव्या शतकाच्या तुलनेत फारशी बदललेली नाही.

'प्रवाह' ह्या डॉ. रवींद्र शोभणे लिखित कादंबरीतल्या नायिकेचं घडणं, तिला परिस्थितीनं घडवणं हा प्रवास विसाव्या शतकातल्या शेवटच्या दशकांतला असला, तरीही तो आजच्या एखाद्या स्त्रीच्या बाबतीत कदाचित थोड्याफार वेगळ्या तपशिलांसह तसा घडत असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तारा ही 'प्रवाह'ची नायिका कादंबरीच्या केंद्रस्थानी असली, तरी एकूणच तिच्या आयुष्यात घडणाऱ्या घटना आणि त्याकरता कारणीभूत ठरणारे घटक हे ह्या कथानकात महत्त्वाची भूमिका बजावतात. ताराची कहाणी ही एक प्रकारे वेगवेगळ्या स्तरांवरचे संघर्ष करत आपलं अस्तित्व टिकवू पाहणाऱ्या कोणत्याही स्त्रीची कहाणी आहे.

कादंबरीच्या कथानकाच्या प्रवाहात – किंवा 'प्रवाह'च्या कथानकात – अनेक वळणं अशी येतात, जिथे वाचक थबकतो. ताराच्या आयुष्यात होणारे चढ–उतार हे परिस्थितीनुरूप होताना दिसतात, मात्र काही ठिकाणी ताराचं वागणं हे सर्वसामान्य वाचकाला अनाकलनीय किंवा न पटणारंही वाटतं. एखादा नायक किंवा नायिका चारित्र्यहीन होण्याच्या मार्गावर नाइलाजानं जाते, पण ती पुन्हा पुन्हा त्याच मार्गाचा अवलंब करू लागली, तर तिचा सर्वनाश ठरलेला असतो, ही एक धारणा. बऱ्याच वेळा परिस्थितीशरण झालेले कथानकाचे नायक–नायिका हे त्या परिस्थितीच्या रेट्याला तोंड देत, पुन्हा समाजमान्य असलेल्या चांगुलपणाच्या मार्गावर येतात. सुधारतात. 'प्रवाह'मधली नायिका ही वेगळी आहे. ती स्वतःच्या भावना, वासना दडपून टाकत नाही. समाजमान्य नसलेल्या प्रवाहात स्वतःला झोकून देते. 'प्रवाहाला जगणं लागत असेल तर त्याची दिशाही आपण नाही ठरवू शकत ना?' हा तिचा सवाल आहे. तिचं असं वागणं सामाजिक नैतिकतेच्या चौकटीत न बसणारं आहे, म्हणूनच ते करकरीत वास्तव आहे.

पहिलं खरं प्रेम उद्ध्वस्त झालेली, आईवडिलांकडूनच शारीरिक पिळवणूक सहन करणारी, मनाविरुद्ध लग्नाकरता उभं करण्यात आलेली नवथर तरुणी अशी तारा. कोवळ्या वयात इतके मानसिक धक्के पचवूनही ती 'पदरी पडलं, पवित्र झालं', अशा प्रकारच्या जोडीदाराबरोबर हौसेनं संसार थाटते. थोडक्या कमाईत का होईना दोघांचं घरटं सजवायचा प्रयत्न करते. मात्र जोडीदाराकडून असं उत्साही जगण्याकरता लागणारा हातभार तोकडाच पडतो, नव्हे मिळतच नाही. मग अशा परिस्थितीत अंगभूत सौंदर्य आणि कुणालाही वश करण्याची नैसर्गिक किमया लाभलेली व्यक्ती आयुष्याच्या प्रवाहात स्वतःला झोकून जे करेल, जसं वागेल, तसंच ताराची व्यक्तिरेखा करू लागते. तिच्या भोवताली असलेल्या अनेक स्त्री–पुरुष व्यक्तिरेखांच्या अस्तित्वानं तिच्या अशा गुणांना अधिक उजाळा मिळू लागतो. लग्नापूर्वीच्या साध्या आयुष्यात तिचं आई–वडिलांच्या हातातलं बाहुलं होऊन राहणं, आणि नवऱ्याकडे आल्यावर त्याचं पुरुषी सत्तेचा प्रतिनिधी असल्यासारखं 'ठरावीक' वागणं हे, 'स्त्री ही घडवली जाते,' ह्या उक्तीला पुष्टी देणारं ठरतं. म्हणूनच एक प्रकारे अधोगतीकडे होणारा तिचा प्रवास हा खरा वाटतो. पुरुषसत्ताक समाजात घडवली गेलेली ही स्त्री, अनेक पुरुषांच्या वासनांची कधी बळी ठरते, तर कधी ती हे वास्तव स्वीकारते. एक स्त्री आणि एक माणूस म्हणूनही ती तिच्या भोगवृत्तींना मोकळं करते. मग कधी त्यामागे स्वार्थ असतो, तर कधी मातृत्वाचं कर्तव्य.

'अशीच तंबी आपल्या आईनेही दिली होती त्या वेळी. ...नशिबाच्या लाथा खात आयुष्याच्या या वळणावर येऊन पोहोचलो. पण आपल्या मुलीच्या आयुष्याचा असा बाजार नाही होऊ द्यायचा. आईपणाच्या आणि बाईपणाच्या झगड्यात ती जणू पिचून गेली होती.'

संपूर्ण कथानकात भूक आणि कामवासना ह्या आदिम मानवी वृत्तीप्रवृत्तींची माणसावर असलेली घट्ट पकड लक्षात येते. ह्या दोन गोष्टींशिवायही आयुष्यात खूप काही आहे, हा विचारच न पोहोचलेल्या सर्व स्तरांवरच्या माणसांची ही आजची गोष्ट. विदर्भातली बोली, निसर्ग, वातावरण आणि समाजजीवनाच्या पार्श्वभूमीवर घडणाऱ्या ह्या गोष्टीचा प्रवाह वाचकाला आकर्षित आणि अंतर्लक्षी करणारा आहे.

**प्रवाह**

लेखक – डॉ. रवींद्र शोभणे

दिलीपराज प्रकाशन


मूल्य – २९० रुपये

## ग्रंथपान



**चांगदेव काळे**
**९८६९२०७४०३**

**मराठी राज्यातले मराठीचे वर्तमान**
**डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी**
**डॉ. अजय देशपांडे**




### मराठी भाषाविषय आकलन समृद्ध करणारा ग्रंथ

'कोणतीही भाषा ही केवळ अभिजात असल्याने टिकत नसते तर आधुनिक, समकालीन जीवनव्यवहारात तिचा वापर व्यापक प्रमाणावर, सर्वांगीण झाला तरच तिला भाषेचे जतन म्हणतात. नवनवीन शब्दांची भर तिच्यात पडण्याच्या संधी निर्माण केल्या गेल्या तरच तिची समृद्धी वाढते. अन्यथा तिचा आपोआप क्षय होतो.'

'मराठी राज्यातले मराठीचे वर्तमान' हा बृहद् ग्रंथ माझ्यासमोर आहे. आकर्षक, सुबक अशी डबल क्राऊन साईज हार्ड बाऊंड असा निर्मिती असलेला ग्रंथ. त्याचे शीर्षक आणि मुखपृष्ठ पाहताक्षणीच आपले लक्ष वेधून घेणारा ग्रंथ. तो वाचायला घेताना मनावर दडपण येणे स्वाभाविक होते, तशी उत्सुकताही होतीच. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा, या म ागणीसाठी प्रा. रंगनाथ पठारे समितीने केलेले अविरत परिश्रम आणि प्रयत्न प्रत्येक टप्प्यावर सातत्याने कानांवर, वाचनात आहेत. मराठी भाषाधोरण यासाठी मुंबईच्या आझाद मैदानावर झालेले आंदोलन, त्यात सहभागी झालेले अनेक मान्यवर साहित्यिक, हे तर समक्ष पाहण्याची, अनुभवण्याची संधी मिळाली होती. मात्र प्रश्नही पडला, आपण मराठी राज्यात आहोत, मराठी ही आपली बोलीभाषा आहे. आपले सगळे व्यवहार याच भाषेतून होत आहेत, आपले शासनही मराठी भाषकांचेच आहे. तरीही मराठी भाषेच्या सर्वागीण अस्तित्वाचा विषय घेऊन ही सगळी मंडळी याच राज्याच्या शासनाकडे पाठपुरावा करण्यासाठी का आटापिटा करत आहेत? आपण मराठी आहोत आणि सगळे चालले ते सुरळीत सुरू आहे, जे करायचे ते शासनाने करायचे, आपली जबाबदारी काही नाही, ही मनात ठासलेली भावना. परंतु हा ग्रंथ आरशासारखा समोर धरला, तेव्हा लक्षात येते, ही सगळी मंडळी जीव तोडून मराठी भाषेसाठी का प्रयत्न करत आहेत! खूप मोठा असा हा दस्तऐवज आहे, जो मराठीच्या सर्वांगीण बाजूंनी केलेला समतोल विचार आपल्यासमोर ठेवतो.

मराठी राज्याची स्थापना झाली ती एक मे १९६० रोजी. त्या घटनेला साठ वर्षे झाली, ज्याला आपण हीरकमहोत्सवी वर्ष म्हणतो. या काळात मराठी भाषेचे वर्तमान काय सांगते, याचा आरसा म्हणजे हा ग्रंथ आहे. मराठी माणसाचे राज्य असण्यापेक्षा मराठी भाषकांचे हे राज्य आहे, हे ब्रीद अगोदर लक्षात घेण्यासारखे आहे. ही भाषा बारा/चौदा कोटी भाषकांची भाषा आहे, देशातील तिसरी आणि जगातील दहावी भाषा आहे, हा अभिमान नक्कीच मोठा आहे. तरीही सगळेच आलबेल नाही, ही वस्तुस्थिती आहे, त्याचे विवेचन हा ग्रंथ करतो. गेल्या साठ वर्षांत या राज्याला मराठी भाषेचे धोरण ठरवण्यात आलेले अपयश आणि त्यामागील उदासीनता स्पष्ट करण्यासाठी १९६४, १९९४, २०१०आणि २०१७ ही सनावळी पुरेशी आहे. 'राज्याचे भाषिक धोरण' हा अनिल गोरे यांचा लेख त्यासाठी संदर्भ आहे. याला जोडून हरी नरके यांचा 'मराठीची अभिजातता आणि आधुनिकता दोन्हीही उपेक्षितच' हा लेख आहे.

ज्ञानभाषा इंग्रजी की मराठी, व्यवहार आणि उपजीविकेची भाषा इंग्रजी की मराठी, या आकलनात मराठी माणूस कमी पडतो आहे की, जाणूनबुजून मराठी भाषेच्या ओढीने फरफटत जात आहे, याचा परिणाम आजच्या शिक्षणव्यवस्थेवर झालेला आहे. दक्षिण भारत भाषेविषयी तडजोड स्वीकारीत नाही. त्यांच्या चारही राज्यांतील भाषांना 'अभिजात भाषेचा दर्जा' मिळालेला आहे आणि त्यांनी हिंदी व इंग्रजीचे आक्रमण रोखून धरलेले आहे, हे पाहता महाराष्ट्राची अवस्था काय आहे, हे वास्तव दाखणारा हा ग्रंथ आहे. शासनाची भूमिका आणि प्रयत्न यांचाही यात उल्लेख आहे.

या ग्रंथात एकूण छत्तीस लेख आहेत. शिक्षण, वृत्तपत्र, प्रसिद्धी माध्यम, यातील मराठी भाषा, अनुवाद, बोली, संस्कृती, प्रशासकीय व न्यायालयातील, विदेशातील मराठी भाषा, अभिजातता, ग्रंथव्यवहार, ग्रंथालये, संमेलने, मराठीची अवहेलना, निरीक्षणे, असा सर्व बाजूंनी मांडलेला विचार आपल्याला या ग्रंथात एकत्रित स्वरूपात वाचायला, अभ्यासायला, आणि विचार करायला लावणारा ऐवज आहे. हे लेख लिहिणारे सर्वच लेखक आणि त्यांची एकत्रितपणे मोट बांधणारे संपादक द्वय हे त्यांच्या विषयातील, क्षेत्रातील ज्येष्ठ विचारवंत, तज्ज्ञ अधिकारी आहेत. (त्यांचा प्रत्येकाचा वैयक्तिक परिचय ग्रंथाच्या शेवटी दिलेला आहे.) आपली मते व्यक्त करताना त्यांनी दिलेले संदर्भ, त्यांची निरीक्षणे आणि केलेली विषयांची मांडणी यात सुलभ, आकलनक्षम, सुसूत्र आहे.

खरे तर असा बृहद्ग्रंथ संपादित करणे हे शिवधनुष्य उचलण्यासारखे आहे. ते लीलया पेललेले आहे, याची खात्री ग्रंथ वाचल्यानंतर येते. हा ग्रंथ साकारताना संपादकांची भूमिका व उद्देश काय होता, त्यामागची कारणे काय आहेत आणि ग्रंथालीने त्यांना कशी साथ दिली, याची चर्चा संपादकांनी त्यांच्या विस्तृत प्रस्तावनेत केलेली आहे. मराठी भाषेची ओढ, आवड आणि आस्था असणाऱ्या प्रत्येक मराठी माणसासाठी, अभ्यासकासाठी साठ वर्षांचा कालखंड समजून घेण्यासाठी हा एक मोठा संदर्भ आहे.


या ग्रंथाला महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाचे सहकार्य लाभलेले आहे. सतीश भावसार यांचे मुखपृष्ठ आवर्जून लक्षात घ्यावे इतके आशयाला कवेत घेणारे आहे.

**मूल्य ७५० रुपये सवलतीत ५०० रुपये**

# ग्रंथपान

## सफरनामा निवडक कलाकारांचा

**पल्लवी पंडित**




**सौंदर्यानुभव देणारा कलाप्रवास**

''माझे आई-वडील मला नेहमी विचारतात, सभोवताली इतक्या सुंदर गोष्टी असताना तू का या कुरूप आणि दरिद्री लोकांची रेखाटनं करतेस? तुझी बहीण सुंदर कलाकृती साकारते, मग तू का नाही? खरं सांगायचं तर मला त्या कष्टकरी वर्गाच्या समस्यांविषयी काहीही कल्पना नाही, माझ्या कलेद्वारे मला त्यांच्या समस्यांना वाचाही फोडायची नाहीये. तरी मी त्यांची रेखाटनं करते कारण मला ते सुंदर भासतात.''

कलावंत हा केवळ कलेशी बांधील असतात असे नाही. आपल्याभोवतीचा समाज, देश, युद्ध, दारिद्र्य, तळागाळात असलेला वर्ग या सगळ्याविषयी जाणिवा जागृत राहून त्यांच्या प्रश्नांना आपल्या कलेच्या माध्यमातून जगासमोर मांडण्याची जबाबदारी ते पार पाडत असतात, हे कॅथे कोलविट्झच्या चरित्राकडे पाहिले की प्रकर्षाने जाणवते. आपल्या चित्रकला आणि मुद्रणकला यांच्यात कुठेही तडजोड न करता त्यांनी साकारलेली 'द विव्हर्स', 'पिझन्ट वॉर', 'द वॉर', 'डेथ' या मुद्रणमालिका अनेक शिल्पांपैकी साकारलेले 'मॉर्निंग पेरेन्ट्स' हे शिल्प आणि सीड्स फॉर सोइंग शुड नॉट बी ग्राऊंड, टू सोल्जर्स वाइव्हज् वेटिंग या कलाकृती त्यांच्या जाणिवा आणि बांधिलकीची साक्ष देणाऱ्या आहेत. दोन महायुद्धे, त्यात मुलगा आणि पणतू यांचे वीरमरण, नाझींचा छळवाद हे सारे अनुभवलेल्या कॅथे यांचा कलाजीवन प्रवास खडतर असूनही ते त्या काळावर स्वत:च्या कलात्मक कर्तृत्वाचा ठसा उमटवलेले कलावंत आहेत. (कालखंड इ.स. १८६७-१९४५)

भारतीय चित्रकलेच्या क्षेत्रात व्यावसायिक चित्रकार म्हणून अनेकांची नावे समोर येतात. त्यापैकी एक नाव आहे अमृता शेरगील. पॅरिस येथे कलाशिक्षण घेतलेल्या, युरोपीय अॅकॅडेमिक कलेचे हंगेरीयन चित्रकारांचे संस्कार झालेल्या अमृता आपल्या कलेविषयी स्वतंत्र दृष्टिकोन बाळगणाऱ्या होत्या. त्यामुळेच त्यांना आधुनिक भारतीय कलेच्या इतिहासात स्वत:चे वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण करता आले.

'प्रोफेशनल मॉडेल'चा प्रयोग अधिक लक्षवेधी ठरला. 'सेल्फ पोर्ट्रेट', 'टॉर्सो' या कलाकृतींनी कलासमीक्षकाचे लक्ष वेधून घेतले. अमृताची ग्रँड सॅलॉन येथे असोसिएट म्हणून निवड झाली तेव्हा ती सगळ्यात कमी वयाची व पहिली आशियायी व्यक्ती ठरली. अमृतानी विदेशाप्रमाणे भारतीय चित्रपरंपरेचा अभ्यास केला. त्यासाठी भरपूर प्रवास केला. त्यातून स्वत:ची शैली निर्माण केली. परखड मते असणाऱ्या अमृतांना विरोध, टीकाही सहन करावी लागली तरी स्वत:चे स्थान निर्माण करणाऱ्या त्या आधुनिक कलाजगतातील चित्रकर्ती आहेत हे कुणीही नाकारू शकत नाही. (कालखंड १९१३-१९४१)

व्यावसायिक चित्रकार म्हणून प्रतिष्ठा प्राप्त केलेले कलावंत म्हणजे जामिनी राय. युरोपीय कलाशैली, कालीघाटशैली नंतर १९२०च्या दशकाच्या मध्यात बंगालमधील लोककलेतील चित्रणपद्धती - 'पट' या शैलीला आत्मसात केलेले जामिनी राय यांचे चित्रण मिथके, पुराणकथा, मूलभूत रूपबंध यांच्या अभ्यासातून साकारले तरी चित्रात सपाट लेपन करणे किंवा लोककलेचे पुनरुज्जीवन करणे यापेक्षा त्यांचे ध्येय होते ते क्षतिग्रस्त ग्रामीण परंपरेतील तत्त्वाच्या साहाय्याने नवीन आधुनिक कला निर्माण करणे, रेषेतील सफाई (काजळीच्या काळ्या रंगाची) कारागीर वापरात त्या रंगांची सामान्य चमक, निर्मितीची सुदृढ भावना या वैशिष्ट्यांसह सपाट आणि ग्रामीण शैलीतही जीवन व गती यांचा सुरेख मेळ त्यांनी साधलेला दिसतो. भारत सरकारने पद्मभूषण देऊन गौरवलेले जामिनी राय यांचा १९७६ मध्ये भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, सांस्कृतिक मंत्रालयाने 'श्रेष्ठतम नऊ' कलाकारांमध्ये समावेश केला. असे नऊ कलाकार, ज्यांनी आपल्या अभिजात आणि सौंदर्यपूर्ण कलेने भारतीय कला आणि संस्कृतीला अमूल्य ठेवा प्रदान केला आहे. (१८८७-१९७२)

अशा आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या कलाकारांचा जीवनप्रवास, कलाप्रवास असलेल्या या 'सफरनामा' ग्रंथाच्या लेखिका आहेत पल्लवी पंडित. रवींद्रनाथ टागोर आणि फ्रिडा काहलो यांचाही यात समावेश आहे. निवडक असले तरी सर्वमान्यता, लौकिक असलेले हे कलावंत आहेत. प्रतिभेचे वरदान, कलेशी एकनिष्ठ असलेली साधना, याचे प्रतीक असलेले हे कलावंत आहेत. त्यांच्या कलाप्रवासासोबतच कलेची वैशिष्ट्ये, त्यावेळची सामाजिक-आर्थिक परिस्थिती, कलावंत म्हणून जगताना त्यांची बांधिलकी, मिळालेले यशापयश, चित्रकलेतील परिमाणे आणि परिणाम, रंगसंगती, त्यामागचा दृष्टिकोन, इतर कलावंतांशी केलेली तुलना, समीक्षकांनी घेतलेल्या नोंदी, इसवी सनाच्या नोंदी, संदर्भ असा मोठा पट या प्रत्येक कलाकाराचा लेखिकेने अभ्यासपूर्ण मांडलेला आहे. लेखिका चित्रकलाकार आहेत. बीएफए, एमएफए (पेंटिंग सुवर्णपदक) नेट 'दृश्यकला' अशा उच्चविद्याभूषित आहेत. सी. शिवराममूर्ती यांच्या 'इंडियन पेंटिंग' या पुस्तकाचा त्यांनी मराठीत अनुवाद केलेला आहे. इतर कलावंताच्या कलेचा आस्वाद घेताना जो अभ्यास करावा लागतो तो त्यांनी परिश्रमपूर्वक केलेला आहे. त्याचवेळी त्यांचे भाषेवरदेखील प्रभुत्व आहे. 'ज्याप्रमाणे एक थकलेला प्रौढ बालकाच्या निरागस साधेपणाकडे आकर्षित होतो, त्याप्रमाणे जामिनीचे लक्ष्य जगाच्या क्लिष्टतेकडून साधेपणाकडे प्रयाण करण्याचे होते', 'एकूणच कलानिर्मिती पाहिल्यास त्यांचा कल सौंदर्याप्रती नसून वैचित्र्याकडे होता हे लक्षात येते.' यांसारखी वाक्ये त्यांच्या भाषासौंदर्याची प्रचीती देतात.

या ग्रंथासाठी प्रा. विकास जोशी, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर यांची रसिक प्रस्तावना लाभलेली आहे. चंद्रकांत चन्ने यांनी प्रतिक्रिया व्यक्त केलेल्या आहेत तर प्रमोदकुमार अणेराव यांनी कलासौंदयात्मक पाठराखण केलेली आहे.


मुखपृष्ठ व मांडणी हेमंत जोशी यांची आहे तर सुंदर निर्मिती (रंगीत फोटोसह) ग्रंथालीची आहे.

**मूल्य ५०० रुपये   सवलतीत ३०० रुपये**

# ग्रंथपान

**दिवेलागणीच्या वेळी**

**जगदीश आचरेकर**




### नवथर वेलीवरील फुले गोजिरी

'कोकणाची दौड, गावची ओढ  
गावच्या चतकोर तुकड्यात नसता  
श्वासात भिनलेल्या मनात मोहरलेल्या,  
गावच्या लालसर मातीत असता'

कविता चांगली की वाईट, कविता आवडली की नाही आवडली; कविता पद्यमय आहे की गद्यमय, कविता लहान की अनिर्बंधपणे अवतरली; कविता ठरवून लिहिली की उत्स्फूर्तपणे लिहिली... एक ना दोन, अनेक प्रश्नांचे चांदणे अंगावर मिरवणारा साहित्यप्रकार म्हणजे कविता. कुठल्या बोटाला धरून कवितेने प्रवासाला सुरुवात केली याचे उत्तर देणे त्या कवितेलाच सुचणार नाही, कवी तर दूरच! तरीही कवितेचा प्रवास सुखनैव सुरू आहे आणि तो तिच्या आवाक्यानुसार, क्षमतेनुसार आपली सुकुमार पावलांची नक्षी अलगदपणे काळाच्या पटलावर उमटवून पुढे जात आहे. तिची पावले लहान की नाजूक, तिची सावली दाट की सडपातळ ह्याची मोजमापे घेण्याची गरज नाही. गरज आहे ती तिच्या आशयगर्भ सौंदर्याकडे आपलेपणा ठेवून पाहण्याची.

सूर्य नसे कोणी इथे काजवे चमचमणारे  
सूर्य पुन्हा उगवेल पूर्वेस, जिवंत आहे आशा

कवी असा काळजातून बोलतो तेव्हा त्याच्या काळजाचे मोजमाप करायचे नसते, ना त्याच्या शब्दांचे. करायचेच झाले तर भावना, स्पंदन, कल्पना आणि त्याची उत्कटता याचे करावे, जे आपल्या काळजाशी नाते सांगणारे आहे.

'दिवे लागणीच्या वेळी' हा जगदीश आचरेकर यांचा पहिलाच कवितासंग्रह आहे. दिवेलागणीची वेळ ही सायंकाळची असते, जेव्हा सूर्य दिवसभराची आन्हिके उरकून संध्येच्या दिशेने सरकतो, जेव्हा गुरेढोरे रानावनातून आपल्या खळ्याकडे, वासरांच्या ओढीने परतू लागतात, पक्षी झाडांच्या आश्रयाला जाऊ लागतात, तशी सर्व कष्टकरी विसाव्यासाठी आपल्या खोपटाकडे वळतात, ती आकर्षित करणारी वेळ असते दिवेलागणीची. आणि शेवटचा अर्थ घ्यायचा तर आयुष्याचे संपूर्ण जगणे सुफल झाले आहे. उरले आहे ते निवांतपणाचे क्षण. त्यांचा आनंद घेत गतस्मृतींना उजाळा देत राहायचे, चांदणे फुललेल्या आकाशाकडे पाहात, तीही दिवेलागणीचीच वेळ असते. अशा या निवांत वेळीचा स्मृतिगंध काव्यरूपाने फुललेला, जसे चांदण्यांनी आकाश फुललेले असावे, असा काव्यसंग्रह म्हणजे 'दिवेलागणीच्या वेळी'. 'साठीच्या या वळणावरती', 'सत्तरीच्या या समृद्ध घरात' यांसारख्या कविता या दिवेलागणीशी आपली जवळीक दाखवतात. याला योगायोग नक्कीच म्हणता येणार नाही, याच शीर्षकाची कविता पृ. क्र. ७२ वर आहे.

'दिवेलागणीच्या वेळी' या कवितासंग्रहात एकूण बहात्तर कवितांचा समावेश आहे. खूप वेगवेगळे विषय कवीने आपलेसे केले आहेत. यात कोकणच्या लाल मातीचा आणि तेथील सर्व नात्यांचा हिशेब लावताना कवी व्यावहारिकतेपेक्षा माती आणि माणूस यांच्या नात्याविषयी आंतरिक ओलाव्याने चिंब झालेले दिसून येतात. (भेट, त्यो) तीच गोष्ट त्यांच्या भक्ती आणि आपल्या नात्याची. विठ्ठल-रुखमाई-पंढरीची ओढ प्रत्येकालाच असते, परंतु त्याचवेळी वडील-आई, आपले घर त्यापेक्षा वेगळे नसते, सांसारिक अडचणी, प्रापंचिक चढउतारात साथ देणारे देव असतात. तसेच मातापिताही असतात. हे दृष्टांतरूप कवीच्या आंतरीचे नाते स्पष्ट करण्यास पुरेसे आहे. (बापविठू, सोबत आई...!, माझ्या माहेरची वारी)

चालता लागताच धाप। मारी पाठीवरी तो थाप  
विठ्ठल माझा मायबाप चाले बरोबरी

सदर कवितासंग्रहाचा कालावधी सन २०१८पासून सुरू झाला आहे असे कवी त्यांच्या मनोगतात नमूद करतात. तसेच त्यांचा परिचय पाहता, ते २०१७ सालात निवृत्त झालेले आहेत. त्यामुळे त्यांचा आताचा कालखंड हा नातवंडांसोबत एन्जॉय करण्याचा आहे. त्यामुळेच त्यांच्या कवितेत हरवलेल्या पावसात हरवलेल्या आजीचा शोध घेताना त्यांची नात दिसते. (पाऊस हरवण्याआधी) दुडुदुडु पावलांनी उठवण्या तो आला नातीत आज माझ्या बाळकृष्ण पाहिला. (अष्टमी), एक छोटीशी चिऊताई रोज नातीशी गप्पागोष्टी करी (खिडकीवरील चिमण्या).

कवी आपल्याभोवती असलेली माणसे, समाज, निसर्ग यांची वर्णने उत्कटपणे करतात तसे सध्याचे राजकारण जे थेट गल्लीपर्यंत पोहोचले आहे त्याविषयी देखील आपल्या भावना व्यक्त करताना दिसतात. कवी हा नेहमीच इतर साहित्यिकापेक्षा अधिक भावनाप्रधान संवेदनशील असतो, त्याला वयाची कुठलीही परिमाणे आडवी येत नाही, याचा प्रत्यय हा कवितासंग्रह देतो. 'ऋतुनारीचे मज रूप द्यावे', 'स्त्रीसत्त्वाचे कंकण द्यावे, मातृत्वाचे अंगण द्यावे', 'बुडविले प्रीतीत स्वत:स सुख तरंगले अंतरी', 'आठवणींची शाल पांघरता, आठविले दिन उबदारी', 'तालावरी प्रेमसरींच्या चांद सारा तो बसला', 'शेला फाटलाय नभाचा' अशा सुंदर ओळी कवितेतून वाचताना आपले मन मोहरून उठते आणि कवीच्या तरल भावनांना उत्स्फूर्त दाद दिली जाते.

कवीचा हा पहिलाच कवितासंग्रह असूनही त्यात नवखेपण कुठे दिसून येत नाही. त्यात लय आहे, नाद आहे, रूपक आणि यमक यांचा व्याकरणीय संबंध अबाधित ठेवलेला आहे. यात शब्दाशी झटापट नाही की ओढूनताणून शब्द जुळवण्याचा अट्टहास नाही. सगळ्या कविता या उत्स्फूर्त, आत्मीय प्रेरणेतून व्यक्त झालेल्या आहेत. त्यामुळे हा संग्रह वाचनीय झाला आणि कवीने असेच सतत लिहीत राहावे हा विश्वास त्यांच्या भावनेने दिला आहे.

कवी ३७ वर्षे बँकिंग क्षेत्रात होते, त्यानंतर मुंबई क्रिकेट असोसिएशनचे खजिनदार म्हणून त्यांनी काम पाहिले आहे.

या संग्रहाचे सुंदर मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी सजवलेले आहे.

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**




# ग्रंथपान

**कालयंत्र**
**शशिकांत काळे**




**उत्तम कथासंग्रह**

''भारताने अणुस्फोटाची चाचणी केली पण ती नियंत्रित करण्याची क्षमता व संयम भारताकडे होता म्हणूनच केली. महाभारतातील भीमावर नियंत्रण ठेवायला धर्मराज होते. कुंतीला ते जमणे शक्यच नव्हते. मी निर्माण केलेल्या भीमसेनाला काबूत ठेवणारी कोणतीच शक्ती माझ्या दृष्टिपथात नव्हती. धर्मराजाशिवाय हा भीमसेन म्हणजे अनियंत्रितपणे केला गेलेला अणुस्फोट न ठरो.''

'कालयंत्र' हा शशिकांत काळे यांचा कथासंग्रह नुकताच ग्रंथालीने प्रकाशित केलेला आहे. कथासंग्रह म्हटले की त्याची वर्गवारी व्हावी असा संकेत नाही, परंतु तिचे वेगळेपण ती सिद्ध करत असेल तर मात्र अशा वर्गवारीला पर्याय नसतो. ग्रामीणकथा, नागरकथा, विनोदीकथा, रहस्यमय-गूढकथा याप्रमाणे विज्ञानकथा अशीही वर्गवारी साधारणपणे आपण ठरवतो. प्रत्येक कथेचा बाज, आशय, त्यातील सूचकता वेगळी असते. यात भाषा, प्रादेशिकता, शैली, तंत्र यांचा समावेश होतो. या वेगळेपणात विज्ञानकथा ही वेगळी ठरते. त्याचे कारण ती फॅण्टसी, उपरोध, अनुमान, कल्पकता याच्या पायांवर उभी असते तरी ती एका सूत्राच्या-अनुमानाच्या निकषावर आपले सामर्थ्य सिद्ध करते. ती आजच्या वर्तमानाचे सूत्र धरून ठेवते तरीही ती भविष्याचा वेध घेत असते. तिचे जग विस्मयकारी वाटत असले तरी त्यातली कल्पना आज ना उद्या सत्यात उतरलेली दिसते, तशी संभाव्य शक्यता तिच्यात अंतूर्भत असते. भूतकाळ, आपली पुराणे, ग्रंथ यात असे अनेक कल्पनेला छेद देणारे, सिद्धांत आपण वाचलेले आहेत, ते आज सिद्ध झालेले आहेत हे पाहात आहोत, अनुभवत आहोत. 'टेस्ट ट्यूब बेबी' हे आमचे वाटणारे सत्य, महालात बसून युद्धभूमीवरील पांडव-कौरवांचे युद्धवर्णन सांगणारा संजय आणि आताची थेट प्रक्षेपणे; हे साम्य आपल्याला पडताळणी करून पाहताना येते. त्यामुळे अशा विज्ञानकथा या भाकीत करणाऱ्या कथा आहेत. कल्पनेचा कस पाहणाऱ्या कथा आहेत. त्यामुळेच त्यांचे वेगळेपण आपल्याला मान्य करावे लागते.

मराठीत विज्ञानकथा लिहिणारे लेखक संख्येने आणि तुलनेने कमी आहेत. जयंत नारळीकर, लक्ष्मण लोंढे, सुबोध जावडेकर, द.पां. खांबेटे अशी नावे आपणास ठाऊक आहेत आणि त्यांच्या उत्तम साहित्यनिर्मितीमुळे ते सर्वच आपले आवडते विज्ञानकथालेखक आहेत. यात शशिकांत काळे यांच्या नावाचा समावेश आवर्जून करायला हवा. 'कालयंत्र' हा त्यांचा कथासंग्रह त्यासाठी नक्कीच प्रमाण ठरावा, असा आहे.

या कथासंग्रहात एकूण सोळा कथा आहेत. या सर्वच कथा विज्ञानातील विविध सूत्र, शोध यांच्यावर आधारित आहेत. यात प्रामुख्याने हाताळलेला विषय आहे तो टेस्ट ट्यूब बेबी आणि क्लोन. शरीरशास्त्र आणि जीवशास्त्र यात विज्ञानाने केलेली प्रगती आज 'अशक्य' या शब्दाला छेद देत आहे. अनेक अशक्य वाटणारे विषय सुलभतेने सुटलेले दिसत आहेत. तरीदेखील अशा विषयांना अनेक पैलू आहेत, त्यात अनेक संभाव्य धोक्यांचा इशारा समोर उभा आहे. त्यामुळे त्याकडे लक्ष वेधणे तितकेच महत्त्वाचे ठरते. तो प्रयत्न यशस्वीपणे केलेला आहे, त्याचा अनुभव या कथा देतात. त्यासाठी डॉ. शहा यांच्या संदर्भाचे उदाहरण समोर ठेवलेले आहे.

संगणकाने केलेली क्रांती आणि तिचे परिमाणआपण सारेच पाहतो आहोत. यंत्रमानव हा त्यातलाच एक भाग, तोही आपल्या परिचयाचा झाला आहे. 'जोडीदार' या कथेत असा हा जोडीदार राजाराणीच्या सेवेला आलेला आहे. परंतु दोन कथा आहेत ज्या आरपीजीच्या सूत्रावर आधारलेल्या आहेत. त्यापैकी एक आहे, 'ठेविले अनंते तैसेचि रहावे' व दुसरी आहे, 'कालयंत्र'.

या दोनही कथा शोध, उत्कंठा, विस्मय, विनोद आणि फॅण्टसीचा मनसोक्त आनंद देतात. आपण आज आहोत तो काळ आपल्या हातात आहे. परंतु नव्या शोधामुळे आपण भूतकाळात मागे जाऊ शकतो तसे भविष्यकाळात आपण कसे असणार आहोत त्याचेही दृश्यरूप आपल्यासमोर या कथामुळे उलगडत जाते. यातील कालयंत्र ही कथा एक संपूर्ण कथा ठरते. तिच्यात एका कादंबरीचा आकृतिबंध दिसून येतो. ती वाचत असताना एखादा चित्रपट पाहत आहोत असेच वाटत राहते. लेखकालादेखील ते मान्य असावे म्हणून मुद्दाम कथेच्या खाली चित्रपटमालिकेसाठी टीप दिलेली आहे.

शशिकांत काळे यांची आतापर्यंत पाच पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. पैकी चार कथासंग्रह आहेत, ज्यात विज्ञानकथा, गूढकथा आणि मिश्रकथांचे संग्रह आहेत. एक लेखसंग्रह आणि कालयंत्र हे त्यांचे सहावे पुस्तक आहे. शशिकांत काळे यांच्या लेखनात सहजता आहे. विज्ञानासारखा विषय हाताळताना त्यावर आपले प्रभुत्व आहे, याची ते खात्री देतात. त्यांचे लेखनकौशल्य प्रथितयश साहित्यिकाच्या तोडीचे आहे. त्याला एक गती आहे जी थेट त्यांच्या नेमकेपणावर घेऊन जाते. प्रसंगात येणारी नाट्यमयता आपणास नक्कीच सुखावणारी आहे. विषय विज्ञानाशी संलग्न आहे तरी त्यातले ललित एखाद्या तलम वस्त्राप्रमाणे आपणाशी सलगी करणारे आहे. एक उत्तम कथासंग्रह जो प्रत्येकाने वाचायला हवा, असा 'कालयंत्र' संग्रह आहे.

कथासंग्रहाच्या शेवटी सुप्रसिद्ध विज्ञानकथाकार सुबोध जावडेकर यांचे पूर्वप्रसिद्ध परिशिष्ट जोडलेले आहे. विज्ञानकथा म्हणजे काय, तिच्याविषयीचे स्वअनुभव आणि केलेले चिंतन या परिशिष्टात आहे. विज्ञानकथा समजून घेणे आणि त्याप्रमाणे तिचा आनंद घेणे यासाठी हे परिशिष्ट प्रत्येकासाठी उपयुक्त आहे.

'कालयंत्र' या कथेतील शकुंतला मुखपृष्ठावर साकारताना कथेचा आशय आणि अभिव्यक्ती याचा सुंदर संगम अनुभवास येतो, ही कल्पकता सतीश भावसार यांची आहे.

**मूल्य ३०० रुपये सवलतीत १८० रुपये**

# पुस्तकप्रकाशन क्षणचित्रे






‘आरवली से अरावली’ पुस्तकाचे ब्यावर, राजस्थान येथे प्रकाशन






‘मुक्काम पोस्ट अटलांटा व्हाया दहिसर’ पुस्तकाचे प्रकाशन



‘आओ फिरसे दीप जलाएँ – भाग १ व २ पुस्तकांचे प्रकाशन



‘फुले फुलली श्रमाची’ पुस्तकाचे प्रकाशन

‘अवघा रंग... एक झाला’ पुस्तकाचे प्रकाशन



‘चिरंजीव भारत : धर्मेतिहासाचे वेगळे आकलन’ पुस्तकाचे प्रकाशन





‘संत बहेणाबाई शिऊरकर’ पुस्तकाचे प्रकाशन

महाराष्ट्र शासन



**श्री. नरेंद्र मोदी**
मा. प्रधानमंत्री



**श्री. एकनाथ शिंदे**
मा. मुख्यमंत्री



**एकूण गुंतवणूकीस चालना**
**रू. ९,४६,७२६ कोटी**

**सामंजस्य करार**
**रू. ४,१९,२१२ कोटी**

**थेट परकीय गुंतवणूक**
**रू. ४,०७,३२८ कोटी**

**नियमित गुंतवणूक**
**रू. १,२०,१८६ कोटी**

# उद्योगशील महाराष्ट्राची प्रगतिशील वाटचाल

## महाराष्ट्रामध्ये औद्योगिक विकासाला चालना देणारे प्रकल्प

- **महाराष्ट्र शासनाने जागतिक आर्थिक परिषद, दावोस २०२३** मध्ये **रु. १३७,६६६** कोटींच्या **१९ सामंजस्य** करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. त्यातून राज्यात एक लाखाहून अधिक रोजगार निर्मिती होणार आहे.
- रांजणगाव, पुणे येथे साकारत असलेल्या **रु. ४९२ कोटींच्या जागतिक दर्जाच्या इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टरचे काम जलद गतीने सुरू आहे.** या प्रकल्पासाठी केंद्र शासनामार्फत **महाराष्ट्राला रु. २०७ कोटींचे अर्थ सहाय्य** देण्यात येणार आहे.
- रायगड जिल्ह्यातील रातवड येथे चामड्यापासून पादत्राणे बनविण्यासाठी **रु. ३२३ कोटींचा मेगा लेदर फुटवेअर आणि ॲसेसरीज क्लस्टर पार्क** विकसीत होत आहे. यासाठी केंद्र शासनाकडून रु. १२५ कोटी मदत होईल.
- अमरावती येथे होत असलेल्या **पीएम मित्रा टेक्स्टाईल पार्कसाठी केंद्र शासन रू. २०० कोटींचे** सहाय्य देणार आहे. या माध्यमातून सुमारे ५००० रोजगार उपलब्ध होणार आहेत.
- बल्क ड्रग पार्कसाठी रायगड जिल्ह्यातील माणगाव आणि रोहा येथील १ हजार हेक्टर जमीन निवडण्यात आली आहे.
- निवेंडी, रत्नागिरी येथील **मँगो कॅश्यु पार्क** आणि **दापोलीतील हर्णे येथील मेगा ॲक्वा मरीन पार्कच्या** विकासासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.
- राज्यात **१७ मल्टी-मॉडल लॉजिस्टिक पार्क्सच्या** संकल्पनेसाठी विकास करण्यात येत आहे. या प्रकल्पांद्वारे **राज्यात सिस्टमॅटिक लॉजिस्टिक्स नेटवर्क** विकसित करण्यात येणार आहे. पुण्यातील पवळेवाडी येथे अंदाजे ३३७ एकर जमीन संपादनाच्या प्रक्रियेत आहे. **कारंजा येथे मल्टीमॉडल लॉजिस्टिक पार्क मास्टर प्लॅन** व फिजिबिलीटी रिपोर्टच्या निविदा काढण्यात आली आहे.
- राज्याच्या शिष्टमंडळाने तैवान मधील प्रमुख क्षेत्रातील कंपन्यांच्या भेटी घेतल्या. दरम्यान **तैवानी कंपनी गोगोरो यांना रु. १२,००० कोटी** किमतीच्या इलेक्ट्रिक वाहनांच्या निर्मितीच्या प्रकल्पासाठी ऑफर लेटर देण्यात आले.
- **लंडन टेक वीक २०२३, लंडन, युके :** महाराष्ट्राच्या प्रतिनिधी मंडळाने राज्याच्या नवीन माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरणाचे प्रोमोशन लंडनमध्ये केले आणि युकेस्थित गुंतवणूकदारांना राज्यात गुंतवणूकीसाठी प्रोत्साहन देवून आमंत्रीत केले.
- **साऊथ कोरिया रोड शो :** उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या नेतृत्वात राज्याच्या शिष्टमंडळाने साऊथ कोरिया येथे अनेक बैठका घेतल्या, गुंतवणूक आणि व्यापार संबंध वृद्धिंगत करण्यासाठी कोरियन गुंतवणूकदार, कोट्रा आणि इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स, साऊथ कोरिया यांचे बोर्ड ऑफ गव्हर्नर्स यांच्याशी संवाद साधला.

**एमआयडीसी तर्फे दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!**



**श्री. उदय सामंत**
मा. मंत्री, उद्योग

MAGNETIC MAHARASHTRA
#MadeForBusiness
Follow us on:

|| उद्यमात सकल समृद्धिः ||
MIDC
www.midcindia.org

**श्री. देवेंद्र फडणवीस**
मा. उपमुख्यमंत्री

**श्री. अजित पवार**
मा. उपमुख्यमंत्री




facebook.com/abpmajha | twitter.com/abpmajhatv | youtube.com/abpmajhatv
instagram.com/abpmajhatv | www.kooapp.com/profile/abpmajha | www.abplive.com

For queries, please contact: adsales@abpnetwork.com | Download the ABP Live app